महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या २७ मार्च,२००० रोजी सकाळी १०.३० वाजतां गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यांत आलेल्या १६५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांकः१६५/३

विषयः- प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना मधुमेह या आजारात औषधोपचारासाठी देण्यात येणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीत रु. ५०००/- वरुन रु. ८०००/- पर्यत वाढ करण्याबाबत.

ठराव क्रमांकः५५५१ दिनांकः- २७/३/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, वैद्यकीय खर्चात वेळोवेळी वाढ होत असल्यामुळे प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना मधुमेह या आजारात औषधोपचारासाठी देण्यात येणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीत रु. ५०००/- वरुन रु. ८,०००/- पर्यत वाढ करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः१६५/५

विषयः- मुंबई मंडळाच्या वसाहतीत लाभार्थींनी खुल्या बाजारातून स्वतः विकत घेतलेले हस्तांतरणीय विकास हक्काचा (टी.डी.आर.) वापर करण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.

ठराव क्रमांकः५५५२ दिनांकः- २७/३/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळाच्या वसाहतीतील तसेच इतर विभागीय मंडळांच्या वसाहतीतील ज्यामध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार हस्तांतरणीय विकास हक्काचा (टी.डी.आर.) वापर अनुज्ञेय आहे, अशा लाभार्थींनी स्वतः खुल्या बाजारातून टी.डी.आर. विकत घेऊन त्यांना भाडेपट्टयाने वितरीत केलेल्या भूखंडावर असा टी.डी.आर. वापरण्याची परवानगी मागितल्यास खालील अटी व शर्तींवर अशी परवानगी/ना हरकत प्रमाणपत्र अदा करण्यास मान्यता देणेत करण्यांत येत आहे.

अ) उपरोक्त परवानगी/ना हरकत प्रमाणपत्राबाबत खालील आकारणी करण्यांत यावी.

१)मुंबई शहर (वार्ड क्र.ए ते जी)	रु. १०००/-	प्रति चौ.मी.टी.डी.आर.क्षेत्रफळावर
२)पश्चिम उपनगरे (वार्ड क्र.एच/पूर्व-एच/पश्चिम,के/पूर्व-के/पश्चिम)	रु. ६००/-	वरीलप्रमाणे
३)पूर्व उपनगरे (वार्ड क्र.एम. एन व एल)	रु. ३००/-	वरीलप्रमाणे
४)पश्चिम विस्तारीत उपनगरे (वार्ड क्र.पी/दक्षिण, पी/उत्तर,आर.)	रु. ३००/-	वरीलप्रमाणे
५)पूर्व विस्तारीत उपनगरे (वार्ड क्र.एस.टी.)	रु. २००/-	वरीलप्रमाणे

ब) उपरोक्त दर टी.डी.आर.चा वापर रहिवासी उपयोगासाठी होत असल्यास लागू करावा. इतर वापरासाठी या दरात खालीलप्रमाणे वाढ अथवा घट करण्यांत यावी.

१)व्यापारी उपयोग	:	उपरोक्त दराच्या दुप्पट
२)औद्योगिक वापर	:	उपरोक्त दराच्या दीडपट
३)शैक्षणिक,सामाजिक व इतर अनिवासी आणि अव्यापारी उपयोग.	:	उपरोक्त दराच्या निम्मेदराने

क) उपरोक्त आकारणी अधिमुल्य नसून ना हरकत पत्र आकारणी आहे. यावर वार्षिक भुईभाडे आकारु नये अशी परवानगी उपरोक्त आकारणी करुन मुख्य अधिकारी/मुंबई मंडळाने द्यावी.

ड) इतर विभागीय मंडळाच्या शहरात टी.डी.आर.चा नियम लागू झाल्यास संबंधित मुख्य अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागाचे दर मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडून मान्य करुन घेऊन, ना हरकत प्रमाणपत्र अदा करण्याची कार्यवाही करावी.

ई) उपरोक्त दर मुंबई शहरासाठीचे ३१-३-२००१ सालापर्यत आकारण्यात यावेत. त्यापुढे बाजारातील बांधकाम क्षेत्रातील मंदी अथवा चढ लक्षांत घेतां, वेळोवेळी सदरहू दर मुंबई व इतर शहरांसाठी बदलण्याचे संपूर्ण अधिकार उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा. यांना असतील.

फ) टी.डी.आर. खुल्या बाजारातून लाभार्थीने विकत घेण्यापूर्वी ना हरकत प्रमाणपत्र मागताना जर म्हाडाकडे असा टी.डी.आर. वितरणास उपलब्ध असल्यास, म्हाडाच्या धोरणानुसार असा म्हाडाकडे उपलब्ध असलेला टी.डी.आर. प्रथम वितरीत करावा. म्हाडाकडे मुंबई शहरासाठी उपलब्ध असलेल्या टी.डी.आर.चे वार्डनिहाय बाजारभाव दरवर्षी ठरविण्यासाठी खालील समिती नेमण्यांत येत आहे.

मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ	:	अध्यक्ष
मुख्य अभियंता-२/प्रा.	:	सदस्य
वरीष्ठ वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.	:	सदस्य
वरीष्ठ वास्तुशास्त्रज्ञ/मुंबई मंडळः		सदस्य सचिव

वरीलप्रमाणे गठीत करण्यांत आलेली समिती टी.डी.आर.चे दर वार्डनिहाय दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात प्राधिकरणाच्या मान्यतेने जाहीर करील.

या अटीं प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जाना लागू रहाणार नाहीत.

म) चटईक्षेत्र वितरणाच्या नेहमीच्या इतर अटी व शर्ती लागू करण्यात याव्यात.

ह) अशाप्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र वितरीत केल्यामुळे म्हाडा कोणत्याही बाबीबाबत जबाबदार असणार नाही, जसे की, सुविधा व अंतर्गत व बाहय इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणा तसेच, अस्तित्वात असलेल्या इमारतीची संरचनात्मकदृष्टया घ्यावयाची काळजी इत्यादीबाबत लाभार्थी सर्वस्वी जबाबदार असतील व त्या आशयाचा स्पष्ट उल्लेख लाभार्थींनी आपल्या अर्जात केलेला असावा व याबाबतचा उल्लेख मुख्य अधिकारी/विभागीय मंडळांनी ना हरकत प्रमाणपत्रात अशी परवानगी देताना करावा.

ज) उपरोक्त ना हरकत प्रमाणपत्र देताना म्हाडाच्या ठराव क्र.५३७७, दि. १४/१२/९८ नुसार फी आकारण्यात येऊ नये.

ल) ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यांत यावी.

बाब क्रमांकः१६५/६

विषयः- म्हाडाच्या वसाहतीत लाभार्थींना वितरीत केलेल्या रहिवाशी गाळे/भूखंड व इतर सुविधांसाठी वितरीत केलेल्या भूखंडाच्या वितरणाच्या वापरात बदल करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५५३</u> दिनांकः-२७/३/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं,

म्हाडाच्या वसाहतीत लाभार्थींना वितरीत केलेले गाळे/भूखंड, सहकारी गृहनिर्माण संस्थांना वितरीत केलेले निवासी भूखंड व इतर सुविधांसाठी वितरीत केलेल्या भूखंडाच्या वापरात बदल करण्यासाठी खालील अटी व शर्तीवर ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

१. अ) म्हाडाने बांधून वितरीत केलेले रहिवासी वापरातील गाळे व वैयक्तिक रहिवासी वापरासाठी १५० चौ.मी. पर्यतच्या वितरीत केलेल्या भूखंडामध्ये अनिवासी वापराची परवानगी देण्यासाठी ठराविक रक्कम वापर बदलाच्या क्षेत्रफळानुसार खालीलप्रमाणे आकारणी करुन कार्यवाही मुख्याधिकारी/विभागीय मंडळ यांनी करावी.

विभाग	निवासी वापराचा बदल अनिवासी वापरात करावयाच्या चटईक्षेत्रफळावर आकारावयाचा दर प्रति चौ.मी.मध्ये
१. मुंबई शहरासाठी	रु. १०००/- प्रति चौ. मी.
२. महानगरपालिका असलेल्या शहरांसाठी	रु. ५००/- प्रति चौ.मी.
३. इतर नागरी शहरांसाठी	रु. २५०/- प्रति चौ.मी.

ब) गाळे अथवा १५० चौ.मी. क्षेत्रफळापर्यत वैयक्तिक भूखंडाच्या बाबतीत वरीलप्रमाणे आकारणी करावी पण अशा बदलामुळे वाढीव वार्षिक भुईभाडे आकारण्यात येऊ नये.

२. १५० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या निवासी अथवा इतर वापरासाठी वितरीत केलेल्या भूखंडाबाबत वापर बदल करण्याच्या प्रकरणात खालील ३ प्रकारे अधिमुल्य विचारात घेऊन सर्वाधिक अधिमुल्य वापर बदलाच्या क्षेत्रफळास आकारुन व वार्षिक भुईभाडे टक्केवारीनुसार वाढवून परवानगी द्यावी.

अ) प्राधिकरणाचा ठराव क्र. ३०९४, दि.१६/११/९२ तसेच या धोरणात वेळोवेळी सुधारणा केलेल्या किंमतीविषयक धोरणानुसार वापर बदलाच्या सर्वाधिक किंमतीच्या प्रकारचे अधिमुल्य व मूळ वितरीत केलेल्या वापराचे प्राधिकरणाचा ठराव क्र.३०९४ दि.१६/११/९२ तसेच या धोरणात वेळोवेळी सुधारणा केलेल्या किंमतीविषयक धोरणानुसार अधिमुल्य यांच्या फरकाच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम आकारणे. फरकाची रक्कम २५ टक्के पर्यत ठेवण्याचे कारण असे कीं, जमिनीचे वितरण करण्यात आलेले असते व त्याचा ताबा लाभार्थींकडे असतो. अशा वितरीत केलेल्या जमिनीचा वापर म्हाडा करु शकणार नाही. फार जास्त प्रमाणात आकारणी केल्यास लाभार्थींना अशा वापर बदलाची रितसर परवानगी घेण्यापासून परावृत्त केल्यासारखे होईल.

ब) प्राधिकरणाचा ठराव क्र. ३०९४, दि.१६/११/९२ तसेच या धोरणात वेळोवेळी सुधारणा केलेल्या किंमतीविषयक धोरणानुसार वापर बदलाच्या सर्वांधिक किंमतीच्या प्रकाराचे अधिमुल्य व मुलतः भरलेल्या अधिमुल्याची रक्कम १२ टक्के वार्षिक चक्रवाढ व्याजाने अर्ज केल्याच्या दिनांकापर्यत सुधारीत केलेले अधिमुल्य यांच्या फरकाच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम अधिमुल्य म्हणून आकारणे. (भूखंडाचे विविध लाभार्थीमध्ये हस्तांतरण होऊन याचे नियमितीकरण केले असल्यास, अशा व्यवहारात अदा केलेली रक्कम १२ टक्के वार्षिक चक्रवाढ व्याजाने सुधारीत अधिमुल्य ठरविताना विचारात घ्यावी)

क) रु. १०००/- प्रति चौ.मी. दराने प्रशासकीय खर्च वापर बदलावयाच्या क्षेत्रफळासाठी मुंबई शहरासाठी रु. ५००/- प्रति चौ.मी. इतर महानगरपालिका असलेल्या शहरांसाठी व रु. २५०/- प्रति चौ. मी. उर्वरीत शहरांसाठी आकारणे.

३. उपरोक्त परिच्छेद २ अ,ब,क नुसार जी अधिमुल्याची रक्कम अधिकची असेल त्यानुसार अधिकचे अधिमुल्य व अधिकचे वार्षिक भुईभाडे (टक्केवारीनुसार) आकारुन वापर बदलाबाबत ना हरकत प्रमाणपत्र विभागीय मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांनी द्यावे. १५० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूखंडाचा वापर बहुमजली इमारतीत (तळ अ १ च्या वर) व्यापारी उपयोगासाठी होत असल्यास, व्यापारी उपयोगाचा बाजारभाव रहिवासी वापाराच्या बाजारभावाच्या दीडपट गृहीत धरण्यात यावा. चटईक्षेत्राअंतर्गत सामाविष्ट क्षेत्रफळावर (१५० चौ.मी.पेक्षा जास्त आकारमानाच्या भूखंडासाठी) उपरोक्त धोरणानुसार आकारणी करुन प्रस्ताव हाताळावेत.

<u>इतर अटी व शर्ती</u>

४. अ) वापर बदलण्याबाबत मंडळामार्फत केवळ ना हरकत प्रमाणपत्र अटी व शर्तीवर देण्यांत यावे. याबाबतच्या आवश्यक परवानग्या स्थानिक संस्थांकडून प्राप्त करुन घेण्याची सर्व जबाबदारी लाभार्थींवर सोपविण्यात यावी व अशी परवानगी प्राप्त करुन घेण्यासाठी लाभार्थींवर कालमर्यादा घालून देण्यांत यावी.

ब) या धोरणात सुचविण्यांत आलेले वापर बदलासाठी देण्याच्या ना हरकत प्रमाणपत्राचे विविध दर वेळोवेळी बदलण्याचे (कमी अधिक करण्याचे) तसेच धोरणाशी विसंगत असलेल्या वापर बदलच्या कांही प्रकरणांसाठी लागू करावयाचे अधिमुल्य व वार्षिक भुईभाडे ठरविण्याचे प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

क) ज्या प्रकरणात वापर बदल पूर्वीच मंजूरी न घेता करुन टाकण्यात आला आहे अशा सर्व प्रकरणात या धोरणानुसार आकारावयाच्या अधिमुल्य/भुईभाडे/खर्च रकमेच्या १५० टक्के रक्कम आकारावी. याबाबत सर्व विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी वर्तमानपत्रात तसेच वैयक्तिक पत्रानुसार संबंधितांना कळवावे. सहा महिन्याच्या कालावधीत लाभार्थींनी वापर बदलाची रक्कम भरुन प्रकरण निकाली काढल्यास, अधिकची ५० टक्के रक्कम आकारु नये. ६ महिन्यांचा कालावधी प्रकरणनिहाय वाढविण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहेत. ठरविलेल्या कालावधीनंतर ५० टक्के अधिकचे अधिमुल्य/वार्षिक भुईभाडे खर्च या धोरणानुसार आकारण्यांत यावे.

ड) ज्या प्रकरणात अनधिकृत वाढीव बांधकाम करुन अशा वाढीव क्षेत्रात अनिवासी वापर करण्यांत येत असल्यास अशा वाढीव बांधकामासाठी या धोरणानुसार आकारावयाच्या अधिमुल्याच्या १५० टक्के दराने अनामत रक्कम वसूल करण्यांत यावी व ज्यावेळी असे अनधिकृत बांधकाम काढून टाकण्यात येईल व मागणीनुसार अशी अनामत रक्कम बिनव्याजी लाभार्थींना मुख्याधिकारी/प्रादेशिक मंडळे यांच्यामार्फत परत करण्यांत यावी.

इ) या धोरणानुसार नव्याने वापर बदलाची परवानगी देताना अशा वापर बदलाबाबत विकास नियंत्रण नियमावलीनुसार प्रस्ताव अनुज्ञेय असल्यास या धोरणानुसार अशी परवानगी देण्यांत यावी.

फ) वसाहतीस अत्यावश्यक असलेल्या सुविधा वापराचे किमान आवश्यकतेचे प्रमाण कमी होणार नाही, याबाबत वापरबदलाची परवानगी देतांना नियोजनात्मकदृष्टीने विचार करण्यांत यावा.

ज) अशाप्रकारच्या मंडळाने दिलेल्या परवानगीमुळे कोणत्याहीप्रकारे वाढीव इन्फ्रास्ट्रक्चर/मुलभूत सुविधा अधिक प्रमाणात पुरविण्याची जबाबदारी मंडळावर/प्राधिकरणावर राहणार नाही.

५. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता ठरावाची अंमलबजावणी करण्यांत यावी.

बाब क्रमांकः१६५/७

विषयः- प्राधिकरणाच्या विविध कार्यालयाकरीता संगणक खरेदी करण्याबाबत.

ठराव क्रमांकः५५५४ **दिनांकः-२७/३/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. बाब टिपणीत नमूद केल्याप्रमाणे मे.एच.सी.एल.इन्फोसिस्टीम मर्यादित यांचेमार्फत २ सर्व्ह अ ५ इन्टेल पी-३ संगणक व इतर अनुषंगिक साहित्य केंद्र शासनाच्या डी.जी.एस. ॲण्ड डी दर-करारानुसार विकत घेण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

२. तसेच मे. झेनीथ कॉम्प्युटर्स मर्यादित या कंपनीकडून, निविदा न मागविता, सुमारे ३९ कॉम्प्युटर्स (एच.पी.ब्रायो ४६६ एमएच झेड) व अनुषंगिक साहित्य (प्रिन्टर्स वगैर) विकत घेण्याच्या उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निर्णयास प्राधिकरणाची ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः- १६५/८

विषयः- प्राधिकरणाच्या पवई, ओशिवरा, मानखुर्द व सायन येथील सदनिकांच्या विक्रीकरीता धडक कार्यक्रम हाती घेणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५५५</u> **दिनांकः- २७/३/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाने पवई, ओशिवरा, मानखुर्द व सायन येथील सदनिकांच्या विक्रीचा धडक कार्यक्रम राबविण्यास व त्यासाठी राबविण्यांत येणाऱ्या विविध पर्यायासाठी होणाऱ्या रु. एक कोटीपर्यतच्या खर्चास तसेच मे. हरी माथुर कन्सल्टन्सी यांना हे काम देण्याच्या उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निर्णयास प्राधिकरण मंजूरी देत आहे. प्राधिकरणाच्या पणन विभागातर्फे हा गाळेविक्रीचा सदर धडक कार्यक्रम राबविण्यांत यावा.

सदर निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१६५/९

विषयः- लातूर येथे गुमास्ता सहकारी गृहनिर्माण संस्था म. यांचेकरीता अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना राबविणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५५६</u> दिनांकः- २७/३/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, औरंगाबाद मंडळाने विषयात नमूद केलेल्या विशेष गटांच्या योजनेची अंमलबजावणी एजन्सी तत्वावर करण्यासाठी प्राधिकरण संमती देत आहे. सदरहू प्रस्ताव शासनाच्या पूर्व परवानगीसाठी पाठविण्याची आवश्यकता नाही.

सदर निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता सुरु करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः१६५/१०

विषयः- सर्व्हे क्र. २६३ सी.टी.एस. क्र.६ ए (भाग) मौजे मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई येथे ३५८४ संक्रमण सदनिका बांधण्याची योजना प्रस्तावित सुधारीत योजना.

ठराव क्रमांकः५५५७ दिनांकः-२७/३/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, सर्व्हे क्र. २६३ सी.टी.एस. क्रमांक ६-अ (भाग), मालवणी, मालाड (पश्चिम) येथील ३४८८ संक्रमण/अल्प उत्पन्न सदनिकां बांधण्याची योजना ११.५० हेक्टर इतक्या क्षेत्रफळाच्या संपूर्ण जमिनीवर २.५ चटईक्षेत्र निर्देशांक वापरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकास नियंत्रण विनियम ३३ (१४) (ड) अंतर्गत मंजूरी दिली आहे. या योजनेमध्ये प्राधिकरणास होणारा आर्थिक तोटा कमी करण्याकरीता ही योजना ३३ (१४) (ड) अंतर्गत ठेवून अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक १.२० पेक्षा किंचित जास्त चटईक्षेत्र निर्देशांक ठेवून योजना सुधारीत केल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास द्यावयाच्या गाळयांची संख्या कमीतकमी ठेवून विक्री करावयाच्या गाळयांची संख्या वाढेल व योजनेत होणारा संभाव्य तोटा कमीतकमी होईल. विक्रीच्या गाळयांचा दर रु. ९९५/- प्रति चौ.फू. फक्त सदरहू जाहिरात दिल्यापासून सहा महिन्याच्या आंत मागणी करणाऱ्या लाभधारकांनाच अनुज्ञेय राहील.

सुधारीत योजनेस व वरीलप्रमाणे विक्रीच्या दरास प्राधिकरणाचे बैठकीत सर्वांनुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

वरील ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता सुधारीत योजनेचे नियोजन योजनेच्या वास्तुशास्त्रज्ञांकडून करुन घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मंजूरीकरीता पाठविण्यात यावे व खुल्या विक्रीच्या गाळयांची विक्रीकरीता वृत्तपत्रात जाहिरात देण्यांत यावी, इत्यादी कार्यवाही करण्यांत यावी.

बाब क्रमांकः१६५/११

विषयः- मौजा गाडगा (ख.क्र. ५६/१) नागपूर येथे उच्च उत्पन्न गटातंर्गत १९२ फलॅटपैकी १३२ फलॅट, २२ दुकाने, व २२ कार्यालयीन कक्ष बांधणे- बांधकाच्या निविदा स्वीकृत करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५५८</u> **दिनांकः-२७/३/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने गाडगा, नागपूर येथे प्रस्तावित केलेल्या १३२ एचआयजी गाळे, २२ दुकाने व २२ चेंबर्सच्या बांधकामासाठी मागविलेल्या निविदेला अनुसरुन प्राप्त झालेला निम्नतम देकार निविदा किंमतीहून १४ टक्क्यांनी कमी म्हणजे रु.६,६५,५१,५०८/- च्या निविदा किंमत/देकार देणारे ईगल कन्स्टक्शन कंपनी यांचा देकार स्विकारण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदरहू ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यासही परवानगी देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक १६५/१२.

विषय : प्रतिक्षा नगर, सायन कोळीवाडा येथील ३५० संक्रमण सदनिका म्हात्रे आणि असोसिएटस् यांना वितरीत करणेबाबत.

ठराव क्रमांक :५५५९ दिनांक : २७/३/२०००

एकमताने निर्णय घेतला कि,

प्रतिक्षा नगर, सायन येथील ६०८ संक्रमण गाळयांपैकी ३५० संक्रमण **गाळे** म्हात्रे ॲन्ड असोसिएटस् यांना दोन वर्षासाठी रुपये १२००/- प्रति गाळा आणि रुपये ५,०००/- प्रती गाळा अनामत रक्कम घेऊन उर्वरित गाळयांच्या विक्री किंमतीची रक्कम बँक गॅरँटीच्या स्वरुपात घेऊन बाब टिपणीतील अटी व शर्तीच्या अधीन राहून गाळे संक्रमण शिबिर म्हणून भाडे तत्वावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच ६०८ संक्रमण गाळयातील उर्वरित २५८ गाळे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास रुपये १.२५ लक्ष प्रती गाळा किंमत घेऊन हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १६५/१३.

विषय : विरार, तालुका-वसई येथे दूरसंचार,कल्याण जिल्हा महाप्रबंधक यांना भूखंड वितरण करणेबाबत.

ठराव क्रमांक :५५६० **दिनांक : २७/३/२०००**

एकमताने निर्णय घेतला कि,

दूरसंचार विभाग, कल्याण यांना विरार येथील सिडकोने मंजूर केलेल्या सार्वजनिक सुविधांसाठी आरक्षित ठेवलेल्या अंदाजे ४८२२.३० चौ.मी.आकारमानाचा भूखंड प्रति चौरस मिटर रुपये ३,०५०/- प्रमाणे एकूण रुपये १,४७,००,०००/- एवढी किंमत आकारुन व वार्षिक रु.१/- भुईभाडे आकारुन टेलिफोन एक्सचेंज व सेवा कर्मचा-यांच्या निवासस्थानासाठी म्हाडाच्या प्रचलित जमिन वितरण व किंमत विषयक धोरणाच्या अधीन राहून वितरीत करण्यास कोंकण मंडळास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २४ एप्रिल, २००० रोजी सकाळी ११.०० वाजतां गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यांत आलेल्या १६६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांकः१६६/२

विषयः- तत्कालिन राजीव गांधी निवारा प्रकल्प विभागात कंत्राटी पध्दतीवर नेमण्यात आलेल्या वास्तुशास्त्रज्ञ अभियांत्रिकीस पदावरील अधिकाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

श्रीमती उषा सिंग यांचे प्रकरण.

ठराव क्रमांकः५५६१ **दिनांकः-२४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, श्रीमती उषा सिंग, वास्तुशास्त्रज्ञ यांना दि. १/१/१९९६ पासून चौथ्या आयोगानुसार निर्धारीत केलेली रु. ३२००-४६२५ अशी सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यास खालील अटींवर व शर्तींवर मान्यता देण्यांत येत आहे.

१. सदरहू वेतनश्रेणी ही फक्त वेतन निश्चितीसाठी सुधारण्यात आली असून वेतन व भत्ते यामधील फरक दिनांक १/१/१९९६ पासून अनुज्ञेय राहील.

२. सुधारीत वेतनश्रेणी लागू केल्यामुळे त्यांची सेवा अखंड होती असा हक्क त्यांना प्रस्थापित करता येणार नाही.

३. श्रीमती उषा सिंग, वास्तुशास्त्रज्ञ यांची वेतनश्रेणी रु.३०००-४५०० वरुन रु. ३२००-४६२५ अशी सुधारण्यात आल्याने त्यांना रु. ३२००-४६२५ या विद्यमान वेतनश्रेणीत पांचव्या वेतन आयोगानुसार रु. १०६५०-१५८५० ही सुधारीत वेतनश्रेणी लागू होईल.

बाब क्रमांकः- १६६/४

विषयः- श्री. गुरुगोविंद सिंग विधायक संस्थेस, टागोरनगर, विक्रोळी येथील माध्यमिक शाळेसाठी भूखंडावरील गुरुव्दाराच्या अनधिकृत बांधकामासह मोकळी जागा वितरीत करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५६२</u> **दिनांकः२४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्री. गुरुगोविंद सिंग विधायक संस्था यांनी अनधिकृत बांधलेल्या गुरुव्दाराखालील त्याला संलग्न केलेल्या इतर बांधकामाखालील आणि त्याच्यासमोरील मोकळी जागा जी गुरुव्दाराच्या कामासाठी वापरात आणली जाते, ती जागा सदरहू संस्थेस प्रचलित बाजारभाव आकारुन वितरीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. हा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यांत यावा. ही जागा नकाशात रोमन एक अंकात दाखविण्यात आली आहे.

उर्वरीत जागा जी नकाशात रोमन दोन या अंकात दर्शविण्यांत आली आहे, ती शाळेसाठी आरक्षित असल्यामुळे सदरहू जागा श्री.गुरुगोविंद सिंग विधायक संस्थेस माध्यमिक शाळा बांधण्यासाठी प्राधिकरणाच्या १९९२ च्या किंमतीविषयक धोरणानुसार देण्यांत यावी. या जागेमधील रोमन-तीन या अंकात दर्शविलेल्या अतिक्रमित जागेचाही समावेश असून या संपूर्ण जागेचा म्हणजे रोमन-दोन, रोमन-तीन यासाठी प्राधिकरणाच्या १९९२ च्या धोरणानुसार किंमत आकारण्यांत यावी. उर्वरीत जागा जी नकाशात रोमन चार,पाच, सहा अशी दर्शविण्यांत आली आहे, ती अनुक्रमे शनेश्वर मंदिर, शिवाजी स्तंभ व समाजमंदिर यांच्यासाठी उपयोगात असल्याने सदर जागा ही या तीन कामासाठी वापरली जाणार असल्यामुळे त्या त्या कामांकरीता वापरण्यास जर संबंधित संस्था पुढे आल्यास त्यांना प्राधिकरणाच्या किंमतीविषयक प्रचलित धोरणानुसार किंमत आकारुन आणि आवश्यकता भासल्यास शासनाची मान्यता घेऊन देण्यांत यावी. जमिनीच्या नकाशाची प्रत सोबत जोडण्यांत आली आहे.

बाब क्रमांकः- १६६/५

विषयः- वांद्रे,पूर्व येथील ॲपेक्स गॅस कंपनीला तात्पुरत्या भाडेपट्टयावर देण्यांत आलेला म्हाडाचा भूखंड त्यांचेकडून परत घेऊन तो कोसळलेल्या इमारतींच्या रहिवाश्यांनी स्थापन केलेल्या न्यू गोविंदा टॉवर्स या नियोजित सहकारी संस्थेस मानवतावादी दृष्टीकोनातून वितरीत करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५६३</u> दिनांकः२४/४/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, खेरवाडी वांद्रे, (पूर्व) येथील सर्व्हे क्रमांक ३४१ पैकी सुमारे १८९० चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड मे. ॲपेक्स गॅस कंपनीला तात्पुरत्या भाडेपट्टयावर देण्यांत आलेला म्हाडाचा भूखंड त्यांच्याकडून परत घेऊन ज्या अटीं व शर्ती मे. अपेक्स गॅस कंपनीला लागू होत्या, त्याच अटीं व शर्तीवर न्यू गोविंद टॉवर्स या इमारतीतील रहिवाश्यांनी स्थापन केलेल्या न्यू गोविंदा टॉवर्स या नियोजित गृहनिर्माण संस्थेस वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

म्हाडास १०११ चौ. फू. चटईक्षेत्र विनामूल्य देण्याबाबतची अट जशीच्या तशी संस्थेवर बंधनकारक राहील. मात्र, जर या सबंधित गृहनिर्माण संस्थेस या अटीं व शर्ती पूर्ण करण्यास अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाची गरज असेल तर, तसे चटईक्षेत्र म्हाडाकडे उपलब्ध असलेला टी.डी.आर. विकत घेणे तसेच टी.डी.आर. डाऊन लोड करण्यासाठी प्रचलित धोरणाचे पालन करणे गृहनिर्माण संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहतां करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांकः-१६६/६

विषयः- मौजे पहाडी गोरेगांव,पश्चिम येथील न.भू.क्र. २९१ पै. उन्नतनगर क्र.३, फिल्मीस्तान स्टुडिओच्या मागच्या बाजूचा इ.क्र. १९ समोरील सुमारे ५२०-०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड श्री. विजू पेणकर यांना व्यायाम शाळा बांधण्यासाठी वितरण करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५६४</u> **दिनांकः२४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला की,

मौजे पहाडी, गोरेगांव पश्चिम येथील न.भू.क्र.२९१ पै. उन्नतनगर क्र.३,फिल्मीस्तान स्टुडिओच्या मागच्या बाजूचा इ.क्र.१९, समोरील सुमारे ५२०.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड श्री. विजू पेणकर यांना व्यायामशाळा बांधण्यासाठी प्रचलित निवासी बाजारभाव आकारुन विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

श्री. विजू पेणकर यांना वितरीत करावयाचा भूखंड हा निवासी असल्यामुळे त्याचा वापर तळमजल्यावर व्यायामशाळा व वरच्या मजल्यावर निवासी बांधकाम करु शकतील. मात्र, त्यासाठी आवश्यक असलेली परवानगी मुंबई महानगरपालिकेकडून घेणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

बाब क्रमांकः१६६/८

विषयः- भूकर पाहणी क्र.५२५ व ५२५/१ मलबार हिल-कंबाला हिल विभाग ऑगस्ट क्रांती मार्ग, डी विभाग येथील ताज बिल्डींग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेचा पुनर्विकास.
<u>म्हाडा व मालमत्ताधारक/विकसक यांच्यामार्फत संयुक्तरित्या जॉईट व्हेंचर करण्याबाबतचा प्रस्ताव.</u>

<u>ठराव क्रमांकः ५५६५</u> **दिनांकः२४/४/२०००**

भूकर पाहणी क्र. ५२५ व ५२५/१, मलबार हिल- कंबाला हिल विभाग, ऑगस्ट क्रांती मार्ग, डी-विभाग येथील ताज बिल्डींग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेचा म्हाडा व मालमत्ताधारक/विकसक यांच्यामार्फत संयुक्तरित्या जॉईट व्हेंचर माध्यमातून पुनर्विकास करण्यासाठी सादर केलेल्या प्रायोगिक प्रस्तावास एकमताने तत्वतः मान्यता देण्यांत आली.

विधीतज्ञ/अर्थतज्ञ यांनी प्रकल्प अहवाल तयार करुन प्राधिकरणासमोर अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यांत यावा. प्रकल्प अहवालासाठी लागणारा निधी प्रथमतः म्हाडाकडून पुरविण्यांत यावा व नंतर तो प्रकल्पावर टाकण्यात यावा.

बाब क्रमांकः१६६/१०

विषयः-विशेष नियोजन प्राधिकरण भाग-१, सोलापूर येथील म्हाडास नागरी जमीन कमाल धारणा कायद्यान्वये प्राप्त झालेल्या अतिरिक्त जमिनीच्या फेर भूसंपादनाबाबत.

<u>ठराव क्रमांकः ५५६६</u> **दिनांकः२४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, उपाध्यक्ष/प्रा. यांनी दि. ३०.३.२००० रोजी घेतलेल्या बैठकीत विशेष नियोजन प्राधिकरण भाग-१, सोलापूर येथील म्हाडास नागरी कमाल धारणा कायद्यान्वये प्राप्त झालेल्या अतिरिक्त जमिनीच्या फेर भूसंपादनाबाबत घेण्यांत आलेल्या खालील निर्णयांना कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

१. संपादनाखालील जमिनीची संयुक्त मोजणी करणे आवश्यक असल्याने त्यापोटी रु. ४.०२ लक्ष मोजणी फी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे जमा करण्याचा निर्णय झाला व त्याप्रमाणे दर्शनी हुंडी क्रमांक ५४१३८३, दि. ३.४.२००० अन्वये रक्कम रु. ४.०२ लक्ष तालुका निरिक्षक भूमि अभिलेख उत्तर सोलापूर यांचेकडे जमा केली.

२. संपादनाखालील जमिनीचे मूल्यांकन अद्याप जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडून करण्यांत आलेले नाही ती रक्कम निश्चित झाल्याशिवाय जमिनीच्या किंमतीपोटी म्हाडास किती रक्कमेची नुकसान भरपाई द्यावी लागेल याचा अंदाज येत नाही.

त्यामुळे प्रथम जमिनीचे मूल्यांकन करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी/सोलापूर यांना कळविण्यांत यावे असा निर्णय घेण्यांत आला. मूल्यांकन ठरविताना प्रत्यक्ष जमिनीचा ताबा जेव्हा मिळाला त्यावेळचे मूल्यांकन करावे व त्यानंतरच करारपत्र करावे असाही निर्णय घेण्यांत आला तसे प्राधिकरणाकडून दि.३१.३.२००० च्या अर्धशासकीय पत्रान्वये जिल्हाधिकारी,सोलापूर यांना कळविण्यांत आले आहे.

३. ही रक्कम गाळे व भूखंड लाभार्थीकडून आता वसूल करणे शक्य नसल्यामुळे म्हाडास शासनाने अनुदानाच्या स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यांत यावा.

४. म्हाडातर्फे शासनमान्य व्हॅलूअर नेमून भूसंपादनाखालील जमिनीचे मूल्यांकन
ठरवून घेण्यांत यावे,ज्यामुळे शासनाने केलेले मूल्यांकन पडताळून पाहता येईल.

५. ज्या जमिनी विकसित केल्या आहेत, परंतु त्रयस्थ हितसबंध निर्माण झाले
नाहीत अशी १४.०७ हेक्टर जमिनी मूळ मालकांस भूसंपादनाचा खर्च व विकास खर्च वसूल करुन घेऊन परत कराव्यात.

६. ज्या जमिनीवर अंतर्गत विकास कामे करण्यांत आलेली नाहीत व त्रयस्थ हितसबंध निर्माण झालेले नाहीत अशा ९.२७ हेक्टर जमिनी मूळ मालकास भूसंपादनाचा खर्च व बाहय विकास खर्च वसूल करुन परत करण्यांत याव्यात.

बाब क्रमांकः१६६/११

विषयः- प्राधिकरणाच्या वाहन वापरावर असलेली बंधने

<u>ठराव क्रमांक ५५६७</u> **दिनांकः-२४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाच्या/मंडळाच्या कामाची व्याप्ती विचारांत घेतां, रु. १२०००-१६५०० या व त्यावरील वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांना कार्यालय ते निवासस्थान असा प्रवास करण्यासाठी प्राधिकरणाच्या वाहनांचा वापर करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रवास हा कर्तव्य प्रवास म्हणून समजण्यांत यावा.

बाब क्रमांकः१६६/१३

विषयः- झोपडपट्टी विकासकांना संक्रमण शिबीरात गाळे
देताना त्यांच्याकडून वाढीव आगाऊ भाडे घेणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः ५५६८</u> **दिनांकः- २४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, खाजगी विकासकांना संक्रमण शिबिरांतील गाळे वितरण करतांना एक वर्षाचे आगाऊ भाडे घेण्याऐवजी त्यांच्याकडून तीन वर्षाचे आगाऊ भाडे घेण्यांत यावे. तसेच अनामत रक्कम रु. ५०००/- व संक्रमण शिबीर गाळयांचे बाजारमूल्य एवढा रकमेचे बॅकेंचे हमीपत्र घेण्यांत यावे.

सदर निर्णय महापालिकेला देण्यांत आलेल्या गाळयांकरीताही लागू करण्यांत यावा.

बाब क्रमांकः १६६/१४

विषयः- दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरातील निवासी गाळयांचा वाणिज्य वापर करीत असल्याने वाढीव भाडे आकारणेबाबत.

ठराव क्रमांकः५५६९ **दिनांकः-२४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरांतील निवासी गाळयांचा वाणिज्य वापर होत असल्यास वाणिज्य आकाराप्रमाणे रु. ५२५/- प्रतिमाहप्रमाणे भाडे रक्कम आकारण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१६६/१५

विषयः- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरातील अतिरिक्त गाळे आम जनतेला भाडेतत्वावर देणेबाबत.

ठराव क्रमांकः ५५७० **दिनांकः २४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, मंडळाकडे अतिरिक्त उपलब्ध असलेल्या संक्रमण शिबीराचे गाळे अथवा घुसखोरी झालेले गाळे आम जनतेला विक्री तत्वावर देण्यांत यावेत. असे करतांना खालील बाबीं विचारांत घेण्यांत याव्यात

१. नजिकच्या काळात मंडळाच्या मालकीच्या ज्या संक्रमण शिबिरांतील जागेवर पुनर्विकास हाती घेण्यांत येणार नसतील तेच गाळे या योजनेखाली आणण्यांत यावेत. उदा. कुलाबा, सायन, वांद्रे, जयकोच किंवा इतर मोक्याच्या ठिकाणी असलेले गाळे नजिकच्या काळात विकास करण्याचा विचार असल्याने असे गाळे या योजनेतून वगळण्यांत यावेत.

२. गाळयांची संपूर्ण विक्री किंमत त्यांच्या खाली व्यापलेली जमीन, त्यांचा सद्याचा बाजारभाव व त्यावरील बांधकाम खर्च एक रकमी वसूल करण्यात यावा.

आम जनतेला अतिरिक्त गाळे देतांना खालील अटींवर गाळे देण्यांत यावेत.

१. भाडेकरुने शपथपत्र लिहून द्यावे की, ते कोणत्याही जुन्या उपकरप्राप्त इमारतीचे भाडेकरु नाहीत व ते पुनर्रचित इमारतीत गाळयांची मागणी करणार नाही.

२. सदर गाळयांची रंगरंगोटी, देखभाल दुरुस्ती, प्रलंबित वीजेचे देयक असल्यास ते भरण्याची जबाबदारी गाळेधारकांची राहील. वीज, पाणी,स्वच्छता,देखभाल अशासारखे एकत्रित सेवा आकार भरणे भाडेकरुंवर बंधनकारक राहील. तसेच जर प्रॉपर्टी टॅक्स भरावा लागला तर त्याच्या वाटयाला येणारा टॅक्स भरणे भाडेकरुंवर बंधनकारक राहील.

३. अर्जदार मुंबई महानगर प्राधिकरण हद्दीतील कायमचा रहिवाशी असावा. अर्जदाराचे/त्याचे पति पत्नी/अज्ञात मुले यांचे नावे बृहन्मुंबई शहरांत गाळा/भूखंड अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासदत्व नसावे.

यासाठी दु. व पु. मंडळाने एक स्वयंपूर्ण योजना तयार करावी व त्याची जाहीर माहिती आम जनतेला देण्यांत यावी.

बाब क्रमांकः१६६/१६

विषयः- शासनाकडून प्राधिकरणाला निरनिराळया योजना/ कार्यक्रम राबविण्यासाठी प्राप्त होणाऱ्या निधीबाबत.

<u>ठराव क्रमांकः ५५७१</u> **दिनांकः- २४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणातंर्गत झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम व इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रम हे दोन मुख्य व महत्वाचे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेला निधी शासनाकडून मिळविण्यासाठी जे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत आले होते, त्यांतील कांही जुजबी प्रकरणांना शासनाने मान्यता देऊन इतर प्रकरणे फेटाळण्यांत आली आहेत. या वित्तीय वर्षामध्ये रु. १७० कोटीच्या निधीपैकी फक्त रु. ७० कोटीचा निधी शासनाकडून प्राधिकरणास मिळाला आहे. अजून रु. १०० कोटीचा निधी शासनाकडून यावयाचा बाकी आहे.

शासनाकडून उपरोक्त निधी प्राप्त न झाल्यामुळे म्हाडाचे प्रमुख व महत्वाचे कार्यक्रम राबविण्यासाठी अडचणीं निर्माण झाल्या आहेत. या कारणास्तव शासनाकडून प्राधिकरणास उपलब्ध होणाऱ्या निधीमधून करण्यांत येणारी कामे उदा. दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रम, झोपडपट्टी सुधार कार्यक्रम तसेच विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर आदि योजना शासनाकडून निधी मिळाल्याशिवाय करु नयेत.

दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रम, झोपडपट्टी सुधार कार्यक्रम तसेच संरक्षक भिंती बांधण्याच्या योजना अंतिम टप्प्यात असतील व ती कामे पूर्ण न केल्यास वित्तीय तसेच जिवित हानी होऊ शकेल अशी कामे मात्र प्राधिकरणाच्या निधीतून पूर्ण करण्यांत यावीत. इतर कामे शासनाकडून म्हाडाने यापूर्वी खर्च केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती झाल्याशिवाय करण्यांत येऊ नये. या निर्णयाची प्रत शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडे पाठविण्यांत यावी.

बाब क्रमांकः१६६/१७

विषयः- म्हाडाच्या विविध कार्यालयांचे संगणकीकरण करण्यासाठी एन.आय आय.टी. या संस्थेला नेमणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः ५५७२</u> **दिनांकः२४/४/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, उपाध्यक्ष/प्रा. यांचे समितीने शिफारस केल्याप्रमाणे एन.आय.आय.टी. या संस्थेला पहिल्या टप्प्याचे काम देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. कामाची व्याप्ती व कामाची सुसाध्यता (Scope / Feasibility of Work) पाहून रु. १३.५० लाखांच्या अंदाजित खर्चाला मान्यता देण्यांत येत आहे.एन.आय.आय.टी.या संस्थेने दिलेला दर कमी करण्याबाबत चर्चा करुन वाटाघाटीने कमी करुन घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा.यांना देण्यांत येत आहेत.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ५ मे २००० रोजी सकाळी ११.०० वाजतां गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई येथे आयोजित करण्यांत आलेल्या १६७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : १६७/२

विषय : मोटार सायकल, स्कूटर, मोपेड / सायकल व अपंग कर्मचा-यांसाठी ३ चाकी स्वयंचलित सायकल किंवा मनुष्यबळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी म्हाडातील कर्मचा-यांना मंजूर करावयाच्या अग्रिमाबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५५७३</u> **दिनांक : ५.०५.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचा क्रमांक अग्रिम-१०९९/प्र.क्र.३/९९/विनियम, दिनांक ९ जुलै १९९९ चा निर्णय जसाचा तसा म्हाडा कर्मचा-यांना लागू करिण्यांत यावा.

बाब क्रमांक : १६७/३

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या वर्ग-३ मधील कर्मचा-यांना वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५५७४</u> **दिनांक : ५.०५.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाचे क्र.एमएच/संअ/ १०९४/ ४६९/प्र.१५, दिनांक २७.१०.१९९४ च्या परिपत्रकानुसार प्राधिकरणाच्या तसेंच प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळाच्या कार्यालयातील वर्ग-३ च्या कर्मचा-यांमधून ज्या कर्मचा-यांनी प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, अशा कर्मचा-यांना वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १.०४.१९९३ क्र.अग्रिम १०९२/प्र.क्र.१२/९२ विनियमाच्या निर्णयामधील विहित अटीं व शर्तीनुसार वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी रु. ४५,०००/- एवढा अग्रिम मंजूर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सन २०००-२००१ या वर्षासाठी संगणक खरेदीसाठी कर्मचा-यांना अग्रिम देण्यासाठी रु. ६७.५० लक्ष तरतूद केलेली आहे. अंदाजे ३०० कर्मचा-यांना अग्रिम मंजूर करण्यासाठी रु. १ कोटी ३५ लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे. रु. ६७.५० लक्ष ज्यादा खर्चास प्राधिकरणाने मंजूरी द्यावी.

बाब क्रमांक : १६७/४

विषय : मौजे पहाडी, गोरेगांव येथील इमारत क्र.३६ व ३७ च्या शेजारी नगर भूमापन क्र.२६८ मधील क्षेत्र ४९१ चौ.मी.च्या मोकळया भूखंडातून श्री.भरत दत्ताराम मुणगेकर यांना औषध विक्री दुकानासाठी व गोदामाकरिता सुमारे ४०० चौ.मी. व उपनगर रुग्णसेवा केंद्र यांना औषध विक्री दुकानासाठी सुमारे १० ✕ १५ चौ.फुट आकारमानाचा भूखंड वितरीत करणेबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५५७५</u> **दिनांक : ५.०५.२०००**

एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला,

१. मौजे पहाडी, गोरेगांव येीील इमारत क्रमांक ३६ व ३७ च्या शेजारी नगर भूमापन क्र.२६८ मधील क्षेत्र ४९१ चौ.मी. चा मोकळा भूखंड निवासी कारणासाठी म्हणून राखीव असला तरी त्या जागेवरील २२५ चौ.मी. जागा सागरकन्या महिला अन्नपूर्णा केंद्र व माहेर महिला झुणका भाकर केंद्र या दोन संस्थाना ११ महिन्याच्या करारावर वितरीत केलेल्या जागेचे नुतनीकरण करण्यांत आले नसल्यास नुतनीकरण करण्यांत येऊ नये व सदरहू वितरण रदद् करण्यांत यावे आणि संपूर्ण भूखंडाचा उपयोग निवासी उपयोगासाठी नियमाप्रमाणे करण्यात यावा.

२. सदरहू भूखंड हा निवासी वापराकरिता आरक्षित असल्यामुळे सदरहू भूखंड निवासी वापराकरीता वरीलप्रमाणे विकसित करण्यांत यावा व तसे शक्य नसेल तर अनिवासी वापरासाठी लेआऊट करुन वापरण्यांत यावे. वरीलप्रमाणे शासनास कळविण्यांत यावे.

बाब क्रमांक : १६७/५

विषय : मंत्रालयातील मा.मंत्री महोदय (गृहनिर्माण) यांचे कक्ष, अंतःकक्ष व परिषद कक्ष यांचे नुतनीकरण करणे.

<u>ठराव क्रमांक : ५५७६</u> **दिनांक : ५.०५.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. मंत्रालयातील मा.मंत्रीमहोदय गृहनिर्माण यांचे कक्ष, अंतःकक्ष, कार्यालय व परिषद कक्ष यांचे नुतनीकरणासाठी होणा-या सुमारे रु. १६ लाखाच्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

२. सदर काम तातडीने करावयाचे असल्याने निविदा न मागविता थेट पध्दतीने मे.अंबेरकर ॲन्ड आंबेरकर व बी.बी.बिल्डर्स यांच्या संयुक्त कंपनीकडून करवून घेण्याच्या मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी ही सभा देत आहे.

बाब क्रमांक : १६७/६

विषय : भारतनगर, वांद्रे (पूर्व) येथील बाहय सुविधांच्या उन्नतीकरणाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मिळणा-या निधीमधून आस्थापना खर्चापोटी वजावट न करण्याची परवानगी मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ५५७७ **दिनांक : ५.०५.२०००**

भारतनगर, वांद्रे (पूर्व) येथील नागरी बाहय सुविधांच्या उन्नतीकरणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त होणा-या निधीतून कामे करताना त्यामधून १० टक्के रक्कम आस्थापना खर्चापोटी वजावट करु नये यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १६७/७

विषय : दादासाहेब गायकवाडनगर, मालवणी येथील प्राधिकरणाच्या २३ हेक्टर जमिनीच्या पुनर्विकास करण्यासाठी ' महाराष्ट्र पोलीस हौसिंग सोसायटी फेडरेशन लिमिटेड ' यांना केलेल्या वितरणाबाबत.

ठराव क्रमांक : ५५७८ **दिनांक : ५.०५.२०००**

एकमताने असा निर्णय घेतला कीं, उच्च न्यायालयाच्या आदेशाची वेगवेगळी स्पष्टीकरणे (Interpretations) केल्यामुळे उच्च न्यायालयाकडे योग्य त्या मार्गदर्शनासाठी अर्ज करण्यांत यावा. महाडातर्फे महाअधिवक्ता (Advocate General) यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचा (Interpretation) आधार घेण्यात यावा. महाअधिवक्ता यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे योजना कार्यान्वित करणे शक्य व्हावी, यासाठी उच्च न्यायालयाकडून १४२९ गाळेधारकांना एका बाजूला आणि इतरांना दुस-या बाजूला एकत्रिक जागा देण्याबाबत सविस्तर आदेश आणण्यांत यावेत.

उपरोक्त कार्यवाही चालू असेपर्यंत व १४२९ गाळेधारकांना मालकीहक्काने गाळे देईपर्यंत सदरहू वसाहतीमध्ये सोयी सुविधा पूर्वीप्रमाणे पुरविण्यांत याव्यात. सदरहू व्यवस्था तात्काळ कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांक : १६७/८

विषय : मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांस शासन पत्र क्र.बीजीएस/१०९९/६१, दिनांक २६.०४.२००० अन्वये द्यावयाच्या सदनिकांचे बांधकामाबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५५७९</u> **दिनांक : ५.०५.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे शासनाच्या दिनांक २६.०४.२००० चे पत्रामधील अटी व शर्तींच्या अधिन राहून मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना म्हाडाच्या ताब्यात असलेल्या स्वदेशी मिल, मॉडर्न मिल व मातुल्य मिल येथील जागेवर घरबांधणी योजनाखाली गाळे बांधावयाचे कंत्राट देण्यास प्राधिकरण एकमताने मान्यता देत आहे. तसेंच दिंडोशी येथील म्हाडाच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर मागणी आजमावून त्यानुसार बांधावयाच्या गाळयांचे कामही मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्सनॉलॉजी लि. यांना देण्यास मान्यता देत आहे. सदर मान्यता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. बांधकामचा दर रु. ६७५/- प्रति चौ.फुट राहील. दर ठरविणा-या समितीने ठरविलेले सुधारीत बांधकाम विनिर्देश लागू रहातील.
२. कंत्राटामध्ये भाववाढीबदद़ल (एक्सलेशन) कोणतीही तरतूद करण्यांत येऊ नये.
३. बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मॉडर्न मिल व मातुल्य मिल येथील स्पेसिफिकेशन वेगळया प्रकारचे असावेत व त्यांच्या स्पेसिफिकेशनाच्या फरकामुळे येणारी रक्कम आज चालू DSR प्रमाणे आजमावून सुमारे रु. ५०.०० चौ.फुट इतकी जास्तीत जास्त देय असावी. याबाबतीत उपाध्यक्षांनी कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा. स्वदेशी मिलबाबत सुधारीत स्पेसिफिकेशन करण्यांत येऊ नये.

४. दिंडोशी येथील जमिनीवरील गाळयांच्या बांधकामाच्या रु. १२९५/- दरानुसार प्रथम मागणी आजमावून मागणीनुसार योजना हाती घेण्यांत यावी. दिंडोशी येथील मूळ रहिवाश्यांना बांधीव सदनिका न देता सोयीसह भूखंड देण्याचा विचार करण्यांत यावा. दिंडोशी येथी मागणी न आल्यास तेवढेच दुसरीकडील काम मागणी आजमावून सदरहू कंत्राटदारास देण्यांत यावे.

५. दिनांक ४.१०.१९९९ रोजी पत्र क्र. ९२८ अन्वये देण्यांत आलेले स्विकृतीपत्राऐवजी हे पत्र देण्यांत येत आहे. पूर्वीच्या स्वीकृती पत्रात अंतर्भूत कामाऐवजी ही कामे देण्यांत येत आहेत. असा उल्लेख Work Order मध्ये स्पष्टपणे करण्यांत यावा.

६. या योजनेला लागणा-या बाहय सुविधांची सर्व कामे प्रचलित दरसूचीवरील दराने त्याच कंत्राटदाराला देण्यांत यावीत.

७. उपरोक्त सर्व कंत्राट टर्न की पध्दतीने देण्यांत यावे. आराखडा तयार करण्यापासून म.न.पा. / इतर सरकारी सर्व दाखले, ॲक्युपेशन दाखला इत्यादी सर्व कामे ठेकेदाराने करावीत.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १६७/१२

विषय : अनिवासी भूखंड वितरणाच्या व किंमतीविषयक
धोरणामध्ये भागशः सुधारणा करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५५८० **दिनांक : ५.०५.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिन व विल्हेवाट) अधिनियमातील तरतुदींनुसार वसाहतीतील अनिवासी भूखंडाच्या वितरणाबाबातचे धोरण ठराव क्र. ६६८, दिनांक २५.०८.१९८३ अन्वये ठरविण्यात आले होते. प्राधिकरणाने ठराव क्र. ३०९४, दिनांक १६.११.१९९२ अन्वये म्हाडाच्या जमिनीचे किंमतीविषयक धोरण व गाळयांची किंमत निश्चित करताना आकारावयाच्या नफयाबाबतचे सुधारीत धोरण निश्चित करण्यांत आले होते. विकास नियंत्रण नियमावलीतील आरखित भूखंडाच्या

विकासाबाबत नमूद केलेल्या सुधारीत विविध तरतुदींचा विचार करुन उपरोक्त धोरणांमध्ये भागशः सुधारणा करण्याबाबत एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

१. **<u>स्थानिक संस्था किंवा शासकीय संस्थाच विकसित करु शकणा-या आरक्षणाबाबत :---</u>**

विविध आरक्षणंतर्गत ज्या जमिनींचा विकास केवळ स्थानिक संस्था किंवा संबंधित शासकीय संस्थाच करु शकतात, अशा जमिनींचे वितरण संबंधित संस्थांना प्राधिकरणाच्या किंमतीविषयक धोरणानुसार आकारणी करुन करण्यांत यावे. ज्या शहरामध्ये अशा वितरणापासून टी.डी.आर.प्राप्त होत असल्यास, अशा टी.डी.आर.ची उपयुक्तता लक्षांत घेता, टी.डी.आर. प्राप्त करुन घ्यावा. अशा प्रकारची आरक्षणे, ज्यांचा विकास केवळ स्थानिक संस्थाच किंवा संबंधित संस्थाच करु शकतात, जे प्राधिकरणाच्या भूखंडाची किंमत देण्यास नकार देतील किंवा अशा जागेचा टी.डी.आर. उपलब्ध नसेल तर अशी प्रकरणे शासनाच्या नगर विकास विभागास आरक्षणे रद?द करण्याचा प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय घेणे किंवा संबंधित संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन खुल्या बाजारात असे भूखंड वितरीत करणे किंवा अशा भूखंडासाठी संबंधित संस्थाना भूखंड खरेदीची नोटीस काढणे (महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अन्वये) इ. बाबतचे निर्णय घेण्याचे सर्व अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

२. संमिश्र वापर अनुज्ञेय असलेल्या आरक्षणबाबात :---

ज्या आरक्षित भूखंडावर संमिश्र वापर अनुज्ञेय आहे, अशा भूखंडाचा विकास विभागीय मंडळांनी स्वतः करावा किंवा अशा आरखित भूखंडाचा विकास करण्यासाठी खुल्या बाजारात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. याबाबतच्या अटी व शर्ती उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने मुख्याधिकारी / विभागीय मंडळ यांनी ठरवाव्यात. "विभागीय मंडळांकडे जमिनीची कमतरता लक्षांत घेता, अशा संमिश्र वापराच्या भूखंडाचा विकास विभागीय मंडळांनी वरीलप्रमाणे करावा. खुल्या बाजारातील निविदा विकासक, सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा इतर संस्थांकडून मागविण्यात याव्यात. जमिनीची न्युनतम किंमत आरक्षणाचे बांधकाम वगळून चटईक्षेत्र ज्या वापरासाठी अनुज्ञेय आहे, जसे निवासी, अनिवासी इत्यादीचा विचार करुन ठरविण्यांत यावे.

३. संमिश्र वापर अनुज्ञेय नसलेल्या मात्र जमीन मालक विकसित करु शकणा-या आरक्षणाबाबत :---

ज्या आरक्षित भूखंडासाठी संमिश्र वापर अनुज्ञेय नाही, मात्र अशा जागांचा विकासकाही प्रमाणात बांधकाम क्षेत्र स्थानिक संस्थाना देऊन, जमीन मालक करु शकतात. जसे, शॉपिंग सेंटर, सर्विस सेंटर इ. अशा जमिनीचा विकास एकतर विभागीय मंडळांनी स्वतः करावा किंवा उपरोक्त जमिनीचा विकास एकतर विभागीय मंडळांनी स्वतः करावा किंवा उपरोक्त प्रकार (२) प्रमाणे खुल्या बाजारातून निविदा मागवून अशा आरक्षित भूखंडाचा विकास करावा. जे आरक्षित भूखंड जसे प्राथमिक शाळा, रुग्णालये, महाविद्यालय इ.बाबत प्राधिकरणाचस किंमतीविषयक धोरणानुसार, जाहिरातीद्वारे संबंधित संस्थांना व प्राधिकरणाच्या अनिवासी भूखंड वितरणाच्या अटी व शर्तीनुसार वितरण करण्यांत यावे.

४. विकास आराखडयातील आरक्षित खुल्या जागांवर किंवा भूअभिन्यासातील विकास नियंत्रण नियमावलीनुसार ठेवावयाच्या करमणुकीच्या खुल्या जागांवर काही प्रमाणात व्यायामशाळा, क्लब हाऊस इत्यादी बांधकाम (ॲन्सीलरी स्टक्चर्स) अनुज्ञेय व आवश्यक असलेल्या आरक्षणाबाबत.

अ. ज्या आरक्षित खुल्या जागांवर (खेळण्याचे मैदान, करमणुकीची जाग इ.) ॲन्सीलरी स्ट्रक्चर जसे कीं, व्यायामशाळा, क्लब हाऊस, पॅव्हेलियन्स आणि इतर अनुषंगिक खेळ व करमणुकीच्या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले बांधकाम अनुज्ञेय असते. असे बांधकाम मुंबई शहरासाठी, खुल्या जागेच्या १५ टक्क्यापर्यत अनुज्ञेय आहे. अशी जागा वसाहतीतील गरजेनुसार निश्चित करण्यांत यावी तसेच अशा आरक्षणावरील बांधकाम व विकासाबाबत प्राथमिक योजना (बांधकाम क्षेत्रफळ, बांधकामाचा प्रकार इत्यादि) तयार करावी व अशा खुल्या जागेसाठी उपरोक्त दर्शविलेल्या विविध वापरासाठी विकसित करण्याबाबत खुल्या बाजारात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. अशा जाहिरातींना अनुसरुन वसाहतीतील फेडरेशन, इतर संस्था किंवा विकासक अर्ज करु शकतील. अशा प्रकारे खुल्या जागेचा विकास करण्यासाठी जमिनीची न्युनतम किंमत प्राधिकरणाच्या दिनांक १६.११.१९९२ च्या किंमतीविषयक धारेणानुसार ठरवावी. अशा प्रकारच्या आरक्षणाबाबत विभागीय मंडळ स्वतः विकास करु इच्छित असल्यास मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या पूर्व परवानगीने असा विकास करावा.

ब. वरीलप्रमाणे खुल्या जागेवर ॲन्सीलरी स्टक्चरची परवानगी देताना वसाहतीतील रहिवासी, म्हाडाचे अधिकारी, कर्मचारी यांना सभासदत्वासाठी ५० टक्के सवलतीच्या दराने फी आकारावी. तसेच खुल्या जागेचा वापर सर्वाना करण्याची मुभा असावी.

५. उपरोक्त परिच्छेद - २, ३ व ४ मधील विविध प्रकारच्या आरक्षणाखाली येणा-या जमिनीचा विकास निविदा मागवून करण्याबाबत निविदा प्राप्त झाल्यावर त्यावर निर्णय घेण्याबाबत खालील समिती नेमण्यात येत आहे.

- मा.अध्यक्ष / म्हाडा - अध्यक्ष
- मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा. - सदस्य
- मुख्य अधिकारी / संबंधित विभागीय मंडळ - सदस्य
- वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ / म्हाडा - सदस्य
- उपमुख्य कार्यकारी अधिकारी /म्हाडा - सदस्य सचिव.

उपरोक्त समितीस वरील ठरावातील परिच्छेद क्र. २, ३ व ४ मधील विविध प्रकारच्या आरक्षणाच्या विकासाबाबत प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय घेण्याचे सर्व अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत.

६. अ. विकास आराखडयातील खुल्या (आरजी, पीजी, जी) आरक्षित जागेबाबत (ज्यावर परिच्छेद - ४ नुसार ॲन्सीलरी स्ट्रक्चरची आवश्यकता नसल्यास)ज्या विकास आराखडयातील आरक्षित खुल्या जागांवर वरीलप्रमाणे ॲन्सीलरी स्ट्रक्चर आवश्यकता नसेल व ज्या शहरांमध्ये टी.डी.आर. नियम लागू आहे, अशा आरक्षणासाठी आवश्यकतेनुसार टी.डी.आर.प्राप्त करुन घ्यावा. ज्या ठिकाणी टी.डी.आर. उपलब्ध नसेल किंवा टी.डी.आर.ची आवश्यकता नसल्यास अशा आरक्षित जागा प्रथम स्थानिक संस्थाना म्हाडाच्या किंमतीविषयक धोरणानुसार वितरीत कराव्यात. अशा स्थानिक संस्था जागा घेण्यास तयार नसल्यास रहिवाश्यांच्या फेडरेशनला म्हाडाच्या धोरणानुसार जागा वितरीत कराव्यात. असे फेडरेशन अस्तित्वात नसल्यास इतर संस्थाना आरक्षित जागा म्हाडाच्या किंमतीविषयक धोरणानुसार तसेच अनिवासी भूखंड वितरण ठराव क्रमांक ६६८, दिनांक २५.०५.१९८३ मधील अटी व शर्तीनुसार वितरण कराव्यात. इतर संस्थाना वितरण करावयाचे असल्यास असे वितरण मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या पूर्व संमतीने करावेत.

ब. भू-अभिन्यासात विकास नियंत्रण नियमानुसार ठेवावयाच्या करमणुकीच्या खुल्या जागेबाबत. (ज्यावर परिच्छेद ४ नुसार ॲ'न्सीलरी स्ट्रक्चरची आवश्यकता नसल्यास).

विकास नियंत्रण नियमावलीनुसार भू-अभिन्यासासाठी ठेवावयाच्या करमणुकीच्या खुल्या जागा व ॲन्सीलरी स्ट्रक्चरची आवश्यकता नसेल अशा सर्व खुल्या जागा खालीलप्रमाणे क्रमशः प्राधान्याने वितरीत कराव्यात.

वसाहतीतील सहकारी संस्थाचे फेडरेशन.
फेडरेशन नसल्यास सहकारी गृहनिर्माण संस्था (इतर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन)
भू-अभिन्यासातील विविध सहकारी गृहनिर्माण संस्थाना त्यांच्या प्रमाणात / वाटयानुसार जागेचे वितरण करावे.
वरील सर्व पर्याय शक्य नसल्यास बाहेरील इतर संस्थाना वितरण करावे. बाहेरील इतर संस्थाना वितरण करावयाचे असल्यास मा.उपाध्यक्ष / प्रा. यांची पूर्व संमली प्राप्त करुन घ्यावी. अशा सर्व खुल्या जागांचे वितरण प्राधिकरणाच्या दिनांक १६.११.१९९२ च्या किंमतीविषयक धोरणानुसार तसेच अनिवासी भूखंडाच्या वितरणाच्या ठराव क्र. ६६८, दिनांक २५.०५.१९८३ मधील अटी व शर्तीनुसार करण्यांत यावे.

७. वरील सर्व प्रकारच्या आरक्षणांर्तत जमिनीचा वाटप व वितरणाबाबत नेहमीच्या अटी व शर्तींशिवाय प्रकरणनिहाय आवश्यकतेनुसार जादा अटी व शर्ती अंतर्गत करण्याचे तसेच विकास नियंत्रण नियमावलीत वेळोवेळी होणा-या बदलांचा या धोरणात समावेश करण्याचे सर्व अधिकार मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

बाब क्रमांक : १६७/१३

विषय : मौजें कोंडीविटा येथील स.क्र.५५४ अ मधील सूमारे १९६६५ चौ.मी. जमीन शासनास परत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५५८१ दिनांक : ५.०५.२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, मौजे कोंडीविटा येथील स.क्र.५५४ अ मधील सुमारे १९६६५ चौ.मी. जमिनीपैकी ८६६०.०० चौ.मी. जमीन शासनास परत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांत यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १३ जून, २००० रोजी सकाळी ११.०० वाजतां गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई येथे आयोजित करण्यांत आलेल्या १६८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांकः१६८/१

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ५ मे, २००० रोजी झालेल्या १६७ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त.

ठराव क्रमांकः-५५८२ दिनांकः- १३/६/२०००

प्राधिकरणाने दि. १७/८/९२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक ३०२८/५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला होता.

" १९९२ मध्ये पोलादावरील निर्बंध उठविल्यानंतर सिमेंट आणि पोलादाच्या भावामध्ये सातत्याने होत असलेली भाववाढ लक्षांत घेतां, आतां असे मान्य करण्यात आलेले आहे कीं, ठेकेदारांना ही भाववाढ अदा करण्यापूर्वी सिमेंट आणि पोलादाचा दर महिन्याच्या शेवटी प्रसिध्द झालेला निर्देशांक दर विचारात घ्यावा आणि प्राधिकरणाच्या दप्तराप्रमाणे ठेकेदाराने वापरलेल्या सिमेंट आणि पोलादाच्या भाववाढीच्या ५० टक्के इतकी रक्कम ठेकेदारास अदा करता येईल. सिमेंट व पोलादाच्या किंमतीवरील ५० टक्के दरवाढीची भरपाई त्यांना देण्यात येत असेल तर दर भाववाढीबद्दलच्या आणि विशेष सहाय्यबद्दलच्या रकमेपुरता लाभ त्यांना देण्यांत येऊ नये असेही पुढे ठरविण्यांत आले आहे. "

उपरोक्त..... सिमेंट व पोलादाच्या किंमतीच्या ५० टक्के दरवाढीची भरपाई त्यांना देण्यांत येत असेल तर, दर भाववाढीबद्दलच्या आणि विशेष सहाय्य बद्दलच्या रकमेपुरता लाभ त्यांना देण्यात येऊ नये अशी प्रशासनाची धारणा आहे आणि तिच धारणा नक्की करण्यांत येत आहे.

सदर ठराव प्राधिकरण बैठक क्रमांक १६७ मधील बाब क्रमांक ९ मध्ये नोंदविण्यांत येऊन त्याप्रमाणे कार्यवृत्तांत सुधारणा करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. त्यानंतर प्रस्तावित कार्यवृत्त एकमताने मंजूर करण्यांत आले.

बाब क्रमांकः१६८/२

विषयः- प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती वाढवून देणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः- ५५८३</u> **दिनांकः-१३/६/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, वैद्यकीय खर्चापोटी प्रत्येक कर्मचाऱ्याला सन २०००-२००१ पासून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम रु. ३५००/- वरुन रु. ५०००/- एवढी वाढ दि. १/४/२००० पासून करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदरहू रक्कम वर्षातून दोन हप्त्यामध्ये देण्यांत यावी. सदरहू रकमेकरीता डॉक्टरच्या बीलाची अथवा प्रमाणपत्राची आवश्यकता नसून याबाबतचे फक्त प्रमाणपत्र अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून घेण्यांत यावे.

उपरोक्त ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांकः१६८/३

विषयः- लक्ष्मीनगर, पुणे येथील भूखंड क्र.५ सं.क्र.९३ वरील तळमजल्याची जुनी कार्यालयीन इमारत पाडण्याबाबत व त्यावर दुकानाची योजना राबविल्यावर त्यातील एक दुकान समतोल किंमत आकारुन सदर कार्यालयीन इमारतीतील भाडेकरु कै.डॉ. पहाडे यांच्या पत्नी श्रीमती प्रफुल्लता पहाडे यांना देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५८४</u> **दिनांकः- १३/६/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, स. क्र. ९३, लक्ष्मीनगर, पुणे येथील भूखंड क्र.५ वरील कार्यालयीन इमारतीच्या पुनर्रचित केलेल्या इमारतीतील एक दुकानी गाळा अंदाजे १५.६७ चौ.मी. श्रीमती प्रफुल्लता पहाडे या सदर इमारतीतील जुन्या भाडेकरुस त्यांनी इमारतीच्या पुनर्रचनेस केलेले सहकार्य ध्यानांत घेऊन २,२५,०००/- किंवा समतोल किंमत किंवा संलग्न दुकानास निविदेने येणारी किंमत यापैकी जी कमी असेल ती किंमत आकारुन देण्याबाबत मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी सादर केलेल्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्रमांकः१६८/४

विषयः- लातूर, औरंगाबाद येथे औरंगाबाद मंडळातर्फे
राबविण्यात येणाऱ्या गुमास्ता सहकारी संस्थेसाठीच्या
गृहनिर्माण योजनेकरीता हुडकोच्या कर्जाऐवजी
प्राधिकरणाचा निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५८५</u> **दिनांकः- १३/६/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाच्या दि. २७/३/२००० रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र.५५५६ ला अनुसरुन या योजनेसाठी लेखाशिर्ष १५३ हुडको कर्ज याऐवजी लेखाशिर्ष १६० प्राधिकरण निधी या अंतर्गत राबविण्यास पुढील अटी व शर्तीस अनुसरुन कार्योत्तर मंजूरी देत आहे.

१. गुमास्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या योजनेकरीता लाभार्थींनी सोसावयाचा भार वगळून उर्वरीत खर्च रु. ६४.२० लाख प्राधिकरणाच्या निधीतून भाडे खरेदीवर ही योजना राबविण्यासाठी उपलब्ध करुन देणे. याप्रमाणे फक्त रु. ६०,०००/- प्रति गाळा लाभार्थींना कर्जरुपाने १३.५ टक्के व्याजदराने १० वर्षाच्या कालावधीकरीता उपलब्ध करुन देणे.

प्रत्यक्षात बांधकामाचा खर्च अंदाजित खर्चापेक्षा म्हणजे रु. ७६,१००/- पेक्षा जास्त झाल्यास अशा जादा खर्चाच्या फरकाची रक्कम लाभार्थीकडून ताबा देण्यापूर्वी घेण्यांत यावी.(म्हणजेच रु. १६१००/- अधिक फरकाची रक्कम)

२. जे लाभार्थी गाळयांची किंमत सहा आठवडयाच्या आंत एक रकमी भरतील, त्यांना गाळयांच्या किंमतीमध्ये ५ टक्के सवलत देण्यांत यावी.

३. लाभार्थींसह याबाबत करारनामा करुन घेताना त्यामध्ये त्यांचे नांव असलेला भूखंड व त्यावरील प्रस्तावित घर मंडळाकडे गहाणखताव्दारे कर्ज परतफेड होईपर्यत गहाण ठेवणे बंधनकारक असेल.

बाब क्रमांकः१६८/५

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९६-९७ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्वीकृत करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांकः-५५८६</u> **दिनांकः- १३/६/२०००**

या बाबींचा विचार करुन एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९६-९७ या वित्तीय वर्षाचा लेखा स्वीकृत करण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१६८/६

विषयः- महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग कॉर्पोरेशन लि. यांना बीज भांडवल देण्याविषयी.

<u>ठराव क्रमांकः-५५८७</u> **दिनांकः- १३/६/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग कॉर्पोरेशन लि. यांना बीजभांडवल म्हणून प्रथम रुपये एक लक्ष वरुन रुपये एक कोटी इतक्या रकमेपर्यत वाढविण्यासाठी नियमाप्रमाणे रितसर कार्यवाही करावी व त्यानंतरच म्हाडाकडून बीज भांडवल म्हणून रुपये एक कोटी देण्यांत यावेत.

बाब क्रमांकः- १६८/७

विषयः- पंचशील सेवा संघ, मुंबई यांना अभ्युदयनगर, काळाचौकी येथील सुमारे ६० चौ.मी. भूखंड वितरण करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः-५५८८</u> **दिनांकः- १३/६/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, पंचशील सेवा संघ, मुंबई यांना अभ्युदयनगर, काळाचौकी येथील सुमारे ६० चौ.मी. भूखंडाचे वितरण, काळाचौकी येथील बृहन्मुंबई गणेशोत्सव मंडळाला ज्या दराने व ज्या अटीं,शर्तींनुसार भूखंड वितरीत करण्यांत आला होता, त्याच दराने अधिक बारा टक्के दराने साधारण व्याज आकारुन गणेशोत्सव मंडळाला दिलेल्या तारखेपासून वितरण करण्यांत यावे.

बाब क्रमांक : १६८/९

विषय : गृहनिर्माण भवनाचे आवारात खाजगी संस्थांना **जाहिरात फलक लावू देणेबाबत.**

<u>ठराव क्रमांक :५५८९</u> **दिनांक :१३.६.२०००**

एकमताने निर्णय घेतला की,

गृहनिर्माण भवनाच्या आवारात प्राधिकरण शासकीय/निमशासकीय कार्यालयाव्यतिरिक्त इतर खाजगी संस्थांचे जाहिरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

जर एखादी संस्था खरोखरच लोकोपयोगी कार्य करीत असेल तर अशा संस्थेला एखाद्या सोयीस्कर ठिकाणी (प्राधिकरणाच्या आवाराव्यतिरिक्त) जाहिरात फलक लावण्यास पूर्वी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार पूर्वीच्याच अटी व शर्तीवर परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १६८/१०

विषय : गांधीनगर,वांद्रे (पूर्व) येथील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड एमआयजी क्रिकेट क्लब यांना वितरीत करणेबाबत.

<u>ठराव क्रमांक :५५९०</u> **दिनांक :१३.६.२०००**

एकमताने निर्णय घेतला कि, ज्या अटी व शर्तीवर मुंबई महानगरपालिकेने एम.आय.जी. क्रिकेट क्लब यांना ७६५३ चौरस मीटर क्षेत्र देखभालीसाठी हस्तांतरीत केले होते त्याच अटी व शर्तीवर मंडळाने संपूर्ण १७४३५ चौरस मिटर क्षेत्र एम.आय.जी.क्रिकेट क्लब यांना ३० वर्षाच्या भाडेपट्टयावर हस्तांतरीत करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

तसेच एम.आय.जी. क्लबच्या नियोजित इमारतीतील ज्या भागाचा वापर वाणिज्य वापरासाठी प्रस्तावित असेल त्याला प्रचलित वाणिज्य बाजारभाव आकारण्यात यावा, इमारतीतील उर्वरित क्षेत्रासाठी निवासी बाजारभाव आकारण्यात यावा व ज्या क्षेत्राचा वापर क्रिडांगण म्हणून होणार आहे त्याला जमिन व विकासास आलेल्या प्रत्यक्ष खर्चाचे १२.५ टक्क्याने भांडवलीकरण करुन येणारे अधिमुल्य आकारावे.

३० वर्षाचा भाडेकरारनामा करतांना प्रशासनाने बाब टिपणीत प्रस्तावित केलेल्या अ-ब-क या अटींचा समावेश करावा. प्राधिकरणाच्या/मंडळाच्या अधिकारी/कर्मचा-यांना तसेच पदाधिका-यांना सेवा सभासदत्व देण्याचे एम.आय.जी. क्रिकेट क्लबवर बंधनकारक करण्यात यावे, यासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात यावे. तसेच जी प्राधिकरण/मंडळ सुचवतील असे दोन अधिकारी क्लबच्या कार्यकारी मंडळावर सदस्य म्हणून घेण्याची अट घालण्यात यावी. या दोन सदस्यांना इतर सदस्याप्रमाणे सर्व अधिकार राहतील.

बाब क्रमांक : १६८/११.

विषय :- प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या
विविध योजनांसाठी वित्तीय संस्थाकडून
कर्ज प्राप्तकरण्या बाबत.

<u>ठराव क्रमांक :५५९१</u> **दिनांक :१३.६.२०००**

प्रादेशिक मंडळाकडून प्राप्त होणा-या प्रस्तावांना हुडकोचे किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे कर्ज हे प्रकरणनिहाय तपासून कर्जाबाबतचा निर्णय घेण्यासाठीचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे इतर यासारख्याच /स्वरुपाच्या वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य प्राप्त करुन घेण्यासाठी हुडको या कर्जाकरीता १५३ लेखाशिर्ष वापरण्यात येते. त्यामध्ये सुधारणा करुन वित्तीय संस्थेचे अर्थसहाय्य असे शिर्षक दर्शवून १५३/०१ आणि १५३/०२ हुडको कर्जाकरीता १५३/०३ राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या कर्जाकरीता याप्रमाणे दर्शविण्याकरीता प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः- १६८/१२

विषयः- वरळी नेबरहूड कर्नाटकक संघास आदर्श इंग्लिश
हायस्कूलसाठी ११० फूट ङ्क १३२ फूट आकारमानाचा
भूखंड वितरीत करण्याविषयी.

<u>ठराव क्रमांकः ५५९२</u> **दिनांकः१३.६.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, आदर्शनगर, वरळी परिसरातील कार्यालयीन इमारत क्र.२ व त्या इमारतीसह संलग्न माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेला ११० फूट ङ्क १३२ फूट भूखंड वरळी नेबरहूड कर्नाटक संघास वितरीत करावा. तथापि, शाळेच्या नवीन इमारतीत भाडेकरु संघास सध्या कार्यालयीन इमारत क्रमांक-२ मध्ये भाडेकरु संघाच्या वापरात असलेल्या चटईक्षेत्रफळाएवढे क्षेत्रफळ कर्नाटक संघाने तळमजल्यावर विनामूल्य बांधून द्यावे. प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे कार्यालयीन इमारत व भूखंडाची किंमत अधिक १० टक्के(अतिक्रमण नियमितीकरण आकार म्हणून) आकारुन वरळी नेबरहूड कर्नाटक संघास लावण्यात यावी. वरळी नेबरहूड कर्नाटक संघाने माध्यमिक शाळेची इमारत तीन वर्षात बांधून पूर्ण करावी. जर तीन वर्षात शाळेचे बांधकाम पूर्ण केले नाही तर सदर वितरण रद्द होईल अशीही अट वितरण पत्रात नमूद करावी.

बाब क्रमांक : १६८/१३.

विषय :- स.क्र.१८९,मौजे-माजिवडे,शिवाई नगर,ठाणे
येथील माझी आई या संस्थेस भाडयाने दिलेल्या
दोन नमुना गाळयांच्या लगत असलेला भूखंड
वितरीत करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक :५५९३</u> **दिनांक :१३.६.२०००**

एकमताने निर्णय घेतला की,

शिवाई विद्या प्रसारक मंडळ,ठाणे या संस्थेला शिवाई नगर, माजिवडे, ठाणे येथील दोन नमुना गाळे व या गाळयांनी व्यापलेला ४८ चौरस मिटर जमिनीसह प्राधिकरणाच्या किंमती विषयक धोरणानुसार विक्रीची किंमत आकारुन नियमित करावेत. तसेच संस्थेने शाळेसाठी वापरात आणलेला अतिरिक्त ६९७चौरस मिटर आकारमानाचा भूखंड प्राधिकरणाच्या दिनांक १६/११/१९९२ च्या किंमती विषयक धोरणानुसार शाळेच्या

वापराची किंमत आकारुन तसेच संस्थेने भूखंडाचा अनधिकृत वापर केला म्हणूनयेणा-या विक्री किंमतीच्या १०टक्के दंडनिय रक्कम आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टा कराराने भूखंडाच्या किंमतीच्या १टक्के वार्षिक भुईभाडे आकारुन नियमित करण्यात यावा.

त्याचप्रमाणे म्हाड (जमिनवाटप.) नियम १९८१ नियम ६ अन्वये इतर अटी व शर्ती शिवाय खालील अटींचा अंतर्भाव भाडेपट्टा करारात करण्यात यावा.

१. संस्थेच्या कार्यकारी मंडळावर मुख्यअधिकारी/कोंकण मंडळ हे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला मंडळाचा अधिकरी घेण्यात यावा..
२. प्रत्येक वर्षी म्हाड कर्मचा-यांच्या मुलांना शाळेत प्रवेशास प्रत्येक वर्गात ५ जागा राखीव ठेवाव्यात.
३. म्हाडाच्या शिवाई नगर माजिवडे व नजिकच्या वर्तकनगर या गृहनिर्माण वसाहतीतील रहिवाश्यांच्या मुलांना प्राधान्याने सदर संस्थेत प्रवेश देण्यात यावा.
४. सर्व धर्माच्या जातीच्या वंशाच्या भारतीय व्यक्तीस/पाल्यास निर्वेध प्रवेश राहील.

बाब क्रमाक : १६८/१५.

विषय : स.क्र. २६३,सीटीएस क्र.६-अ (भाग) मालवणी मालाड (प.) येथील ३४८८ सदनिका झोपडपट्टीपुनर्विकास योजनेकरीता लगतच्या बाहय सुविधा (ऑफसाईट इन्फ्रास्टक्चर्स) ची कामे मे.बी.जी.शिर्के क.टे.लि. याकंत्राटदारांस निविदा न मागविता थेट देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५५९४ **दिनाक :१३.६.२०००**

एकमताने निर्णय घेतला कि,

मालवणी स.क्र. २६३ सीटीएस क्र. ६-अ (भाग) मालाड (प) येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या ३४८८ सदनिकाकरिता बाहय सुविधा (ऑफ साईट इन्फ्रास्टक्चर) जसे कि मुख्य जलवाहिनी, मलनिसःरण वाहिनी, रस्ता पावसाळी पाण्याची गटारे इत्यादी ही कामे निविदा न मागविता योजनेने बांधकाम केलेले मूळ कंत्राटदार मे.बी.जी.शिर्के टे.प्रा.लि.यांना मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित दरसूचीतील दरापेक्षा १६.५६ टक्के जास्त दराने खालील अटींवर देण्यात यावे.

१. कामावरील विक्रीकर म्हाडातर्फे भरण्यात येईल.

२. कामासाठी लागणारे पाणी कंत्राटदारांनी स्वतः खर्चाने टँकरने आणावे. सदर टँकरचा वापर महानगरपालिकेकडून मंजूर करुन घ्यावा. फक्त अतिरिक्त मलनिःसारण पटटी म्हाडाने भरावी.

३. कामासाठी १६ टक्के मोबीलायझेशन अग्रीम रक्कम बिनव्याजी मूळ कंत्राटातील तरतुदीनुसार देण्यात यावी.

४. कामासाठी दरवाढ (एस्कलेशन) लागू राहाणार नाही.
कंत्राटदारासोबतबी-१ कारारनामा करण्यात यावा. सदर कामाकरीता मुंबई महानगरपालिकेकडून आवश्यक प्रमाणपत्र महानगरपालिकेस हस्तांतर करणे इत्यादी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

५. हे काम कार्यादेशाच्या दिनांकापाससून तीन महिन्यांत पूर्ण करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

सदरहू ठरावाची स्थायी होण्याची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १६८/१६

विषयः गणेश व्यायाम शाळेची, व्यायाम शाळा व बगिचा विकसित करण्यासाठी सिध्दार्थ नगर, गोरेगांव येथे भूखंड मिळण्या विषयी विनंती.

ठराव क्रमांक :५५९५ **दिनांक :१३.६.२०००**

एकमताने निर्णय घेतला की,

श्री. पांडुरंग बाबू पार्टे गणेश व्यायामशाळा यांना व्यायामशाळा व बगिचा विकसित करण्यासाठी सिध्दार्थ नगर, गोरेगांव येथील बैठी चाळ क्र. ४७ शेजारील बगिच्यासाठी आरक्षित असलेला १२०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड म्हाड जमिन वाटप १६ अंतर्गत शासनाची मंजूरी घेण्यासाठी प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १६८/१७.

विषय : मौजे.घाटकोपर न.भू.क्र.अ.पै.असलेल्या व रमाबाई आंबेडकर संक्रमण शिबिरात वसलेला भूखंड पोलिस गृहनिर्माण संस्थेस वितरीत करुन सुधारीत प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक :५५९६ **दिनांक** :१३.६.२०००

एकमताने निर्णय घेतला की,

मौजे घाटकोपर न.भू.क्रमांक १९४-अ-पै असलेल्या व रमाबई आंबेडकर नगर संक्रमण शिबिरात वसलेला १३.५ एकर क्षेत्रफळाचा भूखंड डॉ. सी.आर.कापसे यांच्या पोलिस गृहनिर्माण संस्थेस वितरीत करण्यासाठी प्राधिकरणाने दिनाक २७/१/१९९९ रोजीच्या बैठकीत ठराव क्रमां५४०१ नुसार मान्यता दिली आहे. या जमिनीपैकी सुमारे ९.५४ एकर जमिन सी.आर.झेड. आणि आरक्षणाने बाधित असल्याने उर्वरित क्षेत्रात पहिल्या टप्प्यात सुधारित क्षेत्रात ६०० नवीन गाळे बांधण्याबाबतचा जो सुधारित प्रस्ताव सादर केला आहे त्यास मान्यता देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात बांधण्यात येणाऱ्या ६०० गाळयांपैकी २६५ गाळे म्हाडाला विनामूल्य आणि कोणत्याही अडथळया विरहीत देण्यांत येतील. म्हाडाच्या दि. १०.५.२००० च्या पत्राला प्राधिकरणाने कार्योत्तर मंजूरीही दिली आहे. या सुधारीत योजनेत अगोदर ठरलेल्या सर्व अटीं व शर्ती जसाच्या तशा लागू रहातील. मात्र पोलिस गृहनिर्माण संस्थेवर प्राधिकरणास विनामूल्य ३००गाळे तसेच या भूखंडावर वसलेल्या १९९५ पूर्वीचे झोपडीधारक तसेच अनधिकृत गाळेधारकांना सदरहू योजनेत सामावून घेण्यास बंधनकारक राहील. सदरच्या अटीच्या अधीन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची दि. ११ जुलै, २००० रोजी म्हाडाची स्थगित झालेली १६९ वी बैठक दि. २९ जुलै, २००० रोजी घेण्यांत आली, त्या बैठकीचा कार्यवृत्तांत

बाब क्रमांकः१६९/२

विषयः- महाराष्ट्र शासनाच्या संदेशाच्या महाराष्ट्रात ५३ ठिकाणी लावण्यात येणाऱ्या जाहिराती फलकास येणाऱ्या रु. ३,६२,४२०/- खर्चास मंजूरी घेण्याबाबत.

ठराव क्रमांकः५५९७ दिनांकः२९/७/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र शासनाच्या संदेशाच्या महाराष्ट्रात ५३ ठिकाणी जाहिरात फलक लावण्याचे काम ए. सी. ई. कम्युनिकेशन एन्टरप्राईजेस या कंपनीस देण्यांत आले होते. या कामासाठी आलेल्या रु. ३,६२,४२०/- खर्चास तसेच त्यापैकी रु. १,२६,८००/- दुरुस्ती व पुनर्रचना निधीतून ६९५ दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रम या लोखाशीर्षकाखाली तर उर्वरीत रु. २,३५,६२०/- झोपडपट्टी सुधार निधीतून ३६४ झोपडपट्टी सुधार कार्यक्रम या लेखाशीर्षाखाली करण्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः-१६९/३

विषयः- मौ. रावतळे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथील संपादनाखालील जमीन ६०:४० प्रमाणे घेण्याबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५९८</u> दिनांकः- २९/७/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार एकूण संपादित जमिनीपैकी २.०४.५४ हेक्टर जमीन मूळ जमीनमालकांनी स्थापन केलेल्या विंध्यवासिनी शेतकरी समन्वय समितीस नाममात्र रु. १.०० वार्षिक भुईभाडे आकारुन भाडेपट्टा कराराने देण्यास व या संस्थेस संबंधित मूळ जमीनमालकांना जमीन समप्रमाणात वाटणी करणे आणि एकूण जमिनीपैकी ६० टक्के जमिनीचा मोबदला जमीन मालकांना देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः१६९/५

विषयः- श्री. दत्ता चौधरी यांच्या महाराष्ट्र राज्य पोलीस को.ऑ.हौसिंग फेडरेशनला मौजे मुलंड येथील सर्व्हे क्रमांक ३८६ (भाग) मधील सुमारे ८ एकर जमीन वितरीत करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांकः५५९९</u> दिनांकः२९.७.२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, श्री. दत्ता चौधरी यांच्या महाराष्ट्र राज्य पोलीस को. ऑ. हौसिंग फेडरेशनला मौजे मुलुंड येथील सर्व्हे क्रमांक ३८६ (भाग) मधील सुमारे ८ एकर जमीन शासनाने विनियम १६ खाली वितरीत केलेली आहे. सदरहू जमीन म्हाडाने स्वतः विकसित करणे किंवा महाराष्ट्र पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशन यांना देणे उचित राहील या कारणामुळे सदरहू प्रस्ताव शासनास फेरविचारार्थ पाठविण्यांत यावा.

बाब क्रमांकः१६९/६

विषयः- मुंबई मंडळाच्या विविध वसाहतींमध्ये बांधलेल्या दुकानी गाळयांच्या विक्रीबाबतचा प्रस्ताव.

<u>ठरावक्रमांकः५६००</u> दिनांकः२९/७/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. मुंबई मंडळाच्या विविध वसाहतींमध्ये बांधलेल्या दुकानी गाळयाची विक्री प्रथम येणाऱ्यास प्रथम गाळा या तत्वावर जाहिरात देऊन करण्यांत यावी.

२. रकाना (६) मधील दरास अपसेट प्राईस म्हणून मान्यता देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची प्रथम अंमलबजावणी करन महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन स्थलांतर विक्री अदलाबदल) विनिमय १९८१ मधील तरतुदीनुसार शासनाची कार्योत्तर मंजूरी घेण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्रमांकः१६९/७

विषयः- मंडळाच्या वसाहतीमध्ये टी.व्ही. केबल वाहिन्या टाकू देण्यास खाजगी कंपन्यांना परवानगी देण्यासाठी धोरण ठरविणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५६०१</u> दिनांकः- २९/७/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाच्या सर्व विभागीय मंडळाच्या वसाहतीमध्ये टी.व्ही. केबल वाहिन्या टाकू देण्यास खाजगी कंपन्यांना परवानगी देण्यांत यावी. केबल धारकांकडून मासिक भाडे खालीलप्रमाणे आकारण्यांत यावे.

अ. १००० पर्यतच्या सदनिकांसाठी	रु. ३०००
ब. १००१ ते २००० गाळयांसाठी	रु. ५०००
क. २००१ ते ३००० गाळयांसाठी	रु. ७०००
ड ४००० वरील गाळयांसाठी	रु. १००००

केबलधारक जर एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीच्या भाडयाची रक्कम प्राधिकरणाकडे एकदम भरणा करीत असतील तर, त्यांना भाडयाच्या किंमतीत १० टक्के सूट देण्यांत यावी.

या व्यतिरिक्त परवानगी देणेपूर्वी केबलधारकांकडून रु. ५०,०००/- अनामत रक्कम स्विकारण्यांत यावी.

मासिक/वार्षिक शुल्क महिन्याच्या १० तारखेपर्यत मंडळाकडे भरण्याचे बंधन केबलधारकावर राहील.

सर्व मंडळांसाठी या विषयावर निर्णय घेण्यासाठी समिती गठित करण्यांत येउन त्या समितीस या विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार देण्यांत येत आहेत.

सर्व मंडळासाठी मा. सभापती/प्रादेशिक मंडळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यांत येऊन मुख्य अधिकारी, कार्यकारी अभियंता, वास्तुशास्त्रज्ञ, लेखाधिकारी हे सदस्य म्हणून राहतील तर, मिळकत व्यवस्थापक हे सदस्य सचिव म्हणून रहातील. या विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार या समितीस प्रदान करण्यांत येत आहेत.

बाब क्रमांकः१६९/८

विषयः- सर्वे क्र. १३८ (भाग) मानखुर्द या भू अभिन्यासातील सुमारे ४७०० चौ. मी. जागेचे वितरण महिला मिलन या संस्थेस करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५६०२</u> दिनांकः२९/७/२०००

एकमताने निर्णय घेतला कीं, स्पार्क या संस्थेने भायखळा येथील फूटपाथवासियांच्या स्थापन केलेल्या महिला मिलन नगर को. ऑ. हाऊसिंग सोसायटीस भूखंडाचे वितरण मूळ हद्दीनुसार म्हणजे (सर्वे क्र. १३८ (भाग) मानखुर्द या भू अभिन्यासातील सुमारे ४७०० चौ. मी. जागा) पूर्वीच्याच अटी व शर्तीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक :१६९/१२.

विषय : नागरी क्षेत्रामध्ये ५०,००० सदनिका
बांधण्याच्या प्रस्तावाची अंमलबजावणी
करण्यासाठी मॅन्युअल तयार
करण्याकरीता निकमार संस्थेच्या
नेमणूकीबाबत मंजूरी.

ठराव क्रमांक : ५६०३. **दिनांक : २९/७/२०००.**

एकमताने निर्णय घेतला कि,

बाब टिपणीमध्ये विशद केलेल्या प्रस्तावित योजनेच्या अंमलबजावणीकरीता निकमार या संस्थेला नेमण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी आणि या संस्थेकडून मॅन्यअल तयार करुन घेण्यासाठी अदा करावयाच्या रु. २.०० लाखाच्या शुल्कास मंजूरी देण्यात येत आहे. सदरहू खर्च आर ॲन्ड टीच्या लेखाशिर्ष क्रमांक ५२८ अंतर्गत करण्यात यावा. सदरहू ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १५ सप्टेंबर, २००० रोजी घेण्यांत आलेल्या १७० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

बाब क्रमांकः- १७०/१

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
२९ जुलै, २००० रोजी झालेल्या १६९ व्या बैठकीचे
प्रारुप कार्यवृत्त मंजूर करणे.

बाब क्रमांकः १७०/१८.

विषयः- मुंबई मंडळातील मागणीअभावी रिक्त असलेल्या दुकानी गाळयांच्या विक्रीचा धडक कार्यक्रम हाती घेणेबाबत.

ठराव क्रमांकः५६०४ दिनांकः३०.८.२०००

मुंबई मंडळातील मागणीअभावी रिक्त असलेल्या दुकानी गाळयांची विक्रीची धडक मोहीम राबविण्यासाठी रु. १८.६५ लक्ष खर्चास मान्यता देण्यांत येते. जाहिरातीसाठी सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद-२०२ चा भंग क्षमापित करुन मे. हरी माथूर कन्सल्टन्सी या जाहिरात संस्थेस देण्यास मान्यता देण्यांत येते. इतिवृत्ताच्या मान्यतेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी तात्काळ करण्यांत यावी.

सदरचा ठराव कायम करण्यांत आला.

बाब क्रमांकः१७०/१०.

विषयः- पहिल्या मजल्यावरील मानव संसाधन विकास केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापनाचे काम कंटिन्युईंग एज्युकेशन ॲन्ड ट्रेनिंग सेंटर यांना देण्याचा उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांकः ५६०५ दिनांकः ३०/८/२०००

गृहनिर्माण भवनातील पहिल्या मजल्यावरील मानव संसाधन विकास केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापनाचे काम कंटिन्युईंग एज्युकेशन ॲन्ड ट्रेनिंग सेंटर यांना दर महिना रु. ३२,०००/- या दाराने एक वर्षाकरीता देण्याच्या उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निर्णयास प्राधिकरण कार्योतर मंजूरी देण्यांत येत आहे.

सदरचा ठराव कायम करण्यात आला.

बाब क्रमांकः १७०/१५

विषयः- आदर्श निवारा सुधार प्रकल्प पथदर्शी योजना..
मेघवाडी जोगेश्वरी (पूर्व)

<u>ठराव क्रमांकः५६०६</u> **दिनांकः ३०.८.२०००**

झोपडपट्टीमध्ये राबविल्या जाणाऱ्या नेहमीच्या योजनेपेक्षा या योजनेचे स्वरुप भिन्न असल्याने ही योजना पथदर्शी असल्याने व स्थानिक रहिवाशांचा पूर्ण सहभाग असल्याने इमारतीचे बांधकाम व तद्नुषंगिक कामे प्रस्तावित समितीमार्फत कंत्राटदाराची निवड करुन कामे करुन घेण्यास सर्वांनुमते परवानगी देण्यांत येत आहे.

सदरचा ठराव कायम करण्यात आला.

बाब क्रमांकः१७०/२.

विषयः- स. नं. १३८ मानखुर्द येथे व प्रतिक्षानगर, सायन येथे झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतंर्गत बांधण्यात आलेल्या रिक्त सदनिकां/इमारतीसाठी 'संरक्षण व पहारा व्यवस्था पुरविण्याबाबत.

<u>ठराव क्रमांकः५६०७</u> **दिनांकः- १५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

वरील विषयाच्या अनुषंगाने प्राधिकरणाने मानखुर्द व प्रतिक्षानगर, सायन येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या व पूर्णतः वाटप न झालेल्या इमारतींना प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे संरक्षण व पहारा व्यवस्था ठेवण्यास (दि.१९/६/२००० ते दि. १८/६/२००१) एक वर्षाकरीता मान्यता देत आहे. तसेच जसजसे इमारतीचे वाटप होईल त्यानुसार संरक्षण व पहारा व्यवस्था कमी करण्याच्या सूचना प्राधिकरण देत आहे.

प्राधिकरणाचे प्रचलित धोरणानुसार प्रथम एक वर्षाच्या कालावधीसाठी होणाऱ्या संरक्षण व पहारा व्यवस्थेच्या खर्चाची परतफेड करण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळाचे मुख्य अधिकारी यांना आहेत व त्यानंतरच्या कालावधीकरीता प्रकरणे प्राधिकरणासमोर सादर केली जातात.

प्राधिकरण असा निर्णय घेते कीं, प्रथम एक वर्षाच्या कालावधीनंतर संरक्षण व पहाऱ्याच्या व्यवस्थेची खर्चाची प्रकरणे उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी तीन वर्षापर्यतच्या कालावधीकरीता मंजूर करावीत व त्यानंतर पुढील कालावधीकरीता प्रकरणे प्राधिकरणासमोर सादर करावीत.

प्राधिकरण खालील अटीं व शर्तीवर सदरहू विषयास मान्यता देत आहे.

१. सदरहू एजन्सीला अदा करावयाची रक्कम त्या एजन्सीच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहील.
२. प्रत्येक महिन्याला त्या एजन्सीकडून त्यांचे कार्यक्षेत्रात घुसखोरी न झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यांत यावे.
३. सदरहू प्रमाणपत्र तपासून त्याप्रमाणे त्यांना रक्कम अदा करण्यांत यावी व ही जबाबदारी मिळकत व्यवस्थापकांची राहील.
४. सदरहू एजन्सीकडून बँक गॅरंटी प्रत्येक तीन महीन्याच्या मोबदला इतकी घेण्यांत यावी व त्यांच्या कामामध्ये कांही चुकारपणा झाल्यास त्याची वसूली बॅकेमार्फत करण्यांत यावी.
५. एजन्सीच्या कामामध्ये चुकारपणा झाला व घुसखोरी झाल्यास ती घुसखोरी म्हाडातर्फे काढण्यांत येईल व त्याबद्दलची आर्थिक शिक्षा एजन्सीला देण्यांत येईल.

ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यांत यावी.

बाब क्रमांकः१७०/५

विषयः- मुंबई शहर जिल्हा व उपनगर जिल्हा यांत डोंगरावर, तसेच डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या झोपडपट्टीवासियांची जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या संरक्षक भिंत बांधकाम कार्यक्रमाबाबत मानके व मार्गदर्शकक तत्वे निश्चित करणे.

ठराव क्रमांक : ५६०८ **दिनांक १५/९/२०००**

एकमताने निर्णय घेतला की, चालू वर्षीच्या अंदाजपत्रकात शासनाकडून यावयाचे अंदाजीत निधीच्या ५० टक्के पर्यत म्हाडाचा निधी खर्च करण्यात मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः१७०/६

विषयः- झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमासाठी शासनाकडसून अनुदान मिळण्यासापेक्ष मंजूर शासकीय तरतुदीच्या अधीन राहून प्राधिकरणाकडून मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाला देण्यात येणाऱ्या निधीवर व्याज आकारण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५६०९ **दिनांकः१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमासाठी तसेच संरक्षण भिंती कामांसाठी शासनाकडून मंजूर अनुदानाची रक्कम प्राधिकरणाला मिळण्यास विलंब होत असल्याने शासनाकडून जमा अपेक्षित असलेल्या रकमेपर्यत वर्षावधीत आवश्यक भासेल त्याप्रमाणे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाला प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन देण्यांत येणाऱ्या प्राधिकरण निधीवर तो तात्पुरती उचल (ब्रिजींग फायनान्स) समजून त्यावर द.सा.द.शे. ५ टक्के दराने व्याज आकारण्यास मान्यता देण्यात येते. या निर्णयाची अंमलबजावणी सन १९९९-२००० पासूनच करण्यांत यावी व प्राधिकरणाला द्यावयाच्या व्याजापोटी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने आपल्या सन २०००-२००१ च्या सुधारीत अर्थसंकल्पात व यापुढील प्रत्येक वर्षाच्या अर्थसंकल्पात आवश्यक त्या रकमेची तरतूद प्रस्तावित करावी. सन १९९८-९९ वर्षातील रु. ९५०.२९ लाख रकमेवरदेखील व्याज आकारण्यात यावे.

बाब क्रमांकः १७०/७

विषयः- विभागीय मंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या गृहनिर्माण योजना तथा राष्ट्रीय गृहनिर्माण योजना राबविण्याकरीता हुडको कर्जाऐवजी प्राधिकरणाचा निधी वापरण्याबाब माहितीसाठी टिप्पणी.

<u>ठराव क्रमांकः५६१०</u> **दिनांकः- १५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१.१ बाब टिपणीमध्ये विशद केलेली माहिती लक्षांत घेतां आता असे ठरविण्यात आले आहे कीं, शासनाकडून प्राप्त झालेल्या रु. १०.७० कोटी एवढेच फक्त कर्ज हुडकोकडून घ्यावे. म्हणजेच याच रकमेपर्यत कर्ज सिमीत करावे. ज्या योजना प्रगतीपथावर आहेत त्याकरीता सुमारे रु. ३८ कोटीचा निधी प्राधिकरणाच्या निधीतून कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावा. या निधीची वसूली लाभधारकांकडून भाडेखरेदी हप्त्याप्रमाणे व हुडकोने लागू केलेल्या व्याजदरानुसार करण्यात यावी. विभागीय मंडळांनी हुडकोकडे केलेल्या अर्जानुसार तथा हुडकोने मंजूर केलेल्या रु. ४८.९२ कोटीच्या कर्जाऐवजी शासनहमी प्राप्त झालेल्या रु. १०.७० कोटीच्या योजनांसाठी कर्ज सिमीत करावयाचे असल्यामुळे इतर योजनेचे कर्जाचे अर्ज विभागीय मंडळांनी मागे घ्यावेत. डॉक्युमेंटेशन चार्जेस पोटी झालेला खर्च हा त्या त्या योजनेवर वर्ग करावा लागेल. याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी विभागीय मंडळांना कळवावे. मुख्य अधिकारी यांनी ज्या योजनांना, हुडको कर्जाच्या निधी-१५३ अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिली आहे, त्यामध्ये बदल करुन, लेखाशिर्ष प्राधिकरण निधी १६० अशी सुधारणा करावी. विभागीय मंडळांनी लाभधारकांकडून प्रचलित तथा जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या अटीं शर्तीनुसार भाडे खरेदीचे हप्ते वसूल करावे.

१.२ विभागीय मंडळांनी २०००-२००१ च्या प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकामध्ये ३३७८ इडब्ल्यूएस गाळे व एल.आय.जी.चे ५४०२ एल.आय.जी. गाळयांच्या बांधकामाच्या योजना दर्शविल्या आहेत. यासाठी सुमारे रु. ४०,०००/- प्रति गाळा इडब्ल्यूएस आणि रु. १,००,००० प्रति गाळा एलआयजी या हिशोबाने सुमारे रु. ६७ कोटी तथा आवश्यक तेवढा निधी कर्जरुपात भाडेखरेदी पध्दतीने उपलब्ध करुन द्यावा. याकरीता नॅशनल हौसिंग बँक किंवा इतर वित्तीय संस्थेचे कर्ज किंवा योग्य असल्यास प्राधिकरणाचा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी योजनानिहाय निर्णय उपाध्यक्ष/प्रा. घेतील.

वरील प्रस्तावास प्राधिकरणाने अनुमती दिली असून स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी सुरु करावी.

बाब क्रमांकः१७०/८

विषयः- म.गृ. व क्षे.वि. प्राधिकरणामार्फत अत्यल्प उत्पन्न गटासाठी राज्यामध्ये मुंबई व्यतिरिक्त इतर ६१ नागरी क्षेत्रामध्ये ५०,००० सदनिकां बांधण्याबाबत.

ठराव क्रमांक ५६११ **दिनांक १५/९/२०००**

एकमताने निर्णय धेतला की,

महाराष्ट्र गहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत अत्यल्प उत्पन्न गटासाठी राज्यामध्ये मुंबई व्यतिरिक्त इतर ६१ नागरी क्षेत्रामध्ये ५०,००० सदनिकां बांधण्याच्या कार्यक्रमासाठी शासनाकडून ८३ कोटी अनुदान प्राप्त होणार आहे. त्यासाठी कालावधी लागणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अनुदान प्राप्त होण्याची वाट न पाहता म्हाडाने प्रारंभीक कार्यवाही करावी व त्यासाठी म्हाडाचे निधीचा विनियोग करण्यात यावा. शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यावर त्याची परतफेड करण्यात यावी.

बाब क्रमांकः१७०/९

विषयः- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची बुटीबोरी
औद्योगिक क्षेत्रातील १० हेक्टर जमीन देण्याबाबत.

ठराव क्रमांकः५६१२ **दिनांकः-१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील १० हेक्टर जमीन रु. १५० प्रति चौ. मी. या दराने घेण्यास उपाध्यक्ष/प्रा. यांनी घेतलेल्या निर्णयास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः१७०/११

विषयः- प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय
खर्चाची प्रतिपूर्ती वाढवून देणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५६१३</u> **दिनांकः-१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

वैद्यकीय खर्चापोटी प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्याना सन २०००-२००१ पासून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम रु. ३५००/- वरुन रु. ५०००/- एवढी वाढ दि.१/४/२००० पासून करण्यास पूर्वीचा ठराव क्रमांक ५५८३ दिनांक १३/६/२००० अन्वये मान्यता दिली आहे. या वैद्यकीय खर्चाची परतफेड करण्यासाठी डॉक्टरचे खर्चाबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदरहू रक्कम एकाच हप्त्यांत घेण्याचीही मुभा राहील.

सदर ठरावाची अमंलबजावणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक :१७०/१२.

विषय : टाटा हौसिंग डेव्हलपमेंट कंपनी यांच्या
मार्फत एलआयजी करीता योजना
राबविण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक :५६१४</u> **दिनांक : १५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला की,

टाटा हौसिंग डेव्हलपमेंट कंपनी यांच्या सर रतन टाटा या धर्मादाय विश्वस्त संस्थेमार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राबविण्यांत येणाऱ्या योजनेस मान्यता देण्यांत येत आहे.

बाब टिपणीतील अटी विचारात घेऊन या योजनेबाबत टाटा हौसिंग कंपनीसह सखोल चर्चा करुन सदर प्रकल्प राबविण्यात यावा. याबाबतच्या अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना राहातील.

बाब क्रमांकः१७०/१३

विषयः- धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास

<u>ठराव क्रमांकः५६१५</u> **दिनांकः१५.९.२०००**

एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला-

म्हाडाने धारावी मध्ये विकसकाची भूमिका घेण्यास तत्वता मान्यता देण्यात येते. याबाबत संदर्भ प्रस्ताव करून खर्चासह बिझनेस प्लॅन तयार करून अंतिम मान्यतेसाठी प्राधिकरणासमोर आणावे. संदर्भ अहवाल तयार करण्यासाठी श्री मुकेश मेहता रचनाकार यांची कन्सटंट म्हणून नेमणूक करण्यात यावी. त्याना देण्यात येणा-या कामाच्या अटी व शर्ती उपाध्यक्ष/प्रा यांनी ठरवाव्यात. म्हाडाने धारावी येथे नियोजन व विकीसक म्हणून वरील परिच्छेदच्या अधीन राहून खालील अटी व शर्ती वर कार्य करावे.

१. पीएमजीपी अंतर्गत तयार करण्यात आलेल्या धारावी क्षेत्राचा मास्टर प्लानचा आढावा सद्यस्थितीनुरुप घेऊन त्यामध्ये खाजगी तंत्रज्ञांच्या मदतीने बदल करण्यांत यावे.
२. शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे शुल्क रु. ८४०/- प्रति चौ.मी. वरुन रु. ५६०/- प्रति चौ.मी. करणे,सदनिकेमागे अनामत रक्कम रु. २०,०००/-ऐवजी रु. १०,०००/- करावी. वरील शुल्क कमी केल्यामुळे योजनेवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार असल्यामुळे शासनास त्यादृष्टीने विनंती करण्यात यावी.
३. झोपडपट्टी पुनर्वसन योजना ना नफा, ना तोटा तत्वावर आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी लाभार्थीकडून आर्थिक सहभाग घ्यावा, जो कमीत कमी रु. २५,०००/- व जास्तीत जास्त रु. ७५,०००/- इतका असेल.
४. धारावी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना आर्थिकदृष्टया वर्धनक्षम करण्याकरीता व त्याचा सखोल अभ्यास करण्याकरीता एका अभ्यासगटाची स्थापना करण्यात यावी. त्यामध्ये प्राधिकरणाचे वरीष्ठ वास्तुशास्त्रज्ञ/प्रा., मुख्य अभियंता-२/प्रा. व वित्त नियंत्रक/प्रा.यांचाही समावेश करण्यांत यावा.
५. धारावी येथील मोकळया जागा, महापालिकेची जागा, शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे संक्रमण गाळे/स.क्र.३४३/भाग मधील टी जंक्शन येथील भूखंड, सायन स्टेशनजवळील शासकीय भूखंड म्हाडाकडे हस्तांतरीत करण्यात यावेत व तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

६. धारावी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना आर्थिकदृष्टया वर्धनक्षम करण्यासाठी एकत्रित आर्थिक सक्षमता (ग्लोबल फायनान्शियल व्हायबलिटी) व एकत्रित चटईक्षेत्र निर्देशांक (ग्लोबल एफ. एस. आय.) यांचा विचार करण्यांत यावा.

७. शासनाकडे म्हाडाचा रु. ३०० कोटी निधी पडून आहे. धारावी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस आर्थिक मदत लागणार आहे त्यादृष्टीने बीज पैसा (सीड मनी) म्हाडास उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने म्हाडास रु. ३०० कोटी रुपयांपैकी प्रथम रु. ५० कोटीचा हप्ता द्यावा व त्यानंतर ५०/५० कोटीच्या हप्त्यांमध्ये उर्वरीत निधी सदर योजना हाती घेण्याकरीता उपलब्ध करुन द्यावा.

८. म्हाडाची धारावीसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यांत आली आहे. परंतु योजनेच्या नकाशांची छाननी करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही काम म्हाडाकडून केले जात नाही. त्यामुळे वि.नि./प्रा. चे काम म्हाडाकडून योग्ययरित्या केले जात नाही. तरी नकाशे मंजूरी व वि.नि./प्रा. अंतर्गत येणाऱ्या इतर मंजूऱ्या म्हाडाकडे एक खिडकी अंतर्गत मंजूर करण्याचे अधिकार महानगर प्रादेशिक नगर रचना कायद्यांतर्गत देण्यांत यावे.

९. धारावी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत काम करण्यासाठी मोकळे भूखंड आवश्यक आहेत. त्यादृष्टीने सद्या शासकीय मालकीचे फारच थोडे व छोटे भूखंड सद्या उपलब्ध आहेत. परंतु खाजगी मालकीच्या मोठया प्रमाणात मोकळया जागा धारावीमध्ये उपलब्ध आहेत. सदर खाजगी भूखंड म्हाडाचा अधिनियम कलम ५२ अंतर्गत खरेदी करण्यांत यावेत व सदर खरेदी शासनाने जारी केलेल्या शासन निर्णय क्र. एडीएन/१०९२/२३४८/का.१०, दि. ६/२/१९९३ नुसार कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाने विशेष अधिकार द्यावेत.

१०. धारावीमध्ये मुंबई महानगरपालिकेमार्फत मलनिस्सारण, पाणीपुरवठा, रस्तेबांधणी इ. सुविधांचा नियोजन आराखडा तयार करण्यांत यावा व त्या आराखडयाप्रमाणे कार्यक्रम मुंबई महानगरपालिकेने स्वबळावर किंवा शासनाच्या निधीतून राबवावा.

बाब क्रमांकः१७०/१७

विषयः- मॉडर्न मिल व मातुल्य मिल येथील प्राधिकरणातर्फे
राबविण्यात येणाऱ्या गाळयांचा विक्री दर ठरविण्याबाबत.

<u>ठराव क्रमांकः५६१६</u> **दिनांकः१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,प्राधिकरणाने दि. १५/३/९९ रोजी मॉडर्न मिल येथील ठरविलेले सदर रु. २०००/- ते २५००/- प्रति चौ. फू. व मातुल्य मिल येथील ठरविलेले दर रु. २०००/- ते २४००/- प्रति चौ. फू. हे जुनेच दर कायम ठेवावेत.

योजनेचे ठिकाण	दर रु. प्रती चौ.फूट बांधकाम क्षेत्रावर
मॉडर्न मिल (१५४-८४ सदनिका)	२५००
मातुल्य मिल (११२-४२ सदनिका)	२४००

मॉडर्न मिल व मातुल्य मिल येथे बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी प्रथम टप्प्यामध्य ५० टक्के बुकींगसाठी वर दर्शविलेल्या दरानुसार जाहिरात देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. या जाहिरातीस मिळणारा प्रतिसाद विचारांत घेऊन नंतर दरवाढ करणेबाबत विचार करण्यांत यावा.

बाब क्रमांक : १७०/२०.

विषय : निवासी शिपायाऐवजी रोख भत्ता
मंजूर करणेबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६१७</u> **दिनांक :१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कि,

प्राधिकरणाच्या दिनांक २५/३/१९९२ रोजीच्या आदेशामध्ये निवासी शिपाया ऐवजी रोख भत्ता मिळणा-या अधिका-यांच्या यादीत सचिव/प्राधिकरण या पदाचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

यापुढे निवासी शिपायाऐवजी रोख भत्त्यात शासनाने वाढ केल्यास तो अनुज्ञेय अधिका-यांना मंजूर करणेबाबतचे अधिकार उपाध्य /प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सचिव/प्राधिकरण या पदावर सध्या काम करीत असलेल्या प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांना रोख भत्ता देण्याबाबत उपाध्य /प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७०/२१.

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळाच्या सभापतींना मोबाईल दूरध्वनी खरेदी करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६१८ **दिनांक :१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कि,

प्राधिकरणांतर्गत मुंबई व मुंबई बाहेरील प्रादेशिक मंडळाच्या सभापतींना मोबाईल दूरध्वनीची सुविधा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येते. मुंबई व मुंबई बाहेरील सभापतींना देण्यात येणा-या मोबाईल दूरध्वनीच्या कॉल्सची मर्यादा रु. २,८००/- निश्चित करण्यात यावी. या निर्णयाची अंमलबजावणी करुन कार्योत्तर मंजूरीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

बाब क्रमांक : १७०/२२.

विषय : श्री. जॉन राघोजी अल्हाट, सुतार यांच्या सेवानिवृत्ती विषयी.

<u>ठराव क्रमांक :५६१९</u> **दिनांक :१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कि,

श्री. जॉन अल्हाट, सुतार, मुंबई मंडळ यांच्या दिनांक १/५/१९९७ ते दिनांक २१/१/१९९९ हा वाढीव सेवेचा कालावधी पुनर्नियुक्ती म्हणून मान्य करण्यात येत आहे. त्यानुसार त्या कालावधीसाठी त्यांना पुनर्नियुक्तीच्या दराने वेतन देण्यात यावे.

बाब क्रमाक : १७०/२३.

विषय : मोहाडी, धुळे येथील भूमीपुजन समारंभाच्या
खर्चाला कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव.

<u>ठराव क्रमांक :५६२०</u> **दिनांक :१५.९.२०००**

एकमताने निर्णय घेतला कि,

मोहाडी, धुळे येथील भूमिपुजन समारंभाच्या कार्यक्रमासाठी झालेला खर्च रु. २८,०००/- ला उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी दिलेल्या मान्यतेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २ नोव्हेंबर, २००० रोजी घेण्यांत आलेल्या १७१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांकः१७१/२

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या बैठक क्र. १६५,१६६ व १६७ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

<u>ठराव क्रमांकः५६२१</u> **दिनांकः-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, या मोहीमेतंर्गत अर्जदारास पैसे भरण्याची आणखीन ४५ दिवसांची मुदतवाढ देण्यांत यावी व त्यासाठी व्याज आकारु नये. तसेच एकूण ९० दिवसानंतर लाभधारकाना गाळयापोटी भरावयाची रक्कम भरण्यास आणखीन एक महिन्याची मुदतवाढ देण्यांत यावी. त्यासाठी १६ टक्के दराने व्याज आकारण्यांत यावे. मात्र, यापुढे कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ देण्यांत येऊ नये. बाब टिप्पणीशिवाय मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी गाळेविक्रीसंबंधात उपस्थित केलेल्या अडचणीं विचारात घेऊन सदर निर्णय घेण्यांत येत आहे.

बैठकीचे कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता याबाबतीत पुढील कार्यवाही करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१७१/३

विषयः- प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ४०७६, दि. २/६/१९९३ च्या ठरावानुसार मुंबई शहरात कार्यालयीन इमारतीची विक्री करतांना आकारण्यात आलेल्या किंमतीबाबत.

<u>ठराव क्रमांकः- ५६२२</u> **दिनांकः-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं, कार्यालयीन इमारतींच्या विक्रीसाठी प्राधिकरणाने मंजूर केलेल्या ठराव क्र. ४०७६ अन्वये, विक्रीची किंमत चालू बाजारभावाच्या धर्तीवर ठरावानुसार फरकाची रक्कम सर्व विक्री करण्यांत आलेल्या लाभार्थींकडून वसूल करण्यांत यावी.

बाब क्रमांकः१७१/६

विषयः- गाळयांचे भाडे, भाडे खरेदी हप्ते विहित मुदतीत न भरल्यास वसूल करावयाचा दंड.

<u>ठराव क्रमांकः५६२३</u> **दिनांकः- २/११/२०००**

प्राधिकरणाच्या प्रादेशिक मंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या वसाहतीमधील गाळे ज्या लाभधारकास वा गाळेधारकास वितरीत झाले, त्यांना भाडे/मासिक आकार/मासिक हप्ते भरण्यास एका महिन्यापेक्षा जास्त विलंब झाल्यास दुसऱ्या महिन्यापासून १.५ टक्के या प्रतिमहा या दराने दंडात्मक आकार वसूल करण्यांत यावा. सदर दंडात्मक रक्कम भाडे/भाडे खरेदी हप्ता व सेवा आकार/अन्य आकारापोटी थकित रकमेवर आकारण्यांत यावी. याशिवाय विलंबापोटी दुसरा कोणताही दंड आकारण्यांत येऊ नये.

बाब क्रमांक : १७१/७

विषय : मुंबई मंडळामध्ये मागणी अभावी रिक्त असलेल्या विखुरलेल्या गाळयांच्या किंमती कमी करुन प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर विक्री करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५६२४</u> **दिनांकः-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कि, मुंबई मंडळाच्या विखुरलेल्या २९१ सदनिका (आदर्श नगर ओशिवरा सोडून) बाब टिपणी सोबत जोडलेल्या तक्त्यातील प्रस्तावीत दराने विकण्यास मान्यता देण्यात येते.

या सदनिका दिर्घकाळ अवितरीत राहिल्याने आता जाहिरात प्रसिध्द करताना या सदनिंकासाठी उत्पन्नाची मर्यादा ठेवण्यात येऊ नये. तसेच, इतर आवश्यक त्या बाबींसाठी लाभधारकांकडुन स्टॅम्प पेपरवर शपथपत्र घेण्यात यावे.

आदर्श नगर ओशिवरा येथील भूखंडा संबधात विक्री दर निश्चित करण्यासाठी प्राधिकरणा समोर स्वतंत्र बाब टिपणी सादर करण्यात यावी. सदर ठरावाची अमंलबजावणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७१/८

विषय : म्हाड अधिनियम कलम ५२ अन्वये जोगेळे,तालुका दापोली
जिल्हा-रत्नागिरी येथील सर्व्हे क्र.३९,अ-१ अ या खाजगी
मालकीच्या ०.८१ हेक्टर जमिनीची खरेदी करण्यासंबंधी..

ठराव क्रमांकः५६२५ **दिनांक :२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कि, जोगेळे, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी येथील सर्व्हे क्रमांक ३९, अ-१/अ या सुमारे ०.८१ हेक्टर जमीनीची रु. १७,३००/- प्रतिगुंठा या दराने किंमत रु. १४,०१,३०० विहीर व पोहच रस्ते बांधण्यास आलेली रु. ३.०० लक्ष खर्च मिळून रु. १७,०१,३०० मोबदला निश्चित करण्यात यावा. सदर मोबदल्यानुसार जमिनीच्या विकासासहीत रु. २१,००३/- प्रति गुंठा म्हणजेच रु. २१०.०३ प्रति चौ.मी. एवढा दर निश्चित करण्यास मान्यता देण्यात येते. सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांक १७१/९

विषय : टागोर नगर,ग्रुप नं.१,विक्रोळी येथे
नगरसेवक निधीतुन वाचनालय बांधण्यास
ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत..

ठराव क्रमांक :५६२६ **दिनांक :-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कि, टागोर नगर ग्रुप नं. १ विक्रोळी येथे श्री.निरभवणे यांच्या नगरसेवक निधीतून वाचनालय बांधण्यास प्राधिकरणाच्या १९९२ च्या जमिनीच्या किंमती विषयक धोरणास अनुसरुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक १७१/१०

विषय : अंतर्गत दूरध्वनी यंत्राची दुरुस्ती व देखभाल बाबत..

ठराव क्रमांकः५६२७ **दिनांकः-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कि, म्हाडा अंतर्गत असलेली दूरध्वनी यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यासाठी बाब टिपणीत सूचविलेल्या ३ कामांना मंजूरी देण्यात येत आहे. ही कामे निविदा न मागविता एच. सी.एल. इन्फो सिस्टीम लिमिटेड कंपनीकडून थेट पध्दतीने करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांक : १७१/११

विषय : म्हाडा मार्फत अत्यल्प उत्पन्न गटासाठी राज्यामध्ये मुंबई व्यतिरिक्त ६१ नागरी क्षेत्रामध्ये ५०००० सदनिका बांधण्याबाबत.. लातूर नगर परिषद हद्दीत गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक :५६२८ **दिनांक :-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कि, महाराष्ट्र शासन व जिल्हा गृहनिर्माण समिती यांनी घेतलेल्या निर्णयानुसार लातूर नगरपरिषद हद्दीत ५०० घरकुलांची गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी म्हाडाने त्यांचे मालकीची २.६३६ हेक्टर जमिन नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक १७१/१२

विषय : सर्वोदय नगर,मजासवाडी (जोगेश्वरी)येथील
न.भू.क्र.१५५ पै.श्रमिक विदयालयाच्या ताब्यात
(अनधिकृत) असलेली जागा त्यांचे नांवे
नियमित करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक :५६२९</u> **दिनांक :२/११/२०००**

सर्वोदय नगर ,मजासवाडी जोगेश्वरी येथील नगर भू क्रमांक १५५ पै जमीन त्या विदयालयाचे नांवे खालील अटी व शर्तीवर ३० वर्षाच्या भाडेपट्टीवर देण्यास मान्यता देण्यात येते.

१. बाब टिपणी सोबत दिलेल्या नकाशामध्ये योजना आणि मत (अंदाजे क्षेत्रफळ २०.५८ चौ.मी.) श्रमिक विदयालयास ३० वर्षाच्या भाडेपट्टीवर देण्यास मंजूरी देण्यात येत

२. एकूण जमिनीपैकी वरील २०.५८ चौ.मी. जमीनी वरील आरक्षण शाळेच्या नांवे बदलून घेण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहिल.

३. शासनाचा शिक्षण विभाग तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका किंवा इतर स्थानिक संस्था यांच्याकडुन आवश्यकते प्रमाणे प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहिल.

४. संस्थेच्या जागे लगत मंडळाने बांधलेल्या इमारतीसाठी आवश्यक ती असलग्न जागा वगळून रिक्त उर्वरित जागेचे नियमितीकरण करण्यास मान्यता देण्यात येते.

५. १९८६ साली वितरणाच्यावेळी संस्थेस कळविण्यात आलेले रु. ३०० चौ.मी.दर किंवा जमीन विकासासाठी दिलेला प्रत्यक्ष खर्चावर आधारित येणारा खर्च यापैकी जो जास्त येईल तो आकारण्यात यावा.

सदरहू ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १७१/१४

विषय : पुणे गृहनिर्माण कर्मचारी सहकारी क्रेडीट सोसायटी लिमिटेड यांना ठेव देण्याबाबत..

ठराव क्रमांकः५६३० **दिनांक :-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कि, पुणे गृहनिर्माण कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित पुणे यांना रु. १० लाख ठेव प्रतिशत प्रतीवर्षी ११.९५ दराने व्याज आकारुन हया रु. १ लाख या प्रमाणे १० समान मासिक हप्त्यात व्याजासहित परतफेड करण्याचे अटीवर देण्याचे मा.उपाध्यक्ष /प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

मूळ विषयसूचीवरील व पुरवणी विषयसूचीवरील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेतल्यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या परवानगीने खालील आयत्या वेळचे विषय चर्चेस घेण्यांत आले.

बाब क्रमांकः१७१/१५

विषयः- प्रतिक्षानगर, सायन कोळीवाडा येथील मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांनी बहुमजली इमारतीत बांधलेल्या सदनिकांपैकी संक्रमण शिबिर म्हणून राखून ठेवलेल्या सदनिकांचे झोपडपट्टी प्राधिकरण यांनी शिफारस केलेल्या विकसकांना वितरीत करावयाच्या सदनिकांच्याबाबत धोरण निश्चित करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः-५६३१</u> **दिनांकः-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मा. सभापती/मुंबई मंडळ यांनी विशद केलेल्या परिस्थितीमुळे केवळ अपवादात्मक बाब म्हणून प्रतिक्षानगर, सायन येथील बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी यांनी बांधलेल्या बहुमजली इमारतीतील एसआरए योजनेमधील ६०८ गाळयांपैकी संक्रमण शिबीरे म्हणून ९६ सदनिकां दौलतनगर येथील विस्थापितांना संक्रमण सदनिका म्हणून सहा महिन्यांचे आगावू भाडे घेऊन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. आगावू भाडे म्हणून प्रति महा प्रति गाळा रु. ८९२/- (कुठलीही अनामत रक्कम न घेता) देण्यांत यावे. सदर रकमेचा भरणा मंडळाकडे आगावू करणे आवश्यक आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी बैठकीचे इतिवृत्त पुढील बैठकीस स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यास प्रशासनास अनुमती देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१७१/१५

विषयः- प्रतिक्षानगर, सायन कोळीवाडा येथील मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांनी बहुमजली इमारतीत बांधलेल्या सदनिकांपैकी संक्रमण शिबिर म्हणून राखून ठेवलेल्या सदनिकांचे झोपडपट्टी प्राधिकरण यांनी शिफारस केलेल्या विकसकांना वितरीत करावयाच्या सदनिकांच्याबाबत धोरण निश्चित करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः- ५६३२</u> **दिनांक : २/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. संक्रमण गाळे विकसकामार्फत झो. पु. प्रकल्पासाठी वापरण्यांत येणार असल्याचे झो. पु. प्राधिकरणाचे पत्र व झो. पु.प्राधिकरणाचे संबंधित विकसकास संक्रमण सदनिका वितरीत करण्यासंबंधीचे ना हरकत प्रमाणपत्र विकसकाने म्हाडास सादर करणे आवश्यक राहील.

२. विकसकाकडे झो. पु. प्राधिकरणाचे/मुंबई महानगरपालिकेचे योजना मंजूर केल्याचे स्वीकृती पत्र (ख्र्ाक्ष) असणे आवश्यक राहील.

३. विकसकास रु. १२००/- प्रति महिना, प्रति गाळा या दराने भाडे आकारण्यांत येईल. तसेच विकसकाने १२ महिन्यांचे भाडे म्हाडाकाडे आगाऊ जमा करणे बंधनकारक राहील.

४. विकसकास प्रति गाळा रु. २०,०००/- प्रमाणे अनामत रक्कम धनाकर्षाच्या स्वरुपात जमा करावी लागेल.

५. विकसकास एक वर्षापेक्षा जास्त मुदतीकरीता संक्रमण सदसनिका वितरीत केल्यास विकसकाने प्रथम ११ महिने संपताच पुढील १२ महिन्यांचे आगाऊ भाडे, म्हाडाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

६. इमारतींची देखभाल व मिळकत व्यवस्थापन जसे कीं, महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरणे, पाणीपट्टी व जननिःसारण शुल्क भरणे, इमारतींची/सदनिकांची विद्युत देयके भरणे, पाण्याचा पंप तसेच लिफट चालविणे व त्यांची देखभाल करणे, इमारतीसाठी योग्य सुरक्षा व पहारा ठेवणे व इमारत/सदनिकांची आवश्यक देखभाल करणे इत्यादी विकसकाची जबाबदारी राहील. ही जबाबदारी विकसकाने न पाळल्यास रु. २०,०००/- प्रति गाळा ही अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.

७. विकसक नियत कालावधी संपल्यानंतर गाळे रिक्त व चांगल्या स्थितीत हस्तांतरीत करतील. गाळयांच्या/इमारतींच्या नुकसानीपोटी/दुरुस्तीपोटी जर कांही खर्च झाला तर तो विकसकास करावा लागेल.

८. वरील निर्णयाची अंमलबजावणी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे आदेशानुसार ज्या मंडळाकडे सोपविण्यांत येईल, त्या मंडळाच्या उपमुख्य अधिकारी/मिळकत व्यवस्थापन यांनी करावयाची आहे. तसेच भाडे वसुलीच्या संदर्भात विकसकाकडून भाडेवसूली करण्याची जबाबदारी सदर उपमुख्य अधिकारी/मि.व्य. यांनी लेखी स्वरुपात संबंधित मिळकत व्यवस्थापकांकडे सोपवावी. जर या कामांत कांही निष्काळजीपणा दिसून आला तर संबंधितांवर कडक कारवाई करण्यांत येईल.

९. सदर ठरावाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या यापूर्वीचा ठराव क्रमांक ५५५९, दि. २७/३/२००० मधील अट क्रमांक ३ मध्ये बदल होईल. इतर अटीं व अ, ब, क व ग कायम रहातील.

बाब क्रमांकः- १७१/१६

विषयः- शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांना तत्कालीन मुंबई मंडळ किंवा प्राधिकरणाने दिलेल्या भूखंडावरील बांधलेल्या इमारतीच्या कांही भागातील **जागा भाडयाने देण्यास** परवानगी देणेबाबत.

ठराव क्रमांकः ५६३३ **दिनांकः-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

डॉ. ॲनी बेझेंट रोड, वरळी येथील सस्मिरा संस्थेस भाडयाने दिलेल्या भूखंडावर संस्थेने बांधलेल्या बहुमजली इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील १०,०००/- चौ. फूटाची जागा सदर संस्थेस स्कूलनेट इंडिया लिमिटेड या संस्थेस मासिक भाडेपट्टयावर देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. संस्थेस मिळणाऱ्या उत्पन्नावेळी २५ टक्के रक्कम सस्मिरा संस्थेने मुंबई मंडळाकडे भरणा करावयाचे आहे.

या ठरावामुळे प्राधिकरणाचा पूर्वीचा ठराव ७३१, दि. २९.१०.१९८३ मध्ये अंशतः बदल होईल.

सस्मिरा या संस्थेने बांधलेल्या इमारतीच्या टेरेसवर व इमारतीच्या अनुलग्न जागी मे. एम्प्रेस आऊट डोअर ॲडव्हरटाईजिंग यांना जाहिरात फलक लावू देण्यास अनुमती देण्यांत येत आहे. मात्र या जाहिरातीच्या उत्पन्नामधून होणाऱ्या नफयामधून २५ टक्के रक्कम त्यांना मंडळाकडो जमा करणे आवश्यक राहील.

यापुढे अशा प्रकरणामध्ये इमारतीच्या कोणताही भाग भाडयाने देण्याचे, कोणता मजला देण्याचे इत्यादी बाबींवर निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना प्रदान करण्यांत येत आहे. मात्र बांधलेल्या इमारतीपैकी २५ टक्क्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ भाडयाने देता येणार नाही व उत्पन्नाच्या २५ टक्के रक्कम मंडळाकडे भरणे आवश्यक राहील.

तत्कालिन उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी वरळी येथील शिवप्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्यांच्या आवारात जाहिरात फलक लावू देण्यात दिलेल्या परवानगीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१७१/१७

विषय :- मौजे एक्सर, बोरीवली येथील मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर बगीचा व खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेला जमीन क्लब ॲक्वेरिया यांना देखभालीसाठी देणेबाबत.

ठराव क्रमांकः-५६३४ **दिनांकः- २/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार शासनाच्या दि. १३ ऑक्टोबर, २००० च्या पत्रातील अटी व शर्तीवर मौजे एक्सर(बोरीवली) येथील मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर बगीचा व खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जमीन क्लब ॲक्वेरीया यांना देखभाल व विकासासाठी देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

याबाबततच्या विस्तृत अटी व शर्तीबाबतचा क्षतीबंधपत्र क्लब ॲक्वेरीया यांचेकडून मुख्य अधिकारी यांनी करुन घ्यावे.

बाब क्रमांकः१७१/१८

विषयः- स. नं. १९१ अ, येरवडा पुणे येथील विविध उत्पन्न गटाअंतर्गत बांधलेल्या गाळयांच्या अंतिम किंमतीत सुधारणा करण्याबाबत.

ठराव क्रमांकः५६३५ **दिनांकः-२/११/२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. स. नं. १९१ अ, येरवडा, पुणे येथील अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या गाळयांच्या योजनेवर झालेल्या खर्चानुसार दि. २५.४.९६ रोजी जी अंतिम किंमत निश्चित करण्यात आलेली आहे त्याबाबत फेरविचार करण्यांत यावा.

२. दि. २५//९६ रोजी अंतिमतः निश्चित करण्यात आलेली किंमत वसूल करण्याऐवजी मा. मंत्री/गृहनिर्माण यांच्यासमवेत गाळेधारकांच्या प्रतिनिधींसमवेत दि. २१/९/२००० रोजी झालेल्या सनिर्णयानुसार या योजनेतील गाळयाचा प्रत्यक्ष ताबा देतेवेळी जी किंमत आकारण्यात आलेली होती ती किंमत व दि. २५/४/९६ रोजी आकारलेली किंमत यामधील फरकाच्या ४० टक्के एवढी रक्कम सन १९८५-८६ च्या ताबा देतेवेळी आकारलेल्या किंमतीमध्ये मिळवून येणारी किंमत गाळेधारकाकडून वसूल करण्यांत यावी.

३. या योजनेचा फायदा जे गाळेधारक वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या किंमततीचा भरणा त्यांना सूचना दिल्याच्या तारखेपासून ३ महिन्याचे आंत करतील त्यांनाच लागू राहील. जे गाळेधारक ३ ममहिन्याचे आंत पूर्ण रकमेचा भरणा करणार नाहीत त्यांना दि. २५.४.९६ रोजी निश्चित केलेली रक्कम व्याजासहीत भरावी लागेल.

४. वरील योजनेचा फायदा ज्या मूळ गाळेधारकांनी आपल्या गाळयांची विक्री केलेली आहे त्यांनाही देण्यांत यावा. मात्र अशी विक्री केलेल्या गाळेधारकांना म्हाडाचे नियमानुसार हस्तांतरण शुल्क भरावे लागेल.

५. ज्या गाळेधारकांनी यापूर्वी दि. २५.४.९६ रोजी कळविण्यांत आलेल्या अंतिम किंमतीच्या संपूर्ण रकमेचा भरणा केलेला आहे अथवा प्रस्तावित असलेल्या अंतिम किंमतीपेक्षा जास्त रकमेचा भरणा केलेला आहे त्यांना त्यांनी भरणा केलेली अतिरिक्त रककम परत करण्यात येणार नाही.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २३/११/२००० रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : १७२/२

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प ज्ञ १ पवई
संरक्षण व पहारा व्यवस्थेचा प्रस्ताव.

<u>ठराव क्रमांक : ५६३६</u> **दिनांक : २३.११.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गृहनिर्माण महाप्रकल्प - १, पवई प्रकल्पावरील संरक्षण व पहारा व्यवस्थेच्या पहिल्या ६ महिन्याचा व त्यापुढील एक वर्षाचा कालावधी म्हणजे दिनांक ३१.०३.२००० पर्यंतच्या कालावधीसाठीच्या मेसर्स बी.जी.शिर्के यांचे संरक्षण व पहारा व्यवस्थासाठीचे रुपये १०,९८,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर व्यवस्था त्यापुढे इमारत पूर्ण वितरीत होईपर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७२/३

विषय : इमारत पुनर्रचित करतांना ८८ (३) अ, जाहीर करतेवेळी रहिवाशी यादीत नांव नसलेल्या परंतु इमारतीच्या भूखंडावर अनधिकृतपणे राहात असलेल्या रहिवाश्यांना व्हेकेशन नोटीस / पुनर्रचित इमारतीत जागा देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६३७</u> **दिनांक : २३.११.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत पुनर्बांधणी योजनेत कलम ८८ (३) अ खाली प्रमाणपत्र जाहीर करतेवेळी भाडेकरुंची यादी अंतिम ग्राहय धरण्यात यावी. ही यादी तयार करनाता इमारतीच्या भूखंडावर आजूबाजूला असलेल्या गाळेधारकांचाही / रहिवाश्यांचाही पुनर्रचित इमारतीमध्ये गाळा देण्यासाठी विचार करण्यात यावा. इमारतीचा भूखंड ताब्यात घेतल्यानंतर त्या जागेवर येणारा कोणताही अनधिकृत भाडेकरु किंवा झोपडीधारकाच्या पुनर्वसनाची जबाबदारी मंडळाने घेऊ नये.

बाब क्रमांक : १७२/४

विषय : राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास सन २०००-२००१ या वर्षाकरीता शासनाकडून अर्थसंकल्पीत निधी उपलब्ध होईपर्यंत २०.०० कोटी रुपये म्हाडाकडून उपलब्ध करुन देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६३८ **दिनांक : २३.११.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमासाठी शासनाकडून मंजूर अनुदानाची रक्कम प्राधिकरणास मिळण्यास विलंब होत असल्याने शासनाकडून जमा अपेक्षित असलेल्या रकमेपैकी १५ कोटी रुपये टप्प्याटप्प्याने प्रत्येकी ५ कोटी याप्रमाणे झोपडपट्टी सुधार मंडळास प्राधिकरणाच्या निधीतुन देण्यात यावेत. सदर रक्कम तात्पुरती ब्रिजिंग फायनान्स समजून त्यावर दरसाल दरशेकडा १० टक्के दराने व्याज आकारण्यात यावे. तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास देण्यात आलेल्या कर्जावर देखील १० टक्के दराने व्याज आकारण्यात यावे. प्राधिकरणाला द्यावयाच्या व्याजापोटी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सन २००० - २००१ च्या सुधारीत अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद प्रस्तावित करावी.

एकूण २० कोटी पैकी ५ कोटी रुपये लोक आवास येाजनेसाठी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७२/५

विषय : मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. या कंपनीस मुंबई मंडळांतर्गत शासनाचे आदेशानुसार ठोक पध्दतीने काम वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६३९ **दिनांक : २३.११.२०००**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. गोरेगांव येथे १८० चौ.फुटाच्या १२०० संक्रमण सदनिका, तळ अधिक ४ मजले पध्दतीच्या बांधाव्यात व उर्वरित जागेवर मागणी आजमावून अंशदान पध्दतीने अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका तळ किंवा स्टिल्ट अधिक ७ मजले पध्दतीच्या बांधाव्यात. ओशिवरा येथे संक्रमण सदनिका न बांधता फक्त विक्रीच्या सदनिका वरीलप्रमाणचे बांधाव्यात.

२. उपलब्ध चटईक्षेत्राव्यतिरिक्त ०.१८ किंवा लागणारा टीडीआर हा म्हाडाकडील उपलब्ध टीडीआरमधून गोरेगांव येथे वापरण्यांत यावा. तसेच ओशिवरा येथे आवश्यक असल्यास तेथेही टीडीआर वापरावा.

३. गोरेगांव येथे संक्रमण सदनिका व गोरेगांव व ओशिवरा येथे खुल्या विक्रीच्या सदनिकांचे काम मे.बी.जी.शिर्के कन्स्टक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना ठोक पध्दतीने देण्यांत यावे. तळ अधिक ४ मजल्यांच्या इमारतीसाठी बांध्कामचा दर रु. ६६०/- प्रति चौ.फुट राहील व तळ अधिक ७ मजल्याच्या इमारतीसाठभ बांधकामाचा दर रु. ६७५/- प्रति चौ, फुट राहील. कामाचा कालावधी २१ महिने इतका राहील. त्यात वाढ मिळणार नाही.

४. सदरचे बांधकाम अग्रीम अंशदान पध्दतीने हाती घ्यावे. योजनेची जाहिरात द्यावी व लाभार्थींकडून टप्प्याटप्प्राने रक्कम जमा करावी. सदर बांधकाम लाभार्थींच्या मागणीच्या संख्येनुसार करण्यात यावे. खुल्या बाजारात विक्री करावयाच्या सदनिकांचया बांधकामासाठी मागणी आजमावल्याशिवाय बांधकामाचे आदेश देण्यांत येऊ नयेंत.

५. मॉडर्न मिल इ. ठिकाणी मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना दिलेल्या कामामध्ये जे विनिर्देश दिले आहेत व अटी घालण्यात आलेल्या आहेत त्यानुसार विक्रीच्या गाळयांचे स्पेसिफिकेशन व अटी ठेवाव्यात. याप्रमाणे सुधारित स्पेसिफिकेशन असल्यामुळे जास्तीत जास्त रु. ५०/- प्रति चौ.फुट अतिरिक्त दर देय राहील.

६. प्रस्तावात दर्शविलेल्या सदनिकांची संख्या अंदाजित असून महानगर पालिकेची मंजूरी मिळाल्यानंतर सदनिकांची जी संख्या येईल त्या संख्येला अनुसरुन कामाचे आदेश देण्यांत यावे. कामाचे आदेश एकाच वेळी देण्यांत यावेत, म्हणजे त्यानंतर ठेकेदाराचे क्लेम्स उदभवणार नाहीत. सुरवातीस काही प्रमाणात संक्रमण सदनिका व काही प्रमाणात विक्रीच्या सदनिका बांधाव्यात.

७. पायाभूत सुविधंचे काम स्विमींग पूल, क्लब हाऊस तसेच या प्रकल्पामध्ये लागणारी इतर आवश्यक कामे ही देखील कामाचे मूळ ठेकेदार मे.बी.जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉजॉजी लि. यांच्याकडून प्रचलित दरसूचीवर करुन घेण्यात यावीत. प्रचलीत दरसूचीमध्ये दर उपलब्ध नसतील तर सक्षम अधिका-यांकडून दर मान्य करुन घ्यावेत.

८. सदर कंत्राटामध्ये भाववाढीबाबत कोणतीही तरतूद करण्यांत येऊ नये.

९. गोरेगांव येथिल सदनिकांची जाहिरात रु. १५००/- चौ.फुट या दराने देण्यांत यावी. तसेच ओशिवरा येथील सदनिकाची जाहिरात रु. १६००/- प्रति चौ.फुट या दराने देण्यांत यावी.

१०. उपरोक्त सर्व कंत्राट टर्न की पध्दतीने देण्यात यावे. आराखडे तयार करण्यापासून महानगर पालिकेचे / इतर सर्व सरकारी दाखले, रहिवाशी परवाना इ. सर्व कामे ठेकेदाराने करावीत.

११. गोरेगांव व ओशिवरा येथे वास्तुशास्त्रज्ञांना आराखडे करण्यासाठी यापूर्वी नेमलेले आहे. त्यांनी आतापर्यंत केलेल्या कामाचा योग्य मोबदला देऊन त्यांच्याकडून हे काम आता काढून घ्यावे व ही रक्कम या प्रकल्पावर लावावी. त्यांनी केलेल्या आराखडयाचा उपयोग मे.शिर्के यांना नव्याने तययार करावयाच्या आराखडयात रावयास सांगावे व आराखडे चांगल्याप्रकारचे होतील असे पहावे. त्यासाठी मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुख्य अभियंता ज्ञ २ व वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ / प्रा. यांनी एकत्र चर्चा करुन योग्य तो पर्याय निवडावा व त्यावर मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी निर्णय घ्यावा.

१२. वरील निर्णय शासनाच्या आदेशाच्या अधीन राहून घेण्यात येत आहे. तथापि, शासनाचे आदेश आल्यानंतर कामाचे स्वीकृतीपत्र देण्यांत यावे.

१३. ओशिवरा संक्रमण शिबिरामधील अधिकृत भाडेकरुना इतर ठिकाणी हलविण्यांत यावे.

१४. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यांत यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ६/०१/२००१ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : १७३/३

विषय : मौजे वडधामना, नागपूर येथील भूमापन क्रमांक १६१ व भूमापन क्र. १४७ व १४८ यामधील १३.५० हेक्टर जमिन सकल जैन फाऊडेशन या संस्थेस शैक्षणिक वापरासाठी वितरीत करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५६४० **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, मौजे वडधामना, नागपूर येथील भूमापन क्र. १६१ व भूमापन क्र. १४७ व १४८ यामधील १३.५० हेक्टर जमिन सकल जैन फाऊंडेशन या शैक्षणिक संस्थेस वितरीत करण्याच्या भूखंडाची किंमत रुपये २९ लाख पेक्षा कमी करण्यांत येवू नये.

सदर जमिन सार्वजनिक गृहनिर्माण योजनेसाठी उपयुक्त असल्याने सदरचा भूखंड सकल जैन फाऊंडेशन या संस्थेस शैक्षणिक वापरासाठी देणे योग्य होणार नाही, असा शासनास अहवाल सादर करण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७३/४

विषय : विडी कामगार योजने अंतर्गत जालना येथे बांधलेल्या ३५३ सदनिकांचे वाटपाबाबत.

ठराव क्रमांक : ५६४१ **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

विडी कामगार योजने अंतर्गत जालना येथे बांधण्यांत आलैल्या ३५३ सदनिकांपैकी प्रतिसादा अभावी रिक्त राहीलेले १७१ गाळे सर्व सामान्य जनेतस उत्पन्न गट मर्यादा न ठेवता प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर गाळयांची संपूर्ण किंमत (विकास खर्चासहित) जाहिरातीचे दिनांकापर्यंत प्रथम रक्कम भरणा-यास प्रथम विक्री व गाळे, आहे त्या स्थितीत विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यतादेण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७३/५

विषय : स.क्र.१९१ अ, येरवडा पुणे येथील मंडळाच्या वसाहतीतील व पुणे मंडळाच्या इतर ठिकाणच्या वसाहतीतील भूखंडाच्या अनियमित वितरणाबाबत..

ठराव क्रमांक : ५६४२ **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. स.नं.१९१-अ, येरवडाप, पुणे येथिल मंडळाच्या वसाहतीतील व पुणे मंडळाच्या इतर ठिकाणच्या वसाहतीतील भूखंडाच्या अनियमित वितरणाबाबतच्या प्रकरणी दोषी असलेल्या पुणे मंडळातील बाब टिपणीत नमूद केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांची चौकशी करण्या करिता श्री.बेडगे, आय.ए.एस. (सेवानिवृत्त), चौकशी अधिकारी / प्रा. यांची नियुक्ती करण्यात यावी व त्यांनी चौकशीचे काम ३ महिन्यात पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.
२. या प्रकरणातील ज्या १९ भूखंडाचा ताबा संस्था / व्यक्ती यांना देण्यात आला आहे, अशा संस्था / व्यक्तींकडून सदर भूखंडाचे वाटपासाठी मंडळाने निविदा दिली असती तर निविदेत जेवढी किंमत (हातची किंमत / अपसेट प्राईज) ठेवली असती तेवढी किंमत वसूल करुन सदर संस्था / व्यक्ती यांना भूखंडाचे वाटप नियमित करावे. मात्र त्यास संस्थांची तयारी नसल्यास वाटप रदद करावे व भूखंडाचे वाटप रितसर जाहिरात / निविदा मागवून करण्यास मान्यता देण्यात येते.

३. जे भूखंड नियमानुसार वसाहतीतील मोकळी जागा, खेळाचे मैदान म्हणून आहेत (तक्त्यातील अनुक्रमांक ४, अ.क्र.१५) अशा मोकळया जागेचे वितरण करु नये, ते रदद् करण्यात यावे. संस्था / व्यक्ती यांचेकडून घेण्यात आलेली रक्कम त्यांना १० टक्के सरळ व्याजाने परत करण्यास मान्यता देण्यात येते.

४. ज्या ५ भूखंडाचा ताबा देण्यात आलेला नाही त्यापैकी बाब टिप्पणीत उल्लेखिल्या प्रमाणे पिंपरी येथील एम. या १७० चौ.मी.भूखंडाचे वाटप पूर्वीच अनधिकृतपणे रसाचे दुकान टाकलेल्या श्रीमती मंगला गायकवाड यांना शासनाने जमीन वाटप विनियम १६ अंतर्गत केले असल्यामुळे मंडळाने महात्मा फुले श्रमिक संघटनेस प्रस्तावित केलेले वितरण रदद् करुन संस्थेची रक्कम परत करण्यास मान्यता देण्यात येते.

५. ताबा देण्यात आलेल नाही अशा ५ भूखंडापैकी एक मोकळी जागा (ओपन स्पेस - ८ क्षेत्र ७०४ चौ.मी.) आहे. तसेच वर उल्लेख केल्याप्रमाणे ताबा न दिलेल्या पिंपरी येथील एम. या १७० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप शासनाने सौ.मंगला गायकवाड यांना केलेले आहे. उर्वरित २ भूखंडाचा (ॲमेनिटी ९/२ क्षेत्र ५५.५७ चौ.मी. व सी.एच.एस. क्षेत्र ६५४ चौ.मि.) ताबा सदर संस्थांना देण्याबाबत मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७३/६

विषय : कफ परेड, कुलाबा येथील संक्रमण
शिबिराचा पुनर्विकास.

ठराव क्रमांक : ५६४३ **शशशशा दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

कफ परेड, कुलाबा येथील संक्रमण शिबिराचा पुनर्विकास करण्यासाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे १ ते ८ प्रमाणे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास कुलाबा संक्रमण शिबिराचा पुनर्विकास करण्यासाठी खालील अटी व शर्तीवर जाहीर निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येते.

१. कफ परेड, कुलाबा येथिल संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासासाठी जे विकासक पुढे येतील त्यांनी प्रत्येक टप्प्यावर प्राधिकरणाच्या मागणीनुसार प्राधिकरणाकडे पैशाचा भरणा करणे बंधनकारक राहील.
२. विकासकाने १०० कोटी रुपयांची बँक गॅरेंटी देणे बंधनकारक राहील.
३. ज्या विकासकाची वर्षाकाठी १०० ते २०० कोटी रुपयांची बांधकामाची क्षमता असेल अशाच विकासकांना हे काम देण्यात यावे.
४. कफ परेड, कुलाबा येथिल जागेच्या विकासाच्या कामात पारदर्शकता यावी म्हणून उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या मान्यतेने एक समिती स्थापन करण्यात यावी. या समितीवर शासनाचा एक प्रतिनिधी घेण्यात यावा.
५. या प्रकल्पाचा नकाशा महापालिकेकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल त्या तारखेपासून विकासकांनी म्हाडाला अपेक्षित असलेल्या निधीचा भरणा टप्प्याटप्प्याने करणे बंधनकारक राहील.
६. म्हाडाला अपेक्षित असलेल्या किंमतीपेक्षा जे विकासक जास्त किंमत देण्यास तयार असतील अशाच विकासकांचा विचार करण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक १७३/७

विषय : कुर्ला (पूर्व) अॅन्ड्रयू चाळ, कसाई वाडा येथे
डोंगराच्या पायथ्याशी संरक्षक भिंत बांधणेबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६४४</u> **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, कुर्ला (पूर्व) अॅन्ड्रयु चाळ, कसाई वाडा येथे डोंगराच्या पायथ्याशी संरक्षक भिंत बांधण्यासाठी येणारा ३ कोटी रुपये खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात येऊ नये. अशा प्रकारची संरक्षक भिंत बांधण्याच्या कामासाठी शासनाने विशेष निधी म्हाडास उपलब्ध करुन देण्यात यावा. त्यानंतरच अशा प्रकारची कामे करण्यात यावी. याप्रमाणे शासनास प्रस्ताव पाठविण्यात यावा.

बाब क्रमांक : १७३/८

विषय : आदर्श निवारा सुधार प्रकलप - मुंबई येथील
सर्व विधानसभा मतदान क्षेत्रातील झोपडपट्टीत
राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६४५ **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

आदर्श निवारा सुधार प्रकल्पांतर्गत मुंबई मधील विधानसभा मतदार क्षेत्रातील झोपडपट्टीमध्ये राबविल्या जाणा-या नेहमीच्या योजनापेक्षा या योजनेचे स्वरुप भिन्न असल्यामुळे व स्थानिक रहिवाश्यांचा पूर्ण सहभाग असल्यामुळे इमारतीचे बांधकाम व तदअनुषंगिक कामे प्रस्तावित कार्यकारी समिती मार्फत कंत्राटदाराची निवड करुन काम करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७३/९

विषय : मातुल्य मिल, मॉडर्न मिल, स्वदेशी मिल व
प्रतिक्षा नगर, सायन येथील गृहनिर्माण योजनांच्या
अनामत रकमेचया समपहरणाबाबत पुनर्विचार
करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६४६ **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं

१. मातुल्य मिल, मॉडर्न मिल व स्वदेशी मिलच्या संदर्भात प्राधिकरणाने आपला ठराव क्र. ५४२८, दिनांक १५.०२.१९९९ मध्ये अनामत रकमेसंबंधी घेतलेल्या निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मातुल्य मिल, मॉडर्न मिल व स्वदेशी मिल येथील गृहनिर्माण योजनांच्या अनामत रकमेतून एखाद्या ग्राहकाने देकारपत्र दिल्यानंतर माघार घेतल्यास त्याने ज्या प्रकारच्या सदनिकेसाठी अर्ज केला असेल त्या सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १ टक्का (एक टक्का) रक्कम महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ च्या तरतुदीलंनुसार त्याच्या अनामत रकमेतून कापून घ्यावी व उर्वरित रक्म लाभधारकाला विनाव्याज परत करण्यात यावी. जर एखाद्या ग्राहकाने योजनेतून देकारपत्र देण्यापूर्वी माघार घेतली तर त्याने भरलेल्या अनामत रकमेतून प्रशासकीय खर्चापोटी रु. १०००/- कापून घेऊन उर्वरित अनामत रक्कम त्यास विनाव्याज परत करण्यात यावी.

२. प्रतिक्षा नगर, सायन येथील द्वितीय जाहिरातीतील ज्या ग्राहकांनी देकार पत्र दिल्यानंतर माघार घेतली असेल त्या ग्राहकांची संपूर्ण अनामत रक्कम जप्त न करता महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ च्या तरतुदींनुसार सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १ टक्का रक्म त्याच्या अनामत रकमेतून कापून घेऊन उर्वरित रक्कम विनाव्याज परत करण्यात यावी. ही सवलत फक्त द्वितीय जाहिरतीतील सर्व प्रकरणे (ठरावाच्या आधीची सुध्दा) निकाली काढावीत.

३. वरील धोरण प्राधिकरणातर्फे घेण्यात येणा-या सर्वच योजनांना लागू राहील.

वरील निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

बाब क्रमांक १७३/१०

विषय : म्हाडाच्या सायन, मालवणी, मानखुर्द व
पवई येथील रिक्त सदनिकांच्या विक्रीबाबतच्या
धोरणाचा पुनर्विचार करणेबाबत.

.

ठराव क्रमांक : ५६४७ **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

म्हाडाच्या सायन, मालवणी, मानखुर्द व पवई येथील रिक्त सदनिकांच्या विक्रीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

१. सायन व मानखुर्द येथील २२५ चौ.फुट गाळे घेण्यासाठी सर्वसाधारणपणे ३२ लाभधारक सामुहिकरित्या पुढे आल्यास अशा गाळेधारकांच्या सोसायटीला १० टक्के सूट देण्यात यावी.
२. एकत्रित नोंदणीसाठी येणा-या लाभधारकांना ४५ दिवसांपेक्षा जास्त वेळ देण्यात येऊ नये.
३. सध्या जे गाळे विक्री करण्यात आले आहेत त्यांना ही सवलत लागू राहाणार नाही.
४. पवई येथील मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांच्या विक्रीसाठी ही सवलत लागू राहाणार नाही.

बाब क्रमांक : १७३/११

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प या प्रकल्पांतर्गत पवई येथे बांधलेल्या सदनिकांची विक्री खाजगी अभिकरणांमार्फत (प्रायव्हेट प्रॉपर्टी ब्रोकर्स) करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६४८ **दिनांक : ६.०१.२००१.**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पवई येथील रिक्त सदनिकांच्या विक्रीसाठी खाजगी अभिकरणांमार्फत सदनिकांची विक्री करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. मात्र सदर योजना ९ अभिकरणांसाठी मर्यादित न ठेवता सर्व खाजगी ब्रोकर्सना खुली ठेवण्यात यावी. त्याचप्रमाणे या प्रकरणाची मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरणा यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

म्हाडा व प्राधिकृत अभिकरणे यांच्यामध्ये कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी घेतलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक राहील. प्राधिकृत अभिकर्त्यांबरोबर लेखी करार करण्यात यावा आणि अटी व शर्ती प्राधिकरण आणि संबंधित अभिकर्ते दोघांनाही कंत्राटी कालावधी पर्यंत बंधनकारक करण्यात याव्यात.

प्राधिकृत अभिकर्त्यांना ठोक विक्रीकरीता २ टक्के व किरकोळ विक्रीकरिता १.५० टक्के कमिशन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. ठोक विक्रीसाठी किमान २८ सदनिका किंवा एक संपूर्ण इमारत यापैकी जे कमी असेल त्याचा विचार करण्यात यावा.

बाब क्रमांक : १७३/१२

विषय : मालणी येथील योजनेमधील सदनिकाधारकांना विक्री किंमत भरण्यासाठी सदर प्रकलपाचे ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळेपर्यंत लावण्यांत येणा-या दंडनीय याजापोटी सूट देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६४९ **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाने १७१ व्या बैठकीत मालवणी, सायन, मानखुर्द, पवई व ओशिवरा येथिल सदनिकाधारकांना विक्री किंमत भरण्यासाठी मूळ ४५ दिवसाच्य मुदतीमध्ये अधिक ४५ दिवसांची मुदतवाढ विनाव्याज मंजूर केलेली आहे. या बैठकीचे इतिवृत्त दिनांक २३.११.२००० च्या १७२ व्या बैठकीत स्थायी करत असतांना जे ग्राहक ९० दिवसांतही पूर्ण विक्री किंमत भरु शकणार नाहीत अशा ग्राहकांना पुढील ३० दिवसांची अधिक मुदतवाढ उर्वरित रकमेवर १६ टक्के व्याज आकारुन देण्यासंबंधीची दुरुस्ती केली. या दोन्ही सुधारणांच्या अनुषंगाने याच ठरावात आतापुढील सुधारणा करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

मालवणी येथील योजनेचया सदनिकांचा ताबा देण्यासाठी महानगर पालिकेकडून आवश्यक असलेले भोगवटा प्रमाणपत्र अद्याप मिळालेले नसल्याने या योजनेसाठी जे ग्राहक भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत संपूर्ण विक्री किंमत भरु शकणार नाहीत, अशा ग्राहकांना कुठल्याही प्रकारचे दंडनीय व्याज न आकारता मुदतवाढ देण्यात यावी. मात्र या येाजनेला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर व त्याची माहिती ग्राहकांना दिल्यानंतर जर ग्राहकांनी संपूर्ण विक्री किंमत भरली नाही तर जेवढे पैसे बाकी राहातील तेवढया रकमेवर १६ टक्के दराने दंडनीय व्याज आकारण्यात यावे. यामुळे यापूर्वी मालवणी येथील ज या ज्या ग्रहकांना दंडनीय व्याज आकारण्यात आलेले आहे त्यांना त्यांनी भोगवटा प्रमाणपत्र मिळावयाच्या आधी संपूर्ण विक्री किंमत मंडळाकडे जमा केली तर अशा ग्राहकांना आकारण्यात आलेले दंडनीय व्याज परत करण्यात यावे.

सदर प्रस्तावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरित करावी.

बाब क्रमांक : १७३/१३

विषय : मालवणी,सायन, मानखुर्द व पवई येथील सदनिकांची विक्री किंमत भरण्याकरिता १६ टक्के व्याज आकारुन मुदतवाढ मंजूर करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६५० **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मालवणी, सायन, मानखुर्द आणि पवई येथील सदनिकांची विक्री किंमत भरण्याकरिता ९० दिवसांकरिता व्याज आकारण्यात येऊ नये. त्यानंतर लाभधारकांनी मुदतवाढ मागितल्यास १६ टक्के व्याज आकारण्यात यावे. मात्र, १८० दिवसांपेक्षा जास्त मुदतवाढ देण्यात येऊ नये.

बाब क्रमांक : १७३/१४

विषय : पवई, ओशिवरा येथील व तत्सम पुढील म्हाडाच्या येाजनांसाठी कार पार्किंगचे नियम सुधारित करणेबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६५१</u> **दिनांक : ६.०१.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पवई / ओशिवरा येथील इमारती मधील स्टील्टच्या खाली पार्किंगच्या जागेच्या वितरणासाठी व स्टील्टच्या बाहेरील ओपन कार पार्किंगच्या जागेकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. पवई व ओशिवरा येथील सदनिका प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर वितरीत होत असल्याने ज्या इमारतीमधील कार पार्किंगचे वितरण बाकी आहे तेथे हेच तत्व लावण्यात यावे.
२. पवई व ओशिवरा येथील ज्या सदनिकाधारकांना ५ वर्षे किंवा १० वर्षे या मुदतीसाठी भाडेखरेदी तत्वाची सवलत देण्यात आली आहे त्या सदनिकाधारकांपैकी जे सदनिकाधारक नियमितपणे आपला हप्ता भरत असतील व ज्यांनी रुपये १०,०००/- अनामत रक्कम कार पार्किंगसाठभ भरली असेल त्यांचा कार पार्किंगसाठी प्राधान्याने विचार करण्यात यावा. अशा सदनिकाधारकांना कारपार्किंगच्या जागा वितरीत केल्यानंतर जर कारपार्किंगच्या जागा उपलब्ध असतील तर अशा सदनिकाधारकांना त्यांनी १० दिवसांचे आत सर्व थकित हप्ते भरल्यासउर्वरित कारपार्किंगच्या जागांकरिता पात्र करण्यात येईल व कारपार्किंगच्या जागा जर अशा सदनिकाधारकांच्या संख्येपेक्षा कमी असतील तर या जागांचे वितरण सोडत पध्दतीने करण्यात यावे.
३. इमारत क्रमांक १४ मधील विंग कमांडर विजय प्रताप यांना एक कार पार्किंगची जाता त्वरित देण्यात यावी. मात्र यासाठभ त्यांनी आपली न्यायालयातील याचिका मागे घेणे बांधनकारक राहील. उर्वरित ६ जागांसाठी ज्या सदनिकाधारकांनी न्यायालयीन याचिकेपूर्वी मुंबई मंडळाकडे रुपये १०,०००/- च्या अनामत रकमेचा भरणा केला आहे व ज्यांचेकडे भाडेखरेदीचा एकही हप्ता थकित आहे अशा सदनिकाधारकांना सोडतीची निश्चित तारीख कळविण्यात येईल व या निश्चित तारखेपर्यंत जे सदनिकाधारक आपले सर्व थकित हप्ते मुंबई मंडळाकडे भरतील, अशाच सदनिकाधारकांना सोडतीसाठी पात्र ठरविण्यात यावे.
४. ज्या कारपार्किंगच्या जागा इमारतींच्या आवारात आहेत परन्तु स्टील्टखाली नाहीत अशा सर्व जागा रु. १०,०००/- आकारुन वापरण्यासाठी देण्यात याव्यात. यासाठी प्रत्येक इमारतीतील सर्व सदनिकाधारकांना (ज्यांना सदनिकेचा ताबादेण्यात आला आहे) विशिष्ट मुदतीपर्यंत रुपये १०,०००/- भरण्यासंबंधी कळविण्यात यावे व अशी रक्कम भरलेल्या सदनिकाधारकांनाच वितरणासाठी पात्र ठरविण्यात यावे. पात्र ठरलेले सदनिकाधारक उपलब्ध असलेल्या जागांपेखा जास्त असतील तर हे वितरण सोडत काढून करण्यात यावे. या जागांसाठी उपलब्ध

असलेल्या जागांपेक्षा कमी अर्ज आले तर सोडत फक्त कोठली जागा कोणास द्यावयाची यासाठीच काढण्यात यावी.

५. कार पार्किंगसाठीच्या उपरोक्त अटींव्यतिरिक्त इतर अटी परिशिष्ट - १ मध्ये दर्शविल्याप्रमाणेच राहतील.

६. यापुढील सर्व येाजनांमध्ये कार पार्किंगच्या वरील बाबी मार्गदर्शक तत्व या स्वरुपात सर्व मंडळामार्फत अंगिकारण्यात याव्यात. मात्र एखाद दुसरी विशिष्ट अट बदलावयाची असल्यास तेवढया बदलापुरतेच प्राधिकरणाकडे संबंधित मंडळांनी द्यावे. कार पाकिंगचा दर मात्र संबंधित मंडळाच्या मुख्य अधिका-याने उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांचे सहमतीने निश्चित करावा त्यासाठी प्राधिकरणाकडे येण्याची गरज राहणार नाही.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ५ मार्च २००१ रोजी दुपारी १.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : १७४/३

विषय : मौजे घाटकोपर येथे नगर भू-क्रमांक
१९४ - अ (भाग) व रमाबाई नगर घाटकोपर
या नावाने ओळखला जाणारा भूखंड शांतीनगर
पोलिस हौसिंग संस्थेस देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६५२ **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५४०१ दिनांक २७.०१.१९९९ मध्ये बदल करुन मौजे घाटकोपर येथील नगर भू-क्रमांक १९४-अ (भाग) व रमाबाई नगर घाटकोपर या नावाने ओळखल्या जाणारा भूखंड रु. १००१/- प्रति एकर या एस.आर.ए.च्या सुधारित नियम ३३ (१०) अन्वये वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येते. मात्र ठराव क्र. ५४०१ मधील इतर मजकूर आहे तसाच ठेवण्यांत यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १७४/४

विषय : प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत असणा-या अधिका-यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी निकष.

<u>ठराव क्रमांक : ५६५३</u> **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे परिपत्रक क्र.एमएजी - १०८६/ ४९०७/ आरोग्य - ९, दिनांक ३१.०८.१९८७ मधील तरतुदीनुसार म्हाडामध्ये प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या शासकीय अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांनी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करताना फक्त विहित प्रपत्र त्यांच्या सोईनुसार म्हणजे औषधे विहित करतांना किंवा औषधोपचार पूर्ण झाल्यावर शासकीय / महापालिका किंवा केंद्रातील सक्षम वेद्यकीय प्राधिका-याकडून स्वाक्षरांकित करुन सादर करणे आवश्यक राहील.

म.रा.से. (वे.से.) नियम १९६१ नियम १६ (१) मधील तरतुदीनुसार २३ गंभीर आजाराबाबत व नियम १६ (२) मधील तरतुदीनुसार ५ अतिगंभीर आजाराबाबत प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिका-यांना या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अधीन राहून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यास मान्यता देण्यांतयेते.

बाब क्रमांक : १७४/५

विषय : हुडको वित्तीय संस्थेकडून कर्ज पुरवठयाच्या संदर्भातील १० ऑक्टोबर २००० पासून लागू करण्यात आलेले व्याज दर व इतर निकष प्राधिकरणाच्या माहितीसाठी.

ठराव क्रमांक : ५६५४ **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

हुडको वित्तीय संस्थेकडून करण्यांत येणा-याा कर्ज पुरवठयाबाबातच्या दिनांक १० ऑक्टोबर २००० पासून लागू करण्यांत आलेले व्याज दर व इतर निकषाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी बांधण्यांत येणा-या घरांसाठी घेण्यांत येणा-या कर्जाची मर्यादा रु. ५०,०००/- वरुन रु. ७०,०००/- पर्यंत वाढविण्यास व वसुलीचा कालावधी १५ वर्षे ऐवजी २० वर्षाचा करावा अशी शिफारस हुडको वित्त संस्थेकडे करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७४/६

विषय : स.क्र.९३ लक्ष्मीनगर, पुणे येथील भूखंड क्र.५
वरील दुकानांची योजना - जुनी इमारत पाडयाबाबत
कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५६५५ **दिंनाक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

लक्ष्मीनगर पुणे येथील भूखंड क्र.५ वरील मंडळाची जुनी इमारत पाडण्याबाबत पुणे मंडळाने केलेल्या कार्यवाही व पाडेलेल्या इमारतीच्या साहित्याच्या अंदाजित किंमत रु. १३,०००/- ला कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

बाब क्रमांक : १७४/८

विषय : विनियम १६ अंतर्गत शासनातर्फे वितरीत
होणा-या भूखंडाच्या विक्रीचे किंमत विषयक
धोरण.

ठराव क्रमांक : ५६५६ दिनांक : ५.०३.२००१

एकमताने निर्णय घेतला कीं,

विनियम १६ अंतर्गत वाटप होणारे निवासी भूखंड व वाणिज्य व्यतिरिक्त इतर वापरासाठी वाटप केलेल्या भूखंडाला म्हाडाच्या ठराव क्रमांक ३०९४, दिनांक १६.११.१९९२ अन्वये निश्चित केलेल्या दरांवर १० टक्के वाढ करुन येणारे दर / किंमत आकारण्यात यावी. या ठरावामुळे प्राधिकरणाने दिनांक २९.०९.१९९८ च्या बैठकीत केलेला ठराव क्र. ५३४५ हा रद्दबादल करण्यात येत आहे.

या ठरावाची अंमलबजावणी दिनांक २९.०९.१९९८ पासून प्राधिकरणाच्या दिनांक १६.११.१९९२ च्या ठरावा सोबत असलेल्या परिशिष्ट क्र.५ मधील अनु.क्र.-३-अ, ३-ब, ३-क, ३-ड, ३-फ व ५-अ यांना लागू होईल.

तसेच परिशिष्ट-५ मधील अ.क्र.२ (वाणिज्यिक) वगळून उर्वरित अनुक्रमांक ३(इ), ४(अ), ४(ब), ४ (क), ५(ब) व निवासी (अ.क्र.१) उपयोगासाठी विनियम १६ अन्वये वितरीत केले जाणा-या भूखंडासाठी मात्र हा ठराव दिनांक ५.०३.२००१ पासून अंमलात येईल.

विनियम १६ अंतर्गत वाटप करण्यांत येणा-या भूखंडासाठी शासनाने नेमलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीमध्ये अध्यक्ष / प्रा., उपाध्यक्ष/प्रा. तसेच ज्या मंडळाकडील भूखंडाचे वाटप विनियम १६ खाली करावयाचे असेल त्या मंडळाच्या सभापतींना कायम निमंत्रित म्हणून बोलाविण्यांत यावे अशी शिफारस शासनास करण्यास मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १७४/१०

विषय : वर्सोवा कोड क्र. १३२ (बी) म्हाडा उच्च उ.गट
आराम नगर (मधुबन इमारती समोर) ५६ गाळे
असलेल्या इमारतीमधील २८ गाळे अग्रक्रमाने
मिळण्याबाबत विनंती.
सदानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेची विनंती.

<u>ठराव क्रमांक : ५६५७</u> **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

वर्सोवा कोड क्र. १३२ (बी) म्हाडा उच्च उत्पन्न गट, आराम नगर (मधुबन इमारतीसमोर) ५६ गाळे असलेल्या इमारतीमधील २८ गाळे अग्रक्रमाने मिळण्याबाबतची सदानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेची विनंती खालील अटीवर मान्य करण्यात येते :-----

१. सदर योजनेच्या विक्रीपोटी सदानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेने २८ अर्जासोबत विक्री किंमतीच्या ५० टक्के रकमेचा भरणा त्वरित करावा.

२. सदर संस्थेस देकारपत्र दिल्यापासून ९० दिवसांचे आत संपूर्ण विक्री किंमतीचा भरणा करणे बंधनकारक राहील.

३. सदर संस्थेने आपल्या २८ सदस्यांची यादी त्यांच्या पत्यासह व दुरध्वनी क्रमांकासह मुंबई मंडळाकडे सादर करावी. या योजनेस विनियमातील सर्व तरतुदी लागू असल्याने त्या सदर संस्थेवर बंधनकारक राहातील.

४. सदर संस्थेबद्दल प्राधिकरणाचा मागील अनुभव चांगला नसल्याने सदर संस्थेस या विक्रीसाठी ९० दिवसांचे वर कोठलीही अतिरिक्त मुदतवाढ मिळणार नाही, या अटीवर ही विक्री करावी.

५. सदर संस्थेस २८ सदनिका विकण्याचा मानस कळविल्यानंतर ७ दिवसांचे आत सदर संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात प्राधिरणा विरुध्द दाखल केलेली याचिका मागे घेणे बांधनकारक राहील.

६. सदर संस्थेस संस्थेने स्वतःच प्रस्तावित केलेले रु. २५००/- प्रति चौ.फुट या दरात कोठेल्याही प्रकारची सूट अनुज्ञेय राहाणार नाही. (संस्थेने त्यांचे अर्जात जरी १० टक्के सूट मिळावी अशी विनंती केली असली तरीही) आणि सदर संस्थेस उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी वितरणा विषयक मान्य केलेल्या इतर सर्व अनुषंगिक अटी व शर्ती बांधनकार असतील. यासाठी आवश्यक हमीपत्र रु. १००/- च्या (ज्युडीशियल) स्टॅम्प पेपरवर सदर संस्थेने मंडळास देणे बंधनकारक राहील.

सदरहू ठरावाची कार्यवाही कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७४/११

विषय : गरमखाडा, लालबाग, मुंबई येथील गलिच्छ वस्ती निर्मुलन येजने अंतर्गत १०० गाळयांच्या थकीत मासिक हप्त्याच्या रकमेवर आकारण्यात आलेली व्याज रक्कम माफ करणे.

ठराव क्रमांक : ५६५८ **दिंनाक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गणनायक को-ऑप-हौसिंग सोसायटी, गरमखाडा, लालबाग, मुंबई येथील गलिच्छ वस्ती निर्मुलन योजने अंतर्गत १०० गोळयांच्या थकीत मासिक हप्त्याच्या रकमेवर झालेल्या व्याज रक्कम रु. १,९९,९३६/- च्या ऐवजी खास बाब म्हणून व्याजाच्या रक्कमेऐवजी १० टक्के व्याज म्हणून घेण्यास मान्यता देण्यता येते. मात्र यापुढे अशा प्रकारचा पायंडा पडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७४/१२

विषय : संचालक, भुतपूर्व जागतिक बँक प्रकल्पा / प्रा. यांनी सन १९९१-९५ या कालावधीत केलेल्या जेवण भत्याचे १.११ लाखाचे अनियमित प्रदानाबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६५९</u> **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्पांतर्गत योजना कोड क्र. ०११ व ०१२ अंतर्गत चारकोप, कांदिवली, गोराई, आकुर्ली, वर्सोवा येथील ९४६५ विकसित भूखंड वितरण ठराविक मुदतीत पूर्ण करण्यासाठी वसोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या लाभधारकांचे मेळावे आयेाजित करुन नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थांची स्थापना करुन घेण्यासाठी कर्मचारी व अधिकारी वर्गासाठी जेवण भत्यापोटी तत्कालिन संचालक, जागतिक बँक प्रकल्प यांनी मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या १.११ लाख खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

बाब क्रमांक : १७४/१३

विषय : उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी खाजगी विकसितकारकांना ना-हरकत प्रमाणपत्र देऊन अतिरिक्त क्षेत्रफळ पर्यायी इमारतीत घेणे किंवा त्याची किंमत घेणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६६० **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी खाजगी विकसितकरांना ना-हरकत प्रमाणपत्र देऊन अतिरिक्त क्षेत्रफळ त्याच प्लॉट वरील किंवा त्याचा वॉर्डातील पर्यायी इमारतीत घेण्यात यावे व ते शक्य नसेल तर त्याची किंमत घेण्याविषयीचा निर्णय खालील नियुक्त केलेल्या समितीने घ्यावा. सदरहू समिती त्या मंडळाच्या सभापतींच्या अध्यक्षतेखाली खालील अधिका-यांचा समावेश करुन स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१.	सभापती / दु. व पु.मंडळ	समिती अध्यक्ष.
२.	मुख्य अधिकारी / दु. व पु.मंडळ	सदस्य
३.	मुख्य अभियंता-१/प्रा.	सदस्य
४.	विधी सल्लागार / प्रा.	सदस्य
५.	निवासी कार्यकारी अभियंता/दु.वपु.	सदस्य सचिव
६.	कार्यकारी अभियंता / दु. व पु.	निमंत्रित

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली नियम क्र. ३३ (७) मध्ये अशी तरतूद असल्याने म्हाड कायद्याच्या व विकास नियंत्रण नियमावलीमध्ये योग्य त्या सुधारणा करण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७४/१४

विषय : फोरजेट स्ट्रीट, मुंबई येथील विठ्ठलवाडी
झोपडपट्टीमध्ये संरक्षक भिंत बांधणेबाबत..

<u>ठराव क्रमांक : ५६६१</u> **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

फोरजेट स्ट्रीट, मुंबई येथील विठ्ठलवाडी झोपडपट्टीमध्ये संरक्षक भिंत बांधण्यासाठी येणा-या खर्च रुपये ३२.०० लाख रकमेस मान्यता देण्यांत येते. भविष्यात शासनाकडून प्राप्त होणा-या तरतुदीमधून आतापर्यंत या कामासाठी केलेल्या खर्चाचे समायोजन करण्यासही मान्यता देण्यात येते. तुर्त प्रस्तावित खर्च म्हाडाच्या निधीमधून करण्यात यावा.

बाब क्रमांक : १७४/१७

विषय : मुंबई शहर जिल्हयातील परळ विधानसभा
क्षेत्रांमधील झोपडपट्टयांतील धोकादायक ठिकाण
चालू आर्थिक वर्षात काही तांतडीने हाती
घ्यावयाच्या संरक्षण भिंतीच्या कामांबाबत.

ठराव क्रमांक : ५६६२ **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई शहर जिल्हयातील परळ विधानसभा क्षेत्रांमधील झोपडपट्टयांतील धोकादायक ठिकाणी चालू आर्थिक वर्षात मंडळाने सर्व्हे केलेल्या तांतडीने हाती घ्यावयाच्या संरक्षण भिंतीच्या कामासाठी या वर्षी संभाव्य जिवित / वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने रुपये १५.०० लाख खर्चाची ६ कामे तांतडीने सुरु करुन पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येते. या कामासाठी निधीतुन तूर्त म्हाडातर्फे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येते. शासनाकडून या कामासाठी निधी प्राप्त झाल्यानंतर म्हाडाने स्वतःच्या फंडातून खर्च केलेला निधी वळता करुन घेण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७४/१८

विषय : नांदगांव, जिल्हा नाशिक येथील जमिनीवर
मध्यम उत्पन्न गटातील प्रस्तावित गृहनिर्माण येाजनेत
महसूल कर्मचा-यांना प्राधान्याने समाविष्ट करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६६३ **दिनांक : ५.०३.२००१.**

एकमताने निर्णय घेतला कीं,

नांदगांव, जिल्हा नाशिक येथील जमिनीवर मध्यम उत्पन्न गटातील प्रस्तावित गृहनिर्माण येाजनेत महसूल विभागातील तलाठी प्रवर्गातील कर्मचा-यांना प्राधान्याने समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येते.

म्हाड (मिळकत व्यवस्थापक, गाळे विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ चे विनियम १३ (२) मधील तरतुदीनुसार सदर प्रस्ताव शासनाचे मान्यतेस पाठविण्यात यावा. दरम्यान या भूखंडावर इमारत बांधण्यासाठी आवशयक ते काम सुरु करण्यास मान्यतादेण्यात येते. तसेच जमिन वाटप नियम १२ मधील तरतुदीनुसार सर्व गाळे / भूखंडाचे वाटप जाहिरातीद्वारे करावयाचे असल्यामुळे या योजनेचा लाभ पूर्व घोषित सभासदांना देण्याऐवजी सदनिकांचा लाभ तलाठी या प्रवर्गासाठी व्हावा म्हणून सदनिकांचे वाटप तलाठी याच प्रवर्गासाठी विनियमातील तरतुदीनुसार जाहिरात देऊन अर्ज जास्त आल्यास सोडतीद्वारे पात्र अर्जदारांना गाळयांचेवाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७४/१९

विषय : पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथे मॅफको या संस्थेस अतिरिक्त जागा देण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५६६४ **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथे मॅफको या संस्थेच्या ताब्यांत असलेली व अतिरिक्त मागणी केलेला असा एकत्रित भूखंड बाब टिप्पणीत उल्लेख केल्याप्रमाणे प्रचलित बाजार दर रु. ९,५३,००२/- च्या ८ टक्के म्हणजे रु. ७६,२४०/- वार्षिक भुईभाडे आकारुन प्रचलित पध्दतीने भाडे तत्वावर वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १७४/२०

विषय : शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांना म्हाडाच्या गृहनिर्माण येाजनांचा लाभ देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६६५ **दिनांक : ५.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांना म्हाडाच्या गृहनिर्माण येजनांचा लाभ घेण्यासाठी भविष्य निर्वाह निधी मधून कर्ज घेण्यासाठी सविस्तर येाजना तयार करुन ती शासनाच्या मान्यतेस पाठविण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १७ मार्च २००१ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकीय विशेष बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : २

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे
सन २०००-२००१ चे सुधारीत अंदाजपत्राक व
सन २००१-२००२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

ठराव क्रमांक : ५६६६ **दिनांक : १७.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०००-२००१ च्या सुधारित अंदाजपत्रकावर व सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन दोन्ही अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत आली.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०३/२००१ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : १७५/३

विषय : विभागीय चौकशी प्रकरणी चोकशी
अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या
श्री.जी.आर.बेडगे, भा.प्र.से.यांच्या मानधनाबाबत---
समायिक विभागीय चौकशी प्रकरणे.

<u>ठराव क्रमांक : ५६६७</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

ज्या सामाईक विभागीय चौकशी प्रकरणी गुंतलेल्या ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर स्वतंत्रपणे दोषारोपपत्र ठेवण्यांत आलेले आहे, अशा प्रकरणी प्रत्येकी अधिकारी / कर्मचारी यांचे स्वतंत्रपणे अहवाल प्राप्त झाल्यानंतर व अशाप्रकारे आतापर्यंत पूर्ण झालेल्या प्रकरणी व भविष्यातील पूर्ण होणा-या प्रकरणी पहिल्या अपचारीकरिता रक्कम रुपये २०,०००/- व बाकी अपचारीकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/- प्रमाणे मानधन देण्यांस मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७५/५

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९७-९८ या वित्तिय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६६८</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९७-९८ या वित्तीय वर्षाचा लेखा एकमताने स्वीकृत केला.

बाब क्रमांक : १७५/८ व १७५/२३
बाब क्रमांक : १७५/१३ व १७५/२४

विषय : १. कफ परेड, कुलाबा येथील संक्रमण शिबिराचा पुनर्विकास म्हाडाने करणेबाबत..
२. सर्वे क्रमांक ७ व ८ वांद्रे (पश्चिम) येथील मुंबई मंडळाच्या जमिनीवर प्रस्तावित वाणिज्य संकुलाच्या बांधकामाबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६६९</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

सदरहू जमिनीवरील जॉईन्ट व्हेंचरसाठी अटी व शर्ती अधिक शिथील करुन फेर प्रस्ताव मागविण्यांत यावेत व त्यांना प्रतिसाद आला नाही तर म्हाडातर्फे हे बांधकाम करण्यांत यावे.

जॉईन्ट व्हेंचरच्या निविदेमध्ये टाकावयाच्या विस्तृत अटीं व शर्ती तयार करण्यांत याव्यात व त्यास प्रधान सचिव / गृहनिर्माण, सदस्य / प्रा. यांची सहमती घेण्यांत यावी.

बाब क्रमांक : १७५/१४

विषय : भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी
प्रकल्पांतर्गत वितरीत केलेल्या भूखंडाचा भाडेपट्टा
करारनाम्यातील अटींनुसार भूखंडाचे विकसनाचा
विहित कालावधी वाढविण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६७०</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, जागतिक बँक प्रकल्प व राजीव गांधी प्रकल्प यांच्या मार्फत वितरीत केलेल्या भूखंडावर इमारत बांधकामाची मुदतवाढ देण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या वतीने भाडेपट्टा करारनामा करणा-या अधिका-यास तथा सम पदाच्या तथा उच्च पदाचया अधिका-यास प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७५/१५

विषय : सर्व्हे क्रमांक १३८ (भाग) मानखुर्द या अभिन्यासातील
सुमारे ४७१० चौ.मी.च्या भूखंडाचे वितरण महिला
मिलन सहकारी गृहनिर्माण संस्थेस करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६७१</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या नकाशातील पिवळया रंगाने दर्शविलेली सुमारे ४७०० चौ.मी. जमीन, बाब टिप्पणीत नमूद केलेल्या कारणास्तव महिला मिलन सहकारी गृहनिर्माण संस्थेस बदलून देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. या बदलामुळे भविष्यकाळात सुमारे ५६ सदनिकांचे काम होणार नाही याची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्रमांक : १७५/१७

विषय : उन्नतनगर, तीन डोंगरी, गोरेगांव पश्चिम येथील आरक्षित वर्गाच्या असलेल्या भूखंडावर विविध व्यक्तींची पाण्याची भूमिगत टाकी बांधण्यास परवानगी मिळण्याबाबत मागणी.

<u>ठराव क्रमांक : ५६७२</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने असा निर्णय घेतला कीं, उन्नतनगर, तीन डोंगरी येथील भूखंड यु.एन.अक्षय सहकारी गृहनिर्माण संस्था यांना आधीच वितरण केलेला आहे. ते वितरण रद्द करुन आता त्या संस्थेस व पेालीस खात्यास ५०/५० टक्के या पध्दतीने भूखंडाचे वाटप करण्यांत यावे व त्या संस्थेने अद्याप त्याचा वापर केलेला नसल्यामुळे, सदरहू संस्थेला कारणे दाखवा नोटीस पाठवून त्या सदरहू जागेवर हिरवळ वाढविण्याच्या अटींवर तीन ते सहा महिन्याच्या अंात जर पाण्याची टाकी सदर संस्थेने बांधली नाही तर ते वितरण रद्द करण्यांत यावे व त्या संपूर्ण भूखंडाचे वितरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मागणीनुसार त्यांच्या संस्थेस प्रचलीत नियमाप्रमाणे किंमत आकारुन करण्यांस मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७५/१९

विषय : मे.राज असोसिएटस् यांनी डी.एन.नगर अंधेरी येथे वितरीत केलेला सुविधा भूखंड क्र. ४१ वर बांधकाम करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६७३</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, तत्कालीन जागतिक बँक प्रकल्प किंवा राजीव गांधी प्रकल्प किंवा मुंबई मंडळातर्फे यापूर्वी वितरीत करण्यांत आलेल्या भूखंडाच्या करारनाम्यामध्ये बांधकाम पूर्ण करण्याची कालमर्यादा जेथे संपली असेल तर तेथे लाभार्थींनी नमूद केलेली कारणे योग्य असल्याची खात्री झाल्यास दोन वर्षाची मुदतवाढ देण्याचे अधिकार मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांना देण्यांत येत आहेत. त्यानंतर पुढील मुदतवाढ देण्याचे अधिकारी उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यांत येत आहेत.

यापुढे भूखंडाचे करारनामे करतांना भूखंडाचा ताबा घेतलेल्या दिनांकापासून एक वर्षाचे आंत लाभार्थींनी मुंबई महानगर पालिकेच्या मंजूर नकाशाप्रमाणे बांधकामास सुरुवात करावी व या मंजूरीनंतर तीन वर्षाचे आंत ते पूर्ण करावे, अशी अट करारपत्रात टाकण्यांत यावी.

बाब क्रमांक : १७५/२०

विषय : कुंभारमाठ, मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथे गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्यासाठी कोंकण विकास महामंडळाची जमीन कोंकण गृहनिर्माण मंडळास हस्तांतरीत करणेबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६७४</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

कुंभरमाल मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथील कोंकण विकास महामंडळाची सुमारे १८.०० हेक्टर जमिन रु. ३.०० लक्ष प्रति हेक्टर या दराने कोंकण गृहनिर्माण मंडळाकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७५/२१

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणात
कंत्राटदाराचे वर्ग-१ (स्थापत्य) मधील पंजीकरणाबाबतचे
शाासनाचे सुधारीत आदेश लागू करण्याबबात..

<u>ठराव क्रमांक : ५६७५</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक २१.०९.२००० आणि दिनांक ३०.०९.२००० रोजीच्या परिपत्रकातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर परिपत्रक प्राधिकरणाच्या ठरावाच्या दिनांका नंतर प्राधिकरणास लागू करण्यास मान्यतादेण्यात येते.

बाब क्रमांक : १७५/२५

विषय : मॉडर्न मिल व मातुल्य मिल येथील योजनाच्या
विनिर्देशाात बदल करणे व अतिरिक्त बाबींचा
अंतर्भाव करणेबाबत..

<u>ठराव क्रमांक : ५६७६</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मॉडर्न मिल व मातुल्य मिल येथील बांधकामचे विनिर्देशात बदल करण्यात यावेत. तसेच अतिरिक्त बाब म्हणून वॉश हॅन्ड बेसिन प्रस्तेक सदनिकेत बसविण्यात यावीत. कंत्राटदाराने केलेल्या कामाचे मोजमाप करुन त्या अनुसार कंत्राटातील अटींप्रमाणे रक्कम अदा करण्यात यावी.

मातुल्य मिल व मॉडर्न मिल येथील योजनांमध्ये सुचविलेले बदल इमारतींचे बांधकाम पूर्ण होण्याआधी करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट नपाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७५/२६

विषय : मा.मंत्रील महोदय (गृहनिर्माण) व मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचेकडे मुंबई मंडळाची पाठविण्यात आलेली वाहने व त्यावर इंधन, दुरुस्ती खर्च व वाहनचालकांचे वेतन व अतिकालिक भत्ता याबाबत..

<u>ठराव क्रमांक : ५६७७</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मा.मंत्री, गृहनिर्माण आणि मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना मुंबई मंडळाच्या कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या वाहनासाठी लागणा-या इंधन पुरवठा, वाहनचालक, वाहनचाकाचा पगार व अतिकालिक भत्ता, तसेच वाहनाची दुरुस्ती व देखभाल यासाठी दिनांक ४.०५.२००० ते ६.०२.२००१ या कालावधीसाठी झालेला एकूण खर्च रु. ३,५१,६९३/- ला कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

सदर खर्च दुरुस्ती व पुनर्रचना आणि एस.आर.पी.ग्रॅन्ट मधून वळता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७५/२७

विषय : आदर्श निवारा सुधार प्रकल्प पथदर्शी योजना,
मेघवाडी, जोगेश्वरी (पूर्व) भूमिपूजनाच्या समारंभास
तसेच वृत्तपत्र जाहिरातीसाठी केलेल्या खर्चास
कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५६७८ **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला की,

आदर्श निवारा सुधार प्रकल्प पथदर्शी योजना, मेघवाडी, जोगेश्वरी, पूर्व येथे भूमिपूजनाच्या समारंभास तसेच वृत्तपत्र जाहिरातीसाठी केलेल्या खर्चास उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी दिलेल्या रु. २,६४,९२६/- या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७५/२८

विषय : मा.ना.नवाब मलिक, राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन
यांचे नेहरु नगर विधानसभा मतदार संघातील व
मा.ना.मो.आरिफ (नसिम) खान राज्यमंत्री, महाराष्ट्र
शाासन यांचे कुर्ला मतदार संधातील घोषित झोपडपट्टयांमध्ये
धोकादायक ठिकाणी संरक्षक भिंत बांधकामाकरिता
प्राधिकरणाचा निधी उपलब्ध करुन कामे सुरु करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ५६७९</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला की,

मा.ना.नवाब मलिक, राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या नेहरु नगर विधानसभा मतदार संघ तसेच मा.ना.मो.अरिफ नसिम खान, राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या कुर्ला मतदार संघामध्ये घोषित झोपडपट्टयांमध्ये केलेल्या कामासाठी झालेला खर्च रु. ५८.१४ लाख खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. सदरच्या खर्चाची प्रतिपूर्ती १० टक्के व्याज आकारुन शासनाकडून उपलब्ध होणा-या तरतुदीमधून समायोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७५/२९

विषय : मुंबई मंडळाने मुंबईतील विविध ठिकाणी असलेल्या ३० भूखंडासाठी आलेल्या निविदा उघडण्याबाबत..

<u>ठराव क्रमांक : ५६८०</u> **दिनांक : ३१.०३.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाने मुंबई उपनगरातील विविध ठिकाणच्या ३० सुविध / वाणिज्य इत्यादि उपयोगासाठी असलेल्या भूखंडासाठी मागविलेल्या निविदा रद्द करण्यात याव्यात व अर्जदारांना त्यांनी भरलेली इसारा रक्कम परत घेऊन जाण्यास कळविण्यास मान्यता देण्यात येते.

यापुढील निविदा तीन टप्यात मागवाव्यात. प्रत्येक टप्प्यामध्ये सुमारे १० भूखंडांची जाहिरात द्यावी. निविदा स्विकृतीची वेळ साधारणपणे दुपारी १.०० पर्यंत अशी ठेवण्यात यावी व त्याच दिवशी सुमारे ३.०० वाजता निविदा उघडण्यात याव्यात.

ज्या ३०७ निविदाधारकांनी निविदा मंडळाकडे सादर केल्या आहेत त्यांना इसारा रक्कमेबरोबर अर्ज व माहिती पुस्तिकेची किंमत म्हणून त्यांचेकडून घेतलेले रुपये १,०००/- परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्राप्त झालेल्या निविदा शेवटच्या दिवशी निविदा स्विकृतीची जी वेळ असेल तो पर्यंत निविदा स्विकारण्यात याव्यात व त्याच दिवशी दोन तासानंतर उघडण्यात याव्यात.

सदर निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २८/०५/२००१ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : १७६/३

विषय : प्राधिकरण आणि प्राधिकरणांतर्गत विविध संवर्गातील अधिका-यांना दैनंदिन कामकाजात निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६८१ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आणि प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळातील विविधसंवर्गातील अधिका-यांना दैनंदिन कामकाजात निर्णय घेण्याचे अधिकार बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या परिशिष्ट १,२,३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे चर्चेतील दुरुस्त्यांचा समावेश करुन मान्यता देण्यात येते.

या विषयावर प्राधिकरणाने यापूर्वी वेळोवेळी प्रदान केलेले सर्व अधिकार या निर्णयाच्या दिनांकापासून निष्प्रभावित होतील.

बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या अधिकार प्रदानका परिशिष्टामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करणे भाग पडल्यास त्याबाबतचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास प्रशासनास अनुमती देण्यात येते.

बाब क्रमांक : १७६/४

विषय : नागपूर मंडळाने वर्धा येथे बांधलेल्या मध्यम उत्पन्न गटातील ८० गाळयांचे योजनेतील ३१ गाळे श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल ट्रस्ट यांच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या नांवे करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५६८२ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

नागपूर मंडळाने वर्धा येथे बांधलेल्या मध्यम उत्पन्न गटातील ८० गाहयांच्या येजनेतील ३१ गाळे श्रीमती राधिकाबाई मेमोरियल ट्रस्ट यांच्या अधिकारी / कम्रचारी यांचे नांवे हस्तांतरीत करण्याबाबतचा मंडळाचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण फी आकारुन खालील अटीवर मान्य करण्यात येत आहे :---

१. कर्मचारी / अधिका-यांचे महाराष्ट्रात १५ वर्षे वास्तव्य असावे.
२. कर्मचारी / अधिका-यांच्या प्रती / पत्नीचे नांवे नगर पालिकेच्या हद्दिमध्ये दुसरा गाळा नसावा.
३. हस्तांतरीत केलेल्या गाळयांची विक्री करता येणार नाही.
४. गाळयांचे हस्तांतरण फक्त कायदेशिर वारसाच्या नांवे हस्तांतर करता येईल.

बाब क्रमांक : १७६/५

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, भाग-१, सोलापूर येथील म्हाडास नागरी जमिन कमाल धारणा कायद्यान्वये प्राप्त झालेल्या अतिरिक्त जमिनीच्या फेर भूसंपादनाबाबत..

ठराव क्रमांक : ५६८३ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, विशेष नियेाजन प्राधिकरण भाग-१, सोलापूर येथील म्हाडाची नागरी जमिन कमाल धारणा कायद्यान्वये प्राप्त झालेल्या अतिरिक्त जमिनीचे फेर भूसंपादन प्रकरणांमध्ये नुकसान भरपाईची रक्कम शासनाने अदा करावी. त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे २००१-२००२ या आर्थिक वर्षापासून दरवर्षी रुपये ३,८४,८२७/- याप्रमाणे सुधारित भुईभाडे आकारण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७६/६

विषय : मुंबई बेटावरील पुनर्रचित इमारतीतील गाळयांचे नियमितीकरण करतांना आकारावयाच्या दंडात्मक रकमेमध्ये सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६८४ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. म्हाड विनियम १९८१ च्या विनियम ३५ - अ (१) नुसार नियमितीकरण / हस्तांतरण करतांना प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ५२३२ अन्वये निश्चित केलेल्या दरामध्ये सुधारणा करण्यात यावी.
२. अशाा हस्तांतरणासाठी यापुढे निवासी गाळयांकरिता प्रति चौरस फुट रु. १५०/- या दराने दंडात्मक रकमेची आकारणी करावी.
३. अनिवासी गाहयांकरिता हे दर रुपये ३००/- प्रति चौरस फुट असे राहातील.
४. प्राधिकरणाने या प्रस्तावास मान्यता दिल्याच्या तारखेपासून हे दर लागू राहातील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७६/७

विषय : मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे
अंतर्गत बांधण्यात आलेल्या पुनर्रचित इमारतीच्या
भाडयामध्ये सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६८५ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. पुनर्रचित इमारतीच्या निवासी गाळयामध्ये स्वतंत्र शौचालयाची सोय असल्यास त्याकरिता सध्या अस्तित्वात असलेल्या गाळयाकरिता रु. ००.५० पैसे प्रति गाळा प्रति चौ.फुट प्रति महा या भाडयाच्या दरामध्ये सुधारणा करुन हे दर रुपये १.५० प्रति चौरस फुट प्रति महा प्रति गाळा या दराने आकारण्यात यावे.
२. सामुहीक सुविधा असलेल्या गाळयासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या गाळयाकरिता रुपये ००.४० पैसे प्रति गाळा प्रति चौरस फुट प्रतिमहा या दरामध्ये सुधारणा करुन ते रु. १.०० प्रति गाळा प्रति फुट प्रति महा या दराने आकारण्यात यावे.

३. व्यापारी गाळयांचे सध्या अस्तित्वात असलेल्या रु. १.२५ प्रति चौ.फुट प्रति महा या दरामध्ये सुधारणा करुन रु. ३.०० प्रति गाळा प्रति चौ.फुट प्रति महा आकारण्यात यावे.

हे दर पुनर्रचित इमारतीमध्ये घुसखोरी केलेल्या व्यक्तींना किंवा अनधिकृतरित्या वास्तव्य करीत असलेल्या व्यक्तींना लागू असणार नाहीत. वरीलप्रमाणे सुधारीत दर १ एप्रिल २००१ पासून लागू असतील.

तसेच पुनर्रचित इमारतीतील गाळयांची विक्री करण्याबाबतचा जो निर्णय शासनाने १९९८ साली घेतला आहे त पुनर्विचार करण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७६/८

विषय : ठराविक संक्रमण शिबिरांसाठी वाढीव भाडे आकारण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६८६ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकार क्षेत्रतील बाब टिप्पणीत नमूद केलेल्या ११ ठिकाणच्या संक्रमण शिबिरातील गाळयांचे भाडे व सेवाआकार अनुक्रमे रुपये १५०/- व रुपये २००/- अशाा एकूण रुपये ३५०/- प्रति गाळा, प्रति महिना या प्रस्तावित दरास मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावित भाडेवाढीचा सेवाआकार दिनांक १.०४.२००१ पासून आकारण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७६/९

विषय : संक्रमण शिबिरातील गाळयाच्या भाडयामध्ये सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६८७ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील संक्रमण शिबिरातील गाळयांकरिता सध्या आकारण्यात येत असलेल्या सामुहिक सुविधा व सेल्फ कन्टेन्ड गाळे यांचेरिता अनुक्रमे रु. ५०/- व रुपये ७५/- प्रतिमाह प्रति गाळा या दरामध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत असून दिनांक १ एप्रिल २००१ पासून सामुहिक सुविधा असलेल्या गाळयांकरिता रुपये १००/- प्रतिमहा, प्रतिगाळा व सेल्फ कंन्टेन्ड गाळयांकरिता रुपये १५०/- प्रतिमहा प्रतिगाळा दराने भाडे आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७६/११

विषय : मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील संक्रमण शिबिरात राहात असलेल्या अनधिकृत ताबेदारांना पुनर्विकसित संक्रमण शिबिरामध्ये विक्री येाजनेत समाविष्ट करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६८८ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. मूळ उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरुंकडून / कब्जेदारांकडून त्यांच्या संक्रमण शिबिरातील वास्तव्याच्या काळात दुस-या व्यक्तीने भाडेहक्क विकत घेतले असल्यास व अशी भाडेहक्क विकत घेणारी व्यक्ती ही मूळ भाडेकरुला वितरण झालेल्या संक्रमण शिबिरातील गाळयात वास्तव्य करुन असल्यास, अशा व्यक्तीला

संक्रमण शिबिराच्या पुनर्विकास येाजनेअंतर्गत बांधण्यात येणा-या बहुमजली इमारतीच्या विक्री येाजनेमध्ये समाविष्ट करुन घेण्यात यावे.

२. " मुळ भाउेकरुकडून भाडे हक्क विकत घेणा-या व्यक्तीस मूळ भाडेकरुचे जुन्या उपकरप्राप्त इमारतीत असलेल्या क्षेत्रफळाएवढे किंवा असे क्षेत्रफळ २२५.०० चौरस फुटापेखा कमी असल्यास कमितकमी २२५.०० चौरस फुटाएवढे क्षेत्रफळ विक्री येाजनेमध्ये देण्यात यावे. मात्र कोणत्याही परिस्थितीमध्ये विक्री योजनेअंतर्गत देण्यात येणारे क्षेत्रपुळ ६८.०० चौरस फुटापेक्षा जास्त असू नये. "

३. मूळ इमारतीतील क्षेत्रफळा एवढे क्षेत्रफळ वितरीत करतांना अशा व्यक्तीस रुपये ३००/- प्रति चौरस फुट या दराने किंमत आकारण्यात यावी. मूळ क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळ वितरीत करावे लागल्यास अशा अतिरिक्त क्षेत्रफळाच्या बाजारभावाप्रमाणे किंमत आकारण्यात यावी.

४. ही येाजना म्हाडातर्फे विकसित केलेल्या सायन व भविष्यात विकसित करण्यात येणा-या ज्या ओशिवरा, गोरेगांव (पूर्व), मालवणी मुंबई मंडळांनी बांधलेल्या बहुमजली इमारती) या संक्रमण शिबिराकरिता लागू असेल.

५. कुलाबा संक्रमण शिबिराचा पुनर्विकास करुन, बांधण्यात येणारे गाळे हे फक्त सध्या कुलाबा संक्रमण शिाबिरात अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या पात्र व्यक्तीस विक्री करण्यात येतील.

६. सायन, ओशिवरा, गोरेगांव (पूर्व) मालवणी येथील गाळे हे कोणत्याही संक्रमण शिबिरात अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या पात्र व्यक्तीस विक्री करण्यात येतील.

७. वरीलप्रमाणे विक्री करावयाचे गाळे हे या लाभधारकांना मालकी तत्वावर विक्री करण्यात येतील व अशा इमारती त्या भोवतालच्या जागेसह रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस अभिहस्तांतरण करण्यात येतील.

८. गाळयाची विक्री केल्यापासून ३ महिन्याच्या आत संबंधित गाळेधारकांनी (लाभार्थींनी) त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन इमारतींचे अभिहस्तांतरण करुन घेणे बंधनकारक राहील.

९. या विक्री येाजनेत समाविष्ट होण्याकरिता खालीलप्रमाणे व्यकती पात्र असतील :--

अ. ज्या व्यक्तीने उपकरप्राप्त इमारतीतील मूळ भाडेकरुंकडून / रहिवाश्यांकडून तसेच त्यांच्या कायदेशिर वारसांकडून संक्रमण शिबिरातील वास्तव्याच्या कालावधीत उपकरप्राप्त इमारतीतील गाळयाचे भाडेहक्क विकत घेतलेले आहे व अशा व्यक्तीशी विक्री व्यवहारासंअंधी कोणत्याही स्वरुपात लेखी करार केह्लेला आहे.

ब. अशा व्यवहारासाठी भाडेहक्क विकत घेणा-या व्यक्तीने मूळ उपकरप्राप्त इमारतीच्या रहिवाश्यास मोबदला दिलेला आहे.

क. भाडेहक्क खरेदी करणारी व्यकती मूळ भाडेकरुला वितरीत करण्यात आलेल्या संक्रमण शिबिराच्या गाळयात वास्तव्य करुन आहे.

ड. मूळ उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाश्यांना इमारतीच्या दुरुस्तीकरिता तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबिरात हलविले जाते. अशा रहिवाशांनी त्यांच्या संक्रमण शिबिराच्या वास्तव्याच्या कालावधीत आपले हक्क इतरांना विकल्यास असे हक्क विकत घेणारी व्यक्ती या योजनेत समाविष्ट होऊ शकणार नाही.

इ. ज्या मूळ भाडेकरुंनी पुनर्रचित इमारतीमध्ये गाळा घेतलेला आहे. मात्र संक्रमण शिबिरातला गाळाही आपल्या कब्जात ठेऊन त्याचीविक्री इतर व्यक्तीस केलेली आहे व अशी व्यक्ती अनधिकृत ताबेदार म्हणून संक्रमण शिबिरात वास्तव्य करुन असली तरी त्या व्यक्तीला या येाजनेमध्ये समाविष्ट करुन घेता येणार नाही.

ई. अनधिकृत ताबेदार म्हणून संक्रमण शिबिरात वास्तव्यास असणा-या व्यक्तीकडे जुन्या इमारतीचे व्हेकेशन नोटीसची मूळ प्रत, संक्रमण शिबिराचे वितरण आदेश व जुन्या इमारतीतील मूळ भाडेकरुंच्या हक्कांचे इतर कागदपत्रे असणे आवश्यक आहे. ज्या मूळ भाउेकरुंकडून अनधिकृत व्यक्तीने गाळयांचे हक्क खरेदी केले आहेत, असा मूळ भाडेकरु हा मूळ उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी होता हे सिध्द करुन द्यावयाची जबाबदारी अशा अनधिकृत व्यक्तीवर आहे.

उ. ज्या अनधिकृत व्यक्तीस या विक्री येाजनेमध्ये समाविष्ट करुन घेण्यात आले आहे त्या व्यक्तीने ज्या मूळ गाळेधारकांकडून गाळयांचे हक्क विकत घेतलेले आहेत अशा मूळ गाळेधारकाचा किंवा त्याच्या कायदेशिर वारसाचा पुनर्रचित इमारतीमध्ये गाळा मिळविण्याचा हक्क संपुष्टात येईल व त्याचे नांव त्यामूळ इमारतीच्या भाडेकरु / रहिवाशी यादीमधून कमी करण्यात येईल.

ऊ. ही येाजना प्राधिकरणाची मान्यता मिळालेल्या तारखेच्या पूर्वी झालेल्या विक्री किंवा अनधिकृत हस्तांतरणासच केवळ लागू असेल. त्यानंतर होणा-या विक्री व्यवहारांना ही येाजना लागू असणार नाही.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १७६/१२

विषय : ओशिवरा महाप्रकल्प - २ गट क्र.४ संरक्षण व पहारा व्यवस्थेसाठीच्या प्रदानाबाबत.

ठराव क्रमांक : ५६८९ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

ओाशिवरा महाप्रकल्प ज्र २ जर क्रमांक ४ च्या संरक्षण पहारा व्यवस्थेसाठी दिनांक ३१.०३.२००१ ही अंतिम वितरण दिनांक गृहीत धरुन रुपये ५,६०,२५०/- च्या खर्चास मान्यता देण्यात येते.

या प्रकल्पातील अंतिम सदनिकेचे / दुकानाचे वितरण होईपर्यंत मे. अजंठा बिल्डर्स यांचे द्वारे संरक्षण व पहारा व्यवस्था चालू ठेवण्यात यावी. मात्र वितरणानुसार शक्य तेथे पहारेक-यांची संख्या कमी करुन सदर खर्च किमान ठेवण्यात यावा.

बाब क्रमांक : १७६/१३

विषय : भाडेतत्वावर वितरीत केलेल्या व त्यानंतर विक्री येाजनेत समाविष्ट झालेल्या इमारतींचया संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चावरील व्याज माफ करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६९० **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाकडून लाभार्थींना कळविण्यात यावे कीं, भाडेतत्वावर वितरीत केलेल्या व त्यानंतर विक्री येाजनेत समाविष्ट झालेल्या इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चामध्ये जर सदरहू गृहनिर्माण संस्थांमधील लाभार्थींना कळविण्यांत यावे कीं, त्यांनी त्यांचे संपूर्ण कर्ज अधिक ५० टक्के व्याजाची रक्कम दोन महिन्यांत मंडळाकडे भरली तर त्यांचेकडून देय असलेले ५० टक्के व्याज त्यांना माफ करण्यांत यावे. मात्र, दोन महिन्यानंतर व्याज माफी दिली जाणार नाही अशी स्पष्ट अट घालण्यांत यावी.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांक : १७६/१४

विषय : कन्नमवारनगर, विक्रोळी येथील इमारत
क्र.३० ते ४३ ची (इमारत क्र. ३६, ४३ वगळून)
विशेष दुरुस्ती.

ठराव क्रमांक : ५६९१ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णयघेतला कीं,

अ. इमारत क्रमांक ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२ यांचे दुरुस्तीसाठी लागणारी अंदाजित रक्कम रु. ८४.०० लक्ष प्राधिकरणाच्या निधीतून खर्च करण्यास अनुमती देण्यात येते.

ब. कामांवर देखरेख करण्यासाठी संरचनात्मक दुरुस्तीबाबत मार्गदर्शन देणेसाठी म्हाडाच्या पॅनलवरील वास्तुशास्त्रज्ञ नेमण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

क. काम विभागून देण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांक : १७६/१५

विषय : आनंदनगर, सांताक्रुझ (पूर्व) येथील शिधावाटप
कार्यालय असलेला भूखंड बिलावर असोसिएशन
यांना वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६९२ दिनांक : २८.०५.२००१

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीत दर्शविलेले विकल्प-१ प्रमाणे येणारे अधिमूल्य रु. २६,१०,९९९.००/- किंवा विकल्प-२ नुसार येणारे अधिमुल्य रु. १७,२७,४७२.००/- हे नमूद केलेले पत्र मे.बिलावर असोसिएशन यांना देण्यांत यावे. तसेच भूखंड अ - साठी यापूर्वी कमी असकारलेली रु. २,४४,४२०/- ही रक्कम त्यांना म्हाडाकडे भरणा करण्यास कळविण्यांत यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७६/१६

विषय : मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लिमिटेड
या कंपनीस मुंबई मंडळांतर्गत शासनाचे आदेशानुसार
ठोक पध्दतीने काम वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६९३ दिनांक : २८.०५.२००१

एकमताने निर्णय घेतला कीं, शासनाच्या दिनांक २.०३.२००१ च्या पत्राप्रमाणे सहपत्र क वर दर्शविल्याप्रमाणे हमीपत्र घेऊन ओशिवरा व गोरेगांव येथील बांधकामाचे काम मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांना देण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यासही प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्रमांक : १७६/१८

विषय : कुर्ला (पूर्व) येथील एन्ड्रयु चाळ कसाईवाडा
झोपडपट्टी येथे डोंगराच्या पायथ्याशी संरक्षण
भिंत बांधणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६९४ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णयघेतला कीं, कुर्ला (पूर्व) येथील एन्ड्रयु चाळ कसाईवाडा झोपडपट्टी येथे डोंगराच्या पायथ्याशी संरक्षण भिंत बांधण्यासाठी त्या जागेवरील ८५ झोपडीधारकांना कायम स्वरुपी स्थलांतर व त्यांचे पुनर्वसन करण्याच्या अटीवर संरक्षक भिंत बांधण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १७६/१९

विषय : मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळात घोषित झोपडपट्टयांमध्ये जिवित व वित्त हानी प्रतिबंधाकरिता बांधण्यात येणा-या संरक्षण भिंती बांधकाम कार्यक्रमांतर्गत कामास प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५६९५ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, घोषित गलिच्छवस्त्यांमध्ये झोपडपट्टी सुधारणेची कामे (Slum Improvement Works) करण्यासाठी प्रशासकीय मान्यतादेण्याचे अधिकार मुंबई झोपडपट्टी मंडळास आहेतव महाराष्ट्र गलिच्छवस्ती (सुधारणा, निष्कासन व पुनर्विकास) कायदा १९७१ (The Maharashtra Slum Area (Improvement, Clearence and Redevelopment) Act) मधील प्रकरण ३ (Chapter III) मधील कलम ५ अ अन्वये झोपडपट्टी सुधारणेच्या कामामध्ये करावयाच्या कामांचे वर्णन दिलेले आहे. त्यातील उपकलम (६) मध्ये पुढीलप्रमाणे वर्णन आहे. " उक्त क्षेत्र, सुरक्षितता किंवा आरोग्य यास अपायकारक किंवा उपद्रवकारक असल्यास किंवा होण्यास प्रतिबंध करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाच्या मते ज्या गोष्टींची तरतूद करणे इष्ट असेल अशी व इतर कोणतीही बाब " त्यामुळे संरक्षण भिंतीच्या कामात प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मंडळास आहेत अशी आतापर्यंत असलेली धारणा होती व त्याप्रमाणे गेली ५ वर्षे मंडळाचे कामकाज चालत आलेले आहे. ही मंडळाची धारणा स्थायी करण्यात येत असून झोपडपट्टी सुधार मंडळास संरक्षण भिंती बांधकाम कार्यक्रमासाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७६/२१

विषय : म्हाड अधिनियम कलम ४१ अंतर्गत
मौजा पिंपरी (मेघे) येथील संपादित केलेल्या
जमिनीच्या अधिमूल्यास मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६९६ दिनांक : २८.०५.२००१

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाड अधिनियम कलम - ४१ अंतर्गत मौजा पिंपरी (मेघे) येथील संपादित केलेल्या जमिनीचे अधिमूल्य रु. २४,६८,८१६/- व व्याज रु. ११,८८,११८/- अशी एकूण रक्कम रु. ३६,४६,९३४/- अंदा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७६/२२

विषय : उन्नतनगर, गोरेगांव (पश्चिम) येथे ४२ गाळे
उच्च उत्पन्न गट व समाजमंदिर बांधण्याच्या योजनेसाठी
अस्तित्वात असलेले समाजमंदिर तोडण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५६९७ दिनांक : २८.०५.२००१

एकमताने निर्णय घेतला कीं, उन्नतनगर, गोरेगांव (पश्चिम) येथे ४२ गाळे उच्च उत्पन्न गट व समाज मंदिर बांधण्याच्या योजनेसाठी अस्तित्वांत असलेले समाजमंदिर तोडून त्या जागी समाजमंदिर व ४२ गाळे उच्च उत्पन्न गट बांधण्याच्या नियोजित येाजनेच्या कामासाठी मागविण्यात येणा-या निविदेत ठेकेदाराने अस्तित्वात असलेले समाजमंदिर स्वखर्चाने तोडून त्यामधून प्राप्त होणा-या नष्टशेष सामानापोटी रक्कम रु. ९५,१००/- मुंबई मंडळास भरणा करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७६/२३

विषय : भूतपूर्व जागतिक बँक प्रकलपांतर्गत विकसित व वितरीत केलेल्या भूखंडाचे भाडेपट्टा अधिकार हस्तांतरणाच्या परवानगीबाबत.

ठराव क्रमांक : ५६९८ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेण्यांत येत आहे कीं, तत्कालिन जागतिक बँक प्रकल्पांतर्गत भाउेपट्टा करारनामा करुन वितरीत केलेल्या विविध गटातील भूखंडाचे हस्तांतरण, वापर बदल प्रस्तावइत्यादिंबाबत मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी विहित मुदतीत संबंधित लाभार्थींकडून विनंती अर्ज मागवून भूखंडाचे सर्व कर्ज व देय रकमांची वसूली करुन परिशिष्ट क्र.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अधिमूल्य आकारुन भाडेपट्टा अधिकार हस्तांतरीत तथा वापर बदल करण्याचे परवानगी देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी विहित मुदतीत विनंती अर्ज मागूनही, विनंती अर्ज सादर न करता पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण व वापर बदल झाल्याची प्रकरणी परिशिष्ट - १ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या अधिमुल्याच्या दुप्पट अधिमुल्य आकारुन हस्तांतरण व वापर बदल परवानगीदेण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

वापर बदलाबाबत तथा अतिरिक्त बांधकामाबाबत खाली दर्शविण्यांत आलेल्या अअी व शर्ती संबंधित लाभार्थीवर बंधनकारक राहतील. मात्र वापर बदल, अतिरिकत बांधकाम नियमित करण्यास महापालिका किंवा इतर संस्था यांनी परवानगी नाकारल्यास भरणा केलेल्या अधिमूल्याचा परतावा देण्यांत येऊ नयें.

अनिवासी वापरासाठी व अतिरिक्त बांधकामाबाबत इतर अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहातील :---

अ. वापर बदलण्याबाबत मंडळामार्फत केवह ना हरकत प्रमाणपत्र अटीव शर्तीवर देण्यांतयावेत. याबाबतच्या आवश्यक परवानगी स्थानिक संस्थांकडून प्राप्त करुन घेण्याची सर्व जबाबदारी लाभार्थीवर सोपविण्यांत यावी व अशी परवानगी प्राप्त करुन घेण्यासाठी लाभार्थीवर कालमर्यादा घालून देण्यांत यावी.

ब. या धोरणात सुचविण्यांत आलेले वापर बदलासाठी देण्याच्या ना हरकत प्रमाणपत्राचे विविध दर वेळोवेळी बदलण्याचे (कमी अधिक करण्याचे) तसेंच धोरणाशी विसंगत असलेल्या वापर बदलाच्या काही प्रकरणांसाठी लागू करावयाचे अधिमुल्य व वार्षिक भुईभाडे ठरविण्याचेप्रस्ताव मंजूर करण्याचे सर्व अधिकारी उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

क. ज्या प्रकरणात अनधिकृत वाढीव बांधकाम करुन अशा वाढीव क्षेत्रात अनिवासीवापर करण्यांत येत असल्यास, अशा वाढीव बांधकामसाठी या धोरणानुसार आकारावयाच्या अधिमुल्याच्या १५० टक्के दराने दंड म्हणून रक्कम वसूल करण्यांत यावी. जर सदर अनधिकृत बांधकाम किंवा अनिवासी वापरास महानगर पालिकेने नियमितीकरणास परवानगी नाकारल्यास वसूली केलेली दंडाचीरक्कम परत करण्यांत येऊ नये.

ड. या धोरणानुसार नव्याने वापर बदलाची परवानगी देताना अशा वापर बदलाबाबत विकास नियंत्रण नियमावलीनुसार प्रस्ताव अनुज्ञेय असल्यास या धोरणानुसार त्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत यावे.

इ. वसाहतीस अत्यावश्यक असलेल्या सुविधा वापराचे किमान आवश्यकतेचे प्रमाण कमी होणार नाही. याबाबत वापर बदलाची परवानगी देतांना नियेजनात्मकदृष्टीने विचार करण्यांत यावा.

फ. अशा प्रकारच्या मंडळाने दिलेल्या परवानगीमुळे कोणत्याही प्रकारे वाढीव इन्फ्रास्ट्रक्चर (मुलभूत सुविधा) अधिक प्रमाणांत पुरविण्याची जबाबदारी मंडळावर / प्राधिकरणावर राहणार नाही.

बाब क्रमांक : १७६/२४

विषय : प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी
योजनेअंतर्गत वर्षा सहकारी गृहनिर्माण
संस्थेस वितरण केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव क्रमांक : ५६९९ दिनांक : २८.०५.२००१

श्री.रोशनलाल जैन व वर्षा सहकारी गृहनिर्माण संस्था यांचा जो तडजोडनामा झाला आहे तो शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यास प्रशासनास अनुमती देण्यांत येत आहे. शासनाच्या मान्यतेनंतर सदरचा तडजोडनामाचा प्रस्ताव न्यायालयाच्या दाव्याच्या अनुषंगाने उच्च न्यायालयात सादर करण्यात यावा. तडजोडनामातील अटी व शर्तीस प्रशासनाने पुन्हा एकदा तपासूनपाहून व त्यामध्ये प्राधिकरणाच्या किंवा शासनाच्या हितसंबंधास बाधा येत नाही याची खात्री करुन घ्यावी.

बाब क्रमांक : १७६/२७

विषय : लोकआवास येाजनेच्या अंमलबजावणीसाठी
समाजकल्याण विभागाचे अनुदान प्राप्त न झाल्यामुळे
आणि वित्तीय संस्थेचे कर्ज उपलब्ध होईपर्यंत
प्राधिकरणाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत
निर्णय घेण्याचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५७०० दिनांक : २८.०५.२००१

एकमताने निर्णय घेतला कीं, लोकआवास येाजनेकरिता शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून रु. २७ कोटीचे अनुदान आणि याच योजनेकरिता लाभार्थींसाठी वित्तीय संस्थांकडून रु. ४५ कोटींचे कर्ज उपलब्ध होईपर्यंत म्हाडाचा निधी अल्प कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावा.

मात्र, सदरहू निधी उपलब्ध करुन देण्यापूर्वी विभागीय मंडळांच्या मुख्य अधिका-यांनी कर्जाचेप्रस्ताव संबंधित वित्तीय संस्थांकडे व त्यास अनुसरुन लागणा-या शासनहमीचेप्रस्ताव शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच अनुदानाच्या संदर्भात समाज कल्याण विभागाकडे अनुदान मागणीचे प्रस्ताव पाठविणपे अपेक्षित आहे. याप्रमाणे पाठविलेल्या प्रस्तावांमध्ये दर्शविलेल्या एकूण रकमेइतकाच म्हाडाचा निधी उपलब्ध करुन देण्यांत यावा. विभागीय मंडळांच्या मुख्य अधिका-यांनी संबंधित वित्तीय संस्थांकडून कर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी, शासकीय हमीसाठी व समाज कल्याण विभागाचे अनुदान मिळण्यासाठी शीर्घगतीने पाठपुरावा करावा. म्हाडाचा निधी उपलब्ध करताना योग्य नमुन्यांत करारपत्र व हमीपत्र करुन घ्यावे. हमीपत्र व करारपत्राचा मसुदा विधी सल्लागार / प्राधिकरण यांजकडून मंजूर करुन घ्यावा.

बाब क्रमांक : १७६/२९

विषय : महर्षीनगर, पुणे (स.क्र. ६९८) येथे उच्च उत्पन्न गटाचे ५२ गाळे व २४ दुकानांची योजना .. निविदा मंजूरीबाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५७०१ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, महर्षीनगर, पुणे (स.क्र. ६९८) येथील भूखंडावर ५२ एचआयजी व २४ दुकानांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या मे.नोबेल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या निविदेवर वाटाघाटीनंतर कमी केलेला वनिविदा किंमतीपेक्षा १५.३० टक्क्यांनी जादा (रु. २,०७,४६,१३८.८४) असलेल्या देकाराची निविदा स्विकारण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यतादेण्यात येते.

बाब क्रमांक : १७६/३०

विषय : सर्व्हे क्र.२६३, सीटीएस क्र. ६ (अ) भाग, मालवणी मालाड (प.) येथे बांधण्यात आलेल्या ३४८८ सदनिका व मानखुर्द येथील २५४८ सदनिकांचे वसाहतींना नांव देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७०२ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, सर्व्हे क्र. २६३, सीटीएस क्र. ६ (अ) भाग, मालवणी येथील वसाहतीस राजीव गांधी नगर असे नांव देण्यास व मानखुर्द येथील वसाहतीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर असे नांव देण्या मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १७६/३२

विषय : म्हाडास सहाय्यक म्हणून कायम
स्वरुपी पोलीस बल मिळविण्यासंबंधी.

ठराव क्रमांक : ५७०३ **दिनांक : २८.०५.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी तसेच या कामकाजाच्या दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी म्हाडास कायम स्वरुपी पोलीस बल मिळण्यासाठीचा प्रस्ताव मा.सह पोलीस आयुक्त (प्रशासन) बृहन्मुंबई यांच्यामार्फतीने गृह मंत्रालयास सादर करण्याकरिता मान्यता देण्यांत येत आहे. तसेच त्यासाठी होणा-या वार्षिक खर्चास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २६/०६/२००१ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांक : १७७/४

विषय : मुंबई मंडळाच्या अधिपत्याखाली असलेल्या
वसाहतीत, केबल चालकांसह टी.व्ही.केबल
वाहिन्या टाकू देण्यासाठी धोरण ठरविणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७०४ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. मुंबई मंडळाच्या विविध वसाहतींमध्ये प्रायोगिक तत्वावर म्हणून सुरुवातीस ज्या सहा केबल चालकांना प्राधिकरणाची मान्यता मिळेल, हे गृहीत धरुन मा.सभापती / मुंबई मंडळ यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने मंजूरी दिली. त्यांस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

२. यापुढे म्हाडाच्या विभागीय मंडळातून ज्या नवीन वसाहती बांधण्यात येतील, त्याठिकाणी जाहिररित्या अर्ज मागवून केबलधारकांची निवड करावी. यासाठी प्राधिकरणाने जे दर ठरवून दिले आहेत त्यावरील उच्चतम देकारदाराची निविदा अन्य काही प्रतिवाह नसेल तर मान्यकरण्यांत यावी.

३. मंडळाच्या वसाहतीमध्ये जे केबलधारक सध्या विना परवानगी केबल चालवित आहेत त्यांना प्राधिकरणाचे निश्चित केलेले दर व अनामत रक्कम कळवून त्यांचे दुप्पट दर त्यांना आकारुन त्यांना नियमित करण्यांत यावे.

बाब क्रमांक : १७७/५

विषय : कन्नमवार नगर, विक्रोळी येथे महानगर पालिकेच्या जागेवरील पुरस्कृत केलेल्या गणनाकृत स्टॉलना पर्यायी जागा देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७०५ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाच्या अखत्यारित असलेल्या वसाहतीपैकी कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) येथील गजानन महाराज चौक, पंप हाऊस नं.२ मधील भिंत व रस्त्याची कड यामधील जागा रस्त्यावरील स्टॉलधारकांना पर्याय जागा म्हणून देण्यास मान्यता देण्यात येते. मात्र या स्टॉलधारकांकडून प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणानुसार जमिनीची किंमत वसूल करण्यात यावी.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७७/६ व १७७/१४

विषय : कांदिवली पूर्व येथे मुंबई मंडळाने आर्मी वेल्फेअर ऑर्गनायझेशनला वितरीत केलेल्या भूखंडावर बांधलेल्या इमारतीतील गाळे हस्तांतरणाकरिता आकारावयाचे शुल्क.

ठराव क्रमांक : ५७०६ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, कांदिवली पूर्व येथे मु१ंबई मंडळाने आर्मी वेल्फेअर ऑर्गनायझेशनला वितरीत केलेल्या भूखंडावर बांधलेल्या इमारतीतील गाळे, डीफेन्स सर्व्हिसमधील अधिका-यांनाच हस्तांतरीत केले जात असतील तर, हस्तांतरणाकरिता आकारावयाच्या शुल्कासाठी ओशिवरा येथील आर्मी वेल्फेअर हाऊसिंग ऑर्गनायझेशन (A.W.ll.O.) यांना वितरीत केलेल्या भूखंडावर बांधलेल्या तारापूर गार्डन इमारतीसाठी प्राधिकरणाने यापूर्वी पारीत केलेला ठराव क्रमांक ५५३३, दिनांक १७.०१.२००१ अन्वये घेतलेला निर्णय, याही प्रकरणात लागू करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्रमांक : १७७/७

विषय : गरमखाडा लालबाग, मुंबई येथील गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेंतर्गत १०० गाळयांच्या थकित मासिक हप्त्याच्या रकमेवर आकारण्यांत आलेली व्याज रक्कम माफ करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७०७ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, ठराव क्रमांक ५६५८, दिनांक ५.०३.२००१ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत यावी :---

गणनायक को.ऑ.हाऊसिंग सोसायटी गरमखाडा, लालबाग, मुंबई येथील गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेंतर्गत १०० गाळयांच्या थकित मासिक हप्त्याच्या रकमेवरील व्याज रक्कम रु. १,९९,९३६/- च्या ऐवजी खास बाब म्हणून व्याजाची रक्कम, या रकमेच्या १० टक्के म्हणजेच रु. १९,९९४/- व्याज म्हणून घेण्यास मान्यता देण्यांत येते. मात्र यापुढे अशाप्रकारचा पायंडा पडणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी. प्रशासनाने प्राधिकरणाच्या ठराव दुरुस्ती पूर्वी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १७७/८

विषय : मंडळाने लाभार्थींना वितरीत केलेल्या जमिनीवर
लाभार्थींने बांधलेल्या इमारतींच्या गच्चीवर व
अनुलग्न जागेत जाहिरात फलक उभारु देण्याकरिता
परवानगी देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७०८ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पूर्वीच्या ठराव क्रमांक ५६३३, दिनांक २.११.२००० मध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे ठराव करण्यांत येत आहे.

डॉ.ॲनी बेझेंट रोड, वरळी येथील सस्मिरा संस्थेस भाडयाने दिलेल्या भूखंडावर संस्थेने बांधलेल्या बहुमजली इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील १०,०००/- चौ.फुटाची जागा सदर संस्थेस स्कूलनेट इंडिया लिमिटेड या संस्थेस मासिक भाडेपट्टयावर देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. संस्थेस मिळणा-या उत्पन्नापैकी २५ टक्के रक्कम सस्मिरा संस्थेने मुंबई मंडळाकडे भरणा करावयाचे आहे.

या ठरावामुळे प्राधिकरणाच्या पूर्वीचा ठराव ७३१, दिनांक २९.१०.१९८३ मध्ये अंशतः बदल होईल.

सस्मिरा या संस्थेने बांधलेल्या इमारतीच्या टेरेसवर व इमारतीच्या अनुलग्न जागी मे.एम्प्रेस आऊट डोअर ॲडव्हरटाईझिंग यांना जाहिरात फलक लावू देण्यास अनुमती देण्यांत येत आहे. मात्र या जाहिरातीच्या उत्पन्नामधून होणा-या नफयामधून २५ टक्के रक्कम त्यांना मंडळाकडे जमा करणे आवश्यक राहील.

यापुढे या प्रकरणांमध्ये इमारतीच्या कोणताही भाग भाडयाने देण्याचे, कोणता मजला देण्याचे इत्यादिं बाबींवर निर्णय घेण्याचे अधिकारी सभापती / मुंबई मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली गठीत होणा-या समितीस प्रदान करण्यांत येत आहेत. मात्र बांधलेल्या इमारतींपैकी २५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्रफळ भाडयाने देता येणार नाही व उत्पन्नाच्या २५ टक्के रक्कम मंडळाकडे भरणे आवश्यक राहील.

मंडळाने भाडेपट्टयावर दिलेल्या भूखंडावर लाभार्थींतर्फे बांधण्यात आलेल्या इमारतीच्या किंवा मंडळाने इमारत बांधून विकलेल्या इमारतीच्या, टेरेस व अनुलग्न जागेमध्ये जाहिरात फलक उभारु देण्यास मूळ संस्थांना परवानगी देण्यांत यावी. यासाठी मूळ संस्थांना मिळणा-या रकमेपोटी २५ टक्के रक्कम म्हाडास मिळणे आवश्यक राहील.

परवानगी देण्याचे अधिकार सभापती / मुंबई मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली गठीत होणा-या समितीस देण्यांत येत आहेत.

तत्कालिन उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी वरळी येथिल शिवप्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्थेस त्यांच्या आवारात जाहिरात फलक लावू देण्यात आलेल्या परवानगीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १७७/९

विषय : मुंबई मंडळाच्या जमिनीवर मा.खासदार, आमदार नगर सेवक यांचे निधीतून कामे करण्यास दिले जाणारे " ना हरकत प्रमाणपत्र " व त्याअनुषंगाने या जमिनीबाबत आकारावयाचे अधिमूल्य.

ठराव क्रमांक : ५७०९ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळाच्या जमिनीवर मा.खासदार, आमदार व नगर सेवक यांचे निधीतून कामे करण्यास फक्त म्हाडा व मुंबई महानगर पालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र ग्राहय धरण्यांत यावे. तसेच त्या अनुषंगाने आकारावयाचे अधिमुल्य नाममात्र रु. १/- आकारण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७७/१०

विषय : स.गो.बर्वे मार्ग, नेहरुनगर, कुर्ला येथील जी-५१ गाळयांच्या मागील ४२ फुट जागेचा अनधिकृत वापर, श्री.अरकाडे यांना नियमित करुन देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७१० **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, स.गो.बर्वे मार्ग, नेहरुनगर, कुर्ला येथील जी-५१ गाळयाच्या मागील ४२ फुट जागेचा अनधिकृत वापर श्री.अरकाडे यांना नियमित करुन देण्यांत यावा. सदरहू जागेसाठी रु. १२१०/- प्रति चौ.फुट हा दर सदर ४२ चौ.फुट जागेसाठी आकारण्यांत यावा. तसेच १९९६ ते २००० या मागील ५ वर्षासाठी वार्षिक भुईभाडे व त्यावर १६ टक्के दराने व्याज आकारण्यांत यावे.

बाब क्रमांक : १७७/११

विषय : मंडळाच्या वसाहतीमध्ये जाहिरात फलक उभारु देण्यासाठी परवानगी देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७११ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन अर्ज मागविणे इत्यादि कार्यप्रमाणालीस मान्यता देण्यांत येत आहे.

उपाध्यक्ष / प्राधिकरण यांचे मान्यतेने सविस्तर मार्गदर्शक सूचना / परिपत्रक जारी करण्यांत यावे. तसेच प्राधिकरणाने केबल व्यावसायिकांना परवानगी देण्यासाठी सभापती यांचे अध्यक्षतेखाली जशी समिती गठीत केली आहे, त्याच धर्तीवर जाहिरात फलक उभारण्यासाठी परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी सभापती यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यांत यावी.

या समितीमध्ये खालील अधिका-यांचा समावेश असेल

१.	सभापती / मुंबईमंडळ	अध्यक्ष
२.	मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ	सदस्य
३.	सहमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ	सदस्य
४.	संबंधित सहा.भू-व्यवस्थापक	सदस्य सचिव
५.	संबंधित कार्यकारी अभियंता	सदस्य
६.	मुख्य लेखाधिकारी/मुंबई मंडळ	सदस्य
७.	संबंधित मिळकत व्यवस्थापक	सदस्य

बाब क्रमांक : १७७/१५

विषय : टागोरनगर, पूर्व येथे बांधलेले निवासी व व्यापारी इमारतीतील विक्री किंमतीबाबत.

ठराव क्रमांक : ५७१२ **दिंनाक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. श्री.साईसिध्दी सप्तशृंगी गृहनिर्माण संस्थेला, निवासी सदनिका रु. १२५०/- प्रति चौ.फुट या दराने एकरकमी पध्दतीने विकण्यास मान्यतादेण्यात येत आहे. तथापि, त्यासाठी शासनाची पूर्व परवानगी घ्यावी.

२. विनियमातील तरतुदीनुसार गाळयांची दोनदा जाहिरात दिल्यानंतर जर मागणी आली नाही, तर गाळयांची विल्हेवाट कोणत्या पध्दतीने लावावी याचा निर्णय घेण्याची मुभा प्राधिकरणास आहे. यापुढे गाळयांची एकदा जाहिरात देऊनही मागणी न आल्यास, प्राधिकरण ठरवेल त्या पध्दतीने गाळयांचेवितरण करण्याची मुभा प्राधिकरणास राहील असा बदल विनियमात करण्यासाठीची कार्यवाही विधी शाखेने करावी.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७७/१६

विषय : तक्तालिन जागतिक बँक प्रकल्पांतर्गत
झोपडपट्टी श्रेणीवाढ येाजनेखाली आकारण्यात
येणा-या परिसर सुधारणा शुल्क व कर्जाच्या
हप्त्यावरील विलंब शुल्काबाबत.

ठराव क्रमांक : ५७१३ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, झोपडीधारकांनी जर संपूर्ण मूह मुद्दल अधिक विलंब शुल्कापोटी असलेली थकबाकीच्या रकमेपोटी ५० टक्के रक्कम सहा महिन्यात मंडळाकडे भरली तर उर्वरित ५० टक्के विलंब शुल्कापोटी आकारावयाची रक्कम त्यांना माफ करण्यांत यावी.

बाब क्रमांक : १७७/१७

विषय : म्हाडाने उच्च उत्पन्न गटासाठी आरामनगर - १, वर्सोवा
येथे बांधलेल्या ५६ सदनिकांच्या इमारतीतील २८ रिक्त
सदनिका रु. २१००/- प्रति चौरस फुट दराने सनराईज
गृहनिर्माण संस्था (नि.) यांना वितरीत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७१४ **दिनांक : २६.०६.२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, सनराईज सहकारी संस्थेस रु. २१००/- प्रति चौरस फुट याप्रमाणे व ८७४.८९ सुपर बिल्टअप क्षेत्रफळ नमूद करुन ३३ रिक्त सदनिका एकरकमी पध्दतीने विक्री करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २१/७/२००१ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांकः१७८/३

विषयः- पवई येथील सदनिकांची थोक स्वरुपात
खरेदी करणाऱ्या संस्थांना विक्री किंमतीत
१५ टक्के सूट देणेबाबत. तसेच मानखुर्द
सायन व मालवणी येथील सदनिकांच्या विक्री
धोरणाचा पुनर्विचार करणेबाबत.

ठराव क्रमांकः५७१५ **दिनांकः-२१/७/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. कॅनरा बँक व तत्सम कुठल्याही संस्थेने पवई येथील १०० पेक्षा जास्त उच्च उत्पन्न गट सदनिका विकत घेतल्यास त्यांना नॉन डिलक्स सदनिकांसाठीच्या रु. २०००/- प्रति चौ. फूट या दरांत १५ टक्के सवलत तसेच डिलक्स सदनिकांसाठीच्या रु. २२००/- प्रति चौ. फूट या दरांत १५ टक्के सवलत देण्यांत यावी. तसेच कॅनरा बॅकेच्या बाबतीत बाब टिप्पणीत नमूद केलेल्या व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी मान्य केलेल्या अटीं अशा संस्थांनादेखील लागू करण्यांत याव्यात.

२. पवई-मानखुर्द सायन व मालवणी येथे सद्या लावण्यांत येत असणारी मजलानिहाय दरवाढ या ठरावाव्दारे रद्द करण्यांत येत आहे. त्यामुळे १० टक्के व १५ टक्के सवलतींचा फायदा देण्यासाठी खालीलप्रमाणे मूळ विक्री किंमत पायाभूत विक्री किंमत म्हणून मान्य धरण्यांत यावी.

मानखुर्द	रु. १३५०/- प्रति चौ. फूट
सायन	रु. १७००/- प्रति चौ. फूट
मालवणी	रु. ९९५/- प्रति चौ. फूट
पवई(नॉन डिलक्स)	रु. २०००/- प्रति चौ. फूट
पवई (डिलक्स)	रु. २२००/- प्रति चौ. फूट

३. प्रतिक्षानगर, सायन येथे देखील ५० पेक्षा जास्त सदनिका, थोक स्वरुपांत एखाद्या संस्थेने, समूहाने किंवा प्राधिकरणाच्या अधिकृत प्रॉपर्टी ब्रोकरने आरक्षित केल्यास त्यांना देखील रु. १७००/- च्या मूळ विक्री किंमतीत १५ टक्के सूट देण्यांत यावी.

४. पवईप्रमाणेच मानखुर्द, सायन व मालवणी येथेही जी गिऱ्हाईक अर्जासोबत एक रकमी संपूर्ण विक्री किंमत भरतील, अशांना ते एकटे-दुकटे असले तरी देखील वर २ मध्ये दर्शविलेल्या मूळ विक्री किंमतीत १० टक्के सवलत देण्यांत यावी.
पवई, मालवणी, सायन व मानखुर्द येथे थोक आरक्षणाखाली (२८ सदनिका प्रॉपर्टी एजन्टस् करीता व ३२ सदनिका स्वतंत्रपणे येणाऱ्या समूहाकरीता) सदनिका आरक्षित करण्याकरीता १० टक्के सवलत ४५ दिवसांत संपूर्ण विक्री किंमत भरण्याच्या अटींवर देण्याचा प्राधिकरणाने पूर्वीच निर्णय घेतला आहे. या ४५ दिवसांपेक्षा एकही दिवस जास्त उशीर झालेल्या गिऱ्हाईकांना सद्या ही १० टक्केची सवलत नाकारण्यांत येते. तथापि कांही प्रकरणांत हे पैसे भरण्यास, वित्तीय संस्थांनी वेळ केल्यास किंवा ४५ व्या दिवसानंतर लगत लगेच सार्वजनिक सुट्टया आल्यास, कांही दिवस जादा लागतात. अशा प्रकरणांत उपाध्यक्ष/प्रा. यांनी ४५ दिवसांच्या वर कांही दिवस (सार्वजनिक सुट्टया वगळून) पर्यतच्या विलंबाच्या प्रकरणांची, गुणवत्ता तपासून, क्षमापित करावा व अशा गिऱ्हाईकांना मूळ विक्री किंमतीत जाहीर केलेल्या सवलतीचा लाभ द्यावा. अशी प्रकरणे प्राधिकरणापुढे आणू नयेत.

५. दिलेल्या सदनिकांच्या रहिवाशी वापरांत बदल केल्यास त्यासाठी आकारण्यांत येणाऱ्या 'वापर बदल शुल्का' साठी उपाध्यक्ष/प्रा. यांनी दि. ७/६/२००१ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र या परिपत्रकानुसार एखाद्या गिऱ्हाईकाने आपली रहिवाशी सदनिका व्यावसायिक वापरासाठी परिवर्तीत करुन घेतल्यास अशा लाभधारकांस रहिवाशी सदनिकेसाठी दिलेली १० टक्के सवलत अनुज्ञेय रहाणार नाही.

६. अधिकृत प्रॉपर्टी ब्रोकर्सव्दारे सदनिका आरक्षित केलेल्या २८ किंवा त्यापेक्षा जास्त लाभधारकांना देखील प्राधिकरण ठराव क्रमांक ५६४७ दि. ६.१.२००१ मध्ये नमूद केलेली विक्री किंमतीतील १० टक्के सूट देण्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

७. मालवणी येथील विक्री उत्साहवर्धक असल्याने मालवणी येथे १० टक्केपेक्षा जास्त सवलत देण्याचा विचार सद्या तरी करु नये.

८. कॅनरा बॅकेस ११२ सदनिकांचे वाटप करीत असतांना या इमारतीमध्ये आधीच वितरण केलेल्या ६ लाभधारकांना स्थलांतरीत करण्यासाठी कांही खर्च होणार असेल तर त्यास किंवा त्यांना त्यांचे पैसे परत हवे असतील तर त्यासाठीचे सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहे.

सदरहू ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७८/४.

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण- सेवा उपदान नियमावली १९८५ नियम क्रमांक २ (एफ) पृष्ठ क्र. ८ वरील परिशिष्टातील अ.क्र.३ मध्ये सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७१६ दिनांक : २१/७/२००.

एकमताने निर्णय घेतला कि,

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे म्हाडाच्या नियंत्रणाखाली स्वतंत्रपणे शासनाने स्थापन केले असल्यामुळे त्या मंडळाच्या मुख्यलेखाधिकारी यांना सेवा उपदान मंजूरीचे अधिकार प्रदान करण्याबाबतची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण सेवा उपदान विनियम १९८५ च्या नियमावलीच्या पृष्ठ क्रमांक ८ वरील अनूक्रमांक ३ मधील परिशिष्टामध्ये मुख्यलेखाधिकारी मुबंई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ अशी सुधारणा करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांकः१७८/५

विषयः- पवई-कोपरी सर्व्हे क्र.२, प्लॉट क्र.११ (नवीन सी.टी.एस. क्र.१/१०) येथील निटी या सहकारी संस्थेस वितरीत केलेल्या भूखंडाबाबत.

<u>ठराव क्रमांकः५७१७</u> **दिनांकः- २१/७/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं,

निटी या संस्थेची इमारत बांधून पूर्ण झाली असल्यामुळे व तत्कालिन मुख्य अधिकारी/मुबई मंडळ यांनी प्राधिकरणाच्या १९९२ च्या किंमतीविषय धोरणातील तरतुदीप्रमाणे या संस्थेच्या इमारतीतील १० टक्के गाळे म्हाडासाठी राखून ठेवण्याची आवश्यक असलेली अट शिथिल केली असल्याने त्याबाबतीत त्यांचेवर जबाबदारी निश्चित करणेचे अधीन राहून आता ही अट काढून टाकण्यात येत आहे. त्याप्रमाणे संस्थेस याबाबत कळविण्यांत यावे.

मात्र, अधिकार नसतांना ही अट कां शिथिल केली, याविषयी तत्कालिन मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांची जबाबदारी निश्चित करावी.

बाब टिप्पणीत प्रशासनाने सुचविले आहे कीं, १९९२ ते २००१ या कालावधीत वितरीत झालेल्या कोणत्याही भूखंडात अशी अट न ठेवल्याने, ही चूक क्षमापित करावी. तथापि, हे मान्य करण्यांत आले नाही. अशी अट कां ठेवण्यात आली नाही व त्यामुळे किती भूखंडांचे वितरणात म्हाडास १० टक्के प्रमाणे किती गाळे राखून ठेवण्यात आले नाहीत व त्यास जबाबदार कोण आहेत, याबाबतचा अद्यावत अहवाल प्राधिकरणाकडे पुढील बैठकीत मुख्यअधिकारी/मुंबई मंडळ यांनी सादर करावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७८/७.

विषय : गडचिरोली औद्योगिक क्षेत्रातील ५ हेक्टर जमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारा नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास वाटप करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७१८ **दिनांक : २४/७/२००१.**

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची गडचिरोली येथील ५ हेक्टर जमीनरु. ८.०० प्रति चौरस मिटर (अंदाजे ८० पैसे प्रति चौ.फू.) या दराने घेण्यास तसेच जमिनीचा ताबा घेतल्यानंतर नाममात्र वार्षिक भाडे रु. १.०० आणि रु. १.४० प्रति चौरस मिटर सेवा शुल्क दरवर्षी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास भरण्यास प्राधिकरणाची मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १७८/८.

विषय :नागपूर मंडळाने कामठी येथे बांधलेल्या अल्प उत्पन्न गटातील ४५ गाळयांपैकी रिक्त राहिलेले १० गाळे शाहू शिक्षण संस्था, पंढरपूर व ८ गाळे श्री. सदाशिवराव पाटील शिक्षण संस्था, कामठी यांना वाटप करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७१९ **दिनांक : २१/७/२००१.**

एकमताने निर्णय घेतला की,

नागपूर मंडळाने कामठी येथे बांधलेल्या अल्प उत्पन्न गटामधील ४५ गाळयांपैकी रिक्त राहिलेले १८ अगाळयापैकी १० गाळे शाहू शिक्षण संस्था, पंढरपूर आणि ८ गाळे श्री. सदाशिवराव पाटील शिक्षण संस्था, कामठी यांना निवासी वापरासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. गाळयांचे वाटप वसतीगृह निवासी वापरासाठीच करणे आवश्यक राहील. अनधिकृत वापर करता येणार नाही.
२. वसतीगृहातील विद्यार्थ्यांकडून आजूबाजूच्या रहिवाश्यांना कोणताही उपद्रव होणार नाही, याची जबाबदारी संस्थेने घेणे आवश्यक राहील.
३. संस्थांना सदनिकांची विक्री परस्पर करता येणार नाही.
४. संस्थांना गाळयांची किंमत एकरकमी भरावी लागेल त्यात कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

सदर निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक १७८/९.

विषयः देवगड, जिल्हा-सिंधुदुर्ग येथे खाजगी जमिनी मालकांच्या अंशतः सहभागाने गृहनिर्माणयोजना कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५७२० **दिनांक : २१/७/२००१**

एकमताने निर्णय घेतला की,

देवगड, जिल्हा-सिंधुदुर्ग येथील श्री. शशिकांत कुलकर्णी व इतर यांच्या खाजगी मालकीच्या ३.४० हेक्टर जमिनीवर जमिन मालकांच्या अंशतः सहभागाने गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्याच्या बाब टिपणीतील परिच्छेद क्र. ५ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी देण्यात येते. तसेचजमिन मालकास द्यावयाच्या जमिनीची एकूण किंमत बाब टिपणीतील परिच्छेद-३ नुसार निश्चित करण्यास व सदरहू किंमत जमिन मालकास बाब टिपणीच्या परिच्छेद-७ मध्ये नमूद केलेल्या विविध टप्प्यानुसार अदा करण्यास व सदरहू योजना आगाऊ अंशदान पध्दतीने राबविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : १७८/१०.

विषय : मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि.
या कंपनीस मुंबई मंडळांतर्गत शासनाच्या
आदेशानुसार सायन येथील संक्रमण
शिबिराच्या पुनर्बांधणीचे काम ठोक पध्दतीनेवितरीत
करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७२१ **दिनांक : २१/७/२००१**

एकमताने निर्णय घेतला की,

१. प्रतिक्षा नगर, सायन, येथील जमिनीवर सुमारे ६०० संक्रमण सदनिका अ.उ.ग.५७६, अ.उ.ग.१-२२४, म.उ.ग.७१४, उ.उ.ग.१-११२ सदनिका बांधण्याचे प्रकल्पास मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन लि. यांना ठोक पध्दतीने देण्यात यावे. तथापि वर दर्शविलेल्या सदनिकांची संख्या अंदाजित असून महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष मंजुरीप्रमाणे कार्यान्वित करावी. शासनाच्या दिनांक ९/६/१९९९ च्या आदेशाप्रमाणे द्यावयाच्या १०,००० गाळयांचे अंदाजित क्षेत्रफळ ३३,२०,००० चौरस फूट इतके

आहे. वरील क्षेत्रफळातुन आतापर्यंत दिलेल्या ६ कामांचे एकूण क्षेत्रफळ (तीन मिलस्च्या जमिनी, गोरेगांव, ओशिवरा व दिंडोशी) २३,९१,७९९चौरस फूट वजा केल्यास अंदाजे ९,२८,२०१ चौरस फूट बांधकामाचे काम देणे अपेक्षित आहे. सध्या मे. बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांना द्यावयाचे काम सदर बांधकाम क्षेत्रफळापुरते मर्यादित ठेवावे व प्रस्तावित आराखडयानुसार उर्वरित अधिक क्षेत्रफळ सुमारे २.१० लक्ष चौरस फूट वाढीव बांधकामाबाबत शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर देण्यात यावे. प्रकल्पाची जमिन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने मोकळी करुन दिल्यानंतर टप्प्याटप्प्याने काम हाती घ्यावे. वरील प्रकल्प एकूण २१ महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित करावा.

२. बांधकामाचे दर खुल्या विक्रीच्या सदनिकांसाठी शासनाच्या आदेशानुसार दर ठरविणा-या समितीने ठरविल्यानुसार रुपये ६७५/- प्रति चौरस फूट व त्यासोबतचे शासनाचे सुधारीत बांधकाम विनिर्देश व अटी लागू राहातील. संक्रमण गाळयांसाठी तळ अधिक ४ मजले इमारतींसाठी बांधकामाचा दर प्राधिकरणाने गोरेगांव व ओशिवरा प्रकल्पासाठी ठरविल्याप्रमाणे रुपये ६६०/- प्रति चौरस फूट इतका राहील.

३. वरील कामावर कोणत्याही प्रकारचे एस्कलेशन कंत्राटदारास देय राहाणार नाही.

४. खुल्या विक्रीचे सदनिकांचे बांधकाम परिशिष्ट २ मध्ये दर्शविलेले सुधारित स्पेसिफिकेशन्स प्रमाणे करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे व सुधारित विनिर्देशाचे दर जास्तीत जास्त रु. ५५/- प्र.चौ.फू. इतका असावा.

५. संक्रमण गाळयांचे चटई क्षेत्रफळ १८० चौ.फू. इतके ठेवावे व हयाप्रमाणे अभिन्यास व बांधकाम नकाशात सुधारणा कराव्या.

६. योजनेस जरुरी असणा-या पायाभूत सुविधांचे अंतर्गत व बाहय तसेच आराखडयातील व्यापारी संकुल इतर सुविधा जसे की, क्रिडांगण, बागबगीचा, वसाहतीस लागणारी सुरक्षा भिंत इत्यादी कामे मूळ कंत्राटदार मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. कडून चालू दरसूचीवर करुन घेण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. ज्या बाबीसाठी चालू दरसूचित दर उपलब्ध नाहीत, अशा बाबींचे **दर विश्लेषण** करुन सक्षम प्राधिका-याच्या मंजूरीने दर ठरवावे.

७. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने संक्रमण शिबिरात सध्या राहात

असलेल्या भाडेकरुंना प्रतिक्षा नगर, सायन येथील मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांनी नुकत्याच बांधलेल्या व रिकाम्या असलेल्या सुमारे ४०० गाळयांच्या बहुमजली इमारतीत किंवा अन्यत्र हलवून प्रकल्पासाठी टप्प्याटप्प्याने कालबध्द आराखडा आखून जास्तीत जास्त १२ महिन्यांच्या आत जमिन मोकळी करुन घ्यावी.

८. मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. या कंपनीकडून यापूर्वी घेतले होते तसे हमीपत्र घेऊन हया प्रकल्पापुरते काम देण्यात यावे.

९. सदर प्रकल्प कार्यादेशाच्या दिनांकापासून २१ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावो.

१०. सदर ठरावावर प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत कार्यवृत्तांच्या स्थायीकरणाची वाट न बघता पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे

बाब क्रमांकः१७८/११

विषयः-सर्व्हे क्र. २६३, सीटीएस क्र.६-अ (भाग)
मालवणी,मालाड(प.)येथील व्यापारी
संकुल विकसित करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः</u> ५७२२ दिनांकः- २१/७/२००१

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. सर्व्हे क्र.२६३, सी. टी.एस. क्र. ६ (अ) भाग, मालवणी- मालाड (प) येथे व्यापारी संकुल विकसित करण्याचे काम कामाचे मूळ कंत्राटदार मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना थेट पध्दतीने देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

२. सदर व्यापारी संकुलाचे काम प्रेसिडेन्सी डिव्हीजनच्या किंवा इतर चालू दरसूचीवर मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांच्याकडून करुन घेण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. काम बी-१ करारनाम्यानुसार राबविण्यांत यावे. ज्या बाबीसाठी प्रचलित चालू दरसूचीत दर नाहीत, अशा बाबीचे दर

विश्लेषण करुन सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेऊन करारनाम्यात अंतर्भाव करण्यांत यावा.

३. सदर कंत्राटामध्ये कोणत्याही प्रकारचे एस्कलेशन देय राहणार नाही.

४. प्रचलित दरसूचीत 'टर्नओव्हर टॅक्स' चा अंतर्भाव नसल्याने प्रत्यक्ष आकाराप्रमाणे 'टर्नओव्हर टॅक्स' अदा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

५. सदर कामाचे पूर्ण नियोजन, स्थानिक महानगरपालिकेच्या आवश्यक सर्व मंजूरी, कामाचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणे, नळजोडणी, मलनिःस्सारणवाहिनी जोडणे, कामासाठी लागणारी सर्व मंजूरी व पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे इत्यादी सर्व काम मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांनी करावयाची आहेत. त्यासाठी कोणत्याही अतिरिक्त प्रकारचे देयक लागू राहणार नाही.

६. सदर व्यापारी संकुलाचे काम कामाचे कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचे कालावधीत करुन घ्यावयाचे आहे.

७. सदर ठरावावर प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न बघता पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांकः१७८/१२

विषयः- राज्य शासनाला रु. १०० कोटी देण्यासंबंधी.

<u>ठराव क्रमांकः</u> ५७२३ दिनांकः-२१/७/२००१.

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाच्या निधीतून शासनाला रु. १०० कोटी कर्ज म्हणून देण्यास तसेच या निधीवर शासन मान्यतेने व्याज आकारण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. या कर्जाच्या परतफेडीविषयी शासनाबरोबर विचारविनिमय करुन निर्णय घेण्यात यावा.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ११/०९/२००१ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १७९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बाब क्रमांकः१७९/४

विषयः- प्रतिक्षानगर, सायन येथील इमारत क्र.१,६,७,८ व ३-अ मधील सदनिका, मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांची संपूर्ण विक्री किंमत भरण्यासाठी शासनमान्य कर्जपुरवठा संस्थेतर्फे कर्ज सहाय्य व शासन अनुदान मिळून ते प्राधिकरणाकडे वर्ग होईतो, भाडयाने देण्याच्या उपाध्यक्ष/प्रा. यांच्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांकः५७२४ **दिनांकः ११/९/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, प्रतिक्षानगर, सायन येथील इमारत क्र.१,६,७,८ व ३-अ मधील सदनिका, मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांची संपूर्ण विक्री किंमत भरण्यासाठी शासनमान्य कर्जपुरवठा संस्थेतर्फे कर्जसहाय्य व शासन अनुदान मिळून ते प्राधिकरणाकडे वर्ग होईपर्यत, भाडयाने देण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच भविष्यात पुढे शासनाच्या या योजनेचा लाभ घेण्यास जर कांही संस्था पुढे आल्या तर त्यांनाही याच धर्तीवर लाभ देण्याचे संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या सहमतीने उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांस मान्यता देण्यात येत आहेत.

बाब क्रमांकः १७९/६.

विषयः- स. नं. २७ शहानुरवाडी, औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गट-१, २२ रो हाऊसेस व उच्च उत्पन्न गट-२ २८ स्वतंत्र बंगले बांधणे. निविदेवर निर्णय घेण्यास्तव टिप्पणी.

ठराव क्रमांकः५७२५ **दिनांकः ११/९/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, स. नं. २७, शहानुरवाडी, औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गट-१, २२ रो हाऊसेस व उच्च उत्पन्न गट-२, २८ स्वतंत्र बंगले बांधणे याकरीता बाब टिप्पणीतील प्रस्तावित निविदाकारांपैकी पात्र ठरलेले फक्त दोन निविदाकार मे.तनया कन्स्ट्रक्शन आणि मे. खंडेलवाल कन्स्ट्रक्शन यांच्याशी वाटाघाटी करुन जो निविदाकार कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविल, त्याला सदरहू काम देण्याचे ठरविण्यांत आले. मे. खंडेलवाल कन्स्ट्रक्शन यांनी कमी दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे व त्यावेळी मे. तनया कन्स्ट्रक्शनचे निविदाकार अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे मत प्रथम जाणून घेऊन सदरहू काम करण्यास त्यांनी प्रतिसाद दिला नाही तर मे. खंडेलवाल कन्स्ट्रक्शन यांना सदरहू काम देण्यांस मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १७९/७.

विषय : सर्व्हे क्र. २९/२ व ३०/१ मौजा, जयताळा, नागपूर येथील मंजूर अभिन्यासास पोहोच रस्ता मिळण्यासाठी बाजूच्या खाजगी मालकीचा श्री. देशमुख यांचा भूखंड आराजी ११६.१८ चौ.मी. (१२५० चौ.फू.) घेण्याबाबत.

ठराव क्रमांकः५७२६ **दिनांकः११/९/२००१.**

निर्णय घेतला कीं,

सर्वे क्र. २९/२ व ३०/१ मौजा जयताळा, नागपूर येथील मंडळाच्या वसाहतीस पोहच रस्ता मिळण्यासाठी वसाहतीस लागून असलेल्या शिवाजीनगर सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्थेच्या अभिन्यासातील श्री. ललितराव देशमुख यांच्या मालकीचा भूखंड क्षेत्रफळ ११६.१७ चौ.मी. (१२५० चौ. फूट) मंडळाने घेण्यास व त्या बदल्यात मंडळाच्या वसाहतीतील १२५० चौ. फूटाचा भूखंड श्री. देशमुख यांना देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांकः१७९/८.

विषयः- **सेवानिवासस्थान वाटपाच्या सुधारीत मार्गदर्शक तत्वात ५ टक्के सेवासनिवासस्थान गाळे प्राधान्याने वाटप करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्याबाबत.**

ठराव क्रमांकः५७२७ **दिनांकः११/९/२००१.**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळातील एकूण सेवा निवासस्थान गाळयांच्या ५ टक्के सेवा निवासस्थान गाळे स्वेच्छाधिकारात, वाटप करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. मात्र अशाप्रकारे प्राधान्याने वाटप करण्यात येणाऱ्या सेवा निवासस्थान गाळयाकरीता फक्त खालील बाबीत मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विचार करण्यांत यावा.

१. अत्युत्कृष्ट स्वरुपाचे काम करणारे कर्मचारी
२. शारीरिकदृष्टया अपंग असणारे कर्मचारी आणि असाध्य/गंभीर आजाराने दिर्घकाळ पिडीत असलेले कर्मचारी
३. अनुकंपा तत्वावर सेवेत घेतलेले परंतु निवासाची सोय नसल्यामुळे व सुविधा नसलेल्या झोपडपट्टीत रहाणारे कर्मचारी.

सेवा निवासस्थानाचे वाटप करण्यासाठी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वामधील (तत्वक्रमांक-१४) मध्ये याची नोंद घेण्यांत यावी. त्याचप्रमाणे या अधिकारातंर्गत प्राधान्याने वाटप होणाऱ्या सेवा निवासस्थान गाळयांचा तपशील/नोंद स्वतंत्ररित्या ठेवण्यांत यावी. प्राधान्याने सेवानिवासस्थान वितरण करतांना नेहमी वेतनश्रेणी व दर्जा प्रमाणे देय असलेल्या क्षेत्रफळाचे निवासस्थानापेक्षा कमी क्षेत्रफळाचे निवासस्थान देण्यात यावे.

बाब क्रमांकः१७९/९

विषयः- आकुर्ली-कांदिवली येथील उज्वल शिक्षण संस्थेस जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत विकसित केलेल्या निवासी वसाहतीच्या अभिन्यासातील प्राथमिक शाळेसाठी व क्रिडांगण आणि दक्षिणेस असलेला मोकळया भूखंडाची आरक्षित असलेली जागा वितरीत करणेबाबत.

<u>ठराव क्रमांकः५७२८</u> **दिनांकः- ११/९/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीत नमूद केलेली परिस्थिती विचारांत घेऊन व शिक्षणाचा हेतू लक्षांत घेऊन, सदर भूखंडासाठी १९९३ सालची किंमत आकारण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच १९९३ ते २००१ या कालावधीसाठी मुद्दल रकमेवर होणारे व्याज रु. १९,६०,९६४/- हे माफ करण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच व्याज माफ केल्यामुळे म्हाडाचे होणारे आर्थिक नुकसान निर्लेखित करण्यास मान्यता देण्यांत येते.

मुद्दल रक्कम भरण्यास सदर संस्थेस चार वर्षाची मुदत देण्यास मान्यता देण्यांत येते. हा भूखंड थेट पध्दतीने वितरण होत असल्याने प्रस्ताव विनियम १६ अंतर्गत शासनाने गठीत केलेल्या समिती समोर सादर करण्यास प्रशासनास अनुमती देण्यांत येते.

बैठकीचे इतिवृत्त स्थायी होण्यापूर्वी प्रशासनास पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१७९/१०.

विषयः- २९ शिवडी मतदार संघातील वरळी येथील बी.डी.डी. चाळीमधील पिण्याच्या पाण्याची टंचाई प्राधिकरणाकडून राबविण्यात येणारी बाह्य पाणीपुरवठा योजना याकरीता रु. १००.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

ठराव क्रमांकः५७२९ **दिनांकः- ११/९/२००१.**

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाच्या निधीतून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास रु. १००.०० लाख अग्रीम म्हणून देण्यास तसेच या निधीवर शासन मान्यतेने व्याज आकारण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. या कर्जाच्या परतफेडी विषयी शासनाबरोबर विचारविनियम करुन निर्णय घेण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१७९/११.

विषयः स्वदेशी मिल, चुनाभट्टी, कुर्ला, सी.टी.एस. क्र.४७७/ड येथील प्रकल्पामध्ये सुधारीत विनिर्देश वापरण्याबाबत.

ठराव क्रमांकः५७३० **दिनांकः-११/९/२००१.**

एकमताने निर्णय घेतला कीं, स्वदेशी मिल, चुनाभट्टी, कुर्ला, सी.टी. एस. क्र. ४७७/ड येथील प्रकल्पामध्ये सुधारीत विनिर्देश वापरण्यास व हयासाठी येणा-या प्रस्तावित खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१७९/१२.

विषयः- मुरुड-जंजिरा, जिल्हा रायगड येथे खाजगी जमिनीवर जमीन मालकांच्या अंशतः सहभागाने गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव.

ठराव क्रमांकः५७३१ **दिनांकः११/९/२००१.**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुरुड जंजिरा, जि. रायगड येथील श्री. डी. एन. चौलकर व कुटुंबिय यांच्या खाजगी मालकीची ३.०० हेक्टर जमीन म्हाडा अधिनियम १९७६ मधील कलम-५२ अंतर्गत वाटाघाटीस मान्यता देण्यात येते. तसेच प्रकल्पासाठी येणारा एकूण अंदाजित खर्च व उत्पन्न याबाबत सविस्तर अभ्यास करुन सविस्तर टिपणी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावी.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः१७९/१३.

विषयः- प्राधिकरणाच्या १९९२ च्या किंमतीविषयी धोरणामध्ये ज्या ठिकाणी स्वेच्छाधिकार आहेत. ते अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यासाठी प्राधिकरणाकडे शिफारस करणेबाबत.

ठराव क्रमांकः५७३२ **दिनांकः-११/९/२००१.**

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने सादर केलेल्या बाब टिप्पणीमध्ये वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचे अभिप्राय नसल्यामुळे त्यांचे अभिप्राय घेऊन बाब टिप्पणी फेर सादर करावी.

मात्र, टिळकनगर आयुर्वेदिक हिलिंग सेंटर यांना शाससनाने विनियम १६ खाली वितरीत केलेल्या भूखंडासाठी बाजारभावाच्या ५५ टक्के रक्कम आकारण्यास मान्यता देण्यांत येते. या प्रकरणी प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी या बैठकीचे इतिवृत्त स्थायी होण्यापूर्वी करण्यास प्रशासनास अनुमती देण्यांत येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ११/१०/२००१ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८० व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक १८०/३

विषय : राज्याच्या साधन संपत्तीत वाढ करणे व प्रशासकीय खर्चात ५ टक्के कपात करणे- म्हाडा कर्मचारीवृंदाची पदसंख्या १५०० वर आणण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५७३३ **दिनांक ११.१०.२००१**

एकमताने निर्णय घेतला कि, राज्याच्या साधन संपत्तीत वाढ करणे व प्रशासकीय खर्चात ५ टक्के कपात करण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या मंजूर कर्मचारीवृंदापैकी दिर्घकाळ रिक्त राहिलेली पदे त्याचप्रमाणे कनिष्ठ लिपिक,तांत्रिक सहाय्यक, शिपाई व सफाई कामगार या सर्वर्गातील वर्ग १ ते ४ थेट नियुक्तीची पदे अशी एकूण १७० पदे रद्द करण्यास मान्यता देण्यात येते. त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक १८०/४

विषय : श्रीस्वामीसमर्थ अन्नछत्र मंडळ,अक्कलकोट,जि.सोलापूर यांचेसाठी म्हाडातर्फे सल्लागार पध्दतीवर गृहनिर्माण योजना राबविणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७३४ **दिनांक ११.१०.२००१**

एकमताने निर्णय घेतला कि, पुणे मंडळाने वरील विषयाबाबत प्राधिकरणापुढे सादर केलेल्या प्रस्तावानुसार, श्रीस्वामीसमर्थ अन्नछत्र मंडळ,अक्कलकोट या संस्थेकरिता राबविण्यात येणा-'या योजनेसाठी पुणे मंडळाने सल्लागार म्हणुन ५ टक्के सेवाशुल्क आकारुन काम करण्यास मान्यता देण्यात येते. पुणे मंडळाच्या प्रस्तावानुसार पुणे मंडळाने सल्लागार म्हणुन पुढीलप्रमाणे कामे करण्यास मान्यता देण्यात येते.

अ) आराखडे तयार करुन श्रीस्वामीसमर्थ अन्नछत्र मंडळ,अक्कलकोट नगरपालिकेची मान्यता घेणे.
ब) तांत्रिक प्रस्ताव तयार करुन तो अर्जदार अन्नछत्र मंडळातर्फे कर्ज मंजूरीसाठी हुडको किंवा नॅशनल हौसिंग बॅक यांना अर्जदार संस्थेने सादर करणे.
क) अर्थसहाय्य मंजूर झाल्यावर निविदाबाबत कार्यवाही करणे व कंत्राटदाराची नेमणूक करणे बाबत संस्थेस सल्ला देणे.
ड) जागेवर प्रत्यक्ष बांधकामावर देखरेख करणे व कंत्राटदाराची देयके तयार करुन संस्थेकडे अदा करणेसाठी पाठविणे.
इ) प्रकल्प पूर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करणे व संस्थेस सादर करणे.
फ) कर्जाची परतफेड संस्था स्वतः करेल त्याबाबत बॅकेची हमी संस्था घेईल.हमी संस्थेला मिळण्यास तांत्रिक कागदपत्रे उपलब्ध करणे. (म्हाडातर्फे कोणतीही आर्थिक गुंतवणूक होणार नाही.)
ग) सदर योजनेसाठी सल्लागार म्हणुन म्हाडाने प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के 'सल्ला शुल्क' पुढील टप्प्यात वसूल करावे, जसे की, संस्थेशी करारनामा करणे, २ टक्के कंत्राटदाराची नेमणूक करणे १ टक्का, उर्वरित शुल्क प्रत्येक बिलाच्या रकमेतून २ टक्के.
घ) प्रकल्पाच्या खर्चात खालील बाबींचा समावेश असेल.

१. प्रत्यक्ष बांधकाम खर्च (निविदा टक्केवारी व विकास खर्चासह)
२. १० टक्के एस्कलेशन
३. ५ टक्के कॉन्टेनजन्सीस

बाब क्रमांक १८०/५

विषय : स.क्र.२७,शहानुरवाडी, औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गट-१,२२ रो हाऊसेस,व उच्च उत्पन्न गट-२,२८ स्वतंत्र बंगले बांधणे- निविदेवर निर्णय घेण्यास्तव टिपणी..

ठराव क्रमांक : ५७३५ दिनांक ११.१०.२००१

एकमताने निर्णय घेतला कि, मे.तनया कंस्ट्रक्शन यांनी दि.११.९.२००१ रोजी दिलेल्या पत्रानुसार बाबटिपणीतील विषयांकीत काम निविदा किंमतीपेक्षा १७.९५ टक्क्यांनी कमी दराने करण्यासाठी त्यांनी तयारी दर्शविली असल्याने प्राधिकरणाच्या ठराव क्र.५७२५,दिनांक ११.९.२००१ ला अनुसरुन प्राधिकरण मे. तनया कंस्ट्रक्शन यांचा निविदा किंमतीपेक्षा १७.९५ टक्क्यांनी कमी असलेला देकार स्विकारीत आहेत. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

बाब क्रमांक १८०/७

विषय : विठ्ठलवाडी झोपडपट्टी फोरजेट स्ट्रीट, ताडदेव येथे संरक्षण भिंत बांधकाम योजनेबाबत..

ठराव क्रमांक : ५७३६ दिनांक ११.१०.२००१

एकमताने निर्णय घेतला कि, विठ्ठलवाडी झोपडपट्टी फोरजेटस्ट्रीट ताडदेव येथे संरक्षण भिंत बांधण्याच्या कामांची तीन भागात विभागणी करुन बेरोजगार अंभियंता मार्फत तातडीने काम हाती घेण्याच्या मंडळाने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८०/८

. **विषय :मुंबईतील व म्हाडाच्या इतर विभागीय मंडळातील सदनिकांच्या विक्री किंमतीच्या थकीत रक्कमेवर आकारण्यात येणा-या व्याजाचा दर कमी करणेबाबत..**

ठराव क्रमांक : ५७३७ दिनांक ११.१०.२००१

एकमताने निर्णय घेतला कि,या पुढे लाभार्थीस गाळे/भूखंडाची विक्री किंमत भरण्यास विहित मुदतीपेक्षा विलंब झाला तर त्या सध्याच्या प्रचलित १६ टक्के व्याजदराऐवजी यापुढे १३.५ टक्के व्याज दर आकारावा. तसेच, काही कारणास्तव मंडळाकडुन गाळे/भूखंडाचा ताबा देण्यास विहित मुदतीपेक्षा उशिर झाला असेल तर व लाभार्थीने गाळा/भूखंडाची पूर्ण रक्कम मंडळाकडे भरली असेल तर, त्या लाभार्थीस १३.५ टक्के दराने व्याज द्यावे.

२/- व्याजदरात सातत्याने बदल होत असल्याने, या ठरावाची अमंलबजावणी, तुर्तास या कार्यालयातील योजनेसाठी ६ महिन्यांसाठी करावी. ५ महिन्यांनंतर बॅक व्याजदराचा फेर आढावा घेऊन प्रशासनाने प्राधिकरणाच्या ६ महिन्यांनंतर होणा-या बैठकीत याबाबतची बाब टिपणी फेर सादर करावी.

३/- लाभार्थीस सध्याय आकारण्यांत येत असलेल्या डिलेड पेमेंट चार्जेस (विलंबनात प्रदान आकार) व्याजदर मासिक २ टक्के प्रमाणे आकारावा.

४/- अनिवासी वापराच्या व्याजासाठी सध्याच्या २१ टक्के व्याज दराच्या आकारणी ऐवजी,राष्ट्रीयकृत बॅका अनिवासी कारणासाठी ज्या दराने व्याज आकारतात, त्याची सरासरी काढून जो सरासरी दर लाभार्थीस आकारावा. तसेच अशा निवासी गाळयांचा ताबा लाभार्थीस देण्यास मंडळाकडुन उशिर झाला तर, त्यालाही अशाप्रकारच्या अनिवासी गाळयांच्या अशा येणा-या सरासरी दराने परतावा करावा.

५/- या बैठकीचे कार्यवृत्तांत पुढील बैठकीत स्थायी होण्याची वाट न पाहता याप्रमाणे कार्यवाही करण्यास प्रशासनाची अनुमती देण्यांत येते.

बाब क्रमांक : १८०/९

विषय : विभागीय मंडळात महत्वाची पत्रे हस्तपोच देण्याकरिता कुरियर सव्हिसची नेमणूक करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७३८ दिनांक ११.१०.२००१

एकमताने निर्णय घेतला कि, प्राधिकरणाच्या तसेच विभागीय मंडळाच्या महत्वाच्या पत्रव्यवहारासाठी प्रथितयश कुरीयर सव्हिसेसशी रितसर करार करुन अशी पत्रे संबंधितांना हस्तपोच पाठविण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

या मंजूरी नुसार प्रशासनाने प्रस्ताव तयार करुन शासनाकडे विनियमात बदल करुन मिळण्यासाठी सादर करावा आणि विनियमात बदल झाल्यानंतरच या निर्णयाची अंमलबजावणी करावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांच्या स्थायी करणाची वाट न पहाता मान्य करण्यात येते.

बाब क्रमांक : १८०/१०

विषय : विधानसभा सदस्यांच्या नियोजित महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था, मुंबई यांना महालक्ष्मी मॉर्डन मिल कंपाऊंड येथे टाईप-२ च्या २१ सभासदांना ४२ सदनिका वितरीत करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७३९ **दिनांक ११.१०.२००१**

एकमताने निर्णय घेतला कि, बाब टिपणीत प्रशासनाने सुचविल्या नुसार मा. आमदारांना या सदनिका वितरण करण्यास अनुमती मिळण्यासाठी सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करावा. तसेच ब्रीज कँण्डी हॉस्पिटल ट्रस्ट यांचे बाबतीतही सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अमंलबजावणी स्थायी करणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक १८०/११

विषय : रहिवाशी सदनिकांमध्ये अनिवासी वापर करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी आकारावयाचे वापर-बदल शुल्क निश्चित करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७४० **दिनांक ११.१०.२००१**

एकमताने निर्णय घेतला कि, बाब टिपणीत प्रशासनाने सुचविल्यानुसार फक्त मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील निव्वळ रहिवाशी क्षेत्रात (आर-१,झोन) सदनिकांच्या भूखंड वापरात बदल करावयाचा असल्यास, वापर बदल शुल्क चटई क्षेत्रफळावर ७५० प्रति चौ.मी.आकारावे व ओळीने असलेल्या दुकानांची रहिवाशी क्षेत्रातील (आर-२ झोन) मधील सदनिका/भूखंडातील वापर बदलासाठी प्राधिकरणाने ठराव क्र. ५५५३ दि.२७.३.२००० अन्वये १५० चौ.मी. क्षेत्रफळापर्यत रु.१०००/- प्रति चौ.मी.एवढे वापरबदल शुल्क आकारावे.

२/- याबाबत वृत्तपत्रात जाहिरात देऊन ही माहिती जनमानसात जाईल व येणा-या धोरणाबाबत अर्जदारास ८दिवसांत कळविली जाईल, याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. ज्या ठिकाणी लाभार्थींच्या सहकारी संस्था स्थापन होऊन त्या पंजीकृत झाल्या आहेत अश्या ठिकाणी सदर संस्थेचे वापर बदलासाठी ना हरकत पत्र अर्जदाराने मिळवून नंतर मंडळाकडे त्यांने अर्ज करणे बंधनकारक राहिल असा अर्ज सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे केल्यावर सदरहू, सहकारी संस्थेने ३० दिवसांच्या आत ना हरकत पत्र लाभार्थीस निर्गमीत करणे आवश्यक आहे. अन्यथा योग्य व सबळ कारणासह सहकारी संस्थेने मंडळास विहित मुदतीत कळविले नाही तर मंडळाकडुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. हे देण्यांत येणा-या जाहिरातीत व मंडळातर्फे देण्यात येणा-या वापर बदलाच्या पत्रात स्पष्ट करावे.

३/- मंडळाच्या ज्या योजनांमध्ये गाळयांच्या किंमतीत सबसिडी दिली असेल (मंडळास येणा-या प्रत्यक्ष खर्चापेक्षा जर विक्री किंमत कमी आकारली असेल) तर वापर बदल शुल्काबरोबर सबसिडीची रक्कम लाभार्थीकडुन वसूल करावी.

सदर ठरावाची अमंलबजावणी स्थायी करणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः१८०/१२

विषयः- पवई येथील उच्च उत्पन्न गटातंर्गत बांधलेल्या सदनिकांची विक्री शासकीय/निमशासकीय उपक्रमे व खाजगी मर्यादित संस्थांच्या कर्मचाऱ्यांना २० वर्षाच्या भाडेखरेदी तत्वावर करणेबाबत.

ठराव क्रमांकः ५७४१ **दिनांकः ११/१०/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, पवई महाप्रकल्पांतील उच्च उत्पन्न गट सदनिकांची विक्री शासकीय/निमशासकीय/खाजगी/सार्वजनिक मर्यादित संस्था आदिंच्या कर्मचाऱ्यांना, त्या संस्था भाडे आकारावयाचा हप्ता कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कापून घेऊन म्हाडास भरण्यास तयार असतील तर, अशाच संस्थेतून कर्मचाऱ्यांना, कमाल २० वर्षाच्या भाडेखरेदी तत्वावर विकण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

मात्र, बाब टिप्पणीत सुचविल्यानुसार अशा लाभधारकांकडून गाळयांच्या विक्री किंमतीच्या २५ टक्के सुरुवातीस भरावयाच्या रकमेऐवजी ४० टक्के रक्कम सुरुवातीस घेण्यांत यावी.

बाब क्रमांकः१८०/१३

विषयः- मालवणी, सायन, मानखुर्द व पवई येथील सदनिकां विकत घेणाऱ्या गिऱ्हाईकांना प्रोत्साहनपर सवलत देणेबाबत.

ठराव क्रमांकः ५७४२ **दिनांकः ११/१०/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, मालवणी, सायन,मानखुर्द व पवई येथील सदनिकां विकत घेणाऱ्या अर्जदारांना विक्रीदरात खालीलप्रमाणे सवलत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. ज्या व्यक्ती/संस्था या म्हाडाकडुन देकारपत्र प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आंत संपूर्ण पैसे भरतील, त्यांना विक्री किंमतीत ७.५ टक्के सवलत देणे.

व

२. ज्या व्यक्ती/संस्था यांना म्हाडाकडून देकारपत्र प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांचे आंत संपूर्ण पैसे भरतील, त्यांना विक्री किंमतीत ५ टक्के सूट देणे.

सदर निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता ठरावाच्या दिनांकापासून अंमलबजावणी करण्यास प्रशासनास अनुमती देण्यांत येते.

बाब क्रमांकः१८०/१५-१६

विषयः- श्री. डी. आय. मिरकर, उपअभियंता आणि श्री. एस. एस. साधवानी, कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द करण्यात आलेली विभागीय चौकशी- अंतिम आदेशाविरुध्द.

ठराव क्रमांकः- ५७४३ **दिनांकः- ११.१०.२००१**

एकमताने निर्णय घेतला कि,सर्वश्री डी. आय. मिरकर,उपअभियंता व एस. एस. साधवानी, कार्यकारी अभियंता यांना देण्यांत आलेली बडतर्फीची शिक्षा रद्द करावी व त्यांना सेवत ते बडतर्फीच्या दिवशी ज्या पदावर कार्यरत होते त्या पदावर त्यांना पुर्नस्थापीत करावे.मात्र त्यांचे वेतन समयश्रेणीतील सुरुवातीच्या टप्प्यावर दोन वर्षाच्या कालावधीकरीता पुढील वेतनवाढीवर होणा-या परिणामासह आणावे. या कालावधीत त्या दोघांना वेतनवाढ देण्यात येऊ नये. तसेच, वरील दोन वर्षाच्या कालावधीत त्यांनी रजा घेतल्यास तो कालावधी वगळण्यात यावा.

बडतर्फीचा कालावधी नियमित करण्यासाठी व इतर आवश्यक बाबींसाठी अस्तित्वांत असलेल्या नियमाप्रमाणे निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांत येत आहेत.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः-१८०/१७

विषयः- राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास सन २००१-२००२ या वर्षाकरीता शासनाकडून अर्थसंकल्पित निधी उपलब्ध होईपर्यत २४.९९ कोटी रु. म्हाडाकडून उपलब्ध करुन देण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५७४४ **दिनांकः- ११/१०/२००१**

एकमताने निर्णय घेतला कीं, राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रमासाठी शासनाकडून मंजूर अनुदानाची रक्कम प्राधिकरणास प्राप्त होण्यास विलंब होत असल्याने शासनाकडून जमा अपेक्षित असलेल्या रकमेपैकी रु. २४.९९ कोटी रक्कम मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास प्राधिकरणाच्या निधीतून देण्यांत यावे. तथापि, सदर रक्कम तात्पुरती (ब्रिजींग फायनान्स) समजून त्यावर द.सा.द.शे. १० टक्के व्याज आकारुन शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानतून मूळ रक्कम व त्यावरील व्याज परस्पर वळते करुन घेण्यांत यावे असे शासनाकडून सुस्पष्ट आश्वासन मिळाल्यावरच मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास निधी वितरीत करण्यांत यावा. तसेच निधी वितरीत करण्यापूर्वी शासनाने म्हाडास उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये मूळ रक्कम व व्याजाचा स्पष्ट उल्लेख करण्याची परवानगी द्यावी असा निर्णय घेण्यांत आला आहे.

बाब क्रमांकः१८०/१८

विषयः- मॉडर्न मिल व मातुल्य मिल येथील प्राधिकरणातर्फे राबविण्यांत येणाऱ्या योजनातील उर्वरीत ५० टक्के गाळयांच्या विक्रीकरीता विक्रीदर ठरविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७४५ **दिनांक ११.१०.२००१**

एकमताने निर्णय घेतला कि, शासनाने ज्या समित्या नेमलेल्या आहेत त्यांच्या कामाचा फायदा प्राधिकरणास होत नसेल अशा समितीच्या कामकाजासाठी व त्यांना सोई सुविधा पूरविण्यासाठी केलेला खर्च शासनाकडुन जो पर्यत परत म्हाडास मिळत नाही तो पर्यत प्राधिकरणाच्या कार्यालयाकडुन यापूढे कोणताही खर्च करण्यात येवू नये. त्यांना प्राधिकरणाकडुन दिलेल्या इतर सुविधा ताबडतोब बंद करण्यात याव्यात. सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १.११.२००१ पासून करण्यात यावी. शासनाच्या ज्या कार्यक्रमाशी म्हाडाचा कोणत्याही प्रकारचा संबध नाही अशा कार्यक्रमासाठी देखील जो म्हाडा आता खर्च करीत आहे तो बंद करण्यात यावा. तसे शासनास कळविण्यात यावे.

सदर ठरावाची अमंलबजावणी स्थायी करणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

यानंतर अध्यक्ष/प्राधिकरण यांनी प्राधिकरणास अशी माहिती दिली कि, म्हाडाच्या अध्यक्षांच्या सुविधा कमी करण्यात येतात.सदस्यांना सुविधा देण्यात येत नाही. मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशावरही गृहनिर्माण विभागाकडुन अध्यक्षांना देण्यात यावयाच्या सोयी कमी करण्यात आलेल्या आहेत. मा.मुख्यमंत्री महोदयांनी आदेश देऊनही आणि प्राधिकरणाच्या कार्यालयाकडुन तसे शासनास कळवून देखील शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडुन त्यांची दखल न घेता सोयी-सवलती कमी करण्याबाबत जे आदेश देण्यात आलेले आहेत त्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

अध्यक्ष/प्रा. यांनी पूढे अशी सूचना केली कि, प्राधिकरणाच्या अध्यक्षांना यापूर्वी ज्या सोयी-सवलती तसेच प्रादेशिक मंडळाच्या सभापतीना ज्या सोयी देण्यात येत होत्या त्या पूर्वीप्रमाणेच पुरविण्यात याव्यात तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयाकडुन दिलेले निर्देशांचा पाठपुरावा करण्यात यावा. ज्या सभापतीना राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेला आहे त्यांना देखील त्यांना देय असलेल्या सुविधा देण्यात याव्यात. यासाठी प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांची अथवा सचिव/प्राधिकरण यांचे आदेशाची आवश्यकता लागू राहणार नाही.

चर्चेच्या ओघाने आलेल्या या विषयावर प्राधिकरणाने ,

ठराव क्रमांक : ५७४६ दिनांक ११.१०.२००१

एकमताने निर्णय घेतला कि,प्राधिकरणाच्या विद्यमान्य अध्यक्षांना यापूर्वी ज्या सोयी-सवलती तसेच प्रादेशिक मंडळाच्या सभापतीना ज्या सोयी-सवलती देण्यात येत होत्या त्या पूर्वी प्रमाणेच पूरविण्यात याव्यात तसेच मा. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडुन दिलेल्या निर्देशांप्रमाणे सर्व सोयी सवलती देण्यात याव्यात त्यावर कोणतेही बंधन ठेवू नये.सभापतीना राज्यमंत्र्याचा दर्जा देण्यात आलेला आहे त्यांना देखील त्यांना देय असलेल्या सर्व सोयी-सवलती पूरविण्यात याव्यात.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येते.

यानंतर मा.अध्यक्ष/प्रा.यांच्या अनुमतीने टी.डी.आर. या विषयावर चर्चा सुरु करतांना ,
सभापती/मुंबई मंडळ म्हणाले कीं, हल्ली रोज वर्तमानपत्रातून म्हाडाबद्दल ज्या बातम्या येत आहेत, त्यामुळे म्हाडाची प्रतिमा डागाळली जात आहे. म्हाडाचे जवळजवळ ८ ते ९ कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे असे विधान करुन त्याचा सर्वस्वी आरोप म्हाडाचे उपाध्यक्ष व मु.का.अ. श्री. उत्तम खोब्रागडे यांच्यावर ठेवला आहे. वर्तमानपत्रात आलेली

बातमी आणि खरी वस्तुस्थिती यामध्ये बरीच तफावत आहे. परंतु, गृहनिर्माण विभागाचे सल्लागार आणि कांही उच्च पदस्थ अधिकारी अशाप्रकारच्या बातम्या देऊन जनतेची दिशाभूल करीत आहेत, आणि पर्यायाने म्हाडाची छबी खराब होत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे कीं, उलटपक्षी या निर्णयामुळे म्हाडाचा जवळजवळ ५० लाख रुपयाचा फायदाच झालेला असून त्याबद्दल अध्यक्ष/प्रा., उपाध्यक्ष/प्रा. व म्हाडाचे अधिकारी यांचे अभिनंदनच करावयास पाहिजे. गेल्या दीड महिन्यापासून चालू असलेल्या प्रक्रियेप्रमाणे म्हाडाचा स्लमचा कमी होणारा टीडीआर की, ज्याच्यापासून म्हाडाला एक रुपयाचाही फायदा झाला नसता. असा टीडीआर रु. ५० लाखांच्या मोबदल्यात खरेदी करण्यास मे. रोमेल रियल इस्टेट प्रा.लि. या नांवाची एक कंपनी या बदलामध्ये आपला रोड टी.डी.आर. द्यावयास पुढे आली. हा निर्णय सदरहू कंपनीस दोन दिवसांच्या आंत कळवावयाचा असल्यामुळे सदरहू कंपनी बरोबर म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी वाटाघाटी करुन हा निर्णय घेण्यांत आला व मुंबई मंडळाच्या बैठकीमध्ये या निर्णयास कार्योत्तर मंजुरीही घेण्यांत आली. वास्तविकतः टीडीआर अदलाबदलीचा निर्णय म्हाडाने वेळीच घेतल्यामुळे म्हाडाचा जवळजवळ रु. ५० लाखांचा फायदा झाला असतांना खरी वस्तुस्थिती जाणून न घेता वर्तमानपत्रातून उलटसुलट बातम्या देऊन म्हाडाची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. या निर्णयाला शासनाने स्थगिती देऊन चौकशी करण्याचे आदेश दिल्याचे ऐकिवात आहे. ते पुढे म्हणाले कीं, सदरहू कंपनीला हा निर्णय दोन दिवसांत कळवावयाचा असल्यामुळे टेंडर न मागवितां केवळ म्हाडाच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय केल्यानंतरच हा निर्णय घेण्यांत आलेला आहे. अन्यथा, म्हाडाच्या कमी होणाऱ्या टीडीआरमुळे म्हाडाचा एक रुपयाचाही फायदा झाला नसता. अशाप्रकारचा तातडीचा निर्णय प्रधान सचिव/गृहनिर्माण यांचे उपस्थितीमध्ये प्राधिकरणाने मालाड,मालवणी येथील वाणिज्यीक केंद्राचे काम मे.बी.जी.शिर्के कंपनी यांना निविदा न मागविता देण्याबाबत घेण्यात आला होता. याचेही स्मरण त्यांनी यावेळी सभागृहास करुन दिले. याबाबतीत त्यांनी सभागृहास अशी विनंती केली कीं, याबाबतची एक रितसर जाहिरात वर्तमानपत्रांत देण्यांत यावी. जेणेकरुन खरी परिस्थिती जनतेसमोर येईल.

याबाबत शासनाला चौकशी करावयाची असेल तर करु द्यावी परंतु, या टीडीआरची जाहिरात वर्तमानापत्रात देण्यास हरकत नसावी. असे मत यावेळी श्री. बिनसाळे, सदस्य/प्रा. यांनी व्यक्त केले.

प्रस्तावित टीडीआरची शिफारस आपल्याकडूनच झाली होती असे म्हणतांना अध्यक्ष/प्रा. याबाबतीत म्हणाले कीं, जर प्राधिकरणाचा फायदा होत असेल तर असा टीडीआर घेण्यास हरकत नसावी. असा शेरा त्यांनी प्रस्तुत प्रकरणांवर दिला होता. मुंबई मंडळाच्या या निर्णयामुळे प्राधिकरणाचा ५० लाख रुपयांचा फायदा झाला आहे. म्हाडाचा असा फायदा झालेला असताना गृहनिर्माण विभागाचे सल्लागार म्हाडाच्या फाईली मागवून

वर्तमानपत्रांतून बातम्या देतात हे योग्य नाही. हे सल्लागार म्हाडाचे हित साधण्याकरीता नेमले असून अहित साधण्याकरीता नव्हे.

याबाबतीत उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडे निर्देश करुन ते म्हणाले कि, म्हाडाच्या फाईली गृहनिर्माण विभागाच्या सल्लागारापर्यत पोहोचल्या कशा, याबाबत चौकशी करण्यांत यावी असे पत्र मुख्य सचिवांना पाठविण्यांत यावे. ते पुढे असे म्हणाले कीं, वर्तमानापत्रांतून जाहिरात देऊन एम वॉर्डच्या आंत जर कोणी रु. २५०/- ने टी.डी.आर.देण्यास तयार आहे कां, हे आजमाविण्यांत यावे, आणि याकरीता जर कोणी पुढे आले नाही तर म्हाडाची प्रतिमा डागाळण्याविरुध्द कोर्टात केस दाखल करण्यांत यावी. याकरीता वर्तमानपत्रातून जाहिरात देण्याच्या बाबीस मान्यता देण्यांत यावी.

तसेच,सभापती/मुंबई मंडळ व उपाध्यक्ष/प्रा.यांनी या प्रकरणी वेळेवर योग्य ते पाऊल उचलल्यामुळे म्हाडाचा आर्थिक फायदा झालेला आहे.सदर कामगिरीबाबत प्राधिकरणाच्या उपस्थित सदस्यांनी आणि सभापतीनी त्यांचे अभिनंदन केले.

सभापती/मुंबई मंडळ यांनी मांडलेल्या चर्चेतील विषयावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने,

ठराव क्रमांक : ५७४७ दिनांक : ११.१०.२००१

कुर्ला चुनाभट्टी येथील प्राधिकरणाच्या कामावर म्हाडाकडे उपलब्ध असलेला स्लम टि.डी.आर.ची वजावट करुन उपरोक्त कामाचे नकाशे मंजूर करण्यासाठी महानगरपालिकेकडे प्रकरण अंतिम प्रक्रियेत असताना सदर प्रक्रिया थांबवून त्या ऐवजी मे.रोमेल रियल इस्टेट प्रा.लि.यांनी देऊ केलेला रोड टि.डी.आर.रुपये २६.५ लक्ष प्रति १०,००० चौ.मी.च्या मोबदल्यात अदलाबदल करण्याच्या कार्यवाहीस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सध्याच्या वर्तमानपत्रातील बातम्यामध्ये तथ्य शोधून काढण्यासाठी रु.२५०/- प्रति चौ.मि. शहर किंवा एम्.वार्ड मधील २०,००० चौमी.चा टि.डी.आर.विकत घेण्यासाठी जाहिरात देण्याचे प्राधिकरण निर्देश देत आहे. तसेच शासनाने वरील प्रक्रियेवर दिलेल्या स्थगितीमुळे म्हाडाच्या सुरु असलेल्या स्वदेशी मिल व गोरेगांव येथील योजनांच्या प्रगतीला बाधा होऊ नये.यासाठी सदर योजनांमध्ये म्हाडाचा मानखुर्द योजनेमधून प्राप्त झालेला स्लम टि.डी.आर.वापरण्यासाठी मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक १८०/१९

विषय : महाराष्ट्र राज्य पोलीस कर्मचारी गृहनिर्माण संस्था (नि.)
यांना पोईसर कांदिवली येथे सुमारे २.७२ हेक्टर
जमिनीच्या दराबाबत मा.उपाध्यक्ष/प्रा.यांनी घेतलेल्या
निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्र.५७४८ **दिनांक ११.१०.२००१**

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण संस्था पोईसर येथील २.७२ हेक्टर जमिनीच्या अधिमुल्याच्या दराबाबत प्राधिकरणाचा ठराव क्र.४०७९, दिनांक २.६.१९९३ अन्वये, जमिनीच्या अधिमुल्याचा दर रुपये १६५०/- प्रति चौ.मी. (एकंदर जमिनीसाठी व वार्षिक १.५ प्रतिशत दराने भाडेपट्टयाच्या भांडवलीकरणासहीत) आकारण्याचा जो निर्णय घेतला त्याऐवजी त्यावेळच्या मा.उपाध्यक्ष/प्रा.यांनी पोलीस संस्थेला जमिनीच्या अधिमूल्याचा दर वार्षिक भुईभाडयाचे भांडवलीकरण न करता रु.१३९०/- प्रति चौ.मी. व त्यावर दरवर्षी १.५ टक्के भुईभाडे पोलिस सहकारी गृहनिर्माण संस्थेने म्हाडाला भरण्याचा जो निर्णय घेतला आहे त्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

तसेच, यापुढेही इतर संस्थांना ज्याप्रकारे दोन्ही विकल्पानुसार देकार देण्यात येतात (जमिनीचे अधिमूल्य वार्षिक भुईभाडयाचे भाडंवलीकरणासहीत किंवा जमीनीचे अधिमूल्य वार्षिक भुईभाडयाचे भांडवलीकरण न करता वार्षिक भुईभाडे ठरविलेल्या दराने भरण्याच्या अटीवर) असेच पर्याय देण्याचे मान्य करण्यात आले. सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २९/०१/०२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८१ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांकः१८१/४

विषयः- कंत्राटदारांच्या नोंदणीचे सुधारीत नियमात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सवलती. पंजीकरणाचे नुतनीकरण करण्याबाबत.

ठराव क्रमांकः५७४९ **दिनांकः- २९/०१/०२**

एकमताने निर्णय घेतला कीं, सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सवलतीबाबतचे सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय क्र. सीएटी १०९७/प्र.क्र.४२/इमारती-२, दि. २३/१/२००१ प्राधिकरणात लागू करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१८१/७.

विषयः- ओशिवरा-जोगेश्वरी येथील युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया यांना वितरीत केलेल्या १०५०३ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वितरण रद्द करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७५० **दिनांक : २९/१/२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाला ओशिवरा-जोगेश्वरी येथे वितरीत केलेल्या भूखंडाचे वितरण रद्द करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येते. मात्र मुख्यअधिकारी/मुंबई मंडळ यांनी त्यांचे स्तरावर या प्रकरणात स्वयंस्पष्ट आदेश प्रथम जारी करुन ते ट्रस्टला पाठविण्यात यावेत.

बाब क्रमांकः १८१/८

विषयः- मालवणी, मालाड (प.) येथील गृहनिर्माण योजनेस टेलिफोन केबल टाकण्यासाठी परवानगी देणेबाबत.

ठराव क्रमांकः५७५१ **दिनांकः- २९/०१/०२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

म्हाडा अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध विभागीय मंडळांना यापुढे त्यांच्या जमिनीमधून टाकल्या जाणा-या अत्यावश्यक नागरी सुविधा जसे की, पाणी पुरवठा, विद्यूत पुरवठा, गॅस मलनिःसारण, दूरध्वनीसाठी ना-हरकत पत्र संबंधित संस्थांना रु. १/- प्रतिवर्षी नाममात्र भाडे आकारुन मुख्यअधिकारी यांचे स्तरावर निर्गमित करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः१८१/१०

विषयः- कुर्ला (प.) सी.टी.एस.क्र.४९० मधील ६७८.५० चौ.मी. भूखंडाच्या भाडेपट्टा करारनाम्याचे नुतनीकरण.

ठराव क्रमांक : ५७५२ **दिनांक : २९/१/२००१**

एकमताने निर्णय घेतला की,

भूखंडाच्या भाडेपट्टयाचे करारनामे नुतनीकरण करण्याबाबत सर्व संबंधित विभागीय मंडळांकडून ठरावाद्वारे त्यांचे मत घेण्यात यावे. तसेच शासनाकडूनही निश्चित मत घेण्यात यावे व त्यानंतरच सदर बाब प्राधिकरणापुढे निर्णयासाठी फेरसादर करावी.

बाब क्रमांकः१८१/११

विषयः- भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्पातंर्गत विकसित व वितरीत केलेल्या भूखंडाचे भाडेपट्टा अधिकार हस्तांतरणाच्या परवानगीबाबत.

<u>ठराव क्रमांकः५७५३</u> **दिनांकः- २९/०१/०२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाच्या ठराव क्र.५६९८, दिनांक २८/५/२००१ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रशासनाने जागतिक बँक प्रकल्पांतर्गतच्या भूखंड हस्तांतरणाबाबत दिनांक १०/१०/२००१ पर्यंतच्या मुदतवाढीच्या केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

हस्तांतरणीय नियमितीकरण तसेच वापर बदल यासाठी या प्रकल्पातुन मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे हे लक्षात घेऊन अशीच एक जाहिरात पुन्हा वृत्तपत्रात दिनांक १० फेब्रुवारी, २००२ नंतर जाहिरात देण्यात यावी. त्यात नमूद करावे की, जाहिरात दिलेल्या तारखेपासून पुढे तीन महिन्यांपर्यंत हे भूखंड हस्तांतरण किंवा वापर बदल नियमित करुन घेण्यासाठी इच्छुकांनी मंडळाकडे अर्ज केल्यास त्यांना यासाठी मूळ जाहिरातीत दिलेली रक्कम आकारण्यात येईल. तीन महिन्यांपासून सहा महिन्यांपर्यंत अर्ज करणा-यास २५ टक्के दंडात्मक रक्कम आकारुन त्याचे नियमितीकरण करण्यात येईल. सहा महिन्यांपासून पुढील तीन महिन्यांपर्यंत ५० टक्के दंडात्मक रक्कम आकारुन नियमितीकरण करण्यात येईल व जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून नऊ महिन्यांनंतर मात्र कोणत्याही प्रकारची सवलत अनुज्ञेय राहाणार नाही. हस्तांतरण व वापर बदलासाठी लाभार्थींना १०० टक्के दंडात्मक रक्कम मंडळाकडे भरल्याशिवाय त्यांचे नियमितीकरण करण्यात येऊ नये.

बाब क्रमांकः१८१/१२

विषयः- मासिक आकाराच्या वसुलीबाबत.

ठराव क्रमांकः५७५४ **दिनांकः-२९/०२/०२**

एकमताने निर्णय घेतला की,

बाब टिपणीत सूचविल्यानुसार मंडळातील सदनिका, दुकानी गाळे तसेच भूखंडाचे वितरण करतांना ज्या तारखेस लाभार्थीला वितरणाबाबत देकारपत्र देण्यात येईल त्या तारखेपासून मासिक आकाराची वसूली करण्यात यावी. त्या मागील महिन्यांची जर काही थकबाकी असेल तर ती सदनिका/भूखंडाच्या विक्री किंमतीमधील (अनफोरसिन लायबिलिटी, ॲन्टीसिपेटेड लायबिलिटी किंवा नफा किंवा स्थान महत्व अधिक्य) इत्यादी कुशन मधून मंडळाने अदा करावे व त्याचा भार लाभार्थींवर टाकू नये.

सदर निर्णय प्राधिकरणाच्या प्रादेशिक मंडळांनाही लागू करण्यात यावा यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

बाब क्रमांकः१८१/१३

विषयः- राजीव गांधी निवारा प्रकल्प सर्व्हे क्र. १३८ मानखुर्द येथील १८१ पैकी १६५ सदनिकांच्या व ९ दुकानी गाळयांच्या किंमती कमी करणेबाबत.

ठराव क्रमांकः५७५५ **दिनांकः- २९/०२/०२**

एकमताने निर्णय घेतला की,

राजीव गांधी निवारा प्रकल्पातर्फे मानखुर्द येथे बांधलेल्या १८१ निवासी व ९ अनिवासी इमारतीतील उर्वरित निवासी सदनिकांसाठी विक्री दर रु. ११००/- प्रति चौरस फूट ठेवावा. तसेच या इमारतीतील ९ अनिवासी सदनिका (दुकाने) यांचा हातचा दर (अपसेट रेट) रुपये २५००/- प्रति चौरस फूट ठेवावा व जाहिरात द्यावी.

याच जमिनीवर एस.आर.डी. प्रकल्पांतर्गत बांधलेल्या तळ अधिक ७ बहुमजली इमारतीतील विक्रीच्या सदनिकांसाठी प्राधिकरणाने ठराव क्रमांक ५५४७, दिनांक ७/३/२००० अन्वये अनुज्ञेय विक्री दर रुपये १३५०/- प्रति चौरस फूट मान्य केला होता. तथापि या विक्री दरास प्रतिसाद येत नाही, असे लक्षात आल्यामुळे व याच जमिनीवरील एका प्रकल्पासाठी आता परिच्छेद-१ मध्ये म्हटल्यानुसार विक्री दर रुपये ११००/- प्रति

चौरस फूट ठेवण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतल्यामुळे तळ अधिक ७ मजल्याच्या बहुमजली इमारतीतील ज्या सदनिका विक्रीसाठी आता उपलब्ध आहेत व विकल्या गेलेल्या नाही, त्यासाठी विक्री दर रुपये १२५०/- प्रति चौ. फू. ठेवावा. तसेच या इमारतीमधील तळ मजल्यावर असलेल्या दुकानी गाळयांसाठी हातचा दर (अपसेट रेट) रुपये २५००/- प्रति चौरस फूट ठेवून दुकानी गाळयांची जाहिरात द्यावी.

वर परिच्छेद-१ मध्ये नमूद केल्यानुसार व प्रशासनास बाब टिपणीत प्रस्तावित केल्यानुसार राजीव गांधी निवारा प्रकल्पातील निवासी सदनिकांच्या विक्रीमध्ये विक्री दरात घट प्राधिकरणाने मंजूर केल्यामुळे मंडळास होणारे एकूण नुकसान रुपनये १,४७,६८,५२४/- (रुपये एक कोटी सत्तेचाळीस लाख अडुसष्ट हजार पाचशे चोवीस) हे निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच एस.आर.डी. प्रकल्पांतर्गत बांधलेल्या बहुमजली तळ अधिक ७४ मजली इमारतीतील सदनिकांचा विक्री दरही रुपये १३५०/- प्रति चौ.फूट वरुन रुपये १२५०/- प्रति चौ.फू. असा कमी केल्यामुळे प्राधिकरणास जे नुकसान होईल, ते निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८१/१४

विषय : मुरुड जंजीरा, जिल्हा-रायगड येथे खाजगी जमीनीवर जमीन मालकाच्या अंशतः सहभागाने गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्याचा प्रस्ताव.

<u>ठराव क्रमांक : ५७५६</u> **दिनांक : २९/१/२००१.**

एकमताने निर्णय घेतला की,

१. श्री. डी.एन्.चौलकर यांची मुरुड-जंजीरा येथील स.क्र.२१९, २३०,२३२,२३३,२३४, २३५, २३६, २३७, २५५ पैकी ३.०० हेक्टर जमिनीवर प्रस्तावित केल्याप्रमाणे जमिन मालकांच्या अंशतः सहभागाने गृहनिर्माण योजना राबविण्यास प्राधिकरण मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त जमिनीचे म्हाड अधिनियम कलम-५२ अन्वये वाटाघाटीद्वारे संपादन करण्यास व जमिनीची किंमत ही या प्रयोजनार्थ शासनाने नियुक्त केलेल्या समितीने निश्चित केलेला दर रुपये १६,०००/- प्रति आर दरास प्राधिकरण मान्यता देत आहे.

३. जमिनीच्या किंमतीमध्ये योजनेचे अभिन्यास तयार केल्यानंतर पुरविण्यात यावयाच्या अंतर्गत सुविधा जसे अंतर्गत रस्ते, पावसाळी गटारे, पथदीप तसेच बाहय सुविधा जसे रस्ते, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा इत्यादीकरीता ३.०० हेक्टर जमिनीकरीता समप्रमाणात लागणा-या अंदाजित खर्चाची रक्कम जिल्हा दरसूची (डी.एस.आर.) वर आधारीत प्रत्यक्ष प्रस्तावित सुविधा मानकानुसार काढून व त्यास मुख्यअभियंता-१/प्राधिकरण यांची मंजूरी घेऊन त्यानंतर श्री.चौलकर यांना प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार अदा करण्याची मंजूरी देत आहे. अशा प्रकारे मूळ जमिनीची किंमत अधिक त्याकरिता पुरविण्यात येणा-या बाहय व अंतर्गत सुविधांकरिता येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

४. जमिन मालकांस अदा करावयाची किंमत बाब टिपणीत परिशिष्ट-५ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार टप्प्याटप्प्याने एकूण सहा टप्प्यात देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. श्री. डी.एन्. चौलकर यांना रु. एक कोटी कर्ज वित्त नियंत्रक/प्राधिकरण हयांनी प्रस्तावित केल्यानुसार १३.५ टक्के व्याज आकारुन देण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तथापि, या कर्जापैकी प्रथम रु. ५०लाख अदा करावेत व तद्नंतर रुपये २५ लाखापर्यंतचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रु. २५ लाखाची रक्कम अदा करण्यात यावी व त्याप्रमाणे पुढील रक्कम यानुसार टप्प्याटप्प्याने अदा करण्यात यावी. हया कर्जापोटी श्री. चौलकर यांची वरील ३.०० हेक्टर व्यतिरिक्त ६.०० हेक्टर जमीन म्हाडाकडे गहाण ठेवण्यात यावी.

बाब क्रमांक : १८१/१५.

विषय : खातरोड, भंडारा येथे १०० आणि बुटीबोरी, नागपूर येथै १०७ अल्प उत्पन्न गटाच्या बांधकामासाठी बोलाविलेल्या निविदेवर नागपूर मंडळाने ना मंजूरीबाबत घेतलेला निर्णय प्राधिकरणाच्या पुढील निर्णयार्थ प्रस्ताव सादर.

ठराव क्रमांक : ५७५७ **दिनांक : २९/१/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

खातरोड, भंडारा येथे १०० व बुटीबोरी, नागपूर येथे १०७ अल्प उत्पन्न गटाच्या बांधकामासाठी मागविलेल्या निविदा संबंधी मे. जे.ए.असरानी यांनी निविदेमध्ये दिलेल्या अटी प्राधिकरणाला स्विकारणे योग्य न वाटल्यामुळे आणि हे काम करण्यास त्यांनी असमर्थता दर्शविल्यामुळे मे. जे.ए.असरानी, ठेकेदार यांच्या दोन्ही निविदा फेटाळण्यात येत असून या कामासाठी फेर निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नागपूर मंडळाने दिनांक २/११/२००१ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक १००२ व १००३ मध्ये निविदा बोलाविण्याचे व उघडण्याचे अधिकार मंडळास असावेत, असा जो निर्णय घेतला आहे त्याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, नागपूर मंडळाने उपस्थित केलेला मुद्दा कार्यपध्दतीशी धरुन नसल्याने कामकाजाबाबतचे अधिकार मंडळास देण्याची आवश्यकता नाही. असे केल्याने कालापव्यय व खर्चात वाढ होण्याची शक्यता असल्याने प्राधिकरणाने प्रदान केलेली निविदा स्विकृतीचे अधिकार पध्दती योग्य पध्दतीने मंडळाने अंमलात आणावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८१/१६.

विषय : महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमुर्लन व **पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषित करणेबाबत..**

ठराव क्रमांक : ५७५८ दिनांक २९/१/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मध्ये केलेल्या सुधारणा प्रमाणे म्हाडाच्या नियंत्रणाखालील प्रादेशिक मंडळाच्या अधिका-यांना काम करणे सोईचे व्हावे म्हणून शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. गवसु/ १३०१/प्र.क्र.३७५/झोपुसू/१, दिनांक २५ ऑक्टोबर,२००१ अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकरणास दिलेले अधिकार प्रादेशिक मंडळाच्या अधिका-यांना सक्षम प्राधिकारी म्हणून काम पार पाडण्यासाठी प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८१/२३.

विषय : पवई महाप्रकल्पातील इ.क्र. २०-सी मधील सदनिका क्र. ७०२ चे व्याज माफ करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७५९ दिनांक : २९/१/२००२

एकमताने निर्णय घेतला की,

पवई महाप्रकल्पातील इमारत क्र. २०-सी मधील सदनिका क्र. ७०२ चे वाटप श्रीमती सिक्वेरा यांना करण्यात आले होते. मुंबई मंडळाने बाब टिपणीत दर्शविलेल्या आकडेवारीनुसार श्रीमती सिक्वेरा यांचेकडून येणे असलेली व्याज रक्कम रु. ६,१५,०३४/-(रुपये सहा लाख पंधरा हजार चौतीस) अपवादात्मक परिस्थिती म्हणून माफ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र असे प्रसंग पुन्हा येणार नाहीत, याची काळजी घेण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २५/०२/२००२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८२ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १८२/३

विषय : श्री गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) फडतरवाडी, सातारा यांच्यासाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७६० **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्री गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, फडतरवाडी, सातारा यांचेसाठी सहकारी संस्थेचे काम घेण्यासंदर्भात पुणे मंडळाने सादर केलेल्या प्रस्तावातील परिच्छे क्र. २.४ मध्ये विहित केलेल्या येाजनेच्या रुपरेषा प्रमाणे काम करण्यास प्राधिकरण पुढील अअी व शर्तींवर मान्यता देत आहे :---

१. सल्लाशुल्कापोटी येाजनेच्या खर्चास ५ टक्के प्रमाणे आकारणी करण्यांत यावी.
२. म्हाडा तथा पुणे मंडळावर यापोटी कोणताही आर्थिक भुर्दंड बसणार नाही. सदर कामे मंडळाने केवळ सल्लागाराच्या भुमिकेनुसार पार पाडावी. कोणत्याही प्रकारचा आर्थिक सहभाग म्हाडा तथा पुणे मंडळाचा यामध्ये असू नये.
३. सदरहु संस्थेसह पुणे मंडळाने करारपत्र करावे व त्याचा नमुना विधी सल्लागार / प्रा. यांच्याकडून मंजूर करुन घ्यावा.
४. सदरहु संस्थेची जमीन बिगर शेती प्रमाणित व त्यांच्या मालकी हक्काची असल्याबाबत खात्री करुन घ्यावी. अशा जमिनीवर भाडे बोजा किंवा टाच किंवा कोणताही दावा संबंधित नाही याची देखील खात्री करुन घ्यावी.
५. संस्थेकडे येाजनेसाठी लागणारा एकूण खर्च तसेच प्राथमित खर्चाची रक्कम आणि म्हाडाची सल्ला फी देण्याबाबतची रक्कम असल्याची खातरजमा प्रथम करुन घ्यावी.
६. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

बाब क्रमांक : १८२/४

**विषय : मौजा-गाडगा, ख.क्र.५६/१, हिस्लॉप कॉलेज जवळ,
नागपूर येथे १९२ उच्च उत्पन्न गट गाळयांपैकी
६० गाळयांच्या बांधकामाचया निविदांच्या प्रस्तावावर निर्णय.**

ठराव क्रमांक : ५७६१ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मौजा-गाडगा, चा.क्र.५६/१, हिस्लॉप कॉलेज जवळ, नागपूर येथे १९२ उच्च उत्पन्न गट गाळयांपैकी ६० गाळयांच्या बांधकामाच्या योजनेकरिता मागविण्यात आलेल्या निविदांपैकी मे.ईगल कन्स्ट्रक्शन यांनी दिलेला मूळ देकार निविदा किंमतीपेक्षा १२.७० टक्क्यांनी जादा (म्हणजेच रुपये ३,४५,३३,५०८/-) स्विकारण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यतादेण्यात येते.

ठराव क्रमांक : ५७६२ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

यापुढे कोणत्याही निविदेच्या बाबतीत त्यावाजवी दराच्या असतील तर वाटाघाटी न करताच मंजूर करण्यात याव्यातव वाजवी दराच्या नसतील तर फेरनिविदा मागविण्यात याव्यात. याप्रमाणे प्राधिकरण व सर्व प्रादेशिक मंडळांसाठी कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८२/५

विषय : इमारत निर्मिती केंद्राची स्थापना करण्यासाठी अशासकीय खाजगी संस्थांना प्रोत्साहन देण्यास योजनेतील भूखंड व काम देणे व प्राधिकरणाच्या स्थानिक योजनांसाठी त्याचा उपयोग करणे.

ठराव क्रमांक : ५७६३ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

इमारत निर्मिती केंद्राच्या स्थापनेसाठी स्थानिक व शासकीय नामांकित संस्थांना व बेरोजगार अभियंत्यांना प्रोत्साहन देऊन निर्मिती केंद्रे सक्षम व्हावीत यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आला :---

१. सार्वजनिक बांधकाम विभगागाने दिनांक २०.०४.१९९८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काम देण्याच्या संदर्भात व सुविधा करण्याबाबत काहीं सवलती ठरविल्या आहेत. जसे बेरोजगार अभियंत्यांना वर्ग ५ मध्ये थेट नोंदणी देता येते, सुरक्षा अनामत रक्कमेमध्ये ५० टक्के सवलत, अनामत रक्कम भरण्यामध्ये सवलत, प्रथम काम रु. ५ लाखापर्यंत देणे व त्यानंतरचे रु. १० लाख पर्यंत विनास्पर्धा काम देणे. या संदर्भात प्राधिकरणाने सुशिक्षित बेरोजगारांना काम देण्याबाबतचा शासनाच्या धोरणानुसार वेळोवेळी निर्णय घेतला आहे. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी इमारत निर्मिती केंद्र स्थापन करावेत. त्यांना यासाठी पुढाकार घ्यावा म्हणून विभागीय मंडळांनी त्यांच्या योजनेची कामे स्थानिक सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

२. मंडळाच्या अत्यल्प उत्पन्न गट / अल्प उत्पन्न गट / राष्ट्रीय गृहनिर्माण योजनेचे काम त्यांना द्यावयाचे झाल्यास त्या योजनेच्या अभिन्यात सर्वसाधारणपणे १५० ते ५०० चौ.मी. (आवश्यकते नुसार) पर्यंतचा भूखंड इमारत निर्मिती केंद्र स्थापन करण्यासाठी आरक्षित करावा. या भूखंडावर इमारत निर्मिती केंद्रांचे कार्यशाळा आणि इतर सामुग्री तयार करण्याचे कार्य बेरोजगार अभियंत्यांनी करावे. सदर भूखंडाचे वाटप हे म्हाडाच्या प्रचलीत पध्दतीने व सवलतींच्या अधिमुल्यावरउपलब्ध करुन द्यावे. तसेच खालील तक्यात सुचविल्याप्रमाणे सवलत देण्यात यावी.

अ. क्र.	भूखंडाचे क्षेत्रफळ इ.नि.कें.करिता	अधिमुल्य रुपये	भाडे कालावधी	वार्षिक भूभाडे लीजरेंट
१	१५० चौ.मी.पर्यत	रु. ५००/-	सुरवातीला ३ वर्षाची लीज आणि त्यानंतर प्रत्येक ३ वर्षात प्राधिकरण ठरवेल त्या सुधारित प्रिमियम नुसार नुतनीकरण.	रु. १/-
२	१५० चौ.मी.ते ३०० चौ.मी.	रु. १०००	वरीलप्रमाणे	"-"
३.	३०० चौ.मी. आणि जास्त	रु. २०००	वरीलप्रमाणे	"-"

वरील दर म्हाडा लेआऊट मधील भूखंड तसेच निर्मिती केंद्राच्या कामाकरिता प्राप्त होणा-या शासकीय जमिनी व डीआरडीए कडून ताब्यात घेण्यात येणा-या इमारत निर्मिती केंद्राच्या भूखंडाला लागू राहील. जिल्हाधिकारी / डीआरडीएकडून ज्या जमिनी / इमारत निर्मिती केंद्र त्याब्यात घेण्यात येतील त्यांचे मुल्य वरील किंमतीपेक्षा जास्त असणार नाही याची काळजीघ्यावी. वरीलप्रमाणे मुख्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी व इमारत निर्मिती केंद्र ज्या संस्थांना (एनजीओ किंवा तत्सम) द्यावयाचे आहे, त्यांचेसह योग्य ते ॲग्रीमेंट करावे. इमारत निर्मिती केंद्राबाबत हुडको किंवा तत्सम वित्तीय संस्थांकडे निर्मिती केंद्र स्थापन करणा-या संस्थेचे प्रस्ताव फक्त शिफारशीपुरता परस्पर पाठवावा. कर्जाची परतफेड आवश्यक ते कागदपत्र, करारपत्र इ. भरुन घेण्याची जबाबदारी त्या त्या संस्थेची आहे. इमारत निर्मिती केंद्राबाबत याव्यतिरिक्त काही निर्णय घ्यावयाचा असल्यास उपाध्यक्ष / प्रा. निर्णय घेतील.

३. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या संघटनेने शासकीय संस्था नोंदणी करुन अशा भूखंडावर इमारत निर्मिती केंद्रे स्थापन करण्यासाठी कार्यवाही करावी. इमारत निर्मिती केंद्राकरिता आवश्यक असणारी कार्यशाळा व इमारत सामुग्रीची जमवा-जमव अशा संस्थांनीच करावी व हुडको वित्तीय संस्थेचे अथवा केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त करुन घेण्याचे कार्य करावे. यासाठी आवश्यक असल्यास उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्राधिकरणामार्फत शिफारस करता येईल.

४. विभागीय मंडळाने योजनेच्या ठिकाणचे बांधकाम अशा सुशिक्षित बरोजगार अभियंत्यांना काम द्यावयाचे असल्यास या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्राधिकरणाने जारी केलेला शासन निर्णय आणि परिपत्रकास अनुसरुन द्यावे. योजनेच्या कामाची विभागणी करणे आवश्यक असेल तर जसे कीं, प्रत्येक कामाचे विभाजन रु. १० लाखाच्या गटामध्ये करुन कामाचे वाटप करावे लागेल. योजनेचे विभाजन, कामाची योग्ययोग्यता आणि इमारत निर्मिती केंद्राचा उद्देश लक्षात घेऊन करण्याचे अधिकार सक्षम अधिका-यास रहातील.

५. विभागीय मंडहाच्या योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर या योजनेमध्ये स्थापना केलेल्या इमारत निर्मिती केंद्राचा वापर हा त्या पूरताच मर्यादित असू नये. किंबहुना तो लोक आवास व ग्रामीण निवारा योजनेसाठी उपलब्ध व्हावा म्हणून इमारत निर्मिती केंद्र चालविणा-या अशासकीय संस्था वर सुशिक्षित बेरोजगार संस्थांच्या चालकांकडून इमारत निर्मिती केंद्रे चालू ठेवण्यासाठी शाश्वती व पक्रतिज्ञा पत्र / हमी पत्र लिहून घेणे आवश्यक राहील.

६. जर अशासकीय संस्थेला अथवा बेरोजगार अभियंत्यांच्या संस्थेला इमारत निर्मिती केंद्रे / केंद्रे इतर ठिकाणी स्थलांतरीत करावयाचे असेल तर ते स्थलांतरीत करण्याची मुभा राहील. परन्तु स्थलांतरीत झाल्यानंतर रिक्त होणा-या भूखंडांची मालकी पुनःश्च मंडळाकडे सुपुर्द करावी. अशी अट इमारत निर्मिती केंद्रे स्थापन करणा-या गटावर / संस्थेवर राहील.

७. इमारत निर्मिती केंद्रे स्थापन करण्यासाठीच्या सर्व येाजना आणि कर्ज (आवश्यक असल्यास) प्राप्त करुन घेण्यासाठीची सर्व कार्यवाही ही त्या अशासकीय संस्थांनी आणि बेरोजगार संस्थांच्या गटांनी करणे आवश्यक असेल.

८. वरील बाबतचे अटी शर्ती दर्शविणारा करारपत्राचा नमुना उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. आणि विधी सल्लागार / प्रा. यांनी उपाध्यक्षांच्या मंजूरी नंतर सर्व मंडळांकडे तात्काळ पाठवावा.

९. प्राधिकरणाने पुढे असा निर्णय घेतला कीं, वरील बाबींस तत्वतः मंजूरी देण्यात येत आहे. तथापि, स्थापन करण्यात येणा-या इमारत निर्मिती केंद्रामध्ये कोणत्या प्रकारचे साहित्य तयार करण्यात येणार आहे याबाबतची सविस्तर माहिती दर्शविणारी स्वतंत्र बाब टिपणी प्राधिकरणापुढे सादर करण्यात यावी.

बाब क्रमांक : १८२/७

विषय : संरक्षणपात्र निवासी व अनिवासी बांधकामदारास मंडळाची पर्यायी जागा देणेबाबत धोरणात्मक निर्णय.

ठराव क्रमांक : ५७६४ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

शासनाने दिनांक १.०१.१९९५ पूर्वीची सर्व बांधकामे संरक्षण पात्र ठरविली असल्याने व अशा बांधकामांच्या जागेची जेव्हा मंडळास आवश्यकता भासेल त्यांना हलवितांना खालीलप्रमाणे धोरण ठरविण्यांत येत आहे :---

१. संरक्षणपात्र निवासी झोपडया असतील तर १५ फुट, १० फुट, १५० फुट आकाराची जागा (पीच) पुनर्वसनासाठी देण्यात यावी.
२. असे पिचेस देतांना मुंबईत मुंबई महानगर पालिकेच्या ज्या विभागामध्ये मूळ बांधकाम / झोपडे आहे त्या विभागात पर्यायी जागा देण्यात यावी. मात्र, हे शक्य नसल्यास पूर्व किंवा पश्चिम उपनगरामध्ये उत्तरेस पर्यायी जागा देण्यात यावी.
३. अशा पिचच्या खालील जमिनीची मालकी त्या त्या मंडळाकडेच राहील. मात्र त्यासाठी लाभार्थीस मासिक रु. १००/- नाममात्र भाडे देणे आवश्यक राहील. सध्याचे बांधकाम किंवा झोपडे मंडळाने पुनर्वसनासाठी दिलेल्या जागेवर स्वखर्चाने हलविण्याची जबाबदारी, सक्षम प्राधिकरणाकडून सर्व परवानग्या आणण्याची जबाबदारी लाभार्थींची राहील.
४. जे लाभधारक मंडळाकडून पुनर्वसनाची जागा दिल्यानंतर ती दुस-या व्यक्तीस हस्तांतरीत करतील त्यांना नियमित करण्यासाठी निवासी झोपडीधारकांकडून रुपये १०,०००/- दंड व अनिवासी किंवा वाणिज्य उपयोगासाठी हस्तांतरण असेल तर रुपये २०,०००/- दंडात्मक रक्म आकारावी.
५. निवासी वापरासाठी स्थलांतरणासाठी जागा दिली व त्याचा वापर लाभार्थींनी पुढे अनिवासी कारणासाठी सुरु केल्यास मंडळास वापर बदल शुल्क म्हणून एकरकमी एकदाच रुपये २०,०००/- घेण्यात यावेत व अशा वेळी भुईभाडे मासिक रु. २००/- आकारावे.

६. दिनांक १.०१.१९९५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे मंडळाने काही कारणास्तव तोडली असतील तर (मुंबईतील स.गो.बर्वे मार्गावरील प्रकरण सोडून) परन्तु जी प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार अशा लाभार्थींना पर्यायी जागा देणे क्रमप्राप्त ठरेल, अशा प्रकरणांमध्ये वरील मार्गदर्शक तत्वानुसार पर्यायी जागा देण्यात यावी.

७. सक्षम प्राधिका-याने मंजूरी दिलेली अशी प्रकरणे मंडळाच्या पुढील बैठकीत माहितीसाठी बाब टिप्पणी सादर करावी. दिनांक १.०१.१९९५ नंतर झालेल्या कोणत्याही बांधकामांना वरीलप्रमाणे पर्यायी जागा देता येणार नाही. अशी सर्व बांधकामे मंडळाने तोडून टाकण्याची कार्यवाही करावी.

बाब क्रमांक : १८२/९

विषय : सर्व्हे क्र. ७ व ८ वांद्रे (पश्चिम) येथील मंडळाच्या जमिनीवर प्रस्तावित वाणिज्य सकुल म्हाडामार्फत किंवा खाजगी विकासका सोबत संयुक्तपणे राबविणेसंबंधी.

ठराव क्रमांक : ५७६५ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

सर्व्हे क्र. ७ व ८ वांद्रे (पश्चिम) येथिल मुंबई मंडळाच्या जमिनीवर प्रस्तावित वाणिज्य संकुल उभारण्याचे काम म्हाडामार्फत राबविल्यास कोणत्याही प्रकारचा तोटा होणार नसल्याने तसेच या प्रकल्पात कदाचित स्थावर मालमत्तेची किंमत वाढल्यास त्याचा फायदा म्हाडास होणार असल्याने बाब टिप्पणीत उल्लेख केलेल्याबाबींचा साकल्याने विचार करुन जॉईंट व्हेंचर पध्दतीने हा प्रकल्प राबविल्यास पुढे उद्भवणा-या धोक्यांचा व जोखमीचा विचार करता हा प्रकल्प म्हाडाने राबविल्यास म्हाडाला होणा-या फायद्याचा विचार करता सदर प्रकल्प म्हाडामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८२/१०

विषय : प्राधिकरण ठराव गि. ५६५०, दि. ६.०२.२००१ प्राधिकरणाच्या सर्व येाजनांना लागू करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७६६ **दिंनाक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

विखुरलेल्या सदनिकांच्या विक्रीसाठी ९० दिवसांच्या वर विलंब झालेल्या अर्जदारांनी संपूर्ण विक्री किंमत भरण्याची तयारी दर्शविल्यास माहिती पुस्तकेतील अट शिथील करुन उपलब्ध सदनिकांची विक्री अशा अर्जदारांना ९० दिवसांच्या वरील मुदतवाढीच्या कालावधीस १६ टक्के व्याज आकारुनवितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ५६५० दिनांक ६.०१.२००१ ची व्याप्ती फक्त मानखुर्द, सायन, मालवणी व पवई या येाजनांकरिता मर्यादित ठेवता प्राणिकरणाच्या सर्व येाजनांसाठी लागू करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच मालवणी येथील गाळे ९९५/- रुपये प्रति फुट दराने विक्री करावेत व त्यावरील पूर्वीच्या सर्व सुविधा तशाच ठेवण्यात याव्यात.

बाब क्रमांक : १८२/११

विषय : कफ परेड, कुलाबा येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासाअंतर्गत खुल्या बाजारात विकणेसाठी उंच बहुमजली निवासी इमारती बांधणेबाबात.

ठराव क्रमांक : ५७६७ दिनांक : २५.०२.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

कफ परेड, कुलाबा संक्रमण शिबिराचा पुनर्विकासाचा प्रकल्प म्हाडाने स्वतः राबविल्यास कोणत्याही प्रकारचा तोटा होणार नसल्याने तसेच त्यात कदाचित स्थावर मालमत्तेची किंमत वाढल्यास त्याचा फायदा म्हाडास होणार असल्याने प्राधिकरणाने बाब टिप्पणीत उल्लेखिलैल्या गोष्टींचा साकल्याने विचार करुन जॉईंट व्हेंचर पध्दतीने काम करण्यास असलेल्यास एकंदर धोक्याचा व जोखमीचा विचार करुन म्हाडाने हा प्रकल्प निवड करण्यात आलेल्या पूर्व अहर्ताप्राप्त ठेकेदारांकडून रितसर निविदा मागवून करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८२/१२

विषय : विनियम १६ अंतर्गत वाटप होणा-या निवासी भूखंडाच्याप्राधिकरणाच्या ठराव क्र.५६५६, दि. ५.०३.२००१ नुसार किंमत विषयक धोरणात भागशः सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७६८ दिनांक : २५.०२.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाचा ठराव क्र. ५६५६, दिनांक ५.०३.२००१ मधील परिच्छेद - ३ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा. तसेच परिशिष्ट - ५ मधील अनुक्रमांक - २ (वाणिज्यिक) वगळून उर्वरित अनुक्रमांक - ३ (इ), ४ (अ) , ४ (ब), ४ (क), ५ (ब) व अनुक्रमांक १ निवासी उपयोगासाठी विनियम १६ अन्वये वितरीत केल्या जाणा-या भूखंडासाठी हा ठराव दिनांक ५.०३.२००१ पासून अंमलात येईल. तथापि, ज्या प्रकरणांमध्ये शासनाकडून विनियम १६ चे वितरण आदेश दिनांक ५.०३.२००१ पूर्वी निर्गमित झाले आहेत परन्तु अशा सहकारी संस्था / लाभार्थीस अधिमुल्याची रक्कम देकार पत्राद्वारे दिनांक ५.०३.२००१ अथवा त्यानंतर कळविण्यात आलेली आहे अशा प्रकरणांना देखील या ठरावातील तरतुदी लागू कराव्यात व देकारपत्र दिल्याचे दिनांकास जे जमिन विक्री संदर्भात विक्री किंमत विषयक धोरण असेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

तसेच यापुढे भविष्यात शासनाकडून विनियम १६ अन्वये भूखंडाच्या होणा-या वितरणासाठी प्राधिकरणाचे देकारपत्र दिल्या जाणा-या दिनांका रोजी विनियम १६ बाबत जे प्राधिकरणाचे किंमत विषयक धोरण लागू असेल त्यानुसार अधिमूल्याची व वार्षिक भुईभाडयाची रक्कम आकारण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८२/१३

विषय : जे.व्ही.पी.डी.विलेपार्ले येथे मंडळाने वितरीत केलेल्या वैयक्तिक भूखंडांचे हस्तांतरण नियमित करण्यासाठी आकारावयाच्या अधिमूल्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७६९ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

१. भूखंड एखाद्या व्यक्तीस, ट्रस्ट कंपनी तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थे व्यतिरिक्त इतर संस्थेस हस्तांतरीत होत असल्यास, भूखंड हस्तांतरण नियमित करण्यासाठी बाजारमुल्याच्या सरसकट ३५ टक्के वाढीव अधिमुल्य व या अधिमुल्याच्या २.५ टक्के दराने वाढीव भुईभाडे आकारावे.

२. भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरीत होत असल्यास बाजारमूल्याच्या २५ टक्के दराने वाढीव अधिमूल्य व या अधिमूल्याच्या २.५ टक्के प्रमाणे वार्षिक भुईभाडे आकारण्यात यावे. (प्राधिकरणाचा पूर्वीचा ठराव क्रमांक १३३० दिनांक ३०.०१.१९८७ प्रमाणे).

३. जे.व्ही.पी.डी.येथील मूळ भूखंडधारकांनी त्यांना वितरीत केलेल्या भूखंडावर फक्त स्वतःसाठी एकच निवासस्थान बांधावयाचे होते. त्यामुळे मूळ भूखंडधारकास, त्याच्या स्वतःच्या घराच्या (मुंबई मंडळाने दिलेल्या परवानगीनुसार) व्यतिरिक्त अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये (टी.डी.आर.न वापरता), अधिकचे गाळे बांधावयाचे असल्यास, बाजारमुल्याच्या २५ टक्के वाढीव अधिमुल्य रक्म व त्यावर २.५ टक्के वाढीव भुईभाडे आकारावे.

अ.क्र.३ अन्वये कार्यवाही झाली असल्यास पुन्हा अ.क्र.१ अन्वये कार्यवाही करतेवेळी बाजारमुल्याच्या १० टक्के वाढीव अधिमुल्य व त्यावर २.५ टक्के वाढीव भुईभाडे आकारावे. तथापि, अ.क्र.३ मध्ये कार्यवाही झाल्यानंतर अ.क्र.२ अन्वये पुन्हा कार्यवाही होत असल्यास वाढीव अधिमुल्य व भुईभाडे आकारु नये.

४. भूखंड एखाद्या व्यक्तीस ट्रस्ट तसेच कंपनीला (सहकारी संस्था सोडून) इतरांना / इतर संस्थेला हस्तांतरीत होत असल्यास व भूखंड हस्तांतरणाच्या विनंतीसह अशा भूखंडाच्या सध्याच्या निवासी वापरात, प्राधिकरणाचा ठराव क्र. ३०९४, दिनांक १६.११.१९९२ चे किंमती विषयक धोरणातील व्यापारी उपयोग वगळून इतर वापर बदलाची विनंती केली असेल, ज्यामध्ये व्यापारी वापर वगळून इतर वापर जसे की, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक, धार्मिक, आरोग्यविषयक / वैद्यकीय पब्लिक युटीलीटी व सर्व्हीसेस अशा वापराचा समावेश असल्यास, अशा भूखंड हस्तांतरणाची प्रकरण नियमित करण्यासाठी बाजारमुल्याच्या २५ टक्के दराने वाढीव अधिमुल्य व त्यावर २.५ टक्के दराने वाढीव वार्षिक भुईभाडे आकारावे. अशा प्रकरणात अनुज्ञेय चटईक्षेत्र पूर्णपणे वापरण्याची परवानगी असेल, तर त्यासाठी अधिकचे अधिमुल्य आकारु नये. मात्र प्राधिकरणाच्या संबंधित प्रचलित धोरणानुसार अनुज्ञेय चटईक्षेत्रापेक्षा जास्त चटईक्षेत्र टी.डी.आर.च्या माध्यमातुन किंवा वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्र वापरण्याबाबत तसेच वापर बदलासाठी आकारावयाचे अधिमुल्य व वाढीव वार्षिक भुईभाडे आकारण्यात यावे. सापर बदलाच्या प्रस्तावात किंमत अनुज्ञेय चटईक्षेत्राच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त चटईक्षेत्राचा वापर वर उल्लेखिलेल्या वापरात बदल होणे आवश्यक असेल. वैद्यकीय वापर बदलाच्या प्रकरणात (Hospitals Maternity Homes etc.) ५ टक्के जागा, म्हाडाचे विद्यमान पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांना प्राधान्याने देण्याची अट असावी. तसेच शैक्षणिक वापर बदलासाठी म्हाडाने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना एकूण जागांच्या ५ टक्के जागांवर प्राधान्याने प्रवेश देण्याची अट असावी. उपरोक्त ५ टक्के वैद्यकीय व शैक्षणिक जागांसाठी शिफारस करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना राहातील.

५. भूखंड वारसाच्या नांवे हस्तांतरीत करण्याकरिता नाममात्र रुपये १,०००/- आकारण्यात यावेत.

६. अ.क्र.१ व २ यापैकी कोठल्याही एका प्रकाराखाली अतिरिक्त अधिमुल्य मंडळास प्राप्त झाल्यानंतर पुन्हा हस्तांतरणाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास अ.क्र.१ किंवा २ च्या हस्तांतरणाच्या वेळी ग्राहय धरलेले बाजारमुल्य व पुनर्विक्रीच्या वेळीचे बाजारमुल्य यांच्या फरकाच्या अनुक्रमे ३५ टक्के व २५ टक्के हस्तांतरण फी आकारावी. तथापि पुन्हा वाढीव भुईभाडे आकारु नये.

७. भूखंड हस्तांतरणासाठी अतिरिक्त अधिमुल्य हे ज्यांच्या नांवे भूखंड हस्तांतरीत करावयाचा आहे त्यांच्याकडून वसूल करावे. भूखंड ज्यांचे नांव हस्तांतरीत

करावयाचा आहे, त्या व्यक्तीच्या पूर्वी मंडळाचेपूर्व परवानगीशिवाय सदर भूखंडाचेकाही विक्री व्यवहार झाले असल्यास, अतिरिक्त अधिमुल्य वसूल करतेवेळी असे व्यवहार विचारात घेऊ नयेत. शेवटी भूखंड ज्या व्यक्तीच्या / सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नांवे भाडेपट्टयावर होणार असेल त्या व्यक्तीकडून / सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून एकच हस्तांतरण समजून अ.क्र.१ किंवा २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रककम वसूल करावी.

८. भूखंडाचे बाजारमुल्य काढतेवेळी ज्या वर्षामध्ये अतिरिक्त अधिमुल्य कळविण्यात येत आहे, त्या वर्षासाठी भूखंड ज्या विभागामध्ये आहे, त्या विभागासाठी शिघ्र गणकामध्ये दर्शविलेला विकसित भूखंडाचा दर ग्राहय धरुन बाजारमुल्य काढावे. अशा प्रकारे काढलेले बाजारमुल्य व भूखंडाच्या विक्री करारनाम्यानुसार असलेले निव्वळ जमिनीचे बाजारमुल्य यापैकी जे अधिक असेल ते ग्राहय धरावे.

९. इतर प्रकरणासाठी उदा. भूखंडाचा वापर, बदल, इमारतीतील गाळे भाडयाने देणे, टिडीआर वापरणे यासाठी प्राधिकरणाच्या त्या त्या ठरावांप्रमाणे कार्यवाही करावी.

१०. अ.क्र.१ किंवा २ अन्वये अतिरिक्त अधिमुल्य प्राप्त झाल्यानंतर भूखंड ज्या व्यक्तीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नांवे होईल त्याला त्या भूखंडावरील इमारतीतील सदनिका खुल्या बाजारात विकण्याची परवानगी असेल. अशा सदनिका खरेदीदारांची पात्रता तपासण्याची अट ठेऊ नये. मात्र अशा सदनिकांची एकदा विक्री झाल्यानंतर पुन्हा त्या सदनिकांची फेरविक्री होत असल्यास प्राधिकरणाच्या प्रचलित नियमानुसार सदनिका हस्तांतरणासाठी फी आकारावी.

११. भूखंड हस्तांतरण नियमित करण्याचे अधिकारी मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांना राहातील. काही प्रकरणांमध्ये सन २००० पूर्वी बाजारमुल्याचा दर रुपये ४०००/-, ५०००/- प्रति चौ.मी.ग्राहय धरुन अतिरिक्त अधिमुल्य वसूल करण्यात आले आहे. अशा प्रकरणांमध्ये वसूल करण्यात आलेले अधिमुल्य हे या ठरावाप्रमाणे येणा-या अधिमुल्यापेक्षा कमी येत असल्यास, अशा प्रकरणात आधीची रक्कम कळविलेल्या वर्षाच्या बाजारभावानुसार येणारे अधिमुल्य व पूर्वी वसूल केलेली रक्कम यामधील फरकाची रक्कम लाभार्थींकडून व्याज न आकारता वसूल करावी.

जे.व्ही.पी.डी. येथे भूखंड हस्तांतरण नियमित करणेबाबत वरीलप्रमाणे सुधारित धोरण अवलंबावे. भूखंड क्र. १५, ८ व २५ च्या भूखंड हस्तांतरण नियमितीकरणाबाबत प्रशासनाने यापूर्वी केलेल्या कार्यवाहीस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : १८२/१४

विषय : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एम.एम.आर.डी.ए.) निधीतून त्यांच्या जागेवरील झोपडपट्टयामध्ये मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत मुलभूत सुविधा पुरविण्याच्या प्रस्तावित कामापोटी प्रतिशत आकार (सेंटेज चार्ज) आकारण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५७७० **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतुन १०० टक्के अनुदान स्वरुपात करावयाच्या कामापोटी २.५ टक्के सेंटेज चार्ज आकारण्यास उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

बाब क्रमांक : १८२/१५

विषय : राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाकरिता म्हाडा निधितून देण्यात येणा-या रुपये २४.९९ कोटी निधीवर व्याज न आकारणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७७१ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

राष्ट्रीय गलिच्छ वस्तीसुधार कार्यक्रमांसाठी शासनाकडून मंजूर अनुदानाची रक्कम प्राधिकरणास प्राप्त होण्यास विलंब होत असल्याने शासनाकडून जमा अपेक्षित असलेल्या रकमेपैकी रुपये २४.९९ कोटी रक्कम मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास प्राधिकरणाच्या निधीतून देण्यात येणा-या अनुदानावर प्राधिकरणाने शासनाकडे व्याजाची मागणी करण्यात येऊ नये.

बाब क्रमांक : १८२/१६

विषय : झोपडपट्टी सुधार योजनेअंतर्गत
प्रोत्साहनपर बक्षिस योजना.

ठराव क्रमांक : ५७७२ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

झोपडपट्टी सुधार योजनेअंतर्गत प्रात्साहनपर बक्षित येाजनेबाबत शासन निर्णय दिनांक २६ मे, १९९९ च्या अनुषंगाने या स्पर्धेमध्ये भाग घेणारी शेजार समिती नोंदणीकृत व प्रतिनिधीक स्वरुपाची असावी व एकूण खर्च रुपये १०,०००/- पर्यंत मर्यादित असावा व सदर खर्च योजनेच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

बाब क्रमांक : १८२/१७

विषय : राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत
बृहन्मुंबईमध्ये मुंबई महानगर पालिकेच्या जागेवरील
झोपडपट्टयांमध्ये मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत
सुविधा पुरविण्यास शासनानकडून मान्यता मिळणेाबाबत.

ठराव क्रमांक : ५७७३ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या जागेवरील झोपडपट्टयांमध्ये कामे करण्यासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास सन २००१-२००२ या वर्षासाठी प्राधिकरणाच्या निधीतुन रुपये ७१०.८१ लक्ष निधी उपलब्ध करण्यास तसेच विधानसभा मतदार संघनिहाय वाटपास उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी दिलेल्या मान्यतेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

बाब क्रमांक : १८२/१२

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९८-९९ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७७४ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९८-९९ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८२/१९

विषय : मुंबई मंडळाच्या ज्या योजनांच्या, म्हाडा विनियम १९८१ च्या तरतुदींनुसार दोन जाहिराती होऊनही फारसा प्रतिसाद नाही, अशा योजनांमधील अवितरीत सदनिका घाऊक स्वरुपात विकत घेऊ इच्छिणा-या संस्थांना विकणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७७५ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आगाऊ अंशदान ायेाजनेमधील सदनिकाकरिता अर्ज करतांना भरावयाची अनामत रक्कम खालीलप्रमाणे आकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे :---

१.	अल्प उत्पन्न गट - सदनिका	रु.	१०,०००/-
२.	मध्यम उत्पन्न गट - सदनिका	रु.	१५,०००/-
३.	उच्च उत्पन्न गट - सदनिका	रु.	२०,०००/-

तसेच या सदनिकांची घाऊक खरेदीसाठी मुंबई मंडळाने शिफारस केलेल्या ११ सहकारी गृहनिर्माण संस्था व भविष्यात येणा-या सहकारी संस्थांना प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर या जाहिरातीच्या घाऊक आरक्षणाच्या इमारतींमध्ये घाऊक, आरक्षण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

या संस्थांनी अर्जासोबत भरलेली अनामत रक्म व नंतर ९० दिवसांचे आत २५ टक्के रक्कम भरणे बंधनकारक राहील व उर्वरित विक्री किंमत मंडळ निर्देशित करेल अशा हप्त्यात भरणे बंधनकारक राहील.

२.प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य तत्वावर जाहिरात देत असतांना सर्वसामान्य जनतेसाठीच्या ज्या सदनिका व इमारती आणि घाऊक खरेदीसाठीच्या ज्या सदनिका व इमारती यांचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यांत यावा.

बाब क्रमांक : १८२/२०

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण-२, सोलापूर येथील बीडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात आलेल्या ११० गाळयांची किंमत कमी करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७७६ **दिनांक : २५.०२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

विशेष नियोजन प्राधिकरण-१, सेालापूर येथील बीडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात आलेल्या ११० गाळयांची किंमत रुपये २५,०००/- इतकी सिमीत करण्यात यावी. शासनाने रुपये ५,०००/- अनुदान देण्यात यावे. लाभार्थींकडून रुपये ५,०००/- वसूल करण्यात यावे. याप्रमाणे शासनास कळविण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००१-२००२ चे सुधारिता अंदाजपत्रक व सन २००२-२००३ चे अर्थसंकल्पीय अंदाज.. प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे.

ठराव क्रमांक : ५७७७ दिनांक : २/०३/२००३

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या सन २००१-२००२ च्या सुधारित अंदाजपत्रकावर व सन २००२-२००३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन दोन्ही अंदाजपत्रकाना प्राधिकरणाची मंजूरी देण्यात आली.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ६/०४/२००२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८३ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांकः१८३/५.

विषय : भूखंडाच्या अदलाबदली प्रकरणांत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री व अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम ३१ लागू करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७७८ दिनांक : ६.०४.२००२

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल विनियम १९८१ मधील) विनियम ३१ मधील तरतूदी भूखंडाच्या अदलाबदलास लागू करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यास मान्यता देण्यांत येते. तथापि, शासनाने नियमात तरतूद केल्यानंतरच अशी प्रकरणे सरसकट न करता निर्णय घेण्यासाठी प्रथम बाब टिप्पणी मंडळासमोर सादर करुन निर्णय घेण्यात यावा व मंडळाच्या शिफारशीसह बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या मान्यतेस सादर करण्यात यावी.

सदर निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट नपाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८३/७

विषय : मौजे-बोरी, तालुका जिंतुर, जिल्हा परभणी येथिल गट नं. १६३ मधील २.०० हेक्टर खाजगी जमिन रु. १,३०,५००/- प्रति एकर या दराने म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ५२ अन्वये खरेदी करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५७७९ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

राष्ट्रीय गृहनिर्माण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी घरकुल येाजना राबविण्यासाठी मौजे-बोरी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी येथील गट नं. १६३ मधील २.०० हेक्टर खाजगी जमिन म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ५२ अन्वये जिल्हा स्तरीय समितीने ठरविलेल्या रुपये १,३०,५००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्याबाबतच्या औरंगाबाद मंडळाच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८३/८

विषय : गोरेगांव, ओशिवरा व दिंडोशी येथील येाजनांच्या विर्निदेशात अल्प बदल करण्याबाबत व आवश्यक अतिरिक्त बाबींचा अंतर्भाव करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७८० **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गोरेगांव-ओशिवरा व दिंडोशी येथील योजनांच्या विर्निदेशात अल्प बदल करण्याबाबत बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार व आवश्यक अतिरिक्त बाबींचा अंतर्भाव करण्याबाबत अध्यक्ष / प्राधिकरण व उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट नपाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८३/९

विषय : प्राधिकरणाच्या १९९२ च्या किंमतीविषयी धोरणामध्ये ५०० चौ.मि.वरील मोठया आकाराच्या भूखंडांमध्ये एकूण अनुज्ञेय बांधकामाच्या १० टक्के बांधकाम / गाळे म्हाडाला प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या दराने हस्तांतरण करण्याची अट शिथील करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७८१ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. निवासी भूखंडाचे वितरण संदर्भातील ज्या प्रकरणामध्ये मूळ देकारपत्र एकूण अनुज्ञेय बांधकामाच्या १० टक्के बांधकाम / गाळे म्हाडाला प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या दराने हस्तांतरीत करण्याची अट घालण्यात आलेली होती. परन्तु असे हस्तांतरण अद्याप झालेले नाही. अशा प्रकरणी भूखंडास आकारण्यात आलेल्या अधिमूल्याच्या ५ टक्के इतकी रक्कम दंड म्हणून घेण्यात यावी व हस्तांतरणाची सदरची अट शिथील करण्यात यावी.
२. निवासी भूखंडाच्या वितरण संदर्भातील ज्या प्रकरणामध्ये मूळ देकारपत्रात अनुज्ञेय बांधकामाच्या १० टक्के बांधकाम / गाळे म्हाडाला प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या दराने हस्तांतरीत करण्याची अट घालण्यात आलेली नव्हती अशा प्रकरणी कोणतीही दंडाची रक्कम न घेता हस्तांतरणाची सदरची अट शिथील करण्यात यावी.

३. यापुढे ठराव क्र. ३०९४, दिनांक १६.११.१९९२ मधील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमूद करण्यात आलेली निवासी भूखंडाचे वितरण संदर्भातील एकूण अनुज्ञेय बांधकामाच्या १० टक्के बांधकाम / गाळे म्हाडाला प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या दराने हस्तांतरीत करण्याची अट काढून टाकण्यात यावी.
४. शासनाकडून विनियम १६ खाली ज्या जागा गृहनिर्माण संस्थांना या पुढे वितरीत करण्यांत येतील त्यामध्ये १० टक्के शासन नाम निर्देशित सभासद घेण्यात यावेत अशी अट टाकण्यात येत`ती अट शासनाने काढून टाकावी अशी विनंती शासनास करण्यांत यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्या मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८३/१०

विषय : चिकणघर कल्याण येथिल सेप्टीक टँक क्र.१ व त्यालगतची जागा कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेस मलउदंचन केंद्र बांधण्यासाठी देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७८२ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

चिकणघर कल्याण येथील मंडळाच्या वसाहतीमधील सेप्टीक टँक क्र.१ व त्या लगतचा अंदाजे ७०० चौरस मिटरचा मोकळा भूखंड कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेस मलउदंचन केंद्र बांधण्यासाठी प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणानुसार किंमत न आकारता त्याऐवजी त्या जागेचे चटईक्षेत्र निर्देशांक कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेकडून उपलब्ध करुन देण्याच्या अटीवर सदर भूखंड देण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८३/११

विषय : मुंबई येथे मंडळाने आर्मी वेल्फेअर हाऊसिंग ऑर्गनायझेशन यांना वितरीत केलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीमधील गाळे हस्तांतरणबाबत..

ठराव क्रमांक : ५७८३ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने आर्मी वेल्फेअर हाऊसिंग ऑर्ग नायझेशन यांना वितरीत केलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीमधील गाळे हस्तांतरणबाबत आर्मी ते सिव्हीलियन्स गाळे हस्तांतरणास नेहमीच्या उच्च उत्पन्न गटासाठी असलेल्या शुल्काच्या दीडपट रक्म प्रतीगाळा हस्तांतरणास नेहमीच्या उच्च उत्पन्न गटासाठी असलेल्या शुल्काच्या दीडपट रक्कम प्रतीगाळा हस्तांतरण फी आकारुन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यतादेण्यात येते. तसेच तारापोर टॉवर्स ओशिवरा प्रमाणे आर्मी ते आर्मी हस्तांतरणासाठी आर्मी वेल्फेअर हाऊसिंग ऑर्गनायझेशनला अन्य ठिकाणी वितरीत केलेल्या भूखंडासाठी रु. १,०००/- हस्तांतरण शुल्क आकारुन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात येते.

वरील दोन्ही प्रकरणात गाळे हस्तांतरणाचे ना-हरकत प्रमाण्पत्र देणेपूर्वी आर्मी वेल्फेअर हाऊसिंग ऑर्गनायझेशनचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८३/१२

विषय : प्राधिकरणाच्या विभागीय मंडळांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांमधील २ जाहिराती झाल्यानंतरही अवितरीत राहिलेल्या सदनिकांची विक्री करण्यासंबंधी विभागीय मंडळांना द्यावयाच्या धोरणात्मक सूचना..

ठराव क्रमांक : ५७८४ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

एखाद्या योजनेसाठी दोनदा जाहिरात दिल्यानंतरी निवासी गाळयांच्या विक्रीसाठी आवश्यक प्रतिसाद किंवा मागणी नसेल तर अशा रिक्त निवासी गाळयांच्या विक्रीसाठी

१. अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असावे.
२. अर्जदार भारतीय नागरीक असावा.
३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमाती यांचेसाठी नियमानुसार विहित केल्याप्रमाणे निवासी गाळे आरक्षित राहातील. या ३ अटींव्यतिरिक्त इतर सर्व अटी शिथील करण्यास प्राधिकरण आपल्या विभागीय मंडळांना परवानगी देत आहे.

मागासवर्गीय प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासाठीची अट म्हाड (जमिनीचे वाटप) नियमत १९८१ च्या नियम १३ (११-क) नुसार शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय शिथील करता येत नसल्याने ही अट शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय शिथील करण्यात येऊ नये.

बाब क्रमांक : १८३/१३

विषय : विनियम १६ अंतर्गत नियोजित सहकारी गृहनिर्माण संसथांना प्राधिकरणाच्या जमिनीचे वितरण करतांना त्यावर तयार होणा-या सदनिकांपैकी १० टक्के सदनिका शासन नामदिर्नेशित शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी आरक्षित करण्याची अट काढून टाकणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७८५ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

शासनाचे पत्र क्र.शिबीर-१०९६(४२), दिनांक १८ डिसेंबर १९९६ अन्वये ज्या ज्या वेळी नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थांना म्हाडाच्या जमिनी वितरीत केल्या जातील त्या त्या वेळी वाटप केलेल्या भूखंडावर तयार होणा-या सदनिकांपैकी १० टक्के सदनिका शासन नामनिर्देशित शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी आरक्षित राहतील व अशा व्यक्तींची निवड शासनाच्या स्तरावर करण्यात येईल अशी अट शासनाने घातलेली आहे. ही अट शासनाने काढून टाकण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८३/१४

विषय : दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला ७६ व्या बैठकीत बाब क्रमांक ७६/६ वर झालेल्या निर्णयानुसार दुरुस्ती मंडळाला प्राधिकरणाच्या निधीमधून रक्म उपलब्ध करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५७८६ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला शासनाकडून निधी उपलब्ध होईपर्यंत प्राधिकरणाच्या निधीतून रुपये २५ कोटी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येते. मात्र हा निधी शासनाकडून दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास निधी देण्याबाबतचे पत्र प्राधिकरणास देण्यात आल्यानंतरच निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १८३/१५

विषय : कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) येथील इमारत क्र. १८५ जवळ टेलिफोन बुथ, एसटीडी व स्टेशनरीकरिता १० x १० आकाराची जागा मुंबई मंडळातील कर्मचा-यांच्या अपंग मुलाला वितरीत करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५७८७ **दिनांक : ६.०४.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाची शिफारस विचारात घेऊन कन्नमवारनगर, विक्रोळी पूर्व येथील इमारत क्र. १८५ जवळील १० x ५ फुट आकाराची जागा मुंबई मंडळाच्या चेंबूर विभागातील श्री.भिमराव रतन थोरात यांच्या मंदबुध्दी मुलगा श्री.सुशिल भि. थोरात यांना रु. १०००/- अनामत रक्कम व रु. २००/- मासिक भाडे आकारुन प्रथम ५ वर्षाकरिता टेलिफोन बुथसाठी भाडेतत्वावर देण्यास मान्यता देण्यात येते. या भूखंडावर श्री.थोरात यांना कोणत्याच प्रकारचे बांधकाम करता येणार नाही व टेलिफोन बुथ लाकडी खोका स्वरुपाचा राहील. तसेच, या टेलिफोन बुथसाठी महानगर पालिका व इतर कार्यालयाची ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. हा निर्णय फक्त अपवार म्हणून या एकाच प्रकरणासाठी लागू करण्यांत यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३०/०५/२००२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८४ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १८४/४

विषय : मजूर सहकारी संस्थांना देण्यात येणा-या सवलतीमध्ये वाढ करण्याबबात.

ठराव क्रमांक : ५७८८ **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं, मजूर सहकारी संस्थांना देण्यांत आलेल्या सवलतीमध्ये वाढ करण्याबाबत शासनाचे सुधारीत आदेश शासन निर्णय क्र. एलएबी-१०९८/प्र.क्र.१६४/इमारती-२, दिनांक ११.०१.२००० हा त्यातील अटी व शर्तीसह प्राधिकरणास लागू करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८४/६

विषय : अंमळनेर येथील अंतिम भूखंड क्र.२३३ वर ५० गाळे अल्प उत्पन्न गटाची गृहनिर्माण योजना.

ठराव क्रमांक : ५७८९ **दिनांक : ३०.०५.२००२**

अंमळनेर येथील अंतिम भूखंड क्र. २३३ वरील ५० रिक्त गाळयांची मंडळाने ठरविलेली किंमत रु. ८,०००/- असून गाळे आहेत त्या परिस्थितीत इच्छुक लाभार्थींकडून अनामत रक्कम रु. १०,०००/- घेऊन उर्वरित रकमेवर १३ टक्के दराने व्याजाची आकारणी करुन उर्वरित रक्कम भाडेखरेदी हप्ते पध्दतीने १५ वर्षात वसूल करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८४/७

विषय : विडी कामगारांसाठी व जालना येथे बांधण्यात आलेल्या ३५३ गाळे (अत्यल्प उत्पन्न गट) योजनेतील मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांची भाडेखरेदी हप्त्याने विक्री करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७९० **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

जालना येथील विडी कामगार योजनेतील अत्यल्प उत्पन्न गटातील, मंडळाने निश्चित केलेली गाळयांची किंमत रु. २८,०००/- पैकी इच्छुक लाभार्थींकडून अर्जासोबत रुपये २८००/- व गाळयाचा ताबा देण्यापूर्वी रु. २८००/- अनामत रक्म स्विकारुन उर्वरित रक्कम रु. २२,४००/- वर हुडकोच्या दराने व्याजाची आकारणी करुन रक्कम भाडे खरेदी हप्ते पध्दतीने १५ वर्षात वसूल करावी. तसेच, गाळे वाटप करताना उत्पन्न मर्यादेची अट, एकास दोन किंवा अधिक गाळे घेण्यास मुभा असावी. तसेच वास्तव्याची अट आवश्यक वाटल्यास शिथील करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८४/८

विषय : चोपडा जिल्हा जळगांव येथील स.क्र.२२१ भाग वरील ८८ गाळे अल्प उत्पन्न गट व २६ गाळे मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेतील गाळे वाटपाबाबत..

ठराव क्रमांक : ५७९१ **दिनांक : ३०.०५.२०००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

चोपडा जिल्हा जळगांव येथील अल्प उत्पन्न गटातील गाळयांची मंडळाने ठरविलेली किंमत रु. ३०,०००/- व मध्यम उत्पन्न गाळयांची मंडळाने ठरविलेली किंमत रु. ६०,०००/- आहे. गाळे आहे त्या परिस्थितीत अल्प उत्पन्न गआतील गाळे घेण्यास इच्छुक असलेल्या लाभार्थींकडून रु. ५,०००/- अनामत व मध्यम उत्पन्न गटातील लाभार्थींकडून रु. १०,०००/- अनामत रक्कम घेऊन उर्वरित रक्कमेवर हुडकोचा व्याजदर १२.७५ टक्के दराने व्याजाची आकारणी करुन, रककम भाडे खरेदी हप्ते पध्दतीवर १५ वर्षात वसुल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८४/९

विषय : स.क्र.३८६ मुलुंड (पूर्व) येथील उच्च उत्पन्न गट अंतर्गत भारतीय विकास बँक संस्थेस कर्मचा-यांच्या सेवानिवास स्थानासाठी वितरीत केलेला भूखंड क्रमांक ३ चे हस्तांतरण कर्मचा-यांनी स्थापन केलेल्या गृहनिर्माण संस्थेस करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७९२ **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

तत्कालीन राजीव गांधी निवारा प्रकलपाने सर्वे क्र. ३८६ मुलुंड (पूर्व) येथील भूखंड क्र. ३ भारतीय औद्योगिक विकास बँकेच्या कर्मचा-यांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीतील गाळे मालकीहक्काने हस्तांतरण करण्याबाबतची विनंती प्रतिगाळा रु. ३५,०००/- प्रमाणे ४८ गाळयांचे रु. १६,८०,०००/- हस्तांतरण शुल्क आकारुन मान्य करण्यात येत आहे.

मात्र भुखंडाचा भाडेपट्टा करारनामा ठरावा प्रमाणेच भारतीय औद्योगिक विकास बँकेच्या नांवे राहील. तसेच वार्षिक भुईभाडे, अकृषिक आकार इ. बाबी लेसी म्हणून भरण्याची जबाबदारी भारतीय औद्योगिक विकास बँकेचीच राहील.

बाब क्रमांक : १८४/११

विषय : मुंबर्द शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील संरक्षण भिंत बांधकाम कार्यक्रमासाठी रु. २.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यास कार्योत्तर मंजूर प्रदान करणे.

ठराव क्रमांक : ५७९३ **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी रु. २.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यास उपाध्यक्ष / प्रा. यांनी घेतलेल्या निर्णयास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

तसेच मा.सचिनभाऊ अहिर, आमदार यांच्या मतदार संघात तांतडीची कामे हाती घेण्यासाठी त्यांनी मागणी केल्याप्रमाणे रु. १०.०० लाख अतिरिक्त निधी म्हाडाच्या निधीमधून देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८४/१२

विषय : अभ्युदय नगर, काळाचौकी येथील इमारत क्र.२१ च्या बाजूला लागून असलेल्या दुकान क्र. एफएसएच ७-१-१-अ यांना जमिन दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयावर देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७९४ **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

अभ्युदयनगर, काळाचौकी येथील इमारत क्रमांक २१ च्या बाजूला लागून असलेल्या श्री.मोहन यशवंत घाग यांच्या दुकानाची जागा व इ.क्र.२१ च्या सहकारी संस्थेला अभिहस्तांतरणासाठी द्यावी लागणारी किमतान जागा सोडून, उर्वरित जागा (सुमारे २० चौ.मी.) श्री.मोहन यशवंत घाग यांना ३० वर्षाच्या दीर्घ मु१दतीवर भाडेपट्टयावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या जमिनीसाठी त्यांना आजच्या बाजारभावाच्या ५० टक्के रक्म अधिमूल्य म्हणून आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अशाच प्रकारचे श्रीमती पार्वती केळूसकर, स.गो.बर्वे मार्ग, नेहरुनगर व श्री.झोडे, अभ्युदयनगर, काळाचोकी यांची दोन प्रकरणे मंडळाकडे नियमितीकरणासाठी प्रलंबित आहेत व त्यांची बाब टिप्पणी प्राधिकरणासमोर सादर करण्यात आलेली नाही. त्या कप्रकरणात देखील वरील प्रमाणेच प्राधिकरणाचा निर्णय आहे. असे समजून कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८४/१३

विषय : स.गो.बर्वे मार्ग, नेहरुनगर, कुर्ला (पूर्व) या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या वेळी निष्कासित केलेल्या अनिवासी झोपडीधारकांना पर्यायी जागा देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५७९५ **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मानखुर्द येथे राजीव गांधी निवारा प्रकल्पाने बांधलेल्या इमारतीतील ९ दुकाने व एस.आर.डी.प्रकल्पांतर्गत विक्री न झालेली ४७ दुकाने अशी एकूण ५६ दुकाने स.गो.बर्वे मार्गावरील विस्थापित अनिवासी दुकानदारांना रु. २५००/- प्रति चौ.फुट या अपसेट प्राईसवर वितरीत करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्यानुसान ज्या ९२ अनिवासी झोपडीधारकांनी मंडळाकडे अर्ज केले आहेत त्या सर्वांना प्राधिकरणाच्या निर्णयानुसार देकारपत्रे पाठवावीत व एक महिन्यात निर्णय कळविण्यबाबत कळवावे. जर ५६ दुकानांपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले तर सोडत पध्दतीने या दुकानांचे वितरण करावे. ५६ पेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले तर इमारतनिहाय व दुकाननिहाय सोडत काढून वितरण करावे. उर्वरित दुकानांसाठी अपसेट प्राईस रुपये २५००/- चौरस फुट ठेऊन निविदा मागवाव्यात.

सदरहू कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८४/१४

विषय : स्वदेशी मिल, चुनाभट्टी येथील कोड क्र.१६९ मधील १०० सदनिका व कोड क्र.१७० मधील ८५ सदनिका मुंबई पोलिस दलास रु. १४००/- प्रती चौरस फुट दराने विकणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७९६ **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

स्वदेशी मिल, चुनाभट्टी येथील कोड क्र. १६९ मधील १०० सदनिका व कोड क्र. १७० मधील ८५ सदनिका मुंबई पोलीस दलास रु. १४००/- प्रति चौ.फुट (महाजोते) क्षेत्रफळ या दराने विकरण्याच्या मुंबई मंडळाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. तसेंच या व्यवहारात नफयात होणारा संभाव्य तोटा रु. २.१४ कोटी असेल याची प्राधिकरण नोंद घेत आहे.

सदरहू ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८४/१५

विषय : प्राधिकरणाच्या १८२ व्या बैठकीतील बाब क्र. १० चे कार्यवृत्त स्थायी करीत असतांना प्राधिकृत प्रॉपर्टी एजन्टसच्या बाबतीत झालेल्या चर्चेदरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांना मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५७९७ **दिनांक : ३०.०५.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

मालवणी येथिल भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या १० इमारतींपैकी ६ इमारती मे.पुजा कन्स्ट्रक्शन ॲन्ड प्रॉपर्टी कन्स्लटंटस द्वारे आरक्षित करण्यास तसेच उर्वरित ४ इमारती जर अशा प्रकारे इतर प्राधिकृत एजन्टसची मागणी आली तर त्यांना देखील मे.पुजा कन्स्ट्रक्शनला निर्गमित केलेल्या पत्रातील अटी लावून प्रथम मागणी त्यास प्रथम प्राधान्य या धर्तीवर आरक्षित करण्याच्या प्रशासनाच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाचीअंमलबजावणी इतिवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १२/०७/०२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८५ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांकः१८५/१.

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ३०/५/०२ रोजी झालेल्या १८४ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.

सदरहू विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहासमोर सादर केला.

या विषयावर चर्चा करतांना अध्यक्ष/प्राधिकरण म्हणाले कीं, कार्यवृत्ताच्या पृष्ठ क्र.२ वर नमूद केलेली दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कामकाजाची आढावा बैठक जूनच्या पहिल्या आठवडयात घेण्यांत येणार होती. परंतु कांही राजकीय गडबडीमुळे ती घेतां आली नाही. आतां ती जुलैच्या शेवटच्या आठवडयात घेण्यांत यावी व या बैठकीपूर्वी याबाबतचा संपूर्ण अहवाल मुख्य अधिकारी/दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी सादर करावा म्हणजे याबाबतची संपूर्ण माहिती बैठकीपूर्वी सर्वांना होऊ शकेल.

एम.आय.जी. क्रिकेट क्लबच्या बैठकीबाबत बोलतांना ते पुढे म्हणाले कीं, यासंबंधीची बैठक घेण्यांत आली होती व या बैठकीत ठरल्याप्रमाणे ३ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. त्यांनी याबाबतचा निर्णय १५ दिवसांच्या आंत द्यावयाचा होता तो कदाचित तयारही झाला असेल. हा अहवाल प्राप्त झाल्यावर याबाबतीत निर्णय घेण्यांत येईल. ओशिवरा आणि इतर ठिकाणी रिक्त असलेल्या गाळे वितरणाबाबत घेतलेल्या आक्षेपाबाबत सखोल चौकशी करण्यांत आली असून पणन कक्षाकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे ज्या सहकारी संस्थानी पैसे भरलेले आहेत, त्यांनी अधिकृतपणेच सर्व कार्यवाही केल्यामुळे त्यांचे वितरण रद्द करण्यांत येऊ नये व त्यांना पैसे भरण्याची ४५ दिवसांची देय मुदत देण्यात यावी.

डॉ. मांडके फाऊंडेशनला करण्यांत आलेल्या सदनिका वितरणाबद्दल आक्षेप घेतांना श्री. प्रकाश बिनसाळे, सदस्य/प्रा. म्हणाले कीं, ब्रीच कॅन्डी फाऊंडेशनला करण्यांत

यावयाच्या वितरणाबाबत शासनाला प्रस्ताव पाठविण्यांत आलेला आहे, याबाबतीत जो निर्णय घेण्यांत येईल, तोच निर्णय डॉ. मांडके फाऊंडेशनला लागू करण्यांत यावा. डॉ. मांडके यांच्या ट्रस्टला करण्यांत आलेल्या गाळयांच्या वितरणाबद्दल बोलतांना ते पुढे म्हणाले कीं, याबाबतचा निर्णय घेतांना म्हाडाच्या सदस्यांना विचारांत घेण्यांत आले नव्हते. म्हाडाचा असा कोणत्याही प्रकारचा निर्णय नसतांना सदरहू कार्यवाही करण्यांत आली आहे. या विषयावरील म्हाडाचा निर्णय झालेला नसतांनादेखील या निर्णयाची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यांत यावी. याबाबतीत सुरुवातीला कदाचित जाहिरात लवकर दिल्यामुळे या गाळयांना पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही व नंतर शिल्लक राहिलेल्या गाळयांसाठी वर्तमानपत्रातून प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर भरघोस प्रतिसाद मिळाला व शेवटी हा निर्णय बदलून सोडत काढण्याचा निर्णय घेण्यांत आला. या दिसून आलेल्या विरोधाभासामुळे हा मुद्दा उपस्थित करण्यांत आला. डॉ. मांडके फाऊंडेशनला झालेल्या वितरणाबाबत घेतलेल्या आक्षेपाचे स्पष्टीकरण करतांना ते पुढे म्हणाले कीं, डॉ. मांडके फाऊंडेशनला वितरण देण्यास कांहीच हरकत नाही परंतु, याबाबतचा झालेला ठराव व त्याची करण्यांत आलेली अंमलबजावणी यामध्ये विसंगती आहे. ठरावामध्ये केवळ अशाप्रकारचे वितरण थोक पध्दतीने सहकारी गृहनिर्माण संस्थांना करण्यांत यावे असे म्हटले आहे. एखाद्या फाऊंडेशनला नव्हे असे असतांना हे वितरण डॉ. मांडके फाऊंडेशनला करण्यांत आले आहे. याबाबतचा दाखविलेला विरोध हा डॉ. मांडके फाऊंडेशनला करण्यांत आलेल्या वितरणाबद्दल नसून याबाबतच्या झालेल्या विसंगतीबाबत आहे.

याबाबतची वस्तुस्थिती विशद करतांना उपाध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी याबाबतीतील घेतलेला निर्णय हा प्राधिकरणाच्या हिताचाच आहे, त्यामुळे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. हा प्रकल्प राबवितांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले होते. एवढेच नव्हे तर त्यांचा गोपनीय अहवाल खराब केला जाईल अशी धमकीही देण्यांत आली होती. परंतु, एकदां काम हाती घेतल्यावर ते पूर्ण झाले पाहिजे या ध्येयाने हा प्रकल्प पूर्ण करण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यांत आला व अखेरीस तो पूर्णत्वास गेला. या प्रकल्पातील सर्व गाळे विकले जातील अशी हमी शासनास दिल्यामुळे भविष्यांत सदरहू गाळे जर विकले गेले नाही तर प्रसंगी ठेकदारांकडून विकले जातील अशाप्रकारचे हमीपत्रही ठेकेदाराकडून घेतले होते. दोनदां जाहिरात देऊनही या गाळयांना प्रतिसाद मिळाला नाही व त्याच गाळयांच्या विक्रीपोटी जर गाळयांची पूर्ण किंमत एक रकमी मिळत होती. त्यामुळे सदरहू गाळे एका हॉस्पिटल-ट्रस्टसाठी हवे होते म्हणून त्यांचे वितरण करण्यांत आले.

एकंदरीत, गाळे बांधणे व विक्री करणे हे म्हाडाचे उद्दिष्ट असल्यामुळे दोनदां जाहिरात देऊनही प्रतिसाद मिळाला नाही तर प्रथम येईल त्यास प्राधान्य या तत्वावर देण्याचे प्राधिकरणाचे धोरण असल्यामुळे व त्याच गाळयांसाठी डॉ. मांडके

फाऊंडेशनकडून थोक पध्दतीने मागणी प्राप्त झाल्यामुळे सदरहू ट्रस्टला या गाळयांचे वितरण करण्यांत आले. फक्त म्हाडाचे गाळे विक्रीअभावी पडून राहून नयेत व म्हाडाचा यामध्ये अडकलेला निधी मोकळा व्हावा असा यामागील प्रामाणिक हेतू होता आणि हा निर्णय जर प्राधिकरणास मान्य नसेल तर डॉ. मांडके फाऊंडेशनला करण्यांत आलेले वितरण रद्द करण्यांत यावे.

यावर आपले मत मांडताना सभापती/मुंबई मंडळ म्हणाले कीं, डॉ. मांडके फाऊंडेशनला करण्यांत आलेले वितरण रद्द केले तर म्हाडाची तसेच शासनाची प्रतिमा डागाळली जाईल. यास्तव ब्रीच कॅन्डीला जर मान्यता दिली तर डॉ. मांडके फाऊंडेशनलाही देण्यांत यावी.

याबाबतीतील आपले मत मांडताना अध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, मागील बैठकीत आक्षेप घेण्यांत आलेल्या सहकारी संस्थाच्या वितरणाबाबत सर्व चौकशी केल्यानंतर त्यांच्या वितरणाला मान्यता देण्यांत आली आहे. डॉ. मांडके फाऊंडेशनलासुध्दा दोनदां जाहिरात देऊनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर वितरण करण्यांत आले आहे आणि म्हाडा या निष्कर्षाप्रत पोहोचली आहे कीं, गाळयांची एकदां जाहिरात देऊन जर प्रतिसाद मिळाला नाही तर प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर गाळयांचे वितरण करण्यास म्हाडाने परवानगी द्यावी. म्हाडाची घरे विक्रीअभावी पडून राहिली तर त्यांत घुसखोरी होते व नंतर त्यांची विक्री करणे अतिशय कठीण जाते. एखाद्या संस्थेने पैसे भरले असतील तर अशा संस्थेला वितरण करण्यास कांहीही हरकत नसावी. डॉ. मांडके फाऊंडेशनला ज्या धर्तीवर गाळयांचे वितरण करण्यांत आले आहे, त्याच धर्तीवर ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलला वितरण करण्याची म्हाडाने शिफारस करावी. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी घेतलेल्या बैठकीचा वृत्तांत सांगताना ते पुढे म्हणाले कीं, या बैठकीमध्ये उपस्थित असलेल्या मुंबईतील आमदारांनी लोकाभिमुख काम झाले पाहिजे व अशा कामामध्ये अडचणीं निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द कार्यवाही केली पाहिजे अशी मागणी केली. म्हाडातील अधिकाऱ्यांनी अशाप्रकारचे वितरण चुकीने केले असेल तर, निदान भविष्यांत तरी अशाप्रकारचे वितरण करावयाचे असेल तर, ते अध्यक्ष/प्रा. किंवा उपाध्यक्ष/प्रा. यांच्या नजरेस ही बाब आणावी. त्यामुळे ज्यांनी गाळयांचे पैसे भरलेले आहेत, त्यांचे वितरण रद्द करणे योग्य होणार नाही.

या मुद्दयाबाबत विचारणा करतांना प्रधान सचिव/गृहनिर्माण, सदस्य/प्रा. म्हणाले कीं, ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलला गाळे वितरणाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत आलेला आहे व डॉ. मांडके फाऊंडेशनच्या बाबतीत म्हाडाच्या पातळीवर निर्णय घेण्यांत आला या दोहोमधील फरक स्पष्ट करण्यांत यावा.

या दोहोंमधील फरक स्पष्ट करतांना पुन्हा अध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, दोनदां जाहिरात देऊन प्रतिसाद मिळाला नाही तर, प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर वितरण करण्यांत यावे असे प्राधिकरणाचे धोरण असल्यामुळे या गाळयांचे वितरण डॉ. मांडके फाऊंडेशनला करण्यांत आले. परंतु, ब्रीच कॅन्डीच्या वितरणाचा प्रस्ताव हा एकदांच जाहिरात काढल्यानंतर आल्यामुळे तो शासनाकडे पाठविण्यांत आला आहे. पुढे ते असेही म्हणाले कीं, बहुतांशी म्हाडाचे गाळे विक्रीअभावी पडून राहतात, त्यामुळे एखाद्या प्रकल्पाची एकदां जाहिरात येऊन गेल्यानंतर एखाद्या ट्रस्टची अथवा एखाद्या संस्थेची थोक पध्दतीने मागणी प्राप्त झाल्यानंतर त्यांना वितरण करण्यांत यावे अशाप्रकारचा बदल प्राधिकरणाच्या अधिनियमामध्ये करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत यावा.

अध्यक्ष/प्रा. यांनी अधिनियमामध्ये बदल करण्याच्या सुचविलेल्या प्रस्तावास प्रधान सचिव/गृहनिर्माण, सदस्य/प्रा. यांनी आपली सहमती दर्शविली.

या मुद्दयावरील चर्चेमध्ये भाग घेतांना अध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, या प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यावर ब्रीच कॅन्डीच्या प्रस्तावास मान्यता देण्यास हरकत नसावी. कारण, ब्रीच कॅन्डीला गाळयांचे वितरण करण्यांत यावे अशी भारताच्या पंतप्रधानांची शिफारस आहे. त्याशिवाय तेथे सर्वसामान्यांपासून ते भारताच्या पंतप्रधानापर्यत औषधोपचार घेतात. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या नजरेस आणून देतांना अध्यक्ष/प्रा. पुढे म्हणाले कीं, २०/२५ सदनिकां विक्रीसाठी शिल्लक होत्या, त्या सदनिकांच्या विक्रीसाठी जाहिरात न देतां त्यांचे थेट वितरणाकरीता अध्यक्ष/प्रा. व उपाध्यक्ष/प्रा. यांच्या शिफारशीने वितरीत करण्यात याव्यात, अशा सूचना संचालक/पणन यांना देऊनही स्वदेशी मिल येथील गाळयांची संचालक/पणन यांनी जाहिरात वर्तमानपत्रात दिली. त्यांनी वरीष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यांत यावी.

याबद्दलचे स्पष्टीकरण देतांना उपाध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, अध्यक्ष/प्रा. यांच्या आदेशाचा आदर ठेवूनच याबाबतीतील सदनिकांची थेट विक्री करतांनाच त्यांची जाहिरात देण्यांत यावी असे आदेश संचालक/पणन यांना दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कार्यवृत्तांतील पृष्ठ क्र. ५ वर सभागृहाचे लक्ष वेधतांना अध्यक्ष/प्रा. पुन्हा म्हणाले कीं, मागील म्हाडाच्या बैठकीत प्रत्येक म्हाडाच्या बैठकीमध्ये दोन/दोन विभागीय मंडळाचा आढावा घेण्याचे ठरले होते. परंतु, आतां या विभागीय मंडळाचा आढावा घेण्यासाठी सर्व विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांची खास बैठक घेण्यांत येईल व त्या बैठकीमध्ये सर्व विभागीय मंडळाचा आढावा घेण्यांत येईल.

कार्यवृतांतील पृष्ठ क्र.८ वर सूचना करण्यांत आल्याप्रमाणे ठेकेदार, कंत्राटदार, वास्तुशास्त्रज्ञ यांची नवीन यादी लवकरांत लवकर तयार करण्यांत यावी अशी सूचना अध्यक्ष/प्रा. यांनी केली.

कार्यवृत्तांतील पृष्ठ क्र. ११ वर दुरुस्ती सुचवितांना मुख्य अभियंता-२/प्रा. म्हणाले कीं, गृहनिर्माण भवन वांद्रे येथील आवारात मे. अर्बनिटाज आय. एन. सी. कॅनडा या कंपनीतर्फे एक प्रदर्शनीय घर उभारण्याबाबतचा विषय अमान्य न होता (तो पुढे ढकलला गेला आहे(. अशी सुधारणा करण्यात यावी. यास अध्यक्ष/प्रा. यांनी मान्यता दिली. तसेच याबाबतीत आय.आय.टी. कडून अहवाल मागवून नवीन प्रस्ताव प्राधिकरणापुढे ठेवण्यांत यावा अशी सूचना अध्यक्ष/प्रा. यांनी केली.

कार्यवृत्तांतील पृष्ठ क्र् १८ वरील अबोड कन्स्ट्रक्शनविषयी विचारणा केल्यावर विधी सल्लागार यांनी याबाबतीतील प्रगती थोडक्यांत विशद केली.

कार्यवृत्तांतील पृष्ठ क्र. २६ वर पदोन्नतीच्या व रिक्त पदे भरण्याबाबतच्या बैठकीबाबत अध्यक्ष/प्रा. यांनी विचारणा केल्यावर सचिव/प्रा. यांनी माहिती दिली कीं, कनिष्ठ सहाय्यकांच्या पदोन्नत्या प्राधिकरणाच्या स्तरावर करण्यांत आल्या आहेत. बाकीच्या पदोन्नतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

म्हाडाच्या प्रशासनाचे पुनर्रचनेचे काम विचाराधीन, आहे अशी माहिती उपाध्यक्ष/प्रा. यांनी श्री. प्रकाश बिनसाळे यांनी विचारणा केल्यामुळे दिली. यासंबंधीची माहिती म्हाडाच्या बैठकीमध्ये देण्याची विनंती यावेळी श्री. प्रकाश बिनसाळे, सदस्य/प्रा. यांनी केली.

या विषयावर वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव शासनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे पाठवावयास मान्यता दिली व कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यांत आले.

ठराव क्रमांकः ५७९८ **दिनांकः १२/७/०२.**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाने बांधलेल्या व विक्रीयोग्य असलेल्या इमारतींतील गाळयांची एकदा जाहिरात देऊन त्यास पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही तर, महाराष्ट्रातील / पदाधिकारी, सहकारी गृहनिर्माण संस्था, बॅका किंवा एखाद्या ट्रस्टने गाळयांची थोक पध्दतीने मागणी केली असेल तर व म्हाडाला त्याचा जर योग्य मोबदला

मिळत असेल व म्हाडाचे नुकसान होत नसेल तर देखील थोक पध्दतीने अशा पदाधिकाऱ्यांना, गृहनिर्माण संस्थाना, बॅकेंला किंवा एखाद्या ट्रस्टला रिक्त असलेल्या गाळयांचे वितरण करण्यास मान्यता देण्यासाठी विनियमात दुरुस्ती करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांकः-१८५/३</u>

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९९-२००० या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५७९९ **दिनांकः- १२/७/२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९९-२००० या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्वीकृत करण्यात येत आहे.

बाब क्रमांकः१८५/४

विषयः- म्हाड मिळकत व्यवस्थापन (विक्री/हस्तांतरण व गाळयांची अदलाबदल) (विनियम १९८१)मधील गाळा हस्तांतरणाबद्दलची पाच वर्षाची अट काढून टाकण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५८०० दिनांक : १२/७/२००२

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाड मिळकत व्यवस्थापन (विक्री/ हस्तांतरण व गाळयांची अदला-बदल) (विनिमय १९८१) २५ (२) मधील सहकारी संस्थांनी द्यायच्या ना हरकत प्रमाणपत्रातील ५ वर्षाची अट तसेच इतर अटी काढून टाकण्यास तसेच ज्या ठिकाणी सहकारी संस्था नोंदणीकृत झालेल्या नाहीत अशा ठिकाणी देखील मंडळाने ५ वर्षाची अट व इतर अटी काढून टाकण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच शासनाच्या दोन टक्क्यामधूनही ज्या गाळयांचे वितरण होते, त्यांच्याबाबतीत देखील सदरहू विनिमयातील ५ वर्षाची अट व इतर अटी काढून टाकण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच शासनाच्या मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १८५/५.

विषय : मराठवाडयातील सहकारी साखर कारखान्याच्या उसतोड/अस्थायी कामगारांसाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक योजना राबविणे.

ठराव क्रमांक : ५८०१ दिनांक : १२/७/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

मराठवाडयातील सहकारी साखर कारखान्याच्या ऊसतोड व अस्थायी कामगारांसाठी पुढील अटी व शर्तीवर योजना राबविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

१. विषयात नमूद केलेली योजना एजन्सी तत्वावर घेण्यात यावी. म्हाडाने कर्ज घेण्याची व परतफेड करण्याची कोणत्याही प्रकारे हमी घेऊ नये.

२. म्हाडाचा आस्थापना व इतर खर्च ५ टक्के पर्यंत धरण्यात येतो. त्यामुळे एजन्सी चार्जेज ५ टक्के घेण्यात यावे.

३. म्हाडाने आपली रक्कम यामध्ये गुंतवू नये. साखर कारखानदारांनी परस्पर कोणत्याही वित्तीय संस्थांकडून कर्ज घ्यावे.

४. योजनेतील गाळे साखर कारखानदार त्यांच्या उसतोड कामगारांना देणार आहेत. म्हणजे गाळयांचे वाटपहे लॉटरी काढून करावयाचे नसूनत्याचे वाटप कारखानदार स्वतः करणार आहेत. तर मग ही योजना ऊसतोड कामगारांसाठीनसून कारखानदारांच्यासाठी आहे असे म्हणावे. म्हणजेच ही योजना ऊसतोड कामगारांसाठी सेवानिवासस्थानम्हणून असावी.

५. ज्या ज्या सहकारी साखर कारखान्यांसाठी एजन्सी तत्वावर औरंगाबाद मंडळ काम करणार आहे, त्यांच्यासह करारपत्र करण्यात यावे. करारपत्राचा नमुना विधी सल्लागार यांच्याकडून मुख्य अधिका-यांनी मंजूर करुन घ्यावा.

६. योजनांच्या कामासाठी साखर कारखान्यांकडून म्हाडाकडे/औरंगाबाद मंडळाकडे आगाऊ भरण्यात येईल तेवढयाच रकमेची कामे करण्यात यावीत.

बाब क्रमांक : १८५/६.

विषय : मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. या कंपनीस मुंबई मंडळांतर्गत शासनाच्या आदेशानुसार कन्नमवार नगर, विक्रोळी येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्बांधणीचे काम ठोक पध्दतीने वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८०२ **दिनांक : १२/०७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

कन्नमवार नगर, विक्रोळी येथील जमिनीवर १०८ सदनिका अल्प उत्पन्न गट व ५६ सदनिका मध्यम उत्पन्न गट अंतर्गत बांधण्याच्या प्रकल्पास मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना ठोक (टर्न की) पध्दतीने देण्यास मान्यता देण्यात येते. सदनिकांची संख्या अंदाजित असून, महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष मंजूरीप्रमाणे प्रकल्प कार्यान्वित करावा. प्रकल्प १५ महिन्यांचा कालावधीत कार्यान्वित करावा.

बांधकामाचे दर खुल्या विक्रीच्या सदनिकांसाठी शासनाच्या आदेशानुसार व दर ठरविणा-या सिमितिने ठरविल्यानुसार रुपये ६७५/- प्रति चौरस फूट व त्या सोबतचे शासनाचे सुधारीत बांधकाम विनिर्देश व अटी यापूर्वीच्या योजनांप्रमाणे लागू राहातील. गाळयांचा विक्री दर रुपये १४००/- ते रुपये १५०० राहिल.

सदर काम सुधारीत विनिर्देशाप्रमाणे करण्यास मंजूरी देण्यात येते व सुधारित विनिर्देश बाब टिपणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे जास्तीत जास्त प्रति चौरस फूट रु. ५५/- ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांची व इतर अनुषंगिक सर्व कामे असे की, रस्ते, गटारे, मलनिःसारण, कंम्पाऊंड वॉल, पाणीपुरवठा, आर.जी. भूखंड व सुविधा भूखंड विकसित करणे इत्यादि कामाचे मूळ कंत्राटदार मे.बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. कंपनीकडून चालू दरसूचीनुसार करुन घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

वरील कामावर कोणत्याही प्रकारचे एस्कलेशन देय राहाणार नाही.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्रमांक : १८५/७.

विषय : टिळक नगर, चेंबूर येथील काही भूखंडांच्या वितरणात निविदेत नमूद केलेल्या पध्दती व्यतिरिक्त पध्दत अवलंबिणेबाबत..

ठराव क्रमांक :५८०३ **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

टिळक नगर, चेंबूर या वसाहतीतील भूखंडांसाठी ज्या संस्थांनी/मंडळांनी दिलेल्या जाहीरातीस अनुसरुन निविदा भरल्या आहेत त्यांना नियमाप्रमाणे भूखंड वितरण करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र ज्या सात संस्थांनी रितसर निविदा भरलेल्या नाहीत परंतु मागणी केली आहे त्या संस्थांना त्यांचे मागणी नुसार भूखंड द्यावयाचे असतील तर शासनाने त्यास मान्यता देण्यासाठी प्राधिकरणाने योग्य त्या समर्थनासह व स्पष्टीकरणासह शासनास प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८५/८.

विषय : कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वर्तक नगर व शिवाई नगर, ठाणे तसेच श्यामराव पाटील नगर, अंबरनाथ येथील योजनांचे अभिहस्तांतरण करण्यासंबंधी विशेष योजना..

ठराव क्रमांक : ५८०४ **दिनांक : १२/७/२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे कोंकण मंडळाच्या वर्तक नगर, ठाणे, शिवाई नगर, ठाणे,शामराव पाटील नगर अंबरनरथ या योजनामधील इमारती जर त्या प्रत्येक योजनातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था ही योजना जाहीर झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या कालावधीमध्ये अभिहस्तांतरीत करून घेत असतील तर अशा सहकारी गृहनिर्माण संस्थाकडून जुन्या दरानेच म्हणजे सन १९९८ चा वाढीव दर अस्तित्वात येण्याच्यापूर्वी असलेल्या दराप्रमाणेच सेवाशुल्काची आकारणी वसुल करण्यात यावी व वाढीव दराची सेवा शुल्काची आकारणी माफ करण्यास मान्यता देण्यात येते.

इमारतीचे अभिहस्तांतरण करतांना त्या वसाहतीमधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांनी अभिहस्तांतरण करुन घेणे आवश्यक राहील. तसेच त्या वसाहतीकरिता असलेली पाणी पुरवठा योजना देखील अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या महासंघाने त्यांचे ताब्यात घेणे आवश्यक राहील.

अभिहस्तांतरण करुन झाल्यानंतर संपूर्ण कर म्हणजे पाणीपट्टी,अकृषिक आकारणी, मालमत्ताकर व इतर तत्सम देणी याची सर्व जबाबदारी संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था व त्यांच्या महासंघाची राहील. याकरिता मंडळ जबाबदार असणार नाही.

उपरोक्त सहा महिन्याच्या कालावधीत जर संबंधित वसाहतीमधील रहिवाशांना वरीलप्रमाणे त्यांच्या इमारतींचे अभिहस्तांतरण करुन घेतले नाही तर त्यांचेकडून नवीनदराप्रमाणे आकारण्यात आलेली सर्व थकबाकी सक्तीने वसूल करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच यापुढे मंडळ महानगरपालिकेला पाणीपट्टीची कोणतीही देणी भरणार नाही व अशी देणी न भरल्याने वसाहतीचा पाणीपुरवठा खंडीत झाल्यास ती जबाबदारी मंडळाची असणार नाही, याची समज संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात यावी.

बाब क्रमांक : १८५/९.

विषय : विरार-बोळींज, तालुका- वसई, जिल्हा-ठाणे येथे दूरसंचार कल्याण जिल्हा महाप्रबंधक यांना सुविधा भूखंड वितरीत करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८०५ **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

कोंकण मंडळाने शिफारस केल्यानुसार विरार-बोळींज, तालुका-वसई, जिल्हा-ठाणे येथे दूरसंचार कल्याण जिल्हा महाप्रबंधक यांना वाढीव सुविधा भूखंड, दूरसंचार विभाग, कल्याण यांना विरार येथील सिडकोने मंजूर केलेल्या अभिन्यासानुसार सार्वजनिक सुविधांसाठी आरक्षित ठेवलेल्या भूखंडांचे वाढीव क्षेत्रफळ १७७३.८८ चौरस मीटर बाब टिपणी सोबतच्या परिशिष्ट क्रमांक (४) मध्ये दर्शविलेली उर्वरित रक्कम भरणा करुन व व्यावसायिक भुईभाडे आकारुन टेलिफोन एक्यचेंज व सेवा कर्मचा-यांच्या निवासस्थानासाठी म्हाडाच्या प्रचलित जमीन वितरण व किंमत विषयक धोरणाप्रमाणे देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८५/१०.

विषय : म्हाडामधील मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी या पदाची श्रेणीवाढ करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८०६ **दिनांक : १२/७/२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी या पदाची श्रेणीवाढ रुपये १२०००-३२५-१६५०० वरुन रुपये १६४००-४५०-२०९०० अशी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८५/११.

विषय : प्राधिकरणाच्या थकबाकी वसुलीसाठी कमीशन एजंट नेमणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८०७ **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील प्रादेशिक मंडळाच्या कार्यालयाकडे असलेली थकबाकी वसूल करण्यासाठी कमिशन एजंट नेमण्यास तत्वतः मान्यता देण्यात येते.

विभागीय मंडळांच्या मुख्यअधिका-यांनी कमिशन एजंट नेमणूकीची विभागवार व योजनानिहाय एजंटची कार्यकक्षा ठरवून प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा व त्यास मान्यता देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

तसेच एजंटच्या नेमणूका, त्यांचेकडून घ्यावयाची अनामत रक्कम, एजंट बरोबर करावयाचे कायदेशिर करारनामे, एजंटवर ठेवावयाची देखरेख, त्यांच्या कामाचे स्वरुप, त्यांनी हाताळावयाची कागदपत्रे, पावती पुस्तके, हिशोब ठेवणे त्यांना द्यावयाचे कमिशन इत्यादी बाबींची तपशिलवार योजना प्राधिकरणाच्या सर्व विभाग प्रमुखांच्या सल्ल्याने व मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेने अंतिम करण्यात यावी. याबाबतची सविस्तर माहिती प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावी.

बाब क्रमांक : १८५/१३.

विषय : मंडळाच्या वसाहतीतील मोकळे भूखंड सुशोभित/ देखभालीसाठी खाजगी संस्था/ सामाजिक/व्यापारी संस्था यांना परवानगी देण्याबाबत...

ठराव क्रमांक : ५८०८ **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

मंडळाच्या वसाहतीतील मोकळे भूखंड सुशोभित / देखभालीसाठी खाजगी संस्था / सामाजिक /व्यापारी संस्था यांना खालील अटींवर देण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

१. भूखंड, देखभाल व सुशोभिकरणासाठी फक्त परवानगी (ख्ड्इ्ढदद्मइ्ढ) द्यावी. भाडेपट्टा करारनामा करण्यात येऊ नये.

२. सदर भूखंडावर फक्त सुशोभिकरण व देखभाल करण्यात यावी. भूखंडावर कुठल्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. सुशोभिकरणाच्या योजनेस (आराखडयास) मंडळाची पूर्व परवानगी प्राप्त करणे संस्थेस आवश्यक आहे.

३. आवश्यक त्या स्थानिक संस्थांची (महानगरपालिका व इतर)परवानगी घेण्याची जबाबदारी संस्थेची असेल.

४. संस्थेखेरीज भूखंडाचा वापर सर्व जनतेसाठी खुला राहील.

५. भूखंडाचा वापर सर्वकाळ किंवा ठराविक वेळेसाठी सर्वसाधारण जनतेसाठी खुला ठेवावा. भूखंडाचा वापर काही ठराविक कारणासाठी सर्वसाधारण जनतेसाठी व उर्वरित कालावधी स्वतःसाठी वापर होणार असल्यास जमिनीची किंमत विकास खर्च याप्रमाणे येणा-या किंमतीच्या १० टक्के अनामत रकमेऐवजी २ टक्के लायसन्स फी घ्यावी.

६. भूखंड संस्थेने स्वतःच्या खर्चात सुशोभिकरण व देखभाल करणे आवश्यक आहे. तसेच या भूखंडासाठी स्थानिक संस्थांकडून आकारण्यात येणारे कर सुशोभिकरण करणा-या संस्थेस भरावे लागतील.

७. सदर भूखंडाची म्हाडास जेव्हा कधी गरज लागेल तेव्हा सदर भूखंड मोकळया स्थितीत म्हाडास परत करणे संस्थेवर बंधनकारक राहील. यासाठी संस्था कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई मागणार नाही किंवा संस्थेस कोर्ट कचेरी करता येणार नाही.

८. भूखंडाचा ताबा मंडळाकडेच राहील.

९. सुशोभिकरण/देखभालीची परवानगीमुळे अशा भूखंडावर संस्थेचा कुठल्याही प्रकारे हक्क राहाणार नाही. या भूखंडाची मालकी मंडळाकडेच राहील.

१०. ज्या संस्थेस भूखंड सुशोभिकरणास दिला आहे त्या संस्थेला त्यांनी बांधलेल्या भूखंडाच्या संरक्षक भिंतीवर स्वतःचाजाहिरात फलक लावण्यास परवानगी असेल.

११. सदर भूखंड ज्या संस्थेस देखभालीसाठी व सुशोभिकरणासाठी दिला आहे अशा संस्थेस हा भूखंड इतरांना हस्तांतरीत करण्याची अथवा या भूखंडामध्ये इतर संस्थांचे Interest (Third party interest) उत्पन्न करण्याचे अधिकार मूळ संस्थेस राहाणार नाहीत.

१२. भूखंडाचा वापर कुठल्याही प्रकारे रहिवाशी अथवा व्यापारी कारणासाठी अशा संस्थांना करता येणार नाही.

१३. भूखंड सुशोभिकरण व देखभालीसाठी देण्याचे अधिकार मंडळांच्या मुख्य अधिका-यांना करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र ही परवानगी फक्त तीन वर्षासाठी राहील व भूखंडाची मंडळास आवश्यकता तसेच संस्थेची कामगिरी बघून परवानगीची मुदत वाढवून देण्याचा प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे अधिकार मंडळांच्या मुख्य अधिका-यांना राहातील.

वरील सर्व अटी व शर्तीच्या अधीन राहून मंडळाच्या वसाहतीतील भूखंड सुशोभिकरण व देखभालीकरीता खाजगी व्यक्तींना अथवा सामाजिक/व्यापारी संस्थांना देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८५/१४.

विषय : श्री. प्रमोद व्ही.चुरी यांनी त्यांच्या विक्री केंद्राच्या भोवतालची वापरात असलेली जागा मिळणेबाबत केलेली विनंती.

ठराव क्रमांक : ५८०९ **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

श्री. प्रमोद व्ही.चुरी यांना दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड यांना दिलेला स्टॉल ज्या जागेवर आहे त्या जागेसह व त्यांच्या आजूबाजूच्या साधारणतः १०२४ चौरस मीटरचा भूखंड मुंबई मंडळाच्या भविष्यकालिन योजनेसाठी राखीव ठेवण्यात आला होता. हे विचारात घेता श्री. चुरी यांना त्यांचे अनधिकृत वापरात असलेले नकाशात दर्शविल्याप्रमाणे एस.टी.डी. बुथची जागा विशेश बाब म्हणून तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येते.

१. श्री. चुरी यांनी विनंती केलेली जागा दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टा कराराने देण्यात येऊ नये.

२. सध्या बुथच्या जागेकरीता जे भाडे भरण्यात येते त्याच्या साधारणतः चौपट रक्कम किंवा रुपये १०,०००/- यापैकी अधिकची रक्कम (Interest free deposit) म्हणून घेण्यात यावी. यावर व्याज देय राहाणार नाही.

३. मंडळाने नकाशात दर्शविल्याप्रमाणे श्री. चुरी यांना अनुलग्न जागेवर फक्त टेलिफोन बुथ व पत्र्याची वेदरशेड बांधता येईल.

४. ज्यावेळी मुंबई मंडळ भविष्यकालिन योजनेकरीता जागेची मागणी करेल त्यावेळी श्री. चुरी यांनी सध्या वापरात असलेला बुथ व इतर अनधिकृत वापराची परवानगी संपुष्टात येईल. त्यांची घेतलेली अनामत रक्कम परत करण्यात येईल. याबाबतचा सर्व व्यवहार दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑप-मार्केटिंग फेडरेशनलि. यांचेबरोबर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या प्रकरणी इतर आवश्यक त्या अटी व शर्ती मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी घालाव्यात.

बाब क्रमांक : १८५/१५.

विषय : हमाल मापाडी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था मुरुड, जिल्हा-लातूर यांचेसाठी घरकुल योजना राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८१० **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

हमाल मापाडी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था, मुरुड,जिल्हा- लातूर यांचेसाठी घरकुल योजना राबविणाच्या आणि उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी शासनाला पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

शासनाने पत्र क्रमांक एसएचजी-२००२/प्र.क्र.१२४/गृनिधो-१, दिनांक ६ जून, २००२ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार खालील अटींच्या अधीन राहून योजना राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही प्राधिकरणाच्या तांत्रिक विभागाने करावी.

१. प्रस्तुत योजनेसाठी शासनाचे अनुदान उपलब्ध होणार नाही.
२. प्रस्तुत योजनेसाठी हुडकोकडून देण्यात येणा-या कर्जास शासनाची कोणत्याही स्वरुपाची हमी मिळणार नाही.
३. प्रस्तुत योजनेस म्हाडाच्या नियमित योजनांप्रमाणेम्हाडाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक राहील.
४. प्रस्तुत योजनेचा लाभ हमाल मापाडी वर्गासाठीच करणे आवश्यक राहील.

बाब क्रमांकः१८५/१६.

विषयः- नवीन चंद्रपूर विकास आराखडा-
महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अंतर्गत मंजूर विकास आराखडयामधील फेरबदल प्रस्तावाबाबत.

ठराव क्रमांकः ५८११. दिनांकः१२/७/२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये प्राधिकरणाने नवीन चंद्रपूर येथील सुमारे १३९१.७१ हेक्टर एवढया घोषित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाने तयार केलेल्या तथा शासनाने दि. ३०/६/९८ व्दारे मंजूर केलेल्या विकास आराखडयामधील फेरबदलाच्या १६ प्रस्तावांपैकी अनुक्रमे प्रस्ताव क्र.२ वगळून इतर १५ प्रस्तावांना बाब टिपणीमध्ये सादर केल्यानुसार मंजूरी देण्यांत येत आहे. मंजूर फेरबदलांच्या प्रस्तावांचा तपशील सोबत परिशिष्ट १ व २ मध्ये जोडलेला आहे. या फेरबदलाच्या प्रस्तावास नागपूर मंडळाने ठराव क्र. १००४, दि. २/११/२००१ व्दारे मंजूरी दिलेली आहे. (परिशिष्ट क्र.३) हे प्राधिकरण वरील १५

फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) मधील तरतुदीनुसार फेरबदलाची कार्यपूर्ती पूर्ण करण्यासाठी मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्राधिकृत करीत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ, नागपूर यांना सदरहू फेरबदलाबाबत वर्तमानपत्रात व शासकीय राजपत्रात नोटीस प्रसिध्द करुन विहित कालावधीमध्ये जनतेकडून सूचना व हरकती प्राप्त करुन घेण्यासाठी प्राधिकृत करीत आहे व त्याचप्रमाणे सदर सूचना व हरकतीबाबत संबंधितांना योग्य वेळ देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी खालील समिती नेमण्यात येत आहे.

१.	सभापती, नागपूर मंडळ	अध्यक्ष
२.	श्री.प्रकाश बिनसाळे,सदस्य/प्रा.	उपाध्यक्ष
३.	मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ	सदस्य
४.	मंडळाचे चंद्रपूर येथील स्थायी सदस्य सहा. संचालक नगरसरचना, विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर.	सदस्य/सचिव

वरील समितीने आपला स्वयंस्पष्ट अहवाल मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना सादर करावा व सदर अहवालातील शिफारशी अंतिमतः निश्चित करण्याचे व सदर अहवाल शासनास सादर करण्याचे संपूर्ण अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदरहू फेरबदलाच्या प्रस्तावास शासनाची अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर पुढील कार्यकृती करण्याचे संपूर्ण अधिकार, मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

बाब क्रमांक : १८५/१८.

विषयः- मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या जुन्या वसाहतीमधील सेवा आकाराबाबत.

ठराव क्रमांकः ५८१२ दिनांकः-१२/७/२००२.

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या जुन्या वसाहतीमध्ये पुरविण्यांत येणाऱ्या सार्वजनिक सुविधांच्या सेवाआकारात १९९३ व १९९७ मध्ये केलेली वाढ समायोजित करण्यांत यावी व सन १९९८ पासूनची सदनिकांधारकांना कळविलेली वाढ त्यांना ज्या दिवशी कळविलेली आहे, त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांच्याकडून वसूल करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८५/१९

विषयः- मौजे मजासवाडी येथील सी.टी.एस. क्र. १७५ पैकी असलेल्या लांबोळक्या पट्टीचे अधिमूल्य ठरविण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५८१३ दिनांकः-१२/७/२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार मौजे मजासवाडी येथील सीटीएस. क्र. १७५ पैकी असलेल्या लंबोळक्या स्वरुपातील जमिनी या एस.आर.ए. योजनेतंर्गत उपलब्ध होणारा अधिकचा १.५० चटईक्षेत्र निर्देशांक विकासक त्याच्या योजनेत घेणार आहे की चटई क्षेत्रफळ विरहित फक्त जमीनच घेणार आहे याचा खुलासा विकासकाकडून घ्यावा. त्यानुसार बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केलेला विकल्प (१) किंवा विकल्प (२) विकाससकास कळविण्यास व विकासकाच्या इच्छेनुसार विकल्प स्विकारण्यास प्राधिकरण तत्वतः मान्यता देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१८५/२०.

विषय :- गृहनिर्माण भवनात भाडयाने दिलेल्या कार्यालयांच्या जागेचे भाडे निश्चित करण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५८१४ **दिनांकः १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गृहनिर्माण भवनात भाडयाने दिलेल्या कार्यालयांच्या जागेचे भाडे खालीलप्रमाणे आकारण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र.	कार्यालयाचे नांव	प्रस्तावित दर रु. प्रती चौ.फू. प्रतिमहा
१.	म्हाडाची विभागीय कार्यालये,शासकीय कार्यालये व नॅशनल लायब्ररी.	१५/-
२.	शासकीय किंवा अन्य महामंडळे(शिवशाही पुनर्वसन प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, बँक ऑफ महाराष्ट्र इ. व्यापारी कार्यालये) यांचेसाठी	३०/-
३.	कर्मचारी कल्याणकारी संघटना	१/-

बाब क्रमांक : १८५/२२.

विषय : टागोर नगर, विक्रोळी येथे बांधलेल्या तीन इमारतीतील (इ.क्र. ४१६,४१७ व ४१९) २५ टक्के राखीव गाळे (१९ निवासी अधिक ७ दुकाने) मुंबई महानगरपालिकेस रुपये ६३३/-प्र.चौ.फू. दराने हस्तांतरीत करावयाचे असल्याने मुंबई मंडळास होणारे नुकसान क्षमापित करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५८१५ दिनांक : १२/७/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार टागोर नगर, विक्रोळी येथे बांधलेल्या ३ इमारतीतील (इ.क्र.४१६, ४१७ व ४१९) २५ टक्के राखीव गाळे (१९ निवासी अधिक ७ दुकाने) मुंबई महापालिकेस रुपये ६३३ प्रति चौरस फूट दराने हस्तांतरीत करावयाचे असल्याने मुंबई मंडळास होणारे नुकसान क्षमापित करण्यास मान्यता देण्यात येते.

श्री. शरद तांबे यांच्या टागोर नगर, विक्रोळी येथील श्री. साई सिध्दी सप्तश्रुंगी सहकारी संस्थेला जे गाळे देण्याचे प्राधिकरणाने ठरवून तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. शासनाने त्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर त्या लाभधारकांना देकारपत्रे देण्यात येऊन गाळयांची किंमतही कळविण्यात येऊन १० टक्के रक्कमही त्या लाभधारकांकडून घेण्यात आली आहे. त्यामुळे प्राधिकरणाने पूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार सदर गाळे ज्या लाभधारकांनी मागणी केली होती आणि त्यांना देकारपत्रे देण्यात आली होती अशांकडून पैसे वसूल करुन १० दिवसात सदनिकेचा ताबा देण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८५/२३.

विषय : मुंबई मंडळाच्या वसाहतीतीहल सामाईक नागरी व अंतर्गत सुविधांची दुरुस्ती करणे, त्यांची पातळी उंचावणे यासाठी अतिरिक्त चटईक्षेत्राद्वारे उपलब्ध होणा-या निधीतुन निधी उपलब्ध करुन देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८१६ दिनांक १२/७/२००२

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाच्या शिफारशीनुसार आणि बाब टिपणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मंडळाच्या वसाहतीतील सामाईक, नागरी व अंतर्गत सुविधांची दुरुस्ती करणे, त्यांची

पातळी उंचावणे किंवा नवीन सुविधां उपलब्ध करुन देणे, यासाठी लागणारा खर्च अतिरिक्त चटईक्षेत्राद्वारे उपलब्ध होणा-या निधीपैकी व टी.डी. आरव्दारे मिळणाऱ्या निधीपैकी १० टक्के निधी तसेच चटईक्षेत्र/टीडीआर विक्रीमध्ये १० टक्के सरचार्ज आकारुन उपरोक्त खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८५/२४.

विषय : स.क्र.१२०, वर्सोवा येथील जानकीदेवी पब्लीक स्कूलला वितरण केलेल्या भूखंडाजवळ ग्रिनबेल्टसाठी नियोजित असलेली जमीन, देखभालीसाठी देणेबाबत.

ठराव क्रमाक : ५८१७ **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

स.नं.१२० वर्सोवा येथील जानकीदेवी पब्लिक स्कूलला वितरण केलेल्या भूखंडाजवळील ग्रिनबेल्टसाठी नियोजित असलेली जमीन खालील अटींवर देखभालीसाठी देण्यास मान्यता देण्यात येते.

भूखंड देखभाल व सुशोभिकरणासाठी फक्त परवानगी (License) द्यावी.भाडेपट्टा करण्यात येऊ नये.

१ सदर भूखंडाचे फक्त सुशोभिकरण करावे, देखभाल करण्यात यावी, भूखंडावर कुठल्याही प्रकारचे बांधकाम संस्थेस करता येणार नाही. सुशोभिकरणाच्या योजनेस (आराखडयास) मंडळाची पूर्वपरवानगी प्राप्त करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२ आवश्यक त्या स्थानिक संस्थांची (महानगरपालिका व इतर) परवानगी घेण्याची जबाबदारी संस्थेची असेल.

३ संस्थेखेरीज या भूखंडाचा वापर सर्व जनतेसाठी खुला राहील.

४ भूखंडाचा वापर काही ठराविक वेळेमध्ये सर्वसाधारण जनतेसाठी व उर्वरित कालावधीसाठी संस्था स्वतःसाठी करणार असल्यास जमीन अधिक विकास खर्च या दराने येणा-या रकमेच्या १०टक्के रक्कम अनामत म्हणून मंडळाने घ्यावी. या रकमेवर मंडळातर्फे कोणतेही व्याज देय राहाणार नाही.

५ संस्थेने भूखंडाचे स्वतःच्या खर्चाने विकास व सुशोभिकरण करणे आवश्यक राहील. तसेच अतिक्रमण होऊ नये म्हणून देखभाल करणे आवश्यक राहील. तसेच या भूखंडासाठी स्थानिक संस्थांकडून आकारण्यात येणारे कर, सुशोभिकरण करणा-या संस्थेस भरावे लागतील.

६. सदर भूखंडाची म्हाडास जेव्हा गरज लागेल तेव्हा सदर भूखंड मोकळया स्थितीत म्हाडास परत करणे संस्थेवर बंधनकारक राहिल. यासाठी संस्था कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई मागणार नाही.

७. सुशोभिकरण देखभालीच्या परवानगीमुळे अशाभूखंडावरसंस्थेचा कुठलाही प्रकारे हक्क राहाणार नाही. या भूखंडाची मालकी मंडळाकडेच राहिल.

८. सदर भूखंड ज्या संस्थेस देखभालीसाठी व सुशोभिकरणासाठी दिला आहे अशा संस्थेस हा भूखंड इतरांना हस्तांतरीत करण्याची अथवा या भूखंडामध्ये इतर संस्थांचे (Thirty Party Interest) उत्पन्न करण्याचे अधिकार, संस्थेस राहाणार नाहीत.

९. भूखंडाचा वापर कुठल्याही प्रकारे रहिवाशी अथवा व्यापारी कारणासाठी करुन देण्यात येणार नाही. असे आढळल्यास कोणतीही नोटीस न देता License आपोआप रद्द होईल व ताबा मंडळ परत घेईल.

१०. या भूखंडासाठी प्राप्त होणा-या टी.डी.आर. किंवा चटई निर्देशांकाबाबत मुंबई मंडळाचा हक्क राहिल.

बाब क्रमांकः- १८५/२५

विषयः- नर्गीस दत्त चॅरीटेबल ट्रस्ट यांना मुंबई मंडळाच्या ओशिवरा,जोगेश्वर अभिन्यासातील इस्पितळासाठी आरक्षित असलेल्या १०,००० चौ. मी. च्या भूखंडासाठी अधिमूल्य आकारण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५८१८ दिनांकः- १२/७/२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार नर्गीस दत्त चॅरीटेबल ट्रस्ट यांना मुंबई मंडळाच्या ओशिवरा-जोगेश्वरी अभिन्यासातील इस्पितळासाठी आरक्षित असलेला १०००० चौ.मी. चा शासनाने विनियम-१६ अंतर्गत वितरीत केलेल्या भूखंडाचे म्हाडा अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना तसेच म्हाडाच्या माजी अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना विनामूल्य वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या अटी व शर्तीवर नाममात्र वार्षिक भुईभाडे रु.१/- आकारुन ३० वर्षाच्या लिजवर व ३० वर्षानंतर पुन्हा नूतनीकरणाच्या अटीवर वितरीत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे तसेच यामुळे होणारा तोटा रु. ११,७०,६९,५२९/- निर्लेखित करण्यास मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १८५/२६.

विषय : मानखुर्द येथील अवितरित असलेले सर्व गाळे (सुमारे १५१ सदनिका) स्पार्क या संस्थेस विकत देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८१९ **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार मानखुर्द येथील अवितरीत असलेले सर्व गाळे सुमारे १५१ सदनिका प्रथम प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना व नंतर मुंबई पोलिसांना विकत देण्याचा प्रयत्न करावा. हे दोघेही जर या सदनिका विकत घेण्यास इच्छुक नसतील तर प्रशासनाने सूचविल्याप्रमाणे या सदनिका स्पार्क या संस्थेस विकत देण्यास बाब टिपणीत सूचविल्याप्रमाणे मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८५/२७.

विषय : १. प्रतिक्षानगर, सायन येथील इमारत क्र.६ मधील सदनिका क्र. १११ चे सदनिकाधारक श्री.पोतदार यांना रु. १२००/- प्रतिमास भाडे आकारुन सदनिकेचा ताबा मंडळास परत देण्याच्या श्री.पोतदार यांच्या विनंतीबाबत..

व

२. प्रतिक्षानगर, सायन येथे बिपिनस्मृती सह. गृह.संस्था (इ.क्र.१ व ६) बाबा रामदेवजी सह.गृह.संस्था (इ.क्र.७ व ८) व कुमकुम सह.गृह.संस्था (इ.क्र.३अ) यांना संपूर्ण विक्री किंमतीचा भरणा करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८२० **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार श्री. पोतदार यांना त्यांची प्रतिक्षानगर - सायन येथील इ.क्र.६ मधील सदनिका क्र. १११ मंडळास खालील अटींवर परत करण्यास प्राधिकरणास मान्यता देण्यात येते

अ. सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १टक्का इतकी रक्कम म्हणजेच रुपये ५६४४/- सदनिका रद्द करण्यापोटीचा आकार श्री. पोतदार यांना आकारणे.

ब. रु. १२००/- प्रमाणे मासिक भाडे श्री. पोतदार यांना ऑगस्ट, २००० पासूनते सदनिका परत करतील त्या महिन्यांपर्यंत आकारणे अधिक

क. विजेचे बिल किंवा इतर कोठलीही थकबाकी बाकी असल्यास ती आकारणे.

तसेच बिपीनस्मृती सह.गृह.संस्था (इ.क्र.१ व ६), बाबा रामदेवजी सह.गृह.संस्था (इ.क्र.७ व ८) व कुमकुम सह.गृह.संस्था (इ.क्र.३अ)या प्रतिक्षा नगर येथील मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिनांक ३०/९/२००२ पर्यंत या इमारतींची संपूर्ण विक्री किंमत भरण्यास मुदतवाढ देण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८५/२८

विषय : मुंबई मंडळाच्याप अधिपत्याखाली असलेल्या
वसाहतीत केबलचालकास टी.व्ही.केबल वाहिन्या
टाकू देण्याचे धोरण ठरविण्याबाबत...

ठराव क्रमांक : ५८२१ दिनांक : १२.०७.२००२

म्हाडाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या विभागीय मंडळांमध्ये टी.व्ही. केबलचालकास परवानगी देणेबाबत खालीलप्रमाणे सुधारीत धोरणास व कार्यपध्दतीस या ठरावाद्वारे मान्यता देण्यांत येत आहे.

१. मंडळाच्या वसाहतीमध्ये टी.व्ही. केबल व्यवसाय करण्यासाठी ज्यांना परवानगी हवी असेल, त्यांचेकडून खालीलप्रमाणे मासिक भाडे अपसेट प्राईस म्हणून निश्चित करुन, वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवाव्यात.

अ. १००० पर्यंतच्या सदनिकांसाठी	रु.	३०००/-
ब. १००१ ते २००० गाळयांसाठी	रु.	५०००/-
क. २००१ ते ३००० गाळयांसाठी	रु.	७०००/-
ड. ३००१ चे वरील गाळयांसाठी	रु.	१००००/-

जर सद्याचा केबल चालक त्या साईटसाठी प्राप्त झालेल्या उच्चतम देकाराएवढा दर मंडळास देण्यास तयार असेल तर उच्चतम दराची निविदा रद्द करुन तेथे सद्या असलेल्या केबलचालकास व्यवसाय करु देण्यास प्राधान्य देण्यांत येईल, असे निविदा सूचनेत नमूद करावे. मात्र सद्याचा केबल चालक या साईटसाठी प्राप्त झालेल्या उच्चतम निविदेतील दर देण्यास एक महिन्यात तयार झाला नाही तर केबल चालविण्याची परवानगी उच्चतम निविदादारास देण्यांत येईल असे स्पष्टपणे निविदा सूचनेत नमूद करावे. जुन्या केबलचालकास आपली नेटवर्क नवीन केबलधारकास दिलेल्या कार्यादेशाच्या दिनांकापासून पुढील एक महिन्यात काढून टाकावी लागेल. अन्यतः मंडळ अशा केबल व्यवसायिकांच्या केबल्स त्यांच्या खर्चाने व जबाबदारीवर काढून टाकेल, सामान जप्त करेल व त्या सामानासाठी जुन्या केबल चालकास कोणताही हक्क सांगता येणार नाही. जो केबलचालक कोणत्याही पध्दतीने अंतिम होईल, त्याला परवानगीपूर्वी रु. ५०,०००/- अनामत रक्कम मंडळाकडे भरावी लागेल व व्यवसाय चालू असेपर्यंत ही रक्कम मंडळाकडेच राहील.

२. वसाहतनिहाय एकच केबल चालक असावा. तथापि, एका साईटसाठी सदनिका विभागून दोन केबल चालकांनी निविदा सादर केली तर त्यास प्रत्यावह राहणार नाही.

३. या कार्यपध्दतीने निश्चित झालेल्या केबल व्यवसायिकास ३ वर्षापर्यंत याच दराने व्यवसाय करण्यास परवानगी राहील व त्यानंतर निविदा दरात प्रतिवर्षी १० टक्के प्रमाणे वाढ लागू राहील. (सरळ पध्दतीने). वरील धोरण या ठरावाच्या दिनांकापासून अंमलात येत असल्यामुळे प्राधिकरणाचे या आधीचे

ठराव क्र. ५६०१, दिनांक २९.०७.२००० व क्र. ५७०४, दिनांक २६.०६.२००१ हे निष्प्रभावीत होतील.

४. मुंबई मंडळाच्याबाबतीत तत्कालिन उपाध्यक्ष / प्रा. यांनी धोरण नसताना ज्या पांच वसाहतीत केबल चालकास अमर्यादित कालावधीपर्यंत केबल चालविण्यास परवानग्या दिल्या होत्या, त्या सर्व परवानग्या या ठरावाद्वारे रद्दबातल होतील. मात्र त्या व्यवसायिकांना त्या त्या साईटसाठी निविदा सादर करण्याची संधी उपलब्ध राहील.

५. मुंबई मंडळासाठी प्राधिकरणाने ठराव क्र. ५७०४, दिनांक २६.०६.०१ मधील परिशिष्ट "फ" मध्ये नमूद केलेल्या केबल व्यवसायिकांची परवानगी या ठरावामुळे रद्दबातल ठरेल. तथापि, या व्यवसायिकांना त्या साईटसाठी निविदा भरण्याची संधी उपलब्ध राहील.

६. के.के.व्हीजन यांना प्रथम मंडळाने व नंतर प्राधिकरणाने केलेल्या ठरावानुसार कोकरी आगार, वडाळा येथे केबल टाकण्यास परवानगी दिली होती. त्याप्रमाणे त्यांनी मंडळाकडे अनामत रक्कम भरली होती. तथापि. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे सदर केबलचालकास त्या जागेवर केबल टाकण्यास परवानगी देत नाही, असे आढळून आले आहे. त्यामुळे के.के.व्हीजन यांना निविदा न भरता वर नमूद केलेल्या अपसेट प्राईसवर मॉर्डन मिल व मातुल्य मिल किंवा ओशिवरा येथे त्यांचया इच्छेच्या साईअवर व वरील अपसेट दरानुसार केबल टाकण्यास परवानगी देण्यात यावी.

याबाबत कोणत्या वसाहतीध्मये कोणत्या केबलचालकास किती सदनिकांसाठी परवानगी दिली याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयांना कळविण्यात यावी.

बाब क्रमांक : १८५/३०

विषय : मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) येथील सी.टी.एस.क्र.६०८ (भाग) सर्व्हे नं. ३४१ (भाग) येथे संक्रमण शिबिर पुनर्विकास योजना राबविणेबाबत.

प्रारुप ठराव : ५८२२. दिनांक : १२/७/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) येथील सी.टी.एस.क्र.६०८ (भाग), सर्व्हे क्र.३४१ (भाग) येथील संक्रमण शिबिराची संयुक्त पुनर्विकास योजना प्रस्तावात नमूद केलेल्या विकसकामार्फतच राबविण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन या प्रस्तावावर प्राधिकरणाचे नुकसान होणार नाही या निर्णयाप्रत प्राधिकरण पोहोचले असून या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती शासनास करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८५/३१.

विषय : तत्कालिन जागतिक बँक प्रकल्पांतर्गत झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेखाली आकारण्यात येणा-या परिसर सुधारणा शुल्क व झोपडी दुरुस्तीसाठी दिलेल्या कर्जाच्या हप्त्यावरील विलंब शुल्काबाबत..

ठराव क्रमांक : ५८२३. दिनांक : १२/७/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या दिनांक २६/६/२००१ रोजीच्या १७७व्या बैठकीच्या ठराव क्रमांक ५७१३ अन्वये जागतिक बँक प्रकल्पांतर्गतच्या झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेतील झोपडीधारकांना परिसर सुधारणा शुल्क आणि झोपडी दुरुस्ती कर्जाचे मासिक हप्ता भरणा विलंबावर आकारण्यात आलेल्या विलंब शुल्काच्या रकमेत झोपडीधारकांना जर

संपूर्ण मूळ मुद्दल अधिक विलंब शुल्काच्या पोटी असलेल्या थकबाकीच्या रकमेपोटी ५०टक्के रक्कम सहा महिन्यात (३१/१/२००२पर्यंत) मंडळाकडे भरली तर उर्वरित ५०टक्के विलंब शुल्कापोटी आकारावयाची रक्कम त्यांना माफ करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला होता. याच निर्णयानुसार या प्रकल्पाअंतर्गतच्या झोपडीधारकांना विलंब शुल्काच्या रकमेत ५० टक्के सूट देण्याची मुदतवाढ माहे मार्च, २००३ पर्यंत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८५/३२.

विषय : भूतपुर्व जागतिक बँक प्रकल्पांतर्गत विकसित व वितरीत केलेल्या भूखंडाचे भाडेपट्टा अधिकार हस्तांतरणाच्या परवानगीबाबत.

ठराव क्रमांक : ५८२४. **दिनांकः १२/७/२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत वितरीत केलेल्या भूखंडाचे हस्तांतरणास आणि वापर बदलास प्राधिकरणाने ठराव क्र. ५६९८, दिनांक २८/५/२००१ व ठराव क्रमांक ५७५३, दिनांक २९/१/२००२ अन्वये निश्चित केलेले दंडनिय अधिमुल्य माफ करुन ठराव क्रमांक ५६९८ अन्वये निश्चित केलेले आणि खाली दर्शविण्यात आलेले अधिमुल्य आकारुन भूखंड हस्तांतरणास आणि वापर बदलास परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अक्र	भूखंड प्रकार व क्षेत्रफळ चौ.मी.मध्ये	भूखंड हस्तांतरण शुल्क			निवासीचे अनिवासी रुपांतर(सरसकट दर रुपये)
		वारस रुपये	कुटुंबातील १७ नातेवाईक रुपये	इतर वेळी रुपये	
१.अ	२१.००	१,०००/-	२,०००/-	८,५००/-	२१,०००/-
२.अ	२५.००	१,०००/-	२,०००/-	८,५००/-	२५,०००/-
३.ब	२५.००	१,०००/-	२,०००/-	८,५००/-	२५,०००/-
४.क	३०.००	२,०००/-	४,०००/-	१५,०००/-	३०,०००/-
५.ड	४०.००	३,०००/-	६,०००/-	२५,०००/-	४०,०००/-
६.इ	६०.००	५,०००/-	१०,०००/-	३५,०००/-	६०,०००/-
७.एफ	१००.००	५,०००/-	१०,०००/-	५०,०००/-	१,००,०००/-
८.जी	उच्च उत्पन्न गटांतर्गत गृहनिर्माण संस्थांच्या सदनिकेचे सभासदत्व	५,०००/-	१०,०००/-	३५,०००/-	प्राधिकरणाचा ठराव क्र.५५५३ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे दर आकारण्यात यावेत

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत वितरण केलेल्या निवासी भूखंडाचे हस्तांतरण आणि वापर बदल परवानगीच्या वेळी आकारणी करावयाच्या अधिमुल्याबाबत वरीलप्रमाणे निर्णय घेतलेला असून, या अटी व शर्ती प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ५६९८ मध्ये घेतलेल्या निर्णयाप्रमाणे राहातील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८५/३३.

विषय : भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्पांतर्गत वितरीत केलेल्या ६०,१०० चौरस मीटर क्षेत्रफळाचे वैयक्तिक भूखंड आणि उच्च उत्पन्न गटाखालील सहकारी संस्था भूखंडाच्या इमारतीतील गाळे/ सभासदत्व हस्तांतरणाचे परवानगीबाबत..

ठराव क्रमांक : ५८२५. **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

तत्कालिन जागतिक बँक प्रकल्पांतर्गत वितरण केलेल्या ६० व १०० चौरस मीटर क्षेत्रफळाचे वैयक्तिक भूखंड आणि उच्च उत्पन्न गटाखालील सहकारी संस्था भूखंडावरील गाळे /संस्थेतील सभासदत्व हस्तांतरणासाठी, लाभार्थी प्राधिकरणाची पूर्व परवानगी मागतात. त्यामुळे अशा भूखंडाचे हस्तांतरणास प्राधिकरणाने ठराव क्रमांक ५६९८ अन्वये निश्चित केलेले ६० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या वैयक्कि भूखंडासाठी रुपये ३५,०००/-, १०० चौ.मि.क्षेत्रफळाच्या वैयक्तिक भूखंडासाठी रुपये ५०,०००/- व उच्च उत्पन्न गटाखालील भूखंडावरील इमारतीतील गाळे/संस्थेतील सभासदत्व हस्तांतरणास रुपये ३५,०००/- अधिमुल्य आकारुन परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

जागतिक बँक प्रकल्पांतर्गतच्या ६०,१०० चौ.मी क्षेत्रफळाचे वैयक्तिक भूखंड आणि उच्च उत्पन्न गटाखालील सहकारी संस्था भूखंडावरील इमारतीतील गाळे/संस्थेतील सभासदत्व हस्तांतरणास संबंधित लाभार्थी प्राधिकरणाची पूर्व परवानगी मागतात. त्यामुळे ठराव क्रमांक ५६९८, दिनांक २८/५/२००१ आणि ठराव क्र. ५७५३, दिनांक २९/१/२००२ अन्वये हस्तांतरणासाठी निश्चित केलेले दंडनिय अधिमूल्य आकारण्यात येऊ नये.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८५/३४.

विषय : पुनर्रचित इमारतीमधील २७४ व इतर घुसखोरांना (पुनर्रचित गाळे व राजीव गांधी निवारा प्रकल्पातील -आर्शिवाद या इमारतीतील गाळे) प्राधिकरणाच्या या पूर्वीच्या धोरणात्मक निर्णयानुसार गाळे विक्री करण्याचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५८२६. दिनांक : १२/७/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

पुनर्रचित इमारतीतील २७४ आणि इतर घुसखोरांना (पुनर्रचित गाळे) आणि राजीव गांधी निवारा प्रकल्पातील आर्शिवाद या इमारतीतील गाळे प्राधिकरणाच्या यापूर्वीच्या धोरणात्मक निर्णयानुसार या योजनेतील समाविष्ट इमारतीतील गाळयांसाठी त्यावेळी ठरविण्यात आल्याप्रमाणे प्रथम जाहिरातीतील किंमत (रु १२००/-) च्या ३० टक्के प्रमाणे किंवा कमीतकमी रु. १.०० लाख वसूल करुन विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

ज्यांच्या नांवे गाळे नियमित केलेले असतील व ज्यांचेकडून मंडळ नियमित भाडे घेत असेल अशा भाडेकरुंवर कोणताही दंडात्मक आकार न लावता त्यांचे विरुध्दच्या कोर्ट केस काढून घेण्यात याव्यात व कोर्ट केस नंतर ज्यांचे भाडे गाळा नांवावर असून सुध्दा बंद केले असेल तर ते स्विकारण्यात यावे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ अस्तित्वात असतांना त्या मंडळातील कर्मचा-यांना तात्पुरते सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आलेले गाळे रुपये १२००/- या दराने कर्मचारी घेण्यास तयार असतील तर त्यांना ते राहात असलेले गाळे विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८५/३५

विषय : प्राधिकरणाच्या विभागीय मंडळाच्या जमिनीवरील धार्मिक स्थळांची जागा नियमित करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८२७ **दिनांक : १२.०७.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या विभागीय मंडळाच्या जमिनीवरील धार्मिक स्थळांच्या जागा त्या त्या नोंदणीकृत संस्थांच्या (धार्मिक स्थळे) निमित करण्याबाबतचा प्रस्ताव बाब टिपणीतील प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाच्या मान्यतेस पाठविण्यात यावा. शासनाकडून या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतरच अंमलबजावणी करण्यात यावी.

बाब क्रमांक : १८५/३६

विषय : प्राधिकरणाचे भाडेतत्वावर व पुनर्विकासासाठी असलेल्या वसाहतीतील रिक्त निवासी / दुकानी गाळे तात्पुरत्या भाडयाने देण्याबाबत . . .

ठराव क्रमांक : ५८२८. **दिनांक : १२/७/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

म्हाडाने संपादित केलेल्या ज्या जमिनीवर मा.न्यायालयात दावे सुरु आहेत अशा प्रकरणांची तपासणी करुन ६०:४० प्रमाणे निर्णय घेण्यासाठी प्राधिकरणास शिफारस करण्याकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येते.

१.	अध्यक्ष/प्राधिकरण	अध्यक्ष.
२.	उपाध्यक्ष/प्राधिकरण	सदस्य.
३.	संबंधित मंडळांचे सभापती	सदस्य.
४.	संबंधित मंडळांचे मुख्यअधिकारी	सदस्य सचिव

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ०३/०९/०२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८६ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १८६/४.

विषय : औसा, जिल्हा-लातूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांसाठी ५० घरांची योजना राबविणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८२९ **दिनांक : ३/९/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

औसा जिल्हा-लातूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांसाठी ५० घरांची योजना राबविण्यास मान्यता देण्यात येते.

सदर योजना एजन्सी तत्वावर घ्यावयाची असल्याने एजन्सी चार्जेसपोटी ५ टक्के शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येते. तसेच संस्थेस समाजकल्याण विभागाकडून प्राप्त होणारे अनुदान व त्या व्यतिरिक्त सभासदांनी वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याचा संपूर्ण भरणा औरंगाबाद मंडळाकडे केल्यानंतर प्रस्तावित योजना हाती घेण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८६/५.

विषय : नागपूर मंडळाने बल्लारपूर, जिल्हा-चंद्रपूर येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत मागणी अभावी रिक्त असलेले गाळे सर्व शिक्षण प्रसारक मंडळ यांना देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८३० **दिनांक : ३/९/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

नागपूर मंडळाचे बल्लारपूर, जिल्हा-चंद्रपूर येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत मागणी अभावी रिक्त असलेले १४ गाळे नागपूर मंडळाने शिफारस केल्यानुसार रुपये ९०,०००/- प्रति गाळा याप्रमाणे सर्व शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर यांना वसतीगृहासाठी वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८६/८.

विषय : राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास सन २००२-२००२ या वर्षाकरीता शासनाकडून अर्थसंकल्पित निधी म्हाडास प्राप्त होईपर्यंत रुपये २९ कोटी प्राधिकरण निधीतुन उपलब्ध करुन देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८३१ दिनांक : ३/९/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास सन २००२-२००३ या वर्षामध्ये शासनाकडून अर्थसंकल्पित निधी म्हाडास प्राप्त होईपर्यंत रुपये २९ कोटी प्राधिकरण निधीतुन उपलब्ध करुन देण्याबाबतच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८६/१३.

विषय : प्राधिकरणाच्या कर्जरोख्याच्या रकमेची नियत दिनांकापूर्वी परतफेड करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५८३२ दिनांक : ३/९/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या कर्जरोख्यांच्या रकमेची सिरिज XVI XVII XVIII नुसार रुपये ३.३० कोटी या रकमेचे कर्जरोखे संबंधित बँकास परत करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच कर्जरोखे परत करतांना मुद्दल रकमेचा भरणा करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्रमांक : १८६/१५.

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०००-२००१ या वित्तीय वर्षाचा वाषिक लेखा प्राधिकरणाचे स्विकृत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८३३. **दिनांक : ३/९/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०००-२००१ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८६/१६.

**विषय : आयकर अधिनियमावली खंड क्रमांक १०
कलम २०(अ) अन्वये म्हाडास मिळणारी
सवलत सन २००२-०३ वर्षापासून रद्द
झाल्याबाबत..**

ठराव क्रमांक : ५८३४. दिनांक : ३/९/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

आयकर अधिनियमावली खंड क्रमांक १० कलम २० (अ) अन्वये म्हाडास मिळणारी सवलत सन २००२ - २००३ वर्षापासून रद्द झालेली असली तरी त्यामध्ये केंद्र शासनाकडून सवलत मिळण्यासाठी राज्य शासनामार्फत प्रयत्न करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर बदलामुळे म्हाडाच्या लेख्यांमध्ये बदल करावा लागणार आहे. लेख्यांमध्ये नफा तोटा दाखविणे आवश्यक राहील. तसेच उत्पन्नाचे विवरणपत्र आयकर कार्यालयास सादर करावे लागणार आहे. आयकर वसूलीसाठी कायम खाते क्रमांक (पॅन) मिळवावा लागेल. त्याकरीता सनदी लेखापाल मे. के.एस. संघवी आणि कंपनी यांची या कामाकरीता तात्पुरती नेमणूक करण्यास व त्यांना दरमहा रुपये १.२५ लक्ष प्रमाणे सन २००२-२००३ या आर्थिक वर्षाकरीता प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत सर्व मंडळांकरीता मे. के.एस.संघवी आणि कंपनी यांनी मागणी केल्याप्रमाणे फी देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सन २००२-२००३ या आर्थिक वर्षाचे लेखे मार्च, २००३ नंतर तयार होणार असल्याने आयकर संबंधी पूर्ण माहिती त्यानंतर उपलब्ध होईल व ऑक्टोबर, २००३ पर्यंत रिटर्न इत्यादी दाखल करावे लागणार असल्यामुळे फी ऑक्टोबर, २००३ पर्यंत मे. के.एस.संघवी आणि कंपनीला देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८६/१७.

विषय : हुडको या वित्तीय संस्थेने घरबांधणी
<u>कार्यक्रमाकरीता दिलेल्या कर्जाचा परतावा</u>
नियत दिनांकापूर्वी करण्याबाबत..

उपरोक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहास सादर केला.

बाब टिपणीतील प्रस्तावाची सविस्तर माहिती वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी सभागृहास दिली. सविस्तर चर्चा होऊन प्राधिकरणाने,

ठराव क्रमांक : ५८३५. **दिनांक : ३/९/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

हुडको या वित्तीय संस्थेने घरबांधणी करण्याकरीता प्राधिकरणास दिलेल्या कर्जाची अदत्त रक्कम रुपये १८.१० कोटी प्रिपेमेंट चार्जेससह परत करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८६/२२.

विषय : (१) विधानसभा सदस्यांच्या नियोजित महालक्ष्मी
सहकारी गृहनिर्माण संस्था यांना महालक्ष्मी
मॉर्डन मिल कंपाऊंड येथे टाईप-२ (कोड क्र.१६६च्या)
२१ सभासदांना ४२ सदनिका वितरीत करणेबाबत..

(२) ब्रीच कँडी हॉस्पिटल ट्रस्ट यांना महालक्ष्मी
येथे टापईप-१च्या ७७ सदनिका (कोड क्र.१६५)
वितरीत करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८३६ दिनांक : ३/०९/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार मॉर्डन मिल महालक्ष्मी येथील टाईप-२ च्या ४२ सदनिका विधानसभा आमदारांच्या महालक्ष्मी गृहनिर्माण सहकारी संस्थेस रुपये २७५० प्रति चौरस फूट दराने विकण्यास म्हाड विनियम १९८१ मधील विनियम १३(२) अन्वये मान्यता देण्यात येत आहे. यासाठी जाहिरातीपूर्वी शासनाची पूर्व संमती घेण्याबद्दलची अट या प्रकरणी शासनाने क्षमापित करावी अशी शिफारस शासनास करण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे या सदनिकांसाठी प्रती चौरस फूट विक्री दरात १० टक्क्यांनी वाढ करुन सदनिका विकण्यास शासनाची मंजूरी घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

शासनाच्या निर्णयानुसार एका आमदारास ८० चौरस मीटर चटई क्षेत्रफळापेक्षा जास्त चटईक्षेत्रफळ अनुज्ञेय नसल्याने या प्रकरणी एका आमदारास दोन सदनिका वितरीत करावयाच्या झाल्यास या दोन सदनिकांचे एकत्रित चटईक्षेत्रफळ अंदाजे ८१.०० चौरस मीटर एवढे भरते. त्यामुळे वाढीव १.०० चौरस मीटरचा फरकही शासनाने क्षमापित करावा म्हणून शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते.

ठराव क्रमांक : ५८३७ दिनांक : ३/९/२००२.

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार मॉर्डन मिल महालक्ष्मी येथील टाईप-१ च्या ७७ सदनिका ब्रीच कॅन्डी हॉस्पिटल/ट्रस्ट यांना रुपये २,६२५/- प्रति चौरस फूट या दराने विकण्यास म्हाड विनियम १९८१ मधील विनियम १३ (२) अन्वये मान्यता मिळावी म्हणून शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते. त्यासाठी जाहिरातीपूर्वी शासनाची पूर्व संमती घेण्याबद्दलची अट या प्रकरणी शासनाने क्षमापित करावी अशी शिफारस शासनास करण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे या सदनिकांसाठी प्रती चौरस फूट विक्री दरात १० टक्क्यांनी वाढ करुन सदनिका विकण्यास शासनाची मंजूरी घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८६/२३.

विषय : प्राधिकरणाचे वाटप केलेले गाळे भाडयाने देण्यास गाळेधारकास काही अटी व शर्तीवर परवानगी देण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५८३८. **दिनांक : ३/९/२००२.**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाचे वाटप केलेले गाळे भाडयाने देण्यास गाळेधारकास खालील अटी व शर्तीवर परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. मुख्य अधिकारी यांनी म्हाड मिळकत व्यवस्थापन विनियम १९८१ मधील विनियम ३० (३) च्या तरतुदीनुसार गाळेधारकांना हस्तांतरण फीच्या ५ टक्के प्रति वार्षिक अधिमुल्य दिल्यास त्याचा गाळा भाडयाने देण्यास परवानगी द्यावी

अथवा

गाळेधारकाने हस्तांतरण फीच्या ५ टक्के दराने प्रतिवर्षी अधिमुल्य भरल्यास त्याने गाळा भाडयाने दिल्याबद्दल परवानगी दिली आहे असे गृहीत धरावे.

२. प्राधिकरण ठराव क्रमांक ५०८१, दिनांक १४/६/१९९४ अन्वये काळजीवाहू तत्वावर परवानगी देतांना निश्चित केलेल्या फी च्या दरामध्ये सुधारणा करुन त्या ऐवजी हस्तांतरण फीच्या दरांमध्ये सुधारणा करुन त्या ऐवजी हस्तांतरण फीच्या ५ टक्के प्रतिवर्ष अधिमुल्य सरसकट लावण्यात यावे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १७/०९/२००२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८७ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १८७/३

विषय : म्हाडा कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत कर्मचा-यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील अनधिकृत गाळेधारकांच्या नांवे गाळे नियमित करण्यासाठी धोरण ठरविणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८३९ **दिनांक : १७.०९.०२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

म्हाडा कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत कर्मचा-यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील अनधिकृत गाळेधारकांच्या नांवे गाळे नियमित करण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून प्राधिकरण मान्यता देत आहे :---

१. कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या म्हाडा कर्मचा-यांचे सहकारी गृहनिर्माण संस्थाना प्राधिकरणाचे प्रचलित धोरणानुसार आकारण्यात येणा-या फी चे दुप्पट फी आकारुन सभासद बदलीस " ना हरकत प्रमाणपत्र " मुख्य अधिका-यांनी द्यावे.

२. प्राधिरण कर्मचा-यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील गाळयांची तपासणी करण्यात यावी.

३. तपासणीत जे गाळे भाडयाने दिलेले अथवा विक्री केलेले आढळून येतील त्यांचेविरुध्द विनियमातील तसेच भाडेपट्टा करारातील अटी / शर्तीनुसार कारवाई मंडळाने करावी.

४. वरीलप्रमाणे कार्यवाहीचे अधिकार मंडळाचे मुख्य अधिका-यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

५. याशिवाय वस्तुस्थितीनुसार वेळोवेळी आवश्यक त्या अटी / शर्ती घालण्याचे अधिकारी प्राधिकरणाला राहतील.

६. कर्मचारी कल्याणकारी योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून होणा-या गाळे हस्तांतरणाची माहिती दर तीन महिन्यांनी प्राधिकरणास सादर करण्यात यावी.

बाब क्रमांक : १८७/५

विषय : शासनाने वितरीत केलेल्या कार्यालयीन इमारती अंतर्गत भूखंड प्राधिकरण ठराव क्र. ४०७६, दिनांक २.०६.१९९३ मधून वगळण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८४० **दिनांक : १७.०९.२००२**

एकमताने निर्णय घेतला आहे कीं,

१. सागरदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था यांना गांधीनगर येथे इमारत क्र. ४७ व ४८ लगतची कार्यालयीन इमारत व बल्लाळ सहकारी गृहनिर्माण संस्थेस अंधेरी येथिल कार्यालयीन इमारतीचे वाटप शासनाने विनियम १६ अंतर्गत केलेले आहे व म्हाडा कर्मचा-यांची सहकारी गृहनिर्माण संस्था (श्री.घुमकर) यांना अंधेरी येथील कार्यालयीन इमारत क्र.२ चे वाटपास शासनाने मान्यता दिलेली आहे. वरीलप्रमाणे शासनाचे आदेश व शासन मान्यता कार्यान्वित करण्यासाठी सुलभ होण्याच्या दृष्टीने वरील तिन्ही कार्यालयीन इमारती प्राधिकरणाच्या ठराव क्र. ४०७६, दिनांक २.०६.१९९३ मधून वगळण्यात येण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

२. विनियम-१६ अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या सागर दर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था व बल्लाळ सहकारी गृहनिर्माण संस्था यांना प्राधिकरणाच्या किंमतीविषयक धोरण ठराव क्र. ५६५६ व ठराव क्र. ५७६८ नुसार किंमत आकारावी व म्हाडा कर्मचा-यांच्या गृहनिर्माण संस्थेस (श्री.घुमकर) यापूर्वी कर्मचा-यांच्या गृहनिर्माण संस्थांना जे किंमतविषयक धोरण लागू केले होते त्यानुसार किंमत आकारावी.

३.तसेच ठराव क्र. ५६५६, दिनांक ५.०३.२००१ मधील पहिल्या परिच्छेदात ठराव क्र. ३०९४, दिनांक १६.११.१९९२ अन्वये निश्चित केलेल्या दरावर १० टक्के वाढ करुन येणारा दर / किंमत आकारण्यात यावी. " त्याऐवजी " ठराव क्र. ३०९४, दिनांक १६.११.१९९२ व ठराव क्र. ४०९४, दिनांक ३०.०७.१९९३ अन्वये निश्चित केलेल्या दरावर १० टक्के वाढ करुन येणारा दर / किंमत आकारण्यात यावी. " अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८७/१२

विषय : शासकीय कर्जाची एकरकमी परतफेड करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८४१ **दिनांक : १७.०९.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

केंद्र शासन तसेच भारतीय रिझर्व्हे बँक स्तरावरुन कर्जावरील व्याज कमी करण्यात आले असल्यामुळे प्राधिकरणाने प्रतिशत प्रतिवर्ष ९.२५ ते १४.५० व्याजदराने घेतलेल्या शासकीय कर्जाची उर्वरित रक्कम रुपये १५,३९,११,९००/- एकरकमती शासनास भरणा करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच सदर प्रस्ताव पाठवितांना प्राधिकरणाला लागणा-या आयकराच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारांचे होकारार्थी मत असेल तर सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची दिनांक १७.०९.२००२ रोजी संस्थगित झालेली १८७ वी बैठक दिनांक ३०.०९.२००२ रोजी पुढे चालू करण्यात आली. त्या बैठकीचे कार्यवृत्त.

विषय : विभागीय मंडळाच्या सभपतींना शाासन निर्णयाप्रमाणे बैठक भत्ता व इतर सोयी-सवलती तसेंच टॅक्सीचे बील अदा करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८४२ **दिनांक : ३०.०९.२००२**

एकमताने निर्णय घेण्यांत आला कीं,

विभागीय मंडळाच्या सभापतींना व अध्यक्षांना त्यांच्या नेमणुकीच्या दिनांकापासून १.१२.२००० चे शासन निर्णयापूर्वीच्या निर्णयाप्रमाणे बैठक भत्ता व इतर सोयी-सवलती नियमाप्रमाणे देण्यांत याव्यात. तसेच प्राधिकरणाच्या सदस्यांना बैठकीला उपस्थित राहण्यासाठी नियमाप्रमाणे टॅक्सीचे बील अदा करण्यांत यावे. प्राधिरकणासाठी ६ नवीन गाडया घेण्यात याव्यात.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८७/६

विषय : **मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. या कंपनीस मुंबई मंडळांतर्गत स.क्र.१२० वर्सोवा, मुंबई येथे उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका बांधण्याचे काम ठोक पध्दतीने वितरीत करणेबाबत.**

ठराव क्रमांक : ५८४३ **दिनांक : ३०.०९.२००२**

१. सर्व्हे क्र. १२० वर्सोवा येथील जमिनीवर उच्च उत्पन्न गटांतर्गत ७८४ सदनिका बांधण्याचे प्रकल्पबांधकाम मे.बी.जी.शिर्के कं.टे.लि. यांना ठोक पध्दतीने २१.५० एकर जमिनीबाबत शासनाचा खुलासा प्राप्त करुन देण्यात यावे. तथापि, वर दर्शविलेल्या सदनिकांच्या संख्या अंदाजित असून म.न.पा. च्या प्रत्यक्ष मंजूरीप्रमाणे कार्यान्वित कराव्यात. वरील प्रकलप १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावा व निविदांची किंमत सुमारे रु. ६४ कोटी राहील.

२. बांधकामाचे दर खुल्या विक्रीच्या सदनिकांसाठी शासनाच्या आदेशानुसार व दर ठरविणा-या समितीने ठरविल्यानुसार रु. ६७५ प्रति चौ.फुट व त्यासोबतचे शासनाचे सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी यापूर्वीच्या योजनाप्रमाणे लागू राहतील.

३. सदर काम यापूर्वीच्या योजनाप्रमाणे सुधारीत विनिर्देशाप्रमाणे करण्यास मंजूरी देण्यात येत आहे व सुधारीत विनिर्देश दर प्रति चौ.फुट रु. ५५/- इतका असावा. त्यांत सिरॅमिक टाईल फलोरिंग, ॲल्युमिनियम खिडक्या,लोखंडी सळया, ऑईबाऊंड डिस्टॅपरची सदनिकांतर्गत रंगकाम, ग्रॅनाईट किचन ओटा, वॉश बेसीन व इतर कामे यांचा समावेश राहील.

४. योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे जसे कीं, सुरक्षा भिंत, रस्ते, पाथवे, गटारे, मलनिस्सारण इ. कामे, कामाचे मूळ कंत्राटदार मे.बी.जी.शिर्के कं.टे.लि. कंपनीकडून चालू दरसूचीनुसार बी-१ करारनामा अंतर्गत करुन घेण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

५. बाब टिप्पणीत अंतर्भूत केलेल्या निर्देशातील सुधारणा करण्यांत याव्या व त्यासाठी चालू दरसूचीनुसार दर ठरविण्यांत यावेत. ती बाब दरसूचीत नसल्यास त्याचे विश्लेषण करुन सक्षम अधिका-यांकडून मंजूरी घ्यावी.

६. बांधकाम सुरु झाल्यानंतर ६ ते ८ महिन्यात नमुना सदनिका पूर्ण झाल्यानंतर कप्राधिकरणाच्या मंजूरीने जाहिरात देण्यात यावी. तसेच सदनिका विक्रीचा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात यावी.

७. सदर प्रकल्पांसाठी म्हाडाकडे उपलब्ध मानखुर्द कोकरी आगार वडाळा किंवा इतर प्रकल्पाचे हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) लागल्यास वापरुन म.न.पा. ची मंजूरी मिळावी.

८. सुविधा भुखंडावर बांधकाम करावयाचे असल्यास रु. ७३० प्रति चौ.फुट मूळ दराने करावे. काहीं जास्तीचे विनिर्देश द्यावे लागत असतील तर चालू दरसुचीनुसार करण्यांत यावे. ती बाब दरसूचीत नसल्यास त्याचे विश्लेषण करुन सक्षम अधिका-यांकडून मंजूरी घ्यावी.

९. प्रस्तावित जमिनीबाबातचा खुलासा शासनाकडून घेऊन तीन महिन्यांच्या आत महापालिकेकडून आराखडे मंजूर करुन घेऊन कामास सुरुवात करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

विषय क्रमांक : १८७/७

विषय : मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.
या कंपनीस मुंबई मंडळांतर्गत मालाड दिंडोशी
येथील सी.टी.एस.कं. ८२७ (ई) येथील सदनिका
बांधकाम ठोक पध्दतीने वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८४४ **दिनांक : ३०.०९.२०००२**

१. दिंडोशी, मालाड येथील सी.टी.एस.कं.८२७ (ई) येथील जमिनीवर १२८६ सदनिका उच्च उत्पन्न गट, ९६ रो हाऊसेस प्रकारचे बंगले व ५६ सदनिका मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्याचे प्रकलपास मे.बी.जी.शिर्के कं.टे.लि. यांना थोक पध्दतीने देण्यांत

यावे. तथापि, वर दर्शविलेल्या सदनिकांच्यासंख्या अंदाजित असून म.न.पा. च्या प्रत्यक्ष मंजूरीप्रमाणे कार्यान्वित कराव्यात. वरील प्रकल्प १८ महिन्यांच्या कालावधीत कार्यान्वित करावा. प्रकल्पाच्या निविदेची किंमत अंदाजे रु. १०१.६२ कोटी राहील.

२. बांधकामाचे दर खुल्या विक्रीच्या सदनिकांसाठी शासनाच्या आदेशानुसार व दर ठरविणा-या समितीने ठरविल्यानुसार रु. ६७५ प्रति चौ.फुट व त्यासोबतचे शासनाचे दिनांक २६.०४.२००१ चे पत्राप्रमाणे सुधारीत बांधकाम विनिर्देश व अटी यापूर्वीच्या योजनाप्रमाणे लागू राहतील.

३. सदर काम यापूर्वीच्या येाजनाप्रमाणे सुधारीत विनिर्देशाप्रमाणे करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे व सुधारीत विनिर्देश दर प्रति चौ.फुट रु. ५५/- इतका असावा. सुधारित विनिर्देशात सिनॅमिक टाईल्स फलोरिंग, ॲल्युमिनियमच्या खिडक्या , लोखंडी ग्रिल, ऑईल बाऊंड डिस्टँपर, ग्रॅनाईट किचन ओटा, वॉश बेसीन व इतर किरकोळ कामे यांचा समावेश राहील.

४. येाजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे जसे कीं, सुरक्षा भिंत, रस्ते, पाथवे, गटारे, मलनिस्सारण इ. कामे कामाचे मूळ कंत्राटदार मे.बी.जी.शिर्के कं. टे.लि. कंपनीकडून चालू दरसूचीनुसार बी-१ करारनामाअंतर्गत करुन घेण्यास मंजरी देण्यात येत आहे.

५. बाब टिप्पणीत अंतर्भूत केलेल्या विनिर्देशातील सुधारणा करण्यांत याव्यात.

६. योजना विक्रीसाठी जाहिरात काम सुरु होऊन ६ ते ८ महिन्यांच्या कालावधीनंतर नमुना सदनिका तयार झाल्यानंतर जाहिरात प्रकल्प परिमंडळातर्फे द्यावी.

७. सदर प्रकल्पासाठी म्हाडाकडे उपलब्ध मानखुर्द, कोकरी आगार वडाळा किंवा इतर प्रकल्पाचे हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) वापरुन म.न.पा. ची मंजूरी मिळवावी.

८. प्रबोधन गृहनिर्माण संस्थेस केलेले जमिनीचे वाटप रद्द करण्यांत यावे अशी शासनास विनंती करावी व त्वरित कार्यादश (वर्क ऑर्डर देणे) देण्यात यावेत.

९. प्रस्तावित जमिनीबाबतचा खुलासा शासनाकडून घेऊन तीन महिन्याच्या आंत महापालिकेकडून आराखडे मंजूर करुन घेऊन कामास सुरुवात करण्यात यावी. हा ३ महिन्यांचा कालावधी १८ महिन्या व्यतिरिक्त आहे. म्हणून वर्क ऑर्डर दिल्यापासूनचा कालावधी २१ महिने धरावा.

१०. या प्रकल्पातील गाळयांची जाहिरात देण्यापूर्वी तसेच सदनिका विक्रीचा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८७/१०

विषय : जे.व्ही.पी.डी.येथील भास्कर ऑटो गॅरेज यांना विनियम - १६ खाली वितरीत केलेल्या भूखंडाचे वितरण रद्द करण्याबाबत तसेच शेल्विक गॅस एजन्सी यांना तात्पुरत्या भाडेपट्टयावर दिलेल्या भूखंडावर निर्णय घेणे बाबत.

ठराव क्रमांक : ५८४५ **दिनांक : ३०.०९.२०००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. जे.व्ही.पी.डी.येथील भास्कर ऑटो गॅरेज यांना विनियम-१६ अंतर्गत केलेले भूखंडाचे वितरण रद्द करण्याबाबत शासनास विनंती करण्यांत यावी.

२. शेल्विक गॅस एजन्सी यांना प्रथमतः ११ महिन्यांच्या करारावर, गॅस सिलेंडर स्टोअरेजसाठी वितरीत केलेल्या भूखंडाचे वितरण तात्काळ रद्द करण्यांत यावे.

३. वरील कार्यवाही झाल्यानंतर भास्कर ऑटो गॅरेज निष्कासित करण्यांत यावे व भास्कर ऑटो गॅरेज व शेल्विक गॅस एजन्सी यांचेकडून भूखंड परत प्राप्त झाल्यानंतर या भूखंडावर मंडळाने स्वतःची योजना राबवावी.

विषय : श्री.अनिल दारशेतकर, वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ यांना सेवेत घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८४६ दिनांक : ३०.०९.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं, श्री.अनिल दारशेतकर, माजी वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ यांच्या वकीलांनी दिनांक १७.०९.२००२ च्या बैठकीत प्राधिकरणासमोर सादर केलेल्या सविस्तर निवेदनाचा विचार करुन श्री.अनिल दारशेतकर, माजी वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ यांना प्राधिकरणाच्या सेवेत परत घेण्यास मान्यता देण्यात येते.

श्री.अनिल दारशेतकर, माजी वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ यांना प्राधिकरणाच्या सेवेत परत घेण्याबाबतचे आदेश सविस्तर कारणमिमांसेसह सर्व सदस्य / प्राधिकरण आणि विधी सल्लागार / प्रा. यांनी चर्चा करुन उपाध्यक्ष / प्रा. यांचे मान्यतेने आदेश निर्गमित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८७/१३

विषय : कंत्राटदाराच्या नोंदणीचे सुधारित नियम
सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सवलतीबाबत..

ठराव क्रमांक : ५८४७ दिनांक : ५८४७

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रमांक सीएटी-१०९७/प्र.क्र.४२/इमारत २, दिनांक २९.०७.२००२ म्हाडामध्ये लागू करण्यास मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

२. याबाबत प्रत्येक वेळी अशा प्रकारचा निर्णय प्राधिकरणापुढे न आणता कंत्राटदारांच्या नोंदणीच्या नियमाबाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय / परिपत्रके जसेच्या तसे म्हाडामध्ये लागू करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र यासाठी उपाध्यक्ष / प्रा. यांची सहमतीने म्हाडामध्ये लागू करण्यात यावेत.

बाब क्रमांक : १८७/१४

विषय : योजनेच्या अंमलबजावणीसाठी मागविण्यात आलेल्या निविदेस अनुसरुन प्राप्त झालेल्या दरांबाबत वाटाघाटी न करण्याबाबत प्राधिकरणाने पारीत केलेला ठराव क्र. ५७६२, दिनांक २५.०२.२००२ बाबत पुनःश्च निर्णयार्थ प्रस्ताव..

ठराव क्रमांक : ५८४८ **दिनांक : ३०.०९.२००२**

बहुमताने निर्णय घेतला कीं, टागोर नगर, विक्रोळी येथील इमारत क्रमांक ४१७ मधील गाळे साई सिध्दी सप्तशृंगी को-हौसिंग सोसायटी सहकारी गृहनिर्माण संस्थेस प्राधिकरणाने पूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार आणि शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार दहा दिवसात वाटप करण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २९/१०/२००२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८८ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १८८/३

विषय : प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत येणा-या मंडळातील दीर्घकाळ निलंबित असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रकरणांचा आढावा.

ठराव क्रमांक : ५८४९ **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरण व प्राधिकरणांतर्गत येणा-या मंडळातील दीर्घकाळ निलंबित असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रकरणांचा आढावा घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यासाठी उपाध्यक्ष / प्राधिकरण, विधी सल्लागार / प्रा,. सचिव / प्राधिकरण तसेच ज्या मंडळाचे अधिकारी / कर्मचारी असतील त्या मंडळाचे मुख्य अधिकारी यांची समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येते. समितीने घेतलेल्या निर्णयाचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक : १८८/५

विषय : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध कायदा १९५२ चे कलम ७ ए खालील कार्यवाही..

केस नं.एमएच/२१३८५/पीएफ/इएनएफ/६/ए/८.

ठराव क्रमांक : ५८५० **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध कायदा १९५२ चे कलम ७ ए खालील कार्यवाही करण्यासंदर्भात विधी सल्लागार / प्राधिकरण यांनी ॲडव्होकेट जनरल महाराष्ट्र राज्य यांचा याप्रकरणी सलला घेऊन, शासनास पाठवावा आणि त्या अनुषंगाने उपाध्यक्ष / प्रा. व प्रधान सचिव / गृहनिर्माण यांना पुढील निर्णय घेण्याचे अधिकारी प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८८/७

विषय : ओशिवरा-जागेश्वरी (पश्चिम) सर्व्हे क्र.४१ ब (भाग) मुंबई येथील संक्रमण शिबिराच्या पुर्नबांधणी योजनेस मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८५१ **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं, ओशिवरा-जोगेश्वरी, गोरेगांव व सायन येथील संक्रमण शिबीराच्या पुनर्बांधणी योजनेस मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते तसेच यापुढे अशाप्रकारचा मुदतवाढीचा निर्णय घ्यावयाचा असल्यास त्याचे अधिकारी मुख्य अभियंता / प्रा., मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ व उपमुख्य अभियंता एस.आर.डी, यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८८/९

विषय : गझधर बांधस्किम रेसिडेन्ट येथिल पात्र झोपडपट्टीधारकांचे मौजे मालवणी न.भू.क्र.२६३/६-अ येथे पुनर्वसन करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८५२ **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गझधर बांधस्किम रेसिडेन्ट येथील पात्र झोपडपट्टीधारकांचे मौजे मालवणी न.भू.क्र.२६३/६-अ येथे पुनर्वसन करण्यास मान्यता देण्यात येते. याकरिता प्रथमतः लागणारा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यास मान्यता देण्यात येते.

उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केल्याप्रमाणे म्हाडाने फक्त मातीचा भराव टाकण्याचे काम करण्याचे व पीचेस तयार करुन ते झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयास हस्तांतरी तकरण्यास

मान्यता देण्यात येते. शासनाच्या पत्राप्रमाणे या ठिकाणी मूलभूत सुविधा पुरविण्याचे काम महापालिकेने करावे.

सदर कामे महाडातर्पे करावयाची असल्याने व ती वेळेत पूर्ण करुन घ्यावयाची असल्याने याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकारी उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८८/१०

विषय : रायगड सैनिक विद्यालय यांना वितरीत केलेला मौजे-ओशिवरा येथील स.क्र.२७ व ३७ असलेला माध्यमिक शाळा आणि खेळाच्या मैदानासाठीचा आरक्षित भूखंडाची किंमत कमी करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५८५३ **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाने शिफारस केल्यानुसार रायगड सैनिक विद्यालय यांना वितरीत केलेल्या मौजे आशिवरा येथील सर्व्हे क्र. २७ व ३७ असलेला माध्यमिक शाळा आणि खेळाच्या मैदानासाठीच्या आरक्षित भूखंडाची किंमत शासनाने विनियम १६ अंतर्गत म्हाडाचे किंमत विषयक धोरणाच्या अधिन राहून घेतला असल्याने त्यात बदल करावयाचा असल्याने त्याला विनियम १६ अंतर्गत भूखंड वितरण करण्याकरिता शासनाने गठीत केलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीचीही मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८८/११

विषय : वाल्मिकी आंबेडकर आवास (वॅम्बे) योजनेबाबतची माहिती.

ठराव क्रमांक : ५८५४ **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणा मार्फत वाल्मिकी आंबेडकर योजना राबविण्यासाठी रु. ४४.६१ कोटीचे अनुदान राज्य शासनाच्या वतीने केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यास तसेच म्हाडाचा रुपये ४४.६१ कोटीचा निधी शासनाच्या वतीने वॅम्बे खात्यात जमा करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८८/१२

विषय : हमाल मापाडी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था मुरुड, जिल्हा लातूर यांचेसाठी घरकुल योजना राबविणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८५५ **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

हमाल मापाडी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था, मुरुड, जिल्हा लातूर यांचेसाठी घरकुल योजना राबविण्यासाठी शासनहमी कर्जासाठी मिळणार नसली तरी सदर योजना मागासवर्गीयांसाठी व आर्थिक दुर्बल घटकांसाठी असल्यामुळे म्हाडाच्या निधीतून हाती घेण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८८/१३

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प एक चांदिवली टप्पा क्र.१ व २ मधील मे.अबोड कन्स्ट्रक्शन प्रकरणातील लवादाच्या अंतिम आदेशाविरुध्द मंडळातर्फे उच्च न्यायालयात दाद मागणेबाबत..

ठराव क्रमांक ५८५६ दिनांक : २९.१०.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं, गृहनिर्माण महाप्रकलप एक चांदिवली टप्पा क्र.१ व २ मधील मे.अबोड कं.कं. प्रकरणातील लवादाच्या अंतिम आदेशा प्रमाणे लवादाच्या कक्षेमधील रु. ९.४ कोटी कंत्राटदारास अदा करण्यास मान्यता देण्यांत येते.

तसेच, उर्वरित रककम रु. ६.४२ कोटीच्या क्लेम करीता न्यायालयात जाण्यास परवानगी देण्यांत येते तथापि, सदर प्रकरण कंत्राटदार येथेच मिटविण्यास तयार असेल तर उपाध्यक्ष / प्रा. व विधी सल्लागार / प्रा. व मुख्य अभियंता-२ / प्रा. यांनी कंत्राटदाराशी चर्चा करुन मिटविण्याचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८८/१४

विषय : वांद्रे (पश्चिम) येथील न.भू.क्र.अ.७९१ (भाग) ची मुंबई मंडळाची जमिन महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाला वितरीत करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८५७ दिनांक : २९.१०.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

वांद्रे (पश्चिम) येथील न.भू.क्र. अ ७९१ (भाग) ची मुंबई मंडहाची जमी रु. १/- नाममात्र भाडयाने विहित अटी व शर्तीवर महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या नांवावर करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर जमिन महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून ज्यावेळी श्री.दिलीप वेंसरकर ॲकॅडमीला खेळाच्या मैदारासाठी देण्यांत येईल त्यावेळी शासन नामनिर्देशित मुलांना तसेच म्हाडाने नाम निर्देशित केलेल्या मुलांना प्रशिक्षणासाठी प्रवेश देणे बंधनकारक राहील अशी अट घालण्यातस मान्यता देण्यात येते.

भविष्यात सी.आर.झेड.चे निर्बंध शिथिल झाल्यास सदरची जमीन इतर उपयोगासाठी वापरात येण्याची शक्यता निर्माण झाल्यास त्यावर म्हाडाचा अधिकार राहील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १८८/१६

विषय : संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान..

ठराव क्रमांक : ५८५८ **दिनांक : २९.१०.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान महाराष्ट्रात राबविण्यासाठी शासनाने बक्षीस देण्यासाठी मागणी केलेल्या रु. १० कोटीपैकी यावर्षी रु. १ कोटी प्राधिकरणाचे अंशदान म्हणून देण्यास मान्यता देण्यांत येते.

उर्वरित रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व संबंधित महापालिका यांचेकडून या येाजनेसाठी शासनाने घ्यावेत अशी विनंती शासनास करावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २६/११/२००२ रोजी दुपारी ३.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८९ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १८९/२

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प-१ चांदिवली टप्पा क्र.१ व २ मधील मे.अबोड कन्स्ट्रक्शन प्रकरणातील लवादाच्या अंतिम आदेशाविरुध्द म्हाडातर्फे उच्च न्यायालयात दाद मागणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८५९ **दिनांक : २६.११.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गृहनिर्माण महाप्रकल्प-१, चांदिवली टप्पा क्रमांक (१) (२) मधील मे.अबोड कन्स्ट्रक्शन कंपनीच्या दाव्याबाबतच्या लवादातील एकूणदेय रकमेबाबत चर्चा करुन वाटाघाटी करण्याचे अधिकार अध्यक्ष / प्रा. व उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष / प्रा. व उपाध्यक्ष / प्रा. यांच्या समितीकडून ज्या वाटाघाटी करण्यात येतील त्या प्राधिकरणासमोर अंतिम निर्णयासाठी सादर करण्यात याव्यात.

बाब क्रमांक : १८९/३

विषय : योजनेचया अंमलबजावणीसाठी मागविण्यात आलेल्या निविदेस अनुसरुन प्राप्त झालेल्या दरांबाबत वाटाघाटी न करण्याबाबत प्राधिकरणाने पारीत केलेला ठराव क्र. ५७६२, दिनांक २५.०२.२००२ बाबत पुनःश्च निर्णयार्थ प्रस्ताव..

ठराव क्रमांक : ५८६० **दिनांक : २६.११.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या दिनांक २५.०२.२००२ रोजी १८२ व्या बैठकीमध्ये पारीत केलेला ठराव क्रमांक ५७६२ रद्द करण्यात येऊन खालीलप्रमाणे सुधारित निर्णय घेण्यात आला.

प्राधिकरणाच्या विभागीय मंडळाकडून नियमातील तरतुदीप्रमाणे मागविण्यात आलेल्या निविदाच्या देकारांवर सक्षम अधिका-याने प्राधिकरणाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्णय घेताना निम्नतम दराची निविदा जर अवाजवी ठरत असेल तर ती थेटपणे फटाळण्यापूर्वी सर्वकष विचार करुन वाजवी दर काय आहे हे लक्षात घेऊन

त्याप्रमाणे निम्नतम निविदाकारासह सक्षम प्राधिका-याने वाटाघाटी करण्यास हरकत नाही. मात्र ज्याप्रकरणामध्ये वाटाघाटी करावयाच्या आहेत त्याच प्रकरणामध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या सक्षम प्राधिका-यांच्या वाटाघाटीनंतर त्यांचा प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर मंजूरीसाठी पाठविणे बंधनकारक राहील.

अ.क्र.	निविदेवर निर्णय घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी	वाटाघाटी केल्यास वरिष्ठ पातळीवर मंजूरीसाठी सादर करण्याचे अधिकारी.
१.	कार्यकारी अभियंता	उपमुख्य अभियंता
२.	उपमुख्य अभियंता	मुख्य अभियंता
३.	मुख्य अभियंता	विभागीय मंडळे
४.	विभागीय मंडळे	प्राधिकरण
५.	प्राधिकरण	प्राधिकरण.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १८९/४

विषय : चित्तरंजन नगर, घाटकोपर (पूर्व) येथील
८०३.५१ चौ.मी. व त्या बाजूचा २७०.०० चौ.मी.
असे दोन भूखंड लीजवर मिळणेबाबत.
भारतीय विद्या सभा यांची विनंती..

ठराव क्रमांक : ५८६१ **दिनांक : २६.११.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

चित्तरंजन नगर, घाटकोपर (पूर्व) येथिल ८०३.५१ चौरस मिटर आणि त्या बाजूचा २७०.०० चौरस मिटर असे दोन भूखंड प्रचलीत पध्दतीनुसार नियमानुसार भारतीय विद्या सभा, घाटकोपर यांना लिजवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच या भूखंडाच्या वितरणासाठी प्राधिरकणाच्या प्रचलित धोरणानुसार किंमत आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ५/१२/२००२ रोजी सायंकाळी ५.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १८९ व्या संलग्न बैठकीचे कार्यवृत्त.

विषय : मे.आबेड कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेबरोबर वाटाघाटीबाबत..

ठराव क्रमांक : ५८६२ **दिनांक : ०५.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं, गृहनिर्माण महाप्रकल्प-१ चांदिवली (टप्पा १ व २) मधील मे.अबोड कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी केलेल्या दाव्याबाबत लवाद श्री.एस.आर.तांबे यांनी दिलेल्या अंतिम निर्णयावर मा.ॲडव्होकेट जनरल यांनी दिलेल्या मतानुसार मा.उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यासाठी मान्यता देण्यांत येते. तसेच मा.ॲडव्होकेट जनरल यांना त्यांचे अभिप्राय देण्यासाठी मुद्दामहून पुरेसे व आवश्यक कागदपत्र देण्यात आली नसल्याचे निष्पन्न झाल्यास उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी संबंधित अधिका-यांविरुध्द उचीत प्रशासकीय कार्यवाही करावी.

उपरोक्त ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २४/१२/२००२ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १९० व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १९०/२

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १७.०९.२००२ व २९.१०.२००२ रोजीच्या १८७ व्या १८८ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव क्रमांक : ५८६३ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

शासनाकडे जुन्या गाडयांचया बदल्यात नवीन ६ गाडया घेण्यासाठी यापूर्वीच प्रस्ताव प्राधिकरणाकडून पाठविण्यात आलेला असतांना त्यास शासनाकडून अद्याप पर्यंत मंजूरी देण्यात आलेली नसल्यामुळे प्रथम प्राधिकरणाने ६ गाडया खरेदी करुन तसा प्रस्ताव शासनाच्या कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

सदर ठरावाची अंमजबलावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यतादेण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९०/३

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागातील हंगामी /
कंत्राटी पध्दतीवर नेमणूक केलेल्या
अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा ज्येष्ठतेबाबत.

ठराव क्रमांक : ५८६४ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५११७, दिनांक ३०.०८.१९९४ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक २५.०९.१९९७ च्या आदेशान्वये पदविकाधारक व पदवीधर अभियंत्यांची जी अंतिम जेष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली होती तीच यादी या ठरावानुसार अंतिम समजण्यात यावी. त्यात जागतिक बँक प्रकल्प विभागातील बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या यादीतील ज्या कर्मचा-यांची नांवे नमूद करण्यात आली नसतील ती नमूद करण्यात येऊन त्यांच्या नेमणूकीच्या दिनांकापासून सेवाजेष्ठता देण्यातयावी. त्यात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येऊ नये. ज्याकनिष्ठ अभियंता / शाखा अभियंत्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती त्यांना शासनाने तसेच न्यायालयानेदिलेल्या निर्देशानुसार विहित पध्दती अनुसरुन पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात यावी व तसे मा.न्यायालयास विधी सल्लागार / प्राधिकरण यांचेकडून कळविण्यात यावे.

तसेच प्राधिकरणाच्या जाहिरातीस प्रतिसाद देऊन नेमणूक करण्यांत आलेल्या व प्राधिकरणाच्या दिनांक ४ डिसेंबर १९८९ च्या आदेशान्वये ज्या अभियंत्यांना दिनांक १.१२.१९८९ पासून हंगामी नियम आस्थापनेवर घेऊन सन १९९७ च्या जेष्ठतासूचीत स्थान देण्यात आले आहे. त्यानंतर रितसर नेमणूक करण्यांत आलेल्या व सेवा जेष्ठतेत स्थान देऊन अंतिम केलेल्या सेवा जेष्ठतेमधील शेवटच्या अभियंत्यांच्या नंतरचे स्थान पुणे मंडळातील ४ पदविधर कनिष्ठ अभियंत्यांना देण्यांत येऊन त्यांची सेवा नियिमत करण्यास मान्यत देण्यांत येते. त्यामुळे प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ५०९९, दिनांक १४.०६.१९९४ हा रद्द समजण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९०/४

विषय : श्री.एस.ई.फर्नांडिस, उपअभियंता यांचे विरुध्द करण्यात आलेली विभागीय चौकशी.. अंतिम आदेशा विरुध्द अपिल.

ठराव क्रमांक : ५८६५ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्री.एस.ई.फर्नांडीस, उप-अभियंता यांना उप-अभियंता या पदावरुन पुढील ५ वर्षाकरिता खालच्या पदावरर पदावनत करुन सदर पदावनत कालावधीत कोणत्याही प्रकारे वेतनवाढ देण्यात येऊ नये. हा कालावधी संपल्यानंतर त्यांना त्या पदावर व त्याच वेतनावर पुर्नःस्थापित करण्यात यावे व रजेचा कालावधी त्यातून वगळण्यात यावा अशी जी शिक्षा ठोठावण्यात आली होती त्यापैकी २ वर्षाची शिक्षा त्यांनी उपभोगली असल्यामुळे पुढी ३ वर्षाची शिक्षा कमी करुन त्यांना त्यांच्या मूळ पदावर व त्या पदाच्या त्यावेळच्या वेतनावर पुर्नःस्थापित करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९०/५

विषय : प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८६६ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकांमध्ये अथवा शासनमान्य संस्थांमध्ये अतिरिक्त निधी गुंतविण्यात यावा व त्याची माहिती प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीत माहितीसाठी सादर करण्यात यावी. तसेच पूर्वीच्या ठरावानुसार गुंतवणूकीचे अधिकारी मा.उपाध्यक्ष / प्राधिरकण यांना प्रदान केल्याप्रमाणे यापुढे देखील ते स्थायी समजण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९०/६

विषय : महाराष्ट्र आयुर्वेदिक मेडिकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशन यांना, मुंबई मंडळाने उन्नत नगर, गोरेगांव येथे भाडेपट्टयावर दिलेल्या भूखंडावर त्यांनी बांधलेल्या इमारतीतील पहिला मजला, निवासी कारणासाठी वापरु देण्यास परवानगी व दुसरा मजला मालकी तत्वावर विकू देण्यास परवानगी देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५८६७ दिनांक : २४.१२.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र आयुर्वेदिक मेडिकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशनला उन्नत नगर, गोरेगांव येथे कुटुंब कल्याण व धर्मार्थ दवाखान्यासाठी मुंबई मंडळाने ठराव क्र. २३८३, दिनांक १७.०८.२००२ अन्वये शिफारस केल्यानुसार मान्यतादेण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९०/७

विषय : प्राधिकरणाचे अधिकारी / कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती पगारातून देण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५८६८ दिनांक : २४.१२.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीपोटी देण्यात येणारे रुपये ५,०००/- मध्ये वाढ करुन रुपये ६,०००/- सन २००३-२००४ या वित्तीय वर्षापासून करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सदर वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दरमहा रुपये ५००/- प्रमाणे वेतन देयकातून वैद्यकीय भत्ता म्हणून अदा करण्यास मान्यता देण्यात येते. या ठरावाची अंमलबजावणी करुन तसा प्रस्ताव शासनास कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच २७ तांतडीच्या गंभीर आजारांसाठी सद्यःस्थितीती जे रुपये २०,०००/- या रकमेस सिमित राहून शासन निर्णयातील तरतुदीनुसार खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते ती यापुढे तशीच चालू ठेवण्यात यावी. याशिवाय ५ अतिगंभीर आजारांसाठी खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास त्यासाठी होणारा खर्च शासकीय रुग्णालयातून प्रमाणीत करुन घेऊन शासकीय रुग्णालयात जो खर्च आला असता त्या खर्चास सिमित करुन वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व अग्रिम शासन निर्णयानुसार अदा करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९०/८

विषय : श्री.बी.के.गुरव, मिळकत व्यवस्थापक (सेवानिवृत्त)
यांचे विरुध्द करण्यात आलेली विभागीय चौकशी..
अंतिम आदेशा विरुध्द अपील.

ठराव क्रमांक : ५८६९ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्री.बी.के.गुरव, मिळकत व्यवस्थापक (सेवानिवृत्त) यांना देण्यात आलेली शिक्षा कमी करुन दिनांक ५.०१.२००२ चे मा.उपाध्यक्ष / प्रा. यांचे आदेश क्र. २४३ रद्द करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच दिनांक २६.०२.२००१ ते ७.०१.२००२ पर्यंतचा निलंबनाचा कालावधी क्षमापीत करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच श्री,गुरव, मिळकत व्यवस्थापक यांना सहाय्यक मिळकत व्यवस्थापक या पदावर कार्यरत असतांनाचे अखेरदचे वेतन कमी न करता मिळकत व्यवस्थापक यापदाच्या वेतनश्रेणीमधील दिनांक १.०८.२००१ रोजी देय असलेली एक वेतनवाढ त्यांच्या सेवानिवृत्ती पर्यंतच्या कालावधी पर्यंत रोखण्यात येऊन त्यांची वेतन निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे वेतन निश्चित करुन त्यांना थकबाकीसह इतर देय रकमा देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक १९०/९

विषय : श्री.जे.जी.जाधव, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक
(सेवानिवृत्त) यांचे विरुध्द करण्यात आलेली
विभागीय चौकशी..
अंतिम आदेशा विरुध्द अपील..

ठराव क्रमांक : ५८७० **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला की,

श्री.जे.जर.जाधव, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक (सेवानिवृत्त) यांना दिनांक २५.०६.२००२ च्या उपाध्यक्ष / प्रा. यांच्या आदेशान्वये देण्यात आलेली शिक्षा कमी करुन या कालावधीत त्यांची सहाय्यक मिळकत व्यवस्थापक या पदाचे वेतनश्रेणीतील तसेच श्री.जाधव, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक यांना या पदावर कार्यरत असतांनाचे अखेरचे वेतन कमी न करता सहाय्यक मिळकत व्यवस्थापक या पदाच्या वेतनश्रेणीमधील दिनांक १.११.२००१ रोजीदेय असलेली एक वेतनवाढ त्यांच्या सेवानिवृत्ती पर्यंतच्या कालावधी पर्यंत रोखण्यात येऊन त्यांची वेतन निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे वेतन निश्चिती करुन त्यांना थकबाकीसह इतर देय रकमा देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९०/१०

विषय : श्री.रमेश रा. चव्हाण, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) मुंबई मंडळ यांचे विरुध्द करण्यात आलेली विभागीय चौकशी.. अंतिम आदेशा विरुध्द अपील.

ठराव क्रमांक : ५८७१ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्री.रमेश रा.चव्हाण, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त), मुंबई मंडळ यांना प्रस्तावित केलेली शिक्षा कमी करुन त्यांचेकडून वसूल करण्यात यावयाच्या रकमेपोटी २५ टक्के रक्कम वसूल करण्यात यावी व पुढील फौजदारी कार्यवाही थांबविण्यात यावी.

बाब क्रमांक : १९०/१२

विषय : मुंबई मंडळाच्या मालकीची वांद्रे (पश्चिम) येथील न.भू.क्र.७९१-अ पैकी असलेलीजमीन वांद्रे-वरळी सागरी महामार्गाकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास भाडेपट्ट्याने वितरीत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८७२ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक दिनांक ५८५७, दिनांक २९.१०.२००२ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास विशिष्ट आदेश दिलेले नसल्याने भुईभाडे करारनामा न होताही जमिनीचा ताबा व त्या अनुषंगाने मालमत्तेवर भाउेपट्टेदार म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे नांव लावण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता मिळेल असे गृहीत धरुन प्रशासनाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सदर जमिनीवर महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे नांव दाखल करण्यास हरकत नसल्याचे पत्र दिले आहे त्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : १९०/१३

विषय : सर्व्हे नं. ४०९, सदर बाजार, सातारा येथे ५४ गाळे (६६ गाळयांपैकी) मध्यम उत्पन्न गट बांधण्याची योजना - निविदेवर निर्णयार्थ प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५८७३ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पुणे मंडळाने बैठक क्रमांक १४३, दिनांक २९.११.२००२ अन्वये केलेला ठराव क्र. ७५० या ठरावान्वये रद्द करण्यात येत असून सर्व्हे क्र. ४०९,सदर बाजार (सातारा) येथे ५४ एम.आय.जी. गाळयांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या व निविदा किंमतीपेक्षा १०.५१ टक्केने कमी (रुपये ८१,८५,०३८/-) असणारा मे.सी.बी.ॲन्ड सन्स यांचा देकार स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९०/१४

विषय : सर्व्हे नं. ४०९, सदर बाजार येथे १४४ गाळे अल्प उत्पन्न गट बांधण्याची योजना निविदेवर निर्णयार्थ प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५८७४ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पुणे मंडळाने बैठक क्रमांक १४३, दिनांक २९.११.२००२ अन्वये केलेला ठराव क्रमांक ७५६ या ठरावान्वये रद्द करण्यात येत असून सर्व्हे क्रमांक ४०९, सदर बझार, सातारा येथील १४४ एम.आय.जी. गाळयांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या व निविदा किंमतीपेक्षा १०.५१ टक्क्यांनी कमी (रु. १,००,८९,१८८.५२) असणारा म.सी.बी.ॲन्ड सन्स यांचा देकार स्विकारण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९०/१५

विषय : सर्व्हे क्र. ७२०, कोल्हापूर करवीर येथील व्यापारी व रहिवाशी गाळयांचीइमारत निविदा स्विकृतीचा प्रस्ताव..

ठराव क्रमांक : ५८७५ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पुणे मंडळाने बैठक क्रमांक १४३, दिनांक २९.११.२००२ अन्वये केलेला ठराव क्रमांक ७६१ या ठरावान्वये रद्द करण्यात येत असून सर्व्हे क्र. ७२०, करवीर कोल्हापूर येथील वाणिज्य व रहिवाशी गाळयांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेला व निविदा किंमतीपेक्षा ९.९९९ टक्क्यांनी कमी (रु. ५७,७५,३८०.३७/-) असणारा मे.परेश कन्स्ट्रक्शन यांचा देकार स्विकारण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९०/१६

विषय : अल्प उत्पन्न गट ११० गाळे गट नं. ७०८ अक्कलकोट, सोलापूर निविदेवर निर्णयार्थ प्रस्ताव..

ठराव क्रमांक : ५८७६ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पुणे मंडळाने बैठक क्रमांक १४३, दिनांक २९.११.२००२ अन्वये केलेला ठराव क्रमांक ७५८ या ठरावान्वये रद्द करण्यात येत असून गट क्रमांक ७०८, अक्कलकोट सोलापूर येथील ११० एल.आय.जी. गाळयांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या व निविदा किंमतीपेक्षा ८.२१ टक्क्याने कमी (रु. ७४,९४,८२८/-) असणारा श्री.सतिश कुमार एस.कलमानी यांचा देकार स्विकारण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

विषय : १. श्रीमती कविता पांडुरंग उतेकर यांचे प्रती कारगिल. युध्दामध्ये मृत्यु पावल्यामुळे त्यांना २टक्क्यामधून पुणे मंडळाच्या लक्ष्मीनगर मध्ये गाळा देण्याबाबत.

२. शासनाच्या निर्देशाप्रमाणे वाटप करावयाच्या २ टक्के गाळयांबाबत.

ठराव क्रमांक : ५८७७ **दिनांक : २४.१२.२००२**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्रीमती कविता पांडुरंग उतेकर यांना, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे पुणे मंडळाच्या लक्ष्मीनगर वसाहतीतील तळमजल्यावरील रिक्त असलेला एक गाळा खास बाब म्हणून प्राधिकरणाने ठरविलेली किंमत आकारुन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच यापुढे अशा प्रकारे युध्दामध्ये मृत्यु पावलेल्या कोणत्याही सैनिकांचे वारसांकडून

गाळयांसाठी मागणी आल्यास त्यांना प्राधान्याने प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार किंमत आकारुन गाळयांचे वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच प्राधिकरणाने बांधलेल्या वसाहतीतील २ टक्के गाळे शासनाला कळविण्यात आल्यानंतर दोन वर्षामध्ये शासनाकडून त्या गाळयांचे वाटप करण्यात न आल्यास सदर गाळे प्राधिकरणाने प्रचलित गाळेवाटपाच्या नियमाप्रमाणे वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १४/०२/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १९१ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १९१/१३

विषय : प्राधिकरणाच्या पदाधिकारी / अधिकारी कर्मचा-यांना म्हाडा रौप्यमहोत्सवी वर्षानिमितत भेटवस्तू देणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८७८ दिंनाक : १४.०२.२००२

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे म्हाडाचा रौप्यमहोत्सवी कार्यक्रम दिनांक १९.०२.२००३ रोजी दुपारी ३.०० ते ६.०० या वेळात करण्यास तसेच रौप्यमहोत्सवा निमित्ताने म्हाडाचे बोधचिन्ह असलेला ४ ग्रॅमचा (२४ कॅरेट) सोन्याचा सिक्का प्रत्सेक पात्र कम्रचा-यांस व प्राधिकरणाचे मंडळाचे सर्व सदस्य यांस भेटवस्तू म्हणून देण्यास येणा-या अंदाजित रु. ८२,९०,४८०/- आणि कार्यक्रम आयोजनाचा खर्च रु. ५.०० लाख या खर्चास मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १४/०२/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित केलेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे प्राधिकरणाची १९१ वी संलग्न बैठक दिनांक २०.०२.२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १९१/४

विषय : मंडळाच्या वसाहतीतील मोकळे भूखंड सुशोभित/ देखभालीसाठी खाजगी संस्था/सामाजिक/व्यापारी संस्था यांना परवानगी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८७९ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाने ठराव क्रमांक ५८०८ दिनांक १२.०७.२००२ अन्वये घेतलेला निर्णय रद्द करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :---

मंडळाच्या वसाहतीतील मोकळे भूखंड सुशोभित / देखभालीसाठी खाजगी, सामाजिक, व्यापारी संस्था यांना खालील अटींवर देण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे :---

१. भूखंड, देखभाल व सुशोभिकरणासाठी फक्त परवानगी (लायसन्स) द्यावी. दिर्घ मुदतीचा भाडेपट्टा करारनामा करण्यात येऊ नये.

२. सदर भूखंडावर फक्त सुशोभिकरण व देखभाल करण्यांत यावी. भूखंडावर कुठल्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. तसेच सदरहू भूखंडाचा कोणत्याही प्रकारचा गैरवापर करता येणार नाही. या भूखंडावर कोणत्याही प्रकारचा गैरवापर झाल्यास न्यायालयात न जाता सदरहू भूखंड सुशोभिकरणासाठी दिलेली परवानगी रद्द करण्यांत येईल.

३. भूखंड सुशोभिकरण व देखभालीसाठी देण्याचे अधिकार मंडळाच्या मुख्य अधिका-यांना देण्यासमान्यता देण्यांत येते. ही परवानगी केवळ तीन वर्षापुरतीच मर्यादित राहील. तीन वर्षानंतर या परवानगीचे नुतनीकरण करणे आवश्यक राहील व याची जबाबदारी मंडळाच्या मुख्य अधिका-यांवर सोपविण्यांत यावी. भूखंडाची मंडळास आवश्यकता तसेंच त्या जागेचा गैश्रवापर होत नाही हे पाहूनच पुढील नुतनीकरण करण्याचे प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे अधिकारी मंडळांच्या मुख्य अधिका-यांना राहातील. प्रत्येक नुतनीकरणाचे वेळी सदर जागेवर बांधकाम अथवा अतिक्रमण झालेले नाही. तसेच जागेचा गैरवापर झालेला नाही, असे प्रमाणपत्र संबंधित कार्यकारी अभियंत्यांकडून घेण्यात यावे.

४. सुशोभिकरणाच्या योजनेस (आराखडयास) मंडळाची पूर्वपरवानगी प्राप्त करणे संस्थेस आवश्यक आहे.

५. आवश्यक त्या स्थानिक संस्थांची (महानगर पालिका व इतर) परवानगी घेण्याची जबाबदारी संस्थेची असेल.

६. शाळेसाठी दिलेल्या जागेच्या बाबतीत शाळेच्या वेळा सोडून शाळेच्या सोयीप्रमाणे सकाळी २ तास व संध्याकाळी ३ तास अशी वेळ सर्वसाधारण जनतेसाठी देण्यांत यावी व शाळा सोडून इतर जागांसाठी सकाळी ३ तास व संध्याकाळी ३ तास अशी वेळ देण्यांत यावी. यामधील योग्य वेळ निवडण्याची जबाबदारी त्या त्या संस्थेची राहील.

७. मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीतील जागांसाठी रु. १००/- प्रती चौ.मी. इतर महानगर पालिकेच्या हद्दितील जागांसाठी रु. ५०/- व नगर पालिकेच्या हद्दितील जागांसाठी रु. २५/- या दराने अनामत रक्कम घेण्यांत यावी. दरवर्षी १/- रुपया नाममात्र दराने लायसन्स फी घ्यावी.

८. या भूखंडावर माहिती देणारा जाहिरात फलक हा फक्त ६'' x ४'' आकाराचा मोठा राहील व इतर पाटया ९'' x १८'' या आकाराच्या रहातील. त्या दर १० मीटरच्या अंतराने बसविण्यास परवानगी देण्यांत यावी.

९. भूखंड संस्थेने स्वतःच्या खर्चाने सुशोभिकरण व देखभाल करणे आवश्यक आहे. तसेच या भूखंडासाठी स्थानिक संस्थांकडून आकारण्यात येणारे कर सुशोभिकरण करणा-या संस्थेस भराव लागतील.

१०. सदर भूखंडाची म्हाडास गरज लागल्यास सदर भूखंड मोकळया स्थितीत म्हाडास परत करणे संस्थेवर बंधनकारक राहील. यासाठी संस्था कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाईची मागणी करणार नाही किंवा संस्थेस ही बाब न्यायालयात नेता येणार नाही.

११. सुशोभिकरण / देखभालीच्या परवानगीमुळे अशा भूखंडावर संस्थेचा कुठल्याही प्रकारे हक्क राहाणार नाही. या भूखंडाची मालकी मंडळाकडेच राहील.

१२. सदर भूखंड ज्या संस्थेस देखभालीसाठी व सुशोभिकरणासाठी दिला आहे अशा संस्थेस हा भूखंड इतरांना हस्तांतरीत करण्याचे अथवा या भूखंडामध्ये इतर संस्थांचे हक्क (Third party Interest) निर्माण करता येणार नाहीत.

वरील सर्व अटी व शर्तींच्या अधीन राहून मंडळाच्या वसाहतीतील भूखंड सुशोभिकरण व देखभालीकरिता खाजगी व्यक्तींना अथवा सामाजिक / व्यापारी संस्थांना देण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९१/५

विषय : प्रतिक्षानगर, सायन येथील इमारत क्रमांक १,६,७,८ व ३अ मधील सदनिका मागासवर्गीय सहकारी संस्थांना वितरीत करण्यासंबंधी प्राधिकरणाने घेतलेले निर्णय आणि त्यासंबंधात संबंधित इमारतींच्या संस्थांनी आवश्यक अटींची प्रतिपूर्ती न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द घ्यावयाच्या कारवाईबाबत.

ठराव क्रमांक : ५८८० **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने असा निर्णय घेतला कीं,

प्रतिक्षा नगर, सायन येथिल इमारत क्र. १,६,७,८ व ३-अ येथील सदनिकांची विक्री मागासवर्गीय घटकांच्या नियोजित सहकारी संस्थांना ज्या दराने विक्री करण्यात आल्या त्या दरात कपात करण्याची विनंती मान्य करण्यात येऊ नये. तथापि, या संस्था

मागासवर्गीय घटक असलेल्या सदस्यांच्या संस्था असल्याने या संस्थांना शासनातर्फे जे रुपये १,३५,०००/- चे अनुदान प्राप्त होणार होते. त्यापैकी ५० टक्के अनुदान म्हणजेच रुपये ६७,५००/- प्रती सदनिका इतके अनुदान म्हाडातर्फे देण्यात यावे.

या संस्थांना रुपये १,३५,०००/- चे जे अनुदान शासनाकडून प्राप्त होणार होते त्यासाठी म्हाडाने पुन्हा आपल्या स्तरावर प्रयत्न करावेत. शासनाकडून अनुदान मंडळास प्राप्त झाले तर म्हाडातर्पु अनुदान स्वरुपात देण्यात आलेले रुपये ६७,५००/- (प्रति सदनिका) समायोजित करण्यात यावे. प्रशासनाने या संस्थांच्या मुख्य प्रवर्तकांना प्राधिकरणाचा हा निर्णय त्वरित लेखी स्वरुपात कळवावा.प्रशासनाने पत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसानंतर या ठरावाच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु करण्यात यावी. या संस्थांच्या सदस्यांनी म्हाडाकडे भरावयाची उर्वरित विक्री किंमत त्यांना पत्र निर्गमित झाल्याच्या ८ व्या दिवसांपासून ९० दिवसांचे आत भरणे बंधनकारक राहील. असे करीत असतांना प्रत्येक सदस्यान भरलेले रुपये १,००,०००/- हे अंतिम विक्री किंमतीत समायोजीत करण्यात येतील. ९० दिवसानंतर जे सदस्य आपल्या सदनिकेची विक्री किंमत भरणार नाहीत त्यांचे विरुध्द निष्कासनाची कार्यवाही करण्यात यावी.

विक्री किंमतीचा भरणा करेपर्यंतच्या महिन्यांपर्यंत या संस्थांच्या सदस्यांना दरमहा रुपये १२०० या दराने भाडे मंडळाकडे भरावे लागेल. तसेच या संस्थांमधील जे सदस्य वरील निर्णयाशी सहमत असतील अशा सदस्यांकडून या सर्व अटी मान्य असल्याचे हमीपत्र रुपये २०/- च्या मुद्रांकपत्रावर प्रत्येक इच्छुक सदस्यांकडून स्वतंत्ररित्या (नोटरीद्वारे प्रमाणित केलेले) प्राप्त करुन ते हमीपत्र संचालक / पणन यांचे कार्यालयात असे पत्र निर्गमित झाल्यापासून १ महिन्यात सादर करणे या संस्थांच्या मुख्य प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

या योजनेत जे सदस्य सहभागी होणार नाहीत त्यांना त्याच्या सदनिकेमधून निष्कासित करुन त्या सदनिकेचा मोकळा ताबा मंडळाकडे सुपूर्द करण्याची जबाबदारी प्रत्येक संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाची राहील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९१/६

विषय : पोलीस विभागास मौजे कोपरी येथील म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्र. ७८ ची थकीत मूळ किंमत व व्याज रक्कम प्राप्त न करता प्रस्तावित पोलीस ठाणे इमारतीस ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८८१ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मौजे-कोपरी येथील म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्रमांक ७८ ची थकीत मूळ किंमत घेऊन व्याजाच्या रकमेबद्दल हमीपत्र घेऊन प्रस्तावित पोलिस ठाणे इमारतीस ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यास येते.

बाब क्रमांक : १९१/९

विषय : मुंबई व म्हाडातील इतर विभागीय मंडळातील सदनिकांच्या विक्री किंमतीच्या थकीत रकमेवर आकारण्यात येणारे व्याजाचे दर कमी करण्यात येण्याबाबत.

ठराव क्रमांक :५८८२ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

म्हाडाच्या मुंबई व इतर विभागीय मंडळातील गाळे / भूखंडाची विक्री किंमत भरण्यास लाभार्थींना विहित मुदतीपेक्षा विलंब झाला तर १३.५ टक्के व्याज दर आकारावा. तसेच वाणिज्य गाळयांसाठी हा दर १८ टक्के आकारण्यांस मान्यता देण्यात येते.

तसेच लाभार्थीस निवासी गाळयांसाठी आकारण्यांत येत असलेल्या डिलेड पेमेन्ट चार्जेस (विलंबनात प्रदान आकार) हा १.५ टक्के दरमहा व वाणिज्य गाळयांसाठी हा दर २ टक्के दरमहा आकारण्यास मान्यता देण्यात येते.

त्याचप्रमाणे म्हाडाच्या मुंबई व इतर विभागीय मंडळातील कांही कारणास्तव प्रलंबित असलेले निवासी / वाणिज्य गाळयांची प्रकरणे निकालात काढण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांना देण्यांत येत आहेत. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांनी आपल्या अधिकारप्रदानतेखाली अशाप्रकारे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा प्राधिकरणाचे आर्थिक नुकसान होणार नाही, याची काळजी घेऊन निकाली काढण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९१/११

विषय : इमारत क्रमांक २५१, ए ते जी आणि २४७-२५७ एच पटेल बिल्डींग, ना.म.जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई, ग/दक्षिण विभाग -- जोत्यावरील कामाच्या निविदा.

ठराव क्रमांक : ५८८३ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

इमारत क्रमांक २५१ ए ते जी आणि २४७/२५७-एच पटेल बिल्डींग ना.म.जोशी मार्ग, परेल, मुंबई, ग-दक्षिण विभाग या इमारतीच्या जोत्यावरील कामाच्या निविदा मे.कॅनन इंजिनिअरींग कन्स्ट्रक्शन यांची कमी दराच्या मंजूर केलेल्या निविदेनुसार यांची प्रगतीपथावरील कामे बघता ठेकेदाराने १३.६९ टक्के ५,९३,२२,९१६.३२ कमी दराची निविदा व्यवहार्य आहे असे दिसून आल्यामुळे त्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १९१/१२

विषय : समतानगर, कांदिवली (पूर्व) येथे पोलीस ठाण्यासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे वितरण.

ठराव क्रमांक : ५८८४ **दिनांक : २०.०२.२००५**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाने पोलीस विभागास समतानगर, कांदिवली (पूर्व) मुंबई येथे दिनांक २०.०२.२००३ रोजी ५५४.५० चौ.मी. क्षेत्रफळ भूखंडाची किंमत रुपये २,७९,६३३/- करण्यांत आलेले आहे. मात्र, पोलीस विभागाने भूखंडाची रक्कम रु. २,७९,६३३/- म्हाडास भरणा केलेली नसली तरी म्हाडाला जेव्हा पोलीस दलाची गरज भासते त्यावेळी पोलीसांना अदा करण्यांत येणा-या रकमेतून वळती करुन घेऊन पोलीस विभागास त्या भूखंडावर पेालीस स्टेशन बांधण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १९१/१४

विषय : येवला, जिल्हा नाशिक येथील स.क्र.९१/१ मधील अतिक्रमीत दुकानांचे गाळे नियमित करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५८८५ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,मौजे-येवला, जिल्हा नाशिक येथील संपादित केलेल्या सर्व्हे क्रमांक ९१/१, ३.२३ हेक्टर क्षेत्रावरील जमिनीच्या आराखडयात नगररचना नियमाप्रमाणे राखून ठेवलेल्या भूखंडावर अतिक्रमण करुन दुकाने बांधली म्हणून त्या ठिकाणच्या जागेचा व्यापारी प्रयोजनासाठीचा प्रचलित बाजारभाव व सदर भूखंड दुकानदारांनी अतिक्रमण करुन बळकावल्यामुळे प्रत्येक दुकानासाठी दंडात्मक रक्कम आकारुन बाजारभावाने येणा-या किंमतीवर ५० टक्के दंडात्मक रक्कम आकारुन येवला महानगर पालिकेने मंजूर केलेल्या आराखडयानुसार अतिक्रमित दुकानी जागा नियमित करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९१/१५

विषय : कोले कल्याण, सांताक्रुझ (पूर्व) येथिल जोगानी व म्हाडा यांच्या वादातील जमिनीबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक : ५८८६ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

या विषयावर मुंबई मंडळाने केलेल्या शिफारशींचा साकल्याने विचार करुन मुंबई मंडळाची कोले कल्याण, सांताक्रुझ (पूर्व) न.भू.क्र.५५९७ व ५५९८ (भाग) या न.भू.क्रमांकाची सुमारे २१११.०० चौरस मिटर जमीन आहे. या जमिनीपैकी सुमारे १९३.०० चौरस मिटर जमीन श्री.जोगानी व सचदेव विकासक यांना देण्यात यावी. त्या ऐवजी म्हाडाच्या कोले कल्याण येथील जमिनीच्या लगत सदरहू विकासकाच्या योजनेतून १ ते ४ मजल्यावरील सदनिकांपैकी ३ सदनिका प्रत्येकी सुमारे ६५० चौ.फ्फट महाजोते क्षेत्रफळाच्या म्हाडाकडे मालकी हक्काने विकासकाकडून विनामुल्य ताब्यात घेण्यात याव्यात व अधिकच्या क्षेत्रफळासाठी रुपये २.०० लाख विकासकाकडून घेण्यास मान्यता देण्यात येते.

या सदनिकांचा वापर सेवानिवासस्थाने अिवा अतिथीगृह म्हणून करण्यात यावा. प्रस्तावित जमिन दिल्यानंतर मंडळाच्या उर्वरित जमिनीवर येाजना तयार करुन त्यांना एस.आर.डी.ए.ची मंजूरी प्राप्त करुन देण्याची सर्व जबाबदारी श्री.जोगानी यांचेवर देण्यात यावी. तसेच श्री.जोगानी व म्हाडा यांनी संयुक्तपणे सिटी सिव्हील न्यायालयात कन्सेन्टर्मस दाखल करण्यास मान्यता देण्यात येते.

सदरहू जमीन वितरणासाठी आकारण्यात येणारे लिज रेन्ट वार्षिक रुपये १/- पक्रमाणे आकारण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९१/१८

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पातील पुनर्रचित इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८८७ **दिनांक : २०.०२.२०००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. राजीव गांधी निवारा प्रकल्पाअंतर्गत सुरु करण्यात आलेल्या व नागरी नुतनीकरण योजनेखालील इमारतींची दुरुस्ती म्हाडाने स्वतःच्या निधीतुन करावी.

२. व्यावसायिक स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत सर्व्हे करुन घेतल्यानंतर दुरुस्ती करुन घेण्यास मान्यता देण्यात येईल.

३. मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींपैकी भूसंपादन करुन राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या नागरी नुतनीकरणांतर्गत मालकी तत्वावर पुनर्रचित करण्यात आलेल्या ६५ इमारतींची दुरावस्था विचारात घेऊन त्यांनी अभिहस्तांतरणपूर्व एक वेळ दुरुस्ती करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येते.

४. या ६५ इमारतींपैकी प्रत्येक इमारतीच्या भोगवटादारांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करणे व इमारत मालकी तत्वावर अभिहस्तांतरण करुन घेण्याची तयारी दर्शवून तसे लेखी हमीपत्र मंडळास सादर करणे आवश्यक राहील.

५. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने या कामासाठी स्वतंत्र लेखा ठेवावा व त्यातूनच या रकमेचा विनियोग करण्यात यावा.

६.तसेच सदर इमारतीच्या दुरुस्तीचा निम्मा खर्च शासनाने म्हाडास द्यावा म्हणून शासनाला तसे कळविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९१/१९

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत वाणिज्य संकुलासाठी आरक्षित असलेला चारकोप येथील आर.डी.पी.५ लगतचा विकसित भूखंड वितरणबाबत..

ठराव क्रमांक : ५८८८ **दिनांक : २०.०३.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत वाणिज्य संकुलासाठी आरक्षित असलेली चारकोप येथील आरडीपी ५ लगतच्या विकसित भूखंडाची रक्कम प्राधिकरणास भरण्यासाठी मे.सनग्रेस डेव्हलपर्स यांना ९ महिन्यांचा कालावधी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या कालावधीत मे.सनग्रेस डेव्हलपर्स यांनी या वाणिज्य भूखंडाची किंमत २५ टक्क्याकप्रमाणे दर तीन महिन्याने, नऊ महिन्यात भरणे बंधनकारक राहील. या कालावधीत रक्कम भरण्यास त्यांनी असमर्थता दर्शविल्यास त्यासाठी होणा-या विलंबाकरिता प्राधिकरणाच्या प्रचलीत धोरणानुसार व्याज आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. चारको येथील आर.डी.पी.५ लगत वाणिज्य संकुलासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे वितरणासाठी दिलेल्या जाहिरातीत बी.एस.ई.एस.सबस्टेशनचा उल्लेख न केल्यामुळे मे.सनग्रेस डेव्हलपर्स यांची भूखंडाचे अधिमुल्य भरणा विलंबावरील दिनांक ५.११.१९९६ पासून ठरावाच्या दिनांकापर्यंतचे व्याज माफ करुन निर्लेखित करण्यास आणि २५ टक्के अधिमुल्य भरणा केल्यानंतर सदर भूखंडाचे बाबत प्राधिकरण आणि मे.सनग्रेस डेव्हलपर्स यामध्ये ॲग्रीमेंट टू लिज करुन ताबा देण्यास परवानगी देण्यात येते. मात्र, यासाठी जी काळजी घेणे आवश्यक आहे ती घेण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९१/२०

विषय : प्रतिक्षानगर, सायन येथील संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी कॅम्प नं.२ अंतर्गत १२४५ संक्रमण गाळे बांधणे.

ठराव क्रमांक : ५८८९ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. सर्व्हे क्र. ४/५ प्रतिक्षानगर, सायन येथील कॅम्प क्र.२ येथे पुनर्बांधणी कामाअंतर्गत १२४५ संक्रमण सदनिका बांधण्याचे प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे. सदर काम मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लि. यांना त्यांच्या कॅम्प नं.१ येथे सुरु असलेल्या पुनर्बांधणीच्या कामाचे टप्पा क्रमांक २ चे काम म्हणून देण्यात यावे. सदर काम, काम सुरु झाल्यापासून १५ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावे. सदर अतिरिक्त कामाची अंदाजित किंमत सुमारे ३४.६८ कोटी इतकी राहील.

२. संक्रमण सदनिका १८० चौ.फुट चटई क्षेत्रफळाच्या असतील व तळ अधिक चार मजल्यांच्या इमारती बांधण्यात याव्यात व बांधकामाचे दर सायनच्या सुरु असलेल्या संक्रमण शिबिराच्या बांधकामाच्या दराप्रमाणेच म्हणजे रु. ६६०/- प्रति चौ.फुट व शासनाचे दिनांक २६.०४.२००१ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी या पूर्वीच्या योजनेप्रमाणे लागू राहातील.

३. योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे काम जसे कीं, सुरक्षा भिंत, पायथे, गटारे, मलनिःस्सारण इत्यादि कामे, कामाचे मूळ कंत्राटदार मे.बी,जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॅ/जी कंपनीकडून चालू दरसूचीनुसार बी-१ करारनामा अंतर्गत करुन देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

४. सदर काम महानगर पालिकेची मंजूरी मिळाल्यानंतर मंजूर नकाशाप्रमाणे कार्यान्वित करण्यात यावे व महानगर पालिकेची मंजूरी मिळाल्यानंतरच अतिरिक्त कामाचे कार्यादेश देण्यात यावेत.

५. टप्पा क्रमांक ३ चे काम ८/१० महिन्याचे कालावधीत देण्याबाबत कार्यवाही करावी.

बाब क्रमांक : १९१/२२

विषय : स.क्र.५५८-अ, फा.प्लॉट क्र.४७४ टीपीएस क्र.३, मुंजेरी, महर्षीनगर, पुणे येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत १६ गाळयांचे बांधकाम निविदा स्विकृतीबाबत..

ठराव क्रमांक : ५८९० **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

सर्व्हे क्र.५५८-अ, फा.प्लॉट क्रमांक ४७४ टी.पी.एस.क्रमांक ३, मुंजेरी, महर्षी नगर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत १६ गाळयांच्या बांधकामाकरिता मे.धोत्रे कन्स्ट्रक्शन यांनी निविदा किंमतीहून ८.४५ टक्के जादा दराची निविदा दिली होती. जी निम्नतर दराची आहे.

पुणे मंडळाने निम्नतम निविदाकार मे. धोत्रे कन्स्ट्रक्शन यांचेसह वाटाघाटी करुन निविदेचा देकार १ टक्क्यांनी कमी करुन घेतला आहे. त्यानुसार मे.धोत्रे कन्स्ट्रक्शन कंपनी यांची वाटाघाटीनंतरची ७.४५ टक्के जास्त दराची (रुपये ६१,६२,७००.१९) निविदा स्विकृती करण्यास मान्यता देण्यात येते.

मे.धोत्रे कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे नोंदणी पत्र दिनांक ११.०१.२००३ पर्यंत ग्राहय होते. विषयांकित कामाचे स्विकृतीपत्र जारी करण्यापूर्वी मे.धोत्रे कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी त्यांच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वाढवून घेतली आहे याची शहानिशा करुनच स्विकृतीपत्र देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९१/२३

विषय : स.क्र.१५०, १५२, १५३ (भाग) मोरवाडी, पिंपरी वाघीरे, पुणे येथील टप्पा-२ (भाग) अंतर्गत उच्च उत्पन्न गटाच्या २४ रो हाऊसेसपैकी १२ रो हाऊसेसचे बांधकाम निविदा स्विकृतीबाबत.

ठराव क्रमांक : ५८९१ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

सर्व्हे क्रमांक १५०, १५२, १५३ (भाग) मोरवाडी, पिंपरी, वाघिरे, पुणे येथील टप्पा-२ अंतर्गत उच्च उत्पन्न गटातील १२ रो-हाऊसेसच्या बांधकामाकरिता मे.शमा कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी निविदा किंमतीपेक्षा ८.१० टक्क्यांनी जादा असा दर दिला होता. जो कि निम्नतम देकार आहे. पुणे मंडळाने निम्नतम निविदाकार मे.शमा कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेसह वाटाघाटी करुन निविदेचा दर १ टक्क्यांनी कमी केलेला आहे. त्यानुसार मे.शमा कन्स्ट्रक्शन कंपनी यांची वाटाघाटीनंतरची ७.१० टक्क्यांनी जास्त दराची म्हणजेच रुपये ७२,४०,२६८.४५ ची निविदा स्विकृत करण्यात येत आहे.

सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९१/२४

विषय : मुंबईतील म्हाडा वसाहतीतील रहिवाशांकडून जे सेवाशुल्क वसूल केले जाते, त्यातील म्हाडामार्फत पुरविल्या जाणा-या सेवाशुल्काचा दर ५० टक्क्यांनी कमी करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५८९२ **दिनांक : २०.०२.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई महापालिकेला पाणी व मालमत्ता करापोटी अदा करावे लागणारी पाणीपट्टी व मालमत्ता कर तसेच बी.एस.ई.एस.ला वीज पुरवठयापोटी द्यावे लागणारे वीज देयक वेगळता मुंबईतील म्हाडा वसाहतीतील रहिवाशांकडून म्हाडा मार्फत पुरविल्या जाणा-या उदा. पंप घरातील दिवाबत्ती, पंप घराची देखभाल, पंपचालकाचा पगार, जलवाहिन्यांची तांतडीची दुरुस्ती, साफसफाई कामगारांचे पगार, साफसफाईसाठी लागणारे सामान इत्यादि यावरील शुल्काचा दर ५० टक्कयांनी कमी करण्यास प्राधिकरणातर्फे मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची अर्थसंकल्पीय विशेष बैठक दिनांक २४.०३.२००३

बाब क्रमांक : २

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००२-२००३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००३-२००४ चे य अर्थसंकल्पीय अंदाज.

ठराव क्रमांक : ५८९३ **दिनांक : २४.०३.२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या सन २००२-२००३ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर व सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन दोन्ही अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यात येते.

बाब क्रमांक : ३

विषय : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी आकृतीबंध सन २००३-२००४.

ठराव क्रमांक : ५८९४ दिनांक : २४.०३.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरण व प्रादेशिक मंडळांच्या कार्यालयांसाठी २००३-२००४ या सालाकरिता आवश्यक असलेला कर्मचारीवृंद मागील वर्षाच्या आकृतीबंधामध्ये झालेल्या बदलांची / दुरुस्तीची नोंद घेऊन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब टिपणीसोबत जोडलेल्या परिशिष्ट " ब " मध्ये दर्शविण्यात आलेल्या वर्ग-१ ते ४ मधील एकूण ४४९ पदे रद्द करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : ४

विषय : संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान.

ठराव क्रमांक : ५८९५ दिनांक : २४.०३.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं, शासनाच्या संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानासाठी शासनाने मागणी केल्याप्रमाणे रु. ६.०० कोटीचा निधी म्हाडा निधीमधून देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : ५

विषय : महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ यांच्या मालकीची जमीन विकत घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५८९६ दिनांक : २४.०३.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ यांच्या मालकीची जागा म्हाडाला योजना राबविण्याकरीता वाटाघाटीने विकत घ्यावयाचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यांत येत आहेत. त्यांनी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांशी वाटाघाटी करुन तसेच मुख्य अधिकारी / नागपूर मंडळ यांच्याशी चर्चा करुन सदरहू जमिनीवरील योजना म्हाडास फायदेशीर ठरेल याचा विचारपूर्वक अभ्यास करुन निर्णय घ्यावा.

प्राधिकरणाची बैठक क्रमांक १९२, दिनांक २१/०४/२००३ कार्यवृत्त.

बाब क्रमांक १९२/३.

विषयः प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना शासन निर्णयाप्रमाणे ''विशेष असाधारण रजा योजना '' लागू करण्याबाबत..

ठराव क्रः ५८९७ दिनांक : २१/४/२००३.

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या दि.७ ऑक्टोंबर २००२ च्या शासन निर्णयानुसार विशेष असाधारण रजा योजना प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचा-यांना जसाच्या तसा लागु करण्यांस मान्यता देण्यात येते. सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत ही रजा मंजूर करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना राहातील. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी प्रत्येक प्रकरणी अशी रजा मंजूर केल्यामुळे म्हाडाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही याची खात्री करुन रजा मंजूरी संबंधी निर्णय घ्यावा.

बाब क्रमांक १९२/६.

विषयः राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व प्रादेशिक मंडळास सन २००२-२००३ या वार्षाकरिता शासनाकडुन म्हाडास निधी प्राप्त होईपर्यत रु.१४.००कोटी प्राधिकरण निधीतुन उपलब्ध करुन देण्याबाबत..

ठराव क्र.: ५८९८. **दिनांक : २१/४/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व प्रादेशिक मंडळास सन २००२-२००३ या वर्षामध्ये शासनाकडुन अर्थसंकल्पीय निधी म्हाडास प्राप्त होईपर्यत रु.१४.०० कोटी प्राधिकरण निधी उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरणातर्फे कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत असून या कामासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक १९२/९.

विषय : औरंगाबाद मंडळाच्या रोशनगेट येथील स.क्र.५९ व ६० या जमिनीवरील गाळा क्र.१ ते २८ च्या मागील भागात पश्चिम दिशेस असलेली जमिन गाळेधारकास वितरीत करण्याबाबत..

ठराव क्र.५८९९ **दिनांक २१/४/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

औरंगाबाद मंडळाच्या रोशन गेट येथील स.क्र.५९ व ६० या जमिनीवरील गाळा क्रमांक १ ते २८ च्या मागील भागात पश्चिम दिशेस असलेली गाळया लगतची बांधकामास योग्य नसलेली जमिन प्रस्तावित रेडीरेकनरच्या किंमतीच्या ५० टक्के किंमत आकारुन विक्री करण्यास मान्यता देण्यात येते. यापुढे स्वतंत्रारित्या विकसित करता येऊ न शकणा-या जमिनींचे सदर जमिनीला संलग्न असलेल्या म्हाडाच्या गाळेधारकास वितरीत

करावयाचे असल्यास ज्या वर्षी अशा जागेचे देकारपत्र देण्यात येईल त्या वर्षी प्रचलित असलेल्या रेडीरेकनरच्या दराच्या ५० टक्के दर आकारण्यात यावा. हा ठराव सर्व प्रादेशिक मंडळांना लागू राहील. अशा प्रकारे वितरण करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. मात्र अशी जमिनीची विक्री करतांना योग्य ते समर्थन संबंधीत नस्तीवर नमूद करण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्र : १९२/११.

विषय : कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वर्तकनगर व शिवाई नगर ठाणे तसेच श्यामराव पाटील नगर अंबरनाथ येथील योजनांचे अभिहस्तांतरण करण्यासंबंधी विशेष योजना.

ठराव क्र. ५९०० **दिनांक : २१/४/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वर्तक नगर व शिवाई नगर, ठाणे तसेच श्यामराव पाटील नगर, अंबरनाथ येथील योजनांचे अभिहस्तांतरण करण्यासाठी या वसाहतीची वाढीव सेवाशुल्क माफीची योजना दिनांक १६/४/२००३ पासून पुढील सहा महिन्यांसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात येते. या कालावधीत अभिहस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. मात्र यापुढे कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येऊ नये.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९२/१२.

विषय : मौज गोधनी, नागपूर येथे अल्प उत्पन्न गटातील ३१५ गाळयांच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९०१ **दिनांक : २१/४/२००३.**

१. प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मौजा-गोधनी, नागपूर येथे अल्प उत्पन्न गटातील ३१५ गाळयांच्या बांधकामाकरीता मे. प्रेन्डस एन्टरप्रायजेस यांनी निविदा किंमतीपेक्षा ११.५० टक्केनी जास्त (रुपये ४,४२,९४,५१४/-किंमतीचा) दिलेला देकार निम्नतम असून स्विकारण्यात येत आहे.

२. मे. सादीक ॲन्ड कंपनी यांनी निविदा किंमतीपेक्षा २१.५२ टक्केनी जास्त देकार दिलेला असून अक्षरातील रक्कम लिहितांना त्यांनी ती रक्कम चुकीने लिहिलेली असल्याचे पत्र त्यांनी स्वतः दिलेले आहे. सबब मे. सादीक ॲन्ड कंपनीची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊ नये.

३. सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९२/१५.

विषय : सिटीएस नं.२४९/अ-१/५५ नागाळा पार्क,कोल्हापूर येथील म्हाडा व्यापारी संकुलनामधील कार्यालयीन किंमतीपोटी कळविण्यात आलेली रक्कम उशिरा भरल्यामुळे विलंबापोटी करण्यात आलेल्या दंडात्मक व्याजाबाबत..

ठराव क्रमांक : ५९०२ दिनांक : २१/४/२००३.

एकमताने निर्णय घेतला की,

भारत सरकारच्या राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण संगठण (एन.एस.एस.ओ.) या संस्थेने सी.टी.एस.नं. २४९/अ-१/५५ नागाळा पार्क, कोल्हापूर येथील म्हाडा व्यापारी संकुलनामधील कार्यालयीन गाळा क्रमांक १,२,३ व ४ च्या किंमतीपोटी भरावयाची रक्कम विलंबाने भरल्यामुळे त्यांना आकारण्यात येणारा रुपये ४९,२७०/- विलंब आकार माफ करण्याबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीस प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

बाब क्रमांक : १९२/१७.

विषय : स.नं. (भाग) गंगाखेड रोड, परभणी येथील २५ अल्प उत्पन्न गट गाळयांपैकी रिक्त २३ गाळे व १५ मध्ये उत्पन्न गट गाळयांपैकी रिक्त १३ गाळे प्राधिकरणाच्या धोरणानुसार कमी केलेल्या किंमतीत एकरकमी खरेदी तत्वाऐवजी भाडे खरेदी तत्वावर विक्री करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९०३ दिनांक : २१/४/२००३

एकमताने निर्णय घेतला की,

परभणी गंगाखेड रोड येथील स.नं. ५२७ (भाग) या जमिनीवरील २५ मध्यम उत्पन्न गट गाळयांपैकी रिक्त २३ गाळे व १५ अल्प उत्पन्न गट गाळयांपैकी रिक्त १३ गाळयांची किंमती पूर्वी कमी केलेल्या किंमतीपेक्षा ५० टक्क्यांपर्यंत कमी करुन विक्री करण्याचे अधिकार मुख्यअधिकारी, औरंगाबाद मंडळ यांना प्रदान करण्यात येत आहेत.

मागणी करेल त्यास गाळे वाटप करण्या विषयीची कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९२/२२.

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण १ व २ सोलापूर म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून असलेली नेमणूक रद्द करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९०४ **दिनांक : २१/४/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

शासनाने म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून जुळे सोलापूर १ व २ या घोषित क्षेत्राकरिता केलेली नेमणूक रद्द करण्यास व खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

अ) सर्व रस्ते, रस्त्यावरील दिवाबत्ती, पाण्याची पाईप लाईन, कूपनलिका इ. सोलापूर महानगरपालिकेकडे विनामूल्य हस्तांतरीत कराव्यात.

ब) विकास परवाने, बांधकाम परवाने देणेबाबत जबाबदारी सोलापूर महानगरपालिकेकडे राहील.

क) खुल्या जागा (बगीचे, क्रिडांगण) व सुविधासाठीउपलब्ध असलेले सर्व भूखंड म्हाडाकडे राहातील. त्याचे वितरण/उपयोग म्हाडा नियमानुसार करेल.

ड) यापुढे विनप्रा-१ मधील विकास आराखडयातील आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन करण्यात येऊ नये.

वरीलप्रमाणे म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून केलेली नेमणूक रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची १९२ वी संलग्न बैठक दिनांक १०/०५/२००३

बाब क्रमांक : १९२/२.

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या बैठक क्र. १९०,दि. २४/१२/२००२ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल.

ठराव क्रमांक : ५९०५. **दिनांक : १०/०५/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

मौजे पहाडी गोरेगांव (प.) येथील न. भू. क. २९१ पै. उन्नतनगर क.३ फिलमीस्तान स्टुडिओच्या मागच्या बाजूच्या इमारत क. १९ समोरील सुमारे ५२०.०० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड श्री. विजू पेणकर यांना व्यायामशाळा बांधण्यासाठी प्राधिकरणाने प्राधिकरणाचा ठराव क. ५५६४ अन्वये निर्णय घेतला. या निर्णयाच्या अनुषंगाने मुंबई मंडळाने पत्र क, ३२४६, दि.५/७/२००० अन्वये त्यांना वितरण पत्रही वितरीत करण्यांत आले. परंतु, अद्यापपर्यत या भूखंडाचे पैसे त्यांनी म्हाडाकडे भरणा केलेले नसलयामुळे त्यांना ८ दिवसांची मुदत देण्यांत येत आहे. या आठ दिवसांत श्री. विजू पेणकर यांनी उपरोक्त भूखंडाचे पैसे म्हाडाकडे भरणा न केल्यास त्यांना वितरीत केलेलया मौजे पहाडी, गोरेगांव (प.) येथील न. भू. क. २९१ पै उन्नतनगर क.३ फिलमीस्तान स्टुडिओच्या मागच्या बाजूच्या इमारत क. १९ समोरील सुमारे ५२०.०० चौ.मी. क्षेत्रफळ भूखंडाचे वितरण रदद करण्यांत यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

अनुपालन अहवालातील अ.क्र. ३३ बाबत बोलतांना अध्यक्ष/प्रा. म्हणाले की, सदरहू योजनेतील कांही सदनिकां या आमदारांसाठी व ब्रिच कॅन्डी हॉस्पिटलमधील परिचारीकांसाठी वितरीत करण्यांत याव्यात असा ठराव करुन शासनाकडे पाठविण्यांत आला आहे. परंतु याबाबत अद्याप शासनाचा निर्णय न झालयामुळे याबाबत

मा. मुख्य सचिव. महाराष्ट्र शासन यांना यासंबंधीचे एक पत्र लिहून याबाबतचा शासनाचा निर्णय २ महिन्यात न झालयास सदर सदनिकांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विकी करण्यांत येईल, असे कळविण्यात यावे. व या मुदतीत शासनाकडून उत्तर न आलयास सदर सदनिकांची जाहिरात देण्यात यावी.

उपरोक्त चर्चेनंतर प्राधिकरणाने,

ठराव क्रमांक_ : ५९०६ दिनांक :- १०/०५/२००३

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाचा ठराव कमांक ५७३९ अन्वये घेतलेलया निर्णयानुसार योजनेतील काही सदनिका आमदारांना व महालक्ष्मी मॉर्उन मिल कंपाउंड येथील टाईप २ च्या सदनिका बिच कॅन्डी हॉस्पिटलमधील परिचारीकांना वितरीत करण्यांत याव्यात. अशा प्रकारचा प्राधिकरणाने मान्य केलेला ठराव शासनाकडे प्रलंबित असून याबाबत जर शासनाचा निर्णय दोन महिन्यात न झालयास सदरहू सदनिकांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विक्री करण्यांत यावी, असा प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

अ.क्र. ५५ बाबत बोलतांना श्री. प्रकाश बिनसाळे, सदस्य/प्रा. याबाबतची माहिती देतांना म्हणाले कीं, संदेश दळणवळण ही प्रत्येक संस्थेतील एक महत्वाची बाब असल्यामुळे या संस्थेमध्ये ती सुस्थितीत असणे गरजेचे आहे. याकरीता सद्यस्थितीतील दूरध्वनी यंत्रणा बदलून त्याजागी कार्यक्षम यंत्रणेची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे याकरीता ज्या निविदा मागविण्यांत आलेल्या आहेत. त्या निविदेचे योग्य ते परीक्षण करण्याकरीता म्हाडामध्ये माहिती व तंत्रज्ञानामध्ये पारंगत असणारा त्या क्षेत्रातील एकही अभियंता नाही. प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे सर्वात कमी दराने भरलेल्या निविदाकारांस काम देण्यांत येते. तथापि असे निदर्शनास आले आहे की, ज्यांनी या कामासाठी कमी दराच्या निविदा भरलया आहेत त्या संस्थेस काळया यादीत टाकण्यांत आलेले आहे व दुस-या क्रमांकावरील कमी दर असणारी निविदाकार कंपनी ही एक सर्वसाधारण कंपनी असून तिस-या क्रमांकावर सिमेन्स ही कंपनी आहे. सदरहू कंपनी ही या क्षेत्रातील एक अग्रेसर तज्ञ कंपनी असल्यामुळे हे काम सिमेन्स कंपनीला देणे योग्य ठरेल.

याबाबतीतील आपले मत मांडताना अध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, कमी दराचे निविदाकार हे काळया यादीतील असल्यामुळे थोडी जास्त दराची निविदा असली तरी या क्षेत्रात नांवाजलेल्या अशा सिमेन्स कंपनीस हे काम देण्यांत यावे.

अध्यक्ष/प्रा. यांच्या उपरोक्त विचाराशी उपाध्यक्ष/प्रा. यांनी सहमती व्यक्त केली.

या विषयावर चर्चा होऊन प्राधिकरणाने.

ठराव क्रमांक : ५९०७ **दिनांक :१०/०५/२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) येथे सध्या कार्यरत असलेली अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा पूर्णपणे बदलण्यात यावी व कामासंबंधी प्राप्त झालेल्या तिस-या क्रमांकावरील कमी दराची निविदा असलेल्या सिमेन्स कंपनीस जी तांत्रिक दृष्टीने अतिशय सक्षम कंपनी आहे त्यांनी दिलेलया दरानुसार हे काम देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहतां करण्यास मान्यता देण्यांत येते.

अनुकमांक ६४ वर चर्चा करतांना श्री. प्रकाश बिनसाळे, सदस्य/प्राधिकरण यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मालवणी येथील काही गाळे एजन्टना विकी करण्यासाठी देण्यात आलेले आहेत. गाळयांची विकी केलयानंतर त्या पोटी त्यांना देण्यात येणारे कमिशन देतांना मालवणी हा शब्द त्या ठरावात नसलयामुळे कमिशन देता येणार नाही असे सांगण्यात येते, असे निदर्शनास आले आहे.

यावर उपमुख्य अधिकारी-१, मिळकत व्यवस्थापक, मुंबई मंडळ यांनी असा खुलासा केला की, बाब टिपणीमध्ये मालवणीचा उललेख आहे. परंतु मंजूर ठराव क. ५६४८मध्ये त्याचा उललेख आलेला नाही. या ठरावामध्ये पवईचा उललेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे या विषयावर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यावर आदेश झालयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

यावर श्री. प्रकाश बिनसाळे, सदस्य/प्राधिकरण यांनी असे निदर्शनास आणून दिले की, या एजन्ट बरोबर करार करण्यात आला असून त्या करारानुसार त्यांना यापूवी

त्यांची देय असलेली रक्कम अदा करण्यात आली आहे व आता ती अडविण्यात आली आहे हे योग्य नाही. जेव्हां एखादया संस्थेशी करार करण्यात येतो तेव्हा त्या कराराप्रमाणे त्यांनी केलेलया कामाचा मोबदला कराराप्रमाणे अदा करणे आवश्यक आहे.

यावर उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी असे मत व्यक्त केले की, हा आर्थिक व्यवहार असलयाने पुढे मागे कोणालाही त्रास होऊ नये म्हणून पूर्वी ठराव करतांना झालेली चूक दुरस्त करण्यासाठी प्राधिकरणासमोर बाब टिपणी सादर करण्यात यावी, असे प्रस्तावित करण्यात आले आहे.

यावर श्री. प्रकाश बिनसाळे, सदस्य/प्राधिकरण यांनी असे मत व्यक्त केले की, पूर्वीचा ठराव दुरुस्त करण्यासाठी बाब टिपणी प्राधिकरणासमोर सादर करण्याची आवश्यकता नाही. यास अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सहमती दर्शवितांना अशी सूचना केली की, प्राधिकरणाच्या पूर्वीच्या ठरावाप्रमाणे व बाब टिपणीत नमूद केलयाप्रमाणे संबंधित एजन्टना देय असलेली रक्कम अदा करण्यात यावी.

उपरोक्त चर्चेनंतर प्राधिकरणाने,

ठराव कमांक : ५९०८ **दिनांक : १०/५/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,,

प्राधिकरणाचा ठराव कमांक ५६४८, दिनांक ६/१/२००१ मध्ये पवई या शब्दापुढे सायन,मालवणी व मानखुर्दचा उललेख करण्यास मान्यता देण्यात येते. या ठरावात करण्यात येत असलेलया या दुरुस्तीची अंमलबजावणी ठराव कमांक ५६४८, दिनांक ६/१/२००१ च्या पूर्वलक्षी प्रभावानेकरण्यास मान्यता देण्यात येते. अशी सुधारणा ठराव कमांक ५६४८, दिनांक ६/१/२००१ मध्ये करण्यास मान्यता देण्यात येते. यास सभागहाने सहमती दर्शविली.

बाब क्रमांक : १९२/४.

विषय : म्हाडाच्या विनावापर पडलेल्या निधीची
सिकॉमकडे गुंतवणूक करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९०९. **दिनांक : १०/५/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

शासन निर्णय क्रमांक पीएसयू-१००२/सीआर-५/पीएसयू, दिनांक ६/८/२००२ अन्वये निर्गमित केलेल्या सुधारीत मार्गदर्शक तत्वानुसार सिकॉम लिमिटेड या संस्थेकडे व्याजाचा दर जास्त असल्यामुळे आणि निधीच्या सुरक्षिततेची हमी असल्यामुळै म्हाडाचा अतिरिक्त निधी एकूण २०६ कोटीच्या मर्यादेत गुंतविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच गुंतवणूक केलेल्या निधीची रक्कम येत्या २/३ वर्षात कमी करुन रु. १००/- कोटीवरआणण्याचा प्रयत्न करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सिकॉमने ट्रस्टीमार्फतउपलब्ध करुन दिलेल्या रुपये ७५० कोटीच्या सुरक्षेस शासनाने मान्यता दिल्यानंतर वरिलप्रमाणे गुंतवणूक सिकॉमकडे करावी.

बाब क्रमांक : १९२/७.

विषय : निविदा मागवून उच्चतम निविदादारास
वितरीत केलेल्या भूखंड अथवा अनिवासी
गाळयास हस्तांतरणाबाबत फी न आकारण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९१० **दिनांक : १०/५/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

बाब टिपणीतील प्रस्तावाचा विचार करुन निविदा मागवून वितरीत केलेल्या अनिवासी/ गाळे/भूखंडाचे बाबतीत हस्तांतरण फी आकारण्यात येऊ नये. फक्त नियमितीकरणासाठी प्रशासकीय खर्चापोटी नाममात्र रुपये ५००/- आकारण्यात यावेत. या प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या दिनांकापासून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक १९२/१३.

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आलेले गाळे कर्मचा-यांना विक्री करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९११ दिनांक : १०/०५/२००३

एकमताने निर्णय घेतला की,

बाब टिपणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे अत्यल्प, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटाच्या योजनेतील सेवानिवासस्थान गाळयांची विक्री त्यात वास्तव्य करणारे वर्ग-३ व वर्ग-४ च्याच कर्मचा-यांना करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. वरीलप्रमाणे पात्र असणा-या कर्मचा-यांसाठी सेवानिवासस्थानासह व विक्री किंमतीसह सुधारित प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीस सादर करावा.

बाब क्रमांक : १९२/१४.

विषय : बांद्रा (पश्चिम) येथील संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी व त्या अंतर्गत संक्रमण गाळे, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटांतर्गत खुल्या विक्रीच्या सदनिका बांधणे.

ठराव क्रमांक : ५९१२ दिनांक :१०/५/२००३.

एकमताने निर्णय घेतला की,

वांद्रे (पश्चिम) येथील संक्रमण शिबिराची पुनर्बांधणी व त्या अंतर्गत संक्रमण गाळे, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटांतर्गत खुल्या विक्रीच्या सदनिका बांधण्याबाबतच्या प्रस्तावास बाब टिपणीत नमूद केल्याप्रमाणे तत्वतः मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः१९२/२०.

विषयः- पवई येथील डिलक्स व नॉन डिलक्स अवितरीत सदनिकांची घाऊक स्वरुपात विक्री करणेबाबत.

ठराव क्रमांकः ५९१३ दिनांकः-१०/०५/०३.

एकमताने निर्णय घेतला की,

१) या तिन्ही संस्थांच्या मुख्य प्रवर्तकांनी रु. २५०००/- प्रति सदनिका याप्रमाणे अनामत रक्कम मुंबई मंडळाकडे इरादापत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांचे आंत भरावी. तसेच संस्थेच्या सभासदांची यादी ९० दिवसांचे आंत मंडळाकडे सादर करावी.

२) सदनिकांच्या विक्री किंमतीच्या २५ टक्के रकमेचा भरणा इरादापत्र मिळाल्यापासून १८० दिवसांत करावा. तथापि, २५ टक्केपैकी ५ टक्के रकमेचा भरणा १२० दिवसांत, १० टक्के रकमेचा भरणा १५० दिवसांत व उर्वरीत १० टक्के रकमेचा भरणा १८० दिवसांचे आंत करावा.

३) उर्वरीत विक्री किंमतीचा भरणा या संस्थांच्या मुख्य प्रवर्तकांनी इरादापत्र मिळाल्याच्या दिनांकापासून २७० दिवसांचे आत करावा.

४) वरील अनुकमांक २ मध्ये दर्शविलेलया प्रमाणे तीन हप्त्यात रक्कम अदा न केल्यास थकीत रकमेवर १३.५ टक्के दराने व्याज अदा करावे. मात्र १८० दिवसात २५ टक्के रक्कम भरणे बंधनकारक राहील.

५) २७० दिवसांच्या कालावधीमध्ये संस्थेच्या मुख्य प्रवर्तकांना त्यांच्या सभासदांच्या यादीत प्रति सदस्य रु. ५००/- इतका नाममात्र आकार भरुन बदल करता येईल. त्यानंतर मात्र सभासद बदलावयाचा झाल्यास मूळ सभासदाच्या अनामत रकमेतून सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १ टक्का एवढी रक्कम कापून घेण्यात येईल व त्या व्यतिरिक्त नवीन सभासदाकडून रु. ५०००/- प्रति सदनिका एवढे हस्तांतरण शुल्क आकारण्यांत येईल.

६) वरील तिन्ही संस्थांना प्रत्येकी किमान १०० सदनिका घेतलयास विकी किंमतीवर १५ टक्के सूट देण्यात यावी. तथापि, वरील संस्थांपैकी जी संस्था १०० सदनिकांपेक्षा कमी व ५० पेक्षा जास्त सदनिका खरेदी करेल त्या संस्थेस १५ टक्के ऐवजी विक्री किंमतीत १० टक्के सूट देय असेल.

७) वरील संस्थांना पवई येथील सर्वच अवितरीत सदनिका वितरीत करण्यात येत असल्यामुळे ज्या इमारतींमध्ये फुटकळ सदनिका अवितरीत आहेत. त्याठिकाणी वरील संस्थांच्या सभासदांना अस्तित्वात असलेल्या वा भविष्यात नोंदणीकृत होणा-या त्या इमारतींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सभासद होणे बंधनकारक राहील. त्यामुळे त्यांना तसे प्रतिज्ञापत्र सादर केल्याखेरीज ते सदनिका वितरीत करण्यास पात्र असणार नाहीत.

८) वरील ४ प्रमाणे १८० दिवसात २५ टक्के रक्कम न भरलयास किंवा २७० दिवसांच्या आत रक्कम अदा न केल्यास सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १० टक्के रक्कम जप्त करण्यात यावा व सदनिका म्हाडाच्या ताब्यात घेण्यात याव्यात.

९) वरील संस्थांना सुरवातीस विकी करुन दिलेले एकूण गाळे घेणे बंधनकारक राहील. त्यांना कुठलयाही परिस्थितीत ही संख्या कमी करुन काही गाळे कमी करण्यास मान्यता दिलीस जाणार नाही.

१०) अवितरीत सदनिकांची डागडुजी करण्याचे काम तात्काळ हाती घेण्यात यावे.

११) बॅक ऑफ बडोदा यांना इमारत क्र. ४ मधील ५१ डिलक्स सदनिकां तसेच ज्या अर्जदारांना इरादापत्र देण्यांत आले आहे त्यांना सदनिकांचे वितरण करण्यांत यावे. तथापि, त्यानंतर सदनिकांची विक्री थांबविण्यात यावी.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांकः१९२/२१.

विषयः- मुंबई मंडळातील लहान/मध्यम भूखंडावर गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी टर्नकी पध्दतीने गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी पूर्व अर्हताप्राप्त ठेकेदाराची नेमणूक करणेबाबत.

ठराव क्रमांक :५९१४ दिनांक : १०/०५/०३

एकमताने निर्णय घेतला कीं,

१) बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई मंडळातील लहान/मध्यम आकाराच्या भूखंडासाठी पूर्व अर्हता प्राप्त ठेकेदारांची टर्नकी पध्दतीने नेमणूक करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या २४ भूखंडाव्यतिरिक्त इतर उपलब्ध होणा-या भूखंडावर ही योजना राबविण्यास हरकत नाही.

२) आराम नगर, वर्सोवा विभागाचा पूर्ण विकास करावयाचे प्रस्तावित असलयाने वर्सोवा येथे सद्या अशी योजना राबविण्यात येऊ नये.

३) एकाच ठिकाणी केवळ अल्प उत्पन्न गटाच्या सदनिकां न बांधता स्थळनिहाय विचार करुन विविध आकाराच्या सदनिका बांधाव्यात.

४) बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील कामासाठी पूर्व अर्हता प्राप्त ठेकेदाराची यादी तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) वरीलप्रमाणे बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे संबंधित मंडळांनी जाहिरात काढून ठेकेदाराची यादी तयार करावी. अशा ठेकेदाराकडून वित्तीय देकार मागवून पुढील कार्यवाही करावी.

सदरच्या निर्णयाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

मूळ विषयसूचीवरील विषयावर चर्चा करुन निर्णय घेतलयानंतर मा. अध्यक्ष/ प्राधिकरण यांच्या परवानगीने खालील आयत्यावेळचे विषय चर्चेस घेण्यात आले.

बाब क्रमांकः १९२/२५

विषयः- मौजा सिंदी (मेघे) वर्धा येथील मंडळाच्या वसाहतीतील प्रायमरी शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंड आरक्षण क्र. ४३ वितरीत करणेबाबत.

ठराव कमांक : ५९१५ दिनांक : ३१/५/२००३.

एकमताने निर्णय घेतला कीं,

मौजा सिंदी (मेघे) वर्धा येथील मंडळाच्या वसाहतीत प्रायमरी शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड आरक्षण कमांक ४३ वितरीत करणेसाठी देण्यात आलेलया जाहीरातीस अनुसरुन आलेलया ५ संस्थांच्या अर्जापैकी महिला विकास संस्था, वर्धा या संस्थेची आर्थिक स्थिती उरलेल्या इतर ४ संस्थाहून चांगली असलयाने व सदरहू संस्थेचे बँक बॅलन्स रु. ४७,००,०००/- लाख असलयाने सदर संस्थेस भूखंड वाटप करण्याबाबत नागपूर मंडळाने शिफारस केलयानुसार महिला विकास संस्था, वर्धा या संस्थेस उपरोक्त भूखंडाचे प्रचलित धोरणानुसार वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः १९२/२७

विषयः- अभिहस्तांतरण प्रक्रियेबाबत विशेष मोहिम राबविण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५९१६ दिनांकः- १०/०५/०३.

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्रादेशिक मंडळामार्फत बांधण्यात आलेलया वसाहतीतील गाळेधारकांच्या सहकारी संस्थांना त्यांच्या इमारतीचे अभिहस्तांतरण करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात येते.

१. इमारतीच्या अभिहस्तांतरणाची मोहिम प्रथमतः दोन महिन्यांमध्ये राबवावी या दोन महिन्यांमध्ये जे गाळेधारक पुढे येतील त्यांना सदनिका हस्तांतरण नियमितीकरणे करण्यासाठी भराव्या लागणा-या फी मध्ये ५० टक्के सूट देण्यात यावी.

२. गाळेधारकांकडून सेवाआकार व इतर येणे असलेलया रकमेची वसूली अभिहस्तांतरण प्रकिया पूर्ण झालयानंतर ठराविक मुदतवाढ सुमारे एक वर्ष देऊन करता यावी. अशा मुदतवाढीस एक वर्षासाठी १२ टक्के व्याज आकारण्यात यावे.

३. अभिहस्तांतरीत करावयाच्या इमारतीच्या तळमजलयावरील अनधिकृत बांधकामांचा विचार न करता जी इमारत म्हाडाने बांधली आहे त्या इमारतीचे/गाळयांचे अधिकृत बांधकाम क्षेत्राचे अभिहस्तांतरण करण्यात यावे.

४. या ठरावाच्या अनुषंगाने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेलया तारखेपासून विहित कालावधीमध्ये जे अनधिकृत लाभार्थी स्वतःचे नांवे सदनिका करुन घेतील त्यांनाच ही सवलत देण्यात यावी.

५. अभिहस्तांतरणाची ही मोहिम राबविण्यासाठी उपलब्ध अधिकारी/कर्मचा-यांचा एक विशेष कक्ष स्थापन करण्यात यावा. या कक्षातील अधिका-यांनी वैयक्तिकरित्या जागेवर जाऊन एक खिडकी पध्दतीने सदर योजना राबवावी. सदनिका नांवे हस्तांतरण/नियमितीकरण करण्याचे अर्ज जागेवर दिले जावेत. विहित कागदपत्रे व फी डिमांड ड्राफ्ट भरलयानंतर त्यांचे नांवे सदनिका करण्याचा अधिकार या विशेष कक्षाला देण्यास मान्यता देण्यात येते.

६. वरील अटी व शर्तीनुसार गाळे हस्तांतरण/नियमितीकरण प्रकिया सुर असतांना अभिहस्तांतरणाच्या मसुदयाच्या छापील प्रती संस्थेस देण्यात याव्यात व एक महिन्यात त्यांचे इमारतीचे अभिहस्तांतरण संस्थेच्या नांवे करुन घेण्यास देखील सूचना देण्यात यावी. ही प्रकिया संस्थेने पूर्ण न केलयास सहकारी संस्थेने सर्व सुविधांची देखभाल व महापालिका कर स्वतः भरणे बंधनकारक राहील, असे संस्थेस लेखी कळविण्यात यावे.

बाब क्रमांकः१९२/२८

विषयः- नवीन पीएमजीपी कॉलनी, मुलुंड येथे श्रीमती म्हाडगुत यांनी दूध विक्रीसाठी जागा वितरीत करणेबाबत.

ठराव क्रमांकः ५९१७ **दिनांकः१०/०५/०३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

नवीन पीएमजीपी कॉलनी, मुलुंड येथे श्रीमती म्हाडगुत यांना दूध विक्रीसाठी प्रस्तावित जागा वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर जागेवर त्यांना फक्त लाकडी स्वरुपाचे स्टॉल ठेवता येईल, परंतु, त्या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिका, बीएसईएस इत्यांदी आवश्यक त्या संस्थाकडून परवानगी घेण्याची जबाबदारी त्यांची राहील. तसेच हा निर्णय या विशिष्ट प्रकरणास अपवाद म्हणून लागू राहील व तो सर्वसाधारण निर्णय असणार नाही.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ०६/०६/२००३ रोजी दुपारी ३.३० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १९३ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांकः१९३/३

विषयः- तत्कालिन जागतिक बँक प्रकल्पातंर्गत झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेखाली आकारण्यात येणा-या परिसर सुधारणा शुल्क व झोपडी दुरुस्तीसाठी दिलेल्या कर्जाच्या हप्त्यावरील विलंब शुल्काबाबत.

ठराव क्रमांकः ५९१८ **दिनांक :०६/०६/२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं, तत्कालिन जागतिक बँक प्रकल्पातंर्गत झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेतील झोपडीधारकांना विलंब शुल्कांच्या रकमेत ५० टक्के सूट देण्याची सवलत माहे मार्च २००४ पर्यत वाढवून देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१९३/४

विषयः- स. क्र. २२१ चोपडा जि. जळगांव येथील ८८ गाळे अल्प उत्पन्न गट व २५ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेतील सर्व गाळे व उत्तर-दक्षिणेकडील मोकळी जागा वाटपाबाबत नॉर्वेजिअन फ्री इवॅनजेलिकल मिशन इंडिया चॅरिटी ट्रस्ट चोपडा व ओंकार कन्स्ट्रक्शन, नाशिक यांनी केलेल्या विनंतीबाबत.

ठराव क्रमांक : ५९१९ **दिनांक : ०६/०६/२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं, नॉर्वेजिअन फ्री इवॅनजेलिकल मिशन इंडिया चॅरिटी ट्रस्ट, चोपडा यांना स. क्र.२२१ चोपडा, जि. जळगांव येथील ८८ गाळे अल्प उत्पन्न गट व २६ मध्यम उत्पन्न गट योजनेतील सर्व गाळे तसेच उत्तर-दक्षिणेकडील मोकळी जागा म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार एक रकमी पध्दतीने विक्री करण्यास मान्यता देण्यांत येते.

स. क्र. २२१ चोपडा जि. जळगांव येथील ८८ गाळे अल्प उत्पन्न गट व २६ गाळे मध्यम उत्पन्न गट या योजनेचे काम अत्यंत नित्कृष्ट दर्जाचे केल्यामुळे या कामाची चौकशी करण्यांत येऊन या कामाशी संबंधित असलेल्या अधिका-यांवर/ठेकेदारांवर जबाबदारी निश्चित करण्यांत यावी व त्याबाबतचा अहवाल प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांक : १९३/५

विषय : इमारत क्र. ८८, समतानगर, कांदिवली, पूर्व येथे बुध्द विहाराचे बांधकामास परवानगी देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९२० **दिनांक : ६.०६.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

इमारत क्रमांक ८८, समता नगर, कांदिवली, पूर्व येथे बुध्दविहाराचे बांधकाम करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या भूखंडावर बुध्द विहार बांधण्यास शासनाने मान्यता दिल्यास प्राधिकरणाची हरकत राहाणार नाही. त्याप्रमाणे शासनास कळविण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९३/७

विषय : प्राधिकरणाच्या जागतिक बँक प्रकल्प विभागातर्फे विकसित भूखंडाच्या जाहिरातीवर झालेला खर्च रुपये १.४९ लाख अनावश्यक झालेला खर्च क्षमापित करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९२१ **दिनांक : ६.०६.२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या जागतिक बँक प्रकल्प विभागातर्फे विकसित केलेल्या भूखंडाच्या जाहिरातीवर झालेला खर्च रुपये १.४९ लाख अनावश्यक झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत असून सदर खर्च निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९३/१०

विषय : साईबाबा नगर, सहकार नगर, चेंबूर हया वसाहतीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांसाठी मंडळाने बांधलेले ५६ गाळे वितरणासाठी मुंबई मंडळाने केलेल्या शिफारशीस प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९२२ दिनांक : ६.०६.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

साईबाबा नगर, सहकार नगर, चेंबूर या वसाहतीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आशिर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांसाठी मंडळाने बांधलेले ५६ गाळयांपोटी मूळ रक्कम स्विकारुन वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेंच प्राधिकरणाची मंजूरी न घेता ५६ गाळयांपैकी २४ गाळयांचे विक्रीपोटी निम्मी रक्कम स्विकारण्याची मुंबई मंडळाने केलेली कार्यवाही क्षमापित करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९३/११

विषय : स.गो.बर्वे मार्ग, नेहरु नगर, कुर्ला पूर्व या रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या वेळी निष्कासित केलेल्या अनिवासी झोपडीधारकांना पर्यायी जागा देण्याबाबत.

ठराव कमांक : ५९२३ दिनांक : ६/६/२००३.

एकमताने निर्णय घेतला की,

स.गो.बर्वे मार्ग, नेहरु नगर, कुर्ला, पूर्व या रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या वेळी निष्कासित केलेलया अनिवासी झोपडीधारकांना मानखुर्द येथील उपलब्ध ५६ दुकानांच्या विकी करता प्रस्तावित केलेलया रुपये १५००/- प्रति चौरस फूट या दराने विकी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. लाभधारकांकडून विकीची किंमत एकरकमी वसूल करण्यात यावी.

२. माथाडी कामगारांनी मागणी केलेलया उर्वरित ६ दुकानी गाळे देण्याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब कमांक : १९३/१२.

विषय : झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेतील भाडेपट्टा करार झालेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांतील/ झोपडीधारकांच्या झोपडया हस्तांतरास परवानगी देण्याबाबत..

ठराव कमांक : ५९२४ **दिनांक : ६/०६/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेतील भाडेपट्टा करार झालेलया सहकारी गृहनिर्माण संस्थांतील झोपडपट्टीधारकांच्या झोपडया हस्तांतरण करण्यासाठी हस्तांतरण शुलकाच्या २० टक्के प्रशासकीय आकार म्हणून ग्राहय धरुन कुटुंब घटक व कुटुंबातील शासनाने ठरविलेलया १७ नातेवाईकांसाठी खालीलप्रमाणे आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वापराचा प्रकार	वारस	**हस्तांतरण कुटुंबातील सतरा नातेवाईक.**
निवासी	**रु. १०००**	**रु. २,०००**
वाणिज्यक औदयोगिक	रु. २०००	रु. ४०००
संयुक्त	रु. १५००	रु.३०००

बाब कमांक : १९३/१३.

विषय : महाराष्ट्र राज्य वस्त्रोदयोग महामंडळ यांच्या मालकीची नागपूर येथील एम्प्रेस मिलची सर्व्हे क ३६२ रामबाग लॅन्ड विकत घेण्याबाबत..

ठराव कमांक : ५९२५ **दिनांक : ६/६/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र राज्य वस्त्रोदयोग महामंडळाच्या मालकीची नागपूर येथील इंम्प्रेस मिल, सर्व्हे क्र. ३६२, रामबाग लॅन्ड रुपये २० कोटी या किंमतीस प्राधिकरणास देण्यास तयार असेल तर त्याप्रमाणे ऑफर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विषय : जय सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित
२०, मंगलवाडी, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग,
गिरगांव येथील जमीन मालकास गाळा देण्याबाबत.

ठराव कमांक : ५९२६ **दिनांक : ६/६/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

जय सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित २०, मंगलवाडी, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, गिरगांव येथील जमीन मालक व त्यांचे इमारतीतील रहिवाशी यांनी कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता सदर इमारत भाडेकरुंसाठी पुनर्रचित करण्यासाठी देण्याचे मान्य करुन तशा प्रकारे म्हाडास दिलेलया प्रस्तावास मान्यता देण्यात येते. याबदद्ल जमीन मालकाने मागणी केलयाप्रमाणे फक्त २२५ चौरस फूटाचा गाळा जागा देण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २१/६/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १९४ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : १९४/४.

विषयः-१.राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व प्रादेशिक मंडळास सन २००३-२००४ या वर्षाकरीता शासनाकडून म्हाडास निधी प्राप्त होईपर्यत रु. १५.०० कोटी उपलब्ध करुन देण्याबाबत.

२. मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याकरीता संरक्षण भिंत बांधकाम कार्यक्रमासाठी रु. ८६.५४ लक्ष इतका निधी प्राधिकरणाच्या निधीतून उपलब्ध करुन देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५९२७ **दिनांक : २१/६/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रम व संरक्षण भिंती बांधकाम कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व प्रादेशिक मंडळांना सन २००३-२००४ या वर्षाकरीता शासनाकडून अर्थसंकल्पित निधी म्हाडास प्राप्त होईपर्यंत शासनाने दिनांक ८ मे, २००३ व २६ मे, २००३च्या पत्रान्वये सूचना दिल्यानुसार प्राधिकरण निधीतुन मुंबई गलिच्छ वस्ती सुधार मंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक :१९४/५

विषयः- मे. डिझायनर्स इंडिया यांच्या चांदिवली महागृहनिर्माण प्रकल्पावरील कामाबाबत असलेल्या दाव्याबाबत लवादाचा निकाल.

ठराव क्रमांकः ५९२८ दिनांक :२६/०६/०३

बहुमताने निर्णय घेतला कीं, मे. डिझायनर्स इंडिया यांच्या चांदिवली महागृहनिर्माण प्रकल्पावरील कामाबाबत असलेल्या दाव्याबाबतच्या लवादाच्या निवाडयास न्यायालयात आव्हान देण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांकः१९४/६.

विषयः- रमाबाई आंबेडकरनगर, घाटकोपर येथील संक्रमण सदनिकांची जागा पोलीस हाऊसिंग स्किमला दिल्यानंतर उदभवलेल्या कांही समस्यावर तोडगा काढणेबाबत.

ठराव क्रमांक : ५९२९ दिनांक : २१ /६/२००३.

एकमताने निर्णय घेतला कीं,

रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर येथील संक्रमण शिबिराखालील १३.५ एकर जमीन डॉ. कापसे यांच्या पोलीस फेडरेशनला पोलीस गृहनिर्माण योजना राबविण्याकरीता देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर जमिनीवर असलेल्या संक्रमण गाळयांत रहात असलेल्या २८३ अधिकृत मूळ भाडेकरुंसाठी ३०० घरे पोलीस फेडरेशनने मोफत बांधून म्हाडास द्यावीत व तेथील उरलेल्या भाडेकरुंच्या पात्र झोपडीधारकांच्या घरांची जबाबदारी एसआरएला देण्यांत येणा-या ९०० घरांमधून भागविण्यांत यावी. तसा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांकः१९४/७

विषयः- प्रतिक्षानगर, सायन येथील इमारत क्र, १,६,७,८ या इमारती बिपिन का. ऑ. हौ. सोसायटी व बाबा रामदेवजी को.ऑ.हौसिंग सोसायटी यांना उर्वरीत ५० टक्के अनुदानाची रक्कम रु.६७,५००/- मंजूर करणे अथवा ती रक्कम अदा करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्रमांकः ५९३० दिनांकः२१/०६/०३

एकमताने निर्णय घेतला कीं, प्रतिक्षाानगर, सायन येथील इमारत क्र. १,६,७,८ या इमारती बिपीन को.ऑ.हौ.सो व बाबा रामदेवजी को. ऑ.हौ. सो. यांना उर्वरीत ५० टक्के अनुदानाची रक्कम रु. ६७,५००/- म्हाडाकडे अदा करण्यास सहा महिन्याची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः-१९४/९.

विषयः-विनिमय-१६ अंतर्गत शासनातर्फे वितरीत होणा-या भूखंडाच्या विक्रीच्या किंमतविषयक धोरणात सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५९३१ दिनांकः २१/६/२००३.

एकमताने निर्णय घेतला कीं,

विनियम-१६ अंतर्गत शासनातर्फे वितरीत करण्यात येणा-या भूखंडाच्या बाबतीत व्यापारी उपयोगासाठी जर भूखंड द्यावयाचा असेल तर सरसकट व्यापारी उपयोगाकरिता असलेल्या बाजारभावाच्या १०० टक्के किंमत लावून वितरण करण्यांत यावे. निवासी कारणासाठी असेल तर निवासी बाजारभावाच्या ९० टक्के, शैक्षणिक व वैद्यकीय कारणासाठी असेल तर प्रचलित निवासी बाजारभावाच्या ७५ टक्के अशा प्रकारचे वितरण करण्यांत यावे. करमणुकीच्या जागेबाबत जर अशा प्रकारच्या मैदानावर क्लब

हाऊस. पर्यटन व जिम्नॅशियम अशा तीन प्रकारच्या कारणासाठी केलेल्या बांधकामासाठी परवानगी दिली जाते व त्याकरीता निवासी वापराच्या बाजारभावाच्या १०० टक्के किंमत लावावी व उरलेल्या मोकळया जागेकरीता जमिनीची किंमत व विकास खर्च हा १२.५ टक्के व्याजाने अद्यावत करुन येणारी किंमत आकारावी. इतर विकास आरक्षणे जिथे महापालिकेला विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे बांधकाम क्षेत्र द्यावे लागते अशा प्रकरणामध्ये जेवढे क्षेत्रफळ बांधकामासाठी त्या संस्थेला उपलब्ध होईल, त्या क्षेत्रफळावरती चालू बाजारभावाच्या ९० टक्के किंमत आकारावी.

वरिलप्रमाणे सर्व प्रयोजनार्थ बाजारभाव म्हणजे देकारपत्र देण्याच्या दिवशी प्रचलित असलेला शासकीय शिघ्रगणकानुसार (रेडीरेकनर) येणारा बाजारभाव असा अर्थ समजावा. या सर्व प्रकरणामध्ये मूलतः किंमत ही चालू बाजारभावाच्या आधारावर लावावयाची असल्यामुळे लिजरेंट वार्षिक नाममात्र रु. १/- लावण्यांत यावा. या ठरावाची अंमलबजावणी हा ठराव मंजूर झाल्याच्या दिनांकानंतर ज्या प्रकरणी देकारपत्रे देण्यात येतील त्या प्रकरणी करण्यांस मान्यता देण्यात येते. हा ठराव पारीत झालयामुळे या विषयावर प्राधिकरणाचे पूर्वीचे सर्व ठराव रद्द समजण्यात येतील.

यानंतर श्री. प्रकाश बिनसाळे, सदस्य/प्रा. यांनी असे मत व्यक्त केले कीं, प्राधिकरणाचे जे कांही निर्णय इथे घेतले जातात, ते एकत्रितरित्या घेतले जातात. कधी कधी त्यांत मतभिन्नता होते, तरीपण सामोपचाराने ते निर्णय सर्वानुमते घेतले जातात. श्री. दारशेतकर, माजी वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ यांच्याबाबतीत त्यांच्या विनंतीप्रमाणे त्यांच्या वकिलांची सुनावणी घेतली आणि म्हाडाने एकत्रित विचार करुन निर्णय घेतला व या घेतलेल्या निर्णयाची योग्ययोग्यता तपासण्यासाठी कर्नाटक हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश श्री. पेंडसे यांचे याबाबतीतील मत मागण्यांत आले व त्यांनी आपले याबाबतीतील मत दिले आहे. परंतु, शासनाने म्हाड कायदा कलम १६४ खाली त्या निर्णयास स्थगिती दिली पण आज सहा महिन्यानंतर वृतपत्रातून याबाबतीत उलटसुलट चर्चा येत असल्यामुळे त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे आजच्या बैठकीत याबाबतचा ठराव पारीत करुन या विषयाबाबतची संपूर्ण कागदपत्रे शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे पाठवून त्या विभागाने सदरहू विषय हा त्याची योग्ययोग्यता तपासणीसाठी विधी व न्याय विभागाकडे पाठवावा व वर्तमानपत्रात छापून आलेल्या चुकीच्या बातमीचे निराकरण होण्याकरीता ही बातमी वर्तमानपत्रात देण्यांत यावी.

या प्रस्तावास सर्व सभागृहाने संमती दर्शविली व प्राधिकरणाने,

ठराव क्रमांक : ५९३२ दिनांक : २१/०६/०३.

एकमताने निर्णय घेतला की,

श्री. दारशेतकर, माजी वास्तुशास्त्रज्ञ/प्रा. यांच्याबाबतीतील घेतलेल्या निर्णयावरुन म्हाडाच्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत जी चुकीची बातमी वर्तमान पत्रात छापून आली आहे. त्याकरीता श्री. दारशेतकर, माजी वास्तुशास्त्रज्ञ/प्रा. यांच्याबाबतीत म्हाडाने घेतलेल्या निर्णयाची योग्ययोग्यता तपासण्याकरीता सदरहू विषयाची संपूर्ण कागदपत्रे न्याय व विधी विभागाकडे शिफारस करुन पाठविण्याकरीता गृहनिर्माण विभागाकडे पाठविण्यांत यावीत व वर्तमानपत्रात आलेल्या चुकीच्या बातमीचे निराकरण करण्याकरीता सदरहू बातमी वर्तमानपत्रात देण्यांत यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

यानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांनी सभागृहास पुढे माहिती असे सांगितले कीं, १९९४-९५ पासून एसआरए.च्या ५५ विकासकांना म्हाडाने गाळे दिलेले आहेत. त्या विकासकांचे काम संपल्यानंतरही त्यांनी ते गाळे म्हाडास परत केलेले नाहीत व त्याचे जवळजवळ रु. ८ कोटी भाडेही म्हाडाला दिलेले नाही. अशा त-हेने या विकासकांनी म्हाडाची फसवणूक केलेली आहे. त्याबद्दल आजच्या बैठकीत ठराव करुन त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही करण्यांत यावी.

यावर आपली प्रतिक्रिया देतांना सभापती/मुंबई मंडळ म्हणाले कीं,जे विकासक नियमित भाडे भरीत आहेत, त्यांच्यावर अशाप्रकारची कार्यवाही करण्यांत येऊ नये. परंतु, जे दोषास पात्र आहेत, त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत यावी.

उपरोक्त चर्चेनंतर प्राधिकरणाने,

ठराव क्रमांक : ५९३३ दिनांक २१/०६/०३.

एकमताने निर्णय घेतला कीं, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ५५ विकासकांना म्हाडाने जे संक्रमण गाळे दिलेले आहेत, ते गाळे त्या विकासकांनी काम पूर्ण झाल्यानंतरही म्हाडास परत केलेले नसल्यामुळे तसेच त्यांच्या भाडयाची रक्कम जवळजवळ रु. ८ कोटी एवढया रकमेचा भरणा म्हाडाकडे न केल्यामुळे अशा दोषी विकासकावर फौजदारी कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची १९५ वी बैठक दि. २९/०७/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजतां गुलझारीलाल नंदा सभागृहात आयोजित करण्यांत आलेल्या बैठकीचे इतिवृत्त :

बाब क्रमांक : १९५/२

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या बैठक क्र. १९२, दिनांक २१.०४.२००३ व १०.०५.२००३ तसेच बैठक क्र. १९३, दिनांक ६.०६.२००३ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल..

ठराव क्रमांक : ५९३४ **दिनांक : २९.०७.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिरकणाच्या ठराव क्रमांक ५९१६, दिनांक २१.०४.२००३ व १०.०५.२००३ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक ३१.०७.२००३ पर्यंत इमारतीच्या अभिहस्तांतरणाच्या कामासाठी दिलेली मुदत संपल्यामुळे व या कामी प्रलंबित असलेले अर्ज तसेच यापुढे येणारे अर्ज निकाली काढण्यासाठी दिनांक १.०८.२००३ पासून पुढे ३ महिने मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९५/३

विषय : मुंबई मंडळाच्या कन्नमवार नगर, टागोर नगर, विक्रोळी, टिळक नगर, चेंबूर व नेहरु नगर, कुर्ला, येथील जलपुरवठा यंत्रणेची पातळी उंचावणे यासाठी अतिरिक्त चटई क्षेत्राद्वारे उपलब्ध होणा-या निधीतून निधी उपलब्ध करुन देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९३५ **दिनांक : २९.०७.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाच्या कन्नमवार नगर, टागोर नगर-विक्रोळी, टिळक नगर चेंबूर व नेहरु नगर, कुर्ला येथील जलपुरवठा यंत्रणेची पातळी उंचावण्यासाठी बाब टिपणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई मंडळाच्या वसाहतीत उपलब्ध होणा-या अतिरिक्त चटईक्षेत्राद्वारे, टिडीआरद्वारे उपलब्ध होणा-या निधीपैकी १० टक्के निधी तसेच चटईक्षेत्र / टीडीआर त्यावर १० टक्के सरचार्ज आकारुन यामधून मिळणा-या निधीतून नेहरु नगर, कुर्ला, (रुपये ७०.१८ कोटी) टागोर नगर, विक्रोळी (रु. २.७० कोटी) कन्नमवार नगर, विक्रोळी (रुपये ५.४० कोटी) व टिळक नगर, चेंबून (रुपये ६.०० कोटी) या वसाहतीतील पाणीपुरवठा व्यवस्थेचे उन्नतीकरण करण्याच्या कामासाठी लागणा-या एकूण रुपये २१.२८ कोटी या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर कामे प्रचलीत पध्दती अनुसरुन म्हाडामार्फत करण्यास मान्यता देण्यात येते. या कामाच्या नकाशांना महापालिकेकडून मान्यता मिळाल्यानंतरच ही कामे करण्यात यावीत.

बाब क्रमांक : १९५/४

विषय : मे.चंद्राई कन्स्ट्रक्शन, पुणे यांना अनामत रक्कम परत करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९३६ **दिनांक : २९.०७.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मे.चंद्राई कन्स्ट्रक्शन, पुणे यांनी अनुक्रमे १२ गाळे मध्यम उत्पन्न गट व ८ दुकाने बांधकाम योजना संत तुकाराम नगर, पिंपरी-पुणे तसेच १६ गाळे मध्यम उत्पन्न गट योजना संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे या कामासाठी भरलेल्या अनामत रकमेतून १० टक्के रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम परत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९५/५

विषय : प्रतिक्षा नगर, सायन येथील नवीन योजनेत ४७० चौ.फुट महाजोते बांधकाम क्षेत्रफळाच्या प्रत्येकी ३२ सदनिका असलेल्या २ इमारती महाराष्ट्र विधानसभा माजी सदस्य सहकारी गृहनिर्माण (नि.) संस्थेस वितरीत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५९३७ **दिनांक : २९.०७.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्रतिक्षा नगर, सायन येथील नवीन योजनेत ४७० चौ.फुट महाजोते बांधकाम क्षेत्रफळाच्या प्रत्येकी ३२ सदनिका असलेल्या २६-ए व २६-बी या दोन इमारती महाराष्ट्र विधान सभा माजी सदस्य सहकारी गृहनिर्माण संस्था (नि.) यांना वितरीत करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (गाळे वितरण, गाळयांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील नियम १३ (२) च्या तरतुदीच्या आधारे विशिष्ट गट किंवा गटासाठी वितरीत करण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९५/६

विषय : चतुर्थश्रेणी पुरुष व महिला कर्मचा-यांना देण्यात येणा-या गणवेषाच्या शिलाई तसेच धुलाई भत्त्यात वाढ करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९३८ दिनांक : २९.०७.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या तसेच प्रादेशिक मंडळाच्या कार्यालयात काम करणा-या चतुर्थश्रेणीतील कर्मचा-यांना प्रत्येक जोडी कपडयाच्या शिलाईपोटी रुपये १००/- ऐवजी रुपये १५०/- व चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचा-यांना एक ब्लाऊज व पेटीकोट अशा एका जोडीसाठी रुपये २०/- ऐवजी रु. ५०/- शिलाई भत्ता तसेच प्रत्येक चतुर्थश्रेणीतील पुरुष व स्त्री कर्मचा-यांना रुपये ३०/- ऐवजी रुपये ५०/- दरमहा धुलाई भत्ता वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९५/९

विषय : हुडको / एच.डी.एफ.सी. या वित्तीय संस्थांकडून तसेच महाराष्ट्र शासन यांच्याकडून घरबांधणी कार्यक्रमाकरिता दिलेल्या कर्जाचा परतावा नियत दिनांकापूर्वी करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९३९ दिनांक : २९.०७.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

शासन व वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची अदत्त रक्कम रु. २.७९ कोटी परत करण्यास व कार्जाची मुद्दल रक्कम परत करण्याच्या कालावधी पर्यंत व्याज देण्यास मान्यता देण्यात येत आहे. अशाच प्रकारची कार्यवाही हुडकोच्या कर्ज परतफेडीबाबत जागतिक बँक प्रकल्प, मुंबई मंडळ व निशिक मंडळाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९५/१०

विषय : मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्याबाबत तसेच अनुकंपा तत्वावर करावयाच्या नियुक्त्यांबाबत..

ठराव क्रमांक : ५९४० **दिनांक : २९.०७.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

बाब टिपण्णीत प्रस्तावित केल्याप्रमाणे वर्ग-३ मधील कनिष्ठ लिपिक टंकलेखक / अभिलेखापाल या संवर्गातील रिक्त असलेल्या ५२ पदांपैकी ४७ तसेच शिपाई, माळी व मदतनीस या संवर्गात रिक्त असलेल्या ४८ पदांपैकी ४३ पदे अनुशेषांतर्गत भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच वित्त विभाग शासन निर्णय, दिनांक १० सप्टेंबर २००१ अन्वये प्राधिकरणाने सादर केलेल्या कर्मचारी आकृतीबांधास उच्चस्तरीयसचिव समितीची मान्यता मिळाल्यानंतर ज्या पदोन्नत्या कर्मचा-यांना देण्यात येतील त्या परिणामी किंवा इतर कारणाद्वारे कनिष्ठ लिपिक-टंकलेखक व शिपाई संवर्गात रिक्त होणा-या एकूण संवर्ग संख्येच्या ५ टक्के पदे अनुकंपा तत्वावर त्या प्रयोजनाकरिता ठेवण्यात आलेल्या प्रतिक्षा सूचिवरील उमेदवारांना जेष्ठतेप्रमाणे नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९५/१२

विषय : गृहनिर्माण महाप्रकल्प-१ चांदिवली येथील टप्पा क्र.१ व २ बाबतच्या मे.अबोड कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या दाव्याबाबत लवादाने दिलेल्या अंतिरिम व अंतिम निवाडयाच्या आधारे उभयपक्षी समझोता करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९४१ **दिनांक : २९.०७.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

गृहनिर्माण महाप्रकल्प-१, चांदिवली येथील टप्पा क्र.१ व २ बाबतच्या मे.अबोड कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या दाव्याबाबत लवादाने दिलेल्या अंतिरिम व अंतिम निवाडयाच्या आधारे उभयपक्षी समझोता करण्यास मान्यता देण्यात येत असून लवादाने मूळ १४ दाव्यांबाबत दिलेल्या निर्णयानुसार रुपये १०.६४ कोटी अधिक १० जुलै, २००३ पर्यंतचे व्याज रुपये २.०७ कोटी असे एकूण रुपये १२.७१ कोटी कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात येईल त्या दिवसांपर्यंतचे व्याज देण्यास मान्यता देण्यात येत आहे. मे.अबोड कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंतिमतः अनामत रक्कम जी देय असेल ती त्यांना अदा करण्यात येऊन सदर प्रकरणी मे.अबोड कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे सर्व क्लेम या द्वारे अंतिमतः निकाली काढण्यात यावे. तसेच विधी सल्लागार / प्राधिकरण यांनी उभयपक्षी करावयाचा समझोता करार मसुदा तयार करुन त्यास उपाध्यक्ष / प्राधिकरण यांची मान्यता घेण्यास तसेच याबाबातची मा.उच्च न्यायालयात या संबंधाने दोन्ही बाजूने दाखल केलेली प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे एकत्रित निकाली काढण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९५/१४

विषय : कोड क्र. १४७ मधील सदनिकाधारकांकडून प्राप्त झालेल्या निवेदनावर कार्यवाही करणेबाबत.. मानखुर्द येथील अवितरीत सदनिका झोपडपट्टी सुधार मंडळाकडे हस्तांतरीत केल्यानंतर त्या इमारतीत सदनिका विकत घेऊन राहाणा-या सदनिकाधारकांकडून प्राप्त झालेली निवेदने.

ठराव क्रमांक : ५९४२ दिनांक : २९.०७.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

बाब टिपण्णीत प्रस्तावित केल्याप्रमाणे कोड क्रमांक १४७ मधील इमारत क्रमांक ८९ मधील सर्व १३६ गाळे एस.आर.ए. च्या ३३ (१०) योजनेतून वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

इमारत क्रमांक ९१-अ व ९१-ब मधील विक्री योजनेतून आलेल्या ४८ गाळेधारकांना इमारत क्रमांक ८९ मध्ये स्थलांतरीत करण्याचा पर्याय देण्यात यावा. जे गाळेधारक स्थलांतरास तयार होतील त्यांना स्थलांतरीत करुन उरलेल्या गाळेधारकांचे पैसे परत करण्यास तसेच ९१-अ व ९१-ब या इमारतीतील सर्व गाळे ३३ (१०) मध्ये रुपांतरीत करण्यास मान्यता देण्यात येते.

या ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करतांना अडचणी उद्भवल्यास त्या निवारण करुन पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९५/१५

विषय : मौजे-कोले कल्याण, सर्व्हे क्र. १५९ पै. न.भू.क्र.५५८९ पै मधील ९५० चौ.मि. क्षेत्रफळाचा वितरीत केलेला भूखंड बदलून मिळणेबाबत..
(सिध्दी विनायक सह.गृह.नि.संस्था यांची विनंती..)

ठराव क्रमांक : ५९४३ दिनांक : २९.०७.२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

मौजे-कोले कल्याण, सर्व्हे क्रमांक १५९ पै.न.भू.क्र.५५८९ पै मधील ९५० चौरस मिटर क्षेत्रफळाचा विनियम १६ अंतर्गत वितरीत केलेला भूखंड बदलून मिळणेबाबत सिध्दी विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी प्राधिकरणास केलेले निवेदन शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणीस कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट नपाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची १९६ वी बैठक दि. २५/०८/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजतां गुलझारीलाल नंदा सभागृहात आयोजित करण्यांत आलेल्या बैठकीचे इतिवृत्त :

बाब क्रमांकः१९६/१

विषयः- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २९/७/२००३ रोजी झालेल्या १९५ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.

यानंतर कार्यवृत्तातील पृष्ठ क्रमांक ३१ वर सभागृहाचे लक्ष वेधतांना ते पुढे म्हणाले कीं, अभियंत्याच्या बदल्यांच्या बाबतीत पारदर्शकता येण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले कीं, एखाद्या अभियंत्यानी प्राधिकरणाच्या मुंबईस्थित तीन मंडळात काम केल्यानंतरच त्याची झोपसु. मंडळात बदली करण्यांत यावी अशा प्रकारचा ठराव या बैठकीत मंजूर करुन तो शासनाकडे पाठविण्यांत यावा. कांही वेळा बदलीबाबतचे शासनाकडून चुकीचे आदेश येतात. हे चुकीचे आदेश शासनाच्या निदर्शनांस आणून देण्यांत यावेत. म्हाडामधील बदल्या ही म्हाडाअंतर्गत प्रशासकीय बाब असल्यामुळे या विषयामधील हस्तक्षेप शासनाने टाळावा असेही शासनास कळविण्यांत यावे. त्याचप्रमाणे म्हाडाच्या कामासंबंधी कुठल्याही आमदारांने आपणांस एखादा विशिष्ट अभियंता हवा असा आग्रह करणे योग्य नाही. एखाद्या कनिष्ठ अभियंत्याच्या बदलीबाबत मा. आमदारांनी शिफारस करणे योग्य नसून कुठल्याही अभियंत्याकडून काम करुन घेण्याची तयारी मा. आमदारांनी दर्शविणे आवश्यक आहे.

याबाबतीतील आपले मत मांडताना उपाध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, झोपडपट्टी सुधार मंडळाच्या बाबतीतच नव्हे तर कुठल्याही मंडळात तीन वर्षे पूर्ण केल्याशिवाय बदली करण्यांत येऊ नये असे शासनाचे सर्वसामान्य धोरण आहे. तरी पण म्हाडामध्ये झालेल्या बदल्या या शासनाच्या आदेशाप्रमाणेच झालेल्या आहेत. परंतु, झोपसु. मंडळातून एखाद्या अभियंत्याची बदली झाल्यानंतर तीन मंडळामध्ये किमान तीन वर्षे काम केल्यानंतर त्या अभियंत्याची बदली झोपसु. मंडळामध्ये नियमाप्रमाणे होणार असेल तर करण्यांत यावी. अशा प्रकारचा ठराव या बैठकीत मंजूर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त विचारांशी आपली सहमती दर्शवितांना अध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, अशा प्रकारचा ठराव मंजूर करुन त्याची प्रत शासनास पाठविण्यांत यावी.

उपरोक्त चर्चेनंतर प्राधिकरणाने,

ठराव क्रमांकः ५९४४ दिनांकः २५/०८/०३

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडातील अभियंत्याच्या बदल्यां ही म्हाडाअंतर्गत प्रशासकीय बाब असल्यामुळे यामधील हस्तक्षेप टाळावा असे शासनास कळविण्यांत यावे.त्याचप्रमाणे एखाद्या कर्मचा-यांची झोपडपट्टी सुधार मंडळातून बदली झाल्यानंतर त्या अभियंत्याने मुंबई मंडळ, दुरुस्ती मंडळ व कोकण मंडळ या तीन मंडळांपैकी किमान दोन मंडळात प्रत्येकी किमान तीन वर्षे काम केल्यानंतरच सदरहू अभियंता झोपडपट्टी सुधार मंडळामध्ये बदली करण्यास पात्र ठरविण्यात यावा.

सदर ठराव शासनाच्या माहितीकरीता पाठविण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९६/३.

विषय : गुरुनानक सत्संग सभेने घुसखोरी केलेल्या चुनाभट्टी, कुर्ला येथील कार्यालयीन इमारतीबाबत निर्णय घेणे..

ठराव क्रमांक : ५९४५ दिनांक : २५/८/२००३.

एकमताने निर्णय घेतला की,

गुरुनानक सत्संग सभेने घुसखोरी केलेली चुनाभट्टी-कुर्ला येथील कार्यालयीन इमारतस्थित संपूर्ण भूखंड [कार्यालयीन इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ] प्रचलित बाजारभाव लावून गुरुनानक सत्संग सभा या संस्थेस रुपये ३८,१५,७६९/- इतके अधिमूल्य आकारुन प्रचलित पध्दत अनुसरुन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते.

सदरहू ठरावावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.

बाब क्रमांकः१९६/४

विषयः- राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व प्रादेशिक मंडळास सन २००३-२००४ या वर्षाकरीता, शासनाकडून म्हाडास निधी प्राप्त होईपर्यत रु. ३७.०० कोटी प्राधिकरण निधीतून उपलब्ध करुन देण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५९४६ दिनांकः- २५/०८/२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व प्रादेशिक मंडळास सन २००३-२००४ या वर्षाकरीता शासनाकडून म्हाडास निधी प्राप्त होईपर्यत यापूर्वी मंजूर केलेल्या निधी व्यतिरिक्त रु. ११ कोटी प्राधिकरण निधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९६/५.

विषय : पंतनगर, घाटकोपर येथील तळमजली कार्यालयीन इमारत क्र. ११ जवळील अतिरिक्त जमीन श्री.एल.आर.खेमानी यांना वितरीत करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९४७ **दिनांक : २९/८/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

पंतनगर, घाटकोपर येथील तळमजली कार्यालयीन इमारत क्रमांक ११ जवळील अतिरिक्त जमीन श्री.एल.आर.खेमानी यांना मुंबई मंडळाने त्यांचे ठराव क्रमांक २१२ / २३८५ अन्वये शिफारस केलेल्या दरानुसार वितरित करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच यापुढे रस्ता रुंदीकरण, म्हाडाचे प्रकल्प राबविण्यासाठी पात्र झोपडया/दुकाने स्थलांतरीत करण्याची प्रकरणे उद्भवल्यास कायदेशिर बाबी तपासून त्यांनीही या ठरावाच्या अनुषंगाने पर्यायी जागा देण्यात याव्यात.

बाब क्रमांक : १९६/६.

विषय : ६० गाळे [७५ गाळयापैकी] अल्प उत्पन्न गट, बँक अधिक एक म्युनिसिपल आरोग्य केंद्र, सर्व्हे क्र. १६३ [पै] महावीर नगर, कांदिवली [पश्चिम] येथील योजना.
मूळ ठेकेदाराच्या राखण व पहा-याच्या दाव्याबाबत मंजूरी मिळणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९४८ **दिनांक : २५/८/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

६० गाळे [७५ गाळयांपैकी] अल्प उत्पन्न गट, बँक अधिक एक म्युनिसिपल आरोग्य केंद्र, सर्व्हे क्रमांक१६३ [पै.] महावीर नगर, कांदिवली [पश्चिम] येथील योजनेतील मूळ ठेकेदारांच्या राखण व पहा-याच्या दाव्यापोटी देय असलेली रक्कम रुपये १,२१,५००/- मान्य करण्यात येते. मात्र सदर रक्कम मा. अध्यक्ष व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी सदर योजनेची पहाणी करुन दिलेल्या अहवालाच्या अधीन राहून अदा करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

बाब क्रमांक : १९६/८.

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत मुंबई महानगर प्रदेशात राबविण्यात येणा-या व परवडणा-या अल्प उत्पन्न निवारा कार्यक्रमासाठी घेतलेल्या शासकीय कर्जाची एकरकमी परतफेड करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९४९ **दिनांक : २९०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

जागतिक बँक निवारा प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जापैकी उर्वरित अदत्त कर्जाची रक्कम रुपये ३६.२६ कोटी व सप्टेंबर, २००३ मध्ये देय असलेल्या रुपये १.४९ कोटी व्याजासह एकरकमी परतफेड करण्यास मान्यता देण्यात येते. याकरिता आवश्यक ती शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांक : १९६/११

विषय : ५ अतिगंभीर आजारांमध्ये वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत..

ठराव क्रमांक : ५९५० **दिनांक : २९.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

पाच अतिगंभीर आजारासाठी खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास त्यासाठी होणारा खर्च शाासनमान्य रुग्णालयातुन प्रमाणित करुन घेऊन शासनमान्य रुग्णालयात खर्च आला असता त्या खर्चास सिमित करुन वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती व अग्रिम शासन निर्णयानुसार म्हाडा कर्मचा-यांना अदा करण्यास मान्यता देण्यात येते. त्याप्रमाणे ठराव क्रमांक ५८६८ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक १९६/१३.

विषय : गृहनिर्माण प्रकल्प, चांदिवली येथील टप्पा १ व २ ची विकासक मे.अबोड कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी अर्धवट सोडलेली कामे म्हाडा निधीतून पूर्ण करणेबाबत.

बाब क्रमांक : ५९५१ दिनांक : २९.०८.२००३

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाने ठराव क्रमांक ५९४१ द्वारे दिनांक २९/७/२००३ अन्वये धेतलेल्या निर्णयानुसार उभयपक्षी समझोता करार दि. ५/८/२००३ रोजी उच्च न्यायालयात दाखल करुन त्यानुसार मे. अबोड कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांना समझोत्यापोटी रुपये १३.३५ कोटी रकमेपैकी आयकर व इतर वजा जाता रुपये ११.८२ कोटी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सदर समझोता करारान्वये मे. अबोड कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे सर्व दावे तसेच म्हाडाचेहीसर्व दावे अंतिमतः निकाली काढण्यात आलेले आहेत. त्यामुळे.

१] चांदिवली प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक १ मधील २३ इमारतींची व गाळयांची दुरुस्तीची, बाहय सुविधांची व विकसनाशी संबंधीत करावयाची इतर कामे व टप्पा क्र . २ मधील ५ इमारतींची अर्धवट टाकलेली कामे व विकासकाने पूर्वी केलेल्या, परंतु सध्या खराब झालेली कामे, या कामांवर होणारा खर्च म्हाडा निधीतुन करावा.

२] सदर प्रकल्पांतर्गत एल.यू.सी.पोटी महानगरपालिकेस भरलेली व भरावयाची एकूण कराची रक्कम म्हाडा निधीतून अदा करावी.

३] टप्पा-१ मधील सहा इमारतींना केलेल्या अनियमित जलजोडणीपोटी पाणी बिलाची महानगरपालिकेस भरलेली व भरावयाची एकूण देयके [दंडासहीत] म्हाडा निधीतून अदा करावी.

४] समझोता करारान्वये मे. अबोड कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिलेली रुपये १३.३५ कोटी रक्कम उर्वरित ५ इमारतींची विक्री किंमत ठरवितांना विचारात घेवू नये. परंतु वरील १ नुसार होणारा प्रत्यक्ष खर्च विक्री किंमत ठरवितांना विचारात घ्यावा.

विषय क्रमांक : १९६/१४.

विषय : महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ यांच्या मालकीची नागपूर येथील एम्प्रेस मिलची जमीन विकत घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५९५२ **दिनांक : २५.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालकीची एम्प्रेस मिल नं.५ सुभाष रोड, नागपूर येथील सुमारे १९ एकर जमीन २४ कोटी १ हजार रुपयास खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते. सदर जमीन म्हाडा मार्फतच विकसित करावयाची असून या जमिनीचे वाटप शासनाकडून विनियम १६ अंतर्गत करण्यांत येऊ नये.

सदरहू ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९६/१७.

विषय : सर्व्हे क्र. १९१-अ, येरवडा, पुणे येथील मंडळाच्या वसाहतीत व इतरत्र झालेल्या अनियमित भूखंडवितरणाबाबत व किंमत आकारणीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

ठराव क्रमांक : ५९५३ **दिनांक : २५.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

सर्व्हे क्रमांक १९१, येरवडा, पुणे येथील मंडळाच्या वसाहतीत व इतरत्र झालेल्या अनियमित भूखंड वितरणाबाबत व किंमती आकारण्याबाबत सन्माननीय सदस्य/प्राधिकरण व प्राधिकरणाच्या अधिका-यांनी केलेल्या शिफारशी विचारात घेऊन बाब टिपणी सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २८.०८.२००३ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आलेल्या १९६ व्या संलग्न बैठकीचे कार्यवृत्त :

बाब क्रमांक : १९६/१९

विषय : तारांगण सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) यांना ओशिवरा येथील आर-१७ क्षेत्र सुमारे १३२० चौ.मी.च्या भूखंडाकरिता कळविलेल्या अधिमुल्य व इतर रकमेवरील व्याज माफ करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९५४ **दिनांक : २८.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

तारांगण सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) यांना ओशिवरा येथील आर-१७ क्षेत्र सुमारे १३२० चौरस मिटर या भूखंडाचे अधिमुल्य व इतर रक्कम रु. १,०४,६१,१३३ वरील व्याज माफ करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९६/२०

विषय : तत्कालिन जागतिक बँक प्रकल्पांतर्गत झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेखाली आकारण्यात येणा-या परिसर सुधारणा शुल्क व झोपडी दुरुस्तीसाठी दिलेल्या कर्जाच्या उर्वरित हप्त्यावरील शुल्कावर ४५ टक्के सुट देणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९५५ **दिनांक : २८.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

तत्कालिन जागतिक बँक प्रकल्पांतर्गत झोपडपट्टी श्रेणीवाढ येाजनेखाली आकारण्यात यावयाच्या परिसर सुधारणा शुल्क व झोपडपट्टीसाठी दिलेल्या कर्जाच्या परतफेडीची आकारणी करीत असतांना आजवरचा हप्ता विहित दराने देऊन उर्वरित हप्त्यापोटीची रक्कम एकरकमी भरणा-या झोपडीधारकांना हप्त्यापोटी भरावयाचया रकमेत ५० टक्के सुट देण्यात यावी. सदरची सुट ही दिनांक ३१ मार्च २००४ पर्यंत असावी. ज्या झोपडीधारकांना वरीलप्रमाणे एकरकमी रक्कम भरावयाची नसेल त्यांना सध्याच्या दराने दरमहा मासिक हप्ता विहित कालावधीसाठी भरण्याची सुविधा उपलब्ध राहील.

बाब क्रमांक : १९६/२१

विषय : गृहनिर्माण भवनात भाडयाने दिलेल्या कार्यालयाच्या जागेचे भाडे निश्चित करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९५६ **दिनांक : २८.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

म्हाडाची विभागीय कार्यालये, महाराष्ट्र शासनाची कार्यालये, महाराष्ट्र शासनाचे अंगीकृत व्यवसाय जसे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, महिला आर्थिक विकास महामंडळ, महिला आयोग व नॅशनल लायब्ररी या कार्यालयाकरिता प्रति चौरस फुट प्रतिमाह रुपये १५/- याप्रमाणे भाडे आकारण्यात यावे. ही कार्यालये वगळता बँक ऑफ महाराष्ट्र आणि इतर व्यावसायिक कार्यालयांना रुपये ३०/- प्रति चौरस फुट प्रतिमाह, कर्मचारी कल्याण संघटनेला रुपये १/- प्रति चौरस फुट प्रतिमाह याप्रमाणे भाडे आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९६/१५

विषय : श्रीमती ए.जे.कोरडे, सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ यांची विभागीय चौकशी.. दिनांक १ जुलै, २००३ चे अंतिम आदेशाविरुध्द अपील.

ठराव क्रमांक : ५९५७ **दिनांक : २८.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्रीमती कोरडे, सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ यांची उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांचेदिनांक १.०७.२००३ च्या अंतिम आदेशास स्थगिती देण्याची केलेली विनंती अमान्य करण्यात येत आहे. मात्र त्यांची बाजू प्राधिकरणासमोर मांडण्यासाठी वकील नेमण्यास परवानगी देण्यास मान्यता देण्यात येते..

बाब क्रमांक : १९६/१६

विषय : श्री.पी.एम.वर्गीस, उप-अभियंता / मुंबई मंडळ यांच्या विभागीय चौकशीतील अंतिम आदेशा विरुध्द अपील..

ठराव क्रमांक : ५९५८ **दिनांक : २८.०८.२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांनी त्यांचे आदेश क्रमांक एमएच/डीई/कप्र.क्र.२५०/३१८२, दिनांक २८.०८.२००२ अन्वये श्री. वर्गीस यांना दिलेली शिक्षा कमी करण्यात येत असून त्यांनी

श्री.वर्गीस यांचे दिनांक २६.०४.२००१ ते २८.०८.२००२ पर्यंतचा निलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी म्हणून मानण्यात यावा. श्री.वर्गीस यांना निलंबनापूर्वी म्हणजेच दिनांक २६.०४.२००१ पूर्वी असलेल्या वेतनश्रेणीतील वेतनाच्या टप्प्यावर घेऊन त्या दिवसाचे ते घेत असलेले वेतन त्यांना देऊन त्यापुढील परिणामकारक लाभ जसे वेतनवाढी व नियमित वेतनश्रेणी त्यांना देण्यात यावी.

विषय : नागपूर मंडळात नवीन चंद्रपूर येथे विशेष नियोजन प्राधिकरण कार्यालयासाठी सहाय्यक संचालक नगररचना नेमणेबाबत.

ठराव क्रमांक : ५९५९ दिनांक : २८.०८.२००३

एकमताने निर्णय घेतला की,

नागपूर मंडळात नवीन चंद्रपूर येथे विशेष नियोजन प्राधिकरण कार्यालयासाठी सहाय्यक संचालक नगर रचना या पदावर काम करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी नियुक्ती करण्यात यावा. या अधिका-यास द्यावयाचे एकत्रित वेतन आणि इतर सेवा तपशिल उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी निश्चित करावेत व अशा नेमणूकी उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी त्यांच्या स्तरावर कराव्यात. या नेमणूकीस शासनाची मान्यता आवश्यक असल्यास कार्योत्तर मंजूरीसाठी सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात यावा.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ०६/१०/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १९७ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब कमांक : १९७/४ व १९७/११.

विषय : सन २००३-२००४च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतूद नसलेल्या किंवा वाढीव खर्चाची अथवा जमेची पुरवणी अंदाजपत्रकीय तरतूद मा.उपाध्यक्ष/प्रा. यांची मंजूरी घेऊन प्राधिकरणासमोर माहितीसाठी सादर करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९६० **दिनांक : ६/१०/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

आर्थिक वर्ष २००२-२००३ मध्ये उपलब्ध होणारी अधिक्याची १०० टक्के रक्कम [जमा वजा खर्च] त्यापुढील पाच आर्थिक वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी त्याचा विनियोग म्हाडाच्या उद्दिष्टांवर मुख्यतः सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात प्रस्तावित असलेल्या योजनांवर किंवा त्यापुढे होऊ घातलेल्या योजनांवर पूर्णपणे वापरण्यात येईल. तसे आयकर विभागास कळविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब कमांक : १९७/६.

विषय : म्हाडाच्या योजनेमधील गाळे वितरणासाठीच्या विविध संवर्गातील उत्पन्नाच्या मर्यादेची वाढ.

ठराव कमांक : ५९६१ **दिनांक : ६/१०/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

म्हाडाच्या योजनेमधील विविध संवर्गासाठीच्या सुधारीत उत्पन्न मर्यादा बांधकामाच्या खर्चाची मर्यादा व कर्जावरील व्याजदर खालीलप्रमाणे राहातील.व त्याप्रमाणे सदनिका विक्रीच्या जाहीरातीमध्ये तसे नमुद करावे.

संवर्ग	पूर्वीची उत्पन्न मर्यादा रु.	बांधकामाच्या खर्चाची जुनी मर्यादा रु. व व्याजदर	नवीन उत्पन्न मर्यादा रु.	बांधकामाच्या खर्चाची नवीन मर्यादा रुपये.	नवीन व्याज दर
१	२	३	४	५	६
अत्यल्प उत्पन्न गट	२,५००/- दर माह पर्यंत	५०,०००/- व्याजदर १०%	५,०००/- दर माह पर्यंत	१.०० लक्ष	१० %
अल्प उत्पन्न गट	२,५०१/- ते ५,५००/- दर माह	१,५०,०००/- व्याजदर १३ ते १३.२५%	५,००१/- ते १०,०००/- दर माह	२.०० लक्ष	१२ %
मध्यम उत्पन्न गट	५,५०१/- ते १०,०००/- दर माह	अमर्यादित व्याजदर १२.५० %, १२.७५ %, १३.००%	१०,००१/- ते १५,०००/- दर माह	अमर्यादित	लाभार्थींनी स्वतः कर्ज उभारणी करावी.
उच्च उत्पन्न गट	१०,००१/- दर माह च्यावर	अमर्यादित व्याजदर १२.५० %, १२.७५ %, १३.००%	१५,००१/- दर माह च्यावर	अमर्यादित	लाभार्थींनी स्वतः कर्ज उभारणी करावी.

फक्त अल्प व अत्यल्प उत्पन्न गटातील गाळयांसाठीच म्हाडाने स्वतः अर्थसहाय्य वरीलप्रमाणे करावे असे ठरविण्यात आले.

बाब क्रमांकः१९७/७

विषयः- प्राधिकरणाच्या दि. १२/७/२००२ रोजीच्या १८५ व्या बैठकीतील ठरावानुसार दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या इमारतींतील असलेल्या घुसखोरांना गाळे विक्री योजना लागू करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५९६२ दिनांक :- ६/१०/२००३

एकमताने असा निर्णय घेतला कीं,

१. दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या इमारतींमधील एकूण १९३+१३० अशा ३२३ फसवणूक झालेल्या घुसखोरांना रु. ५००/- प्रती चौरस फूट बांधकामाचा खर्च लावून विक्री योजना लागू करण्यांत यावी.

२. अनिवासी गाळयांच्या बाबतीत रु. १०००/- प्रति चौरस फूट एवढी रक्कम आकारण्यात यावी.

३. याबाबतची सूचना १५ दिवसांच्या आंत गृहनिर्माण भवनाच्या आवारात लावण्यांत यावी.

४. देकारपत्र दिल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आंत एक रकमी पैसे भरण्यास मुदत देण्यांत यावी.तसेच या मुदतीनंतर साडे तेरा टक्के व्याज आकारण्यांत यावे.

५. एकूण लाभधारकांची संख्या सद्या अस्तित्वांत असलेली ३२३ एवढीच सिमीत ठेवण्यांत यावी. यापेक्षा अधीक लाभार्थी आढळल्यास अधिकचे प्रत्येक प्रकरण प्राधिकरणापुढे मंजूरीस्तव सादर करावे.

६. दि.१ एप्रिल १९९९ पासून रु. ६००/- प्रमाणे भाडे वसूल करण्यात यावे.

७. मा. उपमुख्यमंत्री कार्यालयातील काम करत असलेले व मंडळाच्या इमारतीत राहाणारे शासकीय कर्मचारी श्री. वाघमारे यांना वितरीत केलेला गाळा आता ते म्हाडाचे कर्मचारी नसले तरी त्यांना खास बाब म्हणून रुपये १२००/- विक्री किंमत आकारुन सदर गाळा त्यांना विक्री करण्यात यावा.

८. ज्यांचे नांवे सदनिका आहेत व ज्यांचेकडूनआपण नियमाप्रमाणे भाडे वसूली करीत आहोत किंवा भाडे वसूल करणे मध्येच थांबविले आहे अशा सदनिकाधारकांवर कोर्टात किंवा अपिलेटमध्ये केसेस असतील तर त्या त्वरीत काढून टाकण्यात याव्यात व त्यांचे नांवे सदनिका असल्यामुळे व त्यांचेकडून भाडे स्विकारले असल्यामुळे त्यांना नियमित भाडेकरु समजून त्यांचेकडून वरीलप्रमाणे विक्रीची किंमत वसूल करु नये.

सदरहू ठरावावर कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १९७/८.

विषय : कै. एस.डी.मोरे, कनिष्ठ लिपिक,
यांना त्यांचे आजारपणात झालेल्या
वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीस विशेष
बाब म्हणून मान्यता मिळण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९६३ **दिनांक : ६/१०/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

कै. एस.डी.मोरे, कनिष्ठ लिपिक यांना त्यांचे आजारपणात झालेल्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीस विशेष बाब म्हणून रुपये १,००,००० [रुपये एक लाख मात्र] रक्कम त्यांना दिलेल्या अग्रिमाचे समायोजन करण्यासाठी मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९७/१०.

विषय : स.क्र.२२१, चोपडा, जिल्हा-जळगांव येथील ८८ गाळे अल्प उत्पन्न गट व २६ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेतील सर्व गाळे व उत्तर दक्षिणेकडील मोकळी जागा वाटपाबाबत नॉर्वेजिअन फि इर्वनजेलिकल मिशन इंडिया चॅरिटी ट्रस्ट चोपडा व ओंकार कंन्स्ट्रक्शन नाशिक यांनी केलेल्या विनंतीबाबत.. पूर्वीच्या ठरावात दुरुस्ती करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९६४ दिनांक : ६/१०/२००३

एकमताने निर्णय घेतला की,

नॉर्वेजियन फ्रि इवॅनजेलिकल मिशन इंडिया चॅरिटी ट्रस्ट, चोपडा यांना स.क्र. २२१ चोपडा, जिल्हा-जळगांव येथील नाशिक मंडळाने बांधलेले अल्प उत्पन्न गटातील ८८ गाळे व मध्यम उत्पन्न+३ गटातील २६ गाळे १५ वर्षाच्या भाडे खरेदी तत्वावर विक्री करण्यास तसेच उत्तर दक्षिणेकडील मोकळी जागा म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार एकरकमी खरेदी तत्वावर भाडेपट्टयावर देण्यास मान्यता देण्यात येते.

स.क्र. २२१ चोपडा, जिल्हा-जळगांव येथील ८८ गाळे अल्प उत्पन्न गट व २६ गाळे मध्यम उत्पन्न गट या योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे या कामाची चौकशी करण्यात येऊन या कामाशी संबंधित असलेल्या अधिका-यांवर / ठेकेदारांवर जबाबदारी निश्चित कराण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९७/१२.

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आलेले गाळे मालकी तत्वावर विक्री करण्याबाबत.

ठराव कमांक : ५९६५ **दिनांक : ६/१०/२००३.**

एकमताने निर्णय घेतला की,

(१) बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्यातील वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांना तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे ते रहात असलेली सेवानिवासस्थाने मालकी तत्वावर विक्री करण्यास मान्यता देण्यात येते. या तक्त्यांत दर्शविलेल्या वर्ग २ व वर्ग १ मधील अधिका-यांचे गाळे मालकी तत्वावर विक्री करण्याचा विचार करण्यासाठी बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत प्रशासनाने सादर करावी.

(२) बाब टिप्पणीत प्रशासनाने गाळयांच्या विक्री दराबाबत सादर केलेला विकल्प "अ" ला मान्यता देण्यात येत आहे.

(३) एकाच इमारतीतील सेवानिवासस्थाने वर्ग १,२,३ व ४ मधील कर्मचा-यांना सेवानिवासस्थाने म्हणून वितरीत केली असतील (जसे की रवीनगर, नागपूर) तरीही बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्यांत दर्शविलेल्या वर्ग ३ व ४ च्या कर्मचा-यांचीच सेवानिवासस्थाने मालकी तत्वावर विक्री करण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येते. वर्ग १ व वर्ग २ च्या काही अधिका-यांना अशा इमारतीतील सदनिका सेवानिवासस्थान म्हणून वितरीत झाले असेल तर त्यासंबंधी वर (१) मध्ये म्हटल्यानुसार स्वतंत्र बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत विचारार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात यावी.

(४) ज्ञानेश्वर नगर शिवडी - वडाळा, भारतनगर वांद्रे येथील भाडेतत्वावर असलेल्या व सेवानिवासस्थान म्हणून कर्मचा-यांना वितरीत केलेल्या सदनिका मालकी तत्वावर कर्मचा-यांना विक्री करण्यांत येवू नयेत.

(५) बाब टिप्पणी सोबत दर्शविलेल्या तक्त्यामध्ये ज्या सदनिकांची विक्री वर्ग ३ व ४ मधील कर्मचा-यांना मालकी तत्वावर करावयाची आहे त्यांच्यासाठी, त्यांची प्राधिकरणात १० वर्षे सेवा झाली असली पाहिजे ही अट ठेवण्यात येवू नये.

(६) सेवानिवासस्थान मालकी तत्वावर विक्री करण्याचे देकारपत्र कर्मचा-यांना देत असताना, त्यामध्ये नमूद करण्यात यावे की, मालकी तत्वावर विक्री करण्यात आलेला गाळा सदर कर्मचा-याला पुढे ५ वर्षे कोणालाही विकता येणार नाही व असे रु.१००/- च्या स्टॅपपेपरवर क्षतीबंधपत्र सदर कर्मचा-यांकडून घेणे अनिवार्य राहील.

(७) बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांना मालकी तत्वावर विक्री करण्यात येत असलेले गाळे हे "जसे आहे त्या परिस्थितीत " विकण्यास मान्यता देण्यात येत आहे. यापुढे या गाळयावर कोणताही दुरुस्ती किंवा अन्य खर्च विभागीय मंडळाने करावयाचा नाही.

(८) वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांना गाळा मालकी तत्वावर वितरीत करीत असल्याचे पत्र त्वरीत देण्यात यावे. हे पत्र मिळाल्यापासून गाळयाची संपूर्ण विक्री किंमत कर्मचा-याने जास्तीत जास्त उशीरा म्हणजे २ महिन्यात त्या त्या मंडळाकडे भरणे आवश्यक राहील. अन्यथा गाळयाच्या किंमतीवर प्रचलित दरानुसार व्याज आकारावे.

(९) बाब टिप्पणी सोबत असलेल्या तक्त्यातील नवीन टिळकनगर चेंबूर, मुंबई येथील इमारत क्र.१४७ व १४८ जरी उच्च उत्पन्न गट इमारती असल्या तरी सेवानिवासस्थान म्हणून असलेल्या गाळयाचे क्षेत्रफळ सुमारे २५० चौ.फूटच आहे हे लक्षात घेऊन हे गाळे तेथे रहात असलेल्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांना मालकी तत्वावर विक्री करण्यास मान्यता देण्यात येते. गाळा क्र.१४८/४९५७ मध्ये सध्या वर्ग २ चा अधिकारी रहात असल्याने हा गाळा मालकी तत्वावर वितरीत करण्याबाबत वर्ग १ व वर्ग २ मधील अधिका-यांच्या सेवानिवासस्थानाबाबत प्राधिकरणाचा जो निर्णय होईल तो या ग ाळयास लागू राहील.

(१०) मच्छिमार नगर माहीम हा तक्ता "अ" मध्ये अनुक्रमांक १६२ येथे दर्शविलेला गाळा सौ. मांजरेकर, म्हाडा कर्मचारी यांना मालकी तत्वावर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते. या गाळयाच्या शासनाच्या २ % स्वेच्छाधिकारात वितरणाबाबत श्री. इक्बाल गफार काझी यांना शासनाने दुसरीकडे गाळा वितरीत करण्याबाबत केल्याचे आदेश काढावेत, अशी विनंती
प्रशासनातर्फे शासनास करण्यात यावी.

(११) एखाद्या इमारतीतील सदनिका वर्ग ३ किंवा वर्ग ४ च्या कर्मचा-यास सेवानिवासस्थान म्हणून वितरीत केली होती. परंतु दुर्दैवाने त्याचा मृत्यू झाला असेल व त्यामध्ये सध्या त्याचे वारसदार रहात असतील किंवा कर्मचारी सेवानिवृत्त होवूनही त्याने सदनिका रिक्त करुन त्याचा ताबा मंडळास परत दिला नसेल तर अशा प्रकरणांमध्ये गाळयाची विक्री मृत कर्मचा-याचे वारसदारास किंवा सेवानिवृत्त कर्मचा-यास मालकी तत्वावर करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १०/११/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १९८ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

. . . . .

बाब क्रमांकः१९८/४

विषयः- पुणे मंडळातील कामाच्या, पुणे मंडळाने वाटाघाटीने कमी केलेल्या निविदा मान्य करण्याबाबत.

१. इचलकरंजी, जिल्हा-कोल्हापूर येथील ११२ अल्प उत्पन्न गटातील गाळयांच्या बांधकामाची निविदा.

२. तळेगांव-दाभाडे, जिल्हा-पुणे येथील ४० अल्प उत्पन्न गट अधिक १२ मध्यम उत्पन्न गट गाळे बांधकामाची निविदा.

ठराव क्रमांकः ५९६६ दिनांकः १०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला की,

पुणे मंडळाच्या (१) इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर येथील ११२ अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळयांच्या बांधकामाच्या मे. केदार कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी पुणे मंडळाने वाटाघाटी करुन कमी केलेल्या ९.९० टक्के जादा दराच्या लघुत्तम निविदेस आणि (२) तळेगांव-दाभाडे, ता. मावळ, जिल्हा-पुणे येथील ४० अल्प उत्पन्न गट + १२ मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळयांच्या बांधकामाच्या पुणे मंडळाने वाटाघाटी करुन कमी केलेल्या मे. नंदकिशोर कन्स्ट्रक्शन कं. यांच्या ९.९० टक्के जादा दराच्या लघुत्तम निविदेस, प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांकः१९८/६

विषयः- स. क्र.३७७ (भाग) चाळीसगांव, जि. जळगांव येथील नाशिक मंडळाच्या ताब्यात असलेल्या तथापि वादग्रस्त असलेल्या जमिनीबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांकः ५९६७ दिनांकः१०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला की,

स.क्र.३७७ [भाग] चाळीसगांव, जिल्हा-जळगांव येथील नाशिक मंडळाच्या ताब्यात असलेल्या तथापी वादग्रस्त असलेल्या श्री. अरुण राजाराम भोसले व इतर यांना या प्रकरणात कोणताही Locus standi नसल्यामुळे न्यायालयात जो निर्णय होईल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः१९८/७

विषय : मौजे-अंबड,तालुका-अंबड, जिल्हा-जालना येथील महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाची २.७५ हेक्टर विकास क्षेत्रातील जमीन खरेदी करण्यास प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत..

ठराव क्रमांकः ५९६८ दिनांक : १०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला की,

मौजे अंबड, ता. अंबड, जि. जालना येथील महाराारुट्र औद्योगिक महामंडळाची २.७५ हेक्टर विकास क्षेत्रातील जमीन, त्या महामंडळाने कळविलेल्या रु. १०.४५ लक्ष या किंमतीस खरेदी करण्याच्या प्रशासनाच्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांकः१९८/८

विषयः- आर-२९, एन-७ सिडको, औरंगाबाद या योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्वावर बांधण्यात आलेले व सेवानिवासस्थान म्हणून वितरीत करण्यात आलेले १५ गाळे त्यांत वास्तव्य करीत असलेल्या म्हाडा कर्मचा-यांना मालकी तत्वावर विक्री करणेबाबत.

ठराव क्रमांकः ५९६९ दि. १०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

आर-२९, एन-७ सिडको, औरंगाबाद या योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्वावर बांधण्यात आलेले व सेवासनिवासस्थान म्हणून वितरीत करण्यांत आलेले १४ गाळे त्यांत वास्तव्य करीत असलेल्या म्हाडा कर्मचा-यांना मालकी तत्वावर वितरीत करण्याचा, मा. प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांच्या दालनात झालेल्या दि. २६/१२/२००२ च्या बैठकीतील निर्णयावर प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येते.

उर्वरीत एक गाळा, जेव्हा भाडेवसुलीकाराचे कार्यालय तेथे ठेवण्याची गरज नसेल तेव्हा, सेवानिवासस्थानाच्या प्रतिक्षायादीवरील कर्मचा-यास मालकीतत्वावरच विकण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९८/९.

विषयः- स. क्र. १०५/२ चुंचाळे, नाशिक येथील अल्प उत्पन्न गट (टप्पा-२) च्या २०० गाळयांच्या वाटपासाठी आयडीपी कमी करुन कर्जात वाढ करुन व हप्ताफेडीचा कालावधी वाढवून देणेबाबत.

ठराव क्रमांकः ५९७० **दिनांकः१०/११/२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं, स.क्र. १०५/२ चुंचाळे, नाशिक येथील अल्प उत्पन्न गट (टप्पा-२) मधील योजनेतील गाळयांच्या वाटपासाठी आयडीपी कमी करुन खाली नमूद केल्याप्रमाणे तपशिलाप्रमाणे विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

अ.	गाळयांची अंदाजित विक्री किंमत	-	रु. १,१२,०००/-.
ब.	अर्जासोबत भरावयाची रक्कम	-	रु. २२,०००/-
क.	कर्ज	-	रु. ९०,०००/-
ड.	आकारावयाचा व्याज दर	-	११.५%
इ.	कर्जफेडीचा कालावधी	-	१५ वर्षे

वरील तपशिलानुसार मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी मासिक हप्ता ठरवावा व त्याप्रमाणे या योजनेतील अवितरीत ८२ सदनिकां शिवाय इतर लाभार्थींनाही याचा फायदा देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावाची अंमलबजावणी, कार्यवृत्तांच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांत यावी.

बाब क्रमांकः १९८/१०

विषयः- बाभुळगाव रोड, लातूर येथील स. क्र. ९७ (भाग)
या मंडळाच्या ताब्यातील २२५ चौ. मी. क्षेत्र
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास पाण्याची टाकी
बांधण्यासाठी भाडेपट्टयावर वितरीत करणेबाबत.

ठराव क्रमांकः ५९७१ दिनांकः१०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला कीं, लातूर येथील सर्व्हे. क्र.९७ (भाग) या मंडळाच्या ताब्यातील २२५ चौ.मी. जमीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास पाण्याची टाकी बांधण्यासाठी भाडेपट्टयावर वितरीत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येते. या जमिनीचे अधिमूल्य किती आकारावयाचे याबाबतचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यात येत आहेत. तसेच प्रस्तावित जागेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाण्याची टाकी आधीच बांधल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाबरोबर भाडेपट्टा करारनामा प्रथम करुन जमीन वितरीत करणे शक्य होणार नसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अधिमूल्य रक्कम भरुन घेतल्यानंतर भाडेपट्टा करारनामा करण्यास मान्यता देण्यांत येते.

तसेच बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार प्राधिकरण ठराव क्र. ३०९४, दि. १६/११/९२ मध्ये ज्याठिकाणी शासन किंवा शासकीय महामंडळे किंवा नगरपालिका किंवा शासकीय संस्था यांना जमिनी द्यावयाच्या असतील तर ठरावात नमूद केलेल्या बाबींसाठी वितरणाचे अधिकार उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहेत. मात्र ठरावाव्यतिरिक्त अन्य कोणास जमीन वितरीत करावयाचे प्रस्ताव असतील तर त्यासाठी प्रशासनाने आवश्यकतेनुसार बाब टिप्पणी प्राधिकरणासमोर सादर करावी.

बाब क्रमांकः१९८/११.

विषयः- प्राधिकरणाच्या वर्ग-१ व वर्ग-२ मधील अधिका-यांना सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आलेले गाळे मालकी तत्वावर विक्री करण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५९७२ दिनांकः१०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिपणीसोबत जोडलेल्या तक्त्यामधील गाळे सदर अधिका-यांना मालकी तत्वावर वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच या बाब टिप्पणीत किंवा मागील बैठकीत सादर केलेल्या बाब टिप्पणीत अत्यल्प, अल्प,व मध्यम उत्पन्न गटातील गाळे, जे सेवानिवासस्थान म्हणून अधिकारी/कर्मचा-यांना यापूर्वी वितरीत झालेले आहेत, तथापि, बाब टिप्पणीत नमूद करावयाचे राहून गेलेले आहेत, तेही गाळे अधिकारी/कर्मचा-यांना मालकी तत्वावर वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब टिप्पणीतील वर्ग-१ व २ च्या अधिका-यांना सेवानिवासस्थान म्हणून वितरीत झालेले अत्यल्प, अल्प,व मध्यम गटातील विखुरलेल्या स्वरुपातील जे गाळे मालकी तत्वावर वितरीत होणार आहेत, त्यांना गाळयांच्या मूळ किंमतीवर अनुक्रमे वर्ग-२ मधील अधिका-यांसाठी २०% व वर्ग-१ मधील अधिका-यांसाठी ३०% अशी अधिकची विक्री किंमत आकारुन मालकी तत्वावर गाळे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांकः १९८/१२

विषयः- शासनाच्या २% स्वेच्छाधिकारातून नागपूर येथील मौजे मानेवाडा या मध्यम उत्पन्न गटातील ५० गाळयांच्या योजनेअंतर्गत श्री. किशोर लक्ष्मणराव करिंगवार यांना वितरीत केलेल्या सदनिकांच्या किंमतीवरील व्याज माफीवर निर्णय घेणे.

ठराव क्रमांक :५९७३ **दिनांकः-१०/११/०३**

एकमताने निर्णय घेतला कीं, शासनाच्या २% स्वेच्छाधिकारातून नागपूर येथील मौजे मानेवाडा या मध्यम उत्पन्न गटातील ५० गाळयांच्या योजनेअंतर्गत गाळयाची अद्ययावत विक्री किंमत रु. २,२५,०००/- आकारुन श्री. किशोर करिंगवार यांना गाळयाचे वितरण करण्यांत यावे. या प्रकरणात नागपूर मंडळाच्या ज्या अधिकारी / कर्मचा-यांकडून हे प्रकरण हाताळण्यास प्रशाासकीय विलंब झाला असला तरी, त्यांचेकडून व्याजापोटी प्राधिकरणाच्या झालेल्या नुकसानीची रक्कम वसूल करण्यांत येऊ नये.

विषय क्रमांकः१९८/१४.

विषयः- अभिहस्तांतरणाच्या विशेष धडक मोहिमेस
दि. ३१/०३/२००४ पर्यत मुदतवाढ मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ५९७४ **दिनांक : १०/११/२००३**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळाच्या वसाहतींमधील इमारतींच्या अभिहस्तांतरणाच्या धडक मोहिमेला दि. ३१/०३/२००४ पर्यत मुदतवाढ देण्यास तसेच गाळयांचे हस्तांतरण शुल्क प्राधिकरणाच्या पूर्वीच्या निर्णयानुसार गाळयांच्या चौरस फूटाप्रमाणे आकारण्यांस मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांकः१९८/१६

विषयः- भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत वितरण केलेल्या आणि पर्यावरण निर्बंध नियमात बाधित ठरलेल्या भूखंडाचे अधिमूल्य भरणा विलंबावरील व्याज वसुली/वार्षिक भुईभाडे वसुली आणि इतर देय रकमांच्या आकारणीबाबत

ठराव क्रमांकः ५९७५ दिनांकः१०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

अत्यल्प व अल्प उत्पन्न गटांतर्गत तत्कालिन जागतिक बँक प्रकल्प विभागाने जाहिरातीतील अटी व शर्तीप्रमाणे अ,ब,क व ड प्रकारच्या सुमारे ९० टक्के भूखंडांचे हस्तांतरण केले असून उर्वरित १० टक्के भूखंडांचे सी.आर.झेड. निर्बंधांमुळे वितरण स्थगित करण्यात आले होते. ज्या भूखंडांचे वितरण लाभार्थींना पूर्वीच झाले आहे अशा भूखंडांच्या बाबतीत जाहिरातीतील अधिमूल्य वसूलीच्या अटी व शर्तीत कोणताही बदल केलेला नसल्यामुळे त्याच धर्तीवर जे शिल्लक भूखंड आज सी.आर.झेड. निर्बंर्ध अटी व शर्ती लागू असल्याने त्यात कोणताही बदल करण्यात येऊ नये.

उच्च उत्पन्न गटातील ई, एफ व जी प्रकारच्या भूखंडाच्या लाभार्थींकडून व्याजाची आकारणी न करता पूर्वीच दिलेलया देकारपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिमूल्याची वसूली करण्यात यावी. तसेच ज्या लाभार्थींकडून देकार पत्रातील अटींप्रमाणे अंशतः अधिमूल्याची वसूली झाली असेल त्यांचेकडून मागणीपत्राच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या विहित मुदतीत उर्वरित अधिमूल्याची वसूली करावी. अन्यथा त्यापुढील विलंब कालावधीसाठी प्रचलित धोरणानुसार व्याजाची आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. गोराई व चारकोपच्या उच्च उत्पन्न गटातील भूखंडधारकांना सी.आर.झेड.लागू असलेल्या कालावधीसाठी व्याज माफ करण्यास मान्यता देण्यात येते.

उच्च उत्पन्न गटातील ज्या भूखंडधारकांनी पूर्वीच अधिमूल्य विलंबाबाबत व्याजाचा भरणा केलेला आहे. तथापी सी.आर.झेड. निर्बंधामुळे विकासनास परवानगी मिळू शकली नव्हती त्या लाभार्थींचे व्याज माफ करण्यात येऊ नये. तसेच त्यांनी भरणा केलेल्या अधिमूल्यावर व्याज देण्यात येऊ नये.

भाडेपट्टयावर वितरण केलेल्या उच्च उत्पन्न गटातील ई.एफ व जी या प्रकारच्या भूखंडाचे वार्षिक भुईभाडे हा प्राधिकरणाचा महसूल असल्याने सी.आर.झेड. बाधीत कालावधी दरम्यान आकारण्यात येणारे वार्षिक भुईभाडे माफ करण्याबाबतची लाभार्थींनी विनंती मान्य करण्यात येत आहे व ही भुईभाडयाची रक्कम निर्लेखित करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांकः१९८/१७.

विषयः- राजीव गांधी निवारा प्रकल्पातील पुरर्रचित इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५९७६ दिनांकः १०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला कीं, राजीव गांधी निवारा प्रकल्पातंर्गत सुरु करण्यात आलेल्या व नागरी नुतनीकरण योजनेखालील इमारतींची दुरुस्ती, प्राधिकरणाने १९१ व्या बैठकीत घेतलेल्या ठराव क्र. ५८८७ मधील अट क्र. ४ प्रमाणे सद्या हमीपत्र न घेतां प्रचलित नियमांनुसार दुरुस्तीची कामे पूर्वलक्षी प्रभावाने करण्यांस मान्यता देण्यात येते. आहे.

बाब क्रमांकः१९८/१८

विषयः- सुविधा भूखंड अे-२४ शिवाईनगर, ठाणे पश्चिमच्या पुनर्वितरणाबाबत.

ठराव क्रमांक : ५९७७ दिनांकः१०/११/०३

एकमताने निर्णय घेतला की,

सुविधा भूखंड अे-२४, शिवाई नगर, ठाणे [पश्चिम] च्या पुनर्वितरणाबाबत कोंकण मंडळाने त्यांचे ठराव क्रमांक २८० अन्वये प्राधिकरणाकडे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांकः १९८/१९

विषयः- एम.आय.जी. क्रिकेट क्लब यांना वितरीत केलेल्या गांधीनगर वांद्रे (पूर्व) येथील खेळाच्या मैदानासाठी व पॅव्हेलियन, क्लबसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाची किंमत कमी करण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५९७८ दिनांकः१०/११/२००३

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई मंडळाने दिनांक १३/२/२००२ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेऊन केलेल्या शिफारशीनुसार अटीं व शर्तीच्या अधीन राहून एम. आय. जी. क्रिकेट क्लब यांना वितरीत केलेल्या गांधीनगर वांद्रे (पूर्व) येथील खेळाच्या मैदानासाठी व पॅव्हेलियन, क्लबसाठी केलेले भूखंडाचे वितरण नियमित करण्यास मान्यता देण्यांत येते.

१. एम. आय. जी. क्रिकेट क्लब यांना वितरीत केलेल्या गांधीनगर वांद्रे (पूर्व) येथील खेळाच्या मैदानासाठी व पॅव्हेलियन, क्लबसाठी आरक्षित असलेल्या भूखंडासाठी उपसंचालक/नगररचना यांनी सुचविल्याप्रमाणे रु. १,१८,२६,३६०/- सुधारीत अधिमूल्य आकारण्यांत यावे.

२. प्राधिकरणाच्या कार्यक्रमासाठी नाममात्र रु.१/- भाडे आकारुन, एम.आय.जी. क्रिकेट क्लबममध्ये असलेल्या सुविधा उपलब्धततेनुसार उपलब्ध करुन देईल.

३. प्राधिकरणाच्या विशेष पाहुण्यांसाठी एम.आय.जी क्रिकेट क्लबमधील वसतिगृहं विशेष बाब म्हणून उपलब्धतेनुसार उपलब्ध करुन देईल. याकरीता ५० टक्के सवलतीच्या दराने देखभाल शुल्क आकारण्यांत येईल.

४. एम.आय.जी.क्रिकेट क्लब यांना भूखंड वितरण करण्याबाबतच्या मूळ ठरावातील अ प्रमाणे करावयाची कार्यवाही म्हणजे वितरण पत्रातील अट क्रमांक ५ सुधारण्यात यावी. **क्लबने प्राधिकरणाकडून भूखंड हस्तांतरीत करुन घेण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने नाहरकत प्रमाणपत्र सादर करावे** या अटी ऐवजी **विकास नियंत्रण नियमावलीच्या अधीन राहून भूखंड वितरीत करावा** अशी सुधारीत अट नमूद करावी.

५. एम.आय.जी.क्रिकेट क्लब यांना भूखंड वितरण करण्याबाबतच्या मूळ ठरावातील क प्रमाणे करावयाची कार्यवाही म्हणजेच वितरण पत्रातील अट क्रमांक ८ सुधारीत करण्यात यावी याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी/पदाधिकारी यांना नाममात्र शुल्क आकारुन सदस्यत्व देण्याबाबतचे बंधन एम.आय.जी.क्रिकेट क्लबला होतो त्याऐवजी अध्यक्ष/प्राधिकरण,. उपाध्यक्ष/प्रा., मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा. मुख्य अभियंता/प्रा. विधी सल्लागार/प्रा. वित्त नियंत्रक/प्रा. सचिव/प्रा. व मुंबई मधील मंडळाचे सभापती, मुख्य अधिकारी, मुख्य अभियंता आणि अध्यक्ष/प्राधिकरण व उपाध्यक्ष/प्रा. यांनी नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती यांना सेवा सभासदत्व [सर्व्हीस मेंबरशिाप] देण्यात यावी. म्हाडातील सेवेत असेपर्यंत दिलेले सभासदत्व अखंडित राहील. मात्र त्यानंतर या सभासदत्वाचा फायदा संबंधितांना मिळणार नाही. तसेच नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचा सेवाकाल अथवा नामनिर्देशन केलेल्या अध्यक्ष/प्रा. उपाध्यक्ष/प्रा. यांचा प्राधिकरणातील सेवाकाल संपुष्टात आल्यानंतर असे केलेले नामनिर्देशन आपोआप रद्द होईल व पुन्हा नव्याने नेमणूक झालेल्या या पदावरील व्यक्तींकडून नामनिर्देशन करुन घेणे आवश्यक राहील.

६. एम.आय.जी.क्रिकेट क्लब विविध वरिष्ठ पदावरील प्राधिकरणाच्या अधिका-यांना सेवा सभासदत्व [सर्व्हीस म] देणार असल्यामुळे वितरण पत्रातील अट क्रमांक ९ प्राधिकरण/मुंबई मंडळ यांनी सूचविलेले दोन अधिकारी एम.आय.जी.क्रिकेट क्लबच्या कार्यकारी संचालक मंडळावर सदस्य म्हणून घेणे ही अट वगळण्यात यावी.

७. एम.आय.जी.क्रिकेट क्लब यांना भूखंड वितरण करण्याबाबतच्या मूळ ठरावातील क प्रमाणे करावयाची कार्यवाही म्हणजेच वितरण पत्रातील अट क्रमांक ७ सुधारण्यात यावी. **क्रिकेट खेळपट्टी सोडून उर्वरित सर्व मैदानाचा मुक्त वापर करण्यास गांधीनगर, वांद्रे [पूर्व] या वसाहतीतील सर्व रहिवाश्यांना मुभा असावी.** त्याऐवजी **गांधीनगर, वांद्रे [पूर्व] या वसाहतीतील रहिवाश्यांना खेळपट्टी सोडून इतर मैदानाचा भाग शिस्तीने वापरण्यास सकाळी ३ तास व संध्याकाळी ३ तास मुभा असावी. या मैदानाचा वापर करणा-या गांधीनगरमधील रहिवाश्यांकडून एम.आय.जी.क्रिकेट क्लब यांनी तसे प्रपत्र भरुन घेण्यास मान्यता देण्यात येते. तसेच क्लबने आपल्या सोयीनुसार वेळ निश्चित करावी,** अशी सुधारीत अट नमूद करण्यात यावी.

वरील अटींच्या अधीन राहून सदर भूखंड एम.आय.जी.क्रिकेट क्लब यांना वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९८/२२.

विषय : म्हाडाच्या नागपूर येथील इंम्प्रेस मिल क्र. ५ येथील जमिनीच्या विकासाचे धोरण ठरविण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९७९ दिनांक १०/११/२००३.

एकमताने निर्णय घेतला की,

म्हाडाच्या निर्णयानुसार ताब्यात घेतलेल्या नागपूर येथील इंम्प्रेस मिल क्रमांक ५ येथील जमिनीच्या विकासाबाबत खाजगी वास्तुशास्त्रज्ञांच्या नेमणूकीबाबत नेमणूकीबाबत निर्णय घेण्यासाठी समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर समितीमध्ये उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. मुख्य अभियंता-/प्रा. ,मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ , आणि मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा. यांचा समावेश असेल. या समितीवर प्राधिकरणाच्या एका सदस्यांना विशेष निमंत्रित म्हणून बोलाविता येईल तसेच या प्रकल्पाच्या कामासाठी चांगला अनुभव असलेले खाजगी वास्तुशाास्त्रज्ञ किंवा सिडकोचे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार यांची निवड उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे स्तरावर करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. म्हाडाकडे उपलब्ध असलेल्या १३ अनुभवी वास्तुशास्त्रज्ञांच्या यादी मधून शेवटचे ३ वास्तुशास्त्रज्ञ वगळून उर्वरित १० वास्तुशास्त्रज्ञांच्या यादीतील वास्तुशास्त्रज्ञांकडूनच प्रकल्प विकासाबाबत सूचना प्राप्त करुन घेऊन त्यातील सर्वोत्तम सूचना देणा-या खाजगी वास्तुशास्त्रज्ञांची निवड या प्रकल्पासाठी करुन त्यांची नेमणूक या प्रकल्पासाठी करण्यास व या खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे करारपत्र व व्यावसायिक शुल्क इत्यादी बाबत निर्णय सदरहू समितीने घ्यावा, यास प्राधिकरण मान्यता देत आहे. या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९८/२३.

विषय : पुणे मंडळाने वाटाघाटीने कमी केलेल्या सर्व्हे क्रमांक ८७ [भाग] हडपसर, पुणे येथील ९६ गाळयांच्या बांधकामची निविदा मान्य करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९८० **दिनांक : १०/११/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

हडपसर येथील अल्प उत्पन्न गटांतर्गत ९६ गाळयांच्या बांधकामाची पुणे मंडळाने वाटाघाटी करुन ठरविलेली मे. सतीश कंन्स्ट्रक्शन यांची १०.१० टक्के कमी दराच्या निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : ११८/२४.

विषय : विभागीय मंडळाच्या विविध वसाहतीतील आरक्षित जमिनींच्या वितरणाच्या किंमतीमध्ये सुट देण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९८१ **दिनांकः १०/११/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या विविध विभागीय मंडळाच्या विविध वसाहतीतील आरक्षित जमिनींच्या वितरणाबाबत, ज्यामध्ये काही प्रमाणात संबंधित आरक्षणाचे बांधकाम करुन संबंधित संस्थांना असे बांधकाम विनामूल्य

हस्तांतरण करण्याची अट असते, अशा भूखंडाच्या वितरणासाठी प्राधिकरणाच्या नेहमीच्या किंमत विषयक धोरणानुसार येणा-या किंमतीमध्ये मुंबईसाठी रुपयें ८००/- प्रति चौरस फूट बांधकाम क्षेत्रफळाला, मुंबई वगळून महाराष्ट्र राज्यातील इतर महानगरपालिका असलेल्या शहरांसाठी रुपयें ५००/- प्रति चौरस फूट बांधकाम क्षेत्रफळाला व इतर नगरपालिका नगरपरिषद शहरांसाठी रुपये ३५०/- प्रति चौरस फूट बांधकाम क्षेत्रफळाला दर आकारुन येणारी किंमत जमिनीच्या किंमतीमधून सूट म्हणून देण्यात यावी. याप्रमाणे सूट दिल्यानंतर येणारी जमिनीची किंमत ही जमिनीची मूळ किमंमत तसेच जमिनीच्या विकासावरील व बाहय तसेच अंतर्गत सुविधांवरील खर्च इ. नुसार येणारी किंमत व त्यावरील जमीन वितरणाच्या दिनांका पर्यंत वार्षिक १२.५ टक्के व्याज आकारुन येणा-या एकूण जमिनीच्या प्रत्यक्ष किंमतीपेक्षा कमी नसावी.

सदरहू जमिनीच्या अधिमूल्यामध्ये सूट देण्याचे दर दिनांक ३१/१२/२००६ पर्यंत लागू राहातील व त्यानंतर या दराबाबत प्राधिकरणाने फेरविचार करावा.

ज्या पूर्वीच्या प्रकरणामध्ये अशाा प्रकारच्या आरक्षित जमिनीच्या किंमतीमधूनसूट देण्याची हमी दिली असेल अशाच पूर्वीच्याप्रकरणांना सूट देण्याचीया ठरावानुसारची तरतूद लागू करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच या ठरावातील जमिनीच्या किंमतीमध्ये सूट देण्याची तरतूद भविष्यामध्ये वितरण करावयाच्या सर्व प्रकरणांना लागू राहील. सुविधांचे बांधकाम क्षेत्र निश्चित करतांना सुविधा बांधकाम अंतर्गत असलेले चटईक्षेत्र म्हणजे कारपेट एरिया अधिक २० टक्के क्षेत्र असे काढावे. या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९८/२५.

विषय : चांदिवली महाप्रकल्पः प्रकल्प समंत्रक
मे. डिझायनर्स इंडिया [पी.एम.सी] विरुध्द
म्हाडा...
लवादाच्या निर्णयावर केलेल्या आव्हान
याचिकेवरील निर्णयावर निर्णय घेणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९८२ **दिनांक : १०/११/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

चांदिवली महाप्रकल्प प्रकल्प संमंत्रक मे. डिझायनर्स इंडिया [पी.एम.सी.] विरुध्द म्हाडा या लवादाच्या निर्णयावर केलेल्या मे. डिझायनर्स इंडिया यांना लवादाने मान्य केलेल्या दाव्याच्या रुपये २,८१९९,७६९/- रकमेवर दिनांक १/४/२००३ पासून १८ टक्के व्याज दराने प्रतिदिन व्याजाची रक्कम रुपये १३,९०७/- एवढी असल्याने ती टाळण्यासाठी ज्याप्रमाणे मे. अबोड कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना उभयपक्षी समझोत्यानुसार टप्पा क्रमांक१ व २ च्या कामाबाबत Full and final settlement पोटी रु. १३.३५ कोटी रक्कम अदा करतांना त्यांचेशी मंडळा विरुध्दचे सर्व दावे निकाली निघाल्याबाबत लेखी करार करण्यात आला. त्याच धर्तीवर मे. डिझायनर्स इंडिया यांचेकडून उभयपक्षी समझोता करार करुन नंतर दाव्याची रक्कम देण्यास त्यांना मान्यता देण्यात येत आहे.

मे. डिझायनर्स इंडिया यांना रुपये २,८१,९९,७६९/- अदा करण्यापूर्वी त्यांनी मंडळा विरुध्दचे सर्व दावे निकाली निघाले असल्याचे प्रतिज्ञा पत्र म्हाडास सादर करणे बंधनकारक राहील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९८/२६.

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००१-२००२ व २००२-२००३ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ५९८३ **दिनांक : १०/११/२००२३.**

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००१-२००२ व २००२-२००३ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाने स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९८/२७.

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत मानखुर्द येथे बांधण्यात आलेल्या ७७ रिक्त सदनिका स्पार्क समुदाय निर्माण सहाय या संस्थेस वितरीत करणेबाबत..

ठराव क्रमांक : ५९८४ **दिनांक : १०/११/२००३**

एकमताने निर्णय घेतला की,

राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत मानखुर्द येथे बांधण्यात आलेल्या ७७ सदनिकांच्या विक्रीसाठी रुपये ७०,०००/- प्रति सदनिका ही विक्रीची किंमत ठेवण्यात यावी. सदनिका जशा आहेत त्या स्थितीत [As is where is basis] वितरण करण्यात याव्यात. संस्था किंवा समुदाय यांनी सर्व ७७ सदनिका वरील किंमतीमध्ये एकाच वेळी विकत घेतल्या पाहिजेत या अटीवर जाहिरात देण्यात यावी. या व्यतिरिक्त कोणतीही अट या सदनिकांच्या विक्रीसाठी ठेवण्यात येऊ नये.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ०९/०१/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या १९९ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांकः१९९/३

विषयः- प्राधिकरणाच्या/मंडळाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरण्याबाबत.

ठराव क्रमांकः ५९८५ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरणाच्या/मंडळांच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे.

१. परिशिष्ट-६ मध्ये पदोन्नतीद्वारे भरावयासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या पदांपैकी जेवढी पदे पदोन्नतीच्या कोटयातील आहेत ती भरण्यास मान्यता देण्यात येते. मात्र सरळसेवेद्वारे भरण्याकरीता राखीव असलेली पदे जर पदोन्नतीद्वारे भरण्याचे प्रस्तावित केले असेल तर सरळसेवेसाठी राखून ठेवण्यात आलेल्या एकूण पदांच्या ५० टक्के एवढया मर्यादेपर्यंतची अनुक्रमे उपमुख्य अभियंता २ पदे,कार्यकारी अभियंता ५ पदे, उपअभियंता ४ पदे, सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ ३ पदे,लेखाधिकारी वर्ग-१ ३ पदे, सहाय्यक लेखाधिकारी ५ पदे,मिळकत व्यवस्थापक ४ पदे, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक /अधिक्षक १५ पदे ,वरिष्ठ सहाय्यक/वरिष्ठ लेखा परिक्षक/ उपलेखापाल २० पदे ,कनिष्ठ सहाय्यक/ वरिष्ठ लेखापाल ३७ पदे, वरिष्ठ लिपिक ४७ पदे. अशी एकूण १४५ पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. ज्या कर्मचा-यांना अशा प्रकारे पदोन्नती दिली जाईल त्यांची पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती असेल व ही पदोन्नती शासन निर्णय क्रमांक असंक/२००१/वित्तीय सुधारणा, दि. १० सप्टेंबर, २००१ व शासन निर्णय क्र. शासाऊ/१००२/प्र.क्र.२७/२००३/साऊ, दि. १६ जून, २००३ नुसार शासनास सादर केलेल्या पदांच्या आढाव्याच्या मंजूरीच्या अधीन राहून असेल.

३. शासनाने जर प्राधिकरणामार्फत सादर करण्यात आलेल्या पदांच्या आढाव्यास मंजूरी दिली नाही किंवा प्रस्तावित केलेल्या पदांपैकी कमी पदांना मंजूरी दिली तर त्यानुसार पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांपैकी आवश्यक तेवढया कर्मचा-यांना पदावनत करण्यांत येईल. पदावनत करतांना सर्वात कनिष्ठ कर्मचा-यास आधी व त्यानंतर त्यांचेपेक्षा जेष्ठ कर्मचारी याप्रमाणे पदावनत करण्यांत येईल. अशा प्रकारची अट पदोन्नतीाच्या आदेशात नमूद करण्यांत येईल.

रिक्त पदांपैकी कोणते पद पदोन्नतीद्वारे व कोणते सरळसेवेद्वारे भरण्यात यावे याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार ठराव क्रमांक ५९८५ च्या अनुक्रमांक १ च्या अधीन राहून उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांना देण्यात येत आहेत.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहतां करण्यांत यावी.

यानंतर श्री.नांगरे सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी चर्चेच्या अनुषंगाने अशी सूचना केली की,म्हाडाने ग्रामीण भागात दुर्दम्य भागात हलाखीचे जीवन जगणा-या जनतेसाठी अतिशय स्वस्त दरात निवारा पुरविला पाहिजे. ग्रामीण भागातील लोकांना जर पुरेसा रोजगार व निवारा शासनाने उपलब्ध करुन दिला तर ग्रामीण विभागातील जनता तिथेच स्थिरावेल व पर्यायाने शहराकडे येणारे लोंढे थांबतील. शासनाने राबविलेल्या वाल्मिकी आंबेडकर योजनेमध्ये समाविष्ट होण्याइतपतही रक्कम या ग्रामीण जनतेकडे नसते. अशा अतिशय गरीब जनतेसाठी रु.५०००/- च्याऐवजी रु. ५००/- अनामत रक्कम घेऊन घरबांधणी कार्यक्रम हाती घेण्यांत यावा अशी तळमळीची मागणी त्यांनी केली व याबद्दलचा ठराव या बैठकीत मंजूर करण्यांत यावा अशी त्यांनी विनंती केली.

उपरोक्त सूचनेस आपली सहमती दर्शवितांना अध्यक्ष/प्रा. म्हणाले कीं, नववर्षाच्या निमित्ताने कांही भरीव निर्णय घेऊन घरबांधणीचा कार्यक्रम वेगाने सुरु करण्याचा संकल्प करण्यांत यावा. त्यानुसार ग्रामीण विभागातील घरांची नोंदणी करण्यासाठी भरावयाच्या रु. ५०००/- ही अनामत रक्कम कमी करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणाच्या पूढील बैठकीत सादर करावा.

श्री. नांगरे, सभापती/औरंगाबाद मंडळ यांच्या उपरोक्त मताशी आपली सहमती व्यक्त करतांनाच श्री.सुनिल शिंदे, सभापती/नागपूर मंडळ पुढे म्हणाले कीं, नागपूर मंडळाचे जमीन संपादनाचे ४१ प्रस्ताव म्हाडाकडे प्रलंबित आहेत. त्यातील पांच प्रस्तावांना उपाध्यक्ष/प्रा. यांनी भेटी दिल्या असून त्याबाबत लवकरांत लवकर कार्यवाही होणे अगत्याचे आहे. या संपादन केलेल्या जमिनीसंदर्भात म्हाडाच्या कडक अटीं असल्यामुळे तसेच त्यावर योजना त्वरीत न राबविल्यामुळे जमीनधारक आपल्या जमिनी दुसरीकडे विकून टाकतात. त्यामुळे या कडक अटीं शिथिल करणे आवश्यक आहे. असे मत त्यांनी मांडले. तसेच शासनाकडून म्हाडास प्राप्त झालेली जमीनदेखील त्यावर योजना राबविण्यास विलंब झाल्यास शासन त्वरीत आपल्या ताब्यात घेते. याबद्दलचे नुकतेच एक घडलेले उदाहरण त्यांनी सभागृहाच्या निदर्शनांस आणून दिले. याबाबतीत एक ठराव करुन शासनाकडून म्हाडास प्राप्त झालेल्या जमिनी शासनाने पुन्हा ताब्यात घेऊ नयेत असे कळविण्यांत यावे अशी आग्रहाची विनंती त्यांनी म्हाडास केली.

या विषयावर बोलतांना आमदार श्री. नितीन पाटील, सदस्य/प्रा. म्हणाले कीं, घरबांधणीचा कार्यक्रम जोमाने सुरु करण्याकरीता म्हाडाच्या वार्षिक अंदाजपत्रात विभागवार तरतूद करण्यांत यावी व प्रत्येक मंडळास त्यांचे वार्षिक उद्दिष्ट ठरवून देण्यांत यावे. असे केल्यामुळे विभागवार घरबांधणीचा कार्यक्रम जोमाने सुरु राहील.

यावर सहमती दर्शवितांना प्रधान सचिव/गृहनिर्माण म्हणाले कीं, राज्यातील प्रत्येक ठिकाणी सामान्य माणसांसाठी घरे मिळावयास हवीत याकरीता मुख्य अधिका-यांकडून तशाप्रकारचे प्रस्ताव आले पाहिजेत. याचवेळी त्यांनी मराठवाडयातील जागेची

पहाणी करण्याची जबाबदारी मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ श्री. शामसुंदर शिंदे यांच्यावर सोपविण्यात यावी अशी सूचना केली. त्यावेळी ते म्हणाले कीं, मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी मुख्य अभियंत्यासह मराठवाडा विभागाचा दौरा करुन तेथील जमिनी संपादन करण्याचा निर्णय तिथल्या तिथे घेण्याचा अधिकार श्री. शामसुंदर शिंदे यांना देण्यांत यावा. सदरहू काम सात दिवसांच्या आंत सुरु करुन मराठवाडयामध्ये जवळजवळ १० ठिकाणी तरी त्वरीत कामे सुरु होतील याची दक्षता घेण्यांत यावी. ते पुढे असेही म्हणाले कीं, म्हाडाच्या घरबांधणी कार्यक्रमाला वेग येण्यासाठी शासनाकडून म्हाडास प्राप्त झालेल्या जमिनी शासनाने परत घेऊ नयेत याबद्दलचा ठराव मंजूर करण्यांत यावा व तसे शासनास कळविण्यांत यावे.सदरहू मंजूर करण्यांत येणारा ठराव प्रधान सचिव/ गृहनिर्माण तसेच नगरविकास विभाग यांना पाठविण्यांत यावा व या ठरावाची प्रत उपाध्यक्ष/प्रा. यांच्या सहीने मा. मंत्री /गृहनिर्माण व मा. राज्यमंत्री/गृहनिर्माण यांना ही पाठविण्यांत यावी.

प्रधान सचिव/गृहनिर्माण यांच्या उपरोक्त मताशी अध्यक्ष/प्रा. व उपाध्यक्ष/प्रा. व उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली.

उपरोक्त विषयावर चर्चा होऊन प्राधिकरणाने,

ठराव क्रमांकः ५९८६ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला कीं, शासनाकडून ना.ज. क. धा. अंतर्गत म्हाडास वितरीत झालेल्या जमिनी या म्हाडाने भविष्यकाळांत राबविण्यांत येणा-या घरबांधणी योजनांसाठी ठेवलेल्या असल्यामुळे अशा जमिनी पुन्हा परत घेण्याचे आदेश शासनाकडून काढण्यांत येऊ नयेत असे शासनास कळविण्यांत यावे. या ठरावाची प्रत उपाध्यक्ष/प्रा. यांच्या सहीने मा. मंत्री /गृहनिर्माण व मा. राज्यमंत्री/गृहनिर्माण यांना पाठविण्यांत यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः१९९/५

विषयः- मौजे-निलंगा, जिल्हा-लातूर येथील गट क्र.२६८ (ब) या नगरपरिषदेच्या जमिनीवर आर्थिकदृष्टया दुर्बल घठकांकरीता १०० गाळे पूर्वनिश्चित लाभार्थींकरीता बांधणेबाबत म्हाड (मिळकत व्यवस्थापन,विक्री, हस्जांतरण व सदनिकांची अदलाबदल)विनियम १९८१ मधील विनियम १३(२)अन्वये योजना हाती घेणेबाबत शासनास शिफारस करणे.

ठराव क्रमांकः ५९८७ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला कीं,

मौजे निलंगा येथील गट क्र. २६८ (ब) या निलंगा नगरपरिषदेच्या जमिनीवर निलंगा नगरपरिषद जे लाभार्थी निश्चित करतील त्या पूर्व निश्चित लाभार्थींसाठी म्हाड (मिळकत व्यवस्थापन,विक्री, हस्तांतरण, सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये विनियम १३(२) अन्वये ही गृहनिर्माण योजना औरंगाबाद मंडळातर्फे कार्यान्वित करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : १९९/६.

विषय : जेष्ठ नागरिकांना म्हाडाची घरे
विकत देतांना व्याज दरात सूट देणेबाबत.

ठराव क्रमांकः ५९८८ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिपणीत प्रस्तावीत केल्यानुसार मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटासाठी जेष्ठ नागरिकांनी म्हाडाकडे विशिष्ठ नमुन्यातील अर्जासह घराची मागणी केली तर विक्री किंमत भरण्यासाठी विशिष्ठ मुदतीत विक्री किंमत न भरल्यास आकारावयाच्या व्याज दरात जेष्ठ नागरीकांना १ % टक्का सूट देण्यात यावी.

बाब क्रमांक : १९९/९.

विषय : कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिम राखीव
निधी उभारण्याचा निर्णय रद्दबादल करण्याबाबत..

ठराव क्रमांकः ५९८९ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना स्वतःच्या मालकीचे घर विकत घेता यावे किंवा जमीन विकत घेता यावी याकरीता म्हाडाने शासनाचे घरबांधणी अग्रिम नियमानुसार अग्रिम देण्याचे मान्य केले व हा अग्रिम देता येणे सोईचे व्हावे म्हणून घरबांधणी अग्रिमाकरीता स्वतंत्र निधी उभारण्याचा निर्णय प्राधिकरणाने दिनांक ६/८/१९९८ च्या

१५२/१५ च्या बैठकीत ठराव क्रमांक ५३३७ द्वारे घेतला व ५०.०० लक्ष रुपयाचा राखीव निधी निर्माण केला. म्हाडा कर्मचा-यांना घरबांधणी / घर विकत घेणेकरीता अग्रिम हा कर्मचा-यांच्या सेवा शर्तीचा भाग असल्यामुळे अंदाजपत्रकात योग्य तरतूद करुन वाटप करुन (Allocation) करता येतो. त्यामुळे कर्मचा-यांना द्यावयाच्या घरबांधणी अग्रिमाकरीता स्वतंत्र राखीव निधी निर्माण करणे समर्थनीय नाही. म्हणून हा राखीव निधी उभारण्याचा निर्णय रद्दबातल करण्याचानिर्णय या ठरावान्वये घेण्यात येत आहे.

मात्र राष्ट्रीय घरबांधणी योजने (N.H.S.) अंतर्गत सर्वसामान्य जनतेकरिता बांधावयाची अत्यल्प उत्पन्न गटातील व अल्प उत्पन्न गटातील घरे बांधतांना ती हुडको वा तत्सम वित्तीय संस्थांकडून कर्ज न घेता म्हाडा फंडातून कर्ज देऊन बांधावीत असा निर्णय झालेला असल्यामुळे हा निधी तसाच ठेऊन त्या कामाकरितां वापरावा व त्यात अंदाजपत्रकातील कामाचे तरतुदीनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार वाढ करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

निधीत सुयोग्य वाढ करण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी /प्राधिकरण यांना या निर्णयान्वये देण्यात येत आहेत.

बाब क्रमांक : १९९/१०.

विषय : महालक्ष्मी मॉर्डन मिल व लोअर परेल मातुल्य मिल येथील या ठिकाणी रिक्त असलेल्या सदनिकांची विक्री किंमत ठरविणेबाबत..

ठराव क्रमांकः ५९९० दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

महालक्ष्मी मॉडर्न मिल येथील वाटपास शिल्लक असलेले गाळे रुपये ३,०००/- प्रति चौरस फूट या दराने व लोअर परेल मातुल्य मिल येथील वाटपास शिल्लक असलेले गाळे रुपये २,९००/- प्रति चौरस फूट या दराने विक्री करण्यासाठी प्रचलित पध्दती अनुसरुन जाहिरात देवून विक्री करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब टिपणी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या गाळयां मधील मॉडर्न मील महालक्ष्मी व मातुल्य मील लोअर परेल येथील गाळयांची जाहिरात देऊन उर्वरित गाळयांची जाहिरात देण्यापूर्वी त्याबाबतचा प्रस्ताव प्रथम मुंबई मंडळाकडे सादर करुन मुंबई मंडळाच्या शिफारशीसह प्राधिकरणाच्या मान्यतेस सादर करण्यात यावा व त्यानंतरच या गाळयांसाठी जाहिरात देण्यात यावी. तो पर्यत ज्या गाळयांसाठी दोनदा जाहिरात देण्यात आली आहे अशा गाळयांसाठी लाभार्थींनी प्राधिकरणाकडे मागणी केल्यास प्रचलीत पध्दती अनुसरुन सदर गाळयांची विक्री करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९९/१२.

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पातील धारावी येथील इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत..

ठराव क्रमांकः ५९९१ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी निवारा प्रकल्पातंर्गत बांधण्यांत आलेल्या सर्व इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात येते. मात्र प्रत्यक्षात काम सुरु करण्यापूर्वी सर्वेक्षण करुन कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी. प्राधिकरणाची मान्यता घेतल्यानंतरच काम सुरु करावे.

बाब क्रमांक : १९९/१३.

विषय : गृहनिर्माण प्रकल्प-१ अंतर्गत कामासाठी सिमेंट व लोखंड यावर भाववाढ देण्याबाबत.. प्राधिकरणाचा ठराव क्र. ३०२८/५ स्पष्ट होण्याबाबत..

ठराव क्रमांकः ५९९२ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

सन १९९०-९१ मध्ये गल्फ वॉर झाल्यामुळे गृहनिर्माण महाप्रकल्प-१ अंतर्गत कामासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंट व पोलादाच्या त्यावेळच्या दराच्या आणि प्रत्यक्ष कामाच्या वेळच्या बाजारभावातील फरकाच्या ५० टक्के रक्कम कंत्राटदारास अदा करण्यास प्राधिकरण मान्यता देण्यात येते तसेच,मूळ भाववाढीमूळे आणि विशेष सहाय्यामुळे [स्पेशल रिलीफ] सिमेंट व पोलादापोटी दिल्या गेलेल्या भाववाढी [एक्सलेशन रक्कमेची त्या मर्यादे पुरती म्हणजेच ५० टक्के रक्कम देय रक्कमेमधून वजावट करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९९/१४.

विषय : पवई महाप्रकल्प-१ व ओशिवरा महाप्रकल्प-२ साठीच्या अतिरिक्त बाबींवर भाववाढ (एस्कलेशन) देण्याबाबत प्राधिकरणाचा ठराव क्र. ५१६९ स्पष्ट होण्याबाबत...

ठराव क्रमांकः ५९९३ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

पवई महाप्रकल्प, व ओशिवरा महाप्रकल्प-२ साठीच्या अतिरिक्त बाबींवर [इम्प्रुव्हड स्पेसिफिकेशन] भाववाढ देण्याबाबतची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यापूर्वी याबाबतची सर्व कागदपत्रांची पहाणी करुन जर कंत्राटदाराची चूक असेल तर त्यांना रक्कम अदा करण्यांत येऊ नये आणि जर कंत्राटदाराची चूक नसेलतर नियमाप्रमाणे देय रक्कम कंत्राटदारास अदा करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यास मान्यता देण्यांत येते

बाब क्रमांक : १९९/१५

विषय : अॅन्टॉप हिल, वडाळा येथील संक्रमण शिबिराचा पुनर्विकास करण्यासाठी इमारत क्र. १, टप्पा-२ चे पाईल फाऊंडरेशन व सुपर स्ट्रक्चरचे बांधकाम..

ठराव क्रमांकः ५९९४ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की, मे. कॅनॉन इंजिनिअरिंग कंन्स्ट्रक्शन कं.यांनां यापूर्वी देण्यांत आलेल्या मंडळाच्या कामांची विशेष लॅबोरेटरी टेंस्टींग करुन घेण्यांत यावी व काम चांगल्या दर्जाचे झाले आहे याची खात्री करुन घेण्यांत यावी या अटीवर ॲन्टॉप हिल, वडाळा येथील संक्रमण शिबिराचा पुनर्विकास करण्यासाठी इमारत क्र. १, टप्पा-२ चे पाईल फाऊंडेशन व सुपर स्ट्रक्चरचे बांधकाम करण्यास मे. कॅनॉन इंजिनिअरिंग कंन्स्ट्रक्शन यांची २१ टक्के उणेची र.३,८८,९५,९४९/- या रक्कमेची निविदा स्विकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : १९९/१६.

विषय : मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीची प्रमाणित मर्यादा रुपये १०००/- प्रति चौ.मी.वरुन रु. १३५०/- प्रति चौ.मी.पर्यंत वाढविणेबाबत..

ठराव क्रमांकः ५९९५ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीची प्रमाणित मर्यादा रुपये १,०००/- प्रति चौरस मिटर वरुन रुपये १२००/- प्रति चौरस मिटर पर्यंत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे व सदर प्रस्ताव शासनाकडे शिफारशीसह मान्यतेसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९९/१८.

विषय :- गृहनिर्माण भवन, वांद्रे येथील आवारात
मे. अर्बनिटाज आय.एन.सी.कॅनडा या
या कंपनीतर्फे एक प्रदर्शनिय घर उभारण्याबाबत..

ठराव क्रमांक : ५९९६ **दिनांक : ९/१/२००४.**

एकमताने निर्णय घेतला की,

गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) येथील आवारात मे. अर्बनिटाज आय.एन.सी. कॅनडा या कंपनीतर्फे सादर करण्यात आलेले प्रदर्शनिय घर उभारण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९९/२०.

विषय : ६० गाळे (७५ गाळयांपैकी) अल्प उत्पन्न गट,
बँक अधिक एक म्युनिसिपल आरोग्य केंद्र सर्व्हे
क्र. १६३ (पै) महावीर नगर, कांदिवली (पश्चिम)
येथील योजना..
सदनिकांचे सुपर बिल्टप क्षेत्रफळ कमी करणेबाबत
व सन १९९ नंतर आकारलेले व्याज माफ
करणेबाबत..

ठराव क्रमांकः ५९९७ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

६० गाळे (७५ पैकी) अल्प उत्पन्न गट बँक अधिक एक म्युनिसिपल आरोग्य केंद्र सर्व्हे क्रमांक १६३ (पै), महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) येथील योजनेतील निवासी गाळयांची सुधारीत विक्री दर रुपये १०५०/- प्र.चौ.फू. एवढा करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच सन १९९९ पासून आकारलेले व्याज माफ करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्रमांक : १९९/२१.

विषय : मंडळाच्या विविध बहुमजली इमारतींच्या व इतर वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना व अन्य लाभधारकांना वसाहतीतील उर्वरित अनुज्ञेय चटईक्षेत्र आणि अन्य तत्सम फुटकळ भूखंड वाटपाबाबत म्हाडाच्या विविध धोरणांमध्ये भागशः सुधारणा व इतर अनुषंगिक बाबींबाबत निर्णय घेणेबाबत..

ठराव क्रमांकः ५९९८ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

१/- प्राधिकरणातर्फे बांधण्यांत आलेल्या बहुमजली इमारतींच्या व इतर वसाहतीतील रहिवाश्यांच्या गरजा लक्षात घेवून, त्यांच्या सहकारी संस्थांना, व इतर संस्थांना, व इतर लाभधारकांना चटईक्षेत्रामध्ये अंतर्भूत न होणारे बांधकाम व चटईक्षेत्रामध्ये अंतर्भूत होणारे बांधकाम हाती घेण्यास ना हरकत प्रमाणपत्र देण्यास तसेच फुटकळ भूखंड व ना फुटकळ , ना विकासास योग्य असे छोटे भूखंड वितरणास मान्यता देण्यांत येते. या साठी खालील धोरणात्मक विविध प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

२/- इच्छुक सहकारी संस्थेने चटईक्षेत्रात अंतर्भूत होणारे व न होणारे बांधकाम स्वखर्चाने विकास नियंत्रण नियमानुसार महानगरपालिकेची/स्थानिक नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळवून, हाती घेण्याबाबतचा ठराव, त्यांच्या संस्थेच्या सर्वसाधारण सभेने मान्य केल्यानंतर त्यांच्या प्रतीसोबत मंडळाकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

ना हरकत प्रमाणपत्र देतांना प्रशासकीय बाबींवर होणारा खर्च वसूल व्हावा आणि सदर प्रकरणांची जरुर ती छाननी व्हावयास हवी, या दृष्टीकोनाने सदर प्रशासकीय खर्च हा ना हरकत प्रमाणपत्र देतेवेळी वसूल करण्यांत येणारा छाननी शुल्क म्हणून ग्राहय धरुन वसूल केला जावा. मुंबई शहरासाठी छाननी शुल्क प्रकरणनिहाय खालीलप्रमाणे ठरविण्यांत आले.

अ] रहिवाशी , शैक्षणिक , सामाजिक , वैद्यकिय व इतर अव्यापारी उपयोगासाठी - रुपये ६०००/-

ब] व्यापारी , औद्योगिक वापरासाठी- रुपये १२,०००/-

क] सुरक्षा भिंत , इमारत दुरुस्तींसाठी - रुपये ३०००/-

उपरोक्त दर हे मुंबई शहरासाठी वर्ष २००३-२००४ साठी मंजूर केले जात आहेत. सदरहू दर पुढील ३ वर्षांसाठी म्हणजेच ३१ मार्च २००७ पर्यंत कायम ठेवण्यांत यावेत. इतर विभागीय मंडळासाठी छाननी शुल्काचे दर उपाध्यक्ष व मु.का.अ./प्राधिकरण यांनी ठरवून द्यावेत, हे दर पुढील तीन वर्षांसाठी [३१ मार्च २००७] कायम रहातील. त्यानंतर दरवर्षी मुंबई तथा इतर विभागीय मंडळांचे छाननी शुल्क ठरविण्याचे अधिकार विभागीय मंडळांच्या मुख्य अधिका-यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

३/- सदर ना हरकत प्रमाणपत्रामध्ये इमारतीचे सध्याचे क्षेत्र, उपलब्ध बाल्कनीकरिता प्रस्तावित क्षेत्र , बांधकामाचा भाग पाडावयाचा असल्यास , त्याखालील क्षेत्र, बांधकामाचा भाग पुन्हा बांधावयाचा असल्यास, त्या खालील क्षेत्र , नवीन अथवा प्रस्तावित

बांधकामाचे उपयोगवार क्षेत्र, प्रत्येक उपयोगासाठी स्वंतत्रपणे दर्शविण्यांत यावेत. तसेच ना हरकत प्रमाणपत्र एकूण किती क्षेत्राकरिता देण्यांत आलेले आहे, इत्यादि बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा.

४/- ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महानगरपालिकेकडून परवानगी मिळविण्याची जबाबदारी सर्वस्वी अर्जदाराची राहिल. अशा परवानगीची एक प्रत सदर अर्जदाराने मंडळास देणे आवश्यक राहिल. सदर बांधकामाबाबत अर्जदार सर्वस्वी जबाबदार राहील आणि मंडळावर कोणतीही जबाबदारी रहाणार नाही. अशा आशयाचे कायदेशीर हमीपत्र सदर अर्जदाराने देणे आवश्यक आहे.

५/- उर्वरित चटईक्षेत्र , एखाद्या संस्थेला दिल्यावर इमारतीतील बांधकामात जे फेरबदल करावयाचे आहेत, ते करण्यासाठी संस्थांनी मान्यवर रचनात्मक अभियंत्यांची नेमणूक करावी व त्यांच्या सल्ल्याने तसेच मार्गदर्शनाखाली अशी कामे करावीत. उपरोक्त चटईक्षेत्राचा वापर करतांना इमारतीचे कांही नुकसान व जीवहानी झाल्यास , त्यासाठी म्हाडा जबाबदार राहणार नाही. तसेच संस्थेनी नेमणूक केलेल्या विकासकाद्वारे, विकास करतेवेळी जर जीवहानी झाल्यास, त्यासाठी देखील म्हाडा जबाबदार राहणार नाही. यासाठी संबंधित संस्थांनी व लाभधारकांनी म्हाडाला क्षतिपूरण [इंडेम्निफाय] करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा इंडेम्निटी बाँड सहकारी संस्थेकडून घ्यावा. प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापूर्वी वरील परिच्छेदांमधील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

६/- सदर सहकारी संस्थेस चटईक्षेत्रामध्ये अंतर्भूत होणारे, व न होणारे सर्व प्रकारचे बांधकाम, हाती घ्यावयाचे असल्यास, दोन्ही बांधकामांबाबत परवानगी मिळविणे आवश्यक राहिल आणि सदर प्रकरणी सहकारी संस्थेमार्फत नकाशे सादर करणे अनिवार्य राहिल.

७/- मंडळाच्या विविध वसाहतींचे सर्वेक्षण करुन सुधारित भू-अभिन्यासास स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडुन मंजूरी मिळण्याची गरज असल्यास खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे पॅनेलवरील वास्तुशास्त्रज्ञांमार्फत हे काम मंडळाच्या मुख्य अधिका-यांनी करुन घ्यावे.

८/- खाजगी वास्तुशास्त्रज्ञांचे व्यावसायिक शुल्क ठरविण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत येत आहेत. मंडळाच्या विविध वसाहतींच्या सर्वेक्षणाची कामे करण्याकरिता तसेच स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडुन त्यास मंजुरी प्राप्त करुन घेण्याकरिता पॅनेलवरील खाजगी वास्तुशास्त्रज्ञांना अथवा पॅनलवर नसलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञांना कामे द्यावयाची झाल्यास, अशा वास्तुशास्त्रज्ञांना नेमण्याचे व वसाहतीच्या अभिन्यासाच्या मंजुरीकरिता आवश्यक असणा-या सर्व कामांसाठी तसेच व्यावसायिक शुल्क ठरविण्याचे सर्व अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत येत आहेत. या कामासाठी येणा-या खर्चाची वसुली या पुढील अभिहस्तांतरण करावयाच्या गाळेधारकांकडून करण्यांत येऊ नये. याबाबत होणारा सर्व खर्च उर्वरित चटईक्षेत्राच्या एकूण निर्माण होणा-या निधी पैकी करण्यांत यावा. या कामासाठी होणारा खर्च वसाहतनिहाय वसूल होणारा नसून , ज्या वसाहतीत उर्वरित चटईक्षेत्र शिल्लक नसेल, असा खर्च उर्वरित चटईक्षेत्राच्या एकूण विक्री मधून करण्यांत यावा.

९/- वसाहतीचे सर्वेक्षण करुन सुधारित अभिन्यासास मंजुरी मिळविण्यासाठी पॅनलवरील खाजगी वास्तुशास्त्रज्ञांनी अथवा पॅनलवर नसलेल्या वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करुन ,त्यांच्याकडून काम करुन घेण्याच्या पध्दतीला दुसरी पर्यायी पध्दत विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी अवलंबू शकतात. हयामध्ये जुन्या वसाहतींचा सुधारित अभिन्यास तयार करणे व त्यास स्थानिक नियोजन प्राधिकरणाची मंजुरी प्राप्त करुन घेणे हे एक विशिष्ट प्रकारचे काम असल्यामुळे, असे काम करणारे व्यावसायिक जे वास्तुशास्त्रज्ञ किंवा स्थानिक नियोजन प्राधिकरणाकरणाचे लायसन्सधारक असू शकतील. अशा तज्ञ व अनुभवी व्यावसायिकांची पूर्व अर्हताप्राप्त यादी , विभागीय

मंडळाच्या मुख्य अधिका-यांनी योग्य ती चौकशी करुन तयार करावी. कोणत्याही भू-अभिन्यासास काम देण्यासाठी अशा पूर्व अर्हताप्राप्त यादीतून किमान ४ देकार प्राप्त होणे आवश्यक राहतील. अशा पूर्व अर्हताप्राप्त व्यावसायिकांकडून हे काम संपूर्णपणे करुन घेणे व त्यांतील सर्व कामाची जबाबदारी त्यांचेवर सोपवून काम पूर्णपणे करुन घेण्यासाठी निविदा पध्दतीने व्यावसायिक शुल्काच्या बाबत देकार मागवून निर्णय विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी घेऊ शकतील.

विविध विभागीय मंडळांच्या या ठरावानुसार सुधारित वसाहतींच्या भू-अभिन्यासास मंजुरी देण्याचे सर्व अधिकार मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

१०/- इमारतीचे अभिहस्तांतरण करीत असतांना प्रत्यक्ष जागेवरील फुटकळ भूखंड ठराव क्र.५३९६,दिनांक २७.१.१९९९ नुसार कोणत्या सहकारी संस्थेस वितरीत करावे,याचा निर्णय घ्यावा व त्याबाबत मंडळाच्या वसाहतींसाठी अधिमूल्य परिच्छेद क्र.१७ मधील दर्शविलेल्या दरानुसार वसूल करण्यांत यावे. इमारतींचे अभिहस्तांतरण करीत असतांना इमारतीच्या नियमानुसार सोडावयाच्या अनुलग्न जागेशिवाय प्रत्यक्ष जागेवर फुटकळ स्वरुपाचे अतिरिक्त भूखंड निर्माण होत असतात. असे भूखंड ठराव क्र. ५३९६ दिनांक २७.१.१९९९ नुसार कोणत्या सहकारी संस्थेस वितरीत करावे, याचा निर्णय घ्यावा व त्याबाबतचे अधिमूल्य व भुईभाडे परिच्छेद क्र.१७ मधील दर्शविलेल्या दरानुसार वसूल करण्यांत यावे. फुटकळ भूखंडाची व्याख्या पुढील प्रमाणे सुधारुन निश्चित करण्यांत येत आहे.

वसाहतीतील भू-अभिन्यासामध्ये विविध इमारतींना, नियमानुसार द्यावयाच्या अनुलग्न जागेशिवाय प्रत्यक्ष जागेवर विकास नियंत्रण नियमावलीनुसार स्वतंत्ररित्या अविकसनक्षम जागा स्वतंत्रपणे बांधकाम न करण्या योग्य जागा किंवा स्वतंत्रपणे पोट विभाजन न करण्यालायक जागेला फुटकळ स्वरुपाचे भूखंड समजण्यात यावे.अशा भूखंडांचे आकारमान किंवा मोजमापे इतक्या अरुंद पट्टयाच्या स्वरुपात असल्यामुळे

अशा भूखंडांवर स्वतंत्ररित्या बांधकाम किंवा स्वतंत्रपणे विकसन व वितरण तसेच स्वतंत्रपणे भूखंडांचे पोटविभाजन विकास नियंत्रण नियमावलीनुसार शक्य होत नाही, असे भूखंड फुटकळ भूखंड म्हणून समजण्यांत यावेत. हया फुटकळ स्वरुपाच्या भूखंडांचे विविध प्रकार पुढील प्रमाणे सुधारुन निश्चित करण्यांत येत आहेत.

अ] प्रवेश मार्ग नसणारे व आजूबाजुच्या इमारतींनी बंदिस्त असणारे भूखंड , असे भूखंड लगतच्या इमारतींची सहकारी संस्था/लाभधारकांना देण्यांत येणे शक्य होईल, असे वितरण करतांना भौमितिक निकष लावून त्याचे वितरण जास्तीतजास्त समप्रमाणात करण्यांत यावे आणि विभाजनासंदर्भात महानगरपालिकेची मंजुरी घेण्यांत यावी.

ब] दोन इमारतींमध्ये उरणारे अतिरिक्त भूखंउ ज्या ठिकाणी दोन इमारतींमधील अनुलग्न जागेशिवाय उपलब्ध असलेली अतिरिक्त जागेची रुंदी अतिशय कमी असल्यामुळे त्यावर निर्माण होणारे भूखंड सर्वसाधारणपणे भौमितिक निकष लावून समप्रमाणात लगतच्या इमारतींच्या सहकारी संस्था/लाभधारकांना वितरण करावे आणि अशा पोट विभाजनास स्थानिक नियोजन प्राधिकरणाची मंजुरी घेण्यांत यावी.

क] रस्ता,.आरक्षित भूखंड, जलाशय किंवा नाला व लगतच्या इमारती/भूखंडांमधील बंदिस्त भूखंड.

सदर भूखंडांचे क्षेत्र, मोजमापे , ठिकाण व रुंदी अशा अरुंद भूखंडांचा स्वतंत्रपणे वापरण्याची व्यवहार्यता इत्यादि निकषानुसार सदर भूखंड स्वतंत्रपणे विकसन करण्यास अपात्र ठरतात. अशा भूखंडांचे वितरण लगतच्या लाभधारकांना करण्यांत यावे.

ड] इमारतींना द्यावयाच्या अनुलग्न जागे पलिकडे अभिन्यासाची सीमा किंवा रस्त्यामध्ये निर्माण झालेले फुटकळ स्वरुपाचे भूखंड.

वरील विविध प्रकारचे फुटकळ भूखंड लगतच्या सहकारी संस्थांना किंवा लाभधारकांना वितरण करण्याचा निर्णय मुख्य अधिकारी विभागीय मंडळ यांनी घ्यावा व अशा प्रकारच्या पोट विभाजनास किंवा फुटकळ भूखंडांचे सहकारी संस्थेच्या भूखंडांमध्ये

विलिनीकरण [अंमलगमेशन] याबाबत निर्णय घेऊन, अशा भू-अभिन्यासास स्थानिक महानगरपालिका/नगरपालिकेची मंजुरी घेण्यांत यावी.

११/- स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडुन अभिन्यासाची मंजुरी प्राप्त करतेवेळी भूखंडाचे पोट विभाजन विकास नियंत्रण नियमावली नुसार केले जाते. असे निदर्शनास आले आहे की, पोट विभाजन करतेवेळी भाडेपट्टा करारनामा व पोट विभाजित भूखंडाप्रमाणे अभिन्यासामध्ये कांही अतिरिक्त भूखंड निर्माण होतात. जे ना फुटकळ स्वरुपाचे, ना स्वतंत्ररित्या बांधकामास योग्य / ना विकास करण्यालायक असे निर्माण होतात. सदर भूखंडाचे क्षेत्र, मोजमापे, ठिकाण, रस्त्यालगतची लांबी, प्रवेश मार्गाची उपलब्धता व रुंदी, वापराची व्यवहार्यता, इत्यादि नियमानुसार अशा भूखंडांवर शासकीय योजनेनुसार झुणका-भाकर केंद्र , जीवनावश्यक वस्तुंचे स्टॉल , इत्यादि प्रकारच्या उपयोगाचे तात्पुरते व एकमजली बांधकाम शक्य होऊ शकते. मात्र सदर पोट विभाजनाने निर्माण होणारे भूखंड हे अस्तित्वात असलेल्या इमारतीलगत असल्याकारणास्तव, त्या लगतची गृहनिर्माण संस्था सातत्याने , अशा भूखंडांची मंडळाकडे मागणी करीत असते. म्हणून असे भूखंड प्रथमतः लगतच्या सहकारी संस्थेस देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. जेणेकरुन वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचा कमाल वापर होणे शक्य होऊ शकेल, अशा थोडया फार मोठया स्वरुपाच्या भूखंडाचे वितरण सहकारी संस्थांना करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मु.का.अ./प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

असे भूखंड जर संस्थाना देकार देऊनही संस्थांकडून जर त्यास योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही तर , अशा प्रकारचे सर्व भूखंड जाहिरात देऊन त्याचे वितरण करण्याचा विचार करण्यांत यावा.

परंतु विविध वसाहतीमध्ये जे भूखंड फुटकळ स्वरुपाचे नसतील व जे भूखंड स्वतंत्ररित्या ना बांधकामयोग्य/ ना विकास करण्यालायक, असे निर्माण होतात परंतु सदर भूखंड हे फुटकळ भूखंड स्वरुपाचे नसल्याकारणास्तव संस्थांकडून त्या भूखंडावर

बांधकाम वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्र, / हस्तांतरणीय विकास हक्काचा वापर करुन बांधकाम करण्यासाठी मागणी केली जाते, असे भूखंड लगतच्या संस्थेस परिच्छेद क्रमांक १७ अन्वये विक्री करण्यास चटई क्षेत्र विरहित किंवा चटई क्षेत्रासह वितरणास मान्यता देण्यात येत आहे.असे भूखंड म्हणजे ज्या भूखंडावर उपलब्ध चटई क्षेत्राच्या ३३%पेक्षा जास्त चटईक्षेत्राचा वापर करता येत नाही अशाच भूखंडाचा या वितरणात समाविष्ट करण्यात यावा. इमारतीचे किंवा भूखंडाचे सीमांकन ठरवितांना कांही निर्णय पूर्वी दिले असल्यास, त्याचाही विचार करुन असे भूखंड संस्थेला / इमारतीच्या सहकारी संस्थेला वितरीत करावे. यापूर्वी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेनुसार मंजूर झालेली प्रकरणे नियमित झाली, असे समजण्यांत यावे. तसेच यापूर्वी उपाध्यक्ष व मु.का.अ/प्राधिकरण यांच्या मान्यतेने मंजूर झालेल्या प्रकरणांना कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहेत.

सदर ना फुटकळ, ना बांधकामास योग्य असे भूखंड वितरणाचे सर्व अधिकार उपाध्यक्ष व मु.का.अ/प्राधिकरण यांना या ठरावानुसार प्रदान करण्यांत येत आहेत व त्यांनी या संदर्भात घेतलेला निर्णय कायम राहिल. वरील सुधारित तरतूद विचारात घेता पूर्वीच्या ठराव क्र. ५३९६ दिनांक १७.१.९९ मध्ये वर उल्लेख केल्याप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सुधारित ठराव क्र. ५३९६,दिनांक २७.१.१९९९ ची प्रत सोबत **<u>परिशिष्ट क्र.१</u>** नुसार जोडण्यांत येत आहे.

१२/- वसाहतीतील अनुज्ञेय, उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप गाळयाच्या संख्येच्या सम प्रमाणात दर्शविणारे भू-अभिन्यास मंडळाने तयार करावे व अशा उर्वरित चटईक्षेत्राचे वाटपाबाबत परिच्छेद क्र.१७ मधील दर्शविलेल्या दरानुसार अधिमूल्य वसूल करण्यांत यावे . अशा वाटपाची कार्यवाही विभागीय मंडळाच्या वसाहतीना लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार करण्यात यावी.

१३/- वसाहतीतील अनुज्ञेय उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप गाळयांच्या क्षेत्राच्या प्रमाणात न करता वसाहतीतील सर्व गाळयांना समप्रमाणात करण्यांत यावेत. तसेच भू-

अभिन्यासास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध होणारे उर्वरित चटईक्षेत्र ज्याचा वापर मंडळाला स्वतःसाठी करता येणार नाही, अशा उर्वरित चटईक्षेत्राची माहिती सहकारी संस्थांना व इतर लाभधारकांना लेखी कळविण्यांत यावी व किमान २५ टक्के अधिमूल्याचा भरणा दिलेल्या नोटीशीच्या ९० दिवसांच्या आंत विभागीय मंडळाकडे करण्यांत यावा व अतिरिक्त चटईक्षेत्राचे आरक्षण करण्यांत यावे. तदनंतर पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यास वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचे प्रथम मागणी प्रथम पुरवठा या तत्वावर वाटप करण्यांत यावे.

१४/- उर्वरित चटईक्षेत्राच्या वितरणाबाबत ज्या प्रकरणांमध्ये वसाहतीचे सुधारित भू-अभिन्यास स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडुन मंजूर झालेले नसतांना अशा वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचे वितरण ज्या लाभार्थींना या पूर्वीच केलेले आहे, अशा लाभार्थींना त्यांच्या इमारत बांधकाम प्रस्तावास संबंधित स्थानिक नियोजन प्राधिकरणाने मान्यता दिल्यानंतर [आय.ओ.डी. मिळाल्याच्या दिनांकापासून] ९० दिवसांचे आंत देकारपत्रात ठरवून दिलेली रक्कम , बिनव्याजी भरण्याची मुभा देण्याच्या प्रस्तावांस मान्यता देण्यांत येत आहे.

१५/- फुटकळ भूखंडाचे वितरण अथवा उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप इमारतीच्या अभिहस्तांतरणा पूर्वीच किंवा अभिहस्तांतरणानंतर या धोरणानुसार आकारणी करुन वितरीत करण्यांत यावे.

१६/- उर्वरित चटईक्षेत्र की, ज्याचा वापर मंडळ आपल्या योजनांसाठी करु शकणार नाही, अशाच उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप करण्यांत यावे.

१७/- विभागीय मंडळांच्या बहुमजली इमारतींच्या वसाहतीतील फुटकळ भूखंडांचे, ना फुटकळ , ना स्वतंत्ररित्या बांधकामास योग्य / ना विकास करण्यालायक स्वरुपाचे थोडयाफार मोठया आकारमानाचे भूखंड व वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राच्या वाटपाबाबत खालीलप्रमाणे अधिमूल्याची आकारणी करण्यांत यावी.

अ] जे भूखंड फुटकळ स्वरुपाचे आहेत म्हणजेच स्वतंत्ररित्या बांधकामास योग्य नाहीत, अशा भूखंडांचे वितरण **चटईक्षेत्रविरहित** , प्रचलित वर्षाच्या रेडी रेकनरच्या रहिवासी वापराच्या दराच्या **५% दराने** करावे.

ब] जे भूखंड ना फुटकळ , ना स्वतंत्ररित्या बांधकामास योग्य / ना विकास करण्यालायक स्वरुपाचे थोडयाफार मोठया आकारमानाच्या भूखंडाचे वितरण **चटईक्षेत्रविरहित** प्रचलित वर्षाच्या रेडी रेकनरच्या रहिवासी वापराच्या दराच्या **१५% दराने** वितरण करावे.

क] विभागीय मंडळासाठी उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटप सहकारी संस्थांना व अन्य लाभधारकांना करतांना वितरण करण्याच्या एक वर्षाच्या पूर्वीच्या रेडीरेकनरच्या रहिवाशी
वापराच्या दराच्या ३० टक्के दराने वाटप/वितरण करावे.

ड] वरील अ, ब व क येथील दरानुसार वितरण रहिवासी वापर शैक्षणिक व सामाजिक वापरासाठी करावे, मात्र व्यापारी वापर, औद्योगिक वापर, वैद्यकिय वापर व इतर तत्सम वापरासाठी वरील अ,ब,क परिच्छेदात दर्शविलेल्या दराच्या **दीडपट दराने आकारणी** करावी.

इ] फुटकळ भूखंड व थोडेफार मोठे भूखंड चटईक्षेत्रासह वितरीत करावयाचे झाल्यास, चटईक्षेत्रविरहित दर परिच्छेद अ किंवा ब नुसार आकारणी करावी व चटईक्षेत्रासाठी परिच्छेद "क" प्रमाणे वेगळी आकारणी करावी.

फ] निवासी/अनिवासी व इतर वापरासाठी या परिच्छेद क्र.१७ मधील दर्शविलेल्या दरानुसार वसूल करण्यांत यावे. विविध प्रस्तावांसाठी अधिमूल्यांची आकारणी करुन, ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यांत यावे. सदर ना हरकत प्रमाणपत्र देतेवेळी पूर्वी आकारले जाणारे, विविध हस्तांतरणीय शुल्क / आकार /सरचार्ज / वार्षिक भुईभाडे इत्यादि बाबींसाठी आकारणी करण्यांत येऊ नये. तसेच यापूर्वीच्या ठराव क्र. ५३८५, दि.१४.१२.९८ अन्वये वाढीव चटई क्षेत्राच्या प्रमाणात वाढीव दर आकारु नये. [टेलिस्कोपीक पध्दतीने दर वाढवू नये] व वर उल्लेखिलेले किंमतीविषयक धोरण अवलंबावे. मात्र फुटकळ भूखंड व थोडयाफार मोठया भूखंडांसाठी वार्षिक अडीच टक्के दराने भुईभाडयाचे आठ टक्क्यांनी तीस वर्षांसाठी भांडवलीकरण करुन, रक्कम आकारुन व तद्नंतर वार्षिक नाममात्र १/- रुपये भुईभाडे आकारुन वितरण करावे.

१८/- विभागीय मंडळांनी ज्या शहरांसाठी रेडी रेकनर उपलब्ध नाही, अशा शहरांसाठी/वसाहतींसाठीचे आकारावयाचे दर उपाध्यक्ष व मु.का.अ/प्राधिकरण यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत. यापूर्वी मुंबई मंडळासाठी विभागीय दरात मंडळाच्या मुख्य अधिका-यांनी तसेच उपाध्यक्ष व मु.का.अ/प्राधिकरण यांच्या मान्यतेने वार्षिक १० % सरळव्याज आकारुन वाढ करण्यांत आलेली आहे. तसेच पुणे आणि कोंकण मंडळासाठी यापूर्वी विभागीय दरास उपाध्यक्ष व मु.का.अ/प्राधिकरण यांनी मान्यता दिलेली आहे. या दोन्ही निर्णयाप्रमाणे झालेल्या प्रकरणास या ठरावानुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

१९/- या ठरावाच्या अन्वये उर्वरित चटईक्षेत्राची विक्री व आकारणी मुंबई इतर महानगरपालिका व अ वर्ग नगरपालिका असलेल्या शहरांसाठी परिच्छेद क्र.१७ मधील दर्शविलेल्या दरानुसार वसूल करण्यांत यावे. ब आणि क वर्गाची नगरपालिका/नगर परिषद व ग्रामपंचायत भागातील वसाहतींना या ठरावाद्वारे आकारणी करण्यांत येऊ नये. मात्र अशा शहरांतील वसाहतींना उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप छाननी शुल्क आकारुन वितरीत करण्यांत यावेत.

फुटकळ भूखंड व थोडयाफार मोठया भूखंडासाठी परिच्छेद क्र. १७ नुसार आकारणी व वितरणाचे धोरण विभागीय मंडळाच्या सर्वच वसाहती ज्या महानगरपालिका, नगरपरीषद, नगरपालिका, अ/ब/क प्रकारची शहरे व इतर ग्रामीण भागातील अशा सर्व वसाहतीतील (बैठया गाळयांच्या वसाहतीसह) लाभार्थींना लागू राहील. कार्यालयीन इमारतींना असे फुटकळ व थोडयाफार मोठया भूखंडाचे वितरण ठराव क्र.४०७६ येथील किंमती विषयक धोरणानुसार वितरण करावे.

ज्या वसाहती बहुमजली स्वरुपाच्या नाहीत किंवा १९८७ च्या शासन निर्णयातील बैठया वसाहतीमध्ये ज्यांचा समावेश नाही अशा इतर प्रकारच्या बैठया गाळयांच्या वसाहतीमधील (ग्रोईंग हाऊस प्रकारासह) लाभार्थींना उर्वरीत चटईक्षेत्र, फुटकळ भूखंड, व थोडेफार मोठे भूखंड वितरीत करण्यासाठी या ठरावातील परिच्छेद क्र.१७ नुसार आकारणी करुन असे वितरण करावे.

२०/- प्राधिकरणाने कर्मचारी कल्याण योजनेंतर्गत कर्मचा-यांना त्यांच्या गृहनिर्माण संस्था बांधण्याकरिता भूखंड वितरीत केलेले आहेत. अशा कर्मचारी कल्याण योजनेतून बांधण्यांत आलेल्या संस्था देखील वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्रासाठी अर्ज करीत असतात. या ठरावानुसार वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्र ,फुटकळ भूखंड व थोडेफार मोठे भूखंड कर्मचारी कल्याण योजनेंतर्गत वितरीत झालेल्या संस्थांना वितरण करण्यास मान्यता देण्यांत येत आहे व यापूर्वी ज्या कर्मचारी कल्याण योजनेंतर्गत वितरीत झालेल्या संस्थांना अतिरिक्त चटईक्षेत्राचे वितरण झालेले आहे, व नव्याने बांधलेले गाळे खुल्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यास या ठरावानुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. अशाच प्रकारच्या इतर विशेष घटकांसाठी या ठरावातील विविध प्रकारच्या वितरणाबाबत आकारणी करुन ना हरकत प्रमाणपत्र द्यावे.

२१/- उपरोक्त निर्णयानुसार प्राधिकरणाच्या ठराव क्र.५३७७ दिनांक १४.१२.१९९८ मधील परिच्छेद क्र.'६' , परिच्छेद क्र.अ,ब,क,व ड, तसेच त्यानंतर नोंदविलेल्या परिच्छेद

" सर्व प्रकरणांमध्ये---------- तक्ता 'ड' प्रमाणे फी आकारण्यांत यावी." ही तरतूद या ठरावानुसार वगळण्यांत येत आहे. म्हणजेच ठराव क्र. ५३७७ दिनांक १४.१२.१९९८ अन्वये वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्र वितरीत केल्यानंतर, त्याचा वापर अधिकचे गाळे निर्माण करण्यासाठी निवासी वापरातील विविध भूखंड, सहकारी संस्थांना वितरीत केलेले भूखंड, बैठ्या स्वरुपाच्या गाळयांच्या योजनेत उपलब्ध असलेले चटईक्षेत्र, कार्यालयीन इमारतीत उपलब्ध असलेले चटईक्षेत्र इत्यादि प्रकरणांमध्ये वसाहतीचे अतिरिक्त चटईक्षेत्र वापरुन अधिकचे गाळे बांधण्यांत येतात. अशा अतिरिक्त गाळयांना ठराव क्र. ५३७७ दिनांक १४.१२.१९९८ अन्वये हस्तांतरणाची फी आकारण्यांत येऊ नये. सुधारित ठराव क्र. ५३७७ दिनांक १४.१२.१९९८ सोबत **परिशिष्ट क्र.२** नुसार जोडण्यात येत आहे.

प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५८१६ दिनांक १२.७.२००२ या ठरावामधील जुन्या वसाहतीतील सामायिक , नागरी व अंतर्गत सुविधांची दुरुस्ती करण्यासाठी १०%सरचार्ज आकारण्याची तरतूद रद्द करण्यांत येत आहे. म्हणजेच प्राधिकरणाचा ठराव क्र. ५८१६ दिनांक १२.७.२००२ हया ठरावान्वये रद्द करण्यांत येत आहे.

या ऐवजी विविध वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राची विक्री करुन उपलब्ध होणारा निधी तसेच हस्तांतरणीय विकास हक्काची आकारणी शुल्कामधून प्राप्त होणारा निधी वसाहतीतील सामायिक , नागरी व अंतर्गत सुविधांची दुरुस्ती करणे, त्याची पातळी उंचावणे किंवा वसाहतींना नवीन सुविधा उपलब्ध करुन देणे इत्यादि कामांसाठी अशा निधीचा उपयोग करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. या कामासाठी टक्केवारीचे बंधन ठेवण्यांत येत नाही. अशा प्रकारे विविध वसाहतींच्या सामायिक सुविधांची दुरुस्ती ,पातळी उंचावणे किंवा नवीन सुविधा देणे, याबाबतचे प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

२२- यापूर्वी विविध संस्थांना जारी केलेले देकारपत्र, ज्यामध्ये संस्थेने संपूर्ण रकमेचा भरणा केलेला नसेल, किंवा कोणत्याही रकमेचा भरणा केला नसेल, अशा सर्व

संस्थांना यापूर्वी दिलेले देकारपत्र रद्द करण्यांत येऊन, सदर ठरावानुसार ज्या चटईक्षेत्राची रक्कम अदा झालेली आहे, असे चटईक्षेत्र वगळून, नवीन देकारपत्र ज्यामध्ये परिच्छेद क्र.१७ मधील दर्शविलेल्या दरानुसार नमूद केल्याप्रमाणे विविध प्रकारची आकारणी करुन, सुधारित देकारपत्र देण्यांत यावे व संस्थांनी सदर देकारपत्रानुसार कळविल्याप्रमाणे किमान २५ % रकमेचा भरणा केल्यानंतरच, संस्थेच्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रस्तावाचा, विचार करण्यांत यावा व ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यांत यावे. वर उल्लेख केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या जागतिक बँक प्रकल्पांतर्गत येणा-या सर्व गृहनिर्माण संस्थांना देखील याचप्रमाणे आकारणी करण्यांस या ठरावानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

२३- अ नवीन चटई क्षेत्राच्या सर्व देकारपत्रात २५% रक्कम भरण्यास ९० दिवसांचा कालावधी देण्यांत यावा व उर्वरित ७५% रक्कम भरण्यास आणखी ९० दिवसांचा कालावधी देण्यांत यावा. वरील ७५% रक्कम भरणा न केल्यास पुढील ६० दिवसांचा कालावधी देण्यांत यावा. तद्नंतर रक्कम न भरल्यास किंवा भागशः रक्कम भरली असल्यास, उर्वरित चटईक्षेत्राचे [ज्याची रक्कम भरलेली नाही, असे चटईक्षेत्र] देकारपत्र रद्द करण्यांत यावे. त्याच संस्थेला पुन्हा देकारपत्र द्यावयाचे झाल्यास परिच्छेद क्र.१७ मध्ये दर्शविलेल्या दरामध्ये १०% वाढ करुन अशी सुधारित रक्कम आकारुन सुधारित दराने देकारपत्र जारी करावे. यापूर्वी देकारपत्रे दिलेल्या विविध प्रकरणांना पूर्ण अथवा भागशः रक्कम न भरलेली असल्यास याच प्रमाणे सुधारित देकारपत्र देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

ब - फुटकळ भूखंड व **थोडे फार मोठ्या आकारमानाचे** भूखंडासाठी संपूर्ण रक्कम भरण्यास ९० दिवसाचा कालावधी देण्यात यावा व सदर रक्कम न भरल्यास पुढील ६० दिवसाचा कालावधी १० % सरळव्याज आकारुन वाढवून देण्यात यावा.

२४- मुंबई मंडळाच्या वसाहतीतील तसेच इतर विभागीय मंडळाच्या वसाहतीतील ज्यामध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार, हस्तांतरणीय विकास हक्काचा

[टी.डी.आर.चा]वापर अनुज्ञेय आहे. अशा लाभार्थींनी स्वतः खुल्या बाजारातून टी.डी.आर.विकत घेवून, त्यांना भाडेपट्टयाने वितरीत केलेल्या भूखंडावर असा टी.डी.आर.वापरण्याची परवानगी मागितल्यास, विविध अटी व शर्तींवर प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ५५५२ दिनांक २७.३.२००० नुसार मंजूरी देण्यांत येते.

मुंबई शहराच्या व ज्या शहरामध्ये टिडीआरचा नियम लागू आहे, अशा शहरांमध्ये या पूढे संस्थांनी बाहेरुन टिडीआर विकत घेऊन ना हरकत प्रमाणपत्र मागितल्यास प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनर मधील रहिवाशी वापराच्या दराच्या ३ % दर आकारुन रहिवाशी, शैक्षणिक, सामाजिक वापरासाठी ना हरकत प्रमाणपत्र द्यावे. तसेच व्यापारी , औद्यौगिक ,वैद्यकिय व तत्सम वापरासाठी वरील दराच्या दिडपट दराने आकारणी करुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. या आकारणीवर वाषिक भूई भाडे आकारणी करु नये.

विकास नियंत्रण नियमावली क्र.३३ [२] अन्वये मुंबई शहरासाठी तसेच इतर शहरांसाठी वेळोवेळी अनुज्ञेय ठरणा-या नेहमीच्या चटईक्षेत्रापेक्षा अधिकचे चटईक्षेत्र सामाजिक, शैक्षणिक , वैद्यकिय व इतर संस्थांना देण्याची तरतूद असते. असे अधिकचे चटईक्षेत्र स्थानिक नियोजन प्राधिकरण मंजूर करीत असतात. अशा अधिकच्या चटईक्षेत्रासाठी देखील या ठरावानुसार व या परिच्छेदातील वरील तरतुदी नुसार आकारणी करुन ना हरकत प्रमाणपत्र दयावे.

या ठरावातील या सुधारित तरतुदी नुसार प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ५५५२ दिनांक २७/३/२००० रद्द करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे बाहेरील टिडीआर किंवा चटईक्षेत्र वापरण्याची परवानगी देण्यापूर्वी मंडळाच्या वसाहतीत उर्वरित चटईक्षेत्र अर्जदार संस्थेस वितरण करण्यास उपलब्ध असल्यास मंडळाने प्रथम मंडळाकडे उपलब्ध चटई क्षेत्राचे वितरण करावे व तद्नंतरच ना हरकत प्रमाणपत्र द्यावे.

२५- म्हाडाच्या वसाहतीतील लाभार्थींना वितरीत केलेल्या रहिवाशी गाळे / भूखंड व इतर सुविधांसाठी, वितरीत केलेल्या भूखंडाच्या/गाळयांच्या वितरणाच्या वापरात बदल करण्यासाठी,ठराव क्रमांक ५५५३, दि.२७.३.२००० नुसार , ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यांत येत असते.

म्हाडाच्या वसाहतीतील अशा सर्व लाभार्थी संस्था जर मूळ चटईक्षेत्राच्या शिवाय वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राची खरेदी करत असतील व त्याचा वापर त्यांच्या इमारत बांधकामामध्ये किंवा इमारतीची पुनर्रचना करण्यामध्ये होत असेल [भागशः किंवा संपूर्ण इमारतीची पुनर्बांधणीचा प्रकल्प] व अशा प्रकरणात वापर बदल करण्याचा प्रस्ताव सादर झाला असेल, तर अशा प्रकरणांत एकूण बांधकामाच्या १५ % बांधकाम क्षेत्रफळास वापर बदलाची आकारणी करु नये व अशा १५% पर्यत व्यापारी वापराच्या बांधकामासाठी वसाहतीतील अतिरिक्त चटईक्षेत्राचा वापर केला असल्यास उर्वरित चटई क्षेत्राचा रहिवाशी वापराचा दर आकारावा. [सुधारित ठराव क्र. ५५५३,दिनांक २७.३.२००० सोबत **परिशिष्ट क्र.३** नुसार जोडण्यांत येत आहे.]

२६- एखाद्या वसाहतीतील भूखंड वितरणास प्राधिकरणाच्या ठराव क्र. ३०९४ दिनांक १६.११.१९९२ अन्वये अधिमूल्य आकारले जात असते. अशा अधिमूल्याचा दर हा भूखंडाच्या क्षेत्रफळावर न आकारता , अशा भूखंडांवर अनुज्ञेय एकंदर बांधकामाच्या क्षेत्रफळावर [चटईक्षेत्र निर्देशांक] आकारण्यांत येण्याची तरतूद आहे. विविध वसाहतीतील उर्वरित अनुज्ञेय चटईक्षेत्राची विक्री लाभार्थी संस्थांना होण्यास चालना मिळण्याचे दृष्टीने विविध भूखंडांना प्राधिकरणाच्या ३०९४ अन्वये जो वेळोवेळी केलेल्या किंमत विषयक धोरणानुसार, अधिमूल्याचा दर आकारावयाचा आहे, असा दर भूखंडांसाठी उपलब्ध असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार नेहमीच्या चटईक्षेत्र निर्देशांकानुसार उपलब्ध होणा-या बांधकामावर आकारण्यांत यावा.

२७- वसाहतीतील अनुज्ञेय उर्वरित चटईक्षेत्र , अशा भूखंडांना वितरीत करीत असतांना अशा अधिकच्या उर्वरित चटईक्षेत्रासाठी या ठरावानुसार आकारणी करण्यांत यावी. मंडळाने यापूर्वी उर्वरित चटईक्षेत्राची विक्री , ठराव क्र. ४०६८ व ५३८५ अन्वये केलेल्या प्रकरणांना कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

या निर्णयाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या ठराव क्र. ३०९४ दिनांक १६.११.१९९२ मधील परिच्छेद क्र. '८' मध्ये नमूद केलेली व परिच्छेद क्र. '८' प्रमाणेच विविध सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये जी तरतूद केलेली आहे, त्यास या ठरावानुसार सुधारणा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सोबत सुधारित प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ३०९४ **परिशिष्ट क्रमांक ४** अन्वये जोडण्यात येत आहे.

२७- इतर अनुषंगिक मुद्दे :-

अ] मंडळांच्या विविध वसाहतींमध्ये विकास नियंत्रक नियमावलीनुसार आरक्षित असलेल्या रस्त्याच्या बदलांत कांही अटी व शर्तींवर अतिरिक्त चटईक्षेत्र मंडळास महानगरपालिका / नगरपालिकांकडून वितरीत केले जाते. सदर चटईक्षेत्र मंडळाने वसाहतीतील विकास आराखडयामध्ये आरक्षित असलेले रस्ते संपूर्णरित्या बांधून म्हणजेच रस्त्याचे डांबरीकरण करुन त्या लगत असणारी गटारे, तसेच लाईटचे खांब लावून ते सर्व महानगरपालिकेकडे हस्तांतरण केल्यानंतरच विकास नियंत्रणानुसार त्या रस्त्याच्या विकासाबाबत मंडळास चटईक्षेत्र वितरण करण्यांत येते. सदर रस्त्याचे बांधकाम जर मंडळाने केले नाही, तर ते रस्ते महानगरपालिकेकडून बांधण्यांत येतात, व त्या रस्त्याच्या बांधकामापोटी महानगरपालिकेकडून यथाप्रमाणात [प्रोरेटा चार्जेस] रक्कम आकारण्यांत येते. सदर प्रोरेटा चार्जेस मंडळाला महानगरपालिकेकडे भरणे क्रमप्राप्त ठरते.

या प्रस्तावानुसार म्हाडाने कांही संस्थांच्या प्रस्तावाबाबत डी.पी.रोडच्या विकासासाठी प्रोरेटा चार्जेसचा भरणा चटईक्षेत्राच्या विक्रीतून प्राप्त निधीतून

महानगरपालिकेस केलेला आहे. सदर मागील सर्व प्रकरणांना या ठरावानुसार प्राधिकरणाने कार्योत्तर मंजुरी दिली. तसेच या पुढील सर्व प्रकरणांमध्ये प्रोरेटा चार्जेसचा भरणा विभागीय मंडळाच्या मुख्य अधिका-यांना जास्तीत जास्त चालू वर्षाच्या उर्वरित चटईक्षेत्राच्या दराच्या ५०% पर्यंत करण्याचे अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत.

ब] प्राधिकरण ठराव क्र. ४०७६ नुसार मंडळांच्या विविध वसाहतींमध्ये अस्तित्वात असलेल्या कार्यालयीन इमारतीची विक्री करण्यांत येते व सदर ठरावानुसार कार्यालयीन इमारतीस अनुलग्न जागेनुसार अतिरिक्त चटईक्षेत्र देण्यांत येते. मंडळाच्या विविध वसाहतींमध्ये अस्तित्वात असलेला ठराव क्र. ४०७६ फक्त अनुज्ञेय चटईक्षेत्रापुरताच मर्यादित आहे. मात्र एखाद्या कार्यालयीन इमारतीच्या विक्रीधारकाने जर सदर इमारतीवर वसाहतीच्या उर्वरित चटईक्षेत्रापैकी अतिरिक्त चटईक्षेत्रफळाची मागणी करुन, अधिकचे गाळे बांधण्यास तयारी दर्शविली तर, सदरचे अतिरिक्त चटईक्षेत्राचे वितरण या ठरावानुसार परिच्छेद क्र.१७ मध्ये दर्शविलेले दर आकारुन चटईक्षेत्राचे वितरण करण्यास परवानगी देण्यांत येत आहे. तसेच या पूर्वी अशा प्रकारच्या वितरण झालेल्या सर्व प्रकरणांनाही या ठरावानुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. सोबत प्राधिकरणाचा सुधारित ठराव क्रमांक ४०७६ **परिशिष्ट क्रमांक ५** नुसार जोडण्यात येत आहे.

क] मंडळाच्या विविध वसाहतींमध्ये अस्तित्वात असलेल्या करमणुकीच्या मैदानाच्या भूखंडाचे वितरण मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेनुसार प्राधिकरण ठराव क्र. ५५८०, द्वारे करण्यांत येते. वसाहतीतील लाभार्थी /लाभधारक संस्था, वसाहतीतील उपलब्ध असलेल्या अशा प्रकारच्या करमणुकीच्या मैदानांची सतत मागणी करीत असतात व त्याचे स्थलांतर देखील मंजुरीसाठी सादर करीत असतात. मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेने अशी प्रकरणे हाताळली जातात. मात्र कांही संस्था अशा आरक्षित असलेल्या करमणुकीच्या मैदानावर प्रथमतः बांधकाम प्रस्तावित करुन तद्नंतर

अस्तित्वात असलेल्या करमणुकीच्या मैदानाचे क्षेत्र दुसरे ठिकाणी स्थलांतर करुन देतात. या ठरावाद्वारे अशा सर्व प्रकारच्या करमणुकीच्या स्थलांतरण प्रकल्पास मान्यता देण्यांत येत आहे व प्रथमतः अशा करमणुकीच्या मैदानावर बांधकाम करण्यास देखील या ठरावाद्वारे मान्यता देण्यांत येत आहे. तसेच यापूर्वी निर्णय घेतल्या गेलेल्या विविध प्रकरणांनाही या ठरावाद्वारे कार्योत्तर मंजुरी प्राप्त करण्यात येत आहे. तसेच वसाहतीतील असे खुल्या करमणूकीच्या मैदानाचे वितरण प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या रहिवाशी दराच्या ३% दराने आकारणी करुन वितरण करावे. (अशा करमणूकीच्या मैदानाची प्रत्यक्ष किंमत गाळे / भूखंडाच्या विक्रीतून वसूल केली असल्यास)यावर वार्षिक २.५% दराने भूईभाडयाची ८% दराने ३० वर्षासाठी भांडवलीकरण करुन त्यानंतर रुपये १/- नाममात्र वार्षिक भूईभाडे आकारुन वितरण करण्यात यावे. सोबत प्राधिकरणाचा सुधारित ठराव क्रमांक ५५८० **परिशिष्ट क्रमांक ६** नुसार जोडण्यात येत आहे.

ड] सदर नव्याने पारित करण्यांत येणारे दर हे दिनांक १५ जानेवारी २००४ पासून लागू होतील.

इ]. प्राधिकरणाने पूर्वी मंजूर केलेले ठराव क्रमांक १८९७ दिनांक ८.३.१९९१ , ठराव क्रमांक ४०६८ दिनांक ८.४.९३ , ठराव क्रमांक ५३८५ दिनांक १४.१२.९८, ठराव क्रमांक ५५५२ दिनांक २७.३.२००० व ठराव क्रमांक ५८१६ दिनांक १२.७.२००२ या ठरावांन्वये रद्द करण्यांत येत आहे. या ठरावान्वये विविध निर्णय घेण्याचे खालीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

अ.क्र	निर्णयाचा प्रस्ताव	अधिकार प्रदानाचा प्रस्ताव
१.	छाननी शुल्क	
अ.	मुंबई मंडळासाठी या ठरावाद्वारे दि.३१.३.२००७ पर्यंत	प्राधिकरण
ब.	मुंबई सोडून इतर विभागीय मंडळासाठी दि.३१.३.२००७ पर्यंत	उपाध्यक्ष व मु.का.अ/ प्राधिकरण
क.	दि.३१.३.२००७ नंतर सर्व विभागीय मंडळासाठी छाननी शुल्क ठरविणे	विभागीय मंडळांचे मुख्य अधिकारी
२.	खाजगी वास्तुशास्त्रज्ञांकडून सुधारित किंवा नवीन भू-अभिन्यास तयार करणे सर्वेक्षण करणे व त्यास स्थानिक संस्थांची मंजुरी मिळविणे इत्यादि व तत्सम कामांसाठी व्यावसायिक शुल्क ठरविणे.	उपाध्यक्ष व मु.का.अ / प्राधिकरण
३.	वसाहतीचे सुधारित भू-अभिन्यास मंजूर करणे.	मुख्य अभियंता / प्राधिकरण, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार / प्राधिकरण
४	ज्या गावामध्ये / शहरामध्ये रेडीरेकनरचे दर उपलब्ध नाही अशा ठिकाणचे उर्वरित चटईक्षेत्र, फूटकळ भूखंड व थोडया फार मोठया आकारमानाचे भूखंडाचे दर ठरविणे.	उपाध्यक्ष व मु.का.अ / प्राधिकरण
५	फुटकळ भूखंड ठरविणे व वितरण करणे	मुख्य अधिकारी विभागीय मंडळ
६	ना फुटकळ ना विकासास योग्य असे भूखंड ठरविणे व वितरण करणे.	उपाध्यक्ष व मु.का.अ / प्राधिकरण.
७	वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचे विविध संस्थांना वाटप व ज्यामध्ये चटईक्षेत्रां -तर्गत समाविष्ट होणारे व न होणारे बांधकाम प्रस्तावित आहे.	
अ.	मूळ गाळयाच्या क्षेत्रफळाच्या ५०%पर्यंत रहिवाशी, व्यापारी व इतर सर्व वापरांसाठी.	मुख्य अधिकारी विभागीय मंडळ

ब.	मूळ गाळयाच्या क्षेत्रफळाच्या ५०% पेक्षा जास्त - रहिवाशी, व्यापारी व इतर सर्व वापरांसाठी .	उपाध्यक्ष व मु.का.अ/ प्राधिकरण
८	वसाहतीतील सामायिक सुविधांची दुरुस्ती करणे, श्रेणीवाढ करणे, नवीन सुविधा उपलब्ध करुन देणे यासाठी,चटईक्षेत्राची विक्री , टी.डी.आर, ना हरकत प्रमाणपत्र देणे यांतून प्राप्त होणारा निधी मंडळामार्फत योजना राबवून खर्च करणे.	उपाध्यक्ष व मु.का.अ/ प्राधिकरण
९	विकास आराखडयातील रस्त्यासाठी यथाप्रमाणात [प्रोरेटा चार्जेस] आकारणी स्थानिक संस्थाना भरणे	मुख्य अधिकारी विभागीय मंडळ
१०	वसाहतींच्या भू-अभिन्यासातील करमणुकीचे मैदान १५% व १०% [Layout R.G.,P.G.or Garden] वितरण/ स्थलांतर करणे.	उपाध्यक्ष व मु.का.अ/ प्राधिकरण
११	उर्वरित चटई क्षेत्र , फूटकळ भूखंड व ना फुटकळ , ना विकासास योग्य भूखंड या सर्वांच्या वितरणाबाबात आवश्यकतेनुसार वेळोवेळी वितरणाच्या इतर अटी व शर्ती ठरविणे	उपाध्यक्ष व मु.का.अ/ प्राधिकरण

टिप :- सदरहू ठरावात ज्या ठिकाणी सहकारी संस्थेचा उल्लेख आहे अशा शब्दाचा अर्थ अर्जदार लाभार्थी समजण्यात यावा.

या ठरावात नमूद करण्यांत आलेली परिशिष्टे [१ ते ६]कार्यवृत्ता सोबत स्वतंत्र जोडण्यांत आली आहेत.

सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

बाब क्रमांक : १९९/२२.

विषय : गृहनिर्माण भवनातील संगणकीकरण करण्याकरीता प्रस्तावित बैठक व्यवस्थेप्रमाणे सर्व कार्यालयांचे, पॅसेजेस व लिफट लॉबीचे नुतनीकरण..

ठराव क्रमांकः ५९९९ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

गृहनिर्माण भवनातील कामाचे संगणकीकरण करण्याकरीता प्रस्तावित बैठक व्यवस्थेप्रमाणे व कार्यालयाच्या पॅसेजेस, लिफट नुतनीकरण करण्यासाठी नामांकित कंपन्यांकडून देकार घेऊन नियमानुसार काम करण्यास व प्रस्तावित खर्च रु.१४.९३ लाख रक्कमेस मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : १९९/२४.

विषय : वांद्रे रेक्लेमेशन येथील मैदान क्र. १ रिजनल सरस या कार्यक्रमाकरिता सवलतीच्या दराने देणेबाबत..

ठराव क्रमांकः ६००० दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

वांद्रे रेक्लमेशन येथील मैदान क्रमांक १ रिजिनल सरस २००३ या कार्यक्रमाकरीता दिनांक १८ ते ३० डिसेंबर, २००३ या कालावधीसाठी शासनाने दि.१०.१०.२००३ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) भाडे आकारण्यास उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : १९९/२५.

विषय : नाशिक गृहनिर्माण मंडळाच्या निविदांना मान्यता देण्याबाबत..

ठराव क्रमांकः ६००१ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

(१.) स.क्र. ४६५/२ चाळीसगांव रोड, धुळे येथील ७४ एम.आय.जी. गाळयांच्या बांधकामासाठी मे. वर्धा कंन्स्ट्रक्शन कंपनी, धुळे यांच्यासह ४४नाशिक मंडळाने वाटाघाटी करुन निविदा किंमतीपेक्षा २ टक्के जादा याप्रमाणे मंडळाच्या कमी करुन मान्य केलेल्या निविदेच्या दराला संमती देत आहे.

(२.) सर्व्हे क्र. २१७ (भाग), म्हसरुळ, नाशिक येथील ४० उच्च उत्पन्न गटातील गाळयांच्या बांधकामासाठी मे. हिरे ॲन्ड जगताप असोसिएशन यांच्यासह नाशिक मंडळाने वाटाघाटी करुन निविदा किंमतीपेक्षा ५.७० टक्के जादा याप्रमाणे कमी करुन मान्य केलेल्या निविदेच्या दराला संमती देत आहे.

(३.) सर्व्हे क्र. ५१७,५२०,५२१ व ५२३ सातपूर,नाशिक येथील कार्यालयीन इमारत/गोडाऊन भूखंडावर उच्च उत्पन्न गटांतर्गत १७ गाळयांच्या कामासाठी मे. अनिल कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांचे अधिकारात वाटाघाटी करुन निविदा किंमतीपेक्षा २.३० टक्केनी जादा याप्रमाणे निश्चित केलेल्या दराला संमती देण्यात येत आहे.

सदर ठरावाची कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९९/२६.

विषय : श्री. गुरु गोविंदसिंग विधायक संस्थेस विक्रोळी (पूर्व) येथील टागोर नगर वसाहतीमधील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील गुरुद्वाराच्या अनधिकृत बांधकामासह मोकळी जागा वितरीत करणेबाबत प्राधिकरणाच्या दि. २२/४/२००० रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ५५६२ मध्ये दुरुस्ती करणेबाबत..

ठराव क्रमांकः ६००२ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

श्री. गुरु गोविंद सिंग विधायक संस्था यांनी मुंबई मंडळाच्या हद्दीत अनधिकृतपणे बांधलेल्या गुरुद्वाराच्या बांधकामाखाली ४७१.५० चौरस मिटर क्षेत्र तत्कालिन बाजारभाव आकारुन आणि गुरुद्वारा समोरील असलेल्या मोकळया जागेचे १८७५.८१ चौरस मिटर क्षेत्र जे शाळेकरीता आरक्षित आणि वापरात असल्या कारणाने ते प्राधिकरणाच्या सन १९९२ च्या किंमत विषयक धोरणानुसार किंमत आकारुन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ज्या संस्थेमार्फत सदरहू जागेत शैक्षणिक कार्य करण्यात येत आहे त्या संस्थेमार्फत ते कार्य पुढे चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक :१९९/२७.

विषय : मौजे-मागाठाणे, सर्व्हे क्र. ५०/९, ५६/२ व ३
५५/१ आणि ५३ या जमिनीच्या विकासाबाबत..

ठराव क्रमांकः ६००३ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

मौजे- मागाठाणे सव्हे क्रमांक ५०/९, ५६/२ व ३, ५५/१ आणि ५३ या जमिनीच्या विकासाबाबत प्राधिकरणाच्या १८५ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या समितिच्या निर्णयाप्रमाणे ६० टक्के जमीन ही मुंबई मंडळाकडे आणि ४० टक्के जमीन दावेदाराकडे ठेवण्यास तडजोड मसुदा मंजूर करण्यात आल्यानुसार व त्या अनुषंगाने मा. न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिका क्रमांक ६३७५/९५ आणि ६३७६ /९६ प्रकरणी अटी शर्तीचे संमतीपत्र दाखल करण्यास व त्या अनुषंगाने दावेदाराने म्हाडाकडे राहाणा-या ६० टक्के जमीन बोजाविरहीत करुन म्हाडाकडे घेण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९९/२८.

विषय : सर्वोदय नगर, मेघवाडी, जोगेश्वरी (पूर्व)
मुंबई येथे म्हाडाच्या भूखंडावरील झोपडीधारकांसाठी
वाल्मीकी आंबेडकर आवास योजना एस.आर.ए.
अंतर्गत राबविण्याबाबत..

ठराव क्रमांकः ६००४ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

म्हाडाच्या जोगेश्वरी पूर्व येथील भूखंडावरील सर्वोदय नगर, मेघवाडी, जोगेश्वरी पूर्व येथील झोपडपट्टीवासियांसाठी वाल्मिकी आंबेडकर आवास योजना व एस.आर.ए. अंतर्गत झोपडपट्टी सुधार मंडळाने वॅम्बे व म्हाडा निधीमधून मे. स्ट्रेस क्रिट इंडिया लिमिटेड या वॅम्बे योजना बांधकाम करण्यास पात्र ठेकेदाराकडून टर्न की बेसीसवर रुपये ४७३ प्रति चौरस फूट इमारतीच्या बांधकामासाठीतसेच बाहय सुविधांची कामे (इन्फ्रास्ट्रक्चर) जसे कि अंतर्गत रस्ते, पाण्याच्या टाक्या मलवाहिन्या, पाण्यासाठी पाईप लाईन, भूखंडासाठी कंपाऊंड भिंत, बगिच्या सुशोभिकरण इत्यादी कामे चालू दरसूची वर्षे २००३-२००४ वर करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदरहू ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९९/२९.

विषय : पी.एम.जी.पी. वसाहत, मजास, अंधेरी-पूर्व या मुंबई मंडळाच्या वसाहतीतील इ.क्र.१ जवळ कु. गीता तलावडेकर (राष्ट्रीय कबड्डी पट्टू) यांना आरे सरीता केंद्र चालविण्यासाठी जागा मिळणेबाबत..

ठराव क्रमांकः ६००५ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

पी.एम.जी.पी.वसाहत, मजास, अंधेरी (पूर्व) या मुंबई मंडळाच्या वसाहतीतील इमारत क्रमांक १ जवळील १०x ४ आकारमानाचा भूखंड कुमारी गीता तलावडेकर, राष्ट्रीय कबड्डीपट्टू यांना आरे सरीता केंद्र चालविण्यासाठी प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : १९९/३०.

विषय : वांद्रे रेक्लमेशन येथे वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेस वितरीत केलेल्या माध्यमिक शाळेसाठीचा भूखंड इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या नांवे वितरीत करणेबाबत..

ठराव क्रमांकः ६००६ दिनांकः- ०९/०१/०४

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई मंडळाने बैठक क्र.२२२ दि.२०.१२.२००३ रोजी या संदर्भात सुधारीत केलेला ठराव क्र.२४१८ दि.२०.१२.२००३रद्द करण्यांत येत असून, खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१. वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेला शाळेच्या भूखंडाचे केलेले वितरण रद्द करुन, सदर भूखंड इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या नांवे दिनांक १९/१/१९८५ या ताबा दिनांकापासून नियमित करणेस मान्यता देण्यात येत आहे..

२. शाळेच्या भूखंडासाठी, प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार अधिमूल्य व त्यावर भुईभाडे आकारावे. प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणानुसार जमिनीची किंमत + अद्यावत केलेला विकास खर्च, या वरील आधारित दरावर अधिमूल्य व या अधिमूल्यावर १ टक्का येणा-या वार्षिक भुईभाडयाचे भांडवलीकरण करुन येणारी रक्कम आकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे..

३. आर्किटेक्चरल कॉलेज व मॅनेजमेंट कॉलेज या उपयोगासाठी वापरण्यात येणा-या क्षेत्रफळासाठी, भूखंडाच्या आजच्या बाजारमूल्याप्रमाणे येणा-या रकमेच्या ५० टक्के अधिमूल्य व या अधिमूल्याच्या २.५ टक्के दराने येणा-या वार्षिक भूईभाडयाचे भांडवलीकरण करुन येणारी रक्कम, आकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

४. संस्थेने ज्या ज्या खाजगी संस्थांना जागा भाडयाने दिलेली आहे त्या संस्थांकडून शाळा चालकांना मिळणा-या भाडयापोटीच्या रकमेपैकी विहित रक्कम पूर्वलक्षी प्रभावाने संस्थेकडून वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय अनधिकृत हस्तांतरण झालेले असल्यामुळे प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणानुसार या शााळेच्या भूखंडासाठी आजच्या दराने अधिमूल्याच्या५० टक्के रक्कम दंड म्हणून आकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १२/०२/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०० व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : २००/३

विषय : ग्रामीण भागात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी प्रस्तावित गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या अनामत रकमेबाबत.

ठराव क्रमांक : ६००७ **दिनांक : १२.०२.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

ग्रामीण भागात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी गृहनिर्माण योजना राबवितांना औरंगाबाद मंडळासाठी ५००० घरकुल नागपूर मंडळासाठी ३००० व अमरावती मंडळासाठी २००० घरकुलाचा कार्यक्रम घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. लाभार्थींकडून अर्जासोबत रुपये १५००/- तसेच बांधकाम सुरु झाल्यानंतर रु. १५००/- चा अंतर्भाव करुन घरांच्या किंमतीच्या १० टक्के व प्रत्यक्ष घरांचा ताबा देतांना घरांच्या किंमतीच्या १५ टक्के अशी एकूण घराच्याकिंमतीच्या २५ टक्के रक्कम वसूल करण्यात यावी व उर्वरित रक्कम १३ वर्षाच्या कालावधीत येाजनेच्या दराने व्याज आकारुन वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अर्जासोबत रुपये १५००/- भरल्यानंतर ते घराचा ताबा घेईपर्यंतची भरावयाची रक्कम जर अर्जदाराने प्रतीमाह रु. ५००/- या प्रमाणे हप्त्याने भरण्याची इच्छा प्रदर्शित केली तर त्यास त्याप्रमाणे परवानगी देण्यात यावी. मात्र अशा प्रकारे हप्त्याने रक्कम भरतांना बांधकाम सुरु होतेवेळी किंमतीच्या १० टक्के व ताबा देते वेळी किंमतीच्या २५ टक्के रक्कम जमा झालेली आहे याची मुख्य अधिका-यांनी खात्री करावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २००/४

विषय : कन्नमवार नगर क्र.२ विक्रोळी येथील अल्प उत्पन्न गाळयाची जाहिरात.

ठराव क्रमांक : ६००८ **दिनांक : १२.०२.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

कन्नमवार नगर क्र.२ विक्रोळी येथील ४८५ चौ.फुट महाजोत्याच्या अल्प उत्पन्न गटात मोडत असलेल्या गाळयांच्या विक्रीसाठी जाहिरात देताना रु. १२५०/- प्रति चौ.फुट दर आकारण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच केंद्रशासनाचे कर्मचारी, संरक्षण दलात काम करणारे कर्मचारी, केंद्र शासनाच्या गुन्हा अन्वेषण विभागात तसेच केंद्र शासनाच्या इतर कार्यालयात काम करणा-य कर्मचा-यांची बदली संपूर्ण भारतभर होत असल्यामुळे त्यांना प्राधिकरणाची घरे मिळण्यासाठी जी १५ वर्षांची महाराष्ट्रातील वास्तव्याची अट घालण्यात येते ती शिथिल करण्यासमान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २००/५

विषय : अतिक्रमण निर्मुलनाच्या अद्ययावत प्रगती अहवाल व अतिक्रमण निर्मुलन कक्ष, मुंबई मंडळ साठी अनधिकृत बांधकाम निष्कासनाने कार्यवाहीसाठी लागणारे साहित्य अवजारे खरेदी करणेबाबत..

ठराव क्रमांक : ६००९ **दिनांक : १२.०२.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. कार्यकारी अभियंता / अतिक्रमण निर्मुलन कक्ष / मुंबई मंडळ यांच्या कार्यालयाने अतिक्रमण निर्मुलना संबंधी बैठकीच्या दिनांकापर्यंत जी कार्यवाही केलेली आहे त्याची नोंद प्राधिकरणाने घेतली.

२. कार्यकारी अभियंता / अतिक्रमण निर्मुलन कक्ष / मुंबई मंडळ यांनी निष्कासन कार्यवाही करण्याकरिता विकत घ्यावयाच्या अवजारांच्या खर्चास तसेच कक्षाकडे असलेल्या अवजारांच्या दुरुस्ती खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

३. कार्यकारी अभियंता / अतिक्रमण निर्मुलन कक्ष / मुंबई मंडळ यांनी सादर केलेल्यासन २००३-२००४ च्या सुधारित अंदाज पत्रकास व सन २००४-२००५ च्या प्रस्तावित अंदाजपत्रकास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

४. कार्यकारी अभियंता / अतिक्रमण निर्मूलन कक्ष / मुंबई मंडळ मध्ये काम कार्यरत असलेल्या सर्व मजदूर / मदतनीस यांना अतिक्रमण निष्कासनाच्या दिवशीचा सध्या देण्यात येत असलेला भोजन भत्ता रुपये २०/- प्रतिदिन ऐवजी रुपये ५०/- प्रति दिन करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

५. कार्यकारी अभियंता / अतिक्रमण निर्मुलन कक्ष / मुंबई मंडळ यांचेकडे असलेल्या दोन वाहन चालकांनाही अतिक्रमण निष्कासनाच्या दिवशी रुपये ५०/- प्रतिदिन भोजन भत्ता देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे व

६.अतिक्रमण निष्कासनाची कामे (उदा. पोलीसंची मदत मिळविणे, निष्कासनानंतरचे नष्टशेष व जप्त केलेले सामान भाडयाच्या ट्रक / टेम्पो मध्ये भरुन ते मंडळाच्या अंधेरी येथील गोदामात उतरणे, आवश्यकता असल्यास जे.सी.बी. अथवा गॅस कटर भाडयाने घेणे इत्यादि इत्यादि) मध्यवर्ती विभाग म्हणून कार्यकारी अभियंता / अतिक्रमण निर्मुलन कक्ष / मुंबई मंडळ यांनीच करावयाची असून (तथापि आवश्यकता भासल्यास निष्कासनासंबंधीची कायदेशीर नोटीस देण्याची जबाबदारी संबंधीत क्षेत्रीय अधिका-याची राहील) अतिक्रमण निष्कासनाच्या प्रत्यक्ष कृतीच्या वेळी संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांच्या प्रतिनिधींनी हजर रहाणे बंधनकारक असेल. तसेच अतिक्रमण निष्कासनाच्या वेळी ज्या बांधकामांना न्यायालयीन स्थगिती आहे अशा बांधकामांबद्दल अतिक्रमण पथकास वेळी माहिती देण्याची (निष्कासन कार्यवाही होण्यापूर्वी) जबाबदारी

संबंधित क्षेत्रिय अधिका-याची असेल. अशा प्रकारणांबाबत आवश्यक पत्र व्यवहार तसेच न्यायालयातील दाव्यांना हजर राहून प्रकरण निकाली काढण्याची जबाबदारी देखील संबंधित क्षेत्रीय अधिका-याची असेल.

म्हाडाच्या जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा. यांचे कार्यालयाकडून पोलीस बल मिळविण्यासाठी शासनास पाठवावयाची सविस्तर प्रस्ताव तयार करावा तसेच यासाठी होणारा खर्च प्राधिकरणाच्या निधीमधून भागविण्यांत यावा

बाब क्रमांक : २००/६

विषय : राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधलेल्या सर्व्हे क्र. १३८ येथील ७७ सदनिकांचे निविदेद्वारे वितरण करण्याबाबत..

ठराव क्रमांक : ६०१० **दिनांक : १२.०२.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या सर्व्हे क्रमांक १३८ येथील ७७ सदनिकांसाठी प्राधिकरण ठराव क्रमांक ५९८४ दिनांक १०.११.२००३ अन्वये दिलेली मान्यता या ठरावान्वये रद्द करण्यात येत असून या गाळयांच्या न्युनतम रक्कम (अपसेट प्राईस) रुपये ७०,०००/- प्रति गाळा निश्चित करुन या रकमेवर निविदा मागविण्यात येऊन ज्या निविदादाराचा दर अधिकतम असेल अशा निविदादारास सदर ७७ सदनिकांची विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २००/७

विषय : श्री.एन.डी.चांदळेकर, वरिष्ठ लिपिक यांना पत्नीच्या कर्क रोगावरील उपचारार्थ रुपये १,००,०००/- अग्रिम मंजूर करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०११ **दिनांक : १२.०२.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

श्री.एन.डी.चांदळेकर यांच्या पत्नीच्या कर्करोगावरील उपचारासाठी रुपये १,००,०००/- इतका अग्रीम विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावा.

श्री.एन.डी.चांदळेकर, वरिष्ठ लिपिक यांना त्यांच्या पत्नीच्या कर्क रोगावरील उपचारासाठी जसलोक रुग्णालय, मुंबई या ठिकाणी होणा-या खर्चाची प्रतिपूर्ती सदर उपचार टाटा रुग्णालय, शासकीय रुग्णालय किंवा महानगर पालिकेच्या रुग्णालयात उपचार करुन घेतले असता जो खर्च आला असता त्या खर्चाशी सिमित करुन खास बाब म्हणून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २००/८

विषय : बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रात मोमीनपूरा, लव्हलेन, आग्रीपाडा व सिध्दार्थ नगर, ताडवाडी या ठिकाणी बी.आय.टी. चाळीच्या दुरुस्ती व मुलभूत सोयी व सुविधा पुरविण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे विशेष अनुदानातून करावयाच्या कामांसाठी कंत्राटदारांची नियुक्ती करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०१२ **दिनांक : १२.०२.२००४**

बहुमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई महानगर पालिकेच्या जुन्या बी.आय.टी. चाळीची दुरुस्ती म्हाडाने करावी. तथापि, ना-हरकत प्रमाणपत्र देतांना महानगर पालिकने टाकलेल्या जाचक अटी उदा. ७ वर्षापर्यंतचा डिफेक्ट लायबिलीटी पिरीयड व हया कालावधीत दुरुस्तीसाठी म्हाडाने खर्च करणे इ. महानगर पालिकेने काढून टाकण्यासाठी त्यांना कळवावे. मा.मंत्री महोदय, गृहनिर्माण डॉ.सय्यद अहमत व मा.श्री.मधू चव्हाण, अध्यक्ष / प्राधिकरण यांनी त्यांचे मतदार संघातील कामासाठी सुचविलेल्य कंत्राटदारांच्या नियुक्तीस विशेष बाब म्हणून खालील प्रमाणे मंजूरी देण्यांत येते :---

अ.क्र.	डॉ.सय्यद अहमदए मा.गृहनिर्माण मंत्री यांनी सुचविलेली कामे व कंत्राटदारांची नांवे.	निव्वळ कामाची रक्कम रुपये
१.	बी.आय.टी.चाळ, ताडवाडी (१ ते ११, १५, १६, १३ इमारती) कंत्राटदाराचे नांव - कोहिनूर कन्स्ट्रक्शन.	रुपये ४४,८५,३३६/-
२.	बी.आय.टी.चाळ, सिध्दार्थ नगर, इमारत क्रमांक अे ते एफ, ६ इमारती कंत्राटदाराचे नांव : कोहिनूर कन्स्ट्रक्शन	रुपये २०,७०,१५५/-
३.	बी.आय.टी.चाळ, मुंबई सेंट्रल (चाळ क्र. २, ४, ६, ८, १०, ११, १२) ७ नंबर कंत्राटदाराचे नांव : कोहिनूर कन्स्ट्रक्शन	रुपये २३,२२,२९०/-
ब १.	आमदार श्री.मधु चव्हाण, मा.अध्यक्ष/म्हाडा बी.आय.टी.चाळ, सेठ मोतीशा लेन, १ इमारत. कंत्राटदाराचे नांव : मे.ताज मोहम्मद अमीर	रुपये ३०,२८,२३८/-
२.	बी.आय.टी.चाह क्रमांक ३ सेठ मोतीशा लेन १ - १ इमारत कंत्राटदाराचे नांव : मे.ताज मोहम्मद अमीर	रुपये ११, ३९,१३९/-
३.	बी.आय.टी.चाळ क्र.१, मोमीनपुरा टँक, पाखाडी रोड, १ इमारत कंत्राटदाराचे नांव : एम.एच.कन्स्ट्रक्शन	रुपये २२,७२,६१६/-
४.	बी.आय.टी.चाळ क्र.२, मोमीनपुरा टँक, पाखाडी रोड, १ इमारत कंत्राटदाराचे नांव : एम.एच.कन्स्ट्रक्शन	रुपये १७,००,१५६/-

५.	बी.आय.टी.चाळ क्रमांक ३ व ४, मोमीनपुरा टँक पाखाडी रोड, २ इमारती विभागून. अ. इमारत क्रमांक ३ मे.ताज मोहम्मद अमीर. ब. इमारत क्रमांक ४ एस.पी.कन्स्ट्रक्शन	 रुपये १४,०५,६४८/- रुपये १४,१९,३२४/-
६.	बी.आय.टी.चाळ क्र. २०, अग्रीपाडा - १ इमारत कंत्राटदाराचे नांव : एस.पी.कन्स्ट्रक्शन.	रुपये २३,४८,०२५/-
७.	बी.आय.टी.चाळ क्र.२१, अग्रीपाडा इमारत कंत्राटदाराचे नांव : एस.पी.कन्स्ट्रक्शन.	रुपये २३,४०,९८८/-

वरील कामात जलनिरोधकांच्या कामांचा समावेश असून कंत्राटदारांनी ती कामे विशेषकृत जलनिरोधक कंत्राटदार हयांचेकडूनच करुन घेणे अपेक्षित आहे. वरील क्रमांक ५ मध्ये इमारत क्रमांक ३ व ४ ची प्रशासकीय मंजूरी एकत्र असल्यामुळे इमारत क्रमांक ३ व ४ चे काम वेगवेगळे विभागून देण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता कंत्राटदारास स्विकृती पत्र (काम करण्याचे आदेश) देण्यास परवानगी देण्यात येत आहे. ही बाब या पुढील प्रकरणात पुर्वोदाहरण म्हणून दाखविण्यात येणार नाही या अटीवर ही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २००/१०

विषय : वांद्रे रेक्लमेशन येथील मैदान क्र.२ टुरीझम को-ऑपरेटिव्ह या संस्थेस सवलतीच्या दराने देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०१३ **दिनांक : १२.०२.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

टुरीझम सहकारी गृहनिर्माण संस्थेस शासनाने दिनांक ७.०१.२००४ च्या पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार दिनांक ९.०१.२००३ ते २९.०१.२००४ या कालावधीसाठी रु. १,००,०००/- भाडे आकारण्याच्या प्रशासनाच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २६/०३/०४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या अर्थसंकल्पिय विशेष बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : ३

विषय : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी आकृतीबंध सन् २००४-२००५

ठराव क्रमांक : ६०१४ **दिनांक : २६.०३.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरण व प्रादेशिक मंडळांच्या कार्यालयासाठी सन २००४-२००५ या वर्षाकरिता आवश्यक असलेला कर्मचारी वृंद व मागील वर्षाच्या आकृतीबांधामध्ये झालेल्या बदलांची नोंद घेऊन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : ४

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००३-२००४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००४-२००५ चे अर्थसंकल्पीय अंदाज.

ठराव क्रमांक : ६०१५ **दिनांक : २६.०३.२००४**

प्राधिकरणाच्या सन २००३-२००४ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर व सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर चर्चा होऊन लोकसभेच्या निवडणुकीनिमित्त आचारसंहिता लागू झाल्यामुळे सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाच्या नवीन योजना वगळून प्रगतिपथावरील योजनांसाठी व आस्थापना खर्चासाठी पहिल्या चार महिन्यातील प्रस्तावित जमा व खर्चाच्या अर्थसकल्पास प्राधिकरणाची मंजूरी देण्यांत येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १९/०५/०४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०१ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

<u>बाब क्रमांक : २०१/३</u>

विषय : मौजे अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची २.७५ हेक्टर विकास क्षेत्रातील जमीन खरेदी करण्यासाठी झालेल्या अधिकच्या रुपये १,५६,७५०/- या रकमेस प्राधिकरणची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०१६ दिनांक : १९.०५.२००४

एकमताने निर्णय घेतला की, मौजे अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या २.७५ हेक्टर जमिनीसाठी त्या मंडळाने मागणी केल्याप्रमाणे अधिकची रक्कम रुपये १,५६,७५०/- औरंगाबाद मंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे जमा केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २०१/४</u>.

विषय : श्री.ना.धो.चांदळेकर, वरिष्ठ लिपिक यांना त्यांच्या पत्नीच्या पोटाच्या कर्करोग आजारात जसलोक रुग्णालयात झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करतांना जास्त अदा केलेली रक्कम रुपये ३०,६०४/- वसूलीबाबत निवासी लेखा परिक्षा अधिकारी / प्रा. यांचे आक्षेप.

ठराव क्रमांक : ६०१७ **दिनांक : १९.०५.२००४**

एकमताने निर्णय घेतला की, श्री.चांदळेकर, वरिष्ठ लिपिक यांना त्यांच्या पत्नीच्या पोटाच्या कर्करोग आजारावर जसलोक रुग्णालयात झालेला खर्च प्रतिपूर्ती करतांना जास्त अदा केलेली रक्कम रुपये ३०,६०४/- विशेष बाब म्हणून माफ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २०१/५</u>

विषय : भाडेतत्वावरील वितरीत केलेले व नंतर विक्री योजनेत समाविष्ट झालेल्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चावरील व्याज माफ करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०१८ **दिनांक : १९.०५.२००४**

एकमताने निर्णय घेतला की, भाडेतत्वावरील वितरीत केलेल्या व नंतर विक्री योजनेत समाविष्ट झालेल्या इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती खर्चावरील मुळ रक्कम व त्यावरील व्याज ५० % माफी करुन भरण्यासाठी डिसेंबर २००४ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २०१/९

विषय : सांगली-मिरज कुपवाड महानगर पालिका क्षेत्रातील झोपडपट्टीतील सर्वेक्षण करण्याबाबतचे काम शेल्टर या (एजजीओ) संस्थेमार्फत करुन घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०१९ दिनांक : १९.०५.२००४

बहूमताने निर्णय घेतला की, ठराव क्रमांक ५९९०, दिनांक ९.०१.२००४ अन्वये ठरविण्यात आलेल्या दरानुसार नव्याने जाहिरात देण्यात आलेल्या गाळयांची विक्री करण्यात यावी. महालक्ष्मी व लोअरपरेल येथील आरक्षित गटातील व इतर वाटपाअभावी रिक्त असलेले गाळे प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर पूर्वीच्या जाहिरातीत दिलेल्या दरानुसार विक्री करण्यास मान्यता देण्यात येते.

याप्रमाणे ठराव क्रमांक ५९९०, दिनांक ९.०१.२००४ मध्ये सुधारणा करण्यांत यावी.

विषय : पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत मुलुंड येथील इमारतीच्या / पाण्याच्या टाक्यांची दुरुस्ती करणेबाबत.

ठराव क्रमांकः ६०२० दिनांकः-१९/०५/०४

एकमताने निर्णय घेतला कीं, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत मुलुंड येथे बांधण्यात आलेल्या इमारतीची तांतडीने पाहणी करुन ठराव क्र. ५९९१, दिनांक ९.०१.२००४ अन्वये मान्यता दिल्यानुसार या इमारतीच्या/पाण्याच्या टाक्यांची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजीते तयार करण्यासाठी व त्या इमारतीच्या/पाण्याच्या टाक्यांच्या दुरुस्तीसाठीच्या अंदाजिताना मंजूरी देण्याचे अधिकार अध्यक्ष/प्रा. व उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यांत येते.

विषय : नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील समृध्दी संकुलातील गाळयांची निविदेद्वारे विक्री करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०२१ **दिनांकः-१९/०४/०५**

एकमताने निर्णय घेतला कीं, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या समृध्दी संकुल या वसाहतीतील उर्वरित गाळयांची विक्री निविदेद्वारे करण्यात यावी. याकरिता बोलीची किंमत (अपसेट प्राईस) ही गाळयाची मूळ विक्री किंमत असावी. निविदेद्वारे विक्रीचे अधिकार मुख्य अधिकारी, नागपूर मंडळ यांना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. १३/०७/२००४ रोजी दुपारी ४.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०२ व्या संस्थगित बैठकीचे कार्यवृत्त.

<u>बाब क्रमांकः२०२/६</u>

विषयः- श्री.डी.ए.माने, मदतनीस यांना घशाच्या कर्करोगासाठी पी.डी.हिन्दुजा रुग्णालयात होणा-या खर्चापोटी उपाध्यक्ष / प्राधिकरण, अध्यक्ष / प्राधिकरण यांनी रु. १,००,०००/- अग्रीम देण्यास दिलेल्या मान्यतेस प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०२२ **दिनांक : १३.०७.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं, श्री.डी.ए.माने, मदतनीस यांना त्यांच्या घशाच्या कर्करोग या आजाराकरिता पी.डी.हिन्दुजा रुग्णालयात होणा-या खर्चापोटी रु. १,००,०००/- अग्रीमास ' विशेष बाब ' म्हणून कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. खर्चाची प्रतिपूर्ती टाटा रुग्णालय, शासकीय रुग्णालय अथवा महापालिका रुग्णालय यामध्ये या उपचारासाठी जेवढा खर्च आला असता त्या मर्यादेत सिमीत राहून करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०२/१३

विषयः- सभापती / पुणे गृहनिर्माण मंडळ यांनी दिनांक ५.११.२००३ ते २४.११.२००३ या कालावधीत वापरलेल्या खाजगी वाहनाचे देयक अदा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०२३ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, मा.सभापती / पुणे मंडळ यांचे वर्दीवर देण्यात आलेले कार्यालयीन वाहन नादुरुस्त झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.११.२००३ ते २४.११.२००३ या कालावधीकरिता भाडयाने घेतलेल्या वाहनाचे भाडे प्रतिदिन रु. ७००/- प्रमाणे २० दिवसांसाठी रु. १४०००/- अदा करण्यास अनुमती देण्यात येत आहे. कार्यवाही झाल्यानंतर माहितीसाठी ही बाब शासनास पाठविण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०२/१४

विषयः- श्री.एस.एस.लोहकरे, मुख्य अधिकारी, नागपूर मंडळ यांच्या मुलास प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०२४ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, श्री.एस.एस.लोहकरे, मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचा मुलगा कुमार अमित एस.लोहकरे याने आपल्या अपंगत्वावर मात करुन (मंदबुध्दीवर) इयत्ता १२ वीच्या परिक्षेमध्ये ५९ टक्के गुण प्राप्त केले आहेत. त्याच्या या अपवादात्मक यशामुळे तो गौरवास पात्र असून कुमार अमित एस. लोहकरे यास पुढील शिक्षणासाठी तीन वर्षापर्यंत किंवा जोपर्यंत तो शिक्षण घेईल तोपर्यंत यापैकी जे कमी असेल तेवढया कालावधीकरिता दरमहा रु. ५००/- शिष्यवृत्ती म्हणून देण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०२/१६

विषय :- ब्रिचकॅन्डी हॉस्पीटलमध्ये काम करणा-या नर्सेससाठी हॉस्पिीटल जवळच्या परिसरात सदनिका उपलब्ध करुन देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०२५ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळाने प्रस्तावित केल्यानुसार ब्रिचकॅन्डी हॉस्पीटल ट्रस्टने त्यांच्या हॉस्पीटलमध्ये काम करणा-या १५० नर्सेसच्या निवासासाठी प्रतिक्षानगर सायन येथे दोन नर्सेससाठी एक याप्रमाणे २५० चौ.फुट क्षेत्रफळाच्या (शौचालय व स्नानगृहासह) एकूण ७५ सदनिका, १५० नर्सेससाठी कॉमन डायनिंग रुम, किचन रुम, स्वागत कक्ष व कार्यालयासाठी जागा असे अंदाजे ३०,००० चौ.फुटाचे बांधकाम करुन देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे. सदर बाब शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०२/१७

विषय :- प्रतिक्षानगर सायन या ठिकाणी टाटा मेमोरियल सेंटर या संस्थेला अल्प उत्पन्न गटातील सदनिका उपलब्ध करुन देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०२६ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, टाटा मेमोरीयल सेंटर या संस्थेतर्फे चालविल्या जाणा-या हॉस्पीटल व कॅन्सर संशोधन केंद्रामध्ये काम करणा-या नर्सेस व कर्मचा-यांसाठी १८० चौ.फुट चटई क्षेत्रफळ असलेल्या ८० स्वयंपूर्ण सदनिका (प्रत्येकी ४० सदनिका असलेल्या दोन इमारती) बांधून देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे. सदर बाब शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०२/१८</u>

विषय :- पत्रकार व विशिष्ट गटासाठी प्रतिक्षानगर सायन व दिंडोशी मालाड या ठिकाणी विशेष गृहनिर्माण योजना राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०२७ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, प्रेस क्लब मुंबईच्या २०० सदस्यांसाठी प्रतिक्षानगर सायन या ठिकाणी १ बीएचके व २ बिएचके च्या इमारती व १०० सदस्यांसाठी दिंडोशी मालाड या ठिकाणी रो-हाऊस व २ बीएचकेच्या इमारतीची स्वतंत्र गृहनिर्माण योजना राबविल्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. सदर बाब शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यात यावी.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायिकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

चर्चेच्या अनुषंगाने सदर विषयानंतर मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांनी सायन प्रतिक्षानगर येथील १. नियोजित स्वयंभू कोकण गृ.मागासवर्गीय सह.संस्थेच्या सभासदांना उच्च उत्पन्न गटातील ८४ सदनिका तयार असलेल्या इमारतीचे वितरण व २. अपर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयातील कर्मचा-यांना उच्च उत्पन्न गटातील एकूण ८९ सदनिकांचे वितरण करण्याबाबतचे दोन विषय वरील विषयानुसार असल्याने हे दोन विषय देखिल शासनास पाठविण्यांत यावे, असे प्रस्तावित केले असता त्यास सन्मा.सदस्यांनी सहमती दर्शविली व प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६०२८ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं सायन प्रतिक्षानगर येथील १. नियोजित स्वयंभू कोकण गृ.मागासवर्गीय सह.संस्थेच्या सभासदांसाठी उच्च उत्पन्न गटातील ८४ सदनिका व २. अपर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयातील कर्मचा-यांना उच्च उत्पन्न गटातील एकूण ८९ सदनिकांची गृहनिर्माण योजना राबविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. या प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

या ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०२/१९</u>

विषय :- राजीव गांधी प्रकल्पांतर्गत मुंबई शहरात

1. **उपकरप्राप्त ६६ इमारतीची पुनर्बांधणी झाली आहे त्यांची दुरुस्ती.**
2. **मुलुंड पूर्व येथील वसाहतीतील ५६ इमारतींची दुरुस्ती.**
3. **मजासवाडी येथील १७ इमारतींची दुरुस्ती.**
4. **धारावी येथील ३५ इमारतींची दुरुस्ती.**
5. **मानखुर्द येथील ३५ इमारतींची दुरुस्ती.**

ठराव क्रमांक : ६०२९ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, लालबाग पेरुचाळ येथील १२६ संक्रमण शिबीराच्या बांधण्यात आलेल्या गाळयांपैकी जे २६ गाळे पावसाळयामध्ये अचानकपणे कोसळणा-या इमारतींतील रहिवाशांना सामावून घेण्याकरिता राखून ठेवण्यात आलेले होते त्यापैकी अशा इमारतीतील रहिवाशांना सामावून घेण्याकरिता सहा गाळे राखून ठेवण्यात यावेत व उर्वरित २० गाळे हे सेस इमारतींच्या - रंगारी बदक चाळ व बदामी बोहरी चाळ यातील मूळ भाडेकरुंसाठी संक्रमण शिबीरातील तात्पूरते निवासस्थान म्हणून वापरण्याकरिता वितरीत करण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

चर्चेच्या अनुषंगाने यानंतर मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांनी असे विवेचन केले की, महालक्ष्मी कंपाऊंड येथे जी इमारत पुनर्रचित करण्यांत आलेली आहे त्या इमारतीतील उपलब्ध असलेल्या अतिरिक्त गाळयांपैकी सहा गाळे ९ (ई) जरीवाला चाळ या इमारतीच्या सहा मूळ भाडेकरुंसाठी आरक्षित करण्यांत यावेत व सदर भाडेकरुंची बृहत् सूचीवरुन पात्रता निश्चित झाल्यानंतरच सदर गाळयांचे वितरण करण्यांत यावे आणि जर त्यांची पात्रता निश्चित न झाल्यास इतर पात्र भाडेकरुंसाठी त्यांचे वितरण करण्यांत यावे, असे प्रस्तावित केले असता सर्व सन्मा.सदस्यांनी यास सहमती दर्शविली चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्दयावर विचार करुन प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६०३० दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, महालक्ष्मी कंपाऊंड येथील पुनर्रचित करण्यांत आलेल्या इमारतीतील उपलब्ध असलेल्या अतिरिक्त गाळयांपैकी सहा गाळे ९ (ई) जरीवाला चाळ या इमारतीच्या सहा मूळ भाडेकरुंची बृहत् सूचीवरुन पात्रता निश्चित करुन वितरण करण्यांत यावे आणि जर त्यांची पात्रता निश्चित न झाल्यास इतर पात्र भाडेकरुंना सदर गाळयांचे वितरण करण्यांत यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांनी यानंतर असे सूचीत केले कीं, सातारा नगर परिषदेतील राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत असलेली कामे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वतीने करण्यात यावीत. आणि अशी सर्व कामे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने केल्यानंतर सातारा नगर पालिकेला हस्तांतरीत करण्यांत यावीत. यावर मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांनी विषद केले कीं, नगर पालिका ही कामे हस्तांतरीत करुन घेण्यास शक्य तो लगेच तयार होत नाहीत, त्यामुळे अशा केलेल्या कामांचे नुकसान होते, म्हणून सातारा नगर पालिकेने अधिकृत पत्र दिले कीं, म्हाडाने ही कामे करुन द्यावीत, तर ते जास्त सयुक्तिक होईल.

यानंतर मा.अध्यक्ष / प्रा. यांनी प्रस्तावित केले कीं, नगर पालिकेचे मुख्य अधिकारी हे शासकीय अधिकारी असल्यामुळें त्यांना एक पत्र देण्यांत यावे कीं, सातारा नगर पालिकेतील गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत असलेली कामे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने करुन देण्याबाबतचा निर्णय प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आला असून ती कामे पूर्ण झाल्यानंतर आपल्या नगर पालिकेने त्वरित हस्तांतरीत करुन घ्यावीत, यास सर्व सन्मा.सदस्यांनी सहमती दर्शविली चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या या मुद्दयावर विचार करुन प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६०३१ दिनांक : १३.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, सातारा नगर पालिकेतील राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत असलेली कामे ही पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने करुन द्यावीत व सदर कामे पूर्ण झाल्यावर ती सातारा नगर पालिकेने त्वरित हस्तांतरीत करुन घ्यावीत, यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

त्यानंतर मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांनी असे सूचीत केले की, यापूर्वी झालेला ठराव क्र. ५९६२, दिनांक ६.१०.२००३ मध्ये पुढील प्रमाणें सुधारणा करण्यांत याव्यात :---

१. दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या इमारतींमधील एकूण १९३ + १३० अशा ३२३ फसवणूक झालेल्या घुसखोरांना रु. ५००/- प्रती चौरस फूट बांधकामाचा खर्च लावून विक्री योजना लागू करण्यांत यावी.

<u>याऐवजी</u>

दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या इमारतींमधील एकूण १९३ + १३० अशा ३२३ फसवणूक झालेल्या घुसखोरांना रु. ५००/- प्रती चौरस फूट बांधकामाचा खर्च लावून भाडेतत्वावर नियमितीकरण योजना लागू करण्यांत यावी. व आशिर्वाद किंवा इतर इमारतीमधील भाडेकरुंवर पोलीस केसेस असल्यास किंवा सी.ए.कडे केसेस असल्यास त्या काढून घेण्यात याव्यात व त्यांना ही नियमितीकरण योजना लागू करावी.

२. ज्यांचे नांवे सदनिका आहेत व ज्यांचेकडून आपण नियमाप्रमाणे भाडे वसूली करीत आहोत किंवा भाडे वसूल करणे मध्येच थांबविले आहे अशा सदनिकाधारकांवर कोर्टात किंवा अपिलामध्ये केसेस असतील तर त्या त्वरीत काढून टाकण्यात याव्यात व त्यांचे नांवे सदनिका असल्यामुळे व त्यांचेकडून भाडे स्विकारले असल्यामुळे त्यांना नियमित भाडेकरु समजून त्यांचेकडून वरीलप्रमाणे विक्रीची किंमत वसूल करु नये.

<u>याऐवजी</u>

ज्यांचे नांवे सदनिका आहेत व ज्यांचेकडून आपण नियमाप्रमाणे भाडे वसूली करीत आहोत किंवा भाडे वसूल करणे मध्येच थांबविले आहे अशा सदनिकाधारकांवर कोर्टात किंवा अपिलामध्ये केसेस असतील तर त्या त्वरीत काढून टाकण्यात याव्यात व त्यांचे नांवे सदनिका असल्यामुळे व त्यांचेकडून भाडे स्विकारले असल्यामुळे त्यांना नियमित भाडेकरु समजून त्यांचेकडून वरीलप्रमाणे भाडेतत्वावर नियमितीकरणाची किंमत वसूल करु नये. तसेच नियमितीकरण करीत असताना आशिर्वाद किंवा इतर इमारतीमधील भाडेकरुंवर मंडळाने पोलीसांमार्फत कोर्टात किंवा अपिलात केसेस केल्या असतील तर त्या काढून टाकण्यात याव्यात व त्यांचे नियमितीकरण करावे.

त्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०३ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

<u>बाब क्रमांकः२०३/३</u>

विषयः- श्री.आर.आर.चव्हाण, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांचेकडून इमारत क्र.९-११ साखळी स्ट्रीट, ५ वी गल्ली, इ-२ विभाग मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ प्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत.

ठराव क्रमांक : ६०३२ दिनांक : २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेण्यांत आला कीं, श्री.आर.आर.चव्हाण, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांनी त्यांचेकडून त्यांना प्रस्तावित केलेली शिक्षा कमी करुन त्यांचेकडून वसूल करण्यांत यावयाच्या रु. १,२५,०००/- रकमेपोटी २५ टक्के रक्कम रु. ३१,२५०/- चा भरणा त्यांनी करावा, व उर्वरित रक्कम रु. ९३,७५०/- ही निर्लेखित करण्यांस हे प्राधिकरण मंजूरी देत आहे व उर्वरित रोखून ठेवलेली त्यांची रक्कम त्यांना त्वरित देण्यांत यावी, असे ठरले.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०३/४</u>

विषयः- गोरेगांव, बिंबीसारनगर येथील संकेत क्र.१७७ अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारत क्र.२१ ए व २१ बीमधील ८४ सदनिका शांतीदूत सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) या संस्थेस वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०३३ दिनांक : २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, मा.उपाध्यक्ष / प्रा. यांचे जाहिरातीद्वारे विक्री करण्याचे मत तसेंच सभापती, मुंबई मंडळ यांचे सदर संस्थेस सध्याच्या किंमतीपेक्षा रु. १००/- अधिक किंमतीने विक्री करावी, हे मत न्यायालयास कळविण्यात यावे. यास प्राधिकरणाने एकमताने मंजूरी दिली.

<u>बाब क्रमांकः२०३/५</u>

विषयः- नॅशनल ट्रेनिंग इन्स्टीटयुट फॉर स्लम - हौसिंग मॅनेजमेंट कॅार्पोरेट बॅाडी निर्माण करुन पीडीसी पुणे येथे कार्यरत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०३४ दिनांक : २९.०७.२ ०० ४

एकमताने निर्णय घेतला कीं, नागरीकरणाच्या वाढत्या प्रक्रियेचा विचार करता म्हाडाच्या पीडीसी / पुणे हया ठिकाणी (राष्ट्रीय झोपडपट्टी गृहनिर्माण व व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था) नॅशनल ट्रेनिंग इन्स्टीटयुट फॉर स्लम - हौसिंग मॅनेजमेंट नावाची सबसिडीअरी सोसायटी स्थापन करण्यात यावी. हया कॅार्पोरेट बॅाडीवर पुढीलप्रमाणे प्रस्तावित तज्ञांची नियुक्ती करण्यांत यावी :---

१. मा.प्रधान सचिव / गृहनिर्माण विभाग	अध्यक्ष.
२. मा.प्रधान सचिव / नगर विकास	सदस्य.
३. मा.प्रादेशिक संचालक / हडको	सदस्य
४. मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / म्हाडा	सदस्य
५. मुख्य अभियंता - १ / म्हाडा	सदस्य
६. मुख्य अभियंता - २ / म्हाडा	सदस्य
७. वित्त नियंत्रक / म्हाडा	सदस्य.
८. श्री.प्रकाश बिनसाळे / अशासकीय सदस्य / म्हाडा	सदस्य.
९. श्री.चरणसिंग सप्रा / अशासकीय सदस्य / म्हाडा	सदस्य
१०. मुख्य अधिकारी / पुणे मंडळ	सदस्य.
११.संचालक / पी.डी.सी., पुणे	सदस्य सचिव.

क्रमांक ८ व ९ वरील म्हाडा सदस्य हे त्या पदावर कार्यरत असेपर्यंत सदस्य म्हणून राहतील. अशासकीय सदस्यांना बदलण्याचा अथवा त्यांचेऐवजी नवीन सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील तसेंच हया संस्थेमार्फत झोपडपट्टी व सामाजिक गृहनिर्माण या नागरीकरणाच्या प्रक्रीयेशी संबंधित असणा-या सर्वांना प्रशिक्षण उपलब्ध होण्यासाठी प्राधिकरण मान्यता देत आहे. वरील समिती ही प्राधिकरणाची सबसिडीअरी म्हणून काम करेल.

<u>बाब क्रमांकः२०३/६</u>

विषयः- सांगली-मिरज कुपवाड महानगर पालिका क्षेत्रातील झोपडपट्टी सर्वेक्षण करण्याबाबतचे काम शेल्टर या (एनजीओ) संस्थेमार्फत करुन घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०३५ दिनांक : २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, सांगली-मिरज कुपवाड महानगर पालिका क्षेत्रातील
राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत पायाभूत सुविधा हया सदर महानगर पालिकेस बांधण्यास न देता त्या म्हाडाने स्वतः बांधून द्याव्यात व सदर सांगली-मिरज कुपवाड महानगर पालिकेने त्या हस्तांतरीत करुन घ्यावात, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०३/७</u>

विषयः- म्हाडाच्या नागपूर येथील इम्प्रेस मिल क्र.५ च्या जमिनीपैकी व्यापारी व तत्सम वापरासाठी भागशः जमिनीची विक्री करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०३६ दिनांक : २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, नागपूर येथिल इम्प्रेस मिल जमिनीवरील योजना तसेंच मुंबई येथील सर्व्हे क्रमांक सात-आठ व कुलाबा येथिल योजना सत्वर कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात येत आहेत.

<u>बाब क्रमांकः२०३/८</u>

विषयः- टिळकनगर, चेंबूर या वसाहतीतील
पाणी पुरवठा व्यवस्थची श्रेणीवाढ करण्याबाबत
Upgradation of Water Supply network.

ठराव क्रमांक : ६०३७ दिनांक : २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या मे.आर.के.मधानी ॲन्ड कं. यांची (+) ८५ % दराची (रु. ५,४८,५१,९५२/-) निविदा स्वीकृतीकरिता, प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०३/१०</u>

विषयः- राजीव गांधी प्रकल्पाअंतर्गत

१. उपकरप्राप्त इमारतींची पुनर्बांधणी.
२. मुलुंड, पूर्व येथील वसाहतीतील ५६ इमारतींची दुरुस्ती.
३. मजासवाडी येथिल १७ इमारतींची दुरुस्ती.
४. धारावी येथील ३५ इमारतींची दुरुस्ती.
५. मानखुर्द येथील ३५ इमारतींची दुरुस्ती.

ठराव क्रमांक : ६०३८ दिनांक : २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, १. मुंबई शहरातल्या राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या ६६ पुनर्रचित इमारतींची दुरुस्ती तसेंच उपनगरातील २. मुलुंड, पूर्व येथील वसाहतीतील ५६ इमारतींची दुरुस्ती. ३.मजासवाडी येथिल १७ इमारतींची दुरुस्ती.४. धारावी येथील ३५ इमारतींची दुरुस्ती.५मानखुर्द येथील ३५ इमारतींची आवश्यक ती दुरुस्ती करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. या इमारतीतील गाळेधारकांकडून मूळ किंमत ही तीन महीन्यांच्या पाच समान हप्त्यात वसूल करण्यात यावी व त्यावरील संपूर्ण व्याज माफ करण्यात यावे तसेंच सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम म्हाडा एकवेळ करुन देईल व सदर काम झाल्यानंतर त्या इमारती संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने त्वरित हस्तांतरीत करुन घ्याव्यात, अशा प्रकारचे अभिवचन सदर सहकारी संस्थेकडून दुरुस्तीचे काम सुरु करण्यापूर्वी घेण्यात यावे. सदर दुरुस्तीचे काम तांतडीने करणे आवश्यक असल्याचे आवश्यकता असल्यास कामाचे तुकडे पाडून काम सुशिक्षीत बेरोजगार अभियंता किंवा मजूर सहकारी संस्थांकडून करुन घेण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. या कामी शहरातील ६६ पुनर्रचित इमारती व उपनगरातील चार ठिकाणी असलेल्या इमारतींचे दुरुस्तीसाठी शहरांतील इमारतींसाठी रु. १५.०० कोटी व उपनगरातील इमारतींसाठी १५.०० कोटी रुपये खर्च करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०३/११</u>

विषयः- औरंगाबाद मंडळातील मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांच्या किंमती कमी करण्याबाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६०३९ दिनांक २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने रिक्त गाळयांची वारंवार जाहिरात देऊनही पूरेसा प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे गाळयांवर प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर आधारीत बाब टिप्पणीमधील तक्ता ' अ ' व ' ब ' मध्ये नमूद केल्यानुसार ११ योजनांतील गाळयांच्या निश्चित केलेल्या किंमतीस हे प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०३/१३</u>

विषयः- भाडेतत्वावरीलल वितरीत केलेले व नंतर विक्री योजनेत समाविष्ट झालेल्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चावरील व्याज माफ करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०४० दिनांक : २९.०७.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, ठराव क्रमांक ६०१८ दिनांक १९.०५.२००४ मध्ये

' भाडेतत्वावरील वितरीत केलेल्या व नंतर विक्री योजनेत समाविष्ट झालेल्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती खर्चावरील मूळ रक्कम व त्यावरील व्याज ५० टक्के माफी करुन भरण्यासाठी डिसेंबर २००४ पर्यंत मुदतवाढ देण्यांत येत आहे. '

याऐवजी

' भाडे तत्वावरील वितरीत केलेल्या व नंतर विक्री योजनेत समाविष्ट झालेल्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती खर्चावरील कर्जाची संपूर्ण रक्कम भरल्यास त्यावरील व्याजाची ५० टक्के रक्कम माफ करण्याची सवलत डिसेंबर २००४ पर्यंत देण्यात येत आहे. यास प्राधिकरणाने मंजूरी दिली.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०३/१५</u>

विषय : मंडळाच्या विविध बहुमजली इमारतींच्या व इतर वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना व अन्य लाभधारकांना वसाहतीतील उर्वरित अनुज्ञेय चटईक्षेत्र आणि अन्य तत्सम फुटकळ भूखंड वाटपाबाबत म्हाडाच्या विविध धोरणांमध्ये भागशः सुधारणा व इतर अनुषंगिक बाबींबाबत निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०४१ दिनांक : २९.०७.२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, ठराव क्र.५९९८ दि.९/१/२००४ मध्ये भागशः सुधारणा मान्य करण्यात आल्या. त्याचा तपशील परिच्छेद निहाय खालील प्रमाणे आहे.

अ) <u>ठराव क्र.५९९८, दि.९/१/२००४ मधील सुधारणा :-</u>

१) <u>परिच्छेद क्र." १७ अ" याप्रमाणे वाचावा :</u>

जे भूखंड फुटकळ स्वरुपाचे आहेत म्हणजे स्वतंत्ररित्या बांधकामास योग्य नाहीत अशा भुखंडाचे वितरण चटईक्षेत्र विरहीत प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या रहिवाशी वापराच्या दराच्या १० टक्के दराने करावे.

२) <u>परिच्छेद क्र. ' १७ ब ' या प्रमाणे वाचावा :</u>

जे भूखंड ना फुटकळ ना स्वतंत्ररित्या बांधकामास योग्य / ना विकास करण्यालायक स्वरुपाचे, थोडेफार मोठया आकारमानाच्या भूखंडाचे वितरण चटईक्षेत्र विरहीत प्रचलीत वर्षाच्या रेडीरेकनरच्या रहिवाशी वापराच्या दरांच्या २० टक्के दराने वितरण करावे.

३) <u>परिच्छेद क्र." १७ क" याप्रमाणे वाचावा.</u>

मुंबई शहरासाठी विविध वार्डवाईज वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राच्या वितरणाच्या दराकरिता खालील तक्त्यातील दरास मान्यता देण्यांत येत आहे.

तक्ता : (अ)

अ.क्र.	विभाग	वॉर्ड	उर्वरित चटईक्षेत्राचे दर प्रति चौ.मी.रुपये
१	२	३	४
१	मुंबई शहर	ए पासून जी पर्यंत	रु.६५००/-
२	मुंबई पश्चिम उपनगरे	एच आणि के	रु. ४०००/-
३	मुंबई पूर्व उपनगरे	एल,एम,आणि एन	*रु. ३०००/-*
४	मुंबई पूर्व व पश्चिम विस्तारीत उपनगरे	पी आणि आर वॉर्ड, एस आणि टी वॉर्ड	रु. २५००/-

उपरोक्त दर पुढील३ वर्षासाठी कायम रहातील (३१/१२/२००७ पर्यंत). त्यानंतर किंवा आवश्यकतेनुसार सदरहु दरात वेळोवेळी सुधारणा करण्या बाबतचे अधिकार प्राधिकरणास राहतील.

मुंबई वगळून इतर विभागीय मंडळासाठी वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राच्या वाटपाचा दर प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या रहिवाशी वापराच्या दराच्या २० टक्के दराने वाटप /वितरण करावे.

४) <u>परिच्छेद क्र.२४ मधील २ रा परिच्छेद याप्रमाणे वाचावा.</u>

मुंबई शहरासाठी रहिवाशी , शैक्षणिक, सामाजिक वापरासाठी सुधारीत परिच्छेद क्र.१७ क मधील तक्ता (अ) मधील वॉर्डवाईज दराच्या २५ टक्के दराने आकारणी करावी व मुंबई वगळून इतर शहरासाठी ज्या शहरामध्ये टीडीआर नियम लागू आहेत. अशा शहरांसाठी प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनर मधीलरहिवाशी वापराच्या दराच्या ५ टक्के दर आकारुन ना हरकत प्रमाणपत्र द्यावे. तसेच व्यापारी, औद्योगिक, वैद्यकीय व तत्सम वापरासाठी वरील दराच्या दीडपट दराने आकारणी करुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत यावे. या आकारणीवर वार्षिक भुईभाडे आकारणी करु नये.

५) <u>परिच्छेद क्र.२७-क मधील हे वाक्य ''वसाहतीतील अशा खुल्या करमणुकीच्या मैदानाचे वितरण प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या रहिवाशी दराच्या ३ टक्के दराने आकारणी करुन वितरण करावे'' ऐवजी या प्रमाणे वाचावे</u> :

''वसाहतीतील अशा खुल्या करमणुकीच्या मैदानाचे वितरण प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या रहिवाशी दराच्या ५ टक्के दराने आकारणी करुन वितरण करावे.''

ब) सदर ठराव दि.२९.७.२००४ पासून लागू करावा मात्र प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५९९८ दि. ९.१.२००४ हा दि.१५.१.२००४ पासून लागू आहे. त्यानंतर ज्या प्रकरणात देकार पत्र देण्यांत आले व ज्यांनी संपूर्ण रक्कम भरली असल्यास त्यांना या ठरावातील तरतूद लागू करु नये तसेंच ज्यांनी ठरवून दिलेल्या मुदतीत रक्कम भरलेली नसल्यास किंवा भागशः रक्कम भरली नसल्यास, त्यांना न भरलेल्या रकमेबाबत या ठरावातील तरतूदीनुसार सुधारीत देकार पत्रे देण्यांत यावी.

क) या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता यामधील सुधारित तरतूदींनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

ड) प्राधिकरणाच्या ठराव क्र.५९९८ दि.९.१.२००४ मधील इतर सर्व अटी व शर्ती कायम रहातील.

यास प्राधिकरण मंजूरी देत आहे

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०३/१६</u>

विषय : भाडेकरुंना देण्यात येणा-या अतिरिक्त क्षेत्रफळासाठी दर निश्चित करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०४२ दिनांक : २९.०७.२००४

एकमताने ठराव केला की, पुनर्रचित इमारतीत किंवा ना-हरकत प्रमाणपत्रांतर्गत बांधण्यात आलेल्या निवासी गाळयासाठीच्या अतिरिक्त क्षेत्रफळाकरिता सरसकट रु. १५००/- प्रती चौ.फुट व व्यापारी गाळयाकरिता निवासी गाळयाच्या दुप्पट म्हणजेच रु. ३०००/- प्रती चौ.फुट दर आकारण्यास हे प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०३/१८

विषय : वर्तकनगर ठाणे येथील समाज मंदिर हॅाल दिर्घ मुदतीवर भाडेपट्टयावर देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०४३ **दिनांक : २९.०७.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं, वर्तकनगर ठाणे येथील समाज मंदिर हॅाल दिर्घमुदतीच्या मा.उपाध्यक्ष / प्रा.जे भाडे आकारतील त्या भाडेकरारावर विहंग महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित यांना देण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ७/०८/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०४ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांकः२०४/४

विषयः- १९९० पूर्वी जाहिरात देऊन विक्री केलेल्या गाळे/भूखंडाची अंतिम विक्री किंमत निश्चित करण्यास अडचणी येत असतील तर जाहिरातीतील अंदाजित किंमत हिच अंतिम विक्री किंमत ठरविण्याचे धोरण.

बाब क्रमांकः२०४/१८

विषयः- न्यु टिळकनगर चेंबूर येथील इमारत क्र. १६५ च्या अभिहस्तांतरणबाबत.

ठराव क्रमांक : ६०४४ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं,ज्या सदनिकांची अंतिम विक्री किंमत निश्चित करण्याच्या कालावधीला बराच मोठा कालावधी लागलेला आहे व जेथे प्रति गाळा अंतिम विक्री किंमत आधी जाहिरात केलेल्या विक्री किंमतीच्या १० टक्क्यापेक्षा जास्त येईल अशा सर्व प्रकरणी जाहिरातीत दिलेली विक्री किंमत अधिक १० टक्के अशा प्रकारे अंतिम विक्री किंमत म्हणून स्थायी करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेंच जेथे अंतिम विक्री किंमत जाहिरातीत दिलेल्या विक्री किंमतीपेक्षा कमी निश्चित होईल तेथे जाहिरातीत दिलेली विक्री किंमत स्थायी करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/५</u>

विषयः- लक्ष्मीनगर, महर्षीनगर, गोखलेनगर, पुणे येथील बैठया गाळयांच्या रहिवाशांकडून किंमतीपोटी थकबाकी व व्याजाबाबत.

ठराव क्रमांकः ६०४५ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, लक्ष्मीनगर, महर्षीनगर, गोखलेनगर,पुणे येथील बैठया गाळयांबाबत शासनाच्या दि. २७/०५/०४ च्या पत्रासह जोडलेल्या दि. २५/०२/०४ च्या कार्यवृत्तात नमूद केल्याप्रमाणे ६५% व्याजाची रक्कम माफ करण्यांत यावी. मात्र, जे मूळ पूरग्रस्त लाभधारक आहेत, किंवा त्यांचे कायदेशीर वारस

आहेत, त्यांनाच फक्त या निर्णयाचा लाभ देण्यांत यावा. परंतु, ज्यांनी गाळयांची विक्री केलेली आहे, त्यांना या निर्णयाचा फायदा देण्यांत येणार नाही. शासनाच्या कार्यवृत्तात नमूद केल्याप्रमाणे ज्यांनी संपूर्ण किंमत व व्याजाचे पैसे भरले आहेत, त्यांना या भरलेल्या पैशांचा परतावा देण्यांत येऊ नये. त्याचप्रमाणे शासनाने दि. ०१/०७/०४ च्या पत्रानुसार पत्रात नमूद केल्याप्रमाणे रहिवाश्यांनी दिलेल्या किंमतीत ३५% रक्कम एकरकमी भरली नाही तर त्यांना संपूर्ण व्याजाची रक्कम भरावी लागेल. हा कालावधी दि. ३० सप्टेंबर ०४ पर्यत वाढविण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. शासनास त्याप्रमाणे कळविण्यांत यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/६</u>

विषयः- सेक्टर-४ विशेष नियोजन प्राधिकरण-चंद्रपूर म्हाडा वसाहतीकरीता पाणी पुरवठा योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीबाबत.

ठराव क्रमांकः६०४६ **दिनांक ७.०८.२००४**

एकमताने निर्णय घेतला की, सेक्टर-४, विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर म्हाडा वसाहतीकरीता पाणीपुरवठा योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा. लि. कोल्हापूर यांनी दिलेला निविदा किंमतीपेक्षा १२.४३ टक्के जास्त हा दर योग्य वाटत असल्यामुळे त्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/८</u>

विषयः- इमारत क्र. १०, पंतनगर, घाटकोपर (पूर्व) शिवनेरी सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीलगतच्या कार्यालयीन इ.क्र.९ पैकीचा (गणेश मंदिर असलेला) भूखंड वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०४७ दिनांकः ७.०८.२ ००४

एकमताने निर्णय घेतला कीं,इमारत क्र. १०, पंतनगर, घाटकोपर (पूर्व) शिवनेरी सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीलगतच्या कार्यालयीन इ.क्र.९ पैकीचा (गणेश मंदिर असलेला) भूखंड तसेच वर्तकनगर, ठाणे येथील श्री साईबाबा मंदिराचा भूखंड हे दोन्ही भूखंड वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/९</u>

विषयः- प्रतिक्षानगर,सायन येथील संक्रमण शिबीराची पुनर्बांधणी प्रकल्पामध्ये टप्पा क्र.४ अंतर्गत नवीन संक्रमण गाळे व खुल्या विक्रीसाठी सदनिका बांधण्याच्या एकरकमी ठेका मे. बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांना देणेबाबत.

ठराव क्रमांकः ६०४८ दिनांकः ७.०८.२००४

प्राधिकरणाने दिनांक २०.०२.२००३ रोजी ठराव क्र. ५८८९ अन्वये सदरचे काम सध्या चालू असलेल्या पुनर्बांधणी प्रकल्पाचे तिस-या टप्प्याचे काम ८ ते १० महिन्यांत देण्यांत यावे, असे ठरले होते. चर्चेअंती एकमताने खालील निर्णय घेण्यात आला.

१. सर्व्हे क्रमांक ४ व ५ प्रतिक्षानगर सायन येथील संक्रमण शिबीराच्या शेवटच्या ४ थ्या टप्प्याचे १४०५ संक्रमण गाळे व २०४८ विक्री गाळे बांधण्याचे प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देण्यात येत आहे. सदर काम सध्या चालू असलेल्या पुनर्बांधणीच्या कामाचे टप्पा क्रमांक ३ चे काम म्हणून देण्यात यावे.

२. सदर काम सुरु केल्यापासून २१ महिन्याचे कालावधीत पूर्ण करावे. सदर कामाची अंदाजित किंमत सुमारे १४०.०८ कोटी इतकी राहील.

३. संक्रमण सदनिका १८० चौ.फूट चटई क्षेत्राच्या असतील व तळ + ४ मजली इमारती बांधण्यात याव्यात. बांधकामाचे दर नवीन शासन निर्णयानुसार सात मजली इमारतीसाठी रु. ८२४/- प्रति चौ.फूट असा आहे. सदरच्या ४ मजली संक्रमण शिबिराच्या इमारतीसाठी हा दर रु. ८०५/- प्रति चौ. फुट इतका आणि ४ टक्के विक्रीकर व शासनाच्या दिनांक १७.०९.१९९९ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तानुसार व दिनांक २६.०४.२००१ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम व विनिर्देश अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

४. विक्रीच्या गाळयासाठी शासनाच्या दिनांक १७.०९.१९९९ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तानुसार व दिनांक २६.०४.२००१ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम व विनिर्देश अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील. त्याशिवाय दिंडोशी येथे मंजूर केलेल्या सुधारित विनिर्देश अटीनुसार काम करण्यास मान्यता देण्यात येत आहे. विक्री गाळयाचा बांधकाम दर शासन निर्णय रु. ८२४/- प्रति चौ.फुट आणि ४ टक्के विक्रीकर असा राहील.

५. वर नमूद केलेल्या बांधकाम दरात वाढ किंवा घट प्राईस इंडेक्सशी आधारीत म्हाडाच्या प्राईस व्हेरिएशन फॉर्म्युलाप्रमाणे करण्यात यावी. सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट, आर.बी,आय. दर निर्देशांक व खालीलप्रमाणे दिलेल्या स्टाररेट प्रमाणे काढण्यात यावी.

सिमेंट = २८२०/- प्रति टन.

स्टील = ३२०००/- प्रति टन.

६. कंत्राटाप्रमाणे देण्यांत येणा-या मोबिलाईझेशन अग्रिमावर सदर अग्रिम देण्यात आलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यंत व्याज आकारण्यात यावे. सदर व्याजाचा दर प्राधिकरणास मिळणा-या गुंतवणुकीच्या व्याजाच्या दराएवढा, वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांच्यासुनचेनुसार ६ टक्के आकारण्यात यावा.

७. योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे काम जसे की, सुरक्षा भिंत, पायवाट, गटारे, मलनिसारण व जलवाहिन्या टाकणे दिवाबत्ती इ. कामे कामाचे मूळ कंत्राटदार मे.बी.जी.शिर्के कंपनीकडून चालू दरसूचीवर बी - १ करारनामा अंतर्गत करुन घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सुविधांचे अतिरिक्त कामाचे दर मुळकामाच्या कंत्राटाच्या आदेशाच्या दिवशी प्रचलित असणा-या दरसुचीनुसार देण्यात यावेत. जे दर दरसूचीमध्ये नसतील त्याचे विश्लेषण (Rate analysis) करुन सक्षम अधिका-याची मंजूरी घेण्यांत यावी.

८. जुनी संक्रमण शिबीरे मु.अ. / इ.दु.व पु.मंडळ यांनी १२ महिन्यांत स्थलांतरीत करुन व जुन्या चाळी पाडून जागा मोकळी करुन देण्यात यावी जेणेकरुन योजनेच्या प्रगतीत अडथळा येणार नाही. सध्याची संक्रमण शिबिरे वेळेमध्ये मोकळी करुन घेण्याची जबाबदारी मुख्य अधिकारी व सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेवर राहील व त्यांनी या विषयावर पाक्षिक अहवाल उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना सादर करावा.
९. सदर काम महानगर पालिकेची मंजूरी मिळाल्यानंतर, मंजूर नकाशाप्रमाणे योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.
१०. भविष्यात सदर येाजनेमुळे म्हाडास कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास त्याची जबाबदारी शासनाचे दिनांक २.०३.२००१ चे पत्रानुसार मे.बी.जी.एस. भरपाई करेल या आशयाचे त्याचेकडून हमीपत्र (लेटर) घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्यासंबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.
११. सदर ठरावाची अंमजबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न बघता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/१०</u>

विषयः- बोईसर.तारापूर येथील सालवड ग्रामपंचायत हद्दीमधील ता. पालघर जिल्हा ठाणे येथील स.क्र.२९ व ३० (जुना) नवीन स.क्र.१५५ व १५६ मधील क्षेत्र १०-१२ हेक्टर जमीन म्हाडा कलम ५२ अन्वये संपादन करणेबाबत

ठराव क्रमांकः६०४९ दिनांकः ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, जि. ठाणे, बोईसर तारापूर येथील सालवड ग्रामपंचायत हद्दीमधील एम.आय.डी.सी.च्या आराखडयातील स.क्र. १५५/२,१५६/२,१५६/३ मधील जमीन सुमारे क्षेत्र १०.१२ हेक्टर या जमिनीच्या खरेदीसाठी शासन नियुक्त समितीने निश्चित केलेला दर रु. १०२५/- प्रति चौ.मी. या दरास व या दरानुसार जमिनीची एकूण किंमत १०३७.३० लाख होत आहे. एवढया रकमेस जमीन खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०४/११

विषयः- मुंबई मंडळातंर्गत मोकळया भूखंडावर टर्न की पध्दतीने निवासी अनिवासी गाळयांचे बांधकाम करण्यासाठी पूर्ण अर्हताप्राप्त ठेकेदाराकडून प्राप्त झालेल्या निविदा स्वीकृतीबाबत.

ठराव क्रमांकः ६०५० **दिनांकः ७.०८.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळातंर्गत मोकळया भूखंडावर टर्न की पध्दतीने निवासी/अनिवासी गाळयांचे बांधकाम करण्यासाठी पूर्वअर्हताप्राप्त ठेकेदाराकडून प्राप्त झालेल्या प्रत्येक प्रकल्पाच्या बाबतीत सर्वात कमी दराच्या निविदा स्वीकृत करण्यासाठी मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०४/१२

विषयः- नागपूर गृहनिर्माण मंडळास नागरी जमीन कमाल धारणा कायद्याअंतर्गत वाटप झालेल्या अ. स.क्र.१२/१ मौजा बीडपेठ ब. स.क्र. १४/१ (ख) व १४/२ (ख) मौजा मानेवाडा तसेच (ड)स.क्र.६४ मौजा मानेवाडामधील जमिनीवर विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांनी लेआऊट टाकून त्यामधील भूखंड परस्पर लोकांना विकले याबाबत धोरणात्मक निर्णय.

ठराव क्रमांकः६०५१ दिनांकः ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं,नागपूर गृहनिर्माण मंडळास नागरी जमीन कमाल धारणा कायद्याअंतर्गत वाटप झालेल्या अ. स.क्र.१२/१ मौजा बीडपेठ ब. स.क्र. १४/१ (ख) व १४/२ (ख) मौजा मानेवाडा तसेच (ड)स.क्र.६४ मौजा मानेवाडामधील जमिनीवर विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांनी लेआऊट टाकून त्यामधील भूखंड परस्पर लोकांना विकले आहेत ते मूल्य आकारुन नियमित करण्यास प्राधिकरण शिफारस करीत आहे, त्यास शासनाची परवानगी घेण्यांत यावी.

सदर प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/१३</u>

विषयः- बोरी, ता. जिंतूर जिल्हा परभणी येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी १६६ गाळयांबाबत औरंगाबाद मंडळाने केलेल्या ठरावाबाबत गाळा ताब्यात देण्यापूर्वी प्राथमिक अदायगीच्या एकूण रकमेचे हप्ते पाडून भरणा करण्याबाबत.

ठराव क्रमांकः ६०५२ दिनांकः ७.०८.२००४

औरंगाबाद मंडळाने दि. ३१/०७/०४ च्या बैठकीत पुढीलप्रमाणे पारीत केलेल्या ठरावास मंजूरी देण्यांत येत आहे."बोरी, ता. जिंतूर, जि.परभणी येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे राज्यातील दुषकाळी परिस्थिती पाहता व घरे लवकरांत लवकर वाटप करण्याच्यादृष्टीने व म्हाडाचेही कोणतेही आर्थिक नुकसान होऊ नये यादृष्टीने तूर्त अंदाजे रु.५०००/- चा भरणा करुन घेऊन गाळे लाभधारकांना ताब्यात द्यावेत व उर्वरीत रक्कम अंदाजे रु. ५०००/- व्याजासह चार समान मासिक हप्त्यात उर्वरित कर्ज रकमेच्या मासिक कर्जाच्या हप्त्यासह वसूल करण्यांत यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/१४</u>

विषयः- पंतनगर,घाटकोपर येथिल ईडब्ल्यूएस ५१२ गाळेधारकांच्या असोशिएनला लगतचा सेप्टीक टॅक भूखंड वितरण करण्याकरीताआणि पुनर्विकास प्रकलपाच्या अहवालाबाबत.

ठराव क्रमांक : ६०५३ **दिनांकः ७.०८.२००४**

पंतनगर, घाटकोपर येथील ५१२ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक गाळेधारकांच्या असोशिएशनला लगतचा सेप्टिक टँक भूखंड वितरण करण्याबाबत आणि त्यांनी सादर केलेल्या प्रकल्पाच्या पुनर्विकासाबाबत एकमताने खालील निर्णय घेण्यांत आला.

१. संदर्भित गाळेधारकांच्या असोशिएशनने मागणी केलेला पंतनगर, घाटकोपर वसाहतीतील सेप्टिक टँक खालील भूखंड सदर असोशिएशनला प्रचलित वर्षाच्या रेडी रेकनरच्या रहिवाशी वापराच्या ५०% प्रति चौ.मी. दराने अधिमूल्य आकारुन चटईक्षेत्र निर्देशांक १.०० याप्रमाणे वितरीत करण्यांत यावा. संदर्भीय भूखंडाचे क्षेत्रफळ सुमारे ४१४४.०० चौ.मी. इतके आहे.

२. गाळेधारकांच्या असोशिएशनला संक्रमण शिबिर व विकास आराखडयातील रस्त्याच्या खालील क्षेत्रफळाचे व उर्वरीत चटईक्षेत्राचे प्राधिकरणाने ठराव क्रमांक ६०४१ दि. २९/७/२००४ व्दारे मान्य केलेल्या वसाहतीतील उर्वरीत चटईक्षेत्राच्या दराने म्हणजे या संदर्भी रु. ३०००/- प्रति चौ.मी. दराने वितरण करावे. या जागेवरील तात्पुरत्या संक्रमण शिबिराच्या कालमर्यादा संपुष्टात आल्यामुळे संक्रमण शिबिर निष्कासित करुन जमीन म्हाडाने परत ताब्यात घ्यावी व असाशिएशनला वरीलप्रमाणे वितरीत करावी. संदर्भीय जागेचे क्षेत्रफळ सुमारे ३३९०.०० चौ.मी. इतके आहे.

सदर ठरावाच्या अंमलबजावणीबाबत स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांकः२०४/१५

विषयः- मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी प्रा.लि. या कंपनीस मुंबई मंडळांतर्गत स.क्र.१२० वर्सोवा मुंबई येथे उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका बांधण्याचे काम ठोक पध्दतीने वितरीत करणेबाबत.

ठराव : ६०५४ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, स.क्र.१२० वर्सोवा येथिल जमिनीवरील १९९१ मधील दाव्यासंदर्भातील न्यायालयीन आदेश तसेच त्यानंतरचे महाराष्ट्र शासनाने न्यायालयात सादर केलेली १९९९ व २००४ मधील सहमती पत्राचा विचार करता प्राधिकरण सध्या शासनाने मान्य केलेल्या सुधारित दराप्रमाणे मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी यांना काम देण्यास मंजूरी देत आहे. परन्तु कंत्राट देण्याची कार्यवाही उच्च न्यायालयात सहमती पत्र स्वीकृत केल्यावरच करण्यात यावी. तथापि, न्यायालयाच्या निर्णयाला बंधनकारक राहून स्विकृतीपत्र देण्यात यावे. जमिनीचा उपयोग करण्यासाठी बिल्डींगची उंची सात (७) मजल्याच्यापेक्षा जास्त झाल्यास सात (७) मजल्यावरील खर्चास पवई प्रोजेक्टमध्ये जे तत्व स्वीकारले आहे त्याप्रमाणे वाढीव रक्कम देय राहील व हे ज्यादाचे दर ठरविण्याचा अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना राहील. तसेंच सायन येथील संक्रमण शिबीरातील बांधकामाबाबत ज्या या कामी योग्य असतील त्या अटी व शर्ती लावण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पूढील कार्यवाहीस मंजूरी.

बाब क्रमांकः२०४/१७

विषयः- प्राधिकरणाच्या कर्मचारी व अधिका-यांनी मागणी केल्याप्रमाणे ते रहात असलेल्या सेवानिवास स्थानातील गाळे (उच्च उत्पन्न गट व इतर) मालकी हक्काने देण्याबाबत विचारार्थ प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६०५५ दिनांक : ७.०८.२००४

एक मताने निर्णय घेतला कीं, सादर केलेल्या प्रस्तावातील परिशिष्ट ६ - क पर्यंत सादर केलेल्या गाळयाच्या यादीतील कोणतेहि गाळे मालकी हक्काने करण्यांत येऊन नयेंत परन्तु सदर प्रस्तावातील परिशिष्ट ७-अ,ब,क मधील जे संक्रमण शिबीरातील आहेत ते गाळे मुळ बांधकाम किंमत घेऊन मालकी तत्वावर करुन देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/१९</u>

विषयः- मुंबई मंडळांतर्गत असलेल्या वसाहतीकरिता टी.व्ही.केबल नेटवर्कची सुविधा पुरविणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०५६ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळांतर्गत मुंबईतील ६६ वसाहतींसाठी रु. ५=०० प्रती गाळा इतका दर निश्चित करण्यांत येत असून सदर ६६ वसाहतींमध्ये सध्या कार्यरत असलेल्या केबल अभिकरणांना नियमित करुन घेण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे तसेंच अशा नियमितीकरणाच्या मंडळाच्या प्रयत्नांना जी अभिकरणे प्रतिसाद देणार नाहीत त्यांच्या सेवा खंडीत करण्याची कार्यवाही मंडळ स्तरावर करण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०४/२०

विषयः- ओशिवरा गृहनिर्माण महाप्रकल्पांतर्गत मासिक भाडे खरेदी हप्ता तत्वावर वितरीत करण्यात आलेल्या सदनिकाधारकांच्या थकीत भाडेखरेदीच्या रकमेबाबत.

ठराव क्रमांक : ६०५७ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, सदर प्रस्तावास प्राधिकरण खालील अटीस अधीन राहून मान्यता दिली.

१. ही योजना जाहीरात दिल्यापासून २ महिना अस्तित्वात राहील.
२. सदर योजना ही जे सदनिकाधारक एक रकमी संपूर्ण रक्कम (करारनाम्याप्रमाणे देय असलेली) उपरोक्त मुदतीत भरतील त्यांनाच लागू राहील.
३. उपरोक्त सूट ही उक्त ओशिवरा महाप्रकल्प योजनेअंतर्गत बांधलेल्या वसाहतीमधील सदनिकाधारकांसाठी मर्यादित असून त्याचा लाभ इतर कोणत्याही योजनेसाठी देऊ नये.
४. सदर योजना ही विशिष्ट कालावधीपूरतीच मर्यादित राहील. म्हणजेच योजनेचा कालावधी संपल्यानंतर सदनिकाधारकांना पूर्वीप्रमाणेच व्याज व विलंबआकार आकारण्यात येतील.

यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

बाब क्रमांकः२०४/२१

विषयः- वर्सोवा अंधेरी येथे जानकीदेवी शिक्षण संस्थेस माध्यमिक शाळेसाठी वितरण केलेल्या भूखंडावरील इमारतीत बँकेसाठी पोट भाडेपट्टयावर दिलेल्या आणि बँकेकडून येणा-या भाडयातील २५ टक्के रक्कम भरण्यापासून सूट मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०५८ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाअंतर्गत ज्या शाळांनी त्यांना शाळेकरिता वितरीत करण्यात आलेल्या भूखंडाचा वापर व्यापारी उद्देशाकरिता करीत असल्यास अशा शाळांना ५ टक्के चटईक्षेत्र निर्देशांकाचा वापर व्यापारी उद्देशाकरिता मोफत ठेवण्यात येऊन त्यावरील २० टक्केपर्यंतच्या वापराकरिता सदर संस्थांना मिळत असलेल्या उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम शाळेने म्हाडास भरावी व २० टक्केच्यावर वापर होत असल्यास शाळेने उत्पन्नाच्या २५ टक्के रक्कम म्हाडास भरावी, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/२२</u>

विषयः- सर्वोदयनगर, मजासवाडी जोगेश्वरी पूर्व येथे मंडळाच्या वसाहतीत चाळ क्र.८७ व चाळ क्र.११३ जवळील मोकळया जागेत असलेला भाजीचा स्टॉल नियमित करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०५९ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, सर्वोदयनगर, मजासवाडी, जोगेश्वरी (पूर्व) येथे मुंबई मंडळाच्या वसाहतीत चाळ क्र. ८७ व चाळ क्र. ११३ जवळील मोकळया जागेत असलेल्या भाजीच्या स्टॉलसाठी श्री.अमर अर्जून शितप, १०० टक्के अंध यांना १० x १० चौ.फुट आकारमानाची स्टॉल ठेवण्याइतकी जागा कायमस्वरुपी वितरीत करण्यास प्रशासनास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/२३</u>

विषयः- वाल्मिकी आंबेडकर आवास योजना, सोलापूर, इचलकरंजी व बीड शहरामध्ये शासनाच्या आदेशानुसार राबविण्याची सुरुवात करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०६० दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, सोलापूर, इचलकरंजी व बीड या ठिकाणी वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेचे काम म्हाडाच्या निधीतून सुरु करण्यास व सदर योजनेसाठी खर्च होणारा निधी शासनाच्या मंजूरीनुसार प्राप्त होणा-या निधीतून यथावकाश समायोजित करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/२४</u>

विषयः- वांद्रे पुनः प्रापण, मौजे वांद्रे प.न.भू.क.अ ७९१ पै, या मुंबई मंडळाच्या जमिनीवरील मैदान क्र.१ लिलावती रुग्णालयासमोर, या मैदानावर केंद्र सरकारच्या धोरणानुसार व निधीमधून क्रिडा संकुलाची उभारणी करणेबद्दल मा.ना.श्री.सुनील दत्त स्थानिक खासदार व विद्यमान केंद्रीय क्रिडा मंत्री यांचे निर्देश.

ठराव क्रमांक : ६०६१ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, वांद्रे पुनः प्रापण, मौजे वांद्रे प.न.भू.क.अ ७९१ पै, या मुंबई मंडळाच्या जमिनीवरील मैदान क्र.१ लिलावती रुग्णालयासमोर, या मैदानावर केंद्र सरकारच्या धोरणानुसार व निधीमधून क्रिडा संकुलाची उभारणी करणेबद्दल रु. १/- नाममात्र दराने ३० वर्षाच्या भाडेपट्टा कराराने वितरीत करण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे. सदर क्रिडा संकुल सर्व जनतेसाठी खुले राहील या अटीवर ही मंजूरी देण्यात येत आहे. तसेंच सदर बाब राज्य शासनाच्या मंजूरीकरिता पाठविण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/२५</u>

विषयः भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत वितरण केलेल्या आणि पर्यावरण निर्बंध नियमात बाधित ठरलेल्या भूखंडाचे अधिमूल्य भरणा विलंबावरील व्याज वसुली / वार्षिक भुईभाडे वसुली आणि इतर देय रक्कमांच्या आकारणीबाबत प्राधिकरणाने दिनांक १०.११.२००३ रोजीचा ठराव ५९७५ अन्वयें घेतलेल्या धोरणात्मक निर्णयात अंशतः सुधारणा करणेंबाबत.

ठराव क्रमांक : ६०६२ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत वितरण केलेल्या आणि पर्यावरण निर्बंध नियमात बाधित ठरलेल्या भूखंडाचे अधिमूल्य भरणा विलंबावरील व्याज, वार्षिक भुईभाडे माफ करण्याचा निर्णय प्राधिकरण ठराव क्र. ५९७५ दिनांक १०.११.२००३ अन्वये घेण्यात आला होता. हा ठराव निवासी भूखंडांनाही लागू होता.

या ठरावातील तरतूदी जशाच्या तशा पर्यावरण निर्बंध नियमाने बाधित झालेल्या भूतपूर्व जागतिक बँक प्रकल्पांतर्गत वितरण केलेल्या अनिवासी भूखंड जसे वाणिज्य, सुविधा, माध्यमिक शाळा इत्यादिंसाठी आरक्षित असलेल्या भूखंडांनाही लागू राहतील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांनी पुढील विषय आयत्यावेळी चर्चेस घेतले :---

१ पुणेयेथील स्वातंत्र्य सैनिक श्री.सोपानराव बंडोबा फडतरे यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या १० टक्के कोटयामध्ये अर्ज करुन त्यांना अद्याप घर मिळालेले नाही. त्यांनी कारगील येथील सैनिकांना ज्या धर्तीवर घरे देण्यात आली त्याच धर्तीवर त्यांना पुणे येथे लक्ष्मीनगरमध्ये घर देण्याची विनंती केली आहे, त्यांनी पुढे म्हंटले आहे कीं, आता स्वातंत्र्य सैनिक खूप कमी राहीले असून त्यांना मुंबई येथे येणे शक्य नाही तरी लक्ष्मीनगरमधील घर त्यांना मुळ किंमतीत मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. यावर सन्मा.सभापती श्री.भाई जगताप / कोंकण मंडळ यांनी प्रस्तावित केले कीं, याबाबतींत चर्चा करण्याचा प्रश्नच नाही अशा स्वातंत्र्य सैनिकांना आपण घर दिले पाहीजे. यास सर्वांनी सहमती दर्शविली व प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६०६३ दिनांक : ७.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, पुणे येथील स्वातंत्र्य सैनिक श्री.सोपानराव बंडोबा फडतरे यांना लक्ष्मीनगर मधील गाळा हा कारगीलच्या सैनिकांना ज्या धर्तीवर गाळे वितरीत करण्यात आले त्या धर्तीवर वितरीत करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ९/०८/२००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०४ व्या संलग्न बैठकीचे कार्यवृत्त.

सचिव / प्राधिकरण यांनी दिनांक ७.०८.२००४ रोजी संस्थगित करण्यांत आलेला ' म्हाडा कर्मचा-यांना सेवानिवृत्त वेतन योजना लागू करण्याबाबत ' हा विषय सभागृहासमोर सादर केला. त्यांनी पुढे विषद केले कीं, मागच्या बैठकीत ठरले होते कीं, व्याजदर जो ८.५ टक्के आहे त्याच्याऐवजी सध्या बाजारात ५.५ टक्के दराने साधारणपणे गुंतवणूक होते. त्या दराने जर व्याज मिळाले तर म्हाडाला किती रक्कम द्यावी लागेल. याबाबतची माहिती आपण विमागणक यांच्याकडून घेतली असून त्यामध्ये ५.५ टक्के दराने व्याज मिळत असेल तर यामध्ये पेन्शनचा जो खर्च येईल तो १७६.५० कोटी इतका येईल आणि आपला सध्या जो खर्च दाखविण्यात आला आहे तो ४३.६७ कोटी आहे आणि १२ टक्केप्रमाणे भविष्य निर्वाह निधीची भविष्यातली वर्गणी ही ४३.१० टक्के इतकी असेल यातील तफावत ही ८९.७३ कोटीची होते. तरी या आकडेवारीबाबत प्राधिकरणाला निर्णय घ्यायचा आहे.

यावर चर्चा होऊन प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६०६४ **दिनांक : ९.०८.२००४**

एकमताने निर्णय घेतला की, यापूर्वी शासनामध्ये, शासनाच्या कर्मचा-यांना निवृत्तीवेतन लागू होते. या धोरणास अनुसरुन म्हाडाने आपल्या कर्मचा-यांना निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत यापूर्वीच्या ठरावांद्वारे शासनास शिफारस केली होती.

आता शासनाने आपल्या धोरणात बदल करुन नवीन नियुक्त होणा-या कर्मचा-यांना निवृत्तीवेतनाऐवजी अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी योजनेचा स्विकार

केला आहे. याबदललेल्या परिस्थितीत म्हाडाच्या कर्मचा-यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत विचार करणे बदलत्या शासन धोरणाच्या अनुषंगाने संयुक्तिक होणार नाही. वरीलप्रमाणे प्राधिकरणाचा निर्णय शासनास कळविण्यास हे प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/२६</u>

विषयः- मौजे कोलेकल्याण येथिल स.क्र.१५८ हिस्सा क्र.२३ बाबतीत मेसर्स सेठी एक्सपोर्ट यांनी दिलेला तडजोडीचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६०६५ दिनांक : ९.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, मौजे कोलेकल्याण येथिल स.क्र.१५८ हिस्सा क्र.२३ बाबतीत मेसर्स सेठी एक्सपोर्ट यांच्याबरोबर ६०:४० या तत्वावर समझोता करण्यास, प्राधिकरणाने मुळ मालकांना दिलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मे.सेठी एक्सपोर्ट यांनी द्यावी या अटीस अधीन राहून प्राधिकरण मंजूरी देत आहे. व त्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयात तडजोडनामा करण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/२७</u>

विषयः- आकुर्ली-कांदिवली येथे जागतिक बँक प्रकल्पांतर्गत विकसित केलेल्या निवासी वसाहतीच्या अभिन्यासांत प्राथमिक शाळेसाठी व क्रिडांगण आणि दक्षिणेस असलेल्या मोकळया भूखंडाची आरक्षित असलेली जागा उज्ज्वल शिक्षण संस्थेस वितरीत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०६६ **दिनांक : ९.०८.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं, आकुर्ली-कांदिवली येथे जागतिक बँक प्रकल्पांतर्गत विकसित केलेल्या निवासी वसाहतीच्या अभिन्यासांत प्राथमिक शाळेसाठी क्रिडांगण आणि दक्षिणेस असलेल्या मोकळया भूखंडाची आरक्षित असलेली जागा उज्ज्वल शिक्षण संस्थेस वितरीत करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०४/२८</u>

विषयः- अभ्युदयनगर, काळाचौकी येथिल औद्योगिक कामगार योजनेअंतर्गत इमारत क्र.६ च्या अनुलग्न जागेवरील अनधिकृत स्टॉल - श्रीमती मैनाबाई शेटये यांचा शेटये स्टेशनरी मार्ट कायम करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०६७ **दिनांक : ९.०८.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं, अभ्युदयनगर, काळाचौकी येथिल औद्योगिक कामगार योजनेअंतर्गत इमारत क्र.६ च्या अनुलग्न जागेवरील श्रीमती मैनाबाई शेटये यांचा अनधिकृत स्टॉल सध्याच्या जागेवर कायम करणे उचित होणार नसल्याने इ.क्र.२९ च्या लगत स्टॉल स्थलांतरीत करुन कायम करावा किंवा सदर वसाहतीतील मंडळाच्या ताब्यातील अन्य जागेवर स्टॉल स्थलांतरीत करुन कायम करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

यानंतर मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांनी प्रस्तावित केले कीं, मुंबई मंडळातील जुन्या इमारतींच्याबाबतींत जर एखादी संस्था इमारतीच्या पुनर्विकासाकरिता पुढे येत असेल परन्तु सदर इमारतीतील एखादा भाडेकरु त्यास विरोध करीत असेल तर यावर काहींतरी अंकूश असणे आवश्यक आहे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात याबाबत कायदा आहे परन्तु मुंबई मंडळात हा कायदा नाही शिवाय हया सेस इमारती नाहीत. यावर मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी प्रस्तुत केले कीं, अशा इमारतीतील लोकांनी संस्थेचा ठराव करावा व त्यांनी सहकार न्यायालयात जावे कारण हया इमारतींचे अभिहस्तांतरण झालेले आहे, त्यामुळे म्हाडा याबाबत काही करु शकणार नाही.

यानंतर सन्मा.आमदार श्री. कुंडलीकराव नांगरे, सभापती / औरंगाबाद मंडळ यांनी देवसडी, चारठाणा, आडगांव, झरी व पुंगळा अशा पाच जमिनी कलम ५२ खाली घेण्यासंदर्भात ते गेली तीन-चार वर्षे प्रयत्न करीत असूनदेखिल सदर प्रस्ताव

त्यांनी या बैठकीत घेण्याच्या सूचना दिल्या असता सदर प्रस्ताव या संस्थगित बैठकीत न आल्यानें त्यांनी नाराजी व्यक्त केली व कारण विचारले.

त्यावेळी मा.अध्यक्ष / प्रा. यांचे संमतीने या संदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांनी माहिती दिली कीं, मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांच्याकडून योग्य त्या अभिप्राय व शिफारशीसह बाब टिप्पणी प्राप्त झाली नाही. त्यासाठी मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांच्या कार्यालयास दुरध्वनीवरुन विचारणा केली असता मुख्य अधिकारी यांच्या दिनांक ६.०८.२००४ च्या पत्राशिवाय कोणताही प्रस्ताव पाठविलेला नाही व मुख्य अधिकारी हे पुणे येथे प्रशिक्षणासाठी गेले असल्याचे समजले. त्यांनी पुढे असेही सांगितले कीं, मुख्याधिकारी यांच्या दिनांक ६.०८.२००४ च्या पत्रासह कलम ५२ च्या समितीने दिनांक ५.०८.२००४ रोजी घेतलेल्या बैठकीचे कार्यवृत्त जोडले आहे. या कार्यवृत्तावर आधारीत एक तुलनात्मक तक्ता तयार केलेले ज्यात सदर गावातील जमिनीकरिता रेडीरेकनरप्रमाणे दर, नगररचना विभागाप्रमाणे दर, कलम ५२ च्या समितीने यथासांग चर्चा करुन ठरविलेला दर आणि जमिन मालकाने मागणी केलेला दर असा तपशील दाखविण्यात आला.

यावर मा.अध्यक्ष / प्रा. व उपाध्यक्ष / प्रा. यांनी शासनाच्या दिनांक १६.०९.१९९८ च्या पत्रानुसार कलम ५२ अन्वये घ्यावयाच्या जमिनीचे दर व वाटाघाटी करण्याचे अधिकार समितीस आहेत प्राधिकरणास तसे अधिकार नाहीत हे निदर्शनास आणून दिले. यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांनी स्पष्ट केले कीं, जमिन मालकाने मागणी केलेल्या दराबाबत किंवा समितीने ठरविलेल्या दराबाबतची शिफारस उक्त समितीने केलेली नाही. किंबहुना समितीने निश्चित केलेला दर व जमिन मालकाने मागणी केलेला अंतिम दर प्राधिकरणाला कळविण्यात यावा व मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी एवढाच उल्लेख कार्यवृत्ताच्या शेवटच्या परिच्छेदात केलेला आहे,

त्यामुळे जर समितीस हा दर मान्य नसेल तर अशा प्रस्तावावर प्राधिकरण निर्णय घेऊ शकणार नाही कारण तो अधिकार प्राधिकरणाच्या अधिकार कक्षेत नाही.

यावर सन्मा.आमदार श्री.नंागरे, सभापती / औरंगाबाद मंडळ यांनी सदर जमिन ही शेतजमीन आहे तसेंच जिल्हाधिकारी तसेंच समितीने याबाबत निर्णय घेण्यास बराच वेळ घालविला शिवाय आम्ही जी किंमत सांगतो आहोत की, ३/- किंवा ४/- रु. प्रति चौ.फुट ही लाभार्थींना परवडत आहे. यावर सन्मा.सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी सूचीत केले कीं, जर लाभार्थींना ही किंमत परवडते आहे तर लाभार्थींनी एकत्र येऊन सदर जमिन खरेदी करावी त्यावर म्हाडा योजना राबवेल. यास सन्मा.आमदार श्री.नागरे / सभापती, औरंगाबाद मंडळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

यावर चर्चा होत असताना सन्मा.आमदार श्री.नागरे / सभापती, औरंगाबाद मंडळ यांनी ग्रामीण भागातील योजनांसाठी जमिनी घेण्याची आग्रहाची भूमिका घेतली व प्राधिकरणासमोर बाब टिप्पणी जरी नसली तरी समितीने ठरविलेल्या दरास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यासाठी विनंती केली असता यावर चर्चा होऊन प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६०६८ **दिनांक : ९.०८.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं, देवसडी, झरी, पुंगळा, चारठाणा व आडगांव येथील जमिनीच्या कलम ५२ अंतर्गत खरेदीबाबत अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील शासन नियुक्त समिती जे दर ठरवील त्या दराने खरेदी करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

त्यानंतर मा.अध्यक्ष / प्रा. यांनी काळाचौकी अभ्युदयनगर येथील औद्योगिक इमारतीत जे शासकीय कर्मचारी राहतात त्यांना इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीवरील व्याजाची रक्कम माफ करण्याबाबत त्यांनी विनंती केली असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणले. याबाबत उपमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी माहिती दिली कीं, सदर एकूण २२० रहिवाशी होते त्यातील १८० रहिवाशांनी संपूर्ण रक्कम भरलेली आहे परन्तु ६६ रहिवाशी आहेत ज्यांनी पैसे भरलेले नाहीत आणि या ६६ लोकांना सदर संपूर्ण व्याज माफ करण्याची मागणी केलेली आहे. त्यांनी पुढे असेहि सांगितले कीं, मध्यंतरी प्राधिकरणाने अशा संरचनात्मक दुरुस्त्यांबाबत जे अशा दुरुस्तींची रक्कम एकरकमी भरतील त्यांना व्याजामध्ये ५० टक्के सवलत देण्याबाबत निर्णय घेतला होता सदर निर्णयास २००४ पर्यंत वाढ देण्यात आली आहे. परन्तु या ६६ रहिवाशांची संपूर्ण १०० टक्के व्याज माफ करण्याची विनंती आहे. यावर मा.अध्यक्ष / प्रा. यांनी सदरबाबत उपमुख्य मंत्री तसेंच मंत्री यांचेकडे बैठका झालेल्या असल्याचे सांगितले. यावर बरीच चर्चा होऊन मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी सूचित केले कीं, सदर इमारतींची मूळ रक्कम घेऊन या इमारतींचे अभिहस्तांतरण करुन घेण्यात यावे व या ६६ रहिवाशांच्या व्याजाबाबत सध्या कोणतीहि कारवाई करण्यात येऊ नयें.

यानंतर मा.अध्यक्ष / प्रा. यांनी मुंबई मंडळात जी १६ तारखेला लॉटरी काढण्यात येणार आहे त्यात जे काहीं अल्प, मध्यम, उच्च उत्पन्न गटातील गाळे शिल्लक राहतील त्या गाळयांच्या विक्रीबाबतचे अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात यावेत असे

सूचीत केले ते पुढे म्हणाले कीं, कारण सदर गाळयांकरिता पाच-सहा जाहिराती देऊन झालेल्या आहेत. यावर चर्चा होऊन प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६०६९ दिनांक : ९.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणांतर्गत मंडळाने दोन वेळा जाहिराती देऊन सदर जाहिरातीतील जे अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाचे गाळे शिल्लक राहतील त्या गाळयांच्या विक्रीबाबतचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २१/०८/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०५ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

<u>बाब क्रमांकः२०५/२</u>

विषयः- नागपूर येथील एम्प्रेस मिल नं. ५ च्या जमिनीला लागून अतिरिक्त २२० चौ.मी.जमीन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाकडून घेण्याबाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६०७० दिनांक : २१.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, इम्प्रेस मिल नागपूर येथे मंडळाने पूर्वी घेतलेल्या (७.७ हेक्टर सुमारे) जमिनीला लागून अतिरिक्त २२० चौ.मी. (एम्प्रेस मिल) ची

जमीन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाकडून रु. १४.२५ लाख किंमतीने घेण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी. '

<u>बाब क्रमांकः२०५/३</u>

विषयः- सोशल वेल्फेअर ॲक्टिव्हिटिज व शैक्षणिक कामाकरिता भूखंड मिळण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०७१ दिनांक : २१.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, ओशिवरा येथील माध्यमिक शाळा व प्राथमिक शाळा याकरीता विकास आराखडयातील आरक्षित असलेल्या भूखंडालगतचा करमणुकीच्या मैदानाकरिता आरक्षित असलेला भूखंड १/३:२/३ या प्रमाणात विभाजन करुन दोन संस्थांमध्ये वितरीत करण्यास काहीं अटी व शर्तींवर मान्यता देण्यात येत आहे.

१. विकास आराखडयातील आरक्षण असल्यामुळे मरकाझूल मारीफ एज्युकेशन यांनी विभाजनाची परवानगी बृहन्मुंबई महानगर पालिका व विशेष नियोजन प्राधिकरण एम.एम.आर.डी.ए. यांचेकडून स्वखर्चाने व स्वजबाबदारीवर प्राप्त करुन घ्यावी.

२. मरकाझूल मारीफ एज्युकेशन यांना १/३ क्षेत्राचे वितरण करण्यात येत असून त्यावर असलेले बांधकाम नियमित करण्यात येत आहे. परन्तु भूखंडावरील आरक्षण लक्षांत घेऊन विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींनुसार भूखंडाच्या एकूण क्षेत्रफळाच्या १/३ प्रमाणे येणा-या क्षेत्रापैकी १० टक्के क्षेत्रावर १५ टक्के इतके बांधकाम फक्त करमणुकीच्या कारणाकरिता वापरता येईल व म.न.पा. यांनी मंजूर केलेल्या नकाशानुसार नियमित केलेले बांधकाम ठेवावे लागेल. विभाजनाचा व बांधकामाचा

प्रस्ताव वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ व मुख्य वास्तुशास्त्रज्ञ / प्रा. यांनी तपासून तद्नंतर नियमितीकरणाची कार्यवाही करण्यांत यावी.

३. वितरीत करण्यात येणा-या क्षेत्राचे विक्रोळी येथील गुरुद्वाराप्रमाणे व घाटकोपर येथिल गणेश मंदिराच्या धर्तीवर या भूखंडावर असलेले बांधकाम नियमित करण्यात यावे.

४. महराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट यांना सुशोभिकरण करण्यासाठी दिलेल्या भूखंडाचे क्षेत्र कमी करुन त्याप्रमाणे अनामत रक्कम परत करावी.

<u>बाब क्रमांकः२०५/४</u>

विषयः- वांद्रे रेक्लमेशन, जन.अरुण कुमार वैद्य मार्ग, वांद्रे - पश्चिम येथील मुंबई मंडळाच्या जमिनीवर असलेले बझम - ई - मोहम्मदी एज्युकेशनल आणि कल्चरल सोसायटीचे बांधकाम नियमित करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०७२ दिनांक : २१.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं बझम - ई - मोहम्मदी एज्युकेशनल आणि कल्चरल सोसायटी, वांद्रे रेक्लमेशन, जन.अरुण कुमार वैद्य मार्ग, वांद्रे - पश्चिम येथील मुंबई मंडळाच्या जमिनीवर केलेले बांधकाम व त्याखालील जमीन नियमित व वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. परन्तु, वितरणापूर्वी खालील कार्यवाही पूर्ण करण्यांत यावी.

१. संस्थेने सध्या अस्तित्वात असलैल्या बांधकामाचा नकाशा, योजना तपशीलासहीत शासनाची मान्यता प्राप्त वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन मुंबई मंडळास सादर करावा.

२. संस्थेने सादर केलेला नकाशा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाकडून तपासून, क्षेत्र निश्चित करावे.

३. भूखंड जरी निवासी आरक्षणाखाली असला तरी बांधकामाचा वापर शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याकरीता करतील या अटीवर प्राधिकरणाच्या किंमतीविषयक धोरणानुसार शाळेकरिता असलेले अधिमुल्य आकारावे.

४. संक्रमण शिबीराचा पुनर्विकास प्रस्ताव कार्यान्वित झाल्यानंतर त्यामध्ये या संस्थेस तेवढयाच क्षेत्रफळाकरिता समाविष्ट करण्यांत यावे. मंडळाने बांधकाम केलेल्या इमारतीत समाविष्ट करुन घेतल्यास बांधकाम खर्च संस्थेस भरणा करावा लागेल. अथवा इतरत्र भूखंड दिल्यास स्वखर्चाने बांधकाम करावे लागेल.

५. अस्तित्वात असलेले बांधकाम दुरुस्त करणे अथवा पुनर्विकास करणे याकरिता संस्थेस संबंधित स्वायत्त संस्थांची परवानगी स्वखर्चाने / स्वजबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यांत यावी.

<u>बाब क्रमांकः२०५/५</u>

विषयः- झोपडपट्टीवासियांना दिलेल्या पर्यायी जागेच्या किंमतीबाबत.
(अभ्युदयनगर, काळाचौकी).

ठराव क्रमांक : ६०७३ दिनांक : २१.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, अभ्युदयनगर काळाचौकी येथिल इमारत क्र.२८ च्या पाठीमागील २५ संरक्षणपात्र झोपडपट्टीवासियांना रु. १,५०,०००/- इतक्या रकमेस सदनिका वितरीत करण्यात आल्या. त्या रकमेपैकी झोपडपट्टीवासियांनी (४५००० ते ५०००० रुपये) काहीं रकमेचा भरणा मंडळाकडे केलेला आहे. आता उर्वरित रक्कम १० समान मासिक हप्त्यामध्ये भरण्यास व आतापर्यंतचे व्याज माफ करण्यास प्राधिकरण मान्यतादेण्यांत येत आहे.

कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०५/६</u>

विषयः- मुंबई मंडळांतर्गत येणा-या नविन योजनांना

' रुफ रेनवॉटर हार्वेस्टिंग ' लागू करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०७४ दिनांक : २१.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं, स्थानिक प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे म्हाडाच्या वसाहतीमध्ये जिथे ' रुफ रेनवॉटर हार्वेस्टिंग ' आवश्यक असेल व जेथे आर्थिकदृष्टया शक्य असेल तिथे राबविण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

<u>बाब क्रमांकः२०५/७</u>

विषयः- मौजे ओशिवरा येथील माध्यमिक शाळेकरिता आरक्षित असलेला भूखंड रायगड सैनिक विद्यालय व राज पुरोहित न्यास यांना विभागून केलेल्या वितरणाबाबत.

ठराव क्रमांक : ६०७५ दिनांक : २१.०८.२००४

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. मौजे ओशिवरा येथील न.भू.क्र. १००,११०, ११२, ११३, ११९, १२०, १२७, १२८, १२९ इत्यादि माध्यमिक शाळेकरिता आरक्षित असलेला भूखंड पूर्वी रायगड सैनिक विद्यालय व राज पुरोहित न्यास यांना ६०:४० प्रमाणात वितरीत केला होता. या वितरणापैकी राज पुरोहित न्यास संस्थेस वेळोवेळी लेखी सूचना देऊनही संस्थेने शाळेची पात्रता सिध्द करण्याची कागदपत्रे सादर न केल्यामुळे सदर संस्थेस केलेले वितरण रद्द करण्यात यावे व त्याबाबत शासनास माहिती करुन देण्यात यावी. सदर वितरण रद्द करुन प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार या भूखंडाचे वितरण रायगड सैनिक विद्यालयास करण्यास परवानगी देण्यांत येत आहे. ही कार्यवाही पूर्ण करुन शासनास माहिती देण्यांत यावी.

२. सदर वरीलप्रमाणे रद्द झालेल्या भूखंडाचे वितरण रायगड सैनिक विद्यालय या संस्थेस त्यांच्या मागणीनुसार करण्यात यावे. या भूखंडाची किंमत त्यांना वितरीत केलेल्या लगतच्या भूखंडानुसार आकारण्यात यावी व या ५० टक्के किंमतीने भूखंड वितरीत करण्यास शासनाची मंजूरी प्रापत करुन घ्यावी.

३. या परिसरात हॉस्पिटल प्लॉटच्या पश्चिमेस सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था ही झोपडपट्टी अस्तित्वात आहे त्याच्या पुनर्विकासाची येाजना म्हाडा स्वतः करणार आहे असे विधान मा.उच्च न्यायालयात करण्यात आले होते. शाळेच्या प्लॉटवरील व प्रस्तावित डीपी रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याचे प्रयत्न करण्यात यावे व त्यासाठी एकूणच परिसरातील गुरुनानक सहकारी गृहनिर्माण संस्था, सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था इ. सह व या परिसरात असलेल्या मोकळया भूखंडाचा समावेश करुन योजना राबविण्यावर विचार करावा व आवश्यकता वाटल्यास ही येाजना विकासक किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी म्हाडासेाबत जॉईंट व्हेंचर पध्दतीने राबवावी यासाठी मा.उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी.

४. छोटया आकारमानाचे मोकळे भूखंड या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी वार्षिक भुईभाडे रु. १००१/- प्रति ४०००/- चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसन येाजनेकरिता असलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार) प्रमाणे देण्यांत यावे.

ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता या ठरावानुसार कार्यवाही करण्यास प्रशासनास मान्यता देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांकः२०५/८</u>

विषयः- मुंबई मंडळाच्या मोकळया जागांवर राखण व पहा-याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांमधून योग्य अभिकरणाची निविदा स्विकृत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०७६ **दिनांक : २१.०८.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळाच्या मोकळया जागांवर राखण व पहा-याच्या कामासाठी निम्नतम दराच्या निविदाकाराच्या दरावर (सध्या चतुर्थ निम्नतम) दरावर इतर पात्र अभिकरणाशी मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी वाटाघाटी कराव्यात व वाटाघाटीनुसार योग्य तो निर्णय घेण्याचे सर्वाधिकार प्राधिकरण मा.उपाध्यक्ष व मु.का.अ. / प्रा. यांना सर्वानुमते प्रदान करीत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १०.०९.२००४ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त.

विषय : माजी उपाध्यक्ष / प्रा. श्री.ए.रामकृष्णन यांनी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना दिनांक १.०९.२००४ रोजी लिहिलेल्या पत्रात प्राधिकरणाच्या निर्णयाबाबत व कार्यप्रणालीवर उपस्थित केलेले मद्दे.

ठराव क्रमांक : ६०७७ **दिनांक : १०.०९.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

माजी उपाध्यक्ष / प्रा. श्री.ए.रामकृष्णन यांनी मा.मुख्य सचिव / महाराष्ट्र शासन यांना दिनांक १.०९.२००४ रोजीच्या पत्रात कायद्याने स्थापन झालेल्या प्राधिकरण / मंडळावर तसेच विधी मंडळ सदस्यांवर केलेले गंभीर स्वरुपाचे आरोप लोकशाहीच्या मुल्यांशी / तत्वांशी विसंगत व खोटे असल्यामुळे श्री.रामकृष्णन माजी उपाध्यक्ष / प्रा. यांचे विरुध्द मुंबई मंडळामार्फत न्यायालयात दावा दाखल करण्यास सह.मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या दाव्यासाठी होणारा खर्च प्राधिकरणाने करावा.

तसेच विधी मंडळामध्ये आमदारांना कायद्याने जे संरक्षण आहे त्या अंतर्गत विधी मंडळ अध्यक्षांना याप्रकरणी सविस्तर अहवाल पाठवून श्री. रामकृष्णन माजी उपाध्यक्ष / प्रा. यांची वरिष्ठ स्थरावून चौकशी करण्याची मागणी करण्यांत यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१०/२००४ रोजी सकाळी ११.३० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या २०६ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

<u>बाब क्रमांकः२०६/३</u>

विषयः- आयकर खात्यास १० ई आयकरासंबंधी प्राधिकरणाने द्यावयाचे प्रमाणपत्र.

ठराव क्रमांक : ६०७८ **दिनांक : ३०.१०.०४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

" Resolved that 100 % (Hundred Percent) Surplus of MHADA arising for the financial year 2003-2004 shall be applied / utilized on the objects of MHADA during the next five consecutive financial years beginning from 2004-2005 and particularly on schemes as mentioned in the Budget for the financial year 2004-2005."

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०६/४</u>

विषयः- मानवी हक्क आयोगाकडील प्रकरण क्र. २१६/२००१/२१२८, दिनांक २२.१२.२००३ च्या आदेशानुसार मिळकत व्यवस्थापन विषयक असलेल्या विनियमातील तरतूद क्रमांक २२ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६०७९ **दिनांक : ३०.१०.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (मिळकत व्यवस्थापन) विनियम १९८१ मधील विनियम २२ मध्ये समाविष्ठ करावयाच्या परिशिष्ठ - २ नुसारच्या सुधारणेस प्राधिकरण अनुमती देत असून सदर प्रस्ताव शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे मंजूरीसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०६/५</u>

विषयः- भटक्या जमातीतील गोंधळी समाज व प्रवर्गासाठी गृहनिर्माण योजना.

ठराव क्रमांक : ६०८० **दिनांक : ३०.१०.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

भटक्या जमातीतील गोंधळी समाज या प्रवर्गासाठी गृहनिर्माण योजना विनियमातील क्र.१३ (२) अन्वये घेण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. मात्र या योजनेसाठी शासनाच्या संबंधित विभागाने अनुज्ञेय असलेले संपूर्ण अनुदान व ज्या तालुक्यामध्ये तथा जिल्हयामध्ये योजना घ्यावयाच्या आहेत त्यासाठी शासकीय जमीन प्राधिकरणास उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी सामाईक सुविधा स्थानिक संस्था व इतर संबंधित निमशासकीय संस्थांनी त्यांच्या खर्चाने उपलब्ध करुन द्याव्यात. योजना घेण्यापूर्वी या विशिष्ट प्रवर्गातील लोकांची ठोस मागणी असणे आवश्यक राहील. या सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतरच योजना अंमलात आणावी या धर्तीवर मंजूरी देण्यात येत असून सदर प्रस्ताव शासनाच्या मंजूरीकरिता पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०६/७</u>

विषयः- डवलामेटी, नागपूर येथे अल्प उत्पन्न गटांतर्गत ३२ गोळे व अल्प उत्पन्न गट-२ अंतर्गत ७५ गाळे बांधण्याच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीबाबत.

ठराव क्रमांक : ६०८१ **दिनांक : ३०.१०.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

म्हाडाचे हीत लक्षात घेऊन डवलामेटी, नागपूर येथील अल्प उत्पन्न गट-१ अंतर्गत ३२ गाळे व अल्प उत्पन्न गट-२ अंतर्गत ७५ गाळे बांधण्याच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.सतीश कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेबाबत पुनर्विचार करण्याची संधी नागपूर मंडळास देण्यात येत असून जर यावर दहा दिवसात एकमत होऊन मंडळाचा निर्णय होत नसल्यास सदर बाब पुन्हा प्राधिकरणासमोर मंजूरीसाठी सादर करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०६/१३</u>

विषयः- पंतनगर, घाटकोपर येथील तळमजली कार्यालयीन इमारत क्र.११ जवळील अतिरिक्त जमिन श्री.एल.आर.खेमाणी यांना वितरीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक :६०८२ **दिनांक : ३०.१०.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

पंतनगर, घाटकोपर येथील तळमजली कार्यालयीन इमारत क्र.११ जवळील बांधकामयोग्य १४ चौ.मि. व बांधकाम अयोग्य २३.७५ चौ.मि.जमिन श्री.एल.आर.खेमाणी यांना खालील अटी शर्तीवर मुंबई मंडळाने ठराव क्र. २३८५ अन्वये शिफारस केल्यानुसार वितरीत करण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे :---

१. प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५०९८ व ६०४१ मधील तरतूदी प्रमाणे अतिरिक्त चटईक्षेत्राकरिता आकारावयाचे अधिमुल्य वसुल करावे.

वरील अटींच्या अधिन राहून उपाध्यक्ष / प्रा. यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०६/१४</u>

विषयः- इमारत क्र.१४३ पंतनगर, घाटकोपरच्या शेजारी असलेले गॅरेजसाठी पर्यायी जागा अथवा त्याच जागेवर गॅरेज पुन्हा देवून नियमित करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०८३ **दिनांक : ३०.१०.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने ठराव क्र. २४३७ दिनांक १६.०७.२००४ अन्वये केलेल्या शिफारशीचा विचार करुन पंतनगर घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्र. १४३ शेजारी ११ x १८ = १९८ चौ.फुट क्षेत्रफळाची जागा प्राधिकरणाच्या ठरावक्र. ५७९४, दिनांक ३०.०५.२००२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रेडीरेकनरच्या आजच्या बाजार भावाच्या ५० टक्के रक्कम

अधिमुल्य आकारुन बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या नकाशानुसार प्रस्तावित जागा भाडेपट्टयाने प्रचलित अटी व शर्तीवर श्री.विनायक कदम यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

<u>बाब क्रमांकः२०६/१५</u>

विषयः- मौजे कोलेकल्याण, ता.अंधेरी येथील सुमारे १० x १५ फुट आकारमानाचा भूखंड धंद्याकरिता मिळण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०८४ **दिनांक : ३०.१०.२००४**

एकमताने निर्णय घेतला कीं,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने ठराव क्र. २४३५, दिनांक ७.०६.२००४ अन्वयें घेतलेल्या निर्णयानुसार मौजे कोले कल्याण, ता.अंधेरी स.क्र. २९८/८ येथील १० x १५ चौ.फुट आकारमानाची जागा इम्रान अे. रौफ यांना खालील अटीवर तात्पूरत्या स्वरुपात लिव्ह ॲन्ड लायसन्स पध्दतीने फक्त लाकडी / लोखंडी खोका ठेवण्यापूरती १० x १५ चौ.फुट जागा देण्यांत यावी. यासाठी आवश्यक ती महानगर पालिकेची परवानगी अर्जदाराने स्वतः प्राप्त करावी.

चिंचोळी पट्टी असल्यामुळे नगर भूमापन क्रमांकाच्या हद्दी अर्जदाराने स्वखर्चाने स्वजबाबदारीवर प्राप्त करुन घ्याव्यात. याकरिता आवश्यकता भासल्यास मुंबई मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००४-२००५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००५-२००६ चे अर्थसंकल्पीय अंदाज तसेच प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांचा कर्मचारी आकृती बंध या विषयावरील बाब टिपण्ण्यांना सर्क्युलेशन पध्दतीने दिनांक २९.०३.२००५ रोजी समक्ष मंजूरी देण्यांत आली त्या बाबतचे कार्यवृत्त :

<u>बाब क्रमांक : १</u>

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००४-२००५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००५-२००६ चे अर्थसंकल्पीय अंदाज.

ठराव क्रमांक : ६०८५ **दिनांक : २९.०३.२००५**

एकमताने निर्णय घेतला कीं,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००४-२००५ चे सुधारीत अंदाज पत्रक व सन २००५-२००६ चे अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकास मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २

विषय : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी आकृती बंध.
सन २००५ -२००६.

ठराव क्रमांक : ६०८६ **दिनांक : २९.०३.२००५**

एकमताने निर्णय घेतला कीं,

प्राधिकरण व प्रादेशिक मंडळाच्या कार्यालयासाठी सन २००५-२००६ या वर्षाकरीत आवश्यक असलेला कर्मचारीवृंद व मागील वर्षाच्या आकृतीबंधामध्ये झालेल्या बदलांची नोंद घेऊन मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

२/- तसेच शासनाच्या दिनांक १६.११.२००० रोजीच्या पत्रातील आदेशानुसार प्राधिकरण व प्रादेशिक मंडळाच्या आस्थापनेवर सन २००४-२००५ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधामध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील एकूण २८०७ मंजूर पदांपैकी राज्याच्या साधन संपत्तीत वाढ आणि प्रशासकीय खर्चात ५ टक्के कपात करण्याच्या दृष्टीने प्राधिकरण व प्रादेशिक मंडळाच्या मंजूर आकृतीबंधात दिर्घकाळ रिक्त राहीलेली वर्ग-४ मधील विविध संवर्गातील ७८ पदे रद्द करण्यास मान्यता देण्यात येते.

३/- तसेच नाशिक व अमरावती मंडळाचे सन २००३-२००४ या वित्तीय वर्षातील भांडवली बांधकाम खर्चाच्या तुलनेत झालेला आस्थापना खर्च व टक्केवारी विचारात घेता अमरावती मंडळ व नाशिक मंडळ यापुढे कार्यरत ठेवणे प्रशासकीय तसेच वित्तीय खर्चाच्या दृष्टीने योग्य नसल्याचे शासकीय सदस्यांना दिसून आल्यामुळे ही दोन्ही मंडळे बंद करण्यास मान्यता देण्यांत येते. ही दोन्ही मंडळे बंद करुन अनुक्रमे अमरावती मंडळ नागपूर मंडळात व नाशिक मंडळ औरंगाबाद मंडळात पूर्वीप्रमाणे विलीन करण्यात यावीत व येथील विभागीय कार्यालय कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाखाली ठेवण्यास मान्यता देण्यांत येते.

४/- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात अंशकालीन रोजंदारी पध्दतीवर ४२५ कर्मचारी कार्यरत आहेत. या अंशकालीन रोजंदारी कर्मचा-यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात याव्यात. यापुढे या अंशकालीन रोजंदारी कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यात येऊ नये. तसेच या अंशकालीन रोजंदारी कर्मचा-यांच्या सेवा समाप्त करुन ही कामे योग्य ती पध्दती अनुसरुन खाजगी एजन्सी मार्फत करुन घेण्यात यावीत.

वरीलप्रमाणे प्रस्ताव शासनाच्या माहितीसाठी व मान्यतेस पाठविण्यात यावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २१.०६.२००५ रोजी सकाळी ११.०० वाजतां आयोजित करण्यांत आलेल्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : ३

विषय : राज्य शासनाला रु. ५००/- कोटी देण्यासंबंधी सर्क्युलेशन पध्दतीने मंजूर करण्यात आलेला ठराव क्र. ६०८७, दिनांक ४.०५.२००५ स्थायी करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०८७ **दिनांक : २१.०६.२००५**

एकमताने निर्णय घेतला कीं, शासनाला प्राधिकरणाच्या निधीतून रुपये ३०० कोटी कर्ज स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासनाला देण्यात येणा-या कर्जावर ७.०० टक्के व्याजाची आकारणी करावी.

शासनाला रुपये ३०० कोटी कर्ज एकरक्कमी उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरणाने राष्ट्रीयकृत बँकेतून तात्पुरत्या स्वरुपात कर्ज घेण्यास मान्यता देण्यांत येत आहे. हे कर्ज प्राधिकरणाने ठेव स्वरुपात ज्या बँकांकडे ठेव ठेवली आहे त्या पावत्या तारण म्हणून कर्ज देणा-या बँकेकडे ठेवाव्या.

या व्यवहारात म्हाडाचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यांत यावी. या संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

<u>बाब क्रमांक : ४</u>

विषय : राज्यात ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील (BPL) व दारिद्रय रेषेवरील (APL) आर्थिकदृष्टया दुर्बल / बेघर / अल्प भू-धारक कुटुंबांसाठी घरकुल योजना सर्क्युलेशन पध्दतीने मंजूरी देण्यांत आलेल्या ठराव क्र. ६०८८, दिनांक १६.०५.२००५ स्थायी करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०८८ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. दारिद्रय रेषेखालील (BPL) व्यक्तीकरिता गृहनिर्माण योजना :

उपरोक्त येाजने अंतर्गत सुमारे रु. ४०,०००/- किंमती पर्यंतची घरे पात्र लाभार्थ्यांना मोफत द्यावयाची असून, रु. २०,०००/- इतके अनुदान शासनाकडून देण्यात येईल. पहिल्या टप्प्यात ५०००० घरकुलांकरिता प्रकल्प किंमत रु. २०० कोटी आहे. या रकमेपैकी ५० टक्के निधी (रु. १०० कोटी) राज्य शासनाच्या गृहनिर्माण

विभागाच्या अंदाजपत्रकात अनुदानाच्या स्वरुपात तरतूद करुन उपलब्ध करुन द्यावे. उर्वरित ५० टक्के निधी शासनाच्या इतर विभागामध्ये, जसे की समाजकल्याण विभाग, प्रकल्पग्रस्त इ. करिता असलेल्या तरतुदीमधून उपलब्ध करुन देण्यात यावा. बांधकामासाठी पुरेशी रक्कम उपलब्ध होऊ न शकल्यास, NGO मार्फत लाभार्थ्यांचा आर्थिक सहभाग घेण्यात यावा. तसेच आवश्यक असल्यास स्थानिक बँकाकडून घराच्या तारणावर सुलभ कर्ज घ्यावे. विविध प्रवर्गासाठी असलेल्या अनुदानाचा वापर या योजनेमध्ये व्हावा म्हणून तो निधी / अनुदान गृहनिर्माण विभागाकडे वळता / पारीत करण्यात यावा.

सुरवातीला ही योजना कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने म्हाडाकडून तुर्त ५० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात येईल व त्याची प्रतीपूर्ती गृहनिर्माण विभागाने म्हाडास करावी. म्हाडाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीची परतफेड शासनाकडून १० टक्के व्याजासह म्हाडास केली जावी. सदरहू निधी म्हाडामार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या मागणीनुसार वितरीत होईल.

२. **तसेंच दारिद्रय रेषेवेरील (APL) आर्थिकदृष्टया दुर्बल / बेघर / अल्प भूधारकांसाठी घरकुल योजना :**

उपरोक्त योजने अंतर्गत प्रति घरकुल रु. ५०,०००/- किंमती पर्यंतची घरे पात्र लाभार्थ्यांसाठी बांधावयाची आहेत. पात्र लाभार्थ्याने त्याचे स्वतःचे योगदान म्हणून रु. ५०००/- ची रक्कम किंवा बांधकाम साहित्य वा मजूरीच्या स्वरुपात देणे बंधनकारक राहील.

उर्वरित रु. ४५,०००/- प्रति घरकुल ही रक्कम म्हाडाने सदरहू पात्र लाभार्थ्यांना बिनव्याजी कर्ज म्हणून २० वर्षाच्या परतफेडीच्या मुदतीवर द्यावयाची आहे. याकरिता म्हाडाने ५०००० घरकुलांसाठी रु. २२५ कोटीचा निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. शासनाने १० टक्के व्याजाची तरतूद अंदाजपत्रकात करावयाची आहे व ती दरवर्षी म्हाडास परतफेड करावयाची आहे.

देण्यात येणा-या कर्जाची वसूली संबंधित जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेने करावी व सदरहू निधी म्हाडाकडे जमा करावा. म्हाडाने उपलब्ध केलेल्या निधीची परतफेड म्हाडास काटेकोरपणे होत आहे याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. बांधण्यात येणारे नवीन घरकुल, कर्जाचे तारण म्हणून ठेवण्यास हरकत नाही.

याबाबत शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त होईपर्यंत पुढील कार्यवाही करण्यांत येऊ नये.

प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार शासनास कळविण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : ६</u>

विषय : श्री.महादेव दळवी, सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०८९ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेण्यांत आला कीं, श्री.दळवी यांची नेमणूक दिनांक २.०५.१९९८० पासून करण्यात आली असल्याने आणि शासनाच्या सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण विभागाच्या दिनांक २४.०१.१९८० च्या क्र. एपीडी/ १०७८/८७/डेक्स-३५ च्या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे रु. ६८०-४०-१०००-५०-१२५० ज्या अधिका-यांची नेमणूक शासनाच्या दिनांक २४.०१.१९८० चा निर्णय निर्गमित होण्या अगोदर झाल्या आहे त्यांच्यासाठी रु. ६८०-१२५० व दिनांक २४.०१.१९८० नंतर पुढे होणा-या नेमणूकीसाठी असल्याने शासन निर्णयानुसार श्री.दळवी यांना रु. ६००-११५० हिच वेतन श्रेणी देण्यांत आली असल्याने व ती शासन निर्णयानुसार योग्य असल्याने त्यात कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही. याप्रमाणे मानवी हक्क आयोगास कळविण्यांत यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : ७</u>

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००३-२००४ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०९० दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, प्रशासनाने सादर केलेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००३-२००४ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा एकमताने स्वीकृत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : ८</u>

विषय : स.क्र.१६४ जळकोट रोड उदगीर येथील १४४ गाळे, अत्यल्प उ.गट योजनेतील २० गाळे (डॉ.बाबसाहेब आंबेडकर मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह व अनुसूचित जाती, नवबौध्द निवासी शाळेकरिता) उल्वल ग्रामीण महिला मंडळ, घोणसी, ता.उदगीर, जिल्हा लातूर या संस्थेस वितरीत करण्याबाबत व गाळयाची किंमत १८ महिन्यात (९ हप्त्यामध्ये) विनाव्याजाने देण्या-बाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६०९१ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, जळकोट रोड उदगीर येथे औरंगाबाद मंडळांतर्गत १४४ गाळे अत्यल्प उ. गटांतर्गत शिल्लक असलेल्या ६३ गाळयांपैकी २० गाळे (रु. ४८,००० प्रती गाळा याप्रमाणे) उज्वल ग्रामिण महिला मंडळ, या संस्थेस २५ टक्के (रु. २,४०,०००/-) आगाऊ रक्कम भरुन उर्वरित ७५ टक्के (रु. ७,२०,०००/-) रक्कम ही बिनाव्याजी १८ महिन्याच्या कालावधीत दर दोन महिन्याने एक हप्ता रु. ८०,०००/- याप्रमाणे ९ हप्त्यात स्विकारण्यास व सदर गाळयांचा वापर डॉ.बाबसाहेब आंबेडकर मागास वर्गीय विद्यार्थी वसतीगृह व निवासी शाळा (अनुसूचित जाती, नवबौध निवासी शाळेकरिता) वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : ९</u>

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे सरळसेवा भरतीने करण्याचे काम आय.बी.पी.एस. या संस्थेस देण्याबाबत..

ठराव क्रमांक : ६०९२ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, दिनांक १५.१२.२००४ रोजीच्या दैनिक लोकसत्ता व इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रात प्राधिकरणाने दिलेल्या जाहिरातीनुसार विविध पदांसाठी प्राप्त झालेल्या व त्या त्या पदांसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांच्या स्पर्धात्मक लेखी परिक्षेचे आयोजन व गुणवत्तेनुसार उमेदवारांची संख्या नियंत्रित करुन संवर्गनिहाय पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तयार करुन घेण्याचे काम आय.बी.पी.एस.या संस्थेस देण्यास मान्यता देण्यात येते.

तसेंच यापुढे प्राधिकरणाकडून जाहिरात दिल्यानंतर अर्जदारांचे अर्ज स्विकारण्यापासून ते स्पर्धात्मक परिक्षेचा निकाल सुपुर्द करेपर्यंतची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची कामे आय.बी.पी.एस.या संस्थेस देण्यास व त्यासाठी होणा-या प्रस्तावित खर्चास मान्यता देण्यात येते.

जाहिरातीचा खर्च व आय.बी.पी.एस.या संस्थेकडून या कामासाठी आकारण्यात येणारा खर्चाकरिता सर्वसाधारण गटातील उमेदवारासाठी रु. २००/- प्रति पदासाठी व मागासवर्ग गटातील उमेदवारांसाठी रु. १००/- प्रती पदासाठी प्रशासकीय आकार घेण्यात यावा. या आकारातून प्राप्त होणारी रक्कम वगळता उर्वरित खर्च प्राधिकरणाने करावा. व यापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्या खर्चास मान्यता देण्याचे अधिकारी उपाध्यक्ष व मु.का.अ. / प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यांत येते.

वरील प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता प्रदान केली व यासाठी होणा-या खर्चास मान्यता प्रदान करण्याचे अधिकारी उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान केले.तसेंच यापुढे म्हाडामध्ये सरळसेवेने भरण्यांत येणारी पदेही सदर संस्थेमार्फत व सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे १२.५ पेक्षा कमी मार्कानुसार मुलाखती घेवून भरण्यास मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : १०</u>

विषय : सावेडी अहमदनगर येथील सर्व्हे नं.१०९, १११, ११२ या क्रमांकाच्या जमिनीचे मालक सय्यद हाजी ताकीय ट्रस्टला भू संपादन कायदा १८९४ मधील कलम २८ (अ) अन्वये <u>अदा करावयाच्या वाढीव मोबदल्याबाबातचे प्रकरण..</u>

ठराव क्रमांक : ६०९३ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. अधिसूचनेतील जमिनींबाबत न्यायालयात दाखल असलेल्या दाव्यांचा निकाल लागल्यानंतर या प्रकरणी निर्णय घेण्यात यावा. तसेंच शासनाने ताकीया ट्रस्टच्या दिनांक १०.०७.१९८७ च्या अर्जावरील निकाल देण्यास झालेल्या विलंबामुळे व त्यामुळे व्याजासह वाढलेली रक्कम रु. १,७७,८२,१६८/- देणेबाबत महसुल व वन विभागाने केलेला आदेश रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव प्रधान सचिव / गृहनिर्माण यांचेमार्फत पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

२. तसेंच असे निदेशित करण्यांत येते कीं, भूसंपादन अधिनियमातील जमिनींची प्रकरणे न्यायालयात दाखल / प्रलंबित असताना उक्त अधिनियमाच्या कलम २८ (अ) नुसार अंमलबजावणी करताना अनेक बाबी उद्‌भवतात व अडचणी निर्माण होतात, त्यामुळे यामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यासाठी शासनाला कळविण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : ११</u>

विषय : वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे (प.) संक्रमण शिबिराची पूनर्विकास योजना राबविण्याबाबत.

निविदा स्विकृती प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्रमांक :६०९४ **दिनांक : २१.०६.२००५**

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे (पश्चिम) येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्विकास योजनेकरिता आलेल्या एकूण आठ निविदांपैकी मे.ओम मेटल प्रा.लि. ॲन्ड एस.पी.एम.एल. (जॉईंट व्हेंचर) यांच्या म्हाडास खुल्या बाजारात विक्रीसाठी असलेल्या बांधकाम क्षेत्रफळावर रु. ५५,१००/- प्रति चौ.मि. इतक्या उच्चतम दराच्या निविदेस मंजूरी देण्यात येत आहे. मात्र सदर काम मे. ओम मेटल प्रा.लि. ॲन्ड एस.पी.एम.एल. (जॉईंट व्हेंचर) यांना योग्य त्या अटी व शर्तींवर देण्याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

<u>बाब क्रमांक : १२</u>

विषय : औरंगाबाद मंडळातील मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांच्या किंमती कमी करणे (योजनेचे नांव ३८ गाळे व ४५३ गाळे तीसगांव) तसेच कमी केलेल्या किंमतीचे गाळे भाडे खरेदी हप्त्याने विक्रीस परवानगी बाबत. (योजनेचे नांव कौठा नांदेड, उदगीर, गेवराई, वाळूज, औरंगाबाद)

ठराव क्रमांक : ६०९५ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, औरंगाबाद मंडळातील मागणी अभावी रिक्त असलेल्या एकूण ११ योजनेमधील नांदेड, लातूर, बीड, एमआयडीसी वाळूज, औरंगाबाद येथील गृहनिर्माण भवनाजवळील योजना, देवगीरी कॉलेज जवळील योजना, अशा ९ योजनेतील गाळयांसाठी पूर्वीच्या ठरावान्वये कमी करुन दिलेल्या किंमतीनुसार आणि आता प्रस्तावित केलेल्या तीसगांव येथिल मध्यम व अल्प उत्पन्न योजनेतील फक्त रिक्त गाळयांसाठी (अल्प उ.गटातील प्रती गाळयाची किंमत रु. ९७,५००/- ऐवजी रु. ८२,५००/- व मध्यम उ.गटातील प्रती गाळयाची किंमत रु. २,०३,५००/- ऐवजी रु. १,६७,०००/- याप्रमाणे) किंमतीवर सर्व रिक्त गाळे भाडेखरेदी हप्त्यावर विक्री करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. एकूण किंमतीच्या २० टक्के रक्कम प्रथम घेवून उर्वरित रक्कम (प्राधिकरणाचा निधी) भाडेखरेदी हप्त्यावर १० वर्षाच्या कालावधीने, अत्यल्प उत्पन्न गटासाठी १० टक्के, अल्प उत्पन्न गटासाठी १२ टक्के व मध्यम उत्पन्न गटासाठी १४ टक्के दराने व्याज आकारणी करुन वसूल करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : १५</u>

विषय : म्हाडा कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत.

ठराव क्र. : ६०९६ दिनांक : २१.०६.२०००५

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, ठराव क्रमांक ६०६४, दिनांक ९.०८.२००४ अन्वये घेतलेल्या निर्णयात " ठराव क्र. ६०६४ करण्यापूर्वी प्राधिकरणाने पेन्शनबाबत जे ठराव केले आहेत ते सर्व ठराव रद्द करण्यात येऊन " अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. त्याप्रमाणे ठराव क्र. ६०६४, दिनांक ९.०८.२००४ मध्ये सुधारणा करण्यांत यावी.

<u>बाब क्रमांक : १६</u>

विषय : औरंगाबाद मंडळांतर्गत लातूर येथील वाल्मिकी अंबेडकर निवास योजनेतील कामाकरिता उपजिल्हाधिकारी यांचे दिमतीला भाडयाने वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६०९७ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, औरंगाबाद मंडळांतर्गत लातूर येथे वाल्मिकी अंबेडकर निवास योजनेअंतर्गत १४००० घरे बांधण्याच्या कामाकरिता उपजिल्हाधिकारी यांचे दिमतीला स्थानिक पातळीवर विहित प्रक्रियेचा अवलंब करुन परिवहन खात्याकडील व्यवसायिक परवाना असलेले वाहन कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यकतेनुसार मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांचे परवानगीने भाडे तत्वावर घेण्यास मान्यता देण्यांत येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मंजूरी देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : १७</u>

विषय : औरंगाबाद मंडळांतर्गत लातूर येथील वाल्मिकी आंबेडकर निवास योजनेतील कामाकरिता नवीन (टाटा सुमो जीप) वाहन खरेदी करण्याविषयी.

ठराव क्रमांक : ६०९८ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, औरंगाबाद मंडळाकडील जुने वाहन क्र.एमएच २०/ई ८८३१ महिंद्र जीप प्रथम निर्लेखित करण्यात येऊन त्यानंतरच आर्थिक तरतूद विचारात घेवून विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक टाटा सुमो जीप खरेदी करण्यात यावी व त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्यांत यावा. व शासन निर्णय क्र. १०/०९/२००१ मधील परिच्छेद २ (४) (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे या प्रस्तावास शासनाची कार्योत्तर मंजूरी घेण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : १८</u>

विषय : बाभळगांवरोड, लातूर येथिल म्हाडाच्या मालकीच्या सर्व्हे क्र. ९७/९८ (भाग) मधील ८०३७.०० चौ.मि. क्षेत्र पोलीस स्टेशन (ग्रामीण) यांना वाटप करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६०९९ दिनांक : २१.०६.२००५

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, औरंगाबाद मंडळाच्या बाभळगांव रोड, लातूर येथील म्हाडाच्या योजनेतील मालकीच्या सर्व्हे क्र. ९७/९८ (भाग) मधील ७०८७.०० चौ.मि.चा भूखंड पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस कार्यालय उभारण्यासाठी पोलीस खात्यास प्रचलीत अटी व शर्तींवर देण्यास मान्यता देण्यांत येते, त्या बदल्यात तेवढयाच किंमतीची शासकीय जमीन जिल्हाधिकारी लातूर यांचेकडून म्हाडाला देण्याच्या अटीवर या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. किंमतीबाबत शासनाच्या स्तरावर होणा-या निर्णयाला आधिन राहून उक्त भूखंडाचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला आहे,याची नोंद घेण्यात आली.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ११.०८.२००५ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित केलेल्या २०७ व्या बैठकीचे कार्यवृत्त...

बाब क्रमांक : २०७/२

विषय : वर्ग-१ ते वर्ग-३ मधील तांत्रिक / अतांत्रिक संवर्गातील रिक्त पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यापूर्वी हया पदांच्या प्रारुप सेवा प्रवेश नियमातील करण्यांत आलेल्या अंशतः सुधारणेस मान्यता मिळण्याबाबत.

उपरोक्त विषय सचिव / प्रा. यांनी सभागृहासमोर सादर केला.

ठराव क्रमांक : ६१०० **दिनांक : ११.०८.२००५**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडा कर्मचा-यांना ७ वर्षे मर्यादेपर्यंत वयातील सुट देणेबाबतचा प्रस्ताव वगळून वयाबाबत सुट पूर्वीप्रमाणेच ठेवावी. प्रस्तावासोबतच्या परिशिष्टात दर्शविलेल्या प्रारुप सेवा नियमात सुचविण्यात आलेल्या प्रस्तावित सुधारणांना मान्यता देण्यांत येत असून तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस पाठविण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : २०७/४

विषय : म्हाडाच्या योजनेतील निवासी गाळे / भूखंड आणि अनिवासी गाळे / भूखंडाच्या हस्तांतरण / नियमिती-करणाच्या फी बाबत.(मुंबई, मुंबई सोडून विभागीय मंडळे, जागतिक बंक प्रकल्प, राजीव गांधी निवारा प्रकल्प, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, विडी कामगार).

ठराव क्रमांक : ६१०१ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाच्या योजनेतील निवासी गाळे / भूखंड आणि अनिवासी गाळे / भूखंडाच्या हस्तांतरण / नियमितीकरणाच्या फीबाबतच्या प्रस्तावामध्ये पुढील येाजनेतील हस्तांतरण नियमितीकरण करण्याच्या प्रस्तावावर प्राधिकरणाने मंजूरी दिली.

(१) बाब अ - निवासी गाळे हस्तांतरण / नियमितीकरणासाठी फी (मुंबई विभागाकरिता) - तक्ता क्र.अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

निवासी गाळे हस्तांतरण / नियमितीकरणासाठी फी (मुंबई सोडून महाराष्ट्रातील इतर विभागीय मंडळासाठी) - तक्ता क्र.ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

बाब ब - निवासी भूखंड हस्तांतरण / नियमितीकरणासाठी फी (मुंबई विभागाकरिता) - तक्ता क्र.क मध्ये नमूद केल्याप्रमाणें.

निवासी भूखंड हस्तांतरण / नियमितीकरणासाठी फी (मुंबई सोडून महाराष्ट्रातील इतर विभागीय मंडळासाठी) - तक्ता क्र.ड मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

बाब क - अनिवासी तथा दुकानी गाळे / भूखंड हस्तांतरण फी (मुंबई विभागाकरिता) - तक्ता क्र.इ मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

अनिवासी तथा दुकानी गाळे / भूखंड हस्तांतरण फी (मुंबई सोडून महाराष्ट्रातील इतर विभागीय मंडळासाठी) - तक्ता क्र.फ मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

बाब ड - बहुमजली तथा स्वतंत्र भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे अभिहस्तांतरण झाल्यावर इमारतीचे किंवा इमारतीतील गाळयांचे पुनर्विक्रीनंतर जमिनीचा भाडेपट्टा पुनर्रखरेदीदाराच्या नांवे करण्याबाबत.

अ. प्राधिकरणाच्या दिनांक ४.०५.१९८७ नोटीफिकेशनने एमएच/एलआरजी/१०८५/२३८७१/इएम-९ अन्वये फॅार्म 'ड' रद्द केला असल्यामुळे ही तरतूद नव्याने करणे आवश्यक आहे व अशा प्रकारचेअधिकार म्हणजे ' चेंज इन स्टेटस ऑफ लेजी ' विभागीय मंडळाच्या मुख्य अधिका-यांना देण्यात येत आहेत.

ब. अशा प्रकरणांना मुख्य अधिका-यांनी सहमती दर्शविण्यापूर्वी मुख्य अधिका-यांनी अर्जदारांकडून संस्थेने अथवा मूळ गाळेधारकांचे ' ना हरकतप्रमाणपत्र ' सादर करणेबाबत आग्रह धरणे आवश्यक राहील.

क. अशा प्रकारच्या बहुसंख्य प्रकरणी इमारतीची सर्व किंमतही वसूल झालेली असते हे लक्षात घेता, भाडेपट्टा करारपत्रातील नामांतरण हे केवळ नाममात्र शिल्लक राहाते हे लक्षात घेऊन अशा प्रकारच्या बदलाकरिता प्रशासकीय खर्च म्हणून नाममात्र फी आकारणे जरुरीचे ठरते. हे लक्षात घेऊन निवासी गाळे/भूखंडाकरिता रु. ५५०/- व अनिवासीगाळे / भूखंडाकरिता रु. ११००/- आकारावे.

(२) जागतिक बँक प्रकलपाअंतर्गत राबविलेल्या येाजना :

अ.क्र.	भूखंड प्रकार व क्षेत्रफळ चौ.मि.	भूखंड हस्तांतरण शुल्क			निवासी अनिवासीरुपांतर
		वारस	कुटुंबातील १७ नातेवाईक	इतर वेळी	
१ अ	२१.००	१,१००/-	२,२००/-	९,३५०/-	२३,१००/-
२अ	२५.००	१,१००/-	२,२००/-	९,३५०/-	२७,५००/-
३ब	२५.००	१,१००/-	२,२००/-	९,३५०/-	२७,५००/-
४क	३०.००	२,२००/-	४,४००/-	१६,५००/-	३३,०००/-
५ड	४०.००	३,३००/-	६,६००/-	२७,५००/-	४४,०००/-
६ई	६०.००	५,५००/-	११,०००/-	३८,५००/-	६६,०००/-
७एफ	१००.००	५,५००/-	११,०००/-	५५,५००/-	१,१०,०००/-
८ जी	उच्च उ.गटांतर्गत गृहनिर्माण संस्थांच्या सदनिकेचे सभासदत्व बदल.	५,५००/-	११,०००/-	३८,५००/-	प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५५५३ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे दर आकारण्यात यावेत. त्यातील अटी / शर्ती पाहव्यात.

विविध गटातील भूखंडाचे हस्तांतरण व वापर बदल करण्याकरिता मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी लाभार्थींकडून अर्ज मागवावेत. भूखंडाचे सर्व कर्ज व देय रकमांची पूर्ण वसूली करण्यात यावी. मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी वर दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे अधिमूल्य आकारुन हस्तांतरण तथा वापर बदलास परवानगी देण्यात यावी.

अनिवासी वापरासाठी व अतिरिक्त बांधकामाबाबात ठळक अटी व शर्ती खालीलप्रमाणे रहातील. सविस्तर अटी शर्ती ठराव क्र. ५५५३ दिनांक २७.०३.२००० मध्ये दर्शविल्या आहेत त्या लागू कराव्यात.

अ) वापर बदलण्याबाबत मंडळामार्फत केवळ ना हरकत प्रमाणपत्र अटी व शर्तीवरदेण्यांत यावेत. याबाबताच्या आवश्यक परवानगी स्थानिक संस्थांकडून प्राप्त करुन घेण्याची सर्व जबाबदारी लाभार्थीवर सोपविण्यात यावी व अशी परवानगी प्राप्त करुन घेण्यासाठी लाभार्थीवर कालमर्यादा घालून देण्यांत यावी.

ब) या धोरणात सूचविण्यात आलेला वापर बदलासाठी देण्याच्या ना हरकत प्रमाणपत्राचे विविध दर वेळोवेळी बदलण्याचे (कमी अधिक करण्याचे) तसेच धोरणाशी विसंगत असलेल्या वापर बदलाच्या काही प्रकरणांसाठी लागू करावयाचेअधिमूल्य व वार्षिक भुईभाडे ठरविण्याचे प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्व अधिकार / उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

क) ज्या प्रकरणात अनधिकृत वाढीव बांधकाम करुन अशा वाढीव क्षेत्रात अनिवासी वापर करण्यात येत असल्यास, अशा वाढीव बांधकामासाठी या धोरणानुसार आकारावयाच्या अधिमुल्याच्या १५० टक्के दराने दंड म्हणून रक्कम वसूल करण्यात यावी. जर सदर अनधिकृत बांधकाम किंवा अनिवासी वापरास महानगरपालिकेने नियमितीकरणास परवानगी नाकारल्यास वसूली केलेली दंडाची रक्कम परत करण्यात येऊ नये.

ड) या धोरणानुसार नव्याने वापर बदलाची परवानगी देताना अशा वापर बदलाबाबत विकास नियंत्रण नियमावलीनुसार प्रस्ताव अनुज्ञेय असल्यास या धोरणानुसार त्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत यावे.

इ) वसाहतीस अत्यावश्यक असलेल्या सुविधा वापराचे किमान आवश्यकतेचे प्रमाण कमी`होणार नाही. याबाबत वापर बदलाची परवानगी देताना नियोजनात्मक दृष्टीने विचार करण्यात यावा.

फ) अशा प्रकारच्या मंडळाने दिलेल्या परवानगीमुळे कोणत्याही प्रकारे वाढीव इन्फ्रास्ट्रक्चर (मुलभसूत सुविधा) अधिक प्रमाणात पुरविण्याची जबाबदारी मंडळावर / प्राधिकरणावर राहणार नाही.

(३) राजीवगांधी निवारा प्रकल्पा अंतर्गत घेतलेल्या योजना :

राजीव गांधी निवारा प्रकल्पा अंतर्गत राबविलेले प्रकल्प मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे वर्ग करण्यांत आले आहेत. त्यामधील पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीतील गाळयांच्या हस्तांतरण / नियमितीकरण करण्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे अंमलबजावणी करावी :-

१. भाडेकरुंना सबसिडी म्हणून मिळालेली रक्कम रु. १२,९००/- ही जशीच्या तशी लागू राहील व ती वसूल करुन त्या व्यतिरिक्त हस्तांतरण / नियमितीकरण करण्यासाठी रु. २२,०००/- याप्रमाणे एकूण रु. ३४,९००/- आकारण्यात यावेत. सबसिडीची रक्कम सुरुवातीलाच हस्तांतरणाच्या वेळी भरली असल्यास पुन्हा आकारण्याची गरज नाही.

(४) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ गाळयांचे हस्तांतरण / नियमितीकरण :

१. निवासी गाळयांच्या हस्तांतरणासाठी प्रति चौ.फुट १६५/- या दराने दंडात्मक रकमेची आकारणी करावी.
२. अनिवासी गाळयांकरिता हे दर रु.३३०/- प्रति चौ.फुट असे राहतील.

अटी व शर्ती :---

१. नियमितीकरणाचा / हस्तांतरणाचा प्रस्ताव असलेल्या गाळयांचे वाटप मूलतः पात्र व मूळ भाडेकरुंना झाले आहे व मूळ वाटपात कोणत्याही प्रकारणी अनियमितता नाही, याची खात्री करावी.
२. ज्या व्यक्तींचा गाळा नियमित / हस्तांतरीत करावयाचा त्या व्यक्तीने गैरमाग्रने व बेकायदेशिररित्या गाळा प्राप्त केलेला नाही याची खात्री मूळ गाळेधारकाकडून प्रत्यक्ष करणें.
३. ज्या गाळयांचे वाटप २ टक्के शासन स्वेच्छाधिकारातून अनियमितपणे झाले आहे, असे गाळे या नियमितीकरण / हस्तांतरण येाजनेतून वगळण्यात यावेत.
४. उक्त नुसार गाळे नियमितीकरण / हस्तांतरण प्रक्रिया सुरु करण्यांत यावी. तथापि त्याचबरोबर संदर्भासाठी अनधिकृत व्यक्तींची यादी देखिल तयार करण्यात यावी.
५. गाळयांचे हस्तांतरण / नियमितीकरण ही सततची प्रक्रिया असल्याने प्रचलित नियम / विनियमातील तरतुदीनुसार नियमित चालू ठेवण्यांत यावी.

(५) विडी कामगार योजनांबाबत :

१ विडी कामगार योजनेतील गाळेधारक हा अनधिकृत विडी कामगार असल्यास रु. ११,०००/- आकारावेत.

२ विडी कामगार योजनेतील गाळेधारक हा अनधिकृत विडी कामगार नसल्यास रु. २२,०००/- आकारावेत.

वर नमूद केलेल्या दोन्ही मुद्दयांमध्ये योजनेच्या नकाशाप्रमाणे असलेली अनुज्ञेय अनुदानीत रक्कम वरील अधिमुल्यासह वसूल करण्यात यावी.
(अनुज्ञेय अनुदान जसे, काही येाजनेमध्ये रु.५०००/- तर काही योजनेमध्ये १०,०००/- इत्यादि सुधारित याप्रमाणे किती लागू आहे हे प्रथम तपासून घ्यावे.)

वरील ठराव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा. शासनाच्या मंजूरीच्या पत्राच्या दिनांकानंतर पुढील महिन्याच्या एक तारखेपासून सदर ठरावातील पुढील तीन वर्षाकरिता तक्ता अ, ब, क, ड, इ, फ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सदर दर लागू करावेत. यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.
टिप : (**तक्ते ' अ ' ते ' फ ' पहावेत**).

बाब क्रमांक : २०७/५

विषय : अक्कलकोट जिल्हा सोलापूर येथील गृहनिर्माण योजनेस पोहोच रस्त्याचे म्हाड कायद्यांतर्गत (कलम ५२) वाटाघाटीद्वारे संपादन करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१०२ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, अक्कलकोट गट नं.७०८/१/अ/१ मधील म्हाडाचे गृहनिर्माण योजनेस पोहोच रस्त्याची आवश्यकता आणि अक्कलकोट नगर परिषदेने दिलेल्या अभिन्यास मंजूरीच्या अटी व शर्तींच्या पूर्ततेसाठी खाजगी क्षेत्र गट नं. ८४४ (५) १ पैकी रस्त्यासाठी आवश्यक ३६०० चौ.मि. क्षेत्राचे म्हाड कायदा कलम ५२ अन्वये रु. २५/- प्रती चौ.मि. दराने जमिन खरेदीसाठी केलेल्या रु. ९०,०००/- च्या खर्चासाठी पुणे मंडळाने केलेल्या कार्यवाहीस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २०७/६

विषय : चिमुर, जिल्हा चंद्रपूर येथील लघु औद्योगिक क्षेत्रामधील नागपूर मंडळाच्या गृहनिर्माण योजनेकरिता जमीन संपादित करण्याबाबत मंजूरीबाबत.

ठराव क्रमांक : ६१०३ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, चिमूर, जिल्हा चंद्रपूर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सुमारे १९९५० चौ.मि. जमिनीची किंमत रु. ७१/- प्रती चौ.मी. दराने रु. १४,१६,४५०/- एवढी रक्कम अदा करुन सदर जमीन नागपूर मंडळाला प्राप्त होत आहे.

बाब टिप्पणीसह जोडेलेल्या ॲनेक्सचर अे नुसार पुढील कार्यवाही करण्यास मुख्य अधिकारी / नागपूर मंडळ यांना कळवावे.

सदर जमिन घेण्याबाबत नागपूर मंडळाने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

बाब क्रमांक : २०७/७

विषय : जुळे सोलापूर - १ येथे म्हाडा काम करत असलेल्या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रामधील संपादित केलेल्या जमिनींसाठी जमीन मालकांना भू संपादन कायद्यातील तरतुदींनुसार नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याच्या प्रशासकीय कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१०४ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. सदर प्रकरणी देण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्याची रक्कम भांडवलीकरणासह (व्याजासह अद्यावत करुन, जसे मार्च-२००५ पर्यंत येणारा दराचा फरक रु. १३४५/- प्रती चौ.मी.) व इतर खर्च याप्रमाणे येणारी जमिनीची किंमत म्हाड कायद्याप्रमाणे सर्व संबंधित लाभार्थींकडून वसूल करण्याची कार्यवाही मुख्य अधिकारी / पुणे मंडळ यांनी सुरु करावी. त्यानंतर पुढील कार्यदिशा ठरविता येईल.

२. नागरी जमिन कमाल धारणा कायद्यांतर्गत रेड्डीच्या प्रकरणानुसार हे प्रकरण विधी सल्लागार / प्रा. यांनी तपासून कार्यवाही करता येईल का पहावे. यासाठी तज्ञ नेमता येईल.

बाब क्रमांक : २०७/८

विषय : सर्व्हे क्र.१५०, १५२, १५३ (भाग) मोरवाडी, पिंपरी, वाघीरे पुणे येथील व्यापारी संकूल योजना... दिर्घकाळ विक्री न झालेल्या गाळयांची एकत्रित योजना.

ठराव क्रमांक : ६१०५ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, स.क्र.१५०, १५२, १५३ (भाग) मोरवाडी, पिंपरी वाघीरे येथे राबविलेल्या व्यापारी संकुलातील गाळे रिकामे राहून अधिक नुकसान होऊ नये तथा पुढील तोटा टाळण्याच्या दृष्टीकोनातून सदर कार्यवाही करण्यात आली आहे, याची नोंद म्हाडाने घेतली.

२. सदर संकुलाचे बांधकाम हाती घेण्यापूर्वी निश्चित मागणी न घेणे, संकुलाच्या इमारतीच्या नियोजनाचे / आराखडे नकाशे वास्तुशास्त्रीय दृष्टीकोनातून योग्य नसणे, बांधकामाचा दर्जा उत्तम नसणे, व त्यामुळे तोटा होणे या बाबी विचारात घेऊन मंडळाच्या संबंधित अधिका-यांविरुध्द त्याप्रकरणी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे, असा प्राधिकरणा निर्णय आहे.

३. सबब, वरील बाब लक्षात घेऊन, मोरवाडी पिंपरी वाघीरे, पुणे येथे पुणे मंडळाने बांधलेल्या व्यापारी संकुलातील ३९ दुकाने, एका बँकेची जागा व ३६ कार्यालयीन गाळयांपैकी ३९ दुकाने, एका बँकेची जागा व ३३ कार्यालयीन गाळे (बांधकाम क्षेत्र २१९६.९४ चौ.मि.) व भूखंडावर असलेला उर्वरित एफ.एस.आय. १३९०.५५ चौ.मि. करिता, मेसर्स अगर बिल्डर्स व डेव्हलपर्स प्रायव्हेअ लिमिटेड, पुणे यांनी दिलेला रु. २,६९,००,०००/- किंमतीचा देकार स्विकारुन बाब टिप्पणीत विषद केलेल्या परिच्छेद क्र.४.१ ते ४.१० वरील अटी व शर्तीला अनुसरुन केलेल्या विक्रीच्या कार्यवाहीची नोंद प्राधिकरणाने घेतली. अटी व शर्तीपैकी, एकूण रु. २,६९,००,०००/- पैकी करारासोबत रु. ५० लाख घेऊन उर्वरित रक्कम रु. २,१९,००,०००/- व्याज न आकारता २४ महिन्याच्या कालावधीमध्ये चार समान हप्त्यात वसूल करण्यांत येणार आहे व त्यामध्ये विलंब झाल्यास १३.५ टक्के द.सा.द.शे.दराने विलंबापोटी व्याज आकारण्यात येईल.

या प्रस्तावाला कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २०७/९

विषय : मौजे पुंगळा, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी येथिल स.क्र.४९/१ मधील कलम ५२ अंतर्गत जमिन खरेदी प्रस्तावाबाबत.

ठराव क्रमांक : ६१०६ **दिनांक : ११.०८.२००५**

एक मताने निर्णय घेण्यात आला कीं, मौजे पुंगळा, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी येथील मुळ प्रस्तावातील १.२५ हेक्टर जमीन घेण्याऐवजी मुख्य राज्य रस्त्यापासून ७० मिटर आतील भागातील सरकारी पोहच रस्ता असलेल्या स्थळ बदलल्याबाबातचे क्षेत्र ३० आर जमिन घेण्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २०७/१०

विषय : स.नं.२२/१, बनवडी, ता.कराड, जिल्हा सातारा येथील ३६०० चौ.मी. जमिनीचा मोबदला अदा करणेबाबत. (संदर्भ : मे.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील सिव्हील अपील क्र.२५१/२००२ मधील तडजोड करारनामा).

ठराव क्रमांक : ६१०७ **दिनांक : ११.०८.२००५**

एकमताने निर्णय घेतला कीं, उक्त प्रकरणी जमिन मालकाला अदा केलेल्या रु. ९.०० लाख या रक्कमेतूनच नियमानुसार नजराण्या पोटीची देय रक्कम (सुमारे रु. ४.५० लाख) जिल्हाधिका-याने वसूल करावी, तसे जिल्हाधिका-यास कळविण्यात यावे आणि जमिनमालकासही मुख्य अधिका-यानी नोटीस जारी करावी.

बाब क्रमांक : २०७/११

विषय : मौजे पाडळी, जुन्नर, जिल्हा पुणे गट क्र.११/१ पैकी येथे विशिष्ट गटासाठी (बेघर महिला गट) योजना राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१०८ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, मातृभूमि बेघर महिला संघटना व भारतीय बेघर महिला संघ यांच्या सभासदांसाठी जुन्नर येथे घरे बांधून मिळण्याकरिता शासनाने दिनांक २९.०८.२००२ रोजी म्हाडास ४८९५ चौ.मि. ताबा दिलेल्या क्षेत्रावर बेघर महिलांकरिता वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २०७/१२

विषय : सेवानिवासस्थान गाळा क्र. एच-८/१४९ बदलून अशोकवन येथील गाळा क्र. ४/१९७ मालकी हक्काने देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१०९ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, अशोकवन दहिसर येथील १८० चौ.फुटाच्या ६० सेवानिवासस्थानापैकी गाळा क्र.४/१९७ या योजनेस विक्री योजना लागू असल्याने न्यू गोराई रोड, बोरिवली ऐवजी सेवानिवासस्थान म्हणून बदलून मयत फर्नांडीस यांच्या पत्नीला विशेष बाब म्हणून सहानुभूतीच्या दृष्टीकानातून मालकी हक्काने नियमानुसार गाळयाची सूंपर्ण किंमत घेऊन वितरीत करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २०७/१३

विषय : प्राधिकरणाने केलेला ठराव क्र. ६०५५ दिनांक ७.०८.२००४ ला अनुसरुन संक्रमण शिबिरातील मालकी हक्काने देण्यात येणा-या गाळयांच्या मूळ किंमतीच्या खुलाश्याबाबत.

ठराव क्रमांक : ६११० दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाने दिनांक ७.०८.२००४ रोजीच्या ठराव क्रमांक ६०५५ अन्वये संक्रमण शिबिरातील सेवानिवासस्थाने मालकीहक्काने देण्याचा निर्णय घेतलेला असून त्या ठरावामध्ये सदर गाळयाची विक्री किंमत मूळ किंमतीवर करण्याचे ठरविण्यात आले होते. या मूळ किंमतीमध्ये असे अभिप्रेत आहे कीं, गाळयाच्या बांधकामावर झालेला खर्च + गाळयाला अनुलग्न / अनुज्ञेय ठरणा-या भूखंडाच्या क्षेत्रफळानुसार येणारी भूखंडाची किंमत + स्पेशल रिपेअर्स + स्पेसिफाईड रिपेअर्सवर झालेला खर्च वर्ग करुन येणारी किंमत म्हणजे मूळ किंमत समजण्यात यावी. त्याप्रमाणे लाभार्थींकडून मूळ किंमत वसूल करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २०७/१५

विषय : थेट पध्दतीने व अन्य मार्गाने थेट वाटप करण्यात येणा-या सदनिकांच्या किंमती आकारण्याबाबतची पध्दती.

ठराव क्रमांक : ६१११ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेण्यांत आला कीं, प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील विभागीय मंडळांच्या योजनेतील २ टक्के सदनिका ज्या शासनाच्या स्वेच्छाधिकारात किंवा अन्य पध्दतीने थेट वितरीत केल्या जातात त्या सदनिकाकरिता पुढील प्रमाणे किंमत आकारण्यात येईल.

अ. प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार बांधकामाचा खर्च / किंमत वाटपाच्या दिनांकापर्यात भांडवलीकरण करुन / अद्ययावत करुन किंमत काढावी व त्यामधून गाळयांच्या / इमारतीच्या पूर्व आयुष्याच्या धर्तीवर घसारा रक्कम वजा करावी.

ब. गाळयाच्या अनुज्ञेय ठरणा-या भूखंडाचे क्षेत्रफळ काढावे व अशा विकसित भूखंडाची किंमत / मुल्य त्या विभागात लागू असलेल्या रेडीरेकनर / शिघ्रगणकाच्या तरतुदीवर काढावी व ती वरील ' अ ' मध्ये समाविष्ट करावी. मात्र विकसित भूखंडाचे मुल्य / किंमत रेडीरेकनर प्रमाणे काढतांना सदर मुल्य हे मंडळाचे जमीन व जमीन विकासासाठी झालेला खर्च प्रचलित धोरणानुसार तो अद्ययावत केल्यानंतर भूखंडाची किंमत किती येते याची तपासणी करावी व त्याची तुलना येणा-या रेडीरेकनरच्या मुल्याशी करावी. जेणेकरुन रेडीरेकनर / शिघ्रगणकानुसार आकारण्यात येणारे मुल्य हे मंडळाने केलेल्या खर्चापेक्षा कमी नाही याची खात्री करुन घ्यावी व भूखंडाची रक्कम वरीलप्रमाणे जी रक्कम / मुल्य जास्त असेल त्याप्रमाणे आकारावे.

क. प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार (विविक्षीत प्रवर्ग तथा विभागासाठी लागू असलेल्या धोरणानुसार) नफा आकारण्यात यावा.

याप्रमाणे वरील अ+ब+क याप्रमाणे गाळयांची अंतिम किंमत थेट पध्दतीने वाटप करण्यात येणा-या गाळयांकरिता लागू करण्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

२. सदर पध्दतीबाबत शासनाची सहमती घेण्यात यावी.

बाब क्रमांक : २०७/१६

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे बांधण्यात आलेल्या सर्वे क्र.११३ खंडेश्वरी, बीड येथील गाळयांच्या सुरवातीस भराव्या लागणा-या रक्कमेस हप्ते पाडून मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६११२ दिनांक : ११.०८.२००५

एक मताने निर्णय घेतला कीं, औरंगाबाद मंडळाअंतर्गत स.क्र.१२३ खंडेश्वरी, बीड येथील गाळेधारकांना सुरवातीला भरावयाची रक्कम रु. १५७००/- एकदम भरु शकत नसल्यामुळे या रक्कमेपैकी अर्जासोबत त्यांनी पूर्वी ४५००/- एवढी रक्कम भरलेली असून आता रु. ११,२०० यापैकी ५,२०० रक्कम प्रथम घेऊन उर्वरित रु. ६०००/- ही रक्कम १२.५ टक्के द.सा.द.शे. प्रमाणे २४ समान हप्त्यात वसूल करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. उर्वरित रकमेचे हप्ते नियमाप्रमाणे ठराविक दराने ठराविक कालावधीत वसूल करण्यात यावेत.

बाब क्रमांक : २०७/१७

विषय : शासनाच्या सूचनेनुसार श्री.पांडुरंग हरिबा शिंदे यांना श्री.प्रविण फड यांना प्रत्येकी एक गाळा प्रायोगिक तत्वावर बांधलेल्या व म्हाडाच्या कर्मचा-यांना मालकी हक्काने दिलेल्या योजनेतील गाळे देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६११३ दिनांक : ११.०८.२००५

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं,

१. सदर योजनेत २ टक्के शासन स्वेच्छाधिकारातील तरतूद नाही. त्यामुळे श्री.शिंदे व श्री.फड यांना योजनेतील गाळे देता येणार नाहीत, असे शासनास कळवून इतर योजनेत २ टक्के गाळे उपलब्ध असल्यास त्यामध्ये वितरण आदेश शासनाने जारी करावेत.

२. सदर योजनेतील गाळे कर्मचा-यांसाठी असल्याने नियमानुसार एका रिक्त गाळयाचे प्रतिक्षा यादीप्रमाणे वाटप करावे व ज्या गाळयात भाडेवसुलीकाराचे कार्यालय आहे ते कायम ठेवावे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २४.०८.२००५ रोजी सायंकाळी ४.३० वा. आयोजित केलेल्या २०८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

<u>बाब क्रमांक : २०८/२</u>

विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (Transaction of Business) विनियम १९८० मध्ये सुधारणा करण्याबाबत..

<u>ठराव क्रमांक : ६११४</u> **दिनांक : २४.८.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत सुचविलेल्या दुरुस्तीतील बाब टिप्पणीच्या पृष्ठ क्र. ४९ वरील कॅालम (F) मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावी. Clause (f) Urgent business means those which are urgent and cannot wait for decision till calling of the next meeting with appropriate notice. इतर प्रस्तावित प्रारुप मसुद्यास मान्यता देण्यात येत असून तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस पाठविण्यासही मान्यता देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २०८/३</u>

विषय :- प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना दिनांक : १ जुलै, २००५ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत..

ठराव क्रमांक : ६११५ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, शासनाने वित्त विभाग निर्णय क्र.मभवा-११०५/प्र.क्र.५/सेवा-९ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणा-या इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचा-यांना दिनांक १ जुलै, २००५ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनाच्या १४ टक्के ऐवजी १७ टक्के दराने दिलेली महागाई भत्ता वाढ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना देण्याबाबत प्राधिकरणाच्या ठराव क्र.६२०, दि.२८.१.१९८३ ला अनुसरुन मा.उपाध्यक्ष/प्रधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २०८/४</u>

विषय :- प्राधिकरणाच्या कार्यालयाकडील वाहनाचे वाटप व वाहन वापरासंबधीचे शासनाने दिनांक २५ मे २००५ च्या निर्णयान्वये ठरविलेले धोरण प्राधिकरणास लागू करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६११६ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, शासनाने दिनांक : २५ मे, २००५ अन्वये ठरविलेले धोरण प्राधिकरणास लागू करण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : २०८/५</u>

विषय :- नाशिक मंडळा अंतर्गत सावेडी, अहमदनगर येथे १०५ अत्यल्प उत्पन्न गट व १०६ अल्प उत्पन्न गटांतर्गत कामाच्या निविदेस उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांनी <u>दिलेली मान्यता प्राधिकरणाने स्थायी करण्याबाबत.</u>

ठराव क्रमांकः ६११७ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५८६०, दि. २६.११.२००२ अन्वये निविदेवर निर्णय घेण्यासाठी असलेल्या सक्षम प्राधिका-यांनी निम्नतम निविदाकाराबरोबर वाटाघाटी केल्या तसेच निविदेची मुदत (व्हॅलीडीटी) संपणार होती हे विचारात घेऊन नाशिक मंडळाने ठराव क्र.२७०, दिनांक : ४.१२.२००४ अन्वये स.क्र.५५/१ अ,ब,क सावेडी अहमदनगर येथे अत्यल्प उत्पन्न गटांतर्गत १०५ गाळयांच्या

बांधकामासाठी मे. आर.एस. रंगादास, हैद्राबाद यांची अंदाजित किंमतीपेक्षा ७.५० टक्के जास्तीची निविदा मान्य करण्यात आली असा बैठकीत खुलासा केल्यावरुन उपरोक्त कामासाठी मे. आर.एस.रंगादास, हैद्राबाद यांची निविदा अंदाजित किंमतीपेक्षा ७.५० टक्के जास्त दराने, तसेच स.क्र.५५/१ अ,ब,क, सावेडी अहमदनगर येथे अल्प उत्पन्न गटांतर्गत १०६ गाळयांच्या बांधकामांसाठी मे. अे.आर. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची निविदा अंदाजित किंमतीपेक्षा ८.२५ टक्के जास्त दराची निविदा मंजूर करण्याबाबत बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांनी मान्यता देण्याच्या केलेल्या कार्यवाहीस निविदेची मुदत संपणार असल्याने प्राधिकरणासमोर विषय सादर करण्या इतपत अवधी शिल्लक नव्हता का? व न्युनतम दर नमूद केलेल्या निविदाकारासोबतच वाटाघाटी केल्याबाबतचे जस्टीफिकेशन तयार करुन प्राधिकरणासमोर फेर सादर करावे .

<u>बाब क्रमांक : २०८/६</u>

विषय :- सिव्हील लाईन्स, नागपूर येथील नागपूर मंडळाच्या गृहनिर्माण भवनाच्या आवारात प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांस मंजूरी मिळण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६११८ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, सिव्हील लाईन नागपूर येथील नागपूर मंडळाच्या गृहनिर्माण भवनाच्या आवारात प्रशासकीय इमारत बांधकामासाठी मागविण्यांत आलेल्या निविदांपैकी मे. इगल कन्स्ट्रक्शन कं. यांची रु. ४,३०,२८,३३०/- रकमेची १९.८० टक्के जास्त दराची निविदा मंजूर करण्याबाबत बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांनी मान्यता देण्याच्या केलेल्या कार्यवाहीस निविदेची मुदत संपणार असल्याने प्राधिकरणासमोर विषय सादर करण्याइतपत अवधी शिल्लक नव्हता का? व निम्नतम दराचे निविदाकाराबरोबर वाटाघाटी का केल्या नाही. याचे जस्टीफिकेशन तयार करुन प्राधिकरणासमोर फेर सादर करावे.

<u>बाब क्रमांक : २०८/७</u>

विषय :-बावला कंपाऊंड, दत्ताराम लाड मार्ग, येथील बिल्डींग क्र. ५ च्या कामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६११९ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे बावला कंपाऊंड, दत्ताराम लाड मार्ग, येथील बिल्डींग क्र.५ च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांमधून बाब टिप्पणीतील ७ (ब) मधील कारणे विचारात घेता निम्नतम ठेकेदार मेसर्स कॅनॅन इंजिनियरींग यांची २१ टक्के जास्त रक्कमेची निविदा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २०८/९</u>

विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना कार्यक्रमांकरिता द्यावयाच्या रु. १०.०० कोटी निधीबाबत.

ठराव क्रमांक : ६१२० **दिनांक : २४.८.२००५**

एकमताने निर्णय घेतला की,

१. प्राधिकरणाने दि. ६.८.१९९८ रोजी ठराव क्र. ५३३१ अन्वये मागील अनुक्रमांक ३ व ४ वरील निर्णयात सुधारणा करुन विभागीय मंडळांकडून पुनर्रचना कार्यक्रमांकरीता निधी न घेता प्राधिकरण स्तरावरुन गुंतवणूकीतून जमा होणा-या व्याजाच्या रकमेतून सरसकट रु. १०.०० कोटी राखीव निधीमध्ये वर्ग करण्यास मंजूरी देण्यात येते.

२. ''पुनर्रचना निधी (Reconstruction Fund) '' या लेखाशिर्षाखाली सन २००३-०४

अखेर जमा असलेला रु. ५६.०० कोटी निधी प्राधिकरणाच्या अधिक्यामध्ये वर्ग करण्यास मंजूरी देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २०८/१३</u>

विषय :- १. प्रतिक्षानगर सायन येथील प्रस्तावित प्रकल्पात उच्च उत्पन्न गटाच्या २८ सदनिका न्यायाधिशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस वितरीत करणेबाबत.

२. प्रतिक्षा नगर सायन येथील प्रस्तावित प्रकल्पात मध्यम उत्पन्न गटाच्या ८४ सदनिका व दिंडोशी मालाड येथील मध्यम उत्पन्न गटाच्या ५६ सदनिका अंशकालीन पत्रकार महासंघाच्या सदस्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस वितरीत करणेबाबत.

३. प्रतिक्षा नगर सायन येथील प्रस्तावित प्रकल्पात अल्प उत्पन्न गटाच्या ७२ सदनिका, मध्यम उत्पन्न गटाच्या २३ सदनिका, उच्च उत्पन्न गटाच्या ३७ सदनिका केंद्रीय अन्वेषण विभागास (सी.बी.आय.) वितरीत करणेबाबत.

४. प्रतिक्षानगर सायन येथील प्रस्तावित प्रकल्पात अल्प उत्पन्न गटाच्या २०० सदनिका सी.सी.आय. च्या (क्रिकेट क्लब **ऑफ इंडिया**) **अल्प उत्पन्न गटधारक सदस्यांना वितरीत करणेबाबत.**

<u>ठराव क्रमांक :</u> ६१२१ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की,

जेजेस को.ऑप.हौसिंग सोसायटी नियोजित या संस्थेने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास विनियम मिळकत व्यवस्थापन (विक्री,हस्तांतरण व गाळयांची अदलाबदल)१९८१ मधील विनियम १३ (२) अंतर्गत संस्थेच्या उच्च उत्पन्न सभासदांसाठी १०० चौ.मि. चे २८ व ८० चौ.मी. क्षेत्रफळाच्या २८ अशा एकूण

५६ सदनिकांची जेजेस या गटासाठी गृहनिर्माण योजना खालील शर्तीवर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात मंजूर देण्यांत येत आहे :-

१. सदनिकांचा विक्री दर सर्वसाधारण जनतेस आकारण्यांत येणा-या विक्री दराप्रमाणे राहील.

२.सदर गाळे न्यायाधिशाच्या सह.गृहनिर्माण सोसायटीस विशेष प्रवर्गात द्यावयाचे असल्याने त्यास म्हाडाच्या जाहिरातीद्वारे गाळे विकण्याबाबतचे आरक्षण लागू होणार नाही. मात्र सहकारी संस्थाचे कायद्यात अंतर्गतचे आरक्षण लागू होईल यासाठी संस्थेच्या सभासदामध्ये विहित प्रवर्गाच्या सभासदाची आरक्षणाची पूर्तता होत नसल्यास अन्य प्रवर्गातील अधिकारी व्यक्तींना नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेस सदस्य म्हणून घेण्यास शासनाने मान्यता द्यावी या उपरही आरक्षित प्रवर्गातीलसभासद उपलब्ध न झाल्यास त्या प्रवर्गाचे आरक्षण शिथील करण्यास शासनाने परवानगी द्यावी.

३. विनियम १३ (२) अंतर्गत विशिष्ट गटासाठी गृहनिर्माण योजना शासनाने मंजूर केल्यानंतर त्या
विशिष्ट गटासाठी वर्तमान पत्रांत जाहिरात देवून अर्ज मागविणे आवश्यक असते तथापि, प्रस्तूत
प्रकरणी जाहिरातीची अट शिथील करुन संस्थेच्या सभासदांना सदनिका वितरण करण्यांस
शासनाने मान्यता देण्यांत यावी.

४. १०० टक्के मा.न्यायाधिश अर्जदार असल्याची अट शिथील करुन आरक्षित गटात न्यायाधिश

नसल्यास २० टक्के अन्य अधिकारी वर्ग समाविष्ट करण्यास शासनाने संमती द्यावी.

<u>बाब क्रमांक : २०८/१४</u>

विषय :- कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), येथील इमारत १४८, १५५ व २२४ या इमारतीमध्ये मनोहर कोतवाल ट्रस्ट (विद्या प्रसारक मंडळ) यांना भाडेतत्वावर दिलेले गाळे मालकी हक्काने देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक :</u> ६१२२ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) येथे मनोहर कोतवाल ट्रस्टला (विद्या प्रसारक मंडळ) देऊ केलेल्या भूखंडापेक्षा म्हाडाने कमी आकाराचा भूखंड दिला. त्यामुळे त्यांची शाळेच्या वर्गाची गरज पूर्ण होऊ शकलेली नाही. शिवाय शाळेने तेथील रहिवाशांच्या मागणीप्रमाणे संगणक, संगीत क्लासेसचे वर्ग सुरु केलेले आहेत, त्यामुळे सदर संस्थेस कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), येथील इमारत क्र. १४८, १५५ व २२४ मध्ये मुंबई मंडळाने पूर्वी शाळेसाठी वितरीत केलेल्या एकूण २४ गाळयांची (बाब टिप्पणीच्या पृष्ठ क्र.२५१ व २५३ वर नमूद केल्याप्रमाणे) निकड आहे. या संदर्भात सदर संस्थेने मा. मुख्यमंत्री महोदय यांना दिलेल्या निवेदनाचे मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी बैठकीत वाचन केल्यानंतर सदर पत्रातील मुद्दे लक्षात घेऊन उपरोल्लेखित इमारतीतील २४ गाळे सदरहू संस्थेस चालू बाजारभावाने मालकी हक्काने देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. चालू बाजारभावाचे दर ठरवितांना ठराव क्र. ६१११ चा आधार घ्यावा.

<u>बाब क्रमांक : २०८/१७</u>

विषय :- दिनांक : २६ व २७ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुंबई उपनगर व ठाणे जिल्हयात अभूत पूरपरिस्थिती निर्माण झाल्यामुळे अर्जदारांना मुदतीत विक्री किंमत अदा करण्यासाठी दिनांक : २६.७.२००५ ते ३१.०८.२००५ या कालावधीसाठी व्याजाची आकारणी न करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१२३ **दिनांक : २४.८.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद करण्यात आलेली वस्तुस्थिती विचारात घेता म्हाडाने ज्या अर्जदारांना सदनिका वितरीत केल्या आहेत अशा अर्जदारांकडून विक्री किंमतीच्या थकीत रकमेवर दिनांक : २६.७.२००५ ते ३१.८.२००५ या कालावधीसाठी व्याजाची आकारणी करण्यांत येऊ नये. तसेच त्यांना या कालावधीत भरावयाची विक्री किंमत अदा करण्यासाठी बिनव्याजी मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर सवलत फक्त मुंबई उपनगर व ठाणे जिल्हयातच लागू न करता राज्यातील पूरग्रस्त जिल्हयांना लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २०८/१८</u>

विषय :- वांद्रे (पूर्व) येथील मुंबई मंडळाच्या भारत नगर वसाहतीतील सुमारे २०२१ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा तात्पुरत्या संक्रमण शाळेकरिता वितरीत करण्ययाबाबतची विनंती.

ठराव क्रमांक : ६१२४ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी महापालिकेस बाब टिप्पणीतील पर्याय २ प्रमाणे १८ महिन्यांच्या भुईभाडयापोटी रक्कम रु. ४,१३,३९६/- (१८ महिन्यांचे भुईभाडे रु. ३,११,३९६ + अनामत रक्कम रु. १,००,०००/- विधी शुल्क रक्कम रु.२,०००/-) कळविण्याच्या केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २०८/२१</u>

विषय :- राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीची एकवेळ दुरुस्ती हमीपत्राच्या मुद्याबाबतची कार्यवाही.

ठराव क्रमांक : ६१२५ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत, नागरी नुतनीकरण योजनेखाली पुनर्रचित करण्यात आलेल्या ६६ इमारतींची एकवेळ दुरुस्ती इमारतीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून हमीपत्र न घेता करावी. हया ६६ इमारतींसाठी पूर्वी ठराव क्रमांक ५९७६ द्वारे मंजूर झालेला निर्णय सर्व ६६ इमारतींना लागू राहील व तद्नंतर सहमुख्य अधिकारी/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या स्तरावर इमारतींच्या अभिहस्तांतरणाबाबतची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २०८/२२</u>

विषय :- पाटलीपुत्र ओशिवरा संक्रमण शिबीर येथील बैठया चाळीतील दुकानी गाळा क्र.५ चे वितरणाबाबत.

ठराव क्रमांक : ६१२६ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, ओशिवरा संक्रमण शिबिरातील अनिवासी गाळा क्र.५ हा माहे १९९६ पासून श्रीमती कविता सिंह यांच्या ताब्यात होता. श्रीमती कविता सिंह यांचेकडे अनधिकृपणे असलेल्या या गाळयाचा ताबा दि. २४.१२.२००४ रोजी मंडळाने काढून आपल्याकडे घेतला, सदरचा गाळा मिळण्यासाठी अनेक लोकांचे अर्ज मंडळाकडे प्राप्त झाल्यामुळे, नियमानुसार सदर गाळयाचे वाटप जाहिरातीद्वारे निविदा बोलावून उच्चतम निविदादारास वितरण करण्याबाबतची कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २०८/२३</u>

विषय :-चितळसर मानपाडा कोड क्र.१८, १९, १००, १०१ अंतर्गत बांधलेल्या २८ गाळे उच्च उत्पन्न गट योजनेतील मागासवर्गीय प्रवर्गातील गाळे वगळून इतर प्रवर्गातील गाळयांना प्रतिसाद न मिळाल्यास हे गाळे सर्वसाधारण जनता या प्रवर्गात वर्ग करण्याबाबत

ठराव क्रमांक : ६१२७ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे चितळसर मानपाडा कोड क्र.१८, १९, १००, १०१ अंतर्गत बांधलेले २८ गाळे उच्च उत्पन्न गट योजनेतील मागासवर्गीय प्रवर्गातील गाळे वगळून इतर प्रवर्गातील गाळयांना नियमाप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर विविक्षित प्रवर्गासाठी प्रतिसाद न मिळाल्याने बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे अशा सर्व प्रवर्गातील (एस.सी.,एस.टी., डी.टी., एन.टी.सोडून) रिक्त असलेले १० गाळे सर्वसाधारण जनता प्रवर्गात वळते करुन वाटप करण्यास मंजूरी देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २०८/२४</u>

विषय :- देवगड-जामसंडे, जिल्हा सिंधुदुर्ग येथे
श्री. राजाराम यशवंत सहस्त्रबुध्दे, जमिनमालक
सर्वे क्र.४२९ अ (१) च्या म्हाड
अधिनियम १९७६ कलम ५२ अंतर्गत भूसंपादनासाठी
अंतिम किंमतीस मंजूरी मिळण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१२८ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, देवगड-जामसंडे, जिल्हा सिंधुदुर्ग येथे श्री. राजाराम यशवंत सहस्त्रबुध्दे, जमिनमालक सर्वे क्र.४२९ अ (१) च्या म्हाड अधिनियम १९७६ कलम ५२ अंतर्गत भूसंपादनासाठी अंतिम किंमतीबाबत मूल्यनिर्धारण समितीने शिफारस केलेली सकृतदर्शनी रु. २०,०००/- प्रती गुंठा या किंमतीबाबत योग्य समर्थन देता येत नाही. रेडी रेकनरप्रमाणे जमिनीचा प्रतीगुंठा दर

रु. ११,०००/- अधिक ३० टक्के सोलेशियम आणि १२ टक्के व्याज मिळून सदर जमिनीचा प्रती गुंठा दर रुपये १५,६२०/- एवढाच येत असला तरी रु.१६०००/- प्रती गुंठा या दराने जमिनमालक सदर जमीन देण्यास तयार असेल तर ही बाब शासनाद्वारे स्थापित केलेल्या मूल्यनिर्धारण समितीने यावर फेरविचार करुन म्हाडास कळवावे.

बाब क्रमांक : २०८/२५

विषय :- भाडेपट्टा करारनामा संपुष्टात आल्यानंतर मिळकतीचे नुतनीकरणासाठी म्हाडाचे स्वतंत्र धोरण आखावे की, शासनाचे धोरण जारी झाल्यानंतर म्हाडाचे धोरण आखावे याबाबत मार्गदर्शनपर बाब..

ठराव क्रमांक : ६१२९ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, शासनाने अद्याप भाडेपट्टयाच्या नुतनीकरणाचे धोरण जारी केलेले नाही. यास्तव सध्या जे करारनामे भाडेपट्टयाच्या नुतनीकरण्यासाठी येतील अशा अर्जदाराकडून शासनाचे नविन धोरण ठरल्यानंतर नवीन दरानुसार येणारी फरकाची रक्कम भरण्यास तयार असलेबाबत प्रतिज्ञापत्र घ्यावे, ज्या अर्जदारांनी प्रतिज्ञापत्र सादर केले त्यांना पुढील ३० वर्षाच्या टप्प्यात नुतनीकरण जुन्या अटी, शर्ती व दराने करण्यात यावे. मात्र असे नुतनीकरण करुन देताना नुतनीकरणाच्या करारामध्ये शासन व प्राधिकरणाचे धोरण ठरुन जो भाडेपट्टयाचा दर नुतनीकरणाच्या संदर्भात लागू करेल त्याप्रमाणे भाडेपट्टा आकारण्यात येईल व त्याप्रमाणे भाडेपट्टा म्हाडाला अदा करणे लाभधारक संस्था / न्यास / महामंडळे इत्यादिं अशा सर्व लाभधारकांना बंधनकारक राहील असे स्पष्टीकरण नवीन करारनामा करताना करण्यात यावे. त्याचप्रमाणे इतर अनुज्ञेय असलेले, जसे मुद्रांकशुल्क इत्यादी लाभधारकास अदा करावे लागेल

<u>बाब क्रमांक : २०८/२६</u>

विषय :- श्री. अेम.बी.लोपीस, सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक यांच्या मुलाच्या रक्ताचा कर्करोग आजरात झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती बाबत.

ठराव क्रमांक : ६१३० **दिनांक : २४.८.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, श्री.एम.बी. लोपीस, सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक यांच्या मुलाच्या रक्ताचा कर्करोग आजारात झालेला खर्च रु. १,६४,४३७/- च्या देयकाची (खाजगी रुग्णालयातील उपचाराची अट शिथील करुन) प्रतिपूर्ती करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : २०८/२७</u>

विषय :- मौजे कोलेकल्याण येथील, मुंबई मंडळाच्या मालकीची जमीन, पाकिस्तान दूतावासास उपलब्ध करुन देण्या-बाबत..

ठराव क्रमांक : ६१३१ दिनांक : २४.८.२००५

एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. १५६/२३(पै), १५७/१, १५२/२(पै) सि.एस.टी.रोड, व्हिलेज कोलेकल्याण, सांताक्रुझ येथील मुंबई मंडळाच्या मालकीच्या जमिनीचा सुमारे ३९८७.४२ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड रु.१६,३००/- प्रती चौ.मी. दराने पाकिस्तान दूतावासाचे कार्यालय पुन्हा मुंबईत उघडण्यासाठी म्हाड (जमिनीची विल्हेवाट) अधिनियम १९८२ च्या विनियम ७ अन्वये "7 Disposal of land by offers to Government, local authority of public sector undertaking :-

Where the Authority determines to dispose of land by making offers, to the Government, local authority, public sector undertaking, public charitable trust or society registered under the Societies Registration Act, 1860 (XXI of 1860) such offers shall be made by the Chief Executive Officers in such form as may be determined by the Authority incorporating the terms and conditions of offers determined" सदर भूखंड वितरणाबाबत महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यात येते.

शासनाने पाकिस्तानचा दुतावास पुन्हा चालू करण्याकरीता भूखंड देण्यास मंजूरी दिल्यास, म्हाडास संबंधितांबरोबर भूखंडाचे अधिमुल्य आकारुन ३० वर्षासाठीचा (पुढे ३०-३० वर्षाच्या दोन कालावधीसाठी वाढविण्याची तरतूद असलेला) भाडेपट्टा करारनामा अंमलात आणण्याचे अटीस अधीन राहून वरील शिफारस करण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ९.०९.२००५ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित केलेल्या २०९ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २०९/२

विषय :- कुलाबा संक्रमण शिबीराचा पुनर्विकासासह लगतच्या झोपडयांच्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत पुनर्विकास व खुल्या बाजारात विक्रीसाठी निवासी इमारत बांधण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१३२ **दिनांक : ९.०९.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, भूखंड क्रमांक ९७ / सी, साधु वासवानी मार्ग, कफ परेड, कुलाबा मुंबई येथील अस्तित्वात असलेल्या संक्रमण शिबीराच्या भागशः पुर्नविकासाअंतर्गत प्रथम चरणात ६५६ संक्रमण गाळे बांधण्याचे काम शासनाच्या पुर्वरचित बांधकाम कंत्राटदाराच्या यादीतील सध्या पात्र असलेल्या मेसर्स बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी लिमिटेड यांना देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण खालील अटीवर मंजुरी देत आहे.

१. संक्रमण सदनिका १८० चौ. फुट चटई क्षेत्राच्या असतील व इमारती तळ + ७ मजली स्वरुपाच्या बांधण्यात येतील. शासकीय समितीच्या निर्णयानुसार (पत्र क्रमांक मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. / १४०४ / प्र.क्र. ५५ / गृनि.धो-२/ गृहनिर्माण विभाग / मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/०७/२००४) रु.८२४/- प्रती चौ. फुट इतका बांधकामाचा दर राहील व शासनाच्य दिनांक २२/०९/९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

२. शासनाचे दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार मोकळया जागेवरील प्रकल्पाकरिता बांधकामाचा कालावधी १८ महिने आहे. परंतु यापूर्वी झालेल्या पुर्नबांधणी प्रकल्पांचा अनुभव लक्षात घेता जुनी संक्रमण शिबीरे पाडून जागा मोकळी केल्याशिवाय नवीन गाळे बांधणी शक्य होत नाही. त्यामुळे यासाठी ३ महिन्याचा अतिरिक्त कालावधी कंत्राटदारास मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार काम सुरु केल्यापासून २१ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करावे. प्रस्तावित कामाची अंदाजित किंमत सुमारे २३.०४ कोटी इतकी राहील. तथापि सदर कामास महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे जे बदल होतील त्याप्रमाणे तितक्या रकमेनुसार योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

३. मे.बी.जी. शिर्के.कं.टे. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत ६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे निर्णय यापूर्वी प्राधिकरणाने सायन येथील मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. यांच्या कामावर दिनांक ०७/०८/२००४ ठराव क्रमांक ६०४८ अन्वये घेतलेला आहे.

४. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३० जुलै २००४ च्या पत्रानुसार वर नमुद केलेल्या दरात वाढ किंवा घट प्राईझ इंडेक्शशी आधारित म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.
स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

५. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणा-या पायाभूत बाहय सुविधांचे काम ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षाच्या असलेल्या प्रचलित दरसूची प्रमाणे देण्यात येईल.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

७. जुनी संक्रमण शिबीरे मुख्य अधिकारी / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी १२ महिन्याच्या आत स्थलांतरित करुन जागा मोकळी करुन देण्यात यावी. जेणेकरुन योजनेच्या प्रगतीस अडथळा येणार नाही.

८. यापुढे शहर भागात १८० प्रती चौ. फुटाच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात व उपनगरामध्ये २२५ प्रती चौ. फुट क्षेत्राच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात. यामुळे उपनगरामधील संक्रमण शिबीरात उत्सुकतेने रहायला जाण्याकरिता भाडेकरु तयार होतील.

९. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना अदा करण्यात येत असलेल्या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेस मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

१०. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. या आय एस.ओ.९००१ (I.S.O. 9001) प्राप्त कंपनी पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणा-या इमातींचे ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) या संस्थेकडून मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी आणावयाची आहे. आय.आय.टी.पवईच्या मंजूरीकरिता लागणारा खर्च मे.बि.जी.शिर्के क.टे.लि. यांनी द्यावा.

११. सदर योजनेचे काम टर्न की पध्दतीवर देण्यात येत असल्यामुळे सदर योजनेवर बाहय वास्तुशास्त्रज्ञ यांचे नियतकालीक (Periodic) देखरेख न ठेवता फक्त म्हाडा अभियंता मार्फत दैनंदिन देखरेख (Supervision) ठेवण्यात यावी व

देखरेखिकरिता इतर प्रकल्पाप्रमाणे म्हाडाच्या संमुचित अभियंत्यांची नेमणूक करण्यात यावी.

१२. यापूर्वी या प्रकल्पाकरिता मे. फिरोझ कुडियनवाला यांची वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक दिनांक ३१/०७/२००० रोजी केलेली आहे. व त्यांनी केलेल्या संक्रमण शिबीराच्या नियोजनापोटी रुपये ५.६० लाख फी अदा केलेली आहे. परंतु अंतीम देयक अंदाजे एकूण रुपये ६.५० लाख अपेक्षित आहे. तथापि करारनाम्यातील अट क्रमांक ९.३ (जी) नुसार कामाची व्याप्ती (Scope) कमी करण्यात यावी. कारण वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार करीत असलेल्या कामाचा अंतर्भाव मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांच्या रुपये ८२४/- प्रती चौ. फुट दरात अंतर्भूत आहे.

१३. संक्रमण शिबीराचे नियोजन व इतर अनुषंगित बाबींवर करारानुसार वास्तुशास्त्रज्ञा सल्लागारास अदा केलेली रक्कम मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांच्या देय रकमेतून वळती करण्यात यावी. अशी अट करारपत्रात अंतर्भूत करण्यात यावी.

१४. भविष्यात सदर वसाहतीमध्ये विक्री गाळयांचा प्रकल्प राबविणे नियोजित आहे. या गाळयांची विक्री करुन भविष्यात म्हाडाला निधी उपलब्ध होणार आहे त्यामुळे सदर योजनेचा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात यावा.

बाब क्रमांक : २०९/३

विषय :- स.क्र.२६३ (भाग) न.भू.क्र.६ अ (भाग) मालवणी, मालाड (प) मुंबई येथील म्हाडाच्या ताब्यातील भूखंडावरील नियोजित गृहनिर्माण योजनेचे काम मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टे.प्रा.लि .यांना देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१३३ **दिनांक : ९.०९.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक २६३ (भाग), सी. टी. एस. क्र.६ अ (भाग), मालवणी, मालाड (पश्चिम), भूखंडावर एस.आर.ए. योजनेनुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक घेऊन (डी.सी. रुल ३३.१४ डी) १९६६ संक्रमण सदनिका बाधण्याचे काम शासनाच्या पूर्वरचित बाधकाम कंत्राटदाराच्या यादीतील सध्या पात्र असलेल्या मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना देण्याच्या प्रस्तावास खालील अटींवर प्राधिकरण मंजुरी देत आहे. असे करीत असताना प्रथम १.२ चटई क्षेत्र निर्देशाअंतर्गत योजना मंजुर करुन घ्यावी व कामास सुरुवात करण्यात यावी.

१. दिनांक २६/०७/०५ रोजी झालेल्या अतिवष्टीमुळे धोकादायक झालेल्या उपकर प्राप्त इमारतींमधील भाडेकरुंना स्थलांतरित करण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणात संक्रमण सदनिकांची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे तसेच उपकर प्राप्त इमारती मोठया प्रमाणावर जीर्ण होत असल्यामुळे यापुढे मोठया प्रमाणावर संक्रमण सदनिकांची गरज भासणार आहे. त्यामुळे या भूखंडावर इतर विक्री योग्य सदनिका न बांधता संपूर्ण संक्रमण सदनिका बांधण्यात याव्यात. संक्रमण सदनिका २२५ चौ. फुट चटई क्षेत्राच्या असाव्यात व तळ + ७ मजली इमारती बांधण्यात याव्यात. शासकीय समितीच्या निर्णयानुसार (पत्र क्रमांक मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. / १४०४ / प्र.क्र. ५५ / गृनि.धो-२/ गृहनिर्माण विभाग / मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/०७/२००४) रु.८२४/- प्रती चौ. फुट इतका बांधकामाचा दर राहील व शासनाच्य दिनांक २२/०९/९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

२. सदर काम सुरु केल्यापासून १८ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावे. प्रस्तावित कामाची अंदजित किंमत रु.८६.९३ कोटी इतकी राहील. सदर कामास महानगर पालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

३. मे.बी.जी. शिर्के.कं.टे. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत ६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे निर्णय यापूर्वी प्राधिकरणाने सायन येथील मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. यांच्या कामावर दिनांक ०७/०८/२००४ ठराव क्रमांक ६०४८ अन्वये घेतलेला आहे.

४. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३० जुलै २००४ च्या पत्रानुसार वर नमुद केलेल्या दरात वाढ किंवा घट प्राईझ इंडेक्शशी आधारित म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.
स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

५. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणा-या पायाभूत बाहय सुविधांचे काम ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षाच्या असलेल्या प्रचलित दरसूची प्रमाणे देण्यात येईल.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा

इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

७. यापुढे शहर भागात १८० प्रती चौ. फुटाच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात व उपनगरामध्ये २२५ प्रती चौ. फुट क्षेत्राच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात. यामुळे उपनगरामधील संक्रमण शिबीरात उत्सुकतेने रहायला जाण्याकरिता भाडेकरु तयार होतील.

८. सदर योजनेचे काम टर्न की पध्दतीवर देण्यात येत असल्यामुळे मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना अदा करण्यात येणा-या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेस मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

९. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. या आय.एस.ओ.९००१ (**I .S.O.** ९००१) प्राप्त कंपनी पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणा-या इमातींचे ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) या संस्थेकडून मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी आणावयाची आहे. आय.आय.टी.पवईच्या मंजूरीकरिता लागणारा खर्च मे.बी.जी.शिर्के कं.टे.लि. यांनी द्यावा.

१०. म्हाडाने या भूखंडावरील पुनर्वसन प्रकल्पावर रु.२६५/- लाख एवढा खर्च केला आहे. यापैकी अंतर्गत सुविधा कामांवर करण्यात आलेला खर्च रु.१६०/- लाख संदरील संक्रमण गाळयांची प्रस्तावित योजना राबविल्यामुळे निरुपयोगी ठरणार आहे. त्यामुळे हा खर्च निर्लेखित करण्यास प्राधिकरण मंजुरी देत आहे.

११. सदरची जमिन शासनाने म्हाडास गजधर बांध येथील झोपडपट्टी पुर्नवसन योजनेमध्ये 'सुविधांसह भूखंड' योजनेखाली दिली आहे व त्याप्रमाणे योजना राबविण्यात आली. तथापि गजधर बांध येथील नागरिकांना इतर ठिकाणी सामावून घेण्यात आल्यामुळे सदरची जागा इतर कारणांसाठी वापरण्यास उपलब्ध होऊ शकते. तथापि शासनाची परवानगी घेण्यासाकरिता विनंती केली आहे. ही योजना राबविण्याबाबत शासनाकडून सदर जमिन संक्रमण गाळे बांधण्यासाठी वापरण्यास परवानगी मिळाल्यानंतरच मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना कार्यादेश देण्यात यावेत.

१२. या भूखंडावर राबविलेल्या अंतर्गत सुविधा कामाचे तोड काम आवश्यकतेनुसार मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी करावयाचे आहे.

१३. यापूर्वी राबविलेल्या अंतर्गत सुविधा कामामधील पुन्हा वापरण्यात येणारे बाधकाम साहित्य प्रस्तावित योजनेत आवश्यकतेप्रमाणे वापरण्यात यावे व त्यानुसार तेवढयाप्रमाणे मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांच्याकडून वसुली करण्यात यावी.

१४. सदरील योजना शासनाकडून उपलब्ध होणा-या उपकर निधीतून कार्यान्वित करण्यात यावी. तथापि शासनाकडून निधी येईपर्यत प्राधिकरणाच्या निधीतून योजनेवर खर्च करण्यात यावा.

<u>बाब क्रमांक : २०९/४</u>

विषय :- सर्व्हे क्र.४८, चेंबूर मुंबई येथील संक्रमण शिबिराची पुर्नबांधणी प्रकल्प अंतर्गत नवीन संक्रमण गाळे व खुल्या विक्रीसाठी सदनिका बांधण्याचा एकरकमी ठेका मेसर्स बी.जी.शिर्के कन्स्ट्र.टे.प्रा.लि.यांना देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१३४ दिनांक : ९.०९.२००५

एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक ४८, चेबुर, मुंबई येथे संक्रमण शिबीर गाळे व विक्री गाळे बाधण्याचे काम शासनाच्या पुर्वरचित बांधकाम कंत्राटदाराच्या यादीतील सध्या पात्र असलेल्या मेसर्स बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी लिमिटेड यांना देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण खालील अटीवर मंजुरी देत आहे.

१. **अ]** संक्रमण सदनिका २२५ चौ. फुट चटई क्षेत्राच्या असतील व इमारती तळ + ४ मजली स्वरुपाच्या बांधण्यात येतील शासकीय समितीच्या निर्णयानुसार (पत्र क्रमांक मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. / १४०४ / प्र.क्र. ५५ / गृनि.धो-२/ गृहनिर्माण विभाग / मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/०७/२००४) रु.८०५/- प्रती चौ. फुट इतका बांधकामाचा दर राहील व शासनाच्य दिनांक २२/०९/९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

ब] विक्री गाळयांचा (तळ + ७) बांधकामाचा दर शासन निर्णयानुसार रुपये ८२४/- प्रती चौ. फुट असा राहील. शासनाच्या दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

२. शासनाचे दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार मोकळया जागेवरील प्रकल्पाकरिता बांधकामाचा कालावधी १८ महिने आहे परंतु यापूर्वी झालेल्या पुर्नबांधणी प्रकल्पांचा अनुभव लक्षात घेता जुनी संक्रमण शिबीरे पाडून जागा मोकळी केल्याशिवाय नवीन गाळे बांधणी शक्य होत नाही. त्यामुळे यासाठी ३ महिन्याचा अतिरिक्त कालावधी कंत्राटदारास मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार काम सुरु केल्यापासून २१ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करावे. प्रस्तावित कामाची अंदाजित किंमत सुमारे ७०.२३ कोटी इतकी राहील. तथापि सदर कामास महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे जे बदल होतील त्याप्रमाणे तितक्या रकमेनुसार योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

३. मे.बी.जी. शिर्के.कं.टे. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत ६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे निर्णय यापूर्वी प्राधिकरणाने सायन येथील मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. यांच्या कामावर दिनांक ०७/०८/२००४ ठराव क्रमांक ६०४८ अन्वये घेतलेला आहे.

४. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३० जुलै २००४ च्या पत्रानुसार वर नमुद केलेल्या दरात वाढ किंवा घट प्राईझ इंडेक्शशी आधारित म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.
स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

५. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणाऱ्या पायाभूत बाहय सुविधांचे काम ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षाच्या असलेल्या प्रचलित दरसूची प्रमाणे देण्यात येईल.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

७. जुनी संक्रमण शिबीरे मुख्य अधिकारी / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी १२ महिन्याच्या आत स्थलांतरित करुन जागा मोकळी करुन देण्यात यावी. जेणेकरुन योजनेच्या प्रगतीस अडथळा येणार नाही.

८. यापुढे शहर भागात १८० प्रती चौ. फुटाच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात व उपनगरामध्ये २२५ प्रती चौ. फुट क्षेत्राच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात. यामुळे उपनगरामधील संक्रमण शिबीरात उत्सुकतेने रहायला जाण्याकरिता भाडेकरु तयार होतील.

९. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना अदा करण्यात येत असलेल्या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेस मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

१० मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. या आय.एस.ओ.९००१ (**I.S.O .9001)** प्राप्त कंपनी पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणा-या इमातींचे ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) या संस्थेकडून मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी आणावयाची आहे. आय.आय.टी.पवईच्या मंजूरीकरिता लागणारा खर्च मे.बि.जी.शिर्के क.टे.लि. यांनी द्यावा

११. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडाला कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास त्याची जबाबदारी शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांच्यावर राहील व होणा-या नुकसानीचे मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. भरपाई करेल. या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र (लेटर) घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्याच्या संबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.

१२. सदर योजनेतील खुल्या विक्रीचे गाळयांसाठी जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्या नंतर देण्यात यावी जेणेकरुन गाळयांना चांगला प्रतिसाद येईल.

१३. सदर वसाहतीमध्ये विक्री गाळयांचा प्रकल्प राबविणे नियोजित आहे. या विक्री गाळयांची विक्री करुन म्हाडाला निधी उपलब्ध होऊ शकेल त्यामुळे सदर वसाहतीमध्ये संक्रमण शिबीराचे व विक्री गाळयांचे बांधकाम म्हाडाच्या निधीतून करण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : २०९/५</u>

विषय :- सी.एस.क्र.५०१ धारावी, मुंबई येथील संक्रमण शिबिराची पुर्नबांधणी, प्रकल्प अंतर्गत नवीन संक्रमण गाळे व खुल्या विक्रीसाठी सदनिका बांधण्याचा एकरकमी ठेका मेसर्स बी.जी.शिर्के कन्स्ट्र.टे.प्रा.लि.यांना देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१३५ **दिनांक : ९.०९.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक ५०१, धारावी, मुंबई येथील भूखंडावर १.५९६ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार २७६८ संक्रमण सदनिका बाधण्याचे काम शासनाच्या पूर्वरचित बाधकाम कंत्राटदाराच्या यादीतील सध्या पात्र असलेल्या मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना देण्याच्या प्रस्तावास खालील अटींवर प्राधिकरण मंजुरी देत आहे. भविष्यात शासनाकडून २.५ चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर झाल्यास अतिरिक्त अंदाजे १८२४ संक्रमण गाळे (एकूण २७६८ + १८२४ = ४५९२ संक्रमण गाळे) बांधण्यास प्राधिकरण मंजुरी देत आहे.

१. दिनांक २६/०७/०५ रोजी झालेल्या अतिवष्टीमुळे धोकादायक झालेल्या उपकर प्राप्त इमारतींमधील भाडेकरुंना स्थलांतरित करण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणात संक्रमण सदनिकांची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे तसेच उपकर प्राप्त इमारती मोठया प्रमाणावर जीर्ण होत असल्यामुळे यापुढे मोठया प्रमाणावर संक्रमण सदनिकांची गरज भासणार आहे. त्यामुळे या भूखंडावर संपूर्ण संक्रमण सदनिका बांधण्यात याव्यात. संक्रमण सदनिका १८० चौ. प्रती. फुट चटई क्षेत्राच्या असाव्यात व तळ + ७ मजली इमारती बांधण्यात याव्यात. शासकीय समितीच्या निर्णयानुसार (पत्र क्रमांक मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. / १४०४ / प्र.क्र. ५५ / गृनि.धो-२/ गृहनिर्माण विभाग / मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/०७/२००४) रु.८२४/- प्रती चौ. फुट इतका

बांधकामाचा दर राहील व शासनाच्य दिनांक २२/०९/९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

२. शासनाचे दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार मोकळया जागेवरील प्रकल्पाकरिता बांधकामाचा कालावधी १८ महिने आहे. परंतु यापूर्वी झालेल्या पुर्नबांधणी प्रकल्पांचा अनुभव लक्षात घेता जुनी संक्रमण शिबीरे पाडून जागा मोकळी केल्याशिवाय नवीन गाळे बांधणी शक्य होत नाही. त्यामुळे यासाठी ३ महिन्याचा अतिरिक्त कालावधी कंत्राटदारास मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार काम सुरु केल्यापासून २१ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करावे. प्रस्तावित कामाची अंदाजित किंमत सुमारे ९५.३५ कोटी इतकी राहील. तथापि सदर कामास महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे जे बदल होतील त्याप्रमाणे तितक्या रकमेनुसार योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

३. मे.बी.जी. शिर्के.कं.टे. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत ६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे निर्णय यापूर्वी प्राधिकरणाने सायन येथील मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. यांच्या कामावर दिनांक ०७/०८/२००४ ठराव क्रमांक ६०४८ अन्वये घेतलेला आहे.

४. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३०/०७/२००४ च्या पत्रानुसार वर नमुद केलेल्या दरात वाढ किंवा घट प्राईझ इंडेक्शशी आधारित म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.
स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

५. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणाऱ्या पायाभूत बाहय सुविधांचे काम ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षाच्या असलेल्या प्रचलित दरसूची प्रमाणे देण्यात येईल.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

७. जुनी संक्रमण शिबीरे मुख्य अधिकारी / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी १२ महिन्याच्या आत स्थलांतरित करुन जागा मोकळी करुन देण्यात यावी. जेणेकरुन योजनेच्या प्रगतीस अडथळा येणार नाही.

८. यापुढे शहर भागात १८० प्रती चौ. फुटाच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात व उपनगरामध्ये २२५ प्रती चौ. फुट क्षेत्राच्या संक्रमण सदनिका बांधाव्यात. यामुळे उपनगरामधील संक्रमण शिबीरात उत्सुकतेने रहायला जाण्याकरिता भाडेकरु तयार होतील.

९. सदर योजनेचे काम टर्न की पध्दतीने देण्यात येत असल्यामुळे मे. बी. जी. शिकै. कं. टे. लि. यांना अदा करण्यात येत असलेल्या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेस मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

१०. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. या आय.एस.ओ.९००१ (**I .S.O.** ९००१) प्राप्त कंपनी , पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणा-या इमातींना ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) या संस्थेकडून मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी आणावयाची आहे. आय.आय.टी.पवईच्या मंजूरीकरिता लागणारा खर्च मे.बि.जी.शिर्के कं.टे.लि. यांनी द्यावा.

११. सदरील योजना शासनाकडून उपलब्ध होणा-या उपकर निधीतून कार्यान्वित करण्यात यावी. तथापि शासनाकडून निधी उपलब्ध होईपर्यत योजनेवर प्राधिकरणाच्या निधीतून खर्च करण्यात यावा.

बाब क्रमांक : २०९/६

विषय :- स.क्र.९८ व ९९ गोखलेनगर, पुणे येथील उच्च उत्पन्न गटांतर्गत ३३ गाळे, १८ दुकाने व ३ कार्यालयीन गाळे या योजनेच्या भूखंडावरील २ दुकानदारांना योजनेतील २ दुकानांचे वाटप करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१३६ **दिनांक : ९.९.२००५**

एकमताने निर्णय घेतला कीं, इतर निविदाकारांनी नमूद केलेल्या दरांचे सरासरी (Average) काढून त्या दराने प्रस्तावित दोन दुकानांचे वाटप करावे. सदर ठराव शासनाच्या मंजूरीनंतर अंमलात येईल.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : १३.१०.२००५ रोजी दुपारी १२.३० वा. आयोजित केलेल्या २१० व्या बैठकीचे कार्यवृत्त

.....

बाब क्रमांक : २१०/२

विषय :- औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे बांधण्यात आलेल्या गृहनिर्माण भवनाजवळील इमारत क्र.१ मधील पहिल्या मजल्यावरील एक हॉल लोक शाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.) यांना विकत देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१३७ दिनांक : १३.१०.२००५

एकमताने निर्णय घेतला की, मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी दिलेले समर्थन विचारात घेऊन इमारत क्रमांक १ मधील एक हॉल क्र. १ (क्षेत्रफळ १५८.३३ चौरस मीटर) यापूर्वी जाहिरात देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.) (शासनाचा अंगिकृत उपक्रम) यांनी केलेल्या अर्जास अनुसरुन रु.१०,७६४/- प्रती चौ.मी. बिल्टअप एरिया या अपसेट प्राईजने मालकी हक्काने विक्री करण्यास मान्यता देण्यात येते. बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे नेहमीच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे लागू राहातील.

१. मंडळाच्या/प्राधिकरणाच्या लिखित पूर्वपरवानगीशिवाय हॉलचे हस्तांतरण/विक्री करता येणार नाही.

२. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम व त्या अंतर्गतचे नियम/विनियमातील
तरतूदी/अटी व त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल लागू असतील.

३. हॉलचा ताबा आहे त्या स्थितीत/परिस्थितीत घ्यावा लागेल.

४. विद्युत पुरवठा अनामत रक्कम आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने दिलेली देयके परस्पर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे त्यांनी ठरवून दिल्याप्रमाणे भरावे लागेल.

५. पाणीपुरवठा शुल्कात मालमत्ता कर औरंबाद महानगरपालिके परस्पर भरावे लागेल.

६. भुईभाडयाची रक्कम अपेक्षित एकत्रित मुल्यामध्ये समाविष्ट करुन (जमिनीच्या मुल्याच्या रकमेच्या २.५ टक्के प्रामणे वार्षिक) भरावी लागेल. त्याशिवाय महसूल विभागाच्या प्रचलित दराप्रमाणे अकृषित कर भरावा लागेल.

बाब क्रमांक : २१०/३

**विषय :- नाशिक मंडळा अंतर्गत दिंडोरी रोड, पंचवटी,
नाशिक येथील १६ व्यापारी दुकानांपैकी रिक्त
२ दुकाने क्र.८ व ९ विक्री बाबत.**

<u>ठराव क्रमांक : ६१३८</u> **दिनांक : १३.१०.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, पंचवटी, दिंडोरी रोड, नाशिक येथील १६ दुकानांपैकी रिक्त असलेल्या २ दुकानांपैकी दुकान क्रमांक ८ करिता श्रीमती हर्षदा रविंद्र आवळे यांनी रु.४२२८/- प्रती चौ.मी. प्रमाणे दिलेला देकार (जो समतल दर रु. ११,०८३/- या पेक्षा कमी आहे) स्वीकृत करण्यात येत आहे.

तद्नुसार दुकान क्रमांक ८ चे वाटप करण्यात यावे. दुकान क्रमांक ९ करिता पुन्हा वाटपासाठी तात्काळ फेर निविदा मागविण्यात याव्यात.या योजनेचे नियोजन योग्य प्रकारे झाले नाही असे मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी यांच्या टिप्पणीत नमूद केले आहे. त्यामुळे चुकीच्या नियोजनामुळे होणा-या नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

<u>बाब क्रमांक : २१०/४</u>

विषय :- भुकर पहाणी क्र.२५२, गिरगांव विभाग, विभाग क्र.डी-७१६ इ.क्र. १३, बोरभाट लेन, मुंबई येथील ''नाझरे बिल्डिंग'' नांवाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१३९ **दिनांक : १३.१०.२००५**

एकमताने निर्णय घेतला की, भूकर पहाणी क्र.२५२, गिरगांव विभाग, क्र.डी-७१६, इमारत क्रमांक १३, बोरभाट लेन, मुंबई येथील ''नाझरे बिल्डिंग' नांवाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र चर्चेत उल्लेख केल्याप्रमाणे सदर इमारतीतील खोली क्र. १६-ए मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर एक्स्ट्रॅक्टमध्ये आढळत नसल्याने सदर खोलीतील रहिवाशी वगळण्यात यावा. सदर रहीवाशी वगळल्यानंतर संपूर्ण योजनेची पुर्नबांधणी बी.एम.सी.एक्स्ट्रॅक्टप्रमाणे खालीलप्रमाणे असेल :---

1. Plot Area : 265.05 Sq. mt.
2. Permissible built-up area with FSI 2.5 :662.62Sq. mt.

3.	Total Carpet area required for Re-housing to existing occupiers	:610.25Sq.mt.
4.	Add. 20% to the carpet area (3) above to convert in to built-up (610.25 x 1.2)	:732.30Sq.mt.
5.	Add. 50% incentive built up area in (4) Above.	:366.15Sq.mt.
6.	Total (4 + 5)	: 1098.45Sq.mt.
7.	FSI to be utilized	:1098.45 ----------X100 = 4.14 265.05
8.	Since the FSI @ (7) above in more than 2.5 the permissible built uparea will be	:1098.45Sq.mt.
9.	Surplus area (Saleable)	:366.15Sq.mt.
10.	% age of surplus area	:366.15 --------X100=33.33 % 1098.45

वर नमूद करण्यात आलेल्या गणनेच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : १९.१०.२००५ रोजी दुपारी ४.०० वा. आयोजित केलेल्या २११ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २११/२

विषय :- मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींची तांत्रिकदृष्टया पहाणी व सर्व्हेक्षण करण्याकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अभियंत्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आय.आय.टी., मुंबई यांचेबरोबर सामंजस्य करार करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१४० **दिनांक : १९.१०.२००५**

एकमताने निर्णय घेतला की,

१) मुंबई शहर बेटावरील उपकर प्राप्त इमारतींची तांत्रिकदृष्टया पहाणी व सर्वेक्षण करण्याकरिता आय.आय.टी. तज्ञांकडून प्रशिक्षण घेण्यासंबंधी सांमजस्य करार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) आय.आय.टी.ने. ठरविलेल्या कार्यक्रमातील पहिल्या टप्प्यामध्ये अंतर्भूत असलेले मुद्दे -

अ) वेगवेगळया प्रकाराने बांधलेल्या इमारतींची सद्यःस्थिती निश्चित करण्यासाठी मानक वा पध्दत ठरविणे.

ब) इमारतीच्या स्थितीचे घटनात्मक मूल्यमापन करुन इमारतीच्या सुरक्षिततेची पातळी ठरविणे.

I. नुसत्या नजरेने पहाणी करणे, ii. जरुरीप्रमाणे Non Disstractive चाचणी करणे, iii. Numeracal Simulation पध्दतीने चाचणी करणे.

३) मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची काटेकोरपणे पाहणी करुन उपाययोजना निश्चित करण्यासाठी म्हाडाच्या अभियंत्यांना सक्षम करण्यास सहाय्य करणे.

वरील टप्पा क्र.१ मधील कामांना तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. तसेच या बाबतचे निर्णय घेणे व आय.आय.टी. पवईतर्फे कळविण्यांत आल्याप्रमाणे टप्पा १ मधील कामांसाठी रु. २४ लाख + सर्व्हीस टॅक्स, शिक्षण कर, (सद्या १०.२ टक्के) शिवाय या चाचण्यांसाठी लागणारे साहित्य व सॉफ्टवेअरसाठी लागणा-या अतिरिक्त खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

४) आय.आय.टी.च्या प्रस्तावातील दुस-या टप्प्यानुसार दुरुस्ती व पुनर्वसनासाठी निवडक इमारतींवर तंत्रशुध्द पध्दतीचा वापर करणेबाबतचा प्रस्ताव व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यांत येत आहेत.

५) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील सुमारे १६३७८ मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मकदृष्टया परिपूर्ण तांत्रिक सर्वेक्षण त्रयस्थ तज्ञ व्यक्तींकडून (out sourcing agency) करुन घेण्याच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. तसेच येणा-या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यांत येत आहेत. सदर होणारा खर्च मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने त्यांच्या अर्थसंकल्पातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

६) तांत्रिक स्वरुपाचे मार्गदर्शन तांत्रिक विभागाच्या सर्व स्तरातील अधिकारी वर्गास दिले जावे.

७) वरील निर्णयाबाबत प्रेस-नोट प्रसिध्द करण्यात यावी.

<u>बाब क्रमांक : २११/ ७</u>

विषय :- नांदेड जिल्हयातील गट क्र.६७९ (भाग), मौजे अर्धापुर व गट क्र.४५५(भाग) मौजे मुदखेड येथे राष्ट्रीय गृहनिर्माण योजने अंतर्गत बांधलेल्या गाळयांच्या वाटपाबाबत - गाळा ताब्यात घेण्यापूर्वी भरावी लागणा-या रक्कमेचे (आयडीपी) हप्ते पाडून देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१४१ दिनांक : १९.१०.२००५

एकमताने निर्णय घेतला की,विषयांकीत योजनेकरीता पूर्वीच निश्चित केलेल्या लाभार्थीना प्राथमिक अदायगीची रक्कम २४ मासिक हप्त्याने भरण्याची मुभा देण्याबाबत मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळाने केलेल्या समर्थनास अनुसरुन प्राधिकरण पुढीलप्रमाणे मंजूरी देत आहे.

अ) एकूण प्राथमिक अदायगीपैकी (I.D.P.) अत्यल्प उत्पन्न गटातील (ई.डब्ल्यू.एस.) लाभार्थींकडून रु. ५०००/- आणि अल्प उत्पन्न गट (एल.आय.जी.) लाभार्थींकडून रु. ७,५००/- या रकमेचा प्रथम भरणा करुन घ्यावा व उर्वरित (I.D.P.) रक्कम योजनेच्या व्याज दराने २४ महिन्यात वसुल करण्यात यावी.

याच मासिक हप्त्यासह गाळयाच्या उर्वरित किंमतीचा नियमित भाडे खरेदी मासिक हप्ता देखील वसुल करण्यात यावा.

ब) वरील प्रमाणे गाळयाचा ताबा देण्यापूर्वी सुरुवातीस भरावयाची/प्राथमिक अदायगीच्या (I.D.P.)रक्कमेपैकी फरकाची रक्कम लाभार्थी सव्याज भरतील अशा आशयाचे क्षतिपूर्ती बंधपत्र नियमानुसार योग्य किंमतीच्या मुद्रांक पत्रावर घेण्यात यावे.

क) वरील मुभा ही फक्त या योजनेतील निश्चित मागणी नोंदविलेल्या व बांधलेल्या घरांच्या संख्येसाठीच लागू असेल. म्हणजेच या योजनेतील घरे जर भविष्यात मागणीनुसार घेण्यात आली तरी ही सवलत त्यांना अनुज्ञेय राहाणार नाही.

<u>बाब क्रमांक : २११/ ८</u>

विषय :- ४८ गाळे अत्यल्प उत्पन्न गट, स.क्र.७०१/४ (भाग) मुरुड, जि.लातूर येथील हमाल मापाडी मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांकरिताची गृहनिर्माण योजनेतील गाळे वाटपाबाबत - गाळा ताब्यात घेण्यापूर्वी भरावी लागणा-या रकमेचे (आय.डी.पी.) हप्ते पाडून देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक : ६१४२</u> **दिनांक : १९.१०.२००५**

एकमताने निर्णय घेतला की,विषयांकीत योजनेतील गाळे रिक्त राहू नये या अनुषंगाने तसेच निश्चित केलेल्या लाभार्थींनी प्राथमिक अदायगीची रक्कम १२ मासिक हप्त्याने भरण्याबाबत मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळाने केलेल्या समर्थनास अनुसरुन प्रस्तावास मंजुरी देण्यात येते आहे.

अ) एकूण प्राथमिक अदायगीपैकी (I.D.P.) पैकी लाभार्थीनी रु. ५०००/- प्रथम भरावे. या रक्कमे खेरीज उर्वरित प्राथमिक अदायगी रक्कम १० टक्के द.सा.द.शे. (I.D.P.) व्याज दराने १२ महिन्यात वसुल करण्यात यावी. याच मासिक हप्त्यासह गाळयाच्या किंमतीचा नियमित मासिक भाडेखरेदी हप्ता देखील वसुल करण्यात यावा.

ब) वरील प्रमाणे गाळयाचा ताबा देण्यापूर्वी सुरुवातीस भरावयाची/प्राथमिक अदायगीच्या रक्कमेपैकी फरकाची रक्कम लाभार्थी सव्याज भरतील अशा आशयाचे क्षतिपूर्ती बंधपत्र नियमानुसार योग्य किंमतीच्या मुद्रांक पत्रावर घेण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : २११/ ९</u>

विषय :- आयकर खात्यास प्रपत्र क्रमांक १० सोबत प्राधिकरणाने द्यावयाचा ठराव.

ठराव क्रमांक : ६१४३ **दिनांक : १९.१०.२००५**

"Resolved that entire revenue surplus of MHADA for the Assessment year 2005-2006 corresponding to Financial year 2004-2005, shall be utilised applied on the object of MHADA during the next five consecutive financial years beginning from 2005-2006 and particularly on schemes as mentioned in the budget for the financial year 2005-2006 as required U/S.11 of the Income Tax Act.1961".

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ३१.०१.२००६ रोजी दुपारी ३.०० वा.आयोजित केलेल्या २१२ व्या बैठकीचे कार्यवृत्त

<u>बाब क्रमांक : २१२/२</u>

विषय :- शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत.

ठराव क्रमांक : ६१४४ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, शासन निर्णय क्रमांक एमएजी/२००५/९/ प्र.क्र.१ आरोग्य-३, दिनांक : १९ मार्च, २००५ हा म्हाडा अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट " अ " व " ब " समवेत शासन निर्णयातील अटी आणि शर्तीच्या अधिन राहून शासन निर्णयाच्या दिनांकापापसून लागू करण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१२/५</u>

विषय :- राज्य शासनाच्या पोलीस कर्मचा-यांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१४५ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीतील प्रस्ताव आणि मा. पोलीस आयुक्त, मुंबई पोलीस यांनी शासनास पाठविलेले दिनांक : १३/०१/२००६ रोजीचे पत्र क्रमांक ३९/पोआ/ कक्ष - ५ / पोकनि /०६ विचारात घेऊन विनियम ६ (३) ऐवजी विनियम १३ (२) खाली प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे शिफारस करण्यांत येत आहे. सदनिकेचा दर प्रत्येकी रु. १७५०/- असावा. एकूण ६२० अर्जदार पोलीस कर्मचा-यांची यादी पोलीस विभागाकडून प्राप्त करुन घेण्यात यावी. त्यासाठी वेगळी जाहिरात देण्याची आवश्यकता नाही.

<u>बाब क्रमांक : २१२/७</u>

विषय :- एस.ई.रेल्वे को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, खामला, नागपूर येथील सोसायटीच्या सभासदांना मालकी हक्कावर भूखंडाचे हस्तांतरण करणेबाबत (शासनाचे दि.५.०९.२००५ चे पत्रानुसार)

ठराव क्रमांक : ६१४६ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेण्यात आला की, शासनाचे दि. ५.९.२००५ चे पत्रानुसार एस.ई. रेल्वे को-ऑप.हौसिंग सोसायटी, खामला, नागपूर या संस्थेच्या ३६ भूखंडधारक सभासदांना त्यांच्या भूखंडाचे मालकीहक्क परत करण्याच्या कार्यवाहीस पुढील अटींनुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ) मंडळाने ज्या गाळेधारकांना गाळयाचे विक्रीखत व भूखंडाचा भाडेपट्टा करुन दिलेला आहे त्या गाळेधाकरांच्या भूखंडाचा भाडेपट्टी करार रद्द करुन भूखंडाचे मालकी हक्काचे तबदील दस्त करुन गाळेधारकांना भूखंडाचा मालकी हक्क परत करण्यात यावा.

ब) ज्या गाळेधारकांनी गाळयाचे विक्रीखत व भूखंडाचा भाडेपट्टीकरार मंडळाकडून करुन घेतलेला नाही त्यांना गाळा व भूखंडाचे संयुक्तरित्या मालकी हक्काचे तबदील दस्त करुन देण्यात यावे.

क) गाळेधारकांना भूखंडाचा वैयक्तिक मालकी हक्क देतेवेळी एस.ई.रेल्वे एम्प्लॉईज को-ऑप.हौसिंग सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

शासनाने दि. ५.९.२००५ च्या पत्रातील आदेशानुसार वर नमूद केल्याप्रमाणे वैयक्तिक गाळेधारकाला भूखंडाचा मालकी हक्क देण्यासाठी मालकी हक्काचे तबदील दस्त मंजूर करावे.

<u>बाब क्रमांक : २१२/ ८</u>

विषय :- स.क्र.१५०,१५२,१५३ (भाग) मोरवाडी, पिंपरी-वाघीरे येथील टप्पा-१ अंतर्गत ६०० सदनिकांची संमिश्र योजना (२४० उच्च/ मध्यम व ३६० अल्प उत्पन्न गट) मागणी अभावी रिक्त असलेल्या ६५ एलआयजी + ३ एचआयजी/एमआयजी सदनिकांची सवलतीच्या किंमतीने विक्री करणेबाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६१४७ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेण्यात आला की, उक्त योजनेतील रिक्त ६५ एल.आय.जी.गाळयांची विक्री रु. ६०१/- प्रती चौ.फूट आणि एच.आय.जी./एम.आय.जी.-३ गाळे रु. ७२९/- प्रती चौ.फूट या दराने विक्री करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच ज्या अर्जदारांना गाळयाचे सुशोभिकरण मंडळाकडून करुन घ्यावयाचे असल्यास त्यासाठी होणा-या रु. ५०/- प्रती चौ.फूट खर्चाची आकारणी वरील किंमतीमध्ये समाविष्ट करावी.

उपरोक्त योजनेतील वर नमूद केलेले रिक्त गाळे ज्या किंमतीने आता विकावे लागणार आहेत त्यामुळे होणा-या आर्थिक परिणामाची [बाब टिप्पणीत विशद केलेले विश्लेषणाची केल्याप्रमाणे] नोंद घेण्यात आली.

<u>बाब क्रमांक : २१२/९</u>

विषय :- मुंबई मंडळांतर्गत मोकळया भूखंडावरील निवासी व अनिवासी गाळे बांधण्याचे टर्न की योजनांच्या कामामध्ये झालेल्या वाढीव कामास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१४८ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत मोकळया भूखंडावरील टर्न की पध्दतीने निवासी/अनिवासी गाळे बांधण्याच्या १४ योजनांचे जोडपत्र-१ मध्ये नमूद केलेले वाढीव काम, योजनेसाठी नियुक्त केलेल्या ठेकेदारांकडून स्विकृत दरानूसार करण्यास मंजूरी देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २१२/१०</u>

विषय :- अंदाजपत्रकीय योजनेच्या मूळ तरतुदीमध्ये २५ टक्के पर्यंत वाढ व अनवधानाने अंदापत्रकात तरतूद करावयाची राहून गेलेली / अचानक काही नवीन कामे अंदाज पत्रकात नंतर समाविष्ठ करण्याचे अधिकाराबाबत.

ठराव क्रमांक : ६१४९ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेण्यात आला की, प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकात असलेल्या तरतूदीत वाढ करावयाचे अधिकार जरी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आले असले तरी त्यावर मर्यादा ठेवणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रकीय योजनेच्या मूळ तदतुदीमध्ये २५ टक्के पर्यंत वाढ करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना असावेत त्यापेक्षा जास्त वाढ करावयाची असल्यास प्राधिकरण बैठकीत बाब टिप्पणी निर्णयासाठी आणली जावी. अनवधानाने अंदाजपत्रकात तरतूद करावयाची राहून गेली असेल तर किंवा अचानक काही नवीन कामे नंतर अंदाजपत्रकात समाविष्ठ करण्याची जरुरी भासली तर अशी प्रकरणे मान्यतेसाठी प्राधिकरणापुढे सादर करण्यात यावी.

<u>बाब क्रमांक : २१२/११</u>

विषय :- पंतनगर, घाटकोपर येथील इमारत क्र.१४३ च्या मागील भूखंडावर म्हाड (मिळकत व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम-१९८१ मधील विनियम १३ (२) अंतर्गतच्या तरतुदीनुसार विशिष्ट प्रवर्गाच्या संस्थेकरीता योजना राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१५० **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेण्यात आला की, पंतनगर घाटकोपर येथील इमारत क्र.१४३ च्या मागील भूखंडावर म्हाड (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, हस्तांतरण आणि अदला बदल) विनियम १९८१ मधील विनियम १३ (२) अंतर्गत तरतूदी नुसार केंद्रीय अन्वेषण ब्युरो (C.B.I.) भ्रष्टाचार विरोधक शाखा मुंबई यामधील कर्मचा-यांच्या शिवसाई सहकारी गृहनिर्माण संस्था (नि.) यांचेसाठी या बाब टिप्पणीत उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांस अनुसारुन विशिष्ट प्रवर्गाच्या संस्थेकरीता गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत शासनाकडे पूर्वमंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्याकरिता शिफारस करण्यांत यावी. तसेच यापूर्वी प्राधिकरणाने घेतलेला मा.न्यायाधीशांना सदनिका वितरण करण्याच्या प्रकरणीचा निर्णय विचारात घेऊन त्यातील अटी शर्तींचा उल्लेख या प्रकरणात करण्यास मान्यता देण्यांत येते.

विशिष्ट प्रवर्गाच्या संस्थेकरिता अशा प्रकारच्या योजना राबविण्यासाठी प्रमाण ठरविण्यांत यावे व त्यास प्राधिकरणाची मान्यता घेण्यांत यावी.

<u>बाब क्रमांक : २१२/ १२</u>

विषय :-मौजे सासवड, ता. पुरंदर, जिल्हा-पुणे यंथील स.क्र.७४/१ भाग क्षेत्र १.१७ हे. जमीन म्हाड कायदा कलम ५२ खाली खाजगी वाटाघाटीने संपादन करणेचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६१५१ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, मौजे सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे येथील स.क्र.७४/१ भाग एकूण क्षेत्र २३२०० चौ.मी. आंबोडी रस्ता रुंदीकरणामध्ये येणारे क्षेत्र १११११.५० चौ.मी. व यापूर्वी जमिनीमालकाने इतरांना विक्री केलेल्या भूखंडांचे क्षेत्र ३२१४.६२ चौ.मी. तसेच त्या भूखंडासाठीच्या अंतर्गत रस्त्याखालील क्षेत्रफळ ५८४.८८ चौ.मी. असे एकूण ४९११.०० चौ.मी. वगळून उर्वरित १८२८९.०० चौ.मी. क्षेत्र जमिनीचा श्रीमती सौ.माधुरी उदय घारपुरे व सौ. जयश्री दत्तात्रय शिळीमकर यांनी दिलेला जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरिय समितीमध्ये वाटाघाटी करुन दिलेला एकत्रित देकार रु. १,३०,००,०००/- जमिनीवरील प्रस्तावित म्हाडाची गृहनिर्माण योजना बाब टिप्पणीमध्ये विषद केलेल्या परिच्छेद क्र.१२ नुसार व्यवहार्य ठरत असल्याचे दिसून आल्यामुळे सदरची १८२८९.०० चौ.मी. क्षेत्र जमीन म्हाड कायदा कलम ५२ खाली खरेदी करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

२. मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी प्रस्तावित जमिनीच्या संदर्भात त्यांच्या बाब टिप्पणीमध्ये या जमिनीच्या क्षेत्रफळाचा विनियोग, योजनेला मिळालेला प्रतिसाद आणि म्हाडाला होणारा फायदा विचारात घेऊन सदर प्रस्तावास मंजूरी दिली आहे.

३. जमिनीचा प्रत्यक्ष खरेदी व्यवहार, खरेदीखत तथा करारपत्र करण्यापूर्वी पुढील मुद्दे मुख्य अधिका-यांनी विचारात घेवून त्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

अ) या जमिनीच्या मूळ मालक श्रीमती लिना सुधीर आळेकर होत्या व मंडळाला जमिनीचा देकार त्यांच्यातर्फे कुलमूखत्यार श्री. उदय मधुकर घारपुरे

यांनी दिला. मंडळाला देकार दिल्यानंतर श्रीमती आळेकर यांनी सदर जमीन/भूखंडांची विक्री सौ. जयश्री दत्तात्रय शिळीमकर व सौ. माधुरी उदय घारपुरे यांना केली. त्यामुळे श्री. उदय मधुकर घारपुरे, कुलमुखत्यार यांनी पुणे मंडळाला ''क्षतिपूर्तीबंधपत्र'' व ''ना हरकत प्रमाणपत्र'' (आवश्यक तेवढया मुद्रांकपत्रावर) घ्यावे. या सर्व बाबींची कल्पना विद्यमान मालकाला देखील अवगत असल्याचा उल्लेख करुन मुळ जमीनमालकाने/कुलमुखत्यारधारकाने किंवा अन्य हितसंबंधीय व्यक्तीने भविष्यात काही अडचण निर्माण केल्यास विद्यमान दोन्ही जमीनमालक त्यास (आर्थिक व भौतीक बाबीसाठी) स्वतः जबाबदार असतील असे क्षतिपूर्तीबंधपत्र घ्यावे.

ब) दोन्ही विद्यमान मालकांनी जमिनीची किंमत विभागून मागितली आहे. म्हणजे रु. १ कोटी ३० लाख पैकी ६० टक्के रक्कम (म्हणजे रु. ७८ लाख) सौ. माधुरी उदय घारपुरे व ४० टक्के रक्कम (म्हणजे रु. ५२ लाख) सौ. जयश्री दत्तात्रय शिळीमकर यांच्या नांवे मागितली आहे. परंतु कार्यवाही करण्यापूर्वी वर्तमानपत्रात जाहिरात देवून जमिनीच्या खरेदी व्यवहाराबाबत ज्या जमिनमालकांकडून ही जमीन खरेदी केली जात आहे व त्याचा मोबदला ज्या व्यक्तीनां दिला जाणार आहे याचे विवरण वर्तमानपत्रात जाहीर निवेदनाद्वारे प्रगटन करणे आवश्यक आहे. असे केल्यास जमिनीच्या किंमतीचा मोबदला हा खात्रीपूर्वक ख-या जमीनमालकाकडे दिला जाईल व भविष्यात इतर अडचणी उद्‌भवणार नाहीत.

क) खरेदीपत्र/करारपत्रामध्ये जमीन मालकांना देण्यात येणा-या रकमेचा उल्लेख, रहिवास क्षेत्रफळाचा, रस्ते व ओपन स्पेस या बाबींचा तपशील नमूद करण्यात यावा.

ड) खरेदीखत/करारपत्र आवश्यक तेवढया मुद्रांकपत्रावर नोंदणीकृत करण्यात यावे.

इ) ७/१२ च्या उता-यावर म्हाडाचे नांव नोंदविण्यात यावे.

वरील [अ ते इ] बाबीकडे मुख्य अधिकारी यांनी विशेष लक्ष दयावे. केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन पुढील बैठकीत सादर करण्यात यावे.

बाब क्रमांक : २१२/१३

विषय :-सर्व्हे क्रमांक १२० (भाग) वर्सोवा, मुंबई येथील सुरु असलेल्या १०८८ उच्च उत्पन्न गटासाठीच्या गाळयांच्या योजनेत अतिरिक्त सुविधा/सुधारीत दर्जाचे साहित्य (Material) वापरुन गाळे सुशोभिकरणास मान्यता मिळण्याबाबत प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६१५२ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, सर्व्हे क्रमांक १२० (भाग) वर्सोवा, मुंबई येथील सुरु असलेल्या १०८८ उच्च उत्पन्न गटासाठीच्या गाळयांच्या योजनेत अतिरिक्त सुविधा / सुधारीत दर्जाचे साहित्य (Material) वापरुन गाळे सुशोभिकरणास येणा-या प्रस्तावित खर्चास मान्यता मिळण्याबाबतच्या बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २१२/१४</u>

विषय :-महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कामकाजाचे संपूर्ण संगणीकरण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान सल्लागार कंपनीची नियुक्ती करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१५३ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की,

१. संगणक क्षेत्रात जलदगतीने अद्ययावत होत जाणारे तंत्रज्ञान व साधनसामुदग्रीचा विचार करता तसेच प्रधिकरणाच्या एकूण कामकाजाचा विचार करता प्राधिकरणाकडे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ, प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नाही तसेच,

२. सध्याचे प्राधिकरणाचे विविध विभागांतर्गत झालेले संगणकीकरणाचे कामात एकसुत्रता नसल्याने परिणामकारक सेवा पुरविण्यासाठी सदर संगणकीकरण पुरेसे नाही. प्राधिकरणाच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये प्राधिकरणास सहाय्य व मार्गदर्शन करण्याकरिता शासन निर्णय क्र.डीआयटी/फाईल ०३/२२२/३९, दि. २०.८.२००३ अन्वये कॅटेगरी "अ" मध्ये टेक्नॉलॉजी कन्सलटंट म्हणून मान्यता प्राप्त कंपन्यांच्या पॅनलमधून मे. टाटा कन्सलटंन्सी सर्व्हिसेस या कंपनीची शासन निर्णय क्रमांक सीओएम १००१/प्र.क्र. १७४/०१/३९, दिनांक : २९.१०.२००१ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीस अधिन राहून व डी.आय.टी. चे मार्गदर्शन घेऊन म्हाडाचे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील

भागीदार म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय प्राधिकरण एकमताने घेत आहे. मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी मे. टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस यांची नियुक्ती केल्यानंतर पहिल्या व दुस-या टप्प्यातील सल्ला/ध्येयधोरण मार्गिका ठरविणे व त्यांच्याशी करारनामा करणे याकरिता कायदेशीर बाबी व आर्थिक बाबी अनुक्रमे विधी सल्लागार/प्राधिकरण, वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचे अभिप्राय घेऊन, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे मान्यतेने अंमलबजावणी करण्यास मंजुरी देण्यात येते.

बाब क्रमांक : २१२/१५

विषय :- स.क्र.३३०/१ पाथर्डी, नाशिक येथे अल्प उत्पन्न गटाअंतर्गत ९१ गाळयांच्या बांधकामाच्या निविदा (टेंडर) मंजूरीबाबत.

ठराव क्रमांक : ६१५४ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, स.क्र.३३०/१ पाथर्डी, नाशिक येथे अल्प उत्पन्न गटाअंतर्गत ९१ गाळयांच्या बांधकामासाठी बाब टिप्पणीत शिफारस करण्यात आल्यानुसार मे. रचना कन्स्ट्रक्शन, नाशिक यांची निविदा अंदाजित किंमतीपेक्षा १७.२३ टक्के जास्त दराने सध्याच्या दरपत्रकाशी तुलना करता ०.३१ टक्केने कमी हा दर वाजवी व रास्त ठरत असल्यामुळे त्यास मंजुरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २१२/१६

विषय :- इमारत क्र.७ (तांबावाला मॅन्शन) चुनाम लेन,डॉ.दादासाहेब भडकमकर मार्ग, डी विभाग, मुंबई या इमारतीस म्हाडा अधिनियमांतर्गत कलम ८८ (३) (अ) अन्वये प्रमाणपत्र जारी करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१५५ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे इमारत क्र.७ (तांबावाला मॅन्शन) चुनाम लेन,डॉ.दादासाहेब भडकमकर मार्ग, डी विभाग, मुंबई या इमारतीस म्हाडा अधिनियमांतर्गत कलम ८८ (३) (अ) नुसार प्रचलीत अटी / शर्तीवर प्रमाणपत्र देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २१२/१७

विषय :- शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजुरीबाबत.

ठराव क्रमांक : ६१५६ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील

आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजुरीबाबतचा शासन निर्णय एमएजी/२००३/११/प्र.क्र.२/आ.३ दि. २ मे, २००३ व शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी २००५/प्र.क्र.१/आ-३, दि. १९ मार्च, २००५ मधील परिशिष्ठ ''ब'' प्रमाणे व प्रस्तुत शासन पूरक पत्र क्रमांक : एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आ-३, दिनांक : २६.१०.२००५ चा शासन निर्णय शासन निर्णयाच्या दिनांका पासून प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना लागू करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २१२/१८

विषय :- गंगाखेड परभणी येथील मागणी अभावी रिक्त असलेले (एल.आय.जी.गट) २५ पैकी २३ गाळे व (एम.आय.जी.गट) १५ पैकी १३ गाळे वितरण करण्यासाठी प्राधिकरणापुढे घ्यावयाच्या निर्णयाचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६१५७ **दिनांक : ३१.०१.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे अल्प उत्पन्न गट या प्रवर्गातील २५ गाळयांपैकी २३ गाळे आणि मध्यम उत्पन्न गट या प्रवर्गातील १५ गाळयांपैकी १३ गाळे सध्या ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत बाब टिप्पणीत नमूद केलेल्या किंमतीत म्हणजे (एम.आय.जी.करिता रु.६३,६००/- आणि एल.आय.जी. करिता रुपये ३६,२००/-) एम.आय.जी.करिता रु.१०,०००/- व एल.आय.जी.करिता रु.५०००/- अशी रक्कम भरणा करुन घेऊन उर्वरित रक्कम अनुक्रमे रु. १०००/- आणि रु. ५००/- अशी मासिक हप्त्याने पगारातून कपात करुन म्हाडास भरणा करतील या अटीवर सदरहू गाळे परभणी नगरपरिषदेच्या कर्मचा-यांना

वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे चूकीच्या पध्दतीनी योजना कार्यान्वीत केल्याबाबत हया प्रकरणी चौकशी करण्यांत यावी.

बाब क्रमांक : २१२/१९

विषय :-मौजे कव्हा, ता.जि.लातूर येथील गुमास्ता सहकारी गृहनिर्माण संसथेकरिता बांधलेल्या गाळयांची किंमत एकरकमी भरणा करण्याचे अटींवर (onr time settlement) कमी करण्याबाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६१५८ (सुधारित) **दिनांक : २४.१०.२००६**
३१.०१.२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, '' निव्वळ बांधकाम खर्च रु. ६९,०००/- प्रती गाळा यामधून प्रस्तावित केलेला दुरुस्तीचा खर्च रु. ११,७१४/- वगळून येणारी किंमत रु. ५७,२८६/- या प्रमाणे आकारणी करण्यात यावी व ही किंमत एकरकमी वसुल करण्यात यावी. या योजनेमधून म्हाडाला होणा-या तोटयाची नोंद (*दि. ३१.१.२००६ रोजी येणारी प्रती गाळा किंमत रु. १,२०,५००/- वजा रु.५७,२८६/- = रु. ६३,२१४* प्रती गाळा) घेण्यात आली. ''

बाब क्रमांक : २१२/२०

विषय :- श्री. चंद्रशेखर प्रभू एक सदस्य समिती गृहनिर्माण विभाग यांना शासनाच्या निर्देशाप्रमाणे पूरविण्यात आलेल्या सोई.

ठराव क्रमांक : ६१५९ दिनांक : ३१.०१.२००६

एकमताने निर्णय घेतला की, मा. श्री. चंद्रशेखर प्रभू एक सदस्य समिती (गृहनिर्माण) यांना शासनाने नेमून दिलेले काम मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कामाशी संबंधीत असल्याने ते पार पाडण्यासाठी दि. १७.७.२००० ते १६.४.२००४ या कालावधीत वेगवेगळया कार्यालयाकडून त्यांचेसाठी विविध सोई सवलतीवर झालेला एकूण खर्च रु. ३१,३८,२८१/- पैकी रु.५,५०,९१६/- शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कंपनी लि. यांनी त्यांचे फंडातून केलेला असल्याने सदर खर्च वगळून रु. २५,८७,३६५/- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास शासनाकडून मिळणा-या वित्तीय तरतुदीमधून वर्ग करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २४.०२.२००६ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित केलेल्या २१३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

<u>बाब क्रमांक : २१३/२</u>

विषय :- श्री. झेड.यु. सिध्दीकी, कार्यकारी अभियंता / मुंबई मंडळ यांचे निलंबन व बदलीबाबत अपील.

ठराव क्रमांक : ६१६० दिनांक : २४.२.२००६

एकमताने निर्णय घेतला की, उक्त प्रकरणी बाब टिप्पणीत नमूद करण्यात आलेली वस्तुस्थिती विचारात घेता श्री. झेड. यु. सिध्दीकी, कार्यकारी अभियंता, घाटकोपर विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी त्यांचे अधिकार कक्षेबाहेर जावून श्री.तिवारी, शाखा अभियंता यांची सचोटी व कार्यक्षमता न पहाता त्यांचेकडे उप अभियंता पदाचा कार्यभार देवून मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांचे अधिकारावर अतिक्रमण केले व श्री.तिवारी, शाखा अभियंता, घाटकोपर विभाग यांना गैरकृत्य करण्यास वाव दिला, ही कृती वर्ग-१ पदावरील जबाबदार अधिका-यांकडून अपेक्षित नसल्यामुळे त्यांचेविरुध्द उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी दिनांक १३.१०.२००५ रोजीच्या आदेश क्रमांक : प्राधि/खा.चौ./६६०३/प्र.९, अन्वये केलेल्या निलंबनाच्या कार्यवाहीबाबत फेरविचार करण्याची आवश्यकता नाही, असे उपस्थित सन्मा.सदस्यांनी मत व्यक्त केले. सबब, श्री. सिध्दीकी यांचे निलंबनाचे आदेश कायम करण्यात येत आहेत.

उक्त प्रकरणी प्राधिकरणाने अशाही सूचना दिल्या की, श्री. सिध्दीकी यांचे विरुध्द करावयाच्या खातेनिहाय चौकशीचे/तपासणीचे काम शासनाच्या वरिष्ठ स्तरावरील अधिका-याकडून किंवा वरिष्ठ श्रेणीतील सेवानिवृत्त अधिका-यांची विहीत कालावधीसाठी नियुक्ती करुन घेण्यात यावी. यासाठी द्यावयाचे मानधन मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी ठरविण्याचे अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत

<u>बाब क्रमांक : २१३/५</u>

विषय :- नाशिक मंडळांतर्गत मौ. चुंचाळे येथील ३५ गाळे मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेतील मागणी अभावी रिक्त १३ घरकुलांचे विक्रीबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१६१ दिनांक : २४.२.२००६

एकमताने निर्णय घेतला की, उक्त योजनेतील १३ गाळे मुख्य अधिका-यांनी दर्शविलेल्या दोन प्रस्तावापैकी एका प्रस्तावाप्रमाणे म्हणजे रु. २,५३,०००/- प्रती गाळा या बाजारभावाप्रमाणे **एकरकमी पध्दतीने विक्री** करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. नियम व विनियमातील तरतुदीप्रमाणे जाहिरात देवून या गाळयाचे वितरण करण्याची कार्यवाही मुख्य अधिका-यांनी करावी.

<u>बाब क्रमांक : २१३/ ६</u>

विषय :- नाशिक मंडळांतर्गत दिंडोरी रोड, पंचवटी, नाशिक येथील १६ व्यापारी दुकानांपैकी रिक्त दुकान क्र.९ विक्रीबाबत.

ठराव क्रमांक : ६१६२ दिनांक : २४.२.२००६

एकमताने निर्णय घेतला की, पंचवटी, दिंडोरी रोड, नाशिक येथील १६ दुकानांपैकी दुकान क्रमांक ९ साठी श्री रविंद्र आवळे यांनी रु.४२५०/- प्रती चौ.मी. प्रमाणे दिलेला देकार स्वीकृत करण्यात येत आहे. तद्नुसार दुकान क्रमांक ९ चे वाटप करण्यात यावे.

प्राधिकरणाने दि. १.१०.२००५ रोजीच्या बैठकीतील पारीत केलेला ठराव क्र. ६१३८ मधे नमूद केलेली जबाबदारी निश्चित करण्याच्या संदभातील पुढील कार्यवाही मुख्य अधिकारी, नाशिक मंडळ यांनी करावी.

<u>बाब क्रमांक : २१३/७</u>

विषय :- डी.एन.नगर, अंधेरी (प.) या वसाहतीस पाणीपुरवठा करणा-या व्यवस्थेचे उन्नतीकरण -

---

जुने डी.एन.नगर व नविन डी.एन.नगरच्या मधील लोखंडवाला सर्कल ते जे.पी.रोड यांना जोडणा-या रस्त्यांच्या पश्चिम बाजूला ३०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी मुंबई महानगर पालिकेला द्यावयाच्या रक्कमेबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१६३ दिनांक : २४.२.२००६

एकमताने निर्णय घेतला की, डी.एन.नगर, अंधेरी (प.) या वसाहतीस पाणीपुरवठा करणा-या व्यवस्थेचे उन्नतीकरणाअंतर्गत जुने डी.एन.नगर व नविन डी.एन.नगरच्या मधील लोखंडवाला सर्कल ते जे.पी.रोड यांना जोडणा-या रस्त्याच्या पश्चिम बाजूला ३०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यासाठी महानगरपालिकेने कळविल्यानुसार रु. ८४.७५ लक्ष इतकी रक्कम महानगरपालिकेकडे भरण्यास मान्यता देण्यात येते. सदर मान्यता महानगरपालिका सुपरव्हिजन व इतर प्रशासकीय आकार भविष्यात मागणार नाही तसेच ही जलवाहिनी महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आली असे समजण्यात येईल या अटीवर देण्यात येत आहे. महानगर पालिकेने सदर काम विहीत पध्दतीचा अवलंब करुन पूर्ण करावे तसेच काम पूर्ण झाल्यावर रक्कम रु. ८४.७५ लक्षचे उपयोगीता प्रमाणपत्र म्हाडास सादर करावे.

<u>बाब क्रमांक : २१३/९</u>

विषय :- नविन चंद्रपूर योजनेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीवर नेमण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या पुनर्नेमणूकीबाबत.

ठराव क्रमांक : ६१६४ दिनांक : २४.२.२००६

एकमताने निर्णय घेतला की, विशेष नियोजन प्राधिकरण चंद्रपूर कार्यालयाअंतर्गत विकासाची कामे चालू असल्याने नविन चंद्रपूर योजनेच्या कामासाठी कार्यरत असलेल्या ७ कंत्राटी कर्मचा-यांना (*बाब टिप्पणीत नांवे नमूद असलेल्या*) पुढील १ वर्षाच्या कालावधीसाठी पुनर्नेमणूक देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : १८.०३.२००६ रोजी दुपारी ४.०० वा. आयोजित केलेल्या अंदाजपत्रकीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

<u>बाब क्रमांक : २</u>

विषय :- प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी आकृतिबंध सन २००६-२००७.

ठराव क्रमांक : ६१६५ दिनांक : १८.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरण व प्रादेशिक मंडळांच्या कार्यालयासाठी सन २००६ - २००७ या वित्तीय वर्षासाठी कर्मचारी आकृतिबंध मंजूर करण्यात येत असून मुख्य अभियंता संवर्गातील एक पद व आर.पी.मधील वाहनचालकांची चार पदे रद्द करण्यास मंजुरी देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : ३</u>

विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००५-२००६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००६-२००७ चे अर्थसंकल्पीय अंदाज.

ठराव क्रमांक : ६१६६ **दिनांक : १८.०३.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २००५-२००६ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर व सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन दोन्ही अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत आली.

<u>बाब क्रमांक : ४</u>

विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००४-२००५ या वित्तीय वर्षाचा लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१६७ **दिनांक : १८.३.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००४-२००५ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्वीकृत करण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक</u> : ६

विषय :- शिव पनवेल महामार्गालगत आणि मानखुर्द रेल्वे स्टेशन जवळील भूखंड दाहेज उरण पाईप लाईन प्रोजेक्टकरिता वितरीत करण्याबाबत (न.भू.क्र. १ पैकी मौजे मानखुर्द, ता. कुर्ला, क्षेत्र सुमारे ३०० चौ.मी.)

<u>ठराव क्रमांक</u> : ६१६८ **दिनांक : १८.३.२००६**

एकमताने निर्णय घेण्यात आला की, दाहेज उरण पाईप लाईन प्रोजेक्टकरिता शिव पनवेल महामार्गालगत आणि मानखुर्द रेल्वे स्टेशन जवळील नगर भू.क्र. १ पैकी मौजे मानखुर्द, ता. कुर्ला, क्षेत्र सुमारे ३०० चौ.मी.चा भूखंड गेल (इंडिया) लि. (भारत सरकारचा उपक्रम) यांना दाहेज-उरण पाईपलाईन प्रोजेक्ट या जनहितार्थ योजनेकरीता म्हाड (जिमिनीची विल्हेवाट) १९८२ मधील कलम ८

(ड) मधील तरतुदीनुसार वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीवर आणि प्रचलित किंमत विषयक धोरणानुसार मान्यता देण्यात येत आहे.

१. गॅस ऑथोरीटी ऑफ इंडिया सदर भूखंडावर सेक्शनलायजिंग वॉल्व्हचे स्टेशन उभारणार असल्याने त्यास आवश्यक असणारी अग्निशमन दल, मुंबई महानगरपालिकेची परवानगी तसेच, पी.डब्ल्यु.डी. आणि तत्सम संस्थांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

२. गेल (इंडिया) लि. यांनी अग्निशमन दलाची (सी.एफ.ओ.) परवानगी प्राप्त करणे आवश्यक आहे.

३. भूखंडाकरीता अधिमूल्य म्हणून वितरण पत्र देण्यात येणा-या वर्षाच्या प्रचलित बाजारभावाच्या (रेडी रेकनर) १०० % प्रमाणे येणारी रक्कम, ३० वर्षाकरीता भुईभाडे म्हणून अधिमूल्य रक्कमेवर २.५ % वार्षिक भुईभाडे भांडवलीकरण करुन येणारी रक्कम आणि रु. १/- प्रती वर्षी नाममात्र भुईभाडे आकारण्यात यावे.

४. कोणत्याही प्रकारची जिवित अथवा वित्तीय हानी झाल्यास, त्याची सर्व जबाबदारी गेल (इंडिया) लि. यांची असेल.

५. भूमिगत गॅस वाहिनीचा मार्ग व लगतची स्थ निर्देशन दर्शविणारा नकाशा प्राप्त करुन घ्यावा.

<u>बाब क्रमांक</u> : ८

विषय :- प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना शासन निर्णयाप्रमाणे ''विशेष असाधारण रजा'' योजना मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१६९ दिनांक : १८.३.२००६

एकमताने निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र शासनाने वित्त विभाग निर्णय क्रमांक अरजा/२४०५/प्र.क्र. २७/०५/सेवा-८ दि. २०.१२.२००५ अन्वये विशेष असाधारण रजेची मुदत दि. १.१.२००६ ते ३१.१२.२००६ पर्यंत वाढविण्याचा शासन निर्णय त्यातील अटी व शर्तींसह पुढील एक वर्षापर्यंत म्हणजेच दि. १.१.२००६ ते ३१.१२.२००६ पर्यंत प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मान्यतेने प्राधिकरणाचे आदेश क्र. प्राधि/वि.अ.रजा/२००६/१८१प्र-१४, दि. १०.२.०६ अन्वये लागू करण्याच्या घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २७.०३.२००६ रोजी दुपारी ४.०० वा. आयोजित

केलेल्या २१४ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

<u>बाब क्रमांक : २१४/२</u>

विषय :- बाभळगांव रोड, लातूर येथील स.क्र.९७-भाग व ९८-भाग या म्हाडाच्या जमिनीतील नगर परिषद, लातूर तर्फे वॅम्बे योजनेच्या बांधकामासाठी मागणी केलेल्या ९३१६.६३ चौ.मी.च्या विक्री प्रस्तावाबाबत.

ठराव क्रमांकः ६१७० दिनांक : २७.३.२००६

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, लातूर नगरपरिषदेला लातूर शहरातील झोपडपट्टीवासियांना स्थलांतरीत करुन पुनर्वसन करण्यासाठी खालील प्रमाणे दर्शविलेले भूखंड देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. या भूखंडाची किंमत रु. ६३,६६,८६७/- नगरपरिषदेला प्रचलित अटी शर्तीनुसार भरावे लागतील व अटी शर्ती खालील प्रमाणे लागू रहातातील.

अ. क्र.	नगरपालिकेस हस्तांतरीत करावयाच्य प्रस्तावीत क्षेत्राअंतर्गत येणा-या योजना	क्षेत्र	दि.३१.३.२००६ पर्यंत व्याजाचे भांडवलीकरण करुन परिगणीत करण्यात आलेले	एकूण भूखंडाचे मुल्य

			विक्री मुल्य	
१	इमारत निर्मिती केंद्राची स्थलांतरीत जागा (टेलिफोन विभागाची आरक्षित क्षेत्र तथापि, सदर क्षेत्र घेण्यास टेलिफोन विभागाचा नकार)	४०००.०० चौ.मी.	रु. ७१०.०० प्रती चौ.मी.	रु.२८,४०,०००.००
२	**''खुली जागा'' स्थलांतरीत क्षेत्र** अ. प्राथमिक शाळा भूखंड ब. अत्यल्प उत्पन्न गट विकसितभूखंड योजना	१४००.०० प्रती चौ.मी. २२५१.०० प्रती चौ.मी.	रु. ३५०.०० प्रती चौ.मी. रु. ६००.००	रु. ४,९०,०००.०० रु.१३,५०,६००.००
३	**पॉकेट ''ए''** अ) मध्यम उ.गट, विकसित भूखंड (६ भूखंड) ब) उच्च उ.गट विकसित भूखंड (३ भूखंड)	८२५.०० चौ.मी. ११८६.१३ चौ.मी.	रु. ७५०.०० प्रती चौ.मी. रु. ९००.०० प्रती चौ.मी.	रु. ६,१८,७५०.०० रु.१०,६७,५१७.००
	एकूण	९६६२.१३ चौ.मी.		रु. ६३,६६,८६७.००

तेव्हा सध्या प्रस्तावीत केलेली जमीन नगर परीषद, लातूरकडे खालील अटीसह देण्यास हरकत नाही.

I उक्त जमीन म्हाडाने निश्चित केलेली किंमत अदा करुन घेण्यास तयार असल्याबाबत नगर परिषद, लातूर यांचा ठराव दाखल करुन घेणे.

II सदर जमीन नगर परिषद, लातुरला देण्यापूर्वी, त्या जमिनीची म्हाडा ठरवेल ती किंमत प्रथम भरणा करणे.

वरील मुद्दा क्रमांक २ नुसार जर नगर परिषद, लातूर सदर जमिनीची किंमत रु. ६३,६६,८६७/- प्रथम अदा करण्यास समर्थ असेल या अटीवर जमिनीचा ताबा देणे.

III जर उक्त जमिनीचा आगाऊ ताबा नगरपरिषदेला द्यावयाचा झाल्यास नगर परिषदेकडून जमिनीची किंमत अदा होण्याच्या तारखेपर्यंत म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार व्याज मुल्य वसुल करणे.

IV हस्तांतरीत क्षेत्र हे म्हाडातर्फे म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ४१ संपादन करण्यात आले असून सदर जमीन मुल्याबाबत भविष्यात कांही जमीन मालकांनी न्यायालयाकडे धाव घेतल्यास व त्यानुसार जमिनीचा मावेजा पोटी जास्तीचा मावेजा मा.न्यायालयाच्या निकालाप्रमाणे जमीन मालकाला द्यावे लागल्यास त्याप्रमाणे वाढीव रक्कम परिषद, लातूरतर्फे भरणा होणे बंधनकारक आहे.

V प्राधिकरणाचे भूखंड वितरणाचे सध्याचे प्रचलित नियम व भविष्यात त्यात होणारे बदल हे पूर्णपणे नगरपरिषद, लातूरला बंधनकारक राहतील. प्रस्तावीत क्षेत्राचे भाडेपट्टाखत नगरपरिषद, लातूरर्फे सत्वर करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच वॅम्बे योजनेसाठी नगरपरिषदेला सदर क्षेत्र देण्यात येत असल्याने, उक्त क्षेत्राचा वापर हा त्याच योजनेसाठी करावा. अन्यथा नगरपरिषदेतर्फे उक्त प्रस्तावातील वॅम्बे योजनेसाठी वापरण्यात येऊ न शकणारे शिल्लक क्षेत्र, म्हाडास परत करणे बंधनकारक राहील.

VI वरील जमीन ही म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ४१ अंतर्गत शासनातर्फे संपादित केली असल्याने ती नगर परीषद, लातूरला देण्यापूर्वी शासनाची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

VII सदर प्रकरणी शासनास्तर झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे (इतिवृत्त जारी व्हायचे आहे) या जमिनीची / भूखंडाची लातूर नगर परिषदेला, लातूर शहरातील स्थलांतरीत केलेल्या लोकांना तातडीने पूनर्वसित करावयाचे आहे, यास्तव त्याचा ताबा, वर नमूद केलेल्या अटी, शर्ती व विवरणाला अनुसरुन देण्यास व सदर ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : २१४/३</u>

विषय :- सर्व्हे क्र.९७ (भाग) व ९८ (भाग) बाभळगांव रोड, लातूर येथील प्राथमिक शाळेसाठीच्या राखीव भूखंडाबाबत वितरणाबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७१ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की,बाभळगांव रोड, लातूर येथील म्हाडाच्या ले-आऊटमधील प्राथमिक शाळेसाठी राखीव असलेला १००० चौ.मीटरचा भूखंड रु. ३५०/- प्रती चौ.मी. या दराप्रमाणे येणारी किंमत रु. ३,५०,०००/- ला विश्वकर्मा शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर यांना वितरीत करण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे. नियमाप्रमाणे सविस्तर अटी व शर्तीनुसारची कार्यवाही मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यानी करावी.

<u>बाब क्रमांक : २१४/४</u>

विषय :- मौजा पोलिस लाईन टाकळी येथील स.क्र.११ मधील श्री. शामराव तुकाराम चोपडे यांच्या १.१० हेक्टर जमिनीबाबत नागरी जमीन (कमाल धारणा विनियम अधिनियम) १९७६ च्या कलम ३४ खाली पारीत केलेल्या पुनर्विलोकन आदेशानुसार, जमीन मालकांस जमीन परत केल्यानंतर वसुलीच्या रकमेबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७२ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की, मौजे पोलीस लाईन टाकळी येथील स.क्र.११ मधील १.१० हेक्टर जमीनीसाठी श्री. शामराव तुकाराम चोपडे यांनी जरी सदर रक्कमेवर आकारलेल्या व्याजावर आक्षेप घेतला असला तरी त्यांची विनंती मान्य करण्यात येवू नये. यास्तव श्री. चोपडे यांनी मंडळाला भरलेल्या रु. २,८५,९६४/- मध्ये अंतर्भूत असलेले व्याज रु. ४५०६८/- (३० जून, २००५ पर्यंत आकारलेले व्याज) परत करण्यात येऊ नये.

<u>बाब क्रमांक : २१४/५</u>

विषय :- टिळकनगर, चेंबूर येथील इमारत क्र.१२२ लगत असलेल्या एन.डी.आर.१८, अस्तित्वात असलेल्या इमारत क्र.१२२ लाचेंबूर संदेश सहकारी गृहनिर्माण संस्था यांना मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१७३ **दिनांक : २७.३.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, टिळकनगर चेंबूर येथील इमारत क्रमांक १२२ लगत असलेला एन.डी.आर.१८ तेथे अस्तित्वात असलेल्या इमारत क्र.१२२ ला चेंबूर संदेश सह.गृहनिर्माण सस्था यांना प्राधिकरणाच्या प्रचलीत धोरणानुसार बाजार भावाप्रमाणे (रेडी रेकनर २००६) निवासी दर रु. १०८५०/- प्रती चौ.मि.आकारुन संस्थेकडून या भूखंडाकरिता बाबत टिपणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे रक्कम रु. ३,५७,९५,८४३/- वसूल करण्यात यावेत व त्या नंतर रितसर जागेचा ताबा देण्यांत यावा.

म्हाड (जमिनीची विल्हेवाट) अधिनियम १९८२ मधील कलम ८ (ड) मधील तरतूदीनुसार प्रचलीत अटी व शर्तीच्या अधिन राहून वितरीत करण्यात यावा.

एन.डी.आर.१८ या भूखंडाकरिता अधिमूल्य म्हणून वितरणपत्र देण्यात येणा-या वर्षाच्या प्रचलित बाजारभावाच्या (रेडी रेकनर) १०० % प्रमाणे येणारी रक्कम, ३० वर्षाकरीता भुईभाडे म्हणून अधिमूल्य रक्कमेवर २.५ % वार्षिक भुईभाडे भांडवलीकरण करुन येणारी रक्कम आणि रु.१/- प्रती वर्षी नाममात्र

भुईभाडे आकारण्यात यावे. मात्र या भूखंडास उपलब्ध असलेल्या पोच रस्त्याचे क्षेत्र अथवा पोच रस्त्याच्या क्षेत्राचा चटईक्षेत्र निर्देशांक संस्थेस वितरीत करण्यात येऊ नये.

<u>बाब क्रमांक : २१४/६</u>

विषय :- मौजे कालेकल्याण येथील, मुंबई मंडळाच्या मालकीची जमीन,पाकिस्तान दुतावासास उपलब्ध करुन देण्याबाबतची विनंती.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७४ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक : ६१३१, दि.२४.८.०५ मधे जमिनीचा तपशील म्हणून " मौजे कोलेकल्याण, ता. अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा, कालिना, सांताक्रुझ (पूर्व) येथील सर्व्हे क्र. १५८/२३ पै., १५७/१ पै. क्षेत्र ३९८७.४२ चौ.मी. आरक्षण निवासी." अशी सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१४/ ७</u>

विषय :- वंगानी चेंबर्स, १५-१५अे, क्रांतीवीर राजगुरु मार्ग, बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई-०४, या इमारतीस म्हाडा अधिनियमांतर्गत कलम ८८(३) (अ) अन्वये

प्रमाणपत्र जारी करणेबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७५ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेण्यात आला की, इ.क्र. १५-१५-अे, वांगणी चेंबर्स, क्रांतीवीर राजगुरु मार्ग, (बोरभाट क्रॉस लेन) गिरगांव, मुंबई : ४००००४ या इमारतीस म्हाड अधिनियमांतर्गत ८८ (३)(अ) अन्वये प्रमाणपत्र जारी करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१४/ ८</u>

विषय :- प्राधिकरणाचा ठराव क्रमांक : ५९६२, दिनांक ०६.१०.२००३ रद्द करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७६ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेण्यात आला की,

1. प्राधिकरणाचा ठराव क्रमांक : ५९६२, दि. ०६.१०.२००३ रद्द करण्यात येत आहे.

2. ज्या घुसखोरांचे नियिमतीकरण झालेले आहे. त्यांची म्हाडाने स्वीकारलेली रक्कम त्यांना परत करण्यात यावी व त्यांना निष्कासित करण्याची कार्यवाही म्हाड अधिनियम कलम ६६ (अ) अन्वये करण्यात यावी.

3. ज्या घुसखोरांनी केवळ रक्कमेचा भरणा केला आहे. अशांच्याही रक्कमा परत करण्यात याव्यात व त्यांनाही म्हाड अधिनियम कलम ६६ (अ) नुसार निष्कासित करण्यात यावे.

४. ज्या घुसखोरांना केवळ देकारपत्रे देण्यात आलेली आहेत त्यांची देकारपत्रे रद्द करुन त्यांनाही म्हाड अधिनियम कलम ६६ (अ) अन्वये निष्कासित करण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : २१४/९</u>

विषय :- नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या ताब्यात असलेली व मिहान क्षेत्रात समाविष्ट असलेली मौजा-खापरी व मौजा शिवणगांव येथील जमीन महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीकडे हस्तांतरीत करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७७ **दिनांक : २७.३.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, नागपूर मंडळाला यू.एल.सी. कायद्याअंतर्गत प्राप्त झालेली १६.१८ हेक्टर जमीन मॅडॅक कंपनीला मिहान प्रकल्पासाठी देण्यास हरकत नाही. याबाबतचे शासनाकडून (गृहनिर्माण विभाग, महसूल व वन विभाग आणि नगरविकास विभाग) आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी. मॅडॅकच्या व्हाईस प्रेसिडेंट ॲण्ड मॅनेजींग डायरेक्टर यांनी त्यांच्या दिनांक : २.११.२००५ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे पर्याय एक, ज्यानुसार मॅडॅक कंपनी म्हाडाच्या लाभार्थीनां त्यांनी मंडळाला अदा केलेल्या रक्कमेचा परतावा परस्पर करतील (रु. ७.९९ कोटी पैकी प्रत्यक्षात अदा केल्याप्रमाणे) व उर्वरित रक्कम नागपूर मंडळाला भरतील. याप्रमाणे कार्यवाहीस संमती देण्यात येत आहे.

शासनाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजुरी देत आहे.

प्राधिकरणाचा सदर निर्णय शासनास कळविण्यात यावा.

<u>बाब क्रमांक : २१४/१०</u>

विषय :- जुळे सोलापूर भाग-१ येथील अदा करण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्याची रक्कम योजनेतील लाभार्थींकडून वसूल करण्याच्या अनुषंगाने (म्हाडाने पारीत केलेला ठराव क्रमांक : ६१०४, दिनांक ११.०८.२००५) कारवाई करीत असताना उद्‌भवलेल्या अडचणीवर पुढील निर्णयासाठीचा प्रस्ताव.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७८ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या दि. ११.८.२००५ रोजी पारीत केलेल्या ठराव क्रमांक : ६१०४ नुसार मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी जमिनीच्या मोबदल्याची रक्कम लाभाधारकांकडून वसुल करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे. परंतु लाभधारकांकडून झालेली निदर्शने इत्यादी पाहाता ही रक्कम लाभधारकांकडून वसुल होऊ शकेल असे दिसून येत नाही. तसेच शासनाकडून देखील मोबदल्याची रक्कम प्राप्त होईल अशी शक्यता वाटत नाही. यास्तव प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शासनाकडून मोबदल्याची रक्कम प्राप्त होऊ शकत नसल्यामुळे शासकीय/यू.एल.सी. जमिन म्हाडास देण्यासाठी शासनाला पुन्हा

विनंती करण्यात यावी, म्हाडाने अदा केलेल्या मोबदल्याच्या रक्कमे इतक्या मुल्याकंनाच्या जमिनी म्हाडाला हस्तांतरीत कराव्यात यास प्राधिकरण मंजुरी देत आहे.

<u>बाब क्रमांक : २१४/११</u>

विषय :- सी.टी.एस. क्र. ११३ (भाग) कन्नमवारनगर, विक्रोळी (पूर्व) येथील अल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटाअंतर्गत गृहनिर्माण योजना.

मध्यम उत्पन्न गटाअंतर्गत ८४ गाळयांचा विक्रीदर निश्चित करणेबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१७९ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या दिनांक : १२.३.२००२ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्रमांक : ५८०२ अन्वये कन्नमवार नगर, विक्रोळी येथील बांधण्यात येणा-या सदनिकांचा दर १४०० ते १५०० प्रती चौ. फुट निश्चित करण्यात आला होता. सदर दर हा जवळ जवळ ४ वर्षापूर्वी निश्चित करण्यात आला होता. तथापि, त्यानंतर गृहनिर्माण विभागाच्या दिनांक :२४.०६.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार दरातील अंदाजित ८ % तफावत कंत्राटदारास द्यावी लागत असल्यामुळे १५ % नफा व बांधकाम कालावधीच्या निम्या काळाकरिता एकूण खर्चावर १४% व्याज विचारात घेण्यात आल्यामुळे पूर्वीच्या दरात वाढ होत असल्याने मध्यम उत्पन्न गटाकरिता (८४ गाळे) सुधारित विक्रीचा दर रुपये १६००/- प्रती चौरस फुट आणि तसेच अल्प उत्पन्न गटाकरिता (उर्वरित ९३ गाळे) रु.१३५०/- प्रती चौ.फुट दराने विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१४/१२</u>

विषय :- एम्प्रेस मिल क्र.५, सुभाषरोड, नागपूर येथील व्यापारी संकुल आणि गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१८० दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाने एम्प्रेस मिल क्र.५, सुभाषरोड, नागपूर येथिल व्यापारी संकुल आणि गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी बाब टिपण्णीतील प्रस्ताव क्र.१, २, ३ व ५ वर खालीलप्रमाणे निर्णय घेतला :-

१. प्रस्ताव क्र.१ व २ :

१.१ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या गणीतामध्ये अंतर्भूत असलेल्या क्षेत्रफळासाठी (अनुज्ञेय बांधकामाच्या) रु. ९,६००/- प्रती चौ.मि.प्रस्तावित दराऐवजी सध्याच्या रेडी रेकनरच्या १०० टक्के म्हणजे रु. १२,०००/- प्रती चौ.मि. अशी अपसेट प्राईझ ठेवण्यात यावी व त्यानुसार प्रस्ताव क्र.१ (१९२५७ चौ.मि.चटईक्षेत्र निर्देशांक) व प्रस्ताव क्र.२ (१०६१० चौ.मि. चटईक्षेत्र निर्देशांक) च्या एकत्रीत भूखंड विक्रीसाठी निविदा मागविण्यात याव्यात.

१.२ खाजगी विकसकांना खुल्या बाजारात विक्रीची किंमत व क्षेत्र ठरविण्याचे स्वातंत्र्य राहील.

१.३ खाजगी विकसकाने पूर्ण भूअभिन्यास विकसन जसे कीं, रस्ते. मलनिःस्सारण वाहीन्या, गटारे, जलवाहीन्या, रस्त्यावरील दिवे इ. विकसित करुन द्यावेत.

१.४ निविदाकाराने निविदा भरलेल्या प्रस्तावित बांधकामास आवश्यकता असल्यास किंवा भविष्यात बांधकाम प्रस्तावित केल्यास रहीवासी विभागातून अधिकचा भूखंड देणे शक्य असल्यास त्याबाबत विचार करण्यास हरकत नाही. मात्र निविदेच्या दराने त्याची किंमत (प्रस्तावित चटईक्षेत्र निर्देशांकानुसार) त्यास द्यावी लागेल.

२. प्रस्ताव क्र.३ : रहिवासी गाळयांचा प्रकल्प :-

वाणिज्य संकुलाच्या वरील प्रकल्पास योग्य प्रतिसाद प्राप्त झाल्यानंतर २५२ रहिवासी गाळयांपैकी प्रत्येक प्रवर्गातील एक इमारत प्राधिकरणामार्फत बांधण्यास (ठोस मागणीनुसार बांधकाम क्षेत्र सिमत न ठेवता) परवानगी खालील प्रमाणे तीन इमारतीच्या बांधकामास परवानगी देण्यात येत आहे :-

५.१ उच्च उत्पन्न गट - १ (दोन इमारती) : एक इमारत.

५.२ उच्च उत्पन्न गट - २ (चार इमारती) : एक इमारत.

५.३ मध्यम उत्पन्न गट (नऊ इमारती) : एक इमारत.

३. प्रस्ताव क्र.५ : मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना पुढीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत :

३.१ व्यापारी संकुलाचा विकास करण्यासाठी विकसकांची अर्हता निश्चित करण्याबाबत निकष ठरवून निविदेच्या अटी व शर्ती निश्चित करुन निविदा मागविणे.

३.२ प्रकलपातील रहिवासी इमारतीतील वरील मजल्यांच्या गाळयांचे दर नागपूर मंडळाने प्रस्तावित केल्यानुसार कमी करण्याबाबत निर्णय घेणेबाबत.

३.३ गरजेनुसार रहिवासी भागाचे वाणिज्य भागात परिवर्तन करणेबाबत.

४. प्रस्ताव क्र.४ च्या बाबत असा निर्णय घेतला कीं, भूसंपादनाचे भांडवलीकरण व बांधकामासाठी आर्थिक गुंतवणूकीचे भांडवलीकरण यांच्या व्याजाचे दर निविदा प्राप्त झाल्यानंतर ठरविण्यात येईल.

<u>बाब क्रमांक : २१४/१३</u>

विषय :- वॅम्बे योजनेंतर्गत राज्य शासनाच्या वतीने म्हाडाने भरलेल्या निधीबाबत.

ठराव क्रमांक : ६१८१ **दिनांक : २७.३.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, म्हाडाने राज्य शासनाच्या वतीने वॅम्बे योजनेकरीता, वॅम्बे खात्यामध्ये रक्कम भरण्याची जी कार्यवाही केली आहे त्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच भविष्यात आवश्यक असल्यास करावयाच्या कार्यवाहीससुध्दा प्राधिकरण मंजुरी देत आहे.

<u>बाब क्रमांक : २१४/१४</u>

विषय :- प्राधिकरण तसेच प्राधिकरणांतर्गत प्रादेशिक मंडळातील जुनी वाहने निर्लेखित करुन त्याच्या बदल्यात नवीन वाहने खरेदी करण्याबाबत..

<u>ठराव क्रमांक</u> : ६१८२ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तपशिलास अनुसरुन शासन वित्त विभाग निर्णय क्र.विअप्र १०९१/प्रक्र १२/विनियम, दि.१.१०.१९९१ ला अधीन राहून निर्लेखनास पात्र असलेली जूनी वाहने प्रथम निर्लेखित करुन त्याऐवजी दि. १८/०५/२००४ रोजीच्या मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या समितीने प्रस्तावित केल्यानुसार नवीन वाहने टप्प्या-टप्प्याने खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच मा.उपाध्यक्ष / प्रा. यांचे दिमतीस असलेले टाटा इंडिगो या दर्जाचे वाहन इतर अधिका-यांकडे वर्ग करुन मा.उपाध्यक्ष / प्रा.हे बेस्ट, सीकॉम, एमआयडीसी. आदी शासकीय उपक्रमांच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या दर्जाचे अधिकारी असल्याने त्यांचे दिमतीस HONDA CITY हे नवीन वाहन खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

समितीने घेतलेला निर्णय वाहने खरेदी केल्यानंतर कार्योत्तर मंजुरीसाठी शासनास पाठविण्यात यावा.

<u>बाब क्रमांक : २१४/१५</u>

विषय :- सि.टी.एस.क्र.७९१/अ (भाग) वांद्रे (प.) या जमिनीवरील संक्रमण शिबिराचा पुनर्विकास प्रकल्पात विकासक मे.ओम् मेटल कन्सॉरटियम यांच्या उर्वरित वित्तीय भुगदानासाठी मुदतवाढ देणेबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१८३ दिनांक : २७.३.२००६

एकमताने निर्णय घेतला की, मे.ओम मेटल कन्सोरटीयम यांच्याशी झालेल्या करार पत्रातील तरतूद क्र. २.२.७ व शेडयुल-II प्रमाणे भरावयाचा दुसरा हप्ता स्विकृती मिळाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांपर्यंत देय होता, विकासकाने विनंती केल्यामुळे त्यांना दुसरा हप्ता भरण्यासाठी ३ महिने मुदतवाढ देण्यात येत आहे. तथापि हया रकमेवर विलंब कालावधीसाठी ९.५ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे. उर्वरीत रकमेचे हप्ते करारनाम्यातील करारपत्राप्रमाणे घेण्यात यावेत.

<u>बाब क्रमांक : २१४/१६</u>

विषय :- राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रमांतर्गत मुंबई शहर व उपनगर जिल्हयामध्ये कामे हाती घेण्यासाठी म्हाडा निधीतून रु. ५६.८९ कोटी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास उपलब्ध करुन देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१८४ **दिनांक : २७.३.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, शासनाच्या आदेशानुसार राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास सन २००५-२००६ या वर्षाकरिता शासनाकडून अर्थसंकल्पीत निधी म्हाडास प्राप्त होई पर्यंत रु. ५६.८९ कोटी प्राधिकरण निधीतून उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २६.०४.२००६ रोजी दुपारी ३.०० वाजतां आयोजित केलेल्या २१५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

<u>बाब क्रमांक : २१५/२</u>

विषय :- ठाणे महानगरपालिकेला पूर्वी दिलेल्या प्रायमरी शाळेकरिता दिलेला ९६६ चौ.मिटरचा भूखंड ठाणे महानगरपालिकेकडून मंडळास परत करण्यांत येत असल्यामुळे शिवाईनगर येथील शिवाई विद्याप्रसारक मंडळाच्या माझी आई शाळेकरिता देण्याबाबतचे प्रकरण.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१८५ दिनांक : २६.०४.२००६

एकमताने निर्णय घेतला की, ठाणे महानगरपालिकेला पूर्वी दिलेल्या प्रायमरी शाळेकरीता ९६६.०० चौ.मी. चा भूखंड ठाणे महानगरपालिकेकडून मंडळास परत करण्यात येत असल्यामुळे व सदरहू भूखंडालगत शिवाई विद्या प्रसारक मंडळ या संस्थेला पूर्वी दिलेल्या भूखंडावर माझी आई शाळा कार्यरत असून ठाणे महानगरपालिकेकडून सदरहू भूखंड माझी आई शाळेला मिळावा म्हणून शिवाई विद्याप्रसारक मंडळाने केलेल्या विनंतीचा विचार करुन सदरहू भूखंड शिवाई विद्या प्रसारक मंडळाच्या माझी आई या शाळेला प्राधिकरणाच्या किंमतीविषयक धोरणानुसार विक्रीची किंमत आकारुन वितरीत करण्यात यावा. सदरहू भूखंडावर संस्थेने काही भागाचा अनधिकृत वापर केला म्हणून विक्री किंमतीच्या १० टक्के दंडनीय रक्कम आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टा कराराने भूखंडाच्या किंमतीच्या १ टक्के वार्षिक भुईभाडे आकारुन व पुढील बाबी विचारात घेऊन वितरीत करण्यात यावा.

अ) प्रती चौरस मीटरचा दर ठरावाच्या दिनांकापर्यंत अद्यावत करुन अधिमूल्याची रक्कम ठरविणे.

ब) ठाणे महानगरपालिकेला रु. ३,१५,३१४/- परत कण्यात यावेत.

क) महापालिकेला द्यावयाच्या रकमेवरील व्याज शिवाई विद्या प्रसारक मंडळाने परस्पर ठाणे महानगरपालिकेला द्यावे.

ड) इतर आवश्यक तो खर्च मंडळाने वितरणाच्या वेळेस संस्थेकडून वसुल करावा.

त्याचप्रमाणे म्हाडा (जमीन वाटप) नियम १९८१ नियम ६ अन्वये इतर अटी व शर्तीशिवाय खालील अटींचा अंतर्भाव भाडेपट्टयात करण्यात यावा.

१. संस्थेच्या कार्यकारी मंडळावर मुख्य अधिकारी/कोकण मंडळ हे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला मंडळाचा अधिकारी घेण्यात यावा.

२. प्रत्येक वर्षी म्हाडा कर्मचा-यांच्या मुलांना प्रवेशास प्रत्यक वर्गात ५ जागा राखीव ठेवाव्यात.

३. म्हाडाच्या शिवाई नगर माजिवडे व नजिकच्या वर्तकनगर या गृहनिर्माण वसाहतीतील रहिवाश्यांच्या मुलांना प्राधान्याने सदर संस्थेत प्रवेश देण्यात यावा.

४. सर्व धर्माच्या, जातीच्या, वंशाच्या भारतीय व्यक्तीस / पाल्ल्यास निर्वेध प्रवेश राहील.

इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

<u>बाब क्रमांक</u> : <u>२१५/३</u>

विषय :- श्री. अे. रामकृष्णन (भा.प्र.से.) तत्कालीन उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांनी म्हाडा व काही सदस्यां बाबत केलेल्या आरोपा संदर्भात चौकशी करण्यासाठीश्री.बी.के.अगरवाल,भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती व त्यांना द्यावयाचे मानधन.

<u>ठराव क्रमांक :</u> ६१८६ दिनांक : २६.४.२००६

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. श्री.अे.रामकृष्णन, माजी उपाध्यक्ष / प्रा. यांनी दिनांक १/०२/२००४ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना लिहिलेल्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २०/०४/२००६ अन्वये नियुक्त केलेल्या श्री.बी.के.अगरवाल, भा.प्र.से. यांना पूर्ण चौकशीसाठी रु. १.५० लाख मानधन देण्यांला तसेच शासन निर्णय दिनांक २०/०४/२००६ मध्ये नमूद केलेल्या सोई सुविधा पुरविण्यास व त्यासाठी होणारा खर्च उपाध्यक्ष / प्रा. यांचे मान्यतेने म्हाडाच्या / मंडळाच्या निधीमधून करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

२. ठाणे महानगर पालिका क्षेत्रासाठी इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची स्थापना करण्यासंदर्भात शासन निर्णय दिनांक १३/०५/२००५ अन्वये अभ्यास गटासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या श्री. बी.के. अगरवाल, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून म्हणजे दि. १९.३.२००५ ते २०.१.२००६ पर्यंतच्या कालावधीसाठी दरमहा रु. १०,०००/- प्रमाणे १० महिन्यांचे रु. १,००,०००/- एवढे परिश्रमिक (मानधन) अदा करण्याच्या म्हाडाने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक</u> : <u>२१५/४</u>

विषय :- श्री. पी.एम. वर्गीस, उप अभियंता (बडतर्फ) यांचे शिक्षेच्या आदेशाविरुध्द अपील.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१८७ दिनांक : २६.४.२००६

एकमताने निर्णय घेतला की, श्री. पी.एम. वर्गीस, उप अभियंता (बडतर्फ) यांनी त्यांचे शिक्षेच्या विरुध्द दाखल केलेल्या अपिलावरील सुनावणी दोन महिन्यानंतर होणा-या प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात यावी. सदर सुनावणीकरीता आवश्यक असलेल्या अपिलाच्या प्रतींचा पुरवठा करण्याबाबत श्री. वर्गीस यांना कळविण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : २१५/५</u>

विषय :- शैलेंद्रनगर, दहिसर (पूर्व) येथील संक्रमण शिबीर पुनर्बांधणी प्रकल्पांतर्गत नवीन संक्रमण गाळे व खुल्या विक्रीसाठी सदनिका बांधण्याचा एकरकमी ठेका मेसर्स बी.जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांना देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६ दिनांक : २६/०४/२००६

एकमताने निर्णय घेतला की, शैलेंद्र नगर, दहिसर (पूर्व) मुंबई येथे ४१६ संक्रमण गाळे व ३१४ विक्री गाळे बाधण्याचे काम शासनाच्या पुर्वरचित बांधकाम कंत्राटदाराच्या यादीतील सध्या पात्र असलेल्या मेसर्स बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी लिमिटेड यांना देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण खालील अटीवर मंजुरी देत आहे.

१. **अ]** संक्रमण सदनिका १८० चौ. फुट चटई क्षेत्राच्या असतील व इमारती तळ + ७ मजली स्वरुपाच्या बांधण्यात येतील शासकीय समितीच्या निर्णयानुसार (पत्र क्रमांक मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. / १४०४ / प्र.क्र. ५५ / गृनि.धो-२/ गृहनिर्माण विभाग / मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/०७/२००४) रु.८२४/- प्रती चौ. फुट इतका बांधकामाचा दर राहील व शासनाच्य दिनांक २२/०९/९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

ब] विक्री गाळयांचा (तळ + ७) बांधकामाचा दर शासन निर्णयानुसार रुपये ८२४/- प्रती चौ. फुट आणि अधिक सुधारित विनिर्देशासाठी रुपये ७५/- (५५ + २०) प्रती चौरस फुट म्हणजे रुपये ८९९/- प्रती चौरस फुट असा राहील. शासनाच्या दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

२. शासनाचे दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार मोकळया जागेवरील प्रकल्पाकरिता बांधकामाचा कालावधी १८ महिने आहे परंतु यापूर्वी झालेल्या पुर्नबांधणी प्रकल्पांचा अनुभव लक्षात घेता जुनी संक्रमण शिबीरे पाडून जागा मोकळी केल्याशिवाय नवीन गाळे बांधणी शक्य होत नाही. त्यामुळे यासाठी ३ महिन्याचा अतिरिक्त कालावधी कंत्राटदारास मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार काम सुरु केल्यापासून २१ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करावे. प्रस्तावित कामाची अंदाजित किंमत सुमारे २९.३३ कोटी इतकी राहील. तथापि सदर कामास महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे जे बदल होतील त्याप्रमाणे तितक्या रकमेनुसार योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

३. मे.बी.जी. शिर्के.कं.टे. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत ६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे निर्णय यापूर्वी प्राधिकरणाने सायन येथील मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. यांच्या कामावर दिनांक ०७/०८/२००४ ठराव क्रमांक ६०४८ अन्वये घेतलेला आहे.

४. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३० जुलै २००४ च्या पत्रानुसार वर नमुद केलेल्या दरानुसार केलेल्या कामाच्या किंमतीमध्ये भाववाढ जून २००४ च्या मुळ निर्देशांकानुसार किंवा भाववाढ किंवा घट म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने

यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.
स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

५. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणा-या पायाभूत बाहय सुविधांचे काम ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षाच्या असलेल्या प्रचलित दरसूची (DSR/M.C.G.M's FMR) प्रमाणे देण्यात येईल.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

७. जुनी संक्रमण शिबीरे मुख्य अधिकारी / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी १२ महिन्याच्या आत स्थलांतरित करुन जागा मोकळी करुन देण्यात यावी. जेणेकरुन योजनेच्या प्रगतीस अडथळा येणार नाही.

८. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना अदा करण्यात येत असलेल्या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेस मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

९. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. या आय.एस.ओ.९००१ (**I.S.O .9001)** प्राप्त कंपनी पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणा-या इमातींचे ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) या संस्थेकडून मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी आणावयाची आहे.

आय. आय. टी. पवईच्या मंजुरीकरीता लागणारा खर्च मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी द्यावा.

१०. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडाला कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास त्याची जबाबदारी शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांच्यावर राहील व होणा-या नुकसानीचे मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. भरपाई करेल. या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र (लेटर) घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्याच्या संबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.

११. सदर योजनेतील खुल्या विक्रीचे गाळयांसाठी जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्या नंतर देण्यात यावी जेणेकरुन गाळयांना चांगला प्रतिसाद येईल.

१२. योजनेचे बांधकाम म्हाडाचा निधी वापरुन, लेखाशिर्ष १६० खाली करण्यात यावे.

<u>बाब क्रमांक</u> <u>: २१५/६</u>

विषय :- सी.टी.एस. क्रमांक १८४, कॅनरा इंजिनिअरींग जवळ, घाटकोपर (पूर्व) येथील संक्रमण शिबीर पुनर्बांधणी प्रकल्पांतर्गत नवीन संक्रमण गाळे व खुल्या विक्रीसाठी सदनिका बांधण्याचा एकरकमी ठेका मेसर्स बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी लिमिटेड यांना देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१८९ दिनांक : २६/०४/२००६

एकमताने निर्णय घेतला की, सी. टी. एस. क्रमांक १८४, कॅनरा इंजिनिअरींग जवळ, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे ३१२ संक्रमण गाळे व २०२ विक्री गाळे बाधण्याचे काम शासनाच्या पुर्वरचित बांधकाम कंत्राटदाराच्या यादीतील सध्या पात्र असलेल्या मेसर्स बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी लिमिटेड यांना देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण खालील अटीवर मंजुरी देत आहे.

१. **अ]** संक्रमण सदनिका १८० चौ. फुट चटई क्षेत्राच्या असतील व इमारती तळ + ७ मजली स्वरुपाच्या बांधण्यात येतील शासकीय समितीच्या निर्णयानुसार (पत्र क्रमांक मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. / १४०४ / प्र.क्र. ५५ / गृनि.धो-२/ गृहनिर्माण विभाग / मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/०७/२००४) रु.८२४/- प्रती चौ. फुट इतका बांधकामाचा दर राहील व शासनाच्य दिनांक २२/०९/९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

ब] विक्री गाळयांचा (तळ + ७) बांधकामाचा दर शासन निर्णयानुसार रुपये ८२४/- प्रती चौ. फुट अधिक सुधारित विनिर्देशासाठी रुपये ७५/- (५५ + २०) प्रती चौरस फुट, म्हणजे रुपये ८९९/- प्रती चौरस फुट असा राहील. शासनाच्या दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

२. शासनाचे दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार मोकळया जागेवरील प्रकल्पाकरिता बांधकामाचा कालावधी १८ महिने आहे परंतु यापूर्वी झालेल्या पुर्नबांधणी प्रकल्पांचा अनुभव लक्षात घेता जुनी संक्रमण शिबीरे पाडून जागा मोकळी केल्याशिवाय नवीन गाळे बांधणी शक्य होत नाही. त्यामुळे यासाठी ३ महिन्याचा अतिरिक्त कालावधी कंत्राटदारास मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार काम सुरु केल्यापासून २१ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करावे. प्रस्तावित कामाची अंदाजित किंमत सुमारे १८.४२ कोटी इतकी राहील. तथापि सदर कामास महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे जे बदल होतील त्याप्रमाणे तितक्या रकमेनुसार योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

३. मे.बी.जी. शिर्के.कं.टे. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत ६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे निर्णय यापूर्वी प्राधिकरणाने सायन येथील मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. यांच्या कामावर दिनांक ०७/०८/२००४ ठराव क्रमांक ६०४८ अन्वये घेतलेला आहे.

४. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३० जुलै २००४ च्या पत्रानुसार नमुद केलेल्या दरानुसार केलेल्या कामाच्या किंमतीमध्ये जून २००४ च्या मुळ निर्देशांकानुसार भाववाढ किंवा घट म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या

फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.
स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

५. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणा-या पायाभूत बाहय सुविधांचे काम ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षाच्या असलेल्या प्रचलित दरसूची (DSR/M.C.G.M's FMR) प्रमाणे देण्यात येईल.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

७. जुनी संक्रमण शिबीरे मुख्य अधिकारी / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी १२ महिन्याच्या आत स्थलांतरित करुन जागा मोकळी करुन देण्यात यावी. जेणेकरुन योजनेच्या प्रगतीस अडथळा येणार नाही.

८. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना अदा करण्यात येत असलेल्या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेस मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

९. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. या आय.एस.ओ.९००१ (**I.S.O .9001)** प्राप्त कंपनी पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणा-या इमातींचे ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) या संस्थेकडून मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी आणावयाची आहे. आय. आय. टी. पवईच्या मंजुरीकरीता लागणारा खर्च मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी द्यावा.

१०. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडाला कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास त्याची जबाबदारी शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांच्यावर राहील व होणा-या नुकसानीचे मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. भरपाई करेल. या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र (लेटर) घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्याच्या संबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.

११. सदर योजनेतील खुल्या विक्रीचे गाळयांसाठी जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्या नंतर देण्यात यावी जेणेकरुन गाळयांना चांगला प्रतिसाद येईल.

१२. योजनेचे बांधकाम म्हाडाचा निधी वापरुन, लेखाशिर्ष १६० खाली करण्यात यावे.

<u>बाब क्रमांक</u> : <u>२१५/७</u>

विषय :- सी.टी.एस. क्रमांक १३२० (भाग) व सर्व्हे क्रमांक ३८६, मुलुंड (पूर्व) येथे ३२० उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका बांधण्याचा एकरकमी ठेका मेसर्स बी.जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी लिमिटेड यांना देण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१९० **दिनांक : २६.४.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, सी.टी. एस. क्रमांक १३२० (भाग) सर्व्हे क्रमांक ३८६, मुलुंड (पूर्व) येथे ३२० उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका बाधण्याचे काम शासनाच्या पुर्वरचित बांधकाम कंत्राटदाराच्या यादीतील सध्या पात्र असलेल्या मेसर्स बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी लिमिटेड यांना देण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण खालील अटीवर मंजुरी देत आहे.

१. सदनिकांच्या (तळ + ७) बांधकामाचा दर शासन निर्णयानुसार रुपये ८२४/- प्रती चौ. फुट असा राहील. शासनाच्या दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील. स्टील्ट + १५ मजल्याच्या इमारतींसाठी मंजुर दर रुपये ८२४/- प्रती चौरस फुट अधिक रुपये १८५/- (स्टील्ट + ७ आणि स्टील्ट + १५ च्या बांधकाम दरातील फरक) असे एकूण रुपये १००९/- प्रती चौरस फुट बांधकाम दर अधिक सुधारित विनिर्देशासाठी रुपये ७५/- (५५ + २०) प्रती चौरस फुट अधिक भाववाढ आणि विक्रीकर राहील.

२. शासनाचे दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार मोकळया जागेवरील प्रकल्पाकरिता बांधकामाचा कालावधी १८ महिने आहे परंतु यापूर्वी झालेल्या पुर्नबांधणी प्रकल्पांचा अनुभव लक्षात घेता जुनी संक्रमण शिबीरे पाडून जागा मोकळी केल्याशिवाय नवीन गाळे बांधणी शक्य होत नाही. त्यामुळे यासाठी ३ महिन्याचा अतिरिक्त कालावधी कंत्राटदारास मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्टील्ट + १५ माळयांच्या टॉवरच्या बांधकामासाठी जास्तीचे ३ महिन्याचा कालावधी आवश्यक आहे. त्यानुसार काम सुरु केल्यापासून एकूण २४ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करावे. प्रस्तावित कामाची अंदाजित किंमत सुमारे ३१.०४ कोटी इतकी राहील. तथापि सदर कामास महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे जे बदल होतील त्याप्रमाणे तितक्या रकमेनुसार योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

३. मे.बी.जी. शिर्के.कं.टे. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत ६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे. अशा प्रकारे निर्णय यापूर्वी

प्राधिकरणाने सायन येथील मे.बी.जी.शिर्के. कं. टे. लि. यांच्या कामावर दिनांक ०७/०८/२००४ ठराव क्रमांक ६०४८ अन्वये घेतलेला आहे.

४. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३० जुलै २००४ च्या पत्रानुसार वर नमुद केलेल्या दरात वाढ किंवा घट प्राईझ इंडेक्शशी आधारित म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.
स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

५. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणा-या पायाभूत बाहय सुविधांचे काम ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षाच्या असलेल्या प्रचलित दरसूची प्रमाणे देण्यात येईल.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

७. जागेवरील संक्रमण शिबीरे मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी १२ महिन्याच्या आत स्थलांतरित करुन जागा मोकळी करुन देण्यात यावी. जेणेकरुन योजनेच्या प्रगतीस अडथळा येणार नाही.

८. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांना अदा करण्यात येत असलेल्या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून योजनेस मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

९. मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. या आय.एस.ओ.९००१ (**I.S.O .9001)** प्राप्त कंपनी पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणा-या इमारतींचे ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) या संस्थेकडून मे. बी. जी. शिर्के. कं. टे.लि.यांनी आणावयाची आहे. आय. आय. टी. पवईच्या मंजुरीकरीता लागणारा खर्च मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांनी द्यावा.

१०. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडाला कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास त्याची जबाबदारी शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांच्यावर राहील व होणा-या नुकसानीचे मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. भरपाई करेल. या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र (लेटर) घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्याच्या संबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.

११. सदर योजनेतील खुल्या विक्रीचे गाळयांसाठी जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्या नंतर देण्यात यावी जेणेकरुन गाळयांना चांगला प्रतिसाद येईल.

१२. योजनेचे बांधकाम म्हाडाचा निधी वापरुन, लेखाशिर्ष १६० खाली करण्यात यावे.

<u>बाब क्रमांक</u> : <u>२१५/८</u>

विषय :- मे.ए.व्ही. शहा, कर सल्लागार यांची वित्तीय वर्ष २००६-२००७ करिता पुनर्नियुक्ती व मासिक शुल्कात वाढ करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६१९१ दिनांक २६.४.२००६

एकमताने निर्णय घेतला की,

१. मे. ए.व्ही. शाह कर सल्लागार यांची थेट पध्दतीने तीन वर्षापूर्वीच नेमणूक करण्यात आलेली असल्यामुळे त्याबाबत कार्योत्तर मंजूरीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२. मे. ए.व्ही. शाह कर सल्लागार यांची वित्तीय वर्ष २००६-२००७ करीता पुनर्नियुक्ती करण्यास हरकत नाही.

३. सहाय्यक आयुक्त, विक्रीकर विभाग यांनी परताव्याच्या रक्कमेवर (रु.८३.९५ लाख) नाकारलेले व्याज मिळविण्याबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी वैयक्तिक स्तरावर कार्यवाही करावी.

४. विक्रीकर सल्लागार मे. ए.व्ही. शाह यांना मासिक शुल्क रु. ३८,५००/- देण्यात यावे. (त्यांना मासिक शुल्क रु. ४८५००/- देण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.)

५. विक्रीकर सल्लागार मे. ए.व्ही. शाह यांचे रु. १९९५००/- अपिल निकाली काढण्याबाबतचे देयक मंजूर करण्याचे प्रकरणी **<u>प्रत्यक्ष परतावा रक्कम जमा झाल्यावर</u>** फी देण्याबाबतचा निर्णय उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे स्तरावर घेण्यात यावा.

<u>बाब क्रमांक</u> : <u>२१५/९</u>

विषय :- प्राधिकरणाच्या रु. ४५.०० कोटीच्या गुंतवणुकीबाबत.

ठराव क्रमांक : ६१९२ **दिनांक : २६.४.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी रु. ४५ कोटी गुंतवणुकीबाबत फसवणुकीचा झालेला प्रकार लक्षात घेता प्राधिकरणाचा निधी सुरक्षित राहणे हे सर्वात महत्वाचे असून त्याला प्राधान्य देण्यात यावे. म्हाडा ही संस्था पैसे व्याजाने देऊन नफा कमावणारी नसल्याने किंवा तसा म्हाडाचा प्रमुख उद्देश नसल्याने व्याज मिळविणे हे म्हाडाचे प्रमुख उद्दिष्ट नसल्याने, मुद्दल सुरक्षित राहील व अतिरिक्त निधी सुरक्षित ठिकाणी सोयीने व सुलभतेने ठेऊन त्यातून काही उत्पन्न मिळवावे एवढेच माफक उद्दिष्ट ठेवणे म्हाडाच्या हिताचे असल्याने अतिरिक्त निधीची गुंतवणूक करण्यासाठी म्हाडाच्या मुख्यालयाच्या बांद्रा पूर्व व पश्चिम परिसरातील १७ राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांचाच अतिरिक्त निधीची गुंतवणूक करण्यासाठी विचार करावा, लांबच्या व दूरच्या बँका किंवा संस्थांचा विचार करण्यांत येऊ नये. परिसरातील जवळच्या संस्थांचा व राष्ट्रीयकृत बँकांचा विचार केल्यामुळे समक्ष संपर्क ठेऊन मुदत ठेव पावती मिळविणे व ती योग्य असल्याची खातरजमा करण्यात यावी.

म्हाडाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक प्रक्रियेमध्ये अमुलाग्र बदल करणे गरजेचे असल्याने बाब टिप्पणी सोबतच्या परिशिष्ठ १ मध्ये दर्शविण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वाना मान्यता देण्यात येते. म्हाडाचा अतिरिक्त निधी गुंतविताना या मार्गदर्शक तत्वाची काटेकार अंमलबजावणी करण्यात यावी.

स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इस्टेट, ठाणे यांनी ७.५० प्रतिशत प्रतिवर्ष व्याजदर दिल्यामुळे म्हाडाचे ८.९६ (त्याच दिवशी दुस-या क्रमांकाचा महत्तम व्याज दर) वजा ७.५० इतके जे नुकसान झाले आहे ते सदर बँकेकडून वसुल करावे. तसेच दिनांक २३/०३/२००६ ते ३०/०३/२००६ या कालावधीचे व्याज नुकसान भरुन देणे गरजेचे आहे. म्हाडाचे जे नुकसान झाले ते भरुन देण्याबाबत स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इस्टेट, ठाणे यांचे विरुध्द रिझर्व्ह बँकेच्या Ombudsman Banking या ठिकाणी अपिल दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया, वागळे इस्टेट, ठाणे या शाखेत कधीही गुंतवणूक करण्यात येऊ नये. बँकेच्या या शाखेस काळया यादीत टाकण्यात यावे.

सदर फसवणुकीचे प्रयत्न करण्याचा प्रकार घडल्यामुळे उद्भवलेल्या बीकट परिस्थितीमुळे दिनांक २३.३.२००६ ते २१.४.२००६ या कालावधीत म्हाडाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक करण्याचे काम शक्य झालेले नाही. या कालावधीत विशेष परिस्थितीमुळे म्हाडाचे जे आर्थिक नुकसान झाले आहे ते क्षमापीत करण्यास मान्यता देण्यात येते.

प्राधिकरणाने ठराव क्रमांक ५८६६, दिनांक : २४.१२.२००२ अन्वये गुंतवणूकीचे सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना दिलेले आहेत. तथापि, उपाध्यक्ष / प्राधिकरण गुंतवणूकीच्या निर्णयासाठी कार्यबाहुल्यामुळे उपलब्ध होऊ शकत नसल्यास गुंतवणूकीचे काम हे त्याच दिवशी ठराविक वेळेपर्यंत करावयाचे असल्याने उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या अनुपस्थितीत समितीने गुंतवणूकीचा निर्णय घ्यावा व उपाध्यक्ष / प्रा. यांचेशी संपर्क साधून त्यांची मौखिक मान्यता घेण्यात यावी व म्हाडाचा अतिरिक्त निधी गुंतविण्यात यावा, त्यास मान्यतेसाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना नस्ती सादर करावी. सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता सुरु करावी.

<u>बाब क्रमांक</u> : <u>२१५/१०</u>

विषय :- स.क्र.१९१-अ, येरवडा पुणे येथील प्लॉट क्र.पीबी-२ या मोकळया भूखंडावर ३२ मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांच्या योजनेच्या बांधकामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६१९३ दिनांक : २६.४.२००६

एकमताने निर्णय घेतला की, स.क्र.१९१-अ, येरवडा पुणे येथील प्लॉट क्र.पीबी-२ या मोकळया भूखंडावर ३२ मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांच्या योजनेच्या बांधकामासाठी पुनःश्न निविदा मागविण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक</u> : <u>२१५/११</u>

विषय :- स.क्र.१९१-अ, येरवडा पुणे येथील प्लॉट क्र.पीबी-१ या मोकळया भूखंडावर ४८ उच्च उत्पन्न गटातील सदनिकांच्या योजनेच्या बांधकामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६१९४ दिनांक : २६.४.२००६

एकमताने निर्णय घेतला कीं,

स.क्र.१९१-अ, येरवडा पुणे येथील प्लॉट क्र.पीबी-१ या मोकळया भूखंडावर ४८ उच्च उत्पन्न गट बांधकामाच्या योजनेसाठी मे. सी.बी. ॲण्ड सन्स या बोलीधारकाचा वाटाघाटीतून कमी केलेला सर्वात कमी असा ९.१७ % जादा देकार स्वीकृत करण्यास मान्यता देण्यांत येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २३.०५.२००६ रोजी दुपारी ३.०० वाजतां आयोजित केलेल्या २१६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २१६/२

विषय :- मौजे देवसडी व पुंगळा, ता.जिंतूर, जिल्हा परभणी येथे गृहनिर्माण योजना घेण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जदारांना अर्जासह भरलेली अनामत रक्कम प्रशासकीय खर्च न करता परत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१९५ **दिनांक : २३/०५/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं, मौजे देवसडी व पुंगळा, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी येथील घर बांधणीची योजना राबविण्यासाठी निश्चित मागणी अजमाविण्यास देण्यात आलेल्या जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जदारांची रु.१५००/- अनामत रक्कमेसह सदर अनामत रक्कम प्रशासकीय खर्चापोटी १ टक्का कपात न करता परत करण्यास मंजूरी देण्यात येते.

बाब क्रमांक : २१६/३

विषय :- एम.आय.डी.सी.बुटीबोरी, जिल्हा नागपूर येथे ११४ गाळे अल्प उत्पन्न गट '' अ '' टाईप गृहनिर्माण योजनेच्या (राष्ट्रीय गृहनिर्माण योजना) बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांच्या स्विकृतीबाबत.

ठराव क्रमांक : ६१९६ दिनांक : २३/०५/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, एम.आय.डी.सी.बुटीबोरी, जिल्हा नागपूर येथील ११४ गाळे अल्प उत्पन्न गट " अ " टाईप राष्ट्रीय गृहनिर्माण योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांच्या ११.९७ टक्के जास्त दराची निम्नतम निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१६/४</u>

विषय :- मे.के.एस.संघवी आणि कंपनी, सनदी लेखापाल यांची पुनर्नियुक्ती करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६१९७ दिनांक : २३/०५/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, मे.के.एस.संघवी, सनदी लेखापाल यांची सन् २००६-२००७ ते २००९-२०१० पर्यंत या तीन वर्षाकरिता पुर्ननियुक्ती पूर्वीच्याच अटी व शर्तीस अधिन राहून मासिक शुल्क रु. १.२५ लाखास मान्यता देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २१६ / ६</u>

विषय :- इमारत क्र. ४० पी, भिकोबा निवास, परळगांव, परळ,मुंबई -१२ या इमारतीच्या " ८८ (अ) " प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१९८ दिनांक : २३/०५/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्रमांक ४० पी, भिकोबा निवास, परळगांव, परळ, मुंबई - ४०० ०१२ या इमारतीस म्हाड कायदा १९७६, कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१६/७</u>

विषय :- इमारत क्र. २३-२३ अ, आराम इमारत, परळगांव, परळ, मुंबई -१२ या इमारतीच्या '' ८८ (३) (अ) '' प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६१९९ दिनांक : २३/०५/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्रमांक २३-२३ अ, आराम इमारत, परळगाव, परळ, मुंबई - ४०० ०१२ या यइमारतीस म्हाड कायदा १९७६ कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१६/८</u>

विषय :- इमारत क्र.७१४ अे, बापूराव जगताप मार्ग, ''ई'' विभाग, भायखळा, मुंबई-११ या इमारतीस म्हाडा अधिनियमातील कलम ८८ (३) (ब) चे प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६२०० **दिनांक : २३/०५/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्र.७४१-अे, बापूराव जगताप मार्ग, '' ई '' विभाग, भायखळा, मुंबई : ४०० ०११ या इमारतीस म्हाड अधिनियमातील कलम ८८ (३) (ब) चे प्रमाणपत्र देण्यास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : २१६/९

विषय :- ६ बेकर लेन, सीएस क्र.२० माझगांव विभाग येथील पुनर्रचना योजनेच्या कामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६२०१ **दिनांक : २३/०५/२००६**

एक मताने निर्णय घेतला कीं, ६ बेकर लेन, सीएस क्र.२०, माझगांव विभाग, मुंबई येथील पुनर्रचना योजनेच्या कामाच्या मे,सतिश कन्स्ट्रक्शन यांच्या २८ टक्के अधिक दाराच्या निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २१६/१०

विषय :- इमारत क्र. २७-२९-३१ नारळवाडी, रामभाऊ भोगले मार्ग, '' ई '' विभाग, माझगाव, मुंबई-१०.

ठराव क्रमांक : ६२०२ दिनांक : २३/०५/२००६

एममताने निर्णय घेतला कीं,इमारत क्र. २७-२९-३१ नारळवाडी, रामभाऊ भोगले मार्ग, " ई " विभाग, माझगाव, मुंबई-४०० ०१० या पुनर्रचित इमारतीस शितलादेवी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी हे नाव देण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१६/११</u>

विषय :- इमारत क्र.१३, १३अे नारळवाडी,
सी.एस.क्र. ६१४, ६१५ माझगांव विभाग
येथील पुनर्रचना योजनेच्या कामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६२०३ दिनांक : २३/०५/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्र.१३, १३अे नारळवाडी, सी.एस.क्र. ६१४, ६१५ माझगांव विभाग येथील पुनर्रचना योजनेच्या कामाच्या निम्नतम ठेकेदार मे.रवि कॉन्ट्रॅक्टींग ॲण्ड ट्रेडींग कंपनी यांच्या २६.७८ टक्के जास्त रकमेच्या निविदा स्वीकृतीस मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : १२.०६.२००६ रोजी दुपारी १.०० वा. आयोजित केलेल्या २१७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २१७/३

विषय :- वर्सोवा, सर्व्हे क्र. १२०, येथील गृहनिर्माण प्रकल्पामधील उच्च उत्पन्न गटासाठीच्या १०८८ सदनिकांचा प्रति चौरस फुट दर निश्चित करणे व सदनिकांच्या वितरणासाठी जाहिरात देण्यास मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२०४ **दिनांक : १२.०६.२००६**

एकमताने निर्णय घेतला की, वर्सोवा, सर्व्हे क्र. १२०, येथील गृहनिर्माण प्रकल्पामधील उच्च उत्पन्न गटासाठीच्या सध्या जाहिरात योग्य ३५४ सदनिकांचा दर प्रती चौरस फुट सिध्द गणक दराप्रमाणे रुपये ४३३८/- आकारण्यास व सदनिकांच्या वितरणासाठी जाहिरात देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २१७/४

विषय :- ज्ञानेश्वर नगर, शिवडी-वडाळा, भूखंड क्र.७१,७२ व ७३ या वसाहतीचा विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३३(५) अंतर्गत पुनर्विकास करण्याबाबत.

<u>ठराव क्रमांक</u> : ६२०५ दिनांक : १२.०६.२००६

एकमताने निर्णय घेतला की, ज्ञानेश्वर नगर, शिवडी-वडाळा, भूखंड क्र.७१,७२ व ७३ या वसाहतीचा पुनर्विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३३(५) अंतर्गत तरतूदी नुसार पुनर्विकास करण्याबाबतच्या बाब टिप्पणीती प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीने ठराव क्र.२१६ दि.२४/१/२००६ अन्वये व महानगरपालिकेने ठराव क्र.११९० दि.२७/१/२००६ अन्वये पूर्वीचा सुधार समितीचा ठराव क्र.१६१ दि.८/८/६७ व महापालिका ठराव क्र.१३१८ दि.२३/१/६८ सुधारीत केला असून यानुसार ५०-५० टक्के बांधीव गाळया ऐवजी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांका मधुन प्राप्त होणा-या निधीचा ५०-५० टक्के भाग म्हाडा व महापालीका विभागुन घेण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सुधार समिती ठराव क्र. २१६ दि.२४/१/२००६ अन्वये घेतलेल्या निर्णय, त्या मधील अटी तसेच महानगर पालीकेचा ठराव क्र.११९० दि.२७/१/२००६ मधील निर्णया प्रमाणे व त्या सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्ती प्रमाणे या प्रकरणी पूढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच महापालिकेस व म्हाडास ५०-५० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्रफळाचे अधिमूल्य प्राप्त होणार असल्यामुळे सदर वसाहतीचा विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३३ (५) अंतर्गत पुनर्विकास करण्यास मान्यता देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या

दिनांक : १६.०८.२००६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित केलेल्या २१९ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : २१९/४

विषय :- मौजे वांद्रे, स.क्र.३५५ अे पै. (न.भू.क्र.२९ पै व ३० पै) गोळीबार सांताक्रुझ येथिल मोकळा भूखंड झोपडपट्टीवासियांच्या संस्थेस झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी भाडेपट्टयाने देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२०६ **दिनांक : १६/०८/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१) मे.शिवालीक व्हेंचर्स यांना ५ वर्षाच्या कालावधीकरिता रु. १५,८००/- या जमिनीच्या बाजारभावाच्या ८ टक्के दराने वार्षिक भुईभाडे आकारुन रु. २,६४,१७,६००/- इतकी रक्कम आगाऊ वसूल करुन जागा देण्यात यावी.

२) मे.मुंबई शेल्टर हौसिंग या ठेकेदाराकडून काम काढून घेतल्यामुळे त्यांची होणा-या नुकसानाची भरपाई मे.शिवालीक व्हेंचर्स देतील, असे प्रतिज्ञापत्र करुन घेण्यात यावे.

३) ५ वर्षानंतर त्यांनी ४१८० चौ.मी. किंवा प्रत्यक्षात मोजमापानुसार येणारे क्षेत्र विकास करुन चौकोनी अथवा आयताकृती आकारात म्हाडास परत द्यावे.

४) योजना राबविण्यास विलंब झाल्यास त्यावेळच्या रेडीरेकनरच्या बाजारभावाप्रमाणे ८ टक्के दराने भाडे आकारुन प्राधिकरण मुदतवाढीचा योग्य त्या कारणासाठी विचार करु शकेल.

५) म्हाडाकडून एन.ओ.सी.आल्याशिवाय एस.आर.ए.कडून लाभधारकांना ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळणार नाही, तसेच तो विकासक जे बांधकाम करणार आहे त्यातील शेवटच्या २५ टक्के सदनिका (गाळे) म्हाडाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय विकसकास विक्री करता येणार नाहीत. अशी अट घालण्यात यावी.

वरील सर्व अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१९/५</u>

विषय :- मौजे कोलेकल्याण येथील स.नं.१५७, हि.क्र.१ व २ आणि स.नं.१५८, हि.क्र. २३ पैकी ही मिळकत पाकिस्तान दुतावासास देण्याबाबत.

ठराव क्रमांक :६२०७ **दिनांक : १६/०८/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं, मे.सेठी एक्सपोर्ट यांच्या मालकीच्या भूखंडाचा स.क्र.१५८/२३ पैकी क्षेत्र सुमारे ७७८.८८ चौ.मि. व मुंबई मंडळाच्या मालकीच्या भूखंडाचा न.भू.क्र. ५५९७ पैकी व ५५९८ पैकी आणि इतर प्रत्यक्ष मोजणीअंती क्षेत्र सुमारे ७७८.८८ चौ.मी. अदलाबदली करण्यास आणि सदर क्षेत्र हे फ्री होल्ड न देता ९० वर्षांच्या भाडे पट्टा कराराने देण्यास मंजूरी देण्यात येते. म्हाड कायदा १९७६ मधील तरतुदीनुसार भूखंड अदला बदली करण्याचे अधिकार प्राधिकरणास नसल्याने सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१९/६</u>

विषय :- म्हाड अधिनियमातील कलम ५२ अन्वये खरेदीने संपादित करावयाच्या सै.सावेडी, अहमदनगर येथिल सर्व्हे नं. ५५/१अ, ५५/१ब, ५५/१क या जमिनीच्या मुल्यांकन समितीने ठरविलेल्या किंमतीस मान्यता प्रदान करणेबाबत.

ठराव क्रमांक :६२०८ दिनांक : १६/०८/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ५२ अन्वये खरेदीने संपादित करावयाच्या मौजे सावेडी, अहमदनगर येथिल सर्व्हे नं. ५५/१अ, ५५/१ब, ५५/१क या जमिनीच्या मुल्यांकन समितीने ठरविलेल्या रु. २७,२०,८९०/- या किंमतीस मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१९/७</u>

विषय :- चिमूर, जिल्हा चंद्रपूर येथिल लघु औद्योगिक क्षेत्रामधील मंडळाच्या गृहनिर्माण योजनेकरिता जमिन संपादित करण्याकरिता भरावी लागणारी अतिरिक्त रक्कम रु. १,४२,०००/- महामंडळाकडे भरणा करण्यास मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२०९ **दिनांक : १६/०८/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं, चिमूर, जिल्हा चंद्रपूर येथिल लघु औद्योगिक क्षेत्रामधील मंडळाच्या गृहनिर्माण योजनेकरिता जमिन संपादित करण्याकरिता भरावी लागणारी अतिरिक्त रक्कम रु. १,४२,०००/- औद्योगिक महामंडळाकडे भरणा करण्यास मंजूरी देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २१९/८</u>

विषय :- मनमाड नगर परिषद हद्दितील म्हाडाची शालेय उपक्रमासाठी आरक्षित असलेली जागा प्राथमिक शाळेसाठी मिळणेबाबत.

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,
<u>नाशिक यांची विनंती.</u>

ठराव क्रमांक : ६२१० **दिनांक : १६/०८/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१/- मनमाड येथील म्हाडाच्या योजनेतील प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेला सुमारे ४३६८ चौ.मि. क्षेत्राचा भूखंड नाशिक मराठा विद्या प्रसारक समाज यांना वाटप करण्याकरिता सचिव/शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अभिप्राय मागवून घेण्यासाठी सचिव/गृहनिर्माण विभाग यांना सविस्तर संदर्भ करण्यात यावा. शासनाच्या संमती नंतर सदर प्राथमिक शाळेच्या भूखंडाचे वाटप करण्यात यावे.

२/- प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेले भूखंड वाटप करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे शासनाने मंजूर केलेली असल्यामुळे सदर भूखंड मनमाड नगर परिषदेच्या ' ना हरकत प्रमाणपत्र ' दाखल्याच्या धर्तीवर भूखंडाची किंमत रु. ४,४८,५००/- वसूल करुन वाटप करण्यासाठीचा निर्णय शासन स्तरावर घेण्यासाठी सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यास मान्यता देण्यांत येते.

<u>बाब क्रमांक : २१९/९</u>

विषय :- नाशिक मंडळातील धुळे पद्मनाभनगर येथील २० मध्यम उत्पन्न गट व ५ दुकानांची योजना.

दुकानाच्या विक्री किंमतीत नफयाचे प्रमाण कमी करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२११ **दिनांक : १६/०८/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं, नाशिक मंडळातील पद्मनाभनगर, धुळे येथे बांधण्यात आलेल्या २० मध्यम उत्पन्न गट व ५ दुकानांच्या योजनेतील दुकानांना जाहिराती देऊनहि प्रतिसाद नसल्यामुळे दुकानांच्या विक्री किंमतीमध्ये म्हाडाच्या नियमाप्रमाणे १०० टक्के नफयाऐवजी ५० टक्के नफा लावून एकरकमी पध्दतीने निविदा मागवून दुकानांची विक्री करण्यास मंजूरी देण्यात येते.

<u>बाब क्रमांक : २१९/१०</u>

विषय :-सिव्हील लाईन्स, नागपूर येथील नागपूर मंडळाच्या गृहनिर्माण भवनाच्या आवारात प्रशासकीय इमारत बांधकामासाठी नेमलेल्या कंत्राटदाराच्या निविदेबाबत - रक्कम रु. ४,३०,२८,३३०/-

---

ठराव क्रमांक : ६२१२ **दिनांक : १६/०८/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं, सिव्हील लाईन्स, नागपूर येथील नागपूर मंडळाच्या गृहनिर्माण भवनाच्या आवारात प्रशासकीय इमारत बांधकामासाठी नेमण्यांत आलेल्या मे.ईगल कन्स्ट्रक्शन कं. यांनी मागणी केलेली भाववाढ देण्याबाबतची विनंती अमान्य करुन अद्यापपर्यंत त्यांनी काम सुरु केलेले नसल्यामुळे मे.ईगल कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा रद्द करण्यांत यावी व या कामासाठी फेर निविदा मागविण्याकरिता मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१९/११</u>

विषय :- १५ सप्टेंबर, ' अभियंता दिन ' साजरा करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२१३ दिनांक : १६/०८/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, ' भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या ' यांच्या स्मरणार्थ दरवर्षी संपूर्ण देशात अभियंता दिन साजरा केला जातो, त्याचप्रमाणे म्हाडामध्ये सुध्दा दरवर्षी एक दिवसीय अभियांत्रिकी कार्यशाळा आयोजून हा प्रबोधनाचा कार्यक्रम म्हाडाच्या संशोधन व प्रशिक्षण लेखाशिर्षाअंतर्गत (२००६-२००७ या वर्षाकरिता मंजूर असलेल्या आर्थिक तरतूदीमधून रु.८७,०००/- [रु.सत्याऐंशी हजार फक्त]चा खर्च) करण्यास मान्यता देण्यांत येते.

अभियंता दिन १५ सप्टेंबर २००६ ला साजरा करावयाचा असल्याने सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २६.०९.२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या २१९ व्या संस्थगित बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : २१९/१३

विषय :- म्हाडाच्या अखत्यारितील मुंबई व इतर महानगर पालिकांच्या शहरांव्यतिरिक्त लहान गावातील विविध वसाहतीमधील खुल्या जागांचे हस्तांतरण (करमणूकीसाठीच्या खुल्या जागा, खेळाचे मैदान, बगीचे) स्थानिक नियोजन प्राधिकरणास विनामुल्य करण्यासंबंधिची बाब टिपण्णी.

ठराव क्रमांक : ६२१४ **दिनांक : २६/०९/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. संपूर्ण राज्यातील म्हाडाच्या अखत्यारितील विविध वसाहतीतील भू अभिन्यासातील खुल्या जागा (करमणूकीसाठीची खुली जागा, खेळाचे मैदान व बगीचे) व भू अभिन्यासातील विकास आराखडयातील खुल्या जागांचे (करमणूकीसाठीची खुली जागा, खेळाचे मैदान व बगीचे) वितरण करीत असताना अशा जागांच्या जमीन व विकास कामावरील खर्च भूअभिन्यासाच्या योजनेतून वसूल करण्यात येऊन अशा जागांचे हस्तांतरण राज्यातील मुंबई व इतर सर्व महानगर पालिका सोडून उर्वरित

सर्व लहान गावातील स्थानिक स्वराज्य संस्थांना विनामूल्य व नाममात्र वार्षिक भाडेपट्टयावर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्था अगर अन्य व्यक्ती अशा जागांचा वापर आर्थिक फायद्यासाठी करणार असल्यास म्हाडास त्यातील ५० टक्के हिस्सा देण्याच्या अटीवर अशा खुल्या जागांचे वितरण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१९/१४</u>

विषय :- प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविण्यासंदर्भात वित्त विभाग शासन निर्णय क्र.पी.एस.यु.-१००५/ सीआर -२६ / पी.एस.यु. दिनांक १३ मार्च २००६ नुसार धोरण ठरविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२१५ दिनांक : २६/०९/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग निर्णय क्र.पी.एस.यु.-१०.५०/सी.आर.-२६/पी.एस.यु., दिनांक १३ मार्च २००६ मधील मार्गदर्शक तत्वे स्विकारण्यास मान्यता दिली. म्हाडाचा अतिरक्त निधी गुंतविण्याकरिता म्हाडाने यापूर्वी वांद्रे पूर्व व पश्चिम विभागातील १७ राष्ट्रीयकृत बँकांना मंजूरी दिली असली तरी या १७ राष्ट्रीयकृत बँकांव्यतिरिक्त म्हाडाचा अतिरिक्त निधी उपलब्धतेनुसार याच भागातील आय.सी.आय.सी.आय.बँक ली. आणि एच.डी.एफ.सी.बँक लि. या दोन बँकांचा तूर्त समावेश, गुंतवणूक करावयाच्या बँकेच्या यादीत, करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. गुंतवणूकीबाबत प्राधिकरण ठराव क्र.६१९२ दिनांक

२६/०४/२००६ अन्वये विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे यापुढेही पालन करण्यात यावे.

<u>बाब क्रमांक : २१९/१९</u>

विषय :- महाराष्ट्र शासन स्थापित '' एम्पॉवर्ड कमिटी ''
(Empowered Committee) अंतर्गत उपकर प्राप्त
इमारतींच्या व म्हाडा वसाहतीच्या
पुनर्विकासासाठी '' Pilot Study ''
(पथदर्शी अभ्यास).

ठराव क्रमांक : ६२१६ दिनांक : २६/०९/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. एम्पॉवर्ड कमिटी अंतर्गत, मुंबई विकास प्रकल्पाचा एक भाग म्हणून मुंबईतील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटने कळविल्यानुसार कमला रहेजा विद्यानिधी इन्स्टीटयुट फॉर आर्कीटेक्ट या समंत्रक चमूकडून पायलट स्टडी (पथदर्शी अभ्यास) करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

२. उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाच्या पायलट स्टडीसाठी ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटने कळविलेल्या

रु. ७,८८,२१४/- या खर्चास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे व यापुढे एम्पॉवर्ड कमिटीत मुंबई विकास प्रकल्पाअंतर्गत इतर संमत प्रस्ताव करुन, करारनामा करणे व त्यावरील पुढील खर्चास मान्यता देण्याचे अधिकार, उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

३. म्हाडा वसाहतीच्या जसे कीं, सहकार नगर, चेंबूर पुनर्विकासासाठीच्या दूस-या पायलट स्टडीसाठी ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटने मा.चंद्रशेखर प्रभू यांच्याकडून पायलट स्टडी करुन घेण्याची सध्या आवश्यकता नाही.

४. पायलट स्टडीसाठी ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटने दिलेले Terms of Reference आणि Tripartite Agreement ला मान्यता देण्यात येत आहे व म्हाडाच्या वतीने सही करण्याचे अधिकार मंडळाचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

<u>बाब क्रमांक : २१९/२०</u>

विषय :- गुरुकृपा (रावले बिल्डींग) नावाने ओळखल्या जाणा-या प्लॉट नं.६३-अ, सायन स्कीम क्र.६, सायन (पूर्व), मुंबई : ४०० ०२२ हया इमारतीला म्हाड अधिनियम ८८ (३) (अ) नुसार घोषित करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२१७ दिनांक : २६/०९/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, गुरुकृपा (रावले बिल्डींग) नावाने ओळखल्या जाणा-या प्लॉट नं.६३-अ, सायन स्कीम क्र.६, सायन (पूर्व), मुंबई : ४०० ०२२ इमारतीला म्हाड अधिनियम ८८ (३) (अ) नुसार घोषित करण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २१९/२१

विषय :- इमारत क्र.१२, अक्क्लकोट पहीली छेद गल्ली (पेठे बिल्डींग), डी-१ विभाग या इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ८८ (३) (अ) अन्वये प्रमाणपत्र जारी करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२१८ दिनांक : २६/०९/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्र.१२, अक्क्लकोट पहीली छेद गल्ली (पेठे बिल्डींग), डी-१ विभाग या इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ८८ (३) (अ) अन्वये प्रमाणपत्र जारी करण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २१९/२२

विषय :- इमारत क्र.२१६-२१८, खाडीलकर रोड (सुशिला निवास), डी-१ विभाग या इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ८८ (३) (अ) अन्वये जारी केलेले प्रमाणपत्र रद्द करणे.

ठराव क्रमांक : ६२१९ दिनांक : २६/०९/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्र.२१६-२१८, खाडीलकर रोड (सुशिला निवास), डी-१ विभाग या इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ८८ (३) (अ) अन्वये जारी केलेले प्रमाणपत्र रद्द करणेबाबत मंजूरी देण्यात येत आहे.

<u>बाब क्रमांक : २१९/२३</u>

विषय :- तत्कालीन जागतिक बँक प्रकल्प अंतर्गतच्या प्राथमिक शाळा भूखंडाचे पोट भाडेपट्टयास परवानगी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२२० **दिनांक : २६/०९/२००६**

एकमताने निर्णय घेतला कीं, तत्कालीन जागतिक बँक प्रकल्प अंतर्गतच्या प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे मंजूर अभिन्यासाच्या अटी व शर्तीनुसार अधिमुल्याची आकारणी न करता महापालिकेस हस्तांतरण केले आहे. महापालिकेने सदर भूखंडाचे वितरण नॅशनल एज्युकेशन संस्थेस केले. मुंबई महानगर पालिकेने व नॅशनल एज्युकेशन संस्थेने सदर भूखंडाचे पोटभाडे पट्टयावरील वितरणास ना हरकत देण्याची विनंती केली आहे. त्यामुळे सदर भूखंडाचे पोट भाडेपट्टा करार करण्यासाठी व प्राधिकरणाच्या प्रचलीत धोरणानुसार अधिमुल्य आकारुन ते प्रथम वसूल करुन प्रचलीत अटी व शर्तींवर " ना हरकत प्रमाणपत्र " देण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच रिक्त असणा-या पाच भूखंडांबाबत शासनाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या धोरणानुसार अधिमुल्य आकारुन सदर भूखंडाचे वितरण करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : २१९/२४

विषय :- महर्षीनगर पुणे येथील वसाहतीमधील भूखंड क्र.१ व ४ च्या विक्रीबाबत.

ठराव क्रमांक : ६२२१ दिनांक : २६/०९/२००६

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. पुणे मंडळांतर्गत मौजे मुंजेरी (पानशेट) येथे महर्षीनगर वसाहतीतील विक्रीसाठी प्रस्तावित भूखंड क्रमांक ४ (क्षेत्रफळ ११२६.२५ चौ.मी.) व भूखंड क्रमांक १ (क्षेत्रफळ १७२५.०० चौ.मी.) पैकी भूखंड क्रमांक ४ बाबत स्थानिक लोकांचा विरोध व क्रीडांगणाचा वापर लखात घेता पूणे मंडळाने सदर भूखंड क्र.४ च्या ठिकाणी क्रीडांगण प्रस्तावित करुन सदर भूखंड योग्य त्या मोबदल्यापोटी किंवा टीडीआरची मागणी करुन पूणे महानगर पालिकेस हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव नगर विकास खात्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

२. भूखंड क्रमांक १ (क्षेत्रफळ १७२५.०० चौ.मी.) याची वर्तमान पत्रात उच्चतम दर (Upset Price) चे बंधन न ठेवता " जसा आहे तसा " या तत्वावर जाहिरात देवून भूखंड विक्रीसाठी निविदा मागविण्याच्या पूर्ण मंडळाच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तथापि, भूखंडाची Upset Price गोपनीय ठेवावी. प्राप्त होणा-या निविदांपैकी उच्चतम व सुयोग्य दराच्या निविदेची तुलना Upset Price शी करुन मुख्य अभियंता-

१ / प्रा. यांच्या संमतीने मुख्य अधिकारी / पुणे मंडळ यांनी स्वीकारण्याची व भूखंड विक्री करण्याची कार्यवाही करावी.

<u>बाब क्रमांक : २१९/२६</u>

विषय :- स.क्र.२६३ (भाग), न.भू.क्र.६ अ (भाग) मालवणी, मालाड (प) मुंबई येथील म्हाडाच्या ताब्यातील भूखंडावरील नियोजित संक्रमण शिबीराचे काम थांबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२२२ दिनांक : २६/०९/२००६

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, स.क्र.२६३ (भाग), न.भू.क्र.६ अ (भाग) मालवणी, मालाड (प) मुंबई येथील म्हाडाच्या ताब्यातील भूखंडावरील नियोजित संक्रमण शिबीराच्या योजनेऐवजी सदर भूखंडावर १८० चौ.फुटाच्या अल्प उत्पन्न गटाच्या गाळयांची योजना राबविण्यात यावी व काम चालू ठेवण्यात यावे. तसेच सदर भूखंडावरील संक्रमण शिबीराच्या गाळयांचे अल्प उत्पन्न गट योजनेत रुपांतर करण्यास शासनाची मान्यता घेण्याकरिता तसा प्रस्ताव शासनास सादर करुन शासनाची मंजूरी घेण्यास मान्यता देण्यात येते. योजनेतील गाळे विकावयाचे असल्यामुळे इतर योजनांमध्ये वापरण्यात आलेले सुधारित विनिर्देश (Improved Specification) वापरण्यात येतील व त्यापोटी रु. ५५/- प्रति चौ.फुट देय राहतील.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ११.०१.२००७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या २२० व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२०/२

विषय :- आयकर खात्यास प्रपत्र क्रमांक १० सोबत प्राधिकरणाने द्यावयाचा ठराव. (सर्क्युलेशन पध्दतीने मंजुरी घेण्यात आली आहे)

Resolution No.:६२२३ Dated : ११.०१.२००७

"Resolved that entire revenue surplus of MHADA for the Assessment year 2006-07 corresponding to Financial year 2005-2006, shall be utlised applies on the object of MHADA during the next five consecutive financial years beginning from 2006-2007 and particularly on schemes as mentioned in the budget for the financial year 2006-2007 as required U/S.11 of the Income Tax Act.1961"

बाब क्रमांक : २२०/३

विषय :- सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तरतूद नसलेल्या किंवा वाढीव खर्चाची अथवा जमेची पुरवणी अंदाजपत्रकीय तरतूद मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचे अवलोकनार्थ व प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी सादर करण्याबाबत (सर्क्युलेशन पध्दतीने मंजुरी घेण्यात आली आहे)

ठराव क्रमांक : ६२२४ दिनांक : ११.०१.२००७

एकमताने निर्णय घेतला की, प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकात असलेल्या तरतुदींत वाढ करावयाचे अधिकार प्राधिकरणाकडे असल्याने मुंबई मंडळ, पुणे मंडळ व नाशिक मंडळ यांनी प्रस्तावित केलेल्या व बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या

विवरण पत्रात दर्शविलेल्या एकूण रु. १२१४५.७८ लाख खर्चाच्या वाढीव तरतुदीस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी, ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२०/ ६

विषय :- श्री. व्ही. बी. तिवारी, शाखा अभियंता (निलंबित) यांना मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सुनावणी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२२५ **दिनांक : ११.०१.२००७**

एकमताने निर्णय घेतला की, श्री. व्ही. बी. तिवारी, शाखा अभियंता (निलंबित) यांना मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सुनावणी देण्याचे अधिकारी मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रदान करण्यात येत आहेत.

बाब क्रमांक : २२०/९

विषय :- भूखंड क्र.३०२ आर-२७ एन-९ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटातील भूखंड वर्ल्ड रिन्युअल स्पिरीच्यूल ट्रस्ट

मुंबई या समाजसेवी संस्थेच्या नावावर हस्तांतरीत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२२६ **दिनांक : ११/०१/२००७**

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, उक्त प्रकरणी भूखंडाचे हस्तांतरण ५ वर्षाच्या आत करण्यासाठी मंजूरी देण्याची बाब विनियमातील तरतुदीनुसार प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातील नाही. त्यामुळे पाच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच प्रस्तावातील वापर बदल करण्याच्या अनुषंगाने आकारलेली फी योग्य आहे किंवा नाही याची तपासणी त्यावेळी करुन आवश्यक असल्यास प्राधिकरणाच्या बैठकीपुढे योग्य समर्थनासह प्रस्ताव सादर करावा.

बाब क्रमांक : २२०/११

विषय :- सन २००६-२००७ वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये आयकर भरण्याकरीता पुरवणी तरतूद करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२२७ **दिनांक : ११.०१.२००७**

एकमताने निर्णय घेतला की, आयकर खात्यास तांतडीने आयकर भरणे भाग पडल्याने भरलेल्या रुपये ४,२२,६९,६७५/- (रुपये चार कोटी बावीस लाख एकोणसत्तर हजार सहाशे पंचाहत्तर फक्त) या रक्कमेस कार्योत्तर मंजूरी देण्यास, तसेच प्राधिकरणाच्या सन २००६-२००७ वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये आयकर भरण्याकरिता अतिरिक्त तरतूद रुपये ३८०५.०० लक्ष (रुपये अडतीशे पाच लक्ष

फक्त) अशी सन २००६-२००७ वर्षाकरीता रुपये ४२२७.०० लक्ष (रुपये बेचाळीसशे सत्तावीस लक्ष फक्त) एकूण तरतूद करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे

बाब क्रमांक : २२०/१४

विषय :- हिंगोली शहराचे मंजूर विकास आराखडयातील म्हाडासाठी आरक्षित असलेल्या जमिनीच्या संपादनाबाबत करावयाचे तडजोडीविषयी.

ठराव क्रमांक : ६२२८ दिनांक : ११.०१.२००७

हिंगोली शहराच्या मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्र. ८६ (स.क्र.१४३ (भाग) मधील ३.१६ हेक्टर व स.क्र. १४४/आ (भाग) मधील ०.६४ हेक्टर याप्रमाणे) मधील ३.८० हेक्टर म्हाडासाठी आरक्षित असलेल्या जमिनीपैकी (आरक्षणाखालील अंदाजे ८२४० चौ.मी. आणि आरक्षणाबाहेरील ३१६० चौ.मी. याप्रमाणे) एकूण १.१४ हेक्टर क्षेत्रफळ, (म्हाडासाठी आरक्षित असलेल्या ३.८० हेक्टरच्या ३० टक्के असेल) जमीन विनामुल्य निधी मर्कंटाईल कंपनीकडून घेण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

२. सदर १.१४ हे. क्षेत्रफळ असलेली जमीन बाब टिप्पणीसह जोडलेल्या परिशिष्ट जोडपत्र ५-अ च्या नकाशामध्ये दर्शविलेल्या पर्याय १ नुसार घेण्यात यावी. (सदर जमिनीच्या चतु:सीमेपैकी एक सीमा अकोला-हिंगोली-नांदेड रोडला लागून अंदाजे १२८ मी. लांबीच्या फ्रंटेजची असलेली व दुसरी बाजू १२ मी. प्रस्तावित रस्त्याला लागून असलेली)

३. कार्यवाहीचे मुद्दे :

३.१) म्हाड कायद्यातील कलम ५२ खाली शासनाने नियुक्त केलेल्या जिल्हा स्तरावरील अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून प्रस्तावित जमिनीची बाब संमत करुन घ्यावी. जेणेकरुन सदर जमिनीचा मालकी हक्क, नगर रचना विभागाने म्हाडाकरिता आरक्षित केलेले क्षेत्र, इत्यादी बाबी या समितीकडून तपासून घेण्यात याव्यात.

३.२) मुलतः ३.८० हे. म्हाडासाठी आरक्षण असलेली जमीन नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनने निधी कर्मंटाईल कंपनीला विकल्यामुळे आता त्यापैकी ३० टक्के जमीन निधी कर्मंटाईल कंपनीकडून म्हाडा/मंडळ विनामुल्य घेत असल्याची पूर्वसूचना नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनच्या
व्यवस्थापकीय संचालकास देण्यात यावी. (यापूर्वी मुख्य अधिका-यांनी त्यांना केलेल्या संदर्भासह)

३.३) उक्त जमिनीचा प्रत्यक्षात व्यवहार अमलात आणण्यापूर्वी मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी जमिनीच्या संदर्भात वर्तमान पत्रातून (इंग्रजी व मराठी) जाहीर निवेदन प्रसिध्द करावे.

३.४) सदर जमीन बोजाविरहित तसेच वादरहित ताब्यात देण्याची जबाबदारी निधी मर्कंटाईल कंपनीची राहील व त्यास अनुसरुन क्षतीपूर्तीबंध पत्र (आवश्यक तेवढया किंमतीच्या मुद्रांक शुल्क पत्रावर) घेण्यात यावे.

३.५) एकूण ३.८ हे. आरक्षणापैकी वर नमूद केल्याप्रमाणे ३० टक्के क्षेत्र (आरक्षणाखालील व आरक्षणाबाहेरील मिळून) म्हणजे अंदाजे १.१४ हे. जमिनीचे क्षेत्र मंडळ घेणार असल्याने आरक्षणाखालील जमिनीच्या (३८००० चौ.मी. ८२४० चौ.मी. = २९७६० चौ.मी.) उर्वरित २९७६० चौ.मी. आरक्षण रद्द करण्यास म्हाडा संमती देत आहे. याप्रमाणे १.१४ हे. क्षेत्र म्हाडासाठी आरक्षण दर्शविण्याची कार्यवाही करावी. तद्नुसार नगरविकास विभागाला कळविण्यात यावे.

३.७) निधी कर्मंटाईल कंपनीकडून सदर जमीन म्हाडाकडे हस्तांतरित करुन घेताना योग्य ते करारपत्र, क्षतीपूर्तीबंध पत्र व ७/१२ च्या उता-यावर म्हाडाचे नाव नोंदविणे इत्यादी कार्यवाही पूर्ण करुन घेण्यात यावी.

बाब क्रमांक : २२०/१५

विषय :- टिळक नगर, चेंबूर या वसाहतीस पाणीपुरवठा करणा-या

व्यवस्थेचे उन्नतीकरण - सहकारी सिनेमा ते कुर्ला टर्मिनस पर्यंत काँक्रीट रोड करण्यासाठी महापालिकेने काम हाती घेतले आहे त्यात पाणीपुरवठा योजना उन्नतीकरणाचे काम महापालिकेमार्फत करुन घेण्यासाठी रु.४८,१४,९७८/- महापालिकेस भरणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२२९ दि. ११.०१.२००७

एकमताने निर्णय घेतला की, महानगरपालिकेकडून रस्ते खोदाई व पुनर्स्थापना यांच्या दरात अवाजवी वाढ झालेली असल्यामुळे व भुमिगत टाकीचे परिमाण कमी झाल्यामुळे मे.आर. के. मधानी यांनी पुढील काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. त्यानुसार त्या निविदेतील करारनाम्याच्या कलम १५ मधील अटी व शर्तीनुसार मे. आर. के. मधानी एण्ड कंपनी यांना निविदेतून मुक्त करुन उर्वरित काम नव्याने निविदा मागवून पूर्ण करावे. मात्र नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया ३ फेब्रुवारी, २००७ नंतर करण्यात यावी.

तसेच टिळक नगर, चेंबूर या वसाहतीस पाणीपुरवठा करणा-या व्यवस्थेचे उन्नतीकरणांतर्गत सहकार सिनेमा ते कुर्ला टर्मिनस पर्यंतच्या १३९० मी. लांबीचे जलवाहिनी टाकण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यासाठी महानगरपालिकेने कळविल्यानुसार रु. ४८,१४,९७८/- इतकी रक्कम महानगरपालिकेस भरण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता महानगरपालिका सुपरव्हिजन व इतर प्रशासकीय आकार भविष्यात मागणार नाही यास अधिन राहून देण्यात येत आहे. महानगरपालिकेने सदर काम विहित पध्दतीचा अवलंब करुन पूर्ण करावे तसेच काम पूर्ण झाल्यावर रक्कम रु. ४८,१४,९७८/- लक्षचे उपयोगीता प्रमाणपत्र म्हाडास सादर करावे.

बाब क्रमांक : २२०/१६

विषय :- उस्मानाबाद येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घ्यावयाच्या जमिनीच्या प्रस्तावास (७५६४ चौ.मी.) कार्योत्तर मंजूरी.

ठराव क्रमांक : ६२३० **दिनांक : ११.०१.२००६**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, उस्मानाबाद येथे एम.आय.डी.सी.कडून रु.१०/- प्रती चौ.मी. या दराने ७५६४ चौ.मी. जमीन घेण्याच्या संदर्भात व त्यास अनुसरुन त्याचे मुल्य रु. ७५,६४०/- अदा केलेल्या रक्कमेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

२. एम.आय.डी.सी.कडून घेण्यात येणा-या जमिनीवर म्हाडाची योजना राबविण्यात येणार असल्याने बाब टिप्पणीसह जोडलेल्या अनेक्चर "A" नुसार कार्यवाही करण्यात यावी.

बाब क्रमांक : २२०/१७

विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००५-०६ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२३१ **दिनांक : ११.०१.२००७**

एकमताने निर्णय घेतला की, प्रशासनाने सादर केलेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००५-२००६ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा स्वीकृत करण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२०/२०

विषय :- अंदाजपत्रकीय योजनेच्या मुळ तरतुदीमध्ये सुधारित वाढ व नवीन कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२३२ दिनांक ११/०१/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाचा ठराव क्र. ६१४९, दिनांक ३१/०१/२००६ प्रमाणे घेण्यांत आलेला निर्णय कायम करण्यांत यावा. त्यात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यांत येवू नये. यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२०/२१

विषय :- मुंबई मंडळातील डी.एन.नगर, अंधेरी (प.) या वसाहतीतील पाणीपुरवठा व्यवस्थेची उन्नतीकरणाचे काम (Upgradation) करणे - निम्नतम निविदा स्वीकरण्याबाबत..

ठराव क्रमांक : ६२३३ दिनांक : ११.०१.२००७

एकमताने निर्णय घेतला की, मे. रश्मीन कंस्ट्रक्शन कं. यांची निविदेच्या अंदाजपत्रकीय रकमेवर ३५.१० % अधिकची निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मात्र मुंबई महानगरपालिकेची निवडणूक घोषित झालेली असल्यामुळे या ठरावाची अंमलबजावणी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेवून करण्यांत यावी व त्यानंतर ठेकेदारास कार्यादेश देण्यात यावेत.

बाब क्रमांक : २२०/२३

विषय :- मा. सभापती/प्रादेशिक मंडळ यांचे वापरात असलेली जुनी वाहने निर्लेखित करुन नवी वाहने खरेदी करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२३४ **दिनांक : ११.०१.२००७**

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे निर्लेखनास पात्र असलेल्या प्रादेशिक मंडळाकडील वाहनांच्या तपशिलास अनुसरुन प्रादेशिक मंडळांचे वापरात असेलेली जुनी वाहने प्रथम निर्लेखित करुन विहित कार्यपध्दती अनुसरुन नवीन ॲम्बेसिडर गाडया /वाहने खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. नवीन वाहने प्रथम खरेदी करुन त्यास शासनाची कार्योत्तर मंजूरी घेण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक : २२०/२४

विषय :- आरामनगर, मौजे वर्सोवा या वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत - प्राधिकरणाचे दि. २३.५.०६ रोजी झालेल्या २१६ व्या बैठकीत सादर केलेली बाब टिप्पणी

ठराव क्रमांक : ६२३५ **दिनाक : ११.०१.२००७**

एकमताने निर्णय घेतला की, आराम नगर, वर्सोवा येथील विभाग-१ तसेच विभाग २ चा एकत्रित पुनर्बांधणीचा प्रस्ताव बाब टिप्पणीत सुचविल्यानुसार खालील प्रस्तावानुसार मान्यता देण्यात येते :---

१. शासनास दिनांक ९/११/२००४ रोजी सादर केलेल्या अहवालातील मुद्दा क्र. ९ ते १२ मधील मुल्यांकनाची सर्व गृहीतके सारखीच ठेवून फक्त उर्वरित चटई क्षेत्र दरासाठी सन् २००४ च्या रेडीरेकनरच्या दराच्या ३० टक्के ऐवजी सन् २००४ च्या दराच्या ५० टक्के वाढ करण्याचे मान्य केले. तसेच योजनेमधील ३५७ पुनर्विकसित गाळयांसाठी सुमारे १०० चौ.मी. प्रती गाळा असे क्षेत्रफळ गृहीत धरण्याचे मान्यता देण्यात यावी व त्यानुसार उर्वरित चटईक्षेत्र काढण्यात यावे , यास मान्यता देण्यात आली.

२. तरी पुनर्विकास प्रकल्पाचे मुल्यांकन खालील गृहीतकांवर आधारित आहे व त्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

- प्रकल्पाचे मुल्यांकन :--- विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील कलम ३३(५) मधील तरतुदीनुसार १.२ चटई क्षेत्र गृहीत धरुन केले आहे. तथापि मुंबई महानगर पालिकेच्या सीआरझेड कडून ही परवानगी विकासकाने प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी विकसकावर राहील. तसेच पुनर्बांधणी प्रकल्पात अभिप्रेत असलेली कलम ३३ (५) मध्ये अंतर्गत असलेली गृहनिर्माणाची विभागणी जसे कीं, ६० टक्के एल.आय.जी. व ४० टक्के एम.आय.जी. / एच.आय.जी. हे प्रमाण कायम ठेवल्याची खात्री टेनन्टस् असोसिएशनने व त्यांच्या विकासकाने करावी.

- मुळ गाळयाचे क्षेत्रफळ सरासरी ५१ चौ.मी. असे गृहीत धरुन गाळयाची घसारा किंमत रु. १०,३००/- प्रती गाळा ही दिनांक ९/०६/१९८८ च्या देकारपत्रानुसार असावी.

- सदर रक्कम सन् १९८७ ते २००६ पर्यंत १० टक्के सरळ व्याजदर प्रतिवर्ष अशी किंमत आकारण्यात यावी.

- पुनर्वसन गाळयाचे क्षेत्रफळ १०० चौ.मी. इतके धरल्याने मूळ गाळयापेक्षा ४९ चौ.मी. जे अधिकचे क्षेत्रफळ आहे ते रु. ९००/- प्रति चौ.मि. या दराप्रमाणे किंमत आकारुन सदर किंमत सन् १९८७ ते २००४ या १७ वर्षाच्या कालावधीसाठी १० टक्के सरळव्याज दराने किंमत आकारण्यात यावी.

- आरामनगर वसाहतीतील म्युनिसिपल चौकीचे वितरण आरामनगर टेनन्टस् वेल्फेअर असोसिएशनला करण्यास म्हाड (जमिनीची विल्हेवाट) विनियम - ८ (ड) १९८२ तील तरतुदीनुसार मान्यता देण्यात यावी व दर सन् २००४ च्या रेडीरेकनरच्या १०० टक्के दर आकारण्यात यावा. आरामनगर असोसिएशनने याबाबत महानगर पालिकेकडून रितसर परवानगी घ्यावी. तसेच प्राधिकरणाचा ठराव क्र. ५९८१, दिनांक १०/११/२००३ नुसार मुंबई महानगर पालिकेला जे १० टक्के बांधकाम क्षेत्र विनामुल्य देण्यात येईल तेवढया क्षेत्रफळास रु. ८००/- प्रति चौ.फुट अशा दराने सुट देण्यात यावी.

- आरामनगर वसाहतीतील कार्यालयीन इमारत प्राधिकरणाच्या ठराव क्र. ४०७६, दिनांक २/०६/१९९३ नुसार आरामनगर, वर्सोवा टेनन्टस् वेल्फेअर असोसिएशनला वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

- खुल्या जागा, खेळण्याचे मैदान आणि करमणुकीचे मैदान यांची किंमत ठरविताना प्राधिकरणाच्या ठराव क्र. ३०९४, दिनांक १६/११/१९९२ नुसार प्रत्यक्ष जमीन व विकास खर्च आकारुन ती १२.५ टक्के प्रति वर्ष दराने अद्ययावत करण्यात आली आहे. तसेच करमणूकीच्या मैदानाचे वितरण अथवा स्थलांतर करताना प्राधिकरणाचा ठराव क्र. ६०४१, दिनांक २९/०७/२००४ नुसार रेडीरेकनर सन् २००४ च्या ५ टक्के दराने आकारण्यात येत आहे.

- प्रकल्पाची आर्थिक वर्धनक्षमता लक्षात घेता, सुधारित आकडेवारीनुसार उर्वरित चटई क्षेत्राचे दर सन् २००४ च्या रडीरेकनरच्या ३० टक्के ऐवजी आता ५० टक्के दराने प्रस्तावित केले आहेत. तसेच फुटकळ व ना फुटकळ ना स्वतंत्रपणे बांधकाम योग्य भूखंडासाठी वेगळी आकारणी केली जाणार नाही. तसेच परिशिष्ट " ई " मधील नमूद केलेल्या आकारणीनुसार इतर कोणत्याही प्रकारच्या भूखंडाना अधिमुल्याची आकारणी करण्यात येणार नाही. सुधारित मुल्यांकनानुसार प्राप्त होणारा निधी एकूण रु. ९०.९३ कोटी इतका आहे. सदरची रक्कम ही अंदाजित असून ही आकडेमोड शीघ्रगणकातील दर, क्षेत्रफळांची आकडेमोड, चटईक्षेत्र, मालमत्ता पत्रकानुसार येणारी आकडेमोड, जागेची हद्द निश्चित करणे, मुंबई महानगर पालिकेची मंजूरी. इतर संस्थांची मंजूरी, जमिनीची प्रत्यक्ष किंमत व व्याज दरांचे बदल इत्यादि विविध बाबींवर अवलंबून राहील.

- विकास आराखडयातील तरतुदीनुसार डी.पी.रस्त्याची बांधणी असोसिएशन मार्फत करण्यात येत असल्याने रस्त्याच्या बांधकाम खर्चात रु. १३४५/- प्रति चौ.मी. या दराने सुट देण्यात येत आहे कारण सदर रस्ता मुंबई महानगर पालिकेला असोसिएशन मार्फत विनामुल्य हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

३. उर्वरित चटईक्षेत्राची व जमीन वितरणाची किंमत प्रचलीत पध्दतीने आकारण्यात यावी. प्रथम दोन वर्षासाठी व्याज आकारण्यात येऊ नये मात्र त्या पुढील २ वर्षाच्या कालावधीसाठी रक्कम भरण्यास विलंब झाल्यास १० टक्के व्याजदराने आकारणी करावी तर त्यापुढील कालावधीसाठी रक्कम भरण्यास विलंब झाल्यास १३.५ टक्के या दराने अथवा प्राधिकरणाने वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या दराने व्याज आकारणी करण्यात यावी. अधिमुल्याचा भरणा केल्यानंतरच भरणा केलेल्या रकमेच्या प्रमाणात ना हरकत प्रमाणपत्र दिले जावे.

४. प्राधिकरणाच्या नेहमीच्या धोरणानुसार वार्षिक भुईभाडे २.५ टक्के आकारण्यात येत असते. मात्र हा प्रकल्प पुनवर्सन प्रकल्प असल्यामुळे सरसकट एकूण अधिमुल्याच्या १ टक्का दराने वार्षिक भुईभाडे आकारण्यात यावे.

५. आरामनगर वसाहतीतील पुनर्वसनासाठी उर्वरित चटईक्षेत्रासाठी सदर टेनन्टस् वेल्फेअर असोसिएशनने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत वर्ष २००४ च्या रेडीरेकनरच्या ५० टक्के नुसार दर आकारण्यात यावा व सदर दर नगर रचना मुल्यांकन विभाग यांचेकडून खात्री करुन घेण्यात यावा. सदर दर रहिवासी वापराकरिता असून वाणिज्य वापर केल्यास रहिवासी दराच्या दुप्पट दराने म्हणजेच सन् २००४ च्या रेडीरेकनरच्या १०० टक्के दराने आकारणी करण्यात यावा.

६. आरामनगर वसाहतीमध्ये कलम १६ अंतर्गत शासनाने ४ भूखंड वितरीत केले आहेत, ते खालीलप्रमाणे आहेत :---

अ. नानु रिक्रीएशन या संस्थेस सुमारे ६००० चौ.मी.चे करमणूकीच्या मैदानाचा भूखंड वितरीत केला आहे.

ब. सिध्देश्वर सहकारी संस्थेस १५०० चौ.मी.क्षेत्रफळाचा भूखंड वितरीत केला आहे.

क. चिंतामणी सहकारी संस्थेस ९०० चौ.मी. व २५० चौ.मी.चे भूखंड वितरीत केले आहेत.

ड. सिध्दांत सहकारी संस्थेस १३९४.७५ चौ.मी.क्षेत्रफळाचा समाजमंदिराचा सुविधा भूखंड वितरीत केला आहे.

तरी, आरामनगर पुनर्विकासाच्या भौतिक व आर्थिक वर्धनक्षमतेवर विपरीत परिणाम होत असल्यामुळे, उपरोक्त ''अ'' ''ब'' व ''क'' मधील तिन्ही भूखंडाचे कलम १६ अंतर्गत वितरण रद्द करण्याबाबत शासनास कळविण्याचे मान्य करण्यात आले. मात्र ''ड'' मध्ये नमूद केलेल्या सिध्दांत सहकारी संस्थेस वितरण केलेल्या भूखंडाबाबत शासन स्तरावर वितरण कायम ठेवण्याचा निर्णय झालेला असल्यामुळे, हा भूखंड पुनर्विकास योजनेतून वगळण्यास मान्यता देण्यात आली.

७. एस.आर.ए. :---- आरामनगर विभाग १ च्या एका कोप-यात एसआरए योजना मंजूर झाली असल्यामुळे ती पुनर्विकासाच्या प्रकल्पातून वगळण्यात यावी.

८. वि.नि.नि. १९९१ मधील कलम ३३ (५) मधील तरतुदीनुसार १.२ चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होऊ शकेल असे मुल्यांकन करताना गृहीत धरले आहे. तथापि, सागरी किनारा नियंत्रण (C.R.Z.) कायद्याने बाधित असल्यामुळे सी.आर.झेड. तसेच मुंबई महानगर पालिकेची (MCGM) ची परवानगी संस्थेने / संस्थेच्या विकासकाने प्राप्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी पूर्णपणे होईपर्यंत आरामनगर, वर्सोवा टेनन्टस वेल्फेअर असोसिएशन बरोबर भाडेपट्टा करार (Agreement for lease) करण्यात यावे. पुनर्बांधणी नंतर लिज डीड करावे व टेनन्ट असोसिएशनने भाडेकरुंना व विक्रीचे गाळे मालकी तत्वावर वितरीत करावे.

१०. त्रिस्तरीय कराराच्या मसुद्यास मान्यता देण्यात यावी. मा.उच्च न्यायालयात त्रिस्तरीय करार दाखल करण्यात यावा व शासनाच्या मंजूरीनंतर मा.उच्च न्यायालयास सदरची योजना सर्व बाबींसह प्रतिज्ञापत्रावर निदर्शनास आणून त्या अनुषंगाने कन्सेन्ट टर्मस् (Consent terms) अंतिम करण्यात याव्यात.

११. आर.जी.प्लॉट फेडरेशन टेन्ट्स असोसिएशन ला वितरीत करावा व म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार अधिमुल्य आकारावे आणि अनधिकृत बांधकामाबाबतची कारवाई म्हाडाने करावी, यास मान्यता देण्यात येत आहे.

१२ : शासनाने दिनांक २१/०४/१९९० व २६/०७/१९९१ च्या पत्रान्वये पुढील आदेश होईपर्यंत आरामनगर वर्सोवा येथील वसाहत ही शासन निर्णय १९८७ च्या विक्री योजनेतून वगळण्याबाबत कळविले होते. या कारणास्तव शासन निर्णय १९८७ आता आरामनगर वसाहतीस लागू होत नाही. तरी सदर वसाहतीच्या पुनर्बांधणी प्रस्तावास ना-हरकत प्रमाणपत्र देताना खालील बाबी अंतर्भूत करण्यात याव्यात :--

अ. आरामनगर येथील विभाग १ व २ च्या एकत्रित पुनर्विकासासाठी उर्वरित चटईक्षेत्रास रेडीरेकनरच्या दराच्या ३० टक्के ऐवजी ५० टक्के दर आकारावा. हा रेडीरेकनरचा दर सन २००४ नुसार निश्चित करण्यात यावा. कारण विभाग दोनच्या प्रस्तावास शासनाने अगोदरच पत्र क्र.वाटप-११९९/प्र.क्र.३०४/गनिभू, दिनांक १३/१२/२००५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

ब. तसेच पुनर्वसनाचे व विक्रीचे गाळे यांचे प्रत्येक टप्प्यातील प्रमाण निश्चित करुन द्यावे जेणेकरुन विकासक विक्रीचे गाळे प्राधान्याने बांधून पुनर्वसन गाळे बांधण्यात दिरंगाई करणार नाही, यावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

तसेच आरामनगर, वर्सोवा येथील वसाहतीच्या विभाग-१ तसेच विभाग-२ चा एकत्रितपणे पुनर्बांधणी करण्याचा प्रस्ताव शिफारशींसह शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात यावा. त्यानंतर हा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय यांच्या मंजरीसाठी विधी सल्लागार / प्रा. यांनी सादर करावा.

बाब क्रमांक : २२०/२५

विषय :- शासनाचे जाहिरातीचे धोरण स्विकृत करणे, शासनाने केलेल्या विविधांगी प्रगतीची माहिती होण्यासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या खर्चास मान्यता देणे व खर्चाची रक्कम शासनास अदा करणे तसेच विशेष जाहिराती देण्याचे अधिकार, मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२३६ दिनांक : ११.०१.२००७

एकमताने निर्णय घेतला की,

१) मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेने प्रसिध्दीसाठी देण्यात आलेली INDIAN TERRITORY INDEPENDENT या वर्तमानपत्रातील विशेष जाहिरातीवरील झालेल्या रु. १,६०,०००/- (रुपये एक लाख साठ हजार) या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. तसेच त्यांच्या मान्यतेने दैनिक एकमतच्या दिवाळी अंकासाठी

रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार) व महाराष्ट्र शासनास दोन वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दिनांक १ नोव्हेंबर २००६ रोजी म्हाडाची विशेष जाहिरात Times of India, Mid Day, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत व एकमत या वर्तमानपत्रांना शासनाच्या महासंचालनालय कार्यालयातर्फे प्रसिध्द केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत असून या जाहिरातीची देयके प्राप्त झाल्यानंतर अदा करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

२) महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. निर्णय क्र. पीयुव्ही-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दिनांक : १ मे २००१ मधील जाहिराती प्रसिध्द करण्याबाबतच्या सूचना प्राधिकरणास स्विकृत करण्यास एकमताने मान्यता देण्यात येत आहे तसेच वरील शासन निर्णयातील सुचनांचे पालन करुन शासकीय दराने शासनमान्य वर्तमानपत्रांना जाहिराती देण्याचे अधिकार जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

३) जी वर्तमानपत्रे म्हाडाच्या जाहिरातीना वाणिज्य दर आकारतात त्या वर्तमानपत्रांना जाहिरात द्यावयाची असल्यास संबंधित विभागाने उपाध्यक्ष/प्राधिकरण यांची मान्यता घेवून त्यानंतरच जाहिरात प्रसिध्दीसाठी जनसंपर्क विभागाकडे पाठवाव्यात व अशा प्रकारे प्राप्त झालेल्या निविदा सूचना वाणिज्य दर आकारणा-या वर्तमानपत्रांना आवश्यकतेनुसार प्रसिध्दीसाठी देण्याचे अधिकार जनसंपर्क अधिकारी/प्राधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

४) प्रसंगानुरुप वाणिज्य दराने विशेष जाहिरात देण्याचे आधिकार मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

५) काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये दर्शनी जाहिराती (Display) तसेच काही महत्वाच्या जाहिरातींसाठी एजन्सीची मदत घ्यावी लागल्यास मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेने एजन्सीची नियुक्ती करावी व नियुक्त केलेल्या एजन्सीतर्फे जाहिरात वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दीसाठी पाठविण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

वरील क्र. २ ते ५ मधील प्रस्तावाप्रमाणे देण्यांत येणा-या जाहिरातीच्या रु. ५.०० लाख पर्यंतच्या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना राहतील.

६) शासनाने केलेल्या विविधांगी प्रगतीची माहिती होण्यासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या येणा-या अंदाजित खर्चास रु.३०,९२,९१७/- (रुपये तीस लाख ब्याण्णव हजार नऊशे सतरा फक्त) त्याचप्रमाणे ओव्हरचुर एजन्सीने सादर केलेल्या रु. ३,२०,४२९.०३ (रुपये तीन लाख वीस हजार चारशे एकोणतीस व पैसे तीन फक्त) एकूण रुपये ३४,१३,३४६.०३ (रुपये चौतीस लाख तेरा हजार तीनशे शेचाळीस आणि पैसे तीन फक्त) इतक्या अंदाजीत खर्चास प्राधिकरण मान्यता देत आहे. " तसेच या जाहिराती शासनाच्या निर्देशाप्रमाणे प्राधिकरणाने दिलेल्या असल्याने या जाहिरातीसाठी झालेल्या खर्चाची देयके म्हाडाच्या निधी मधून संबंधित एजन्सिना अदा करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

৬২৭

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ३.०३.२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या २२१ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२१/२

विषय :- मुंबई बेट शहरामधील मुंबई म.न.पा.च्या बी.आय.टी. या बिगर उपकर प्राप्त इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२३७ **दिनांक : ३/०३/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई बेट शहरामधील मुंबई महानगर पालिकेच्या बी.आय.टी. या बिगर उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीचे काम मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कार्यालयामार्फत करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र महापालिकेने त्यांच्या दिनांक ९/११/२००६ च्या पत्रान्वये घातलेल्या अटी शिथील करण्यासंबंधी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने मुंबई महानगर पालिकेस प्रस्ताव पाठवून पुढील कार्यवाही करावी.

बाब क्रमांक : २२१/४

विषय :- दवलामेटी, नागपूर येथे अत्यल्प उत्पन्न गटांतर्गत १०० गाळे व अल्प उत्पन्न गटांतर्गत १०० गाळे [राष्ट्रीय गृहनिर्माण योजना] बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२३८ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, दवलामेटी, नागपूर येथे अत्यल्प उत्पन्न गटांतर्गत १०० गाळे व अल्प उत्पन्न गटांतर्गत १०० गाळे (राष्ट्रीय गृहनिर्माण योजना) बांधकामाच्या प्राप्त झालेल्या मे.सतिश कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा किंमतीपेक्षा ६० टक्के जास्त दराच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी, ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२१/५

विषय :- इमारत क्रमांक ४४३ सी.डी.मौलाना शौकत अली रोड, ब्राम्हणवाडी, ८८ [३] [अ] अन्वये घोषित करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२३९ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, इमारत क्रमांक ४४३ सी.डी.मौलाना शौकत अली रोड, ब्राम्हणवाडी, ८८ [३] [अ] अन्वये घोषित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२१/६

विषय :- इमारत क्र.५८ कामाठीपुरा, ५ वी गल्ली क्र.७४४ भायखळा विभाग या इमारतीस महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियम १९७६ अंतर्गत ८८ [३] [ब] चे नुसार द्यावयाच्या प्रमाणपत्रास मंजूरी देणे.

सदर बाब टिपण्णीवर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६२४० दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्र.५८ कामाठीपुरा, ५ वी गल्ली क्र.७४४ भायखळा विभाग या इमारतीस महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अधिनियम १९७६ अंतर्गत ८८ [३] [ब] चे नुसार द्यावयाच्या प्रमाणपत्रास मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २२१/७

विषय :- इमारत क्रमांक ६४-६६-६८ अब्दुल कादर चाळ, सन मिल लेन, लोअर परळ या इमारतीच्या ८८ [३] '' अ '' प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२४१ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्रमांक ६४-६६-६८ अब्दुल कादर चाळ, सन मिल लेन, लोअर परळ या इमारतीच्या ८८ [३] '' अ '' प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२१/९

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तात्पुरते संक्रमण शिबीराकरिता मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीत वितरीत केलेल्या भूखंड / जमिनीच्या भुईभाडे आकारणीबाबत व कालावधीबाबत न्यायालयीन निर्देश विचारात घेऊन घ्यावयाचा निर्णय.

ठराव क्रमांक : ६२४२ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तात्पुरते संक्रमण शिबीराकरिता मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीत वितरीत केलेल्या भूखंड / जमिनीच्या भुईभाडे आकारणीबाबत दर हा २४ महिन्यांपर्यंत रेडीरेकनरच्या एक टक्का प्रति चौ.फुट आणि २४ महिन्यांनंतर रेडीरेकनरच्या दोन टक्के प्रति चौ.फुट यास मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : २२१/१२

विषय :- अनुसूचित जाती कल्याण समितीने म्हाड मिळकत व्यवस्थापन [डिस्पोझल ऑफ लॅन्ड] नियम १९८१ मधील नियम १३ मधील अनुसूचित जातीकरिता [एससी] असलेले ११ टक्के आरक्षण १३ टक्के करण्याबाबत नियमात सुधारणा करणे.

ठराव क्रमांक : ६२४३ **दिनांक : ३/०३/२०७**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडा लॅन्ड डिस्पोझल रुल १९८१ मधील नियम १३ (१) (१) मधील अनुसूचित जातीच्या प्रवर्गासाठी सध्या असलेले आरक्षण ११ टक्क्याऐवजी १३ टक्के शासनाने करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. मात्र, नियम १३ नुसार व शासन स्वेच्छाधिकार २ टक्के मिळून एकूण आरक्षणे ही ५० टक्के पेक्षा जास्त होत असल्याने, अन्य प्रवर्गाची आरक्षणे (क्र.२ ते ११) कमी करावी किंवा कसे यावरही शासनाने निर्णय घ्यावा.

बाब क्रमांक : २२१/१३

विषय :- लेबर कॅालनी नांदेड येथील ५५८ गाळे, औद्योगिक कामगार योजना [एस.आय. एच.एस.] या योजनेतील भूखंड कर्मचा-यांच्या नांवे मालकी हक्काने करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२४४ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं, लेबर कॅालनी नांदेड येथील ५५८ गाळे, औद्योगिक कामगार योजना [एस.आय. एच.एस.] या योजनेतील चौथरे वजा भूखंड कर्मचा-यांच्या नांवे तसेच अनधिकृतपणे ताबा घेतलेले चौथरे वजा भूखंड सध्याच्या कब्जेदार व्यक्तीच्या नांवे शासनाच्या १९७९ च्या निर्णयानुसार व १९८१ च्या निर्णयाप्रमाणे किंमत (अधिकृत व्यक्तीसाठी रु. १०५११/- (व्याज / भांडवली करुन अद्ययावत करुन येणा-या किंमतीसह आणि अनधिकृत व्यक्तीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार दंडनिय आकरणी करुन) आकारुन मालकी हक्काने करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२१/१५

विषय :- गृहनिर्माण भवन, वांद्रे [पूर्व] इमारतीतील तिस-या मजल्यावरील सभागृह व मानव संशोधन विकास केंद्राच्या भाडे आकारणीबाबत. [सुधारित दर]

ठराव क्रमांक : ६२४५ दिनांक : ३/०३/२०७

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाच्या तिस-या मजल्यावरील सभागृहाचे भाडे (भारतरत्न कै.गुलझारीलाल नंदा सभागृह) पूर्ण वेळेसाठी दर रु. ३०००/- आणि अर्धा दिवसाकरिता रु. १५००/- तर पहिल्या मजल्यावरील सभागृह (मानव संशोधन विकास केंद्र) पूर्ण वेळेकरिता रु. १८००/- तर अर्धा दिवसासाठी रु. ९००/- पुढील तीन वर्षांकरिता (फक्त शासकीय व निमशासकीय संस्थांना देण्यासाठी) आकारण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच विशिष्ट परिस्थितीत यापेक्षा कमी दराने सभागृह द्यावयाचे झाल्यास मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना अधिकार राहतील.

बाब क्रमांक : २२१/१६

विषय :- पहूर, ता.जामनेर, जिल्हा जळगांव येथील ६५ गाळे अत्यल्प उत्पन्न गट व ३२ गाळे अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना --- रिक्त गाळे वाटपाचे दृष्टीने आय.डी.पी. कमी करणे व कर्ज परतफेडीचा कालावधी वाढविणे.

ठराव क्रमांक : ६२४६ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, पहूर ता.जामनेर, जिल्हा जळगांव येथील ६५ गाळे अत्यल्प उत्पन्न गट व ३२ गाळे अल्प उत्पन्न गटात रिक्त गाळयांकरिता अत्यल्प उत्पन्न गटाकरिता किंमत रु. ६९,७००/- प्राथमिक रक्कम १० टक्के म्हणजे रु. ७०००/- कर्ज रक्कम रु. ६२,७००/- याकरिता व्याजदर १० टक्के २० वर्षाकरिता येणारा मासिक हप्ता रु. ६५२/- तर अल्प उत्पन्न गटकरिता किंमत रु. १,२०,०००/- प्राथमिक रक्कम १० टक्के रु. १२,०००/- कर्ज रक्कम रु. १,०८,०००/- व व्याजदर १२.२५ टक्के २० वर्षांकरिता येणारा मासिक हप्ता रु. १३०६/- असा ठेवण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२१/१७

विषय :- पांचपाखाडी, ठाणे स.क्र.१५२ [भाग] १५३ [भाग] लोकमान्यनगर पांचपाखाडी ठाणे येथील पोलीस वसाहतीचे बांधकाम

ठराव क्रमांक : ६२४७ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, पांचपाखाडी ठाणे येथील पोलिस वसाहतीचे बांधकामाच्या योजनेसाठी सन् २०६-२००७ करिता रुपये ४५०.०० लाख इतक्या सुधारित अंदाजपत्रकीय तरतुदीस मंजूरी देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२१/१८

विषय :- कन्नमवार नगर विक्रोळी [पूर्व] येथील मलनिःस्सारण वाहिन्यांची कामे महानगर पालिकेकडून करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२४८ दिनांक : ३/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, कन्नमवार नगर विक्रोळी [पूर्व] येथील मलनिःस्सारण वाहिन्यांची कामे महानगर पालिकेकडून करण्याबाबत व त्याकरिता येणारा खर्च महानगर पालिकेस हस्तांतरीत करणेकरिता मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२१/१९

विषय :- श्री.पी.एम.वर्गीस, उप अभियंता/मुंबई मंडळ यांचेविरुध्द करण्यांत आलेली विभागीय चौकशी आदेशाविरुध्द अपिल

ठराव क्रमांक : ६२४९ दिनांक : ३/०३/२०७

एकमताने निर्णय घेतला कीं, श्री.पी.एम.वर्गीस, उप अभियंता, मुंबई मंडळ (बडतर्फ) यांच्या विरुध्द करण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या अंतीम आदेशाविरुध्द सादर केलेल्या अपीलावर सुनावणी देण्याचे अधिकार मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रदान करण्यात येत आहेत.

बाब क्रमांक : २२१/२०

विषय :- कांदिवली [पूर्व] येथील मुंबई मंडळाने आर्मी वेल्फेअर हौसिंग ऑर्गनायझेशनला वितरीत केलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे सदर इमारतीच्या शंकर सह.गृह. संस्थेस अभिहस्तांतरण करुन मिळणेबाबत

ठराव क्रमांक : ६२५० **दिनांक : ३/०३/२०७**

एकमताने निर्णय घेतला कीं, कांदिवली [पूर्व] येथील मुंबई मंडळाने आर्मी वेल्फेअर हौसिंग ऑर्गनायझेशनला वितरीत केलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे सदर इमारतीच्या शंकर सह. गृह. संस्थेस अभिहस्तांतरण करुन मिळणेकरिता भूखंड सबलिज करावयाचा झाल्यास भूखंडाच्या एकूण अधिमूल्याच्या २५ टक्के रक्कम अँकर फाउंडेशन व ससमीरा सहकारी गृहनिर्माण संस्थांना सब लिजसाठी आकारलेली आहे त्याप्रमाणे सदर संस्थेस भूखंडाच्या मूळ किंमतीच्या २५ टक्के रक्कम आकारावयाची झाल्यास रु. ९,१४,९७१/- एवढया किंमतीवर २५ टक्के रक्कम रु. २,४३,७४५/- एवढी आकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ७.०३.२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या २२२ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२२/२

विषय :- स.क्र.३७/१/१ खराडी, पुणे येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ४८ सदनिका व १६ दुकाने योजनेच्या बांधकामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६२५१ **दिनांक : ७/०३/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, स.क्र.३७/१/१ खराडी, पुणे येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ४८ सदनिका व १६ दुकाने योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या मेसर्स अमर कन्स्ट्रक्शन यांच्या १४.९५ टक्के जादा दराची निविदा मान्य करण्यांत येत असून सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायीकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : २२२/३

विषय :- स.क्र.३७/१/१ खराडी, पुणे येथील अल्प उत्पन्न गटांतर्गत ३६० सदनिकांच्या योजनेच्या बांधकामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६२५२ दिनांक : ७/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, स.क्र.३७/१/१ खराडी, पुणे येथील अल्प उत्पन्न गटांतर्गत ३६० सदनिकांच्या योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या मेसर्स विजय कन्स्ट्रक्शन यांच्या २४.४१ टक्के जादा दराची निविदा मान्य करण्यांत येते. तसेच सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थायी करणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२२/४

विषय :- हिंगोली शहराच्या मंजूर विकास आराखडयातील म्हाडासाठी आरक्षित असलेल्या जमिनीच्या संपादनाबात सुधरित प्रस्तावानुसार करावयाच्या तडजोडीविषयी.

ठराव क्रमांक : ६२५३ दिनांक : ७/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. प्राधिकरणाने दिनांक ११/०१/२००७ रोजी पारीत केलेला ठराव क्र. ६२२८ रद्द करुन मुख्य अधिकारी / औरंगाबाद यांनी नव्याने सादर केलेल्या प्रस्तावावर प्राधिकरण पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे :

२. हिंगोली शहराच्या मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्र. ८६ (स.क्र.१४३ (भाग) मधील ३.१६ हे. व स.क्र.१४४/आ (भाग) मधील ०.६४ हे.याप्रमाणे) मधील ३.८० हे. म्हाडासाठी आरक्षित असलेल्या जमिनीपैकी ३० टक्के म्हणजे १.१४ हे. (११,४०० चौ.मी.) क्षेत्रफळाची अतिक्रमण विरहीत, बोजाविरहीत व कोणताही वाद नसलेली आणि अकोला-हिंगोली-नांदेड या राज्य महामार्गाखालील क्षेत्र वगळून येणारी (१.१४ हे.) जमीन, निधी मर्कंटाईल कंपनीकडून विनामुल्य घेण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

३. टिपणीसह जोडलेल्या परिशिष्ट-२ मधील जोडपत्र १ सह असलेल्या नकाशामध्ये दर्शविलेले स्थान / जमीन (१.१४ हे.) घेण्यास सम्मती देण्यात येत आहे. (सदर जमिनीच्या चर्तुसीमेपैकी एक सीमा अकोला-हिंगोली नांदेड राज्य महामार्गाला लागून ६१.१८ मी.रुंदीचा फ्रंटेज दक्षीण बाजू

कडील १२ मि.रुंद (विकास आराखडयातील) रस्त्याला लागून ५१.६५ मी.रुंद फ्रंटेज असलेली आणि इतर दोन सीमा अनुक्रमे (सुमारे) २०४.६३ मी. व २२९.६८ मी.ने वेढलेले क्षेत्र)

४. कार्यवाहीचे मुद्दे :----

४.१ म्हाड कायद्यातील कलम ५२ खाली शासनाने नियुक्त केलेल्या जिल्हा स्तरावरील अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून प्रस्तावित जमिनीची बाब संमत करुन घ्यावी. जेणेकरुन सदर जमिनीचा मालकी हक्क, नगर रचना विभागाने म्हाडाकरिता आरक्षित केलेले क्षेत्र, इत्यादि बाबी या समितीकडून तपासून घेता येतील.

४.२ मुलतः ३.८० हे.म्हाडासाठी आरक्षण असलेली जमीन नॅशनल टेक्सटाईल कॅार्पोरेशनने निधी मर्कंटाईल कंपनीला विकल्यामुळे आता त्यापैकी ३० टक्के जमीन निधी मर्कंटाईल कंपनीकडून म्हाडा / मंडळ विनामुल्य घेत असल्याची पूर्वसूचना नॅशनल टेक्सटाईल कॅार्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालकास देण्यात यावी. (यापूर्वी मुख्य अधिका-यांनी त्यांना केलेल्या संदर्भासह)

४.३ उक्त जमिनीचा प्रत्यक्षात व्यवहार अंमलात आणण्यापूर्वी मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी जमिनीच्या संदर्भात वर्तमान पत्रातून (इंग्रजी व मराठी) जाहीर निवेदन प्रसिध्द करावे.

४.४ सदर जमीन बोजाविरहीत तसेच वादरहीत ताब्यात देण्याची जबादारी निधी मर्कंटाईल कंपनीची राहील व त्यास अनुसरुन क्षतीपूर्तीबंध पत्र (आवश्यक तेवढया किंमतीच्या मुद्रांक शुल्क पत्रावर) घेण्यात यावे.

४.५ वर विशद केल्याप्रमाणे १.१४ हे.क्षेत्र म्हाडासाठी आरक्षण दर्शविण्याची कार्यवाही करावी व उर्वरित क्षेत्राचा (३.८० हे. - १.१४ हे. = २.६६ हे.) आरक्षण रद्द करण्यास म्हाडा संमती देत आहे. तद्नुसार नगर विकास विभागाला कळविण्यात यावे वर नमूद केलेल्या सर्व मुद्दयांची पूर्तता केल्यानंतर उर्वरित आरक्षण (सुमारे ७० टक्के) रद्द करण्यासाठी नगर रचना विभागाने ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केल्यास मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी कार्यवाही करावी.

४.६ वरील ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता उपरोक्त प्रस्ताव शासनाच्या गृहनिर्माण विभाग आणि नगर विकास विभागाकडे पाठवून मंजूरी प्राप्त करुन घ्यावी.

४.७ निधी मर्कंटाईल कंपनीकडून सदर जमीन म्हाडाकडे हस्तांतरीत करुन घेताना योग्य ते करारपत्र, क्षतीपूर्तीबंध पत्र व ७/१२ च्या उतारा-यावर म्हाडाचे नाव नोंदविणे इत्यादि कार्यवाही पूर्ण करुन घेण्यात यावी.

यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २२२/६

विषय :- गृहनिर्माण भवनामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याकरिता प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या रु. ३०,०००/- अनुदानास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२५४ दिनांक : ७/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, गृहनिर्माण भवनामध्ये महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत सादर करण्यांत येणा-या आंतरराष्ट्रीय महिला दिनाकरिता प्राधिकरणाकडून मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्य मान्यतेने देण्यांत आलेल्या रु. ३०,०००/- अनुदानास विशेष बाब म्हणून कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ३०.०३.२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता

आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २

विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन् २००६-२००७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन् २००७-२००८ चे अर्थसंकल्पीय अंदाज.

ठराव क्रमांक : ६२५५ दिनांक : ३०/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २००६-२००७ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास वरील सुधारणांसह मान्यता देण्यांत आली.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : ३

विषय :- प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी आकृतिबंध सन् २००७ - २००८

ठराव क्रमांक : ६२५६ दिनांक : ३०/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरण व प्रादेशिक मंडळांच्या कार्यालयासाठी सन २००७-२००८ या वित्तीय वर्षासाठी कर्मचारी आकृतीबंध मंजूर करण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : ४

विषय :- वॅम्बेअंतर्गत अपूर्ण योजना पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मिळणा-या मदतीमध्ये म्हाडाचा आर्थिक सहभाग.

ठराव क्रमांक : ६२५७ दिनांक : ३०/०३/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, वॅम्बेअंतर्गत अपूर्ण योजना पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मिळणा-या मदतीमध्ये म्हाडाचा आर्थिक सहभाग असावा म्हणून २५ टक्के रक्कम म्हाडाने आपल्या फंडातून उपलब्ध करुन देण्यात यावी. उर्वरित ७५ टक्के रक्कम या कामासाठी शासनाने उपलब्ध करुन देण्यात यावी तसा प्रस्ताव मुख्य अभियंता-२/प्रा. यांनी शासनास पाठविण्यास मान्यता देण्यांत येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ४.०६.२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या २२३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२३/२

विषय :- चारकोप-४ कांदिवली येथील मलनिःस्सारण प्रकल्पांची विद्युत व यांत्रिक संयंत्राची प्रवर्तन (Operation) व परिरक्षा (Maintenance), संधारण (Refurbishing) पुनःस्थापन (Replacement) तसेच स्थापत्य विषयक कामे करण्याच्या निविदेस मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२५८ दिनांक : ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, चारकोप-४ कांदिवली येथील मलनिःस्सारण प्रकल्पांची विद्युत व यांत्रिक संयंत्राची प्रवर्तन (Operation) व परिरक्षा (Maintenance), संधारण (Refurbishing) पुनःस्थापना (Replacement) तसेच स्थापत्या विषयक कामे करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेपैकी निम्नतम निविदाधारकाने काम करण्यास असमर्थता दर्शवून माघार घेतल्यामुळे त्याची इसारा रक्कम (EMD) जप्त करुन सदर काम द्वितीय निम्नतम एजन्सी मे.नाईक इन्वायरमेंट यांना मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी वाटाघाटीने कमी केलेल्या सुधारित देकार रक्कम रु. १,१५,००,०००/- (रु. एक कोटी पंधरा लाख) स्विकृत करण्यास मुळ निविदेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मान्यता देत आहे.

सदर मलनिःस्सारण संयंत्र वेळेत कार्यान्वित न झाल्यास सदर परिसरामध्ये अनारोग्य वातावरण निर्माण होवून लोकक्षोभ होण्याची शक्यता विचारात घेवून सदर

ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता सदर कामासाठी कार्यादेश देण्यास मान्यता देत आहे.

बाब क्रमांक : २२३/४

विषय :- म्हाडा कमर्शियल बिल्डिंग नं.१ मधील '' बी '' विंग वांद्रे पूर्व, मुंबई येथे २०,००० चौ.फुट जागा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नवीन कार्यालयाच्या वापरासाठी वाजवी भाडयाने मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२५९ दिनांक : ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडा कमर्शियल बिल्डींग नं.१ मधील '' ए '' विंग बांद्रा पूर्व, मुंबई येथील सुमारें २०००० चौ.फुट जागा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या व धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कार्यालयासह नवीन कार्यालयासाठी मागणी केलेली जागा ३ वर्षाच्या भाडे पटटयावर रु. ३३/- प्रती चौ.फुट असे भाडे आकारुन (अधिक मालमत्ता कर, सामायिक वीज, पाणी पट्टी, अकृषिक आकार इत्यादि खर्च वेगळा) देण्यास मान्यता देण्यांत येते. याच वाणिज्यक इमारतीतील उर्वरित क्षेत्र विक्री न करता गृहनिर्माण भवनातील इतर शासकीय कार्यालयांना विहीत अटी व शर्तींच्या अधिन राहून भाडेतत्वावर तात्पूरत्या स्वरुपात देण्यात यावे.

मात्र मा.न्यायालयात या प्रकरणी दाखल करण्यांत आलेल्या दाव्या संदर्भात मा.उच्च न्यायालयात सदर निर्णयाबाबत आवश्यकता असल्यास अवगत करुन पुढील कार्यवाही करावी.

बाब क्रमांक : २२३/५

विषय :- म्हाडाच्या विविध बहुमजली इमारतींच्या व इतर वसाहतींमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्बांधणीसाठी उर्वरित चटईक्षेत्र व अन्य फुटकळ भूखंड, करमणुकीचे मैदान इत्यादिंसाठीच्या वाटपाबाबातच्या धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत.

ठराव क्रमांक :- ६२६० दिनांक :- ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. महाराष्ट्र शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च- एप्रिल, २००७ च्या दरम्यान दि. २६/३/२००७ रोजी एक लक्षवेधी सूचना दाखल करुन घेण्यांत आली होती. सदरहू लक्षवेधी सूचनांच्या संदर्भात दि. २६/३/०७ रोजी महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेमध्ये मा. मुख्यमंत्री / महाराष्ट्र राज्य यांनी म्हाडाच्या वसाहतींच्या पुनर्बांधणी योजनेसाठी सुधारीत धोरण तयार करण्याबाबत घोषणा केलेली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

२. म्हाडाच्या जुन्या वसाहतींच्या पुनर्बांधणी योजनांसाठी सुधारीत धोरण तयार करताना खालील बाबींचा विचार केला जाईल.

(अ) एलआयजी सदनिकांना ३३० चौरस फूटापेक्षा जास्त चटईक्षेत्र देण्याची मागणी.

(ब) अतिरिक्त चटईक्षेत्र समप्रमाणात सहकारी गृहनिर्माण संस्थांना उपलब्ध करुन देणे.

(क) एलआयजी वसाहतींचा अतिरिक्त चटईक्षेत्र एमआयजी वसाहतींना किंवा एचआयजी वसाहतींना देता येणार नाही.

(ड) प्राधान्य/प्रतिक्षा यादी पध्दत रद्द करण्यात येईल.

(ई) प्रथम येणा-याला प्रथम प्राधान्य (first come first) पध्दत रद्द करण्यात येईल.

(फ) या वसाहतींमध्ये उपलब्ध होणा-या अतिरिक्त चटईक्षेत्राचे दर/किंमत विषयी सुधारीत धोरण तयार करण्यांत येईल.

३. वरील व्यतिरिक्त मा.राज्यमंत्री गृहनिर्माण विभाग यांनी विधान परिषदेत केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने यापुढे वसाहतीचा सुधारीत भूअभिन्यास तयार करुन स्थानिक प्राधिकरणाची मंजूरी आणण्यासाठी फक्त पॅनेलवरील वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्यांत यावी. याशिवाय खालील विविध प्रस्तावांना मान्यता देण्यांत आली.

४. सदर घोषणा पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येऊ नये. त्यामुळे प्रस्तावित धोरण दि.२७.०३.०७ पासून पुढे कार्यान्वित करण्यात यावे. त्यानुसार ठराव क्र.५९९८ व ६०४१ नुसार दि.२६.०३.०७ पर्यत जी एफएसआय वाटपाची कार्यवाही झाली आहे त्यामध्ये आता फेरबदल करण्याची गरज नाही.

५. उपरोक्त घोषणेच्या अनुषंगाने म्हाडाच्या सद्या अस्तित्वांत असलेल्या जुन्या वसाहतींतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्बांधणीसाठी विक्री करावयाचे उर्वरीत चटईक्षेत्र,फूटकळ भूखंड, ना फुटकळ ना स्वतंत्रपणे विकासयोग्य भूखंड, करमणुकीचे

मैदान इत्यादींच्या वाटप व किंमतीबाबत धोरणामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात खालील इतर प्रस्ताव मान्य करण्यांत आले.

(अ) एलआयजी सदनिकांना ३३० चौरस फूटापेक्षा जास्त चटईक्षेत्र देण्याची मागणी.

अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट यांच्या नगरविकास विभागाने निश्चित करुन दिलेली चटईक्षेत्राची ३० चौ.मी.ची मर्यादा पुनर्विकास प्रकल्पात रद्द करण्यांस हरकत नसावी. पुनर्विकासाच्या प्रकल्पात सदर मर्यादा ४५.०० चौ.मी. (बाल्कनी वगळून) पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत भविष्यात नगरविकास विभागामार्फत सुधारीत चटईक्षेत्राची मर्यादा जी घालून देण्यांत येईल, ती मर्यादा ग्राह्य धरण्यांत यावी. शासनाकडून मंजूरी होईपर्यत सध्याच्याच मर्यादेचे पालन करण्यात यावे (३०.०० चौ.मी.कमाल). सुधारीत नियम मंजूर झाल्यावर त्या नियमानुसार मंजूरी देण्यात यावी.

(ब) अतिरिक्त चटईक्षेत्र समप्रमाणात सहकारी गृहनिर्माण संस्थांना उपलब्ध करुन देणे.

वसाहतींचे भूअभिन्यास स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून मान्य झाल्यानंतर वसाहतींतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना उर्वरीत क्षेत्राचे वाटप गाळयांच्या संख्येच्या समप्रमाणात वितरीत करण्यांत यावे.

वसाहतीतील कार्यालयीन इमारत, इतर मोकळे भूखंड, (विनियम १६ खालील व निविदेद्वारे वितरीत केलेले भूखंड) सुविधा भूखंड किंवा ज्या सुविधांना विकास नियंत्रण नियमावली क्रमांक ३३ नुसार अतिरिक्त चटईक्षेत्र मिळू शकते, अशांना अथवा विकास नियंत्रण नियमावली क्रमांक ९ नुसार ज्यांचा विकास होऊ शकतो अशा सर्व प्रकारच्या भूखंडाना वसाहतीतील उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटप या पूढे करण्यांत येऊ नये. अशा भूखंडाना नेहमीचा अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक त्यांच्या मंजूर अभिन्यासानुसार पोटविभाजीत भूखंडांवर यापुढे द्यावा. मात्र ज्या सहकारी

संस्थांना किंवा भूखंडधारकांना किंवा कार्यालयीन इमारतींना किंवा इतर भूखंडधारकांना यापूर्वी देकारपत्र देण्यांत आलेली असतील, व ज्यांनी चटईक्षेत्रासाठी दिलेल्या देकारपत्रास अनुसरुन भागशः अथवा पूर्ण रक्कम भरली असेल किंवा ज्यांना शासनाने मंजूरी दिली असेल, अशांना दिलेल्या हमीनुसार उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटप करण्यांत यावे म्हणजे थोडक्यांत उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटपाबाबत यापूर्वी दिलेली हमीची प्रकरणे वगळून केवळ रहिवासी इमारतींच्या सहकारी संस्थानांच समप्रमाणात करण्यांत यावे. अशा प्रकारच्या भूखंडांना टि.डी.आर. अथवा अन्य मार्गाने मिळणा-या चटईक्षेत्रासाठी ना हरकत प्रमाणपत्र या ठरावानुसार द्यावे.

वसाहतीतील इमारतींसह सर्व प्रकरणात ज्यांना देकार पत्रे दिली आहेत व ज्यांनी भागशः अथवा पूर्ण रक्कम भरली असल्यास अशांनाच देकार पत्रानुसार उर्वरित चटईक्षेत्राचे वितरण करावे.

वसाहतीचा सुधारीत भू-अभिन्यास पुन्हा मंजूर झाल्यावर उर्वरित चटईक्षेत्र सर्व मूळ गाळेधारकांना वाटल्यास प्रति गाळा जे प्रमाण येईल त्या प्रमाणानुसार, ज्या सहकारी संस्थाना या पेक्षा जास्त उर्वरित चटईक्षेत्राचे वाटप या पूर्वी झाले असेल, त्या संस्थाचा पुन्हा मंजूर झालेल्या अभिन्यासातील उर्वरित चटईक्षेत्राचे समप्रमाणात वाटप करतांना पुन्हा समावेश करण्यात येऊ नये.

ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी TDR चा वापर करण्याबाबत या पूर्वीच्या ठरावान्वये ना हरकत प्रमाणपत्रे घेतलेली आहेत, त्यांना या सुधारीत धोरणानुसार चटईक्षेत्राचे समप्रमाणात वाटप करण्यामध्ये अशा सहकारी संस्थांना समाविष्ट करुन घ्यावे. या ठरावातील चटईक्षेत्रा- साठी व इतर बाबीसाठी अधिमुल्याची रक्कम भरण्यासाठी एक वर्षाचा कालावधी देण्यात यावा. मात्र, रक्कम भरण्यास उशीर झाल्यास अशांना सुधारीत रेडीरेकनरच्या दराने रक्कम आकारावी.

उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटप समप्रमाणात करीत असतांना कोणत्याही सहकारी संस्थेला त्या व्यतिरिक्त TDR चा वापर करावयाचा झाल्यास किंवा इतर स्वरुपाच्या चटईक्षेत्राचा वापर करावयाचा झाल्यास किंवा दोघांचा एकत्र वापर करावयाचा झाल्यास कोणत्याही भूखंडावर वि.नि.नि. कलम ३३(५) च्या व इतर वसाहतींना मुंबई महानगरपालिकेने/ इतर स्थानिक प्राधिकरणाने घालून दिलेल्या मर्यादेनुसार चटईक्षेत्र वापरासाठी ना हरकत प्रमाणपत्र द्यावे.

बाब टिप्पणीतील ''पर्याय-१'' प्रमाणे वसाहतीतील ईडब्ल्युएस, एलआयजी, एमआयजी, एचआयजी या सर्व वर्गातील गाळयांना समप्रमाणात अतिरिक्त चटईक्षेत्र वितरीत करण्याचे मान्य करण्यांत आले.

ज्या वसाहतीत गाळेधारकांच्या सहकारी संस्थांनी अनधिकृत बांधकामे केलेली आहेत व त्यापोटी मंजूर अभिन्यासात काही चटईक्षेत्र राखीव करण्यात आलेले आहे, अशा गाळयांना चटईक्षेत्राचे वाटप करु नये.

ज्या शहरांच्या विकास नियंत्रण नियमावलीत मुंबईतील नियम क्र.३३(५) प्रमाणे चटईक्षेत्राची तरतुद लागू नाही त्या क्षेत्रांसाठी स्थानिक विकास नियंत्रण नियमानुसार कार्यवाही करावी.

क) LIG वसाहतींचे चटईक्षेत्र MIG, HIG वसाहतींना देता येणार नाही

नवीन प्रस्तावानुसार सम प्रमाण वाटपाचे धोरण असल्याने एका उत्पन्न गटाचे चटईक्षेत्र दुस-या उत्पन्न गटास वाटप करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

ड) प्राधान्य / प्रतिक्षा यादी पध्दत रद्द करणे

कोणत्याही वसाहतींचा सुधारीत भूअभिन्यास मंजूर झाल्यानंतर सहकारी संस्थांच्या अर्जानुसार प्राधान्य यादी तयार करण्याची पध्दत घालून देण्यांत आली होती, ती पध्दत रद्द करण्यांत यावी.

मुंबई शहरातील काही वसाहती जसे की, पंतनगर-घाटकोपर व टिळकनगर-चेंबूर या वसाहतींसाठी प्राधान्य यादया दि.२६.३.२००७ पूर्वीच तयार करण्यात आल्या होत्या व या याद्यांना दि.२६.३.२००७ पूर्वी मा. उपाध्यक्ष/प्रा. व मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी मान्यता दिली होती. तथापि त्या याद्या लागू करण्यांत आल्या नाहीत, त्या याद्या रद्द करण्यांत याव्यात.

ई) <u>प्रथम येणा-याला प्रथम प्राधान्य ही पध्दत रद्द करण्याबाबत</u>

प्राधिकरणाच्या या पूर्वीच्या ठरावातील धोरणानुसार ठरवून दिलेल्या मुदतीत सहकारी संस्थांनी पुढाकार न घेतल्यास प्रथम मागणी प्रथम पुरवठा या तत्वावर वितरण करण्याचे जे धोरण होते, ते यापुढे या ठरावानुसार रद्द करण्यांत येत आहे..

फ) <u>वसाहतींमध्ये उपलब्ध होणा-या अतिरिक्त चटईक्षेत्र व इतर बाबींच्या दराविषयी किंमती विषयक धोरण ठरविणे</u>

प्राधिकरणाने या पूर्वीच्या ठरावाच्या धोरणानुसार उर्वरीत चटईक्षेत्र, TDR चा वापर, फूटकळ भूखंड, ना फूटकळ ना स्वतंत्रपणे विकास योग्य भूखंड व करमणुकीचे मैदान इत्यादीं संदर्भात सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप करण्याचे किंमतविषयक सध्याचे धोरण खालील तक्ता क्र. १ नुसार दर्शविण्यांत येत आहे. यापूर्वी चटईक्षेत्राची किंमत झोनल पध्दतीने आकारण्यांत आली होती. त्यासाठी त्यावेळचे खुल्या बाजारातील टीडीआरच्या दरांची सरासरी विचारात घेऊन प्राधिकरणाने हे विभागीय दर ठरवून दिले होते.

तक्ता क्र. १ :

सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप करण्याचे सध्याचे ठराव क्र. ५९९८ व ६०४१ मध्ये असलेले किंमतविषयक धोरण.

अ. क्र.	तपशील	मुंबई शहरासाठी दर (प्रचलित वर्षाच्या रेडी रेकनरदराची टक्केवारी) अ.क्र. १,२ व ४ साठी	मुंबई व्यतिरिक्त इतर महानगर पालिका व अ वर्ग नगरपालिका (प्रचलित वर्षाच्या रेडी रेकनरच्या दराची टक्केवारी) अ.क्र. १ते ५ साठी	ब व क वर्ग नगरपालिका (प्रचलित वर्षाच्या रेडी रेकनर दराची टक्केवारी) अ.क्र. १,२ व ४ साठी
१	फुटकळ भूखंडाचे वितरण	१०%	१०%	१०%
२	ना फुटकळ ना स्वतंत्रपणे विकास योग्य भूखंडाचे वितरण	२०%	२०%	२०%
३	उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटप	झोनल / विभागीय दर (प्रति चौ.मी.)	२०%	फक्त छाननी शुल्क आकारण्यात यावे.
	अ. मुंबई शहर (ए ते जी)	रु. ६५००/-		
	ब. मुंबई पश्चिम उपनगरे (एच आणि के)	रु.४०००/-		
	क. मुंबई पूर्व (एल, एम व एन)	रु. ३०००/-		
	ड. मुंबई पुर्व व पश्चिम विस्तारीत उपनगरे(पी,आर,एसवटी)	रु. २५००/-		
४	खुल्या जागा व करमणुकीचे मैदानाचे वितरण	प्रचलित रेडीरेकनर दराच्या ५%	प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनर दराच्या ५%	प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनर दराच्या ५ %
५	टी.डी.आर. वापराचे दर	विभागीय दराच्या २५%	प्रचलित रेडीरेकनरदराच्या ५%	टी डी.आर नियम लागू नाही.

(अ.क्र. १ , २ मधील दर हे चटईक्षेत्र विरहित वाटपाचे आहेत.)

<u>सुधारीत किंमतविषयक धोरण खालील प्रमाणे ठरविण्यात येत आहे.</u>

उर्वरीत चटईक्षेत्र व इतर प्रकरणातील सुधारीत किंमतीविषयक धोरण खालील तक्ता क्र. २ नुसार मान्य करण्यांत आले.

<u>तक्ता क्र.२</u>

अ. क्र.	तपशील	मुंबई शहरासाठी दर (प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या दराची टक्केवारी) अ.क्र. १ ते ५ साठी	मुंबई व्यतिरिक्त इतर महानगर पालिका व अ वर्ग नगरपालिका (प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या दराची टक्केवारी) अ.क्र. १ ते ५साठी	ब व क वर्ग नगरपालिका (प्रचलित वर्षाच्या रेडीरेकनरच्या दराची टक्केवारी) अ.क्र. १, २ साठी
अ	ब	क	ड	ई
१	फुटकळ भूखंडाचे वितरण	५०%	५०%	५०%
२	ना फुटकळ ना स्वतंत्रपणे विकास योग्य भूखंडाचे वितरण चटईक्षेत्र विरहित	६०%	६०%	६०%
३	उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटप			फक्त छाननी शुल्क आकारण्यात यावे.
	१.अत्यल्प उ. गट,अल्प उत्पन्न गट, एस.आय.एच.एस., एस.सी.एस. व तत्सम	४० %	४०%	
	२.मध्यम उत्पन्न गट-	६० %	६०%	
	३.उच्च उ.गट-	८०%	८०%	
४	खुल्या जागा व करमणुकीचे मैदानाचे वितरण	१०%	१०%	-
५	टी.डी.आर वापराचे दर	५%	५%	टी डी.आर नियम लागू नाही.

टिप.

- उपरोक्त तक्त्यातील रेडीरेकनरच्या दराची टक्केवारी ही रेडीरेकनरमधील विकसित जमिनीच्या दराची टक्केवारी आहे.
- यापूर्वीच्या ठरावाबाबत लेखापरीक्षक यांनी असा खुलासा मागितला आहे की, यापूर्वी ठरविलेले दर हे रहिवाशी गाळयांसाठीचे दर आकारण्यांत आलेले आहेत काय ? कारण ठरावात रहिवासी वापराच्या दराचा उल्लेख जमिनीचा दर रहिवासी गृहीत धरुन करण्यात आला होता. याबाबत खुलासा करण्यांत येतो कीं. यापूर्वी प्राधिकरणासमोर सादर करण्यांत आलेल्या रेडी रेकनरचे दर ठराव क्र. ६०४१ च्या परिशिष्टानुसार दर्शविलेले आहेत, ते रेडी रेकनरमधील विकसित जमिनीचे दर आहेत. त्यामुळे या नुसार लेखापरिक्षकांना उत्तर देण्यास मान्यता देण्यांत आली.
- वरील चटईक्षेत्र व टीडीआर ना हरकत पत्राचे दर रहिवासी, शैक्षणिक व सामाजिक वापरासाठी आहेत.
- उर्वरीत चटईक्षेत्र व टीडीआरचे ना हरकत पत्र व्यापारी, औद्योगिक, वैद्यकीय व तत्सम वापरासाठी परवानगी द्यावयाची झाल्यास वरील दराच्या दीडपट दराने आकारणी करण्यात यावी.
- इतर मार्गाने उर्वरीत चटईक्षेत्र प्राप्त केल्यास जसे की, विकास नियंत्रण नियमावली क्र.३३चे (२), (३) खालील तरतूदीनुसार व इतर मार्गाने उर्वरीत चटईक्षेत्र प्राप्त केल्यास प्रचलित रेडीरेकनरच्या दराच्या १०% प्रमाणे आकारणी करुन ना हरकत पत्र दयावे.
- गाळयांची वर्गवारी मूळ वितरणानुसार असेल. यापूर्वी बांधलेल्या औद्योगिक कामगार व झोपडपट्टी निमूर्लन योजनेतील गाळयांना अल्प उत्पन्न गटानुसार समजावे.
- एकूण बांधकाम क्षेत्रफळाचे १५% टक्के व्यापारी वापरास रहिवासी दर लावण्याची अट रदद करावी व त्यास वरील दराच्या दीडपट दराने आकारणी करावी.
- मुंबई व इतर सर्व महानगर पालिका क्षेत्र सोडून उर्वरीत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना खुल्या जागांचे हस्तांतरण करताना ठराव.६२१४/ दि.२६.०९.०६

नुसार कार्यवाही करावी. ज्या शहरांमध्ये टीडीआर नियम लागू आहेत त्यामध्ये स्थानिक संस्थांना डी.पी. खुल्या जागेचे वितरण टीडीआर घेऊन करण्यांत यावे.

- वरील सुधारीत प्रस्तावाशिवाय ठराव क्र.५९९८ व ठराव क्र.६०४१ मधील इतर तरतुदी कायम रहातील.
- अनुक्रमांक १,२ साठी वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचे वेगळे दर लावू नयेत. अ.क्र.४ मधील दर हे चटईक्षेत्र विरहीत वाटपाचे दर आहेत.
- वरील दर हे सहकारी संस्थासाठी असून तेच दर वैयक्तिक गाळेधारकांना लागू रहातील. (जसे की, स्वतंत्र बंगलो प्लॉट, रो-हाऊस, इ.)
- खुल्या जागेचा जमीन, विकास व पायाभूत सुविधांवर एकूण झालेला खर्च योजनेतून प्रत्यक्ष वसुल केल्यानंतर अधिकची किंमत वसुल करावयाची आहे.

६. <u>मुंबई मंडळाच्या जुन्या वसाहतीतील अतिरिक्त चटईक्षेत्र वितरणाबाबत इतर मुददे :</u>

- सिध्दार्थनगर, गोरेगांव या वसाहतीतील ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस ३५.०० चौ.मी. व रामकृष्णनगर खार (प.) येथे ३२.०० चौ.मी.प्रतिगाळा चटईक्षेत्राचे देकार पत्रे देण्यात आलेली आहेत व त्यांनी काहीच रक्कम भरलेली नाही अशा संस्थाना, अधिमुल्याची रक्कम भरण्याची मुदत जी देकार पत्राच्या दिनांकापासून ९० दिवसाची आहे ती कालमर्यादा रद्द करावी व या वसाहतींसाठी प्रथम मागणी प्रथम पुरवठा पध्दत लागू करण्यांत न आल्यामुळे ही पध्दत लागू करु नये व या ठरावानुसार कार्यवाही करावी.
- टिळकनगर येथे एन.डी.आर भूखंडाना १.२० इतका चटई क्षेत्र निर्देशांक आरक्षित केला आहे. अधिकचा ०.६ चटई क्षेत्र निर्देशांकबाबत वसाहतीमधील अतिरिक्त चटई क्षेत्र उपलब्ध झाल्यास मोकळे भूखंड / एन.डी.आर भूखंड यांना देणे ऐवजी अस्तीत्वात असलेल्या जून्या इमारतींचे पुनर्बांधणीकरिता देण्यात यावे.

- टिळकनगर वसाहतीमधील एन.डी.आर २१ व २७ भूखंडाला व अशा इतर प्रकरणात शासनाने अतिरिक्त चटईक्षेत्र वापरण्यास दि.२६.०३.२००७ पूर्वी परवानगी दिलेली आहे. त्या संस्थेला अति.च.क्षे.वितरण करावे.
- ज्या वसाहतीत अंदाज न येणा-या दायीत्वाबाबत पुर्तता करण्यासाठी एकूण उर्वरित चटईक्षेत्रापैकी १०% चटईक्षेत्र राखीव करुन ठेवावे व त्याच्या वाटपाची प्रक्रीया व खात्री झाल्यावर त्याचे वितरण करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्याचे मान्य करण्यांत आले.
- अधिकार प्रदानतेबाबतचा प्रस्ताव खालीलप्रमाणे तक्ता क्र.३ प्रमाणे मान्य करण्यांत आला.

तक्ता-३

अ. क्र.	**निर्णयाचा प्रस्ताव**	**प्रस्तावित अधिकार प्रदानता**
१	सर्व मंडळासाठी या ठरावाव्दारेप्रत्येक ३ वर्षाच्या कालावधीसाठी छाननी शुल्क ठरविणे.	मा.उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा.
२	खाजगी वास्तुशास्त्रज्ञांकडून सुधारीत किंवा नविन भू-अभिन्यास तयार करणे व त्यास स्थानिक संस्थांची मंजुरी मिळविणे इत्यादि व तत्सम कांमासाठी व्यावसाईक शुल्क ठरविणे	मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा.
३	वसाहतीचे सुधारीत भू-अभिन्यास मंजुर करणे	मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा.
४	ज्या गावामध्ये / शहरामध्ये रेडीरेकनर दर उपलब्ध नाही अशा ठिकाणचे उर्वरित चटईक्षेत्र,फूटकळ भूखंड व थोडया फार मोठया आकारमानाचे भूखंडाचे दर ठरविणे	मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा.
५	फुटकळ भूखंड ठरविणे व वितरण करणे	मुख्य अधिकारी/विभागीय मंडळ
६	ना फुटकळ ना स्वतंत्रपणे विकास योग्य असे भूखंड ठरविणे व वितरीत करणे	मुंबई मंडळाकरिता मा.उपाध्यक्ष / प्रा. इतर विभागीय मंडळासाठी मुख्य अधिकारी / विभागीय मंडळ

७	वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचे विविध संस्थाना वाटप या धोरणाप्रमाणे व ज्यामध्ये चटईक्षेत्रांतर्गत समाविष्ट होणारे व न होणारे बांधकाम प्रस्तावित आहे.	मुख्य अधिकारी/ विभागीय मंडळ
८	वसाहतीतील सामायिक सुविधांची दुरुस्ती करणे, श्रेणीवाढ करणे, नविन सुविधा उपलब्ध करुन देणे यासाठी चटईक्षेत्राची विक्री,टिडीआर ना हरकत प्रमाणपत्र देणे यांतून प्राप्त होणारा निधी मंडळामार्फत योजना राबवून खर्च करणे	मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./ प्राधिकरण
९	विकास आराखडयातील रस्त्यांसाठी यथाप्रमाणात (प्रोराटा चार्जेस) आकारणी स्थानिक संस्थाना भरणे	मा.उपाध्यक्ष व मु.का.अ./प्राधिकरण
१०	वसाहतींच्या भू-अभिन्यासातील करमणूकीचे मैदान १५ % व १० % (Layout R.G. P.G.or Garden) वितरण व स्थलांतरण करणे	मा.उपाध्यक्ष व मु.का.अ./ प्राधिकरण
११	उर्वरित चटईक्षेत्र, फूटकळ भूखंड व ना फुटकळ ना स्वतंत्रपणे विकास योग्य भूखंड या सर्वांच्या वितरणाबाबत आवश्यकतेनुसार वेळोवेळी वितरणाच्या इतर अटी व शर्ती ठरविणे	मा.उपाध्यक्ष व मु.का.अ./ प्राधिकरण
१२	विकास नियंत्रण विनियम ३३ (२), (३) नुसार मुंबई व इतर शहरासाठी इतर मार्गाने मिळणा-या नेहमीच्या अनुज्ञेय चटईक्षेत्रापेक्षा अधिकचा चटईक्षेत्र सामाजिक / शैक्षणिक / वैद्यकिय व इतर संस्थाना मंजूर करणे	मुंबई मंडळाकरिता मा.उपाध्यक्ष व मु.का.अ./ प्रा. इतर विभागीय मंडळासाठी मुख्य अधिकारी विभागीय मंडळ
१३	बाहेरील हस्तांतरणीय विकास हक्क विविध संस्थाना रहिवासी,व्यापारी व इतर वापरासाठी वापरण्यास परवानगी देणे	मा.उपाध्यक्ष व मु.का.अ./ प्राधिकरण

७. **<u>हमीपत्रासह मंजूर केलेल्या यापूर्वीच्या प्रकरणां संदर्भात वसुली करण्याबाबत</u>**

प्राधिकरणाच्या दि.९.०१.०४ रोजीच्या बैठकीत उर्वरीत चटईक्षेत्राचे वाटपा संदर्भात ठराव क्र.५९९८ अन्वये व नंतर या धोरणात पुन्हा सुधारणा करुन, आकारणी करावयाचे विभागीय दर ठराव क्र.६०४१, दि.२९.०७.०४ नुसार मंजूर केले होते त्यानुसार उर्वरीत चटईक्षेत्र वितरणाची प्रकरणे हाताळण्यात येत होती. शासनाने वसुलीबाबत पत्र क्र.वाटप ११०५/ प्र.क्र.३१६/ गृनिभू-१,दि.२५.१०.०५ अन्वये म्हाडाला असे कळविले होते की, व्यक्ती किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून एक हमीपत्र प्राप्त करुन घ्यावे, ज्यामध्ये शासन जो निर्णय घेईल किंवा शासन ज्या प्रकरणात जो दर अंतिमतः निश्चित करेल, असा सुधारीत दर आकारणे संबंधित संस्था वा व्यक्तीवर बंधनकारक राहील असा स्पष्ट उल्लेख असावा. विविध प्रकरणांच्या वसुलीबाबत नविन मंजूर दरानुसार फरकाची रक्कम वसुल करावी.

प्रस्तावित वसुली फक्त मुंबई महानगरपालिका क्षेत्रापुरतेच मर्यादीत असून इतर विभागीय मंडळाच्या क्षेत्रासाठी वसुली प्रस्तावित नाही यास मान्यता देण्यात आली.

ठराव क्र.६०४१ च्या मंजूरीच्या तारखेपासून आताच्या ठरावाच्या मंजूरीच्या तारखेपर्यत सर्व प्रकरणात फरकाची रक्कम वसुल करण्यात यावी. याबाबत असे

ठरविण्यांत आले की, सुधारीत किंमती विषयक धोरण तक्ता क्र. २ नुसार वितरणाच्या वर्षाच्या रेडीरेकनरच्या दराने फरकाची रक्कम वसुल करण्यांत यावी.

सदर ठरावातील चर्चेदरम्यान मा.अतिरिक्त मुख्य सचिव, नगरविकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी सुचविल्यानुसार म्हाडाच्या वसाहतीवर अधिकचा चटईक्षेत्र मागणी करण्याच्या संदर्भात खालील प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

''म्हाडाच्या मुंबई बेट, उपनगरे तसेच विस्तारीत उपनगरे येथील सर्व अस्तित्वातील व प्रस्तावित वसाहतींच्या प्रकल्पासाठी व महाराष्ट्र राज्यातील इतर सर्व शहरे व गावांसाठी सर्व अस्तित्वातील व प्रस्तावित वसाहतींच्या प्रकल्पासाठी संपूर्ण भूअभिन्यासावर २.५ चटई क्षेत्र मंजूर करण्यांत यावे. सर्व प्रकल्पात ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अत्यल्प / अल्प उत्पन्न गटाचे गाळे असण्याची अट लागू करण्यात येऊ नये. तसेच उप विभाजीत भूखंडाबाबत चटईक्षेत्र वापराची जी कमाल मर्यादा स्थानिक नियोजन प्राधिकरणाचे आयुक्त अथवा मुख्य अधिकारी ठरवतील त्याप्रमाणे कायम करण्यांत यावी.''

वरील प्रस्तावानुसार संबंधित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडातर्फे शासनाच्या गृहनिर्माण विभागामार्फत शासनाच्या नगर विकास विभागाकडे शिफारशींसह मंजूरीसाठी पाठविण्यास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

वरीलप्रमाणे ठराव सर्व संमतीने मंजूर करण्यात आला व हा ठराव मा. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांनी शासनाच्या गृहनिर्माण विभागाची मंजूरी प्राप्त करुन घेण्यास शासनास पाठवावा असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

बाब क्रमांक : २२३/६

विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या '' रणवीर सदन '' या पुनर्रचीत इमारतीवर बेसिक टेलिकॉम सर्व्हिस (Installnation of Basic Telecommunication service) भी करण्यासाठी रिलायन्स इन्फोकॉम कंपनीच्या प्रस्तावास ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत व अशा प्रकारे भविष्यात प्राप्त होणा-या प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२६१ दिनांक : ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या " रणवीर सदन " या पुनर्रचीत इमारतीवर बेसिक टेलिकॉम सर्व्हिस (Installnation of Basic Telecommunication service) उभी करण्यासाठी रिलायन्स इन्फोकॉम कंपनीच्या प्रस्तावास ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत व अशा प्रकारे भविष्यात प्राप्त होणा-या प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत तसेच सदर प्रस्तावांवर वार्षिक भाडे रु. ३,००,०००/- प्रतिवर्ष १० टक्के वाढ करुन लावण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२३/८

विषय :- आय.सी.आय.सी.आय.बँक लि. व एच.डी.एफ.सी. बँक लि. या खाजगी क्षेत्रातील बँकेत प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविण्याच्या प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाचा फेर विचार करणेबाबत तसेच आय.डी.बी.आय.या अन्य सार्वजनिक उपक्रमांच्या बँकेला गुंतवणूक प्रक्रीयेत सहभागी करुन घेणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२६२ दिनांक : ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक पी.एस.यु. १०.०५ / सी.आर.-२६/पी.एस.यु., दिनांक १३ मार्च २००६ मधील

मार्गदर्शक तत्वान्वये वांद्रे पूर्व व पश्चिम विभागातील राष्ट्रीयकृत बँकांव्यतिरिक्त म्हाडाचा अतिरिक्त निधी उपलब्धतेनुसार याच भागातील आय.सी.आय.सी.आय. बँक लि. आणि एच.डी.एफ.सी.बँक लि. या दोन खाजगी बँकांमध्ये गुंतविण्याचा ठराव क्रमांक ६२१५, दिनांक २६/०९/२००६ अन्वये घेतलेल्या निर्णयास मान्यता देण्यात येत आहे. तसेच म.शा.वित्त विभाग निर्णय क्र.पीएसयु १०.०५/सीआर-२६/पी.एस.यु. दिनांक १३/०३/२००६ अन्वये विहीत केलेल्या बँकांमध्ये गुंतवणूक करण्यात यावी, यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२३/९

विषय :- महाराष्ट्र मुल्य वर्धीत कर नियम २००२ (व्हॅट) अंतर्गत सन् २००५-२००६ चे लेखापरिक्षण करणेसंबंधी.

ठराव क्रमांक : ६२६३ दिनांक : ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर नियम २००२ चे कलम ६० (१) मध्ये शासनाने सुधारणा केली असून महाराष्ट्र मुल्यवर्धीत करनियम २००५ (लेव्ही ॲन्ड अमेंडमेंट) मुल्यवर्धीत कराचे लेखापरिक्षण करण्यासाठी मे.राकेश जे.गांधी, सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे. मे.राकेश जे.गांधी, सनदी लेखापाल यांना प्रस्तावित कामाकरिता वार्षिक व्यावसायिक फी रुपये २,४२,००९/- (रुपये दोन लाख बेचाळीस हजार नऊ फक्त) अधिक सेवा आकार तसेच कर्मचा-याच्या प्रत्यक्ष दौ-याकरिता प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे प्रवासखर्च अदा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २२३/१०

विषय :- जुळे सोलापूर भाग-१ येथील जमिनीचा मोबदला शासनाकडून न मिळाल्यामुळे किंवा मोबदल्याची रक्कम लाभधारकांकडून वसूल न करता आल्यामुळे अथवा तेवढयाच मुल्यांकनाची शासकीय जमिन मिळत नसल्यामुळे मोबदल्या पोटीच्या रकमेमुळे म्हाडावर पडणा-या आर्थिक भुर्दंडाबाबत माहिती.

ठराव क्रमांक : ६२६४ **दिनांक ४/०६/२००७.**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१) सदरहू जमिनीसाठी शासनाच्या निर्देशानुसार सुमारे रु. २२.३४ कोटी + इतर खर्च मिळून म्हाडाला रक्कम अदा करावी लागली. याप्रमाणे भूखंडाची किंमत लाभधारकांकडून वसूल करण्यासाठी केलेले प्रयत्न सफल झाले नाहीत. तसेच शासनाने देखील तेवढयाच मुल्यांच्या शासकीय जमिनी म्हाडास उपलब्ध होणार नसल्याचे कळविले आहे. या बाबीची नोंद प्राधिकरणाने घेतली. त्यामुळे अदा केलेल्या वाढीव मोबदल्याच्या रकमेचा आर्थिक भूर्दंड म्हाडावर पडला आहे.

असे जरी असले तरी एवढया मुल्यांकनाच्या शासकीय तथा नागरी जमीन कमाल धारणा कायद्यान्वये जमिनी **<u>विनामुल्य</u>** प्राप्त करुन घेण्यासाठी शासनाच्या

गृहनिर्माण विभागामार्फत नगर विकास विभागाकडे / महसुल विभागाकडे पुनःश्च विनंती करावी, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

२) भूसंपादनाकरिता रु. ६५,५९,८१५/- या आस्थापना खर्चाच्या पूर्ततेसाठी आणि कलम १८ खाली सुरु असलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये अदा करावयाच्या मुल्यांकन तज्ञाची फी प्रथम म्हाडाने अदा करावी व त्याच्या प्रतिपूर्तीसाठी शासनाकडे मागणी करण्यात यावी, यास मंजूरी देण्यात येत आहे.

३) सदरहू १७२ भूखंडांची किंमत बाजारी मुल्य / शीघ्र गणकानुसार आकारण्यात यावी. याप्रमाणे येणारी किंमत या योजनेतील सर्व १७२ लाभधारकांना लागू राहील.

४) शिल्लक जमिनीवर ४२ एमआयजी व २० दुकानी गाळयांची योजना मंडळाने प्रस्तावित केली आहे. या योजनेतील भूखंडाची / जमिनीची किंमत प्रचलीत बाजारी मुल्य / शिघ्र गणकानुसार करण्यात यावी.

बाब क्रमांक : २२३/११

विषय :- बाभूळगांव रोड. लातूर येथील स.क्र.९७ (भाग) व ९८ (भाग) मधील म्हाडाच्या मालकीच्या मंजूर रेखांकनातील विखुरलेल्या स्वरुपात नगर परिषद, लातूरतर्फे दूस-या टप्प्यात करण्यात आलेली ७३०५.५० चौ.मी.क्षेत्राच्या भूखंडाची मागणी.

ठराव क्रमांक : ६२६५ दिनांक : ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाच्या लातूर येथील बाभूळगांव रोडवरील स.क्र.९७ भाग व ९८ भाग या जमिनीवरील विकसित केलेल्या योजनेतील लातूर नगर परिषदेला यापूर्वीच्या प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६१७० दिनांक २७/०३/२००६ नुसार ९६६२.१३ चौ.मि. जमीन निश्चित केलेल्या किंमतीप्रमाणे आकारुन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या व्यतिरिक्त नगर परिषदेने आता मागणी केलेल्या ११,०२५.५ चौ.मी. (टिप्पणीसह जोडलेल्या नकाशातील ब्लॉक बी, सी, डी,इ,एफ,जी) दिनांक ३०/०४/२००७ पर्यंत परिगणित केलेल्या रु. ९८,९४,८२३/- याप्रमाणे मुल्य आकारुन नगर परिषदेने त्यांच्या पत्रात विषद केलेल्या प्रयोजनासाठी देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

मा.अध्यक्ष, नगर परिषद लातूर यांनी त्यांच्या दिनांक १०/०७/२००७ रोजीचे पत्र क्र.२२८ अन्वये सदरहू ठिकाणच्या जमिनी लिजवर अथवा अत्यल्प भाडयाने देण्यासाठी विनंती केली आहे. सदरहू त्यांची विनंती प्रत्यक्ष वस्तुस्थितीनुसार नाही, त्यामुळे ती मान्य करता येणार नाही.

शासनाकडे सदर ठराव / प्रस्ताव पाठवून मंजूरी प्राप्त करुन घ्यावी. नगर परिषदेने त्यांना हस्तांतरीत केलेल्या व करण्यात येणा-या जमिनीबाबतचा ठराव औरंगाबाद मंडळाने प्राप्त करुन घ्यावा.

सदर जमीन कलम ४१ खाली संपादित करण्यात आली आहे. मात्र यातील काही प्रकरणे मावेजाकरिता न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत. न्यायालयाच्या

निकालास अधिन राहून अधिमुल्य अदा करावे लागेल. जमिनीची किंमत/अधिमुल्य नगर परिषदेकडून रक्कम प्राप्त होण्याच्या दिनांकापर्यंत व्याज आकारण्यात येईल.

भूखंडाच्या वितरणाबाबतचे प्राधिकरणाचे नियम/विनियम व त्यात वेळोवेळी होणारे बदल हे लातूर नगर परिषदेला बंधनकारक राहतील. लातूर नगर परिषदेने करारनामा करणे आवश्यक आहे. सदर जमीन/भूखंडाचे हस्तांतरण हे नगर परिषदेच्या वॅम्बे योजनेसाठी करण्यात येत असल्याने त्याचा उपयोग याच प्रयोजनासाठी करणे लातूर नगर परिषदेला बंधनकारक आहे. याप्रमाणे अटी, शर्ती व वरील विवरणाला अनुसरुन प्राधिकरणाने निर्णय घेतला असून, नगर परिषदेला वाटप करावयाच्या सदर ११,०२५.५ चौ.मी.भूखंड/जमिनी बाबतच्या या ठरावास शासनाकडून मंजूरी घेण्यात यावी.

बाब क्रमांक : २२३/१२

विषय :- स.क्र.१९१ अ, येरवडा येथिल प्लॉट क्र.पीबी-२ या मोकळया भूखंडावर ३२ मध्यम उत्पन्न गट सदनिकांच्या योजनेच्या बांधकामाच्या निविदाबाबत.

ठराव क्रमांक : ६२६६ **दिनांक : ४/०६/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, स.क्र.१९१ अ, येरवडा येथिल प्लॉट क्र.पीबी-२ या मोकळया भूखंडावर ३२ मध्यम उत्पन्न गट सदनिकांच्या योजनेच्या बांधकामाच्या

मे.विजय कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीतून येणा-या २५ टक्के अधिकची रक्कम रु. ८२,०५,५५०/- च्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२३/१३

विषय :- संक्रमण शिबीर व्यवस्थापन - सुधारणा.

संक्रमण शिबीरांचे व्यावसायिक पध्दतीने व्यवस्थापन करण्यासाठी यंत्रणा उभारणे व कार्यान्वित करणे.

ठराव क्रमांक : ६२६७ **दिनांक : ४/०६/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत संक्रमण शिबीरांचे व्यावसायिक पध्दतीने व्यवस्थापन करण्यासाठी स्पर्धात्मक निविदा मागवून यंत्रणा उभारणेस मान्यता देण्यांत येत असून प्रथमतः सायन व बिंबीसारनगर या संक्रमण शिबीरांपैकी कोणत्याही एका संक्रमण शिबीराचे पायलट बेसवर व्यवस्थापनास खालील कामांचा समावेश करुन देण्यात यावे.

१. दर महिन्याचे भाडयाचे बिल भाडेकरुंना देणे.

२. दर महिन्याचे भाडे वसूल करणे.

३. भाडेकरु नियमित विद्युत बिल भरतात याची खात्री करणे.

४. अधिकृत भाडेकरु गाळयात रहात आहे याची खात्री करणे.

५. घुसखोर व्यक्तीस गाळयातून बाहेर काढणे.

६. ज्या भाडेकरुंची जुनी इमारत पुनर्रचित झाली आहे व त्यांना गाळे वितरीत झाले आहेत अशा

भाडेकरुंकडून मुदतीत गाळे खाली करुन घेणे.

७. ज्या भाडेकरुंच्या इमारती दुरुस्त झाल्या आहेत त्यांना त्यांच्या जुन्या इमारतीत परत

पाठविणे व मुदतीत संक्रमण शिबिरातील गाळे खाली करुन घेणे.

८. रिक्त गाळयांचे काटेकोरपणे अतिक्रमण व नुकसानीपासून संरक्षण करणे.

९. मंडळाच्या आदेशाप्रमाणे जुन्या उपकर प्राप्त इमारतीतील भाडेकरुंना गाळयाचा ताबा देणे.

१०. मंडळाच्या इमारतींचे नुकसानापासून संरक्षण करणे.

११. संक्रमण शिबिरांच्या जमिनी अतिक्रमणापासून वाचविणे.

१२. संक्रमण शिबिरांचे व्यवस्थापन मंडळाने तयार केलेल्या संगणक प्रणालीवर चालविणे.

१३. संक्रमण शिबीरांचे गाळे खाली करण्याकपूर्वी संबंधित भाडेकरुंकडून विद्युत बिलाची वसूली

करणे.

१४. संक्रमण शिबीरातील साफसफाई करणे, स्वच्छता ठेवणे.

१५. संक्रमण शिबिरात उद्यानाची देखभाल करणे.

१६. संक्रमण शिबीरात वृक्षारोपण करणे, वृक्ष वाढविणे.

१७. आवश्यकतेनुसार संक्रमण शिबिरात पहारेकरी (चौकीदार) पुरविणे.

१८. संक्रमण शिबिरात पाणी वाटप करणे.

ज्या व्यवसायिक संस्थेला निविदा पध्दतीने सदर काम देण्यांत येईल त्या संस्थेवर वरील कामे करणे बंधनकारक राहील. तसेच संक्रमण शिबीरांच्या देखभालीबाबतचा परिणाम पाहून नंतर पुढील संक्रमण शिबीरांच्या देखभालीबाबत मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२३/१४

विषय :- इमारत क्र.४६२-४७२ काळबादेवी रोड, (भारत भवन) या इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या निविदेबाबत.

ठराव क्रमांक : ६२६८ दिनांक : ४/०६/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारतक्र. ४६२-४७२, काळबादेवी रोड (भारत भवन) या इमारतीच्या दुरुस्तीचे काम मे.एम.एस.मिस्त्री आणि कंपनी यांचे निम्नतर निविदा वाटाघाटी नंतर २८ टक्के अधिक या दराने निविदा रक्कम रु. ९३,७४,५९३/- या रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्ताच्या स्थाईकरणाची वाट न पाहता करण्यास मान्य देण्यांत येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २४.०८.२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या २२४ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : २२४/२

विषय :- श्री.चंद्रशेखर प्रभू एक सदस्य समिती (गृहनिर्माण विभाग) यांना शासनाच्या निर्देशाप्रमाणे पुरविण्यांत आलेल्या सोई सुविधांवर झालेल्या खर्चास मान्यता देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२६९ दिनांक : २४/०८/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, श्री.चंद्रशेखर प्रभू एक सदस्य समिती (गृहनिर्माण विभाग) यांना शासनाच्या निर्देशाप्रमाणे पुरविण्यांत आलेल्या सोई सुविधांवर झालेला रु. २५,८७,३६५/- एवढा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता शासनाच्या दिनांक ७/११/२००६ रोजीच्या पत्राच्या अनुशंगाने देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२४/३

विषय :- मा.सभापती / नागपूर मंडळ यांचे वापरात असलेले जुने वाहन निर्लेखित करुन त्याऐवजी नवीन वाहन खरेदी करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२७० **दिनांक : २४/०८/२००७**

एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडील जुने वाहन क्रमांक ५८३६ हे वाहन प्रथम निर्लेखित करुन विहित कार्यपध्दती अनुसरुन तसेच शासनाने घालून दिलेल्या रु. ६.०० लाख किंमतीच्या मर्यादेत राहून नवीन वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, वाहन खरेदी केल्यानंतर शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

बाब क्रमांक : २२४/५

विषय :- मे.अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, विक्रीकर सल्लागार यांच्या नेमणूकीचे नुतनीकरण व फी वाढ करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२७१ **दिनांक : २४/०८/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र व्हॅट ॲक्ट २००२, वर्क्स कॉन्ट्रॅक्ट टॅक्स, सर्व्हीस टॅक्स इत्यादि संबंधित व न्यायालयीन कायदेविषयक बाबी नियमानुसार पूर्तता करुन वेळीच कार्यवाही करण्याकरिता त्या विषयातील तज्ञाची आवश्यकता

असल्याने मेसर्स अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल यांची सन् २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

मे.अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल यांना नेमणूकीच्या कालावधीसाठी मासिक फी रुपये ४८,५००/- (रुपये अठ्ठेचाळीस हजार पाचशे फक्त) मंजूर करण्यांत येत आहेत.

मे.अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल यांना नेमणूकीच्या कालावधीत मुंबई बाहेरील विभागीय मंडळांना भेटी द्याव्या लागतात, यासाठी त्यांना प्रत्यक्ष प्रवासखर्च प्राधिकरणाचे नियमाप्रमाणे मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२४/७

विषय :- उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. या पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना श्री.उज्वल उके (भा.प्र.से.) यांना गृहनिर्माण भवनातील सेवानिवासस्थान क्र.२ चे करण्यात आलेले वितरण नियमित करण्याबाबतचा कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव व भाडे आकारणी ठरविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२७२ दिनांक : २४/०८/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. या पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना श्री.उज्वल उके (भा.प्र.से.) यांना गृहनिर्माण भवनातील सेवानिवासस्थान क्र.२ चे वितरण करण्यात आले होते आणि

दिनांक १/०९/२००२ ते २६/०७/२००६ पर्यंतच्या कालावधीत तत्कालीन म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. हे (म्हाडाच्या इमारतीतील सेवानिवासस्थान क्र.२) या सेवानिवासस्थानात रहात होते. सदरहू सेवानिवासस्थान वाटपाबाबत केलेली कार्यवाही नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाबत टिपण्णीत परिच्छेद (प-१) मध्ये विशद केल्याप्रमाणे, श्री.उज्ज्वल उके यांचेकडून वर नमूद केलेल्या कालावधीसाठी नियमाप्रमाणे तथा प्रचलीत / नेहमीच्या पध्दतीने लागू असलेले भाडे जसे, अनुज्ञेय घरभाडे भत्ता, सेवाआकार, अनुज्ञप्ती शुल्क इ. (वसूल केले नसल्यास) वसूल करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२४/८

विषय :- अभियंता दिनानिमित्त प्रतिवर्षी एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यास मान्यता देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२७३ **दिनांक : २४/०८/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, " भारतरत्न सर एम.विश्वेश्वरय्या यांच्या जन्मदिनी संपूर्ण देशात साजरा होणा-या अभियंता दिनानिमित्त एक दिवशीय कार्यशाळेमार्फत प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच यावर्षाकरिता प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यक्रमासाठी रु. १.०५ लाख या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच हया प्रबोधनपर कार्यशाळेच्या कार्यक्रमास दरवर्षी प्राधिकरणाकडे

ठराव आणण्याऐवजी प्रत्यक्षात येणा-या खर्चाची प्रतिपूर्ती म्हाडाच्या संशोधन व प्रशिक्षण लेखाशिर्षांतर्गत अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खर्च करण्याचे व त्यास मंजूरी देण्याचे अधिकारी उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात येत आहेत.

बाब क्रमांक : २२४/९

विषय :- सर्व्हे क्रमांक १२० (भाग) वर्सोवा, अंधेरी, मुंबई येथील उच्च उत्पन्न गटासाठीच्या १०८८ गाळयांच्या प्रकल्पास लेखाशिर्ष १५७ ऐवजी लेखाशिर्ष १६० अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२७४ दिनांक : २४/०८/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, सर्व्हे क्रमांक १२० (भाग) वर्सोवा, अंधेरी, मुंबई येथील उच्च उत्पन्न गटासाठीच्या बांधण्यात येणा-या १०८८ गाळयांच्या प्रकल्पास लेखाशिर्ष १५७ ऐवजी लेखाशिर्ष १६० अंतर्गत प्राधिकरण निधितून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या योजनेस १५७ आगाऊ अंशदान या लेखाशिर्षाखाली झालेला खर्च १६० प्राधिकरण निधी या लेखाशिर्षाखाली वर्ग करावा व आर्थिक तरतुदीचे यानुसार समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : १.११.२००७ रोजी सायंकाळी ४.३० वाजता आयोजित केलेल्या २२५ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : २२५/२

विषय :- आयकर खात्यास प्रपत्र क्रमांक १० सोबत प्राधिकरणाने द्यावयाचा ठराव.

ठराव क्रमांक : ६२७५ **दिनांक : २९/१०/२००७**

१/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं,

" Resolved that entire revenue surplus of MHADA for the Assessment Year 2007-2008 corresponding to Financial Year 2006-2007, shall be utilised applied on the object of MHADA during the next five consecutive financial years

beginning from 2007-2008 and particularly on schemes as mentioned in the budget for the Financial Year 2007-2008 as required U/S 11 of the Income Tax Act, 1961."

Action on this Resolution to be taken without waiting for confirmation.

बाब क्रमांक : २२५/३

विषय :- पंढरपूर नगर परिषदेकडून घेतलेल्या गट क्र.२५ पैकी १.१३ हेक्टर (प्रत्यक्ष क्षेत्र १००३३.१२५ चौ.मि.) क्षेत्राचे किंमतीच्या अदायगीची कार्योत्तर मंजूरी - (रु. ११,०३,६४४/-) जमिनीच्या किंमतीपोटी खर्चाचा प्रस्ताव तथा माहिती टिप्पणी.

सदर बाब टिपण्णीवरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्राधिकरणाने

ठराव क्रमांक : ६२७६ दिनांक : १/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं,

१.पंढरपूर नगर परिषदेकडून घेतलेल्या गट क्र.२५ (पैकी) मधील १००३३.१२५ चौ.मी.क्षेत्रफळाची जमीन रु. ११०/- प्रती चौ.मी.या दराने येणा-या व अदा केलेल्या रुपये ११,०३,६४४/- रकमेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नोंदणी करण्यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. मुख्य अधिकारी / पुणे मंडळ आणि मुख्य अभियंता-१ / प्राधिकरण यांनी सदरहू जमिनीवर तीन महिन्याच्या आत योजना सुरु करण्यासाठीची नियमानुसार योग्यती कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक : २२५/४

विषय :- मौजे मुरुड, जिल्हा लातूर येथील सर्व्हे क्रमांक ७०१/४ या जमिनीवर बांधण्यात आलेल्या ५० गाळे अत्यल्प उत्पन्न गट योजनेतील गाळयांची किंमत एकरकमी वसूलीबाबत.

ठराव क्रमांक : ६२७७ दिनांक : १/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. उक्त प्रकरणी गाळयाची एकरकमी पध्दतीने ४ समान हप्त्यात मूळ रक्कम, व्याज न आकारता घ्यावयाची आहे, मात्र व्याज विलंब शुल्क, एन.ए.अथवा लीजरेंट माफ करण्याचे अधिकार प्राधिकरणाला नाहीत, त्यामुळे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे निर्णय घेण्यासाठी पाठविण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. शासन निर्णय प्राप्त झाल्यानंतरच व्याज, विलंब शुल्क इत्यादिं रक्कम माफ करण्याची कार्यवाही करण्यात यावी. शासन निर्णय ज्या दिवशी जारी होईल त्या दिवसापर्यंतचे व्याज, विलंब शुल्क त्यामध्ये अभिप्रेत असेल. कारण प्रस्तावात नमूद

केलेली रक्कम ही दिनांक ३१/०७/२००७ पर्यंत परिगणीत करण्यात आली आहे व ती शासन निर्णय होईपर्यंत वाढत जाणार आहे.

३ शासन निर्णयानंतरच सदरहू योजनेतील गाळयाची मूळ रक्कम रु. ५०,०००/-, ज्यापैकी रु. १०,०००/- प्रत्येक लाभधारकाने पूर्वीच भरले आहेत व उर्वरित रु. ४०,०००/- रकमेच्या चार मासिक समान हप्त्यामध्ये लाभार्थीने म्हाडाला तात्काळ भरणे बंधनकारक असेल. यामध्ये कसूर केल्यास म्हाडाच्या कायद्यातील नियम व विनियमातील तरतुदीनुसार कसूरदाराकडून थकबाकीची वसूली करणे, किंवा निष्कासित करणे इत्यादि कारवाई केली जाईल व व्याज सवलत दिली जाणार नाही.

प्राधिकरणाच्या निर्णयानंतर गृहनिर्माण विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यास या ठरावाप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२५/५

विषय :- सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ५८ (१) (ब) अन्वये प्राधिकरणास मिळालेल्या व मिळणा-या गिरण्यांच्या जमिनीच्या विकासाबाबत.

ठराव क्रमांक : ६२७८ दिनांक : १/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. सुधारित विकास नियंत्रण नियमावली ५८ च्या तरतुदीनुसार म्हाडास उपलब्ध होणा-या जमिनीवर म्हाडाने संक्रमण सदनिका बांधणे. तसेच गिरणी कामगारांच्या वाटयास उपलब्ध होणा-या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी सदनिका बांधण्याचे कामदेखील म्हाडानेच करावे.

२. मुंबई शहरातील / उपनगरातील ३१ (२९+२) पैकी २० गिरण्यांमधील म्हाडाच्या व गिरणी कामगारांच्या वाटयाची जमीन गिरणी मालकांकडून ताब्यात घ्यावी व जमिनींचा प्रत्यक्ष विकास जो पर्यत सुरु होत नाही तोपर्यत जमिनीची राखण व पहा-यासाठी पहारेदार कंत्राटदाराची नेमणूक करण्यात यावी.

३. सदरहू प्रकल्पासाठी २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात रुपये २२० कोटीची तरतुद प्रस्तावित केलेली आहे. सदर प्रकल्पासाठी होणारा खर्च प्रशासकीय मान्यतेच्या अभावी "प्राधिकरण निधीतून" लेखाशिर्ष १६० खाली करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

४. JNNURM योजनेअंतर्गत सदरहू प्रकल्पाचे काम करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. (मंजुरीनुसार प्राप्त होणारे अनुदान योजनेत वापरुन प्रकल्प खर्च त्या प्रमाणात कमी होईल.)

५. गिरणी कामगारांना वितरीत करावयाच्या सदनिकांची प्रती चौ. फुट विक्री किंमत प्रत्यक्ष खर्चावर आधारित असेल व त्यावर १५ टक्के देखरेख शुल्काचा समावेश करण्यात यावा.

६. गिरणी कामगारांना वितरीत करावयाच्या सदनिकांची किंमत, मुख्य सचिव / महाराष्ट्र शासन हयांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली समिती ठरवेल. तसेच गिरणी निहाय पात्र कामगारांची यादी दिनांक ११/१०/२००६ च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार कामगार आयुक्त / महाराष्ट्र शासन म्हाडास उपलब्ध करुन देतील.

७. सदनिकांच्या (तळ + ७) बांधकामाचा दर शासन निर्णयानुसार रुपये ८२४/- प्रती चौ. फुट असा राहील. शासनाच्या दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम विनिर्देश व अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील. स्टील्ट + १६ मजल्याच्या इमारतींसाठी मंजुर दर रुपये ८२४/- प्रती चौरस फुट अधिक रुपये १८५/- (या मजल्यांमध्ये कमी किंवा अधिक प्रमाणानुसार वरील अतिरिक्त दरात त्या प्रमाणात फेरफार होईल. स्टील्ट + ७, आणि स्टील्ट + १६ च्या बांधकाम दरातील फरक) असे एकूण रुपये १००९/- प्रती चौरस फुट बांधकाम दर, अधिक सुधारित विनिर्देशासाठी रुपये २१५/- प्रती चौरस फुट, अधिक भाववाढ आणि विक्रीकर देय राहील. योजनेत कार्यान्वित करावयाच्या सुधारित विनिर्देशाकरिता अदा करावयाचा दर तसेच स्टिल्ट + १६ मजल्यांपेक्षा जास्त ऊंच (सुमारे २४ मजली) इमारतीकरिता वाढणाऱ्या सुविधा, कॉंक्रिट यांचेंकरिता देय असलेल्या अधिकच्या दराची आकडेमोड वर्सोवा प्रकल्पात वापरण्यात आलेल्या पध्दतीनुसार प्रत्यक्ष खर्चावर काढण्यात यावा. त्यास मंजूर करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत. सुधारित विनिर्देशासाठी सदर अधिकचा दर मिल कामगारांच्या सदनिकांसाठी आणि संक्रमण शिबीरासाठी राहील.

८. सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी, कामाचे स्वरुप लक्षात घेता, एकूण २४ महिन्यांचा कालावधी ठेवण्यात येत आहे.

९. प्रस्तावित प्रकल्पांपैकी सध्या न्यु हिंद मिल माझगांव या प्रकल्पांचे काम मे.बी.जी.शिर्के. कन्स्ट्रक्शन टेक्नालॉजी प्रा. लि. यांना पूर्वीचे (शासन निर्णय १९८४ व वेळोवेळी सुधारित) शासन निर्णयानुसार तसेच त्यांची पुनर्रचित बांधकाम तंत्रज्ञानातील पात्र कंत्राटदार म्हणून नोंदणी झाल्याचे आदेश वितरीत झाल्यानंतर ठोक कंत्राट पध्दतीने (ख्ख्श्द्रभद्वश् च्द्धद्धदत्ड्ढन्र)

देण्यात यावे. बांधकामाचा दर आणि इतर विवरण अनुक्रमांक ७ वर नमुद केल्याप्रमाणे राहील. सुधारित विनिर्देशासाठीचा दर अनुक्रमांक (७) अनुसार देण्यात येईल. निवेदेची अंदाजित किंमत बाब टिप्पणीत नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे न्यु हिंद मिल करीता रु. १८५.३८ कोटी इतकी राहील. शासनाचे दि. ०७/११/२००६ चे निर्णयानुसार मिल कामगारांकरीता सदनिका व संक्रमण सदनिकांच्या संखेत वाढ अथवा घट होणे अपेक्षित आहे. त्यानुसार निवीदा रक्कमेत बदल होणे अपेक्षित आहे. लिप-टची देखभाल १० वर्षाकरीता कंत्राटदार करतील त्यापोटी त्यांना प्रती गाळा प्रती वर्ष देय रक्कम उपाध्यक्ष प्राधिकरण निश्चित करतील व त्याची वसुली गाळेधारकांकडून वसूल करावयाच्या सेवा शुल्कात अंतर्भूत करण्यात येईल. तसे उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

१०. मे.बी.जी.शिर्के. कन्स्ट्रक्शन टेक्नालॉजी प्रा. लि. यांना कराराप्रमाणे मोबीलाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के या दराने कार्यादेश दिल्यानंतर देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत १०.०६ टक्के दराने अग्रीम रकमेवर व्याज आकारण्यात यावे.

११. प्रशासकिय मंजूरी मिळाल्यानंतर व प्राधिकरणाच्या ताब्यात प्रकल्पाची जमीन आल्यानंतरच आणि उपनगरात मिळालेली / मिळणा-या जमिनीबाबत शासनास केलेल्या संदर्भावर निश्चित निर्णय प्राप्त झाल्यानंतरच योजनेचे स्विकृती पत्र मे.बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नालॉजी प्रा.लि. यांना देण्यात यावे व सदर कामास महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नकाशाप्रमाणे जे बदल होतील त्याप्रमाणे तितक्या रकमेनुसार करारपत्र करुन योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत. सदर योजनेतील संक्रमण सदनिका हया १८० चौ. फुट चटई क्षेत्राऐवजी २२५ चौ. फुट क्षेत्राच्या राहतील. कारण इमारती स्टील्ट + १६ व त्यापेक्षा जास्त

मजली राहणार आहेत. सदर बहुमजली इमारतीवर लाभधारकांची टिका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे लोकांना आकर्षित करण्यासाठी गाळयांचे विनिर्देश उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेत वापरण्यात येतात त्याप्रमाणे ठेवण्यात येतील. तसेच पॅसेजची रुंदी ५ फुटाऐवजी ६ फुट व त्यापेक्षा जास्त ठेवण्यात यावी.

१२. सदनिकांची अंतर्गत मांडणी लाभधारकांचे सोयीची असावी व अभिन्यासाचे नियोजन व इमारती आकर्षक असाव्यात याकरीता नियोजनाचे काम वास्तुशास्त्रज्ञ, हफीज कॉन्ट्रॅक्टर यांचेवर सोपविण्याचे उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी ठरविले आहे. हफीज कॉन्ट्रॅक्टर यांचे नाव म्हाडाच्या मान्यताप्राप्त वास्तुशास्त्रज्ञांच्या यादीमध्ये समाविष्ट नसल्यामुळे त्यास प्राधिकरण मंजुरी देत आहे. सदर वास्तुशास्त्रज्ञ यांची कामाची व्याप्ती (च्ड़दृद्रड्ढ दृढ द्यण्ड्ढ ध्द्दृद्धत्त) आणि त्यांना देय असलेले शुल्क म्हाडाचे प्रचलित धोरणानुसार मान्य करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. योजनेच्या नियोजनाचा अंतर्भाव मे. बी.जी. शिर्के यांना देय असलेल्या रुपये ८२४/- प्रती चौ. फुट या दरामध्ये असल्यामुळे वास्तुशास्त्रज्ञ हफीज कॉन्ट्रॅक्टर यांना देय असलेले शुल्क मे.बी.जी. शिर्के यांनी वास्तुशास्त्रज्ञ हफीज कॉन्ट्रॅक्टर यांना परस्पर अदा करावे अशी अट स्वीकृती पत्रात अंतर्भूत करण्यात यावी.

१३. शासनाचे वर नमुद केलेल्या दिनांक ३० जुलै २००४ च्या पत्रानुसार वर नमुद केलेल्या दरात वाढ किंवा घट प्राईझ इंडेक्शशी आधारित म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशन फॉर्म्युला प्रमाणे करण्यात येईल. त्यानुसार,

अ] प्राईझ व्हेरिएशन हे शासनाच्या निर्णय क्रमांक १०९१ / सी. आर. / १७२ / बी.एल.डी.जी.-२ दिनांक १०/०१/१९९२ च्या फॉर्म्युला नुसार काढण्यात येईल. सदर शासन निर्णय प्राधिकरणाने यापूर्वीच (दिनांक १२/१०/१९९२ च्या प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये) स्वीकारला आहे.

ब] सिमेंट व स्टील मध्ये भाववाढ किंवा घट आर.बी.आय. दर निर्देशांक व दिनांक ३०/०७/२००४ रोजीच्या खालील बाजार भाव स्टार रेट प्रमाणे काढण्यात यावे.

सिमेट रुपये २८२०/- प्रती टन.

स्टील रुपये ३२०००/- प्रती टन.

१४. शासनाचे दिनांक २२.०९.१९९९ व ३०.०७.२००४ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे वर्क्स कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

१५. शासनाचे दिनांक ३०/०७/२००४ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे योजनेसाठी लागणा-या पायाभूत बाहय सुविधा व इतर प्रकल्प अनुषंगिक कामे, ज्या दिवशी मूळ कंत्राट केले जाईल त्या वर्षात प्रचलित असलेल्या दरसूची प्रमाणे मुळ कामाच्या कंत्राटदारासच देण्यात येतील. जे दर दरसुचीमध्ये नसतील त्यांचे विश्लेषण (ऽड्डद्यद्ब ऋद्बड्डथ्त्र्यात्म) करुन सक्षम अधिका-याची मंजुरी घेण्यात यावी.

अ] योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांमध्ये सुरक्षा भिंत, रस्ते, पायवाटा, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस, व्यापारी संकुल, ५ टक्के ऋद्धदत्द्यद्र व सुविधा दुकाने इत्यादींचा आवश्यकतेनुसार अंतर्भाव राहील.

ब] महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर सुविधांच्या कामाचा बी - १ करारनामा करुन सदर कामांचे आदेश देण्यात यावे.

१६. मे. बी. जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांना अदा करण्यात येत असलेल्या दरामध्ये सदर योजनेचे नियोजन, सक्षम प्राधिकरणाकडून

योजनेस मंजुरी, भोगवटा प्रमाणपत्र व Completion Certificate मिळविण्याची जबाबदारी मे. बी. जी. शिर्के. कं. टे. लि. यांची राहील.

१७. मे. बी. जी. शिर्के. कन्स्ट्रक्शन टेक्नालॉजी प्रा. लि. या आय.एस.ओ.९००१ (I.S.O .९००१) प्राप्त कंपनीने पुर्वरचित बांधकाम पध्दतीने बांधण्यात येणाऱ्या इमारतींची ५० वर्षाची हमी दयावयाची आहे. तसेच संरचनात्मक संकल्प चित्राची (Structural Design) मंजुरी आय.आय.टी., पवई (I.I.T., Powai) व बहुमजली इमारतीकरीता ज़्त्दड्ड च्द्धददड्ढथ च्ड्ढद्मद्य ही च.क.ड.क. चेन्नई या संस्थेकडून मे. बी. जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांनी आणावयाची आहे. या मंजुरीकरीता लागणारा खर्च मे. बी. जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांनी द्यावा.

१८. प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेता आवश्यक तांत्रिक अधिकारी उपलब्ध करुन देण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. प्रकल्पाकरिता लागणाऱ्या तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या व निवड करण्याचे अधिकार मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे वास्तुशास्त्रज्ञ व लेखाविभागाकरीता कर्मचारी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१९. सदर योजनेवर प्रकल्प समंत्रकाची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यांचे शुल्क ठरविण्याचे व नेमणूक करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना राहतील. सदर योजनेवर प्रकल्प समंत्रकाची देखरेख राहील व कामाची देयके प्रकल्प समंत्रक व म्हाडा अधिका-यांनी प्रमाणित केल्यानंतर अदा करावे. प्रकल्प समंत्रक (P.M.C.) यांचे शुल्क म्हाडा परस्पर अदा करेल.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२५/६

विषय : जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मिशन या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या योजनांची कामे मेसर्स बी.जी.शिर्के कं. टे.प्रा.लि. यांना देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२७९ दिनांक : १/११/२००७

एकमताने निर्णय घेण्यात आला की, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मिशन योजनेअंतर्गत केंद्र सरकारने मंजूर केलेल्या खालील योजनांची कामे मे.बी.जी. शिर्के. कंन्स्ट्रक्शन टे. प्रा. लि. हयांना देण्याबाबतच्या प्रस्तावास त्यांची पुनर्रचित बांधकाम तंत्रज्ञानातील पात्र कंत्राटदार म्हणून नोंदणी झाल्याचे आदेश निर्गमित झाल्याच्या अधिन राहून प्राधिकरण मंजुरी देत आहे.

	योजना	**अंदाजित बांधकाम खर्च [रुपये कोटी]**
१]	मागाठणे, बोरिवली [पूर्व]	२४.७५
२]	प्लॉट १. गोराई रोड, बोरिवली [प].	२०.९३
३]	प्लॉट २. गोराई रोड, बोरिवली [प].	३४.२६
४]	तुर्भे मंडाले, मानखुर्द.	४६.०६
५]	सिध्दार्थ नगर, गोरेगांव [प]	३६.८३
६]	पंतनगर, घाटकोपर [पूर्व]	६१.२५
७]	गायकवाड नगर, मालवणी, मालाड [प]	२४.०२
	एकूणः	**२४८.०९**

१. सदर काम कार्यादेश दिल्यापासून २१ महिन्याचे कालावधीत (तुर्भे मंडाले वगळून) पूर्ण करावे. तुर्भे मंडाले येथील काम १८ महिन्यात पूर्ण करावे. सदर कामाची अंदाजित किंमत सुमारे रुपये २४८.०९ कोटी इतकी राहील. खर्च प्राधिकरण निधी १६० लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात यावे. तसेच नवीन प्रकल्पाच्या सन २००७-२००८ च्या या वर्षाच्या खर्चास अर्थसंकल्पीय तरतुदीस मंजुरी देण्यात येत आहे.

२. संक्रमण सदनिका १८० चौ. फुट चटई क्षेत्राच्या असतील व इमारती तळ + ७ मजली इमारती बांधण्यात याव्यात. बांधकामाचे दर नवीन शासन निर्णयानुसार रुपये ८२४/- प्रती चौरस फुट अधिक सुधारित विनिर्देशासाठी रुपये ५०/- प्रती चौ. फुट अधिक भाववाढ आणि विक्रीकर इतका राहील.

३. विक्री गाळयांसाठी बांधकामाचे दर नवीन शासन निर्णयानुसार विक्रीच्या [स्टिल्ट + ७] गाळयांसाठी रुपये ८२४/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम अधिक सुधारित विनिर्देशासाठी रुपये १०० प्रती चौरस फुट, अधिक भाववाढ आणि विक्रीकर, विक्रीच्या [स्टिल्ट + १५] गाळयांसाठी रुपये ८२४/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम अधिक सुधारित विनिर्देशासाठी रुपये १०० प्रती चौरस फुट अधिक उंच इमारतीसाठी रुपये १८५ प्रती चौरस फुट, अधिक भाववाढ आणि विक्रीकर इतका राहील. शासनाच्या दिनांक १७/०९/१९९९ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार व दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम व विनिर्देश अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

४. मेसर्स बी.जी. शिर्के. कं. टेक्नोलोली लिमिटेड यांना कराराप्रमाणे मोबालाईझेशन व मशीनरी अग्रीम १६ टक्के देण्यात यावे. परंतु कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यतच्या काळापर्यत १०.०६ टक्के दराने अग्रीम रक्कमावर व्याज आकारण्यात यावे.

५. शासनाचे दिनांक २२/०९/१९९९ व ३०/०७/२००४ रोजीच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे वर्क कॉन्ट्रॅक्ट वरील विक्री कर म्हाडाने परस्पर अदा करावा.

६. वर नमुद केलेल्या दरात वाढ किंवा घट, जून २००४ च्या मूळ निर्देशांकानुसार म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशनफॉर्म्युला प्रमाणे करण्यात यावी. सिमेंट व स्टील

मध्ये भाववाढ किंवा घट, आर.बी.आय. दर निर्देशांक जून २००४ व खालीलप्रमाणे दिलेल्या स्टाररेट प्रमाणे काढण्यात यावेत.

सिमेंट - २८२०/- प्रती टन.

स्टील - ३२०००/- प्रती टन.

७. योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे काम जसे की, सुरक्षा भिंत, पायवाटा, गटारे, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे, दिवाबत्ती इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की, चक्की, दवाखाना, पोस्ट ऑफिस सुविधा, दुकाने इत्यादी कामे कामाचे मूळ कंत्राटदार मेसर्स बी.जी. शिर्के. कंपनीकडून त्यांना त्या कामासाठी ज्या वर्षामध्ये कार्यादेश देण्यात आले आहेत त्या वर्षासाठी लागू असलेल्या दरसुचीवर (DSR / MCGM's FMR) बी-१ करारनामा अंतर्गत करुन घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे व महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतरच अंतर्गत सुविधांचे अतिरिक्त कामाचे आदेश देण्यात यावेत.

८. जुनी संक्रमण शिबीरे म.अ./इ.दु. व पु. मंडळ यांनी १२ महिन्यांत स्थलांतरीत करुन व जुन्या चाळी पाडून जागा मोकळी करुन देण्यात यावी जेणेकरुन योजनेच्या प्रगतीस अडथळा येणार नाही. सदर काम महानगरपालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर, मंजूर नकाशाप्रमाणे योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

९. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडास कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार त्याची जबाबदारी मेसर्स बी.जी. शिर्के. कंपनी यांचेवर राहील व ते भरपाई करुन देतील या आशयाचे त्यांचेकडून हमीपत्र (Undertaking) घेण्यात यावी व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्यासंबंधीचे कार्यादेश देण्यात यावे.

१०. सदर योजनेतील खुल्या विक्रीचे गाळयांसाठी जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्यानंतर देण्यात यावी जेणेकरुन गाळयांना चांगला प्रतिसाद येईल.

११. शासनातर्फे संक्रमण शिबीरांचे बांधकामासाठी २.५ FSI देण्याचे मान्य झालेले आहे व त्याप्रमाणे आदेश निर्गमित झाले आहेत. त्यामुळे त्याप्रमाणे कामांचे

नकाशे मेसर्स बी.जी. शिर्के कंपनी यांनी सुधारित करुन सादर केले आहेत त्याप्रमाणे काम करण्यात यावे.

१२. प्रस्तावित योजनेतील नकाशे व आराखडे, नामांकित वास्तुशास्त्रज्ञांकडून करुन घेण्यात येतील. सदर वास्तुशास्त्रज्ञ यांच्या कामाची व्याप्ती (Scope of the work) आणि त्यांना देय असलेले शुल्क म्हाडाचे प्रचलित धोरणानुसार मान्य करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात यावे. हे शुल्क कंत्राटदारास देय असलेल्या दरामध्ये अंतर्भूत असल्याने ते वास्तुशास्त्रज्ञांना मे.बी.जी.शिर्के यांनी अदा करावे. तसेच कामाची गुणवत्ता प्रतीथयश PMC कडून तपासून घेण्यात येईल. PMC चे शुल्क म्हाडा अदा करतील व त्यांचे शुल्क व नेमणूक करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना राहतील. सदर योजनेवर PMC देखरेख ठेवतील व योजनेची देयके PMC व म्हाडा अधिका-यांनी प्रमाणित केल्यानंतर अदा करण्यात येतील.

१३. प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार नकाशांत आवश्यक तेथे बदल होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार करण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२५/७

विषय : सिध्दार्थनगर गोरेगांव येथील ६७२ पत्राचाळीतील बैठया गाळयांच्या पुनर्विकासाचा प्रकल्प संयुक्त पुनर्विकास पध्दतीवर राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२८० **दिनांक : १/११/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, सिध्दार्थनगर गोरेगांव सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ६७२ गाळयांनी व्यापलेली सुमारे ४० एकर जमिनीपैकी १० एकर निव्वळ जमीन (१३.१८ एकर ढोबळ) शासनाच्या ठराव क्र. एचएसजी/३३८१/४११८१/१३१३/का.१० दि. ८.२.१९८८ नुसार संस्थेस वितरीत करण्यात येऊन उर्वरीत २६.८२ एकरवर संस्थेने नेमलेला विकासक , सहकारी गृहनिर्माण संस्था व म्हाडा यांच्यात संयुक्त प्रकल्प (Joint Venture) राबविण्यास खालील अटी व शर्तींवर मान्यता देण्यांत येत आहे.

१. उपरोक्त विकास प्रस्ताव हा या पूर्वी शासनाने मंजूर केलेल्या १९८८ च्या शासन निर्णयातील तरतूदी कायम ठेऊन राबविण्यांत यावयाचा आहे. त्या व्यतिरिक्त सदर प्रस्ताव हा म्हाडा , सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी संस्थेने नेमलेला विकासक यांच्यातर्फे Joint Venture पध्दतीने राबविण्यात यावा.

२. सदर प्रकल्पात अंतर्भूत असलेल्या एकूण ४० एकर जमिनीचा विकास करताना प्रचलित विकास नियंत्रण नियमानुसार उपलब्ध असलेल्या चटईक्षेत्रानुसार उपलब्ध होणारे बांधकाम क्षेत्रफळ जास्तीत जास्त वापरणेस संस्था व त्यांनी नेमलेल्या विकासकावर बंधनकारक राहील.

३. बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.९ मधील अ ते न येथील सर्व गृहतीकांना मान्यता देण्यांत आली.

४. सदर प्रस्तावात जमीन व बांधकाम क्षेत्र विभागून म्हाडाच्या हिस्स्याची जमीन व बांधकाम क्षेत्र म्हाडास विनामूल्य प्राप्त होणेबाबत प्रस्तावित असल्यामुळे, नियमानुसार जमिनीचे अधिमूल्य अधिकचे आकारण्यात येऊ नये.

५. बांधकामाच्या काळात सध्याचे गाळेधारकांच्या पर्यायी जागेची व्यवस्था संस्थेलाच करावी लागेल.

६. ६७२ गाळे तोडण्याचा खर्च सर्वस्वी संस्थेलाच करावा लागेल. गाळे तोडण्यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून होणार नाही.

७. संस्थेच्या सर्व ६७२ सभासदांना (मंडळाच्या भाडेकरुंना) नवीन इमारतीमध्ये मालकी तत्वावर सामावून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

८. प्रस्तावित प्रकल्पांचे आराखडे म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाखाली तयार करण्यांत यावे व ते म्हाडामार्फत मुंबई महानगर पालिकेस सादर करण्यांत यांवे. प्रकल्पास प्रारंभ प्रमाणपत्र (कमेंसमेंट सर्टिफीकेट), म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाने प्राप्त करुन घ्यावे.

९. प्रकल्पाच्या आराखडयांवर म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती स्वतंत्रपणे व स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात, तसेच चटईक्षेत्रासंबंधीची आकडेमोड स्वतंत्रपणे दर्शविण्यांत यावी.

१०. म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती यांचे स्पेसिफिकेशन सारखेच असावेत.

११. मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांच्या ना हरकत प्रमाणपत्राशिवाय विकासकास त्यांच्या हिस्स्याच्या इमारतींचे विक्री खत / अभिहस्तांतरण (Sale deed/Conveyance deed) करता येणार नाही.

१२. स्थानिक प्राधिकरणाकडून इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफीकेट) प्राप्त करण्यापूर्वी मा. उपाध्यक्ष/म्हाडाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

१३. कोणत्याही त्रयस्थ व्यक्तींशी विक्री खत अथवा हस्तांतरण पत्र करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष / म्हाडाकडून पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन घ्यावा लागेल.

१४. विकासकाने सदर करारनाम्याच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आंत बांधकामास सुरुवात करावी व याच तारखेपासून ३६ महिन्याच्या आंत बांधकाम सर्व बाबतीत पूर्ण करावे.

१५. कोणत्याही अकल्पीत परिस्थितीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जादा वेळेची आवश्यकता असल्यास याबाबत मा. उपाध्यक्ष/म्हाडा निर्णय घेतील. जर

मुदतवाढ देण्यांत आलेली नसेल, तर मुळ वेळापत्रक प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी गृहीत धरण्यात येईल.

१६. एकूण बांधकामापैकी ५०% बांधकाम १८ महिने कालावधीत तर संपूर्ण बांधकाम ३६ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१७. प्रस्तावित बांधकामाचे भू अभिन्यास, बांधकाम नकाशे, इलेवेशन, तसेच स्पेसीफीकेशन इत्यादी बाबी मा. उपाध्यक्ष म्हाडाकडून बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी मंजूर करुन घ्यावे.

१८. म्हाडाच्या इमारतींच्या बांधकामावर देखरेख करण्यासाठी मा. उपाध्यक्ष/म्हाडा ''प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची'' (PMC) नेमणूक करतील व त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार / शिफारसीनुसार विकासकाने बांधकाम पूर्ण करावे.

१९. जर बांधकाम वरील अटी व शर्तीनुसार पूर्ण न झाल्यास व म्हाडाच्या हिस्स्याचे बांधकाम म्हाडास हस्तांतरीत न केल्यास, सदर करारनामा रद्द करण्याचा हक्क मा. उपाध्यक्ष/म्हाडा राखून ठेवत आहे व अशा परिस्थितीत जमिनीचा ताबा परत घेण्यांत येईल. उर्वरीत बांधकाम म्हाडातर्फे विकासकाच्या खर्च व जोखिमेवरती (Cost & Risk) करण्यांत येईल व याबाबत कोणत्याही खर्चाची पूर्तता म्हाडा देणार नाही. करारनामा रद्द करण्यापूर्वी विकासकास ३० दिवसांची सूचना देण्यांत येईल.

२०. सदर प्रकल्पाबाबतची बांधकामाची कार्यवाही, पूर्णत्वाची, तसेच स्पेसीफीकेशन प्रमाणे दर्जाबाबतची जबाबदारी याबाबत विकासकाची बांधिलकी व जोखिम असेल व याबाबत तसे क्षतीपूर्तीबंध पत्र विकासक म्हाडाकडे सादर करेल.

२१. प्रकल्पाची प्रगती तसेच दर्जा याबाबत शहानिशा करण्यासाठी म्हाडाचे अधिकारी वेळोवेळी जागेस भेट देतील.

२२. विकासक म्हाडाच्या अधिका-यांना जागा पाहणीच्या वेळी सर्व आवश्यक सहाय्य करेल. तसेच परिक्षणाचे नमूने निवडण्याबाबत सर्व आवश्यक सहाय्य करेल.

२३. सर्व गाळयांचे विक्रीखत उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांच्यातर्फे नियुक्त केलेले म्हाडाचे अधिकारी व विकासकाचे अधिकृत प्रतिनिधी यांच्यातर्फे संयुक्तरित्या करण्यांत येईल.

२४. विकासक विषयांकीत प्रकल्पाखालील मिळकत तारणापोटी कांही बांधकाम कर्ज उभे करणार असल्यास, त्याबाबत त्यांनी मा. उपाध्यक्ष / म्हाडाची आगाऊ मान्यता घ्यावी.

२५. जमिनीच्या विकासाची परवानगी देण्याअगोदर ६७२ गाळेधारकांकडून मंडळाला देय असलेली भाडयाची संपूर्ण थकबाकी संस्थेला मंडळाकडे एकरकमी अदा करावी लागेल.

२६. अशा रितीने संस्थेस जमीन दिल्यानंतर सध्याच्या ६७२ भाडेकरुंना उपलब्ध होणा-या सदनिका विक्री / हस्तांतरीत करण्यास पहिली १० वर्ष म्हाडाची परवानगी मिळणार नाही. त्यानंतर रितसर परवानगी घेऊन म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार गाळे हस्तांतरणाची कार्यवाही करावी लागेल.

२७. ६७२ गाळयांच्या पुनर्वसन योजनेनुसार संस्थेस ६७२ गाळयांची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने संपूर्ण ४० एकर वरील योजनेत आवश्यकतेनुसार व टप्प्याटप्प्याने सुरवातीला संस्थेबरोबर ''परवाना करारनामा'' (license Agreement) करण्यांत यावा. पुनर्वसन व विक्री गाळयांच्या पुनर्बाधणीनंतर संस्थेची सर्व थकबाकी वसुल झाली असल्यास, पुनर्बांधणीनंतर म्हाडाबरोबर सिध्दार्थनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेला तसेच नवीन विक्रीचे गाळे खरेदी करणा-या लाभधारकांच्या गृहनिर्माण संस्थेला लीजडीड करावे लागेल तसेच भाडेकरुंना द्यावयाचे व विक्रीचे गाळे मालकी तत्वावर वितरीत करावे लागतील.

२८. पुर्नविकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संस्था, म्हाडा व संस्थेने नेमलेला विकासक यांच्यात त्रिपक्षीय करारनामा करण्यांत यावा. तत्पूर्वी प्रस्तावाप्रमाणे म्हाडाला देय असलेली रक्कम संस्थेने भरणे आवश्यक आहे.

२९. प्रकल्प राबविताना सभासद/विकासक/संस्था यांचेमध्ये कोणत्याही प्रकारचा तंटा / वाद निर्माण झाल्यास किंवा तत्सम स्वरुपाचे कोणतेही न्यायालयीन विवाद निर्माण झाल्यास सदर प्रकरणाबाबतची संपूर्ण जबाबदारी संस्था व संस्थेने नेमलेल्या विकासकावर राहील. तसेच कायदेशीर बाबींना अधीन राहून प्रकल्प पूर्तीच्या दृष्टीने आवश्यकता असल्यास म्हाडामार्फत सहाय्य करण्यांत येईल.

३०. म्हाडास विनामूल्य उपलब्ध होणा-या क्षेत्रफळात सध्या अस्तित्वात असलेल्या संक्रमण गाळयांचे क्षेत्रफळ अंतर्भूत असून पुनर्बांधणी केलेले २२५.०० चौ.फूट चटई क्षेत्रफळाचे गाळे म्हाडाला प्राधान्याने हस्तांतरीत करावे. म्हाडाला उपलब्ध करुन द्यावयाच्या चटई क्षेत्रामध्ये संक्रमण गाळयांसाठी सुमारे १०५२५ चौ.मी. क्षेत्राचा अंतर्भाव असेल.

३१. प्रकल्पास आवश्यक असणा-या सर्व सोई सुविधा (infrastructure) या मुंबई महानगर पालिकेने मान्य केल्यानुसार स्वखर्चाने पुरविण्याची जबाबदारी विकासकावर राहील.

३२. म्हाडास उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे निवासी वापरासाठीच वापरण्यांत यावे. म्हाडाला प्राप्त होणा-या विनामूल्य बांधकाम क्षेत्रफळात प्राप्त होणारे निवासी गाळे, त्याचे क्षेत्रफळ व प्रकार ठरविणे, योजनेत प्राप्त होणारे क्षेत्रफळ अंतीमतः ठरविणे, तसेच तांत्रिक व इतर बाबतच्या अटी व शर्ती ठरविण्याचे व संयुक्त प्रकल्प यशस्वीरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने वेळोवेळी निर्णय घेण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांत यावे.

३३ संस्थेच्या वाटयास येणा-या ५० टक्के बांधकामक्षेत्राचा वापर अनिवासी करण्यास मान्यता देण्यांत यावी. यास अधिकचे अधिमूल्य आकारण्यात येऊ नये .

३४. प्रकल्पात ५०:५० या तत्वावर बांधकाम क्षेत्राच्या विभागणीचा प्रस्ताव असल्यामुळे जमिनीसाठी प्राधिकरणाच्या दि. ४.६.०६ च्या ठराव क्र. ६२६० मधील इतर आकारणी लागू रहाणार नाही.

३५. म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार वार्षिक भुईभाडे आकारण्यांत यावे व त्याची वसुली गाळे हस्तांतरणापूर्वी करण्यांत यावी.

३६. म्हाडास विनामूल्य उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे योजनेतील क्षेत्र मालमत्ता पत्रके, मुंबई महानगर पालिकेची मंजूरी, सर्वेक्षण, जागेवरील हद्द निश्चिती इत्यादी बाबींवर अवलंबून राहील. बाब टिपण्णीतील परिच्छेद क्र.९-न मधील मधील तत्वानुसार अंतीम क्षेत्रफळ निश्चित केले जाईल.

३७. म्हाडा, विकासक, तसेच संस्थेचे पुनर्विकासाचे गाळे यांचे बांधकाम हे एकूण बांधकामाच्या प्रमाणात ठरविण्यात यावे.

३८. इतर आवश्यक अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांत यावे.

३९. उपरोक्त अटी व शर्तीशिवाय म्हाडाच्या जमीन वितरणाच्या इतर सर्वसाधारण अटी सहकारी संस्था व संस्थेने नेमलेल्या विकासकावर बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे प्रस्तावास प्राधिकरणाने मंजूरी दिली व सदर प्रस्ताव त्यातील शिफारशींसह शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : २२५/११

विषय : म्हाड अधिनियम कलम ८८ (३) अ अन्वये २८ इमारतींकरिता प्रमाणपत्र जारी करणे, तसेच म्हाड अधिनियम कलम ८८ (३) अ अंतर्गत प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी समिती गठित करुन सदर समितीला अधिकार प्रदान करणेबाबत .

ठराव क्रमांक : ६२८१ दिनांक : १/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या म्हाड अधिनियम कलम ८८ (३) अ अंतर्गत खालील २८ इमारतीं दुरुस्ती पलिकडे / धोकादायक घोषित करण्याबाबत प्रमाणपत्र जारी करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

म्हाड अधिनियम कलम ८८(३)अ अन्वये प्रमाणपत्र जारी करणेबाबतचे २८ इमारती

अ. क्र	इमारतीचे नाव व पत्ता	विभाग	मजल्यांची संख्या	उपकर क्रं/ वर्ग	रहिवाशी			दुरुस्तीचा दर प्रती चौ.मी.	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी.
					निवासी	अनिवासी	एकूण		
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	इमारत क्रमांक २४८ नागदेवी स्टिट, ब विभाग मुंबई (उपकर क्रं.२२२)या इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८(३)अ अन्वये प्रमाणपत्र जारी करणेबाबत.	ब	तळ +२ व अंशता ३	ब- २२२, अ	६	१	७	७९०९.७०	२८७.००
२	ईमारत क्रमांक ८८-१०२,खेतवाडी बॅक रोड, अरब बिल्डींग या इमारतीस म्हाडा अधिनियमांतर्गत कलम ८८ (३)अ अन्वये प्रमाणपत्र जारी करणेबाबत.	डी२	तळ +१	डी२१३८ (१-४), अ व क	२७+१	२१	४९	३२६५.५२	१३०९.०३
३	ईमारत क्रमांक ३३०-३३२-	फग/	तळ + २	जी.एन	२५+४	१०	३९	२३१५	१३५८.२५

	३३४-३३८,३४०-३४२ व ३४४ अब्दुल रेहमान बिल्डींग,एन.सी.केळकर मार्ग,दादर (प),मुंबई या इमारतीस ८८(३)अ अन्वये दयावयाचे प्रमाणपत्र	उत्तर		४१८८ (क)					
४	ईमारत क्रमांक २५६-इ,शिवाई सेवा टस्ट,उपकर कं.ग/ उ - ४२२०(६व९), एन.सी.केळकर मार्ग,दादर (प),मुंबई या इमारतीस ८८(३)अ अन्वये प्रमाणपत्र जारी करणेबाबत.	ग/ऊ	तळ +१	४४२० (६व ९) अ	--	३८	३८	२४३३	८७
५	ईमारत क्रमांक ३७,सदाशिव क्रॉस लेन दोशी भवन,गिरगाव मुंबई ४०० ००४ या इमारतीस ८८ (३)अ अन्वये प्रमाणपत्र जारी करणेबाबत.	डी - १	तळ+ २	डी-९२९ (२) / अ	६	२	८	५२२४.०७	१८५
६	ईमारत क्रमांक३५,सदाशिव क्रॉस लेन दोशी भवन,गिरगाव मुंबई ४०० ००४ या इमारतीस ८८(३)अ अन्वये प्रमाणपत्र जारी करणेबाबत.	डी - १	तळ+३	डी-९२९ (१) / अ	४	--	४	५१३०.१६	३५४
७	ईमारत क्रमांक २६-अ,सदानंद निवास,परळगांव परळ मुंबई ४०० ०१२ या इमारतीच्या ८८(३)अ अन्वये प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत..	फग/ द	तळ+१	फ/द २५४७(२) अ	१	१	२	२५८३.४८	२७९
८	ईमारत क्रमांक ६ मोरी रोड,अंतिम भुखंड क्रं.८४० श.लि.यो.३ उपकर फग/उत्तर ६००० (२) माहीम,मुंबई ४०० ०१६ येथील जहांगीर लॉज व सोना लॉज नावाने ओळखल्या जाणा-या इमारतस म्हाड अधिनियम ८८(३) अ अन्वये दयावयाचे प्रमाणपत्र	फग /उ	तळ+ १	फग/उ ६०००(२) अ	४ ९	-- १	१४	१५७७.५५	५४२
९	ईमारत क्रमांक ७८ ए.बी.सी.फॉकलंड रोड कल्याण बिल्डींग मुंबई ४०० ००७ या इमारतीस ८८(३)अ अन्वये	उी २	अे विंग तळ +५ , बी विंग तळ +४,	४३०२-०३,४३०४-०६,४३०७-०९/ अ	१८८	२४	२१२	१७७१	५५।

	प्रमाणपत्र जारी करणेबाबत.		सि विंग तळ + ४						
१०	ईमारत क्रमांक २०-२२ जेल रोड,भायखळा,मुंबई उपकर क्र.४०९३ (१ई)इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत प्रस्ताव	ई	तळ +१+२ अंशता	४०९३(ई) / अ	१०	६	१६	२१८३.३६	८४९.२४
११	४८, अकोलावाला, बिल्डींग डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,लालबाग,मुंबई इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत	ई	तळ+३	७६६३(२) / ७९१ अ	५१	--	५१	२६०४.७२	११७९.४४
१२	५०-५८ अकोलावाला बिल्डींग डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड लालबाग,मुंबई इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	ई	तळ+३+४	७६६३(क) / अ	२७	७	३४	२२०६.९६	११३१.०९
१३	ईमारत क्रमांक ३९-४१ म्हातारपाखडी रोड माझगांव मुंबई या उपकर इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	ई	तळ+१	५५८३/१ / अ	८	२	१०	२२१७.००	१०४४.४८
१४	बाझ, बिल्डींग १७१ खेतवाडी बॅक रोड माझगांव मुंबई ०४ या इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	डी२	तळ+ ३	डी-२०७७(१)/ अ	२५	--	२५	२२१८	१२३७.४८
१५	बाना, बिल्डींग १७९-१८१ खेतवाडी बॅक रोड माझगांव मुंबई ०४ या इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	डी२	तळ+ ४+५	डी-२०७७(१ अ) व २०७७ (२) / अ	११	१	१२	१४२५.१४	१४४१.५९
१६	रांगणेकर बिल्डींग १७७ खेतवाडी बॅक रोड माझगांव मुंबई ०४ या इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	डी२	तळ+ ३	डी-२०७७(१अे) / अ	११	१	१२	२२००	१२५५.८०
१७	ईमारत क्रमांक ७६,रमा निवास उपकर क्र.जी/एन ४६७२ (२-	फग/ उ	तळ+२+३ अंशता	जीएन ४६७२ (२ - ३) / अ	१४	--	१४	१७३६.६०	७२९.१७

	३)रानडे रोड,दादर पश्चीम,मुंबईया इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.								
१८	ईमारत क्रमांक ८७ टेमकर स्टिट,नागपाडा,मुंबइ८ या इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	ई	तळ +४	इ-१०८, अ	१०	--	१०	४४९९.४०	३६
१९	ईमारत क्रमांक९,बाबुलनाथ आश्रम,प्लॅनेट मिल लेन,लोअर परेल,मुंबई-१३ या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	ग/द	तळ+२	२०९९(४) / अ	५४	२	५६	१४०८.८७	१००२
२०	ईमारत क्रमांक १७, टेमकर स्टिट,नागपाडा,मुंबइ८ या इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	इ	तळ+३	इ१०८ अ	१०	१	११	४४९९.४०	३६७
२१	ईमारत क्रमांक ४ मोहसिन बिल्डींग अंतिम भुखंड क्रं.८८ उपकर क्रं.जी एन ४१८८ (१अअ) आर.के.वैदय मार्ग,दादर (प) मुंबई या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	फग/ उ	तळ +२	गऊ ४१८८ (१अ.अ)/ अ	४७	६	५३	१६०९.७५	११३१
२२	इमारत क्रमांक ३४६ -३६४ हाजी कासम चाळ महादेव पालव मार्ग,करी रोड,मुंबई १२ या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	फग/ द	तळ + ३	फ/द ११८(१) अ	३१	१०	४१	१७०५.६२	१४३१
२३	इमारत क्रमांक ५५ अ हाजी	फग/	तळ + ३	फ /द २९८	६३	९	७२	१५३९.३८	१७०८

	कासम चाळ महादेव पालव मार्ग,करी रोड,मुंबई १२ या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	द		(२-२अ) अ					
२४	इमारत क्रमांक ५९-६०अ हाजी कासम चाळ महादेव पालव मार्ग,करी रोड,मुंबई १२ या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	फग/ द	तळ + ३	फ / द ३०२-३०३(१-२) अ	१५८ २	१० ८	१७८	१६८१.६०	३९१९.३७
२५	इमारत क्रमांक ३६८-३८६ हाजी कासम चाळ डॉ.बी.ए.रोड लालबाग मुंबई १२ या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	फग/ द	तळ + ३	फा/द ११५(२) ११७ (१-२) अ	३०	१०	४०	१६४७.२७	१६०२.५८
२६	इमारत क्रमांक ३६८-अे आणी बी हाजी कासम चाळ डॉ.बी.ए.रोड लालबाग मुंबई १२ या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८(३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	फग/ द	तळ + ३	फा/द ११६ (१) व ११६ (३) अ	१३१	४	१३५	१७२९.२४	३१२७.८५
२७	इमारत क्रमांक ३६४ अे आणी बी हाजी कासम चाळ डॉ.बी.ए.रोड लालबाग मुंबई १२ या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८ (३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	फग/ द	तळ + ३	फा/द ११६(४) व ११६(२) अ	अे ५१ बी ११३	२ ३	१६९	१५९५.२६	४०६३.४४
२८	इमारत क्रमांक ३०९- ३१९ नुर मोहम्मद बिल्डींग रामभाऊ भोगले मार्ग मुंबई ४०० ०१० या उपकरप्राप्त इमारतीस म्हाड अधिनियम ८८ (३)अ नुसार प्रमाणपत्र देण्याबाबत.	ई	तळ + २	ई७७२२ अ	१२	८	२०	२१२९.६८	६८१.००

वरील इमारत म्हाड अधिनियम कलम ८८ (३) अ अन्वये घोषित केल्यानंतर इमारतीचा पुनर्विकास खाजगी विकासकामार्फत विकास नियंत्रण नियमावली कलम ३३ (७) अन्वये करावयाचे निश्चित झाल्यावर भाडेकरु / रहिवाशी / अनिवासी गाळेधारक यांची यादी शासनाच्या दिनांक २५/०१/१९९९ च्या आदेशास अधिन राहून मुख्य अधिकारी / मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी प्रथम प्रमाणित करावी व तद्नंतरच पुनर्विकासाची परवानगी देण्यात यावी यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थाईकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : २२५/१२

**विषय : इमारत क्र.६७४ - ६७४अे, ना.म.जोशी मार्ग
" ई " विभाग भुकर क्र.१८१३ भायखळा विभाग,
येथील पुनर्बांधणी योजना. ठेकेदार मे.संजय कन्स्ट्रक्शन
यांच्या वरील कलम ३ (सी) नुसार केलेली कारवाई
रद्द करुन कलम ३ (ए) नुसार करणेबाबत.**

ठराव क्रमांक : ६२८२ **दिनांक : १/११/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, इमारत क्र.६७४ - ६७४अे, ना.म.जोशी मार्ग " ई " विभाग भुकर क्र.१८१३ भायखळा विभाग, येथील पुनर्बांधणी योजनेच्या कामाचे ठेकेदार मे.संजय कन्स्ट्रक्शन यांच्या वरील कलम ३ (सी) नुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने केलेल्या कारवाईस मंजरी देण्यात येते.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २२.११.२००७ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेल्या २२६ व्या बैठकीचे कार्यवृत्त.

बाब क्रमांक : २२६/२

विषय :- कावेसर घोडबंदर रोड, ठाणे येथील जमिनीचे स्विस चॅलेंज मेथडवर आधारित म्हाडा व विकासक यांनी संयुक्तरित्या विकास प्रकल्प राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२८३ **दिनांक : २२/११/२००७**

एकमताने निर्णय घेतला कीं, स्वीस चॅलेज मेथड अंतर्गत जाहिरातीद्वारे मागविण्यात आलेल्या निविदा व सुधारीत देकारानुसार पुढील प्रस्तावास खालील अटी व शर्तीसह मंजूरी देण्यात येत आहे.

अ) कावेसर, ठाणे येथील स.क्र. १६६ (हि) १५पै, १६ पै ,२६ ते २८व ३२ ते ३४ पै येथील सुमारे ०.६७७ हेक्टर जमिनीवर म्हाडा व विकासक मे. गुरुकृपा डेव्हलपर्स यांच्या द्वारे संयुक्त विकास प्रकल्प राबविण्यास संमती देण्यात येत आहे.

ब) सदर प्रकल्पामध्ये अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक १.२० अधिक ०.८० टि.डी.आर. वापरुन मिळणाऱ्या एकुण बांधकाम क्षेत्रफळापैकी म्हाडास ३५.५०% निव्वळ रहिवाशी वापराकरीता व विकासकास ६४.५०% बांधकाम क्षेत्र देण्यास संमती देण्यात येत आहे.
क) सदरच्या प्रकल्पामध्ये खाजगी विकासकास टि.डी.आर. वापरासाठी विनामुल्य परवानगी देण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

ड) वरीलबाबत आवश्यक करार करण्यासाठी मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

ई) प्रकल्पाचा कालबध्द कार्यक्रम तयार करण्याबाबत मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी आवश्यक कार्यवाही निविदेतील अटीस अधिन राहुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

फ) निविदेतील अटी व शर्तीनुसार विकासकाच्या वाट्यास येणाऱ्या चटईक्षेत्राचा वापर अनिवासी करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. यास अधिकचे अधिमुल्य प्राधिकरणाच्या धोरणानुसार आकारण्यात येऊ नये, असे ठरले.

अटीः-

१. प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने म्हाडा व विकासक यांच्यात करारनामा करण्यात यावा. याकरीता मा. उपाध्यक्ष /प्राधिकरण ठरविल त्या दराने सुरक्षा अनामत रक्कमत विकासकास ठेवावी लागेल.

२. प्रस्तावित प्रकल्पांचे आराखडे म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाखाली तयार करण्यात यावे व ते म्हाडा मार्फत संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करण्यात यावे. प्रकल्पास प्रारंभ प्रमाणपत्र (कमेंसमेंट सर्टिफीकेट) म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाने प्राप्त करुन घ्यावे.

३. प्रकल्पाच्या आराखड्यांवर म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती स्वतंत्रपणे व स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात, तसेच चटईक्षेत्रासंबंधीची आकडेमोड स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावी.

४. म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती यांचे स्पेसिफिकेशन सारखेच असावेत.

५. सदर प्रस्तावात जमिन व बांधकाम क्षेत्र विभागून म्हाडाच्या हिस्याची जमिन व बांधकाम क्षेत्र म्हाडास विनामुल्य प्राप्त होणेबाबत प्रस्तावित असल्यामुळे नियमानूसार जमिनीचे अधिमुल्य अधिकचे आकारण्यात येऊ नये.

६. मुख्य अधिकारी/कोंकण मंडळ यांच्या पूर्व परवानगी शिवाय विकासकास त्यांच्या हिस्स्याच्या इमारतींचे विक्रीखत / अभिहस्तांतरण (Sale Deed / Conveyance Deed) करता येणार नाही.

७. स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफीकेट) प्राप्त करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष / म्हाडा यांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

८. विकासकाने कोणत्याही त्रयस्त व्यक्तीशी विक्रीखत अथवा हस्तांतरण पत्र करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष/ म्हाडाकडून पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन घ्यावा लागेल.

९. विकासकाने सदर करारनाम्याच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आत बांधकामास सुरुवात करावी व याच तारखेपासून ३० महिन्याच्या आत बांधकाम सर्व बाबतीत पूर्ण करावे.

१०. कोणत्याही अकल्पीत परिस्थितीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जादा वेळेची आवश्यकता असल्यास याबाबत उपाध्यक्ष /म्हाडा निर्णय घेतील. जर मुदतवाढ देण्यात आलेली नसेल, तर मुळ वेळापत्रक प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी गृहीत धरण्यात येईल.

११. एकुण बांधकामापैकी ५०% बांधकाम १८ महिने कालावधीत तर संपूर्ण बांधकाम ३० महिन्याच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१२. प्रस्तावित बांधकामाचे भू अभिन्यास, बांधकाम नकाशे, इलेवेशन, तसेच स्पेसीफीकेशन इत्यादीबाबी मा. उपाध्यक्ष /म्हाडा यांच्या कडून बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी मंजूर करुन घ्यावे.

१३. म्हाडाच्या इमारतींच्या बांधकामावर देखरेख करण्यासाठी उपाध्यक्ष /म्हाडा ''प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची '' (P.M.C.) नेमणूक करतील. व त्यांनी दिलेल्या सुचने नुसार / शिफारसीनुसार विकासकाने बांधकाम पूर्ण करावे.

१४. जर बांधकाम वरील अटी व शर्तीनुसार पूर्ण न झाल्यास व म्हाडाच्या हिस्याचे बांधकाम म्हाडास हस्तांतरीत न केल्यास सदर करारनामा रद्द करण्याचा हक्क मा. उपाध्यक्ष /म्हाडा राखून ठेवत आहे. व अशा परिस्थितीत जमिनीचा ताबा परत घेण्यात येईल. उर्वरीत बांधकाम म्हाडातर्फे विकासकाच्या खर्च व जोखिमेवर (Cost & Risk) करण्यात येईल. व याबाबत कोणत्याही खर्चाची पूर्तता म्हाडा देणार नाही व विकासक कोणताही दावा करु शकणार नाही. करारनामा रद्द करण्यापूर्वी विकासकास ३० दिवसाची सूचना देण्यात येईल.

१५. योजनेत अवश्यकतेनुसार व टप्प्या टप्प्याने सुरुवातीला विकासकाबरोबर परवाना करारनामा (Licence Agreement) करण्यात येईल. बांधकामानंतर लाभधारकांच्या गृहनिर्माण संस्थेला म्हाडाबरोबर भाडेपट्टा करारनामा (Lease Deed) करावा लागेल, निविदेतील अटीनुसार नाममात्र वार्षिक भूई भाडे गृहनिर्माण संस्था स्थापन होईपर्यत आकरण्यात येईल व संस्था स्थापन झाल्यावर म्हाडाच्या धोरणानुसार भुई भाडे आकारण्यात येईल.

१६. सदर प्रकल्पाबाबतची बांधकामाची कार्यवाही, पूर्णत्वाची, तसेच स्पेसीफीकेशन प्रमाणे दर्जाबाबतची जबाबदारी याबाबत विकासकाची बांधिलकी व जोखिम असेल व याबाबत तसे क्षतीपूर्तीबंध पत्र विकासक उपाध्यक्ष /म्हाडाकडे सादर करेल.

१७. प्रकल्पाची प्रगती तसेच दर्जा या बाबत शहानिशा करण्यासाठी म्हाडाचे अधिकारी वेळोवेळी जागेस भेट देतील.

१८. विकासक म्हाडाच्या अधिकाऱ्यांना जागा पाहणीच्या वेळी सर्व आवश्यक सहाय्य करेल. तसेच परिक्षणाचे नमूने निवडण्याबाबत सर्व आवश्यक सहाय्य करेल.

१९. सर्व गाळ्याचे विक्रीखत उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांच्यातर्फे नियुक्त केलेले म्हाडाचे अधिकारी व विकासकाचे अधिकृत प्रतिनिधी यांच्यातर्फे संयुक्त रित्या करण्यात येईल.

२०. विकासक विषयांकीत प्रकल्पाखालील मिळकत तारणापोटी काही बांधकाम कर्ज उभे करणार असल्यास त्याबाबत त्यांनी मा.उपाध्यक्ष/म्हाडाची आगाऊ मान्यता घ्यावी.

२१. प्रकल्प राबवितांना कोणत्याही प्रकारचा तंटा / वाद निर्माण झाल्यास किंवा तत्सम स्वरुपाचे न्यायालयीन विवाद निर्माण झाल्यास सदर प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी विकासकावर राहिल. तसेच कायदेशीर बाबींना अधिन राहून प्रकल्प पूर्तीच्या दृष्टीने आवश्यकता असल्यास म्हाडामार्फत सहाय्य करण्यात येईल.मात्र कोणताही आर्थिक बोजा म्हाडावर असणार नाही.

२२. म्हाडास विनामुल्य उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे योजनेतील मालमत्ता पत्रके, स्थानिक नियोजन / प्राधिकरणाची मंजूरी, सर्व्हेक्षण, जागेवरील हद्द निश्चिती इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.व तद्नुसार वर नमूद केलेले क्षेत्रफळ अंतिम करण्यात येईल.

२३. भविष्यामध्ये जादा चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास यावर प्राधिकरणाची मालकी असेल.त्याचे वितरण विकासकास याच तत्वावर करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात यावे.

२४. म्हाडा व विकासक यांचे बांधकाम हे एकुण वरीलप्रमाणे बांधकामाच्या प्रमाणात ठरविणे,गाळ्यांचे क्षेत्रफळ व संख्या ठरविणे, तसेच सर्व तांत्रिक व इतर अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यात यावे.

२५. उपरोक्त अटी व शर्ती शिवाय म्हाडाच्या जमिन वितरणाच्या इतर सर्वसाधारण अटी बंधनकारक राहतील.

२६. वरील सर्व प्रस्ताव हे जनहित याचिका क्र. ७२ /२००७ मधील निर्णयास अधिन राहुन केली जावी.

२७. मा.महा-अधिवक्ता यांनी नोंदविलेल्या मतानुसार संबंधित विकासकाकडून प्रतिज्ञा पत्र घेण्यात यावे.

२८. तसेच या योजनेसाठी भविष्यामध्ये २.५ किंवा त्यापेक्षा जास्त चटईक्षेत्र निर्देशांक शासनाकडून मंजूर झाल्यास अशा जास्तीच्या बांधकाम क्षेत्रापैकी ३५.५० % बांधकाम क्षेत्र म्हाडास विकासकाने मुळ प्रस्तावानुसार विनामुल्य बांधून देण्यात यावे.

२९. प्रकल्पास आवश्यक असणा-या सर्व सोयी सुविधा (Infrastructure) या स्थानिक नियोजन प्राधिकरणाने मान्य केल्यानुसार स्वखर्चाने पुरविण्याची जबाबदारी विकासकावर राहील.

या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कार्यवाही करण्यास एकमताने मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : २२६/३

विषय :- मिरारोड, ठाणे येथील जमिनीचे स्विस चॅलेंज मेथडवर आधारित म्हाडा व विकासक यांनी संयुक्तरित्या विकास प्रकल्प राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२८४ दिनांक : २२/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, स्वीस चॅलेज मेथड अंतर्गत जाहिरातीद्वारे मागविण्यात आलेल्या निविदा व मुळ विकासकाच्या सुधारीत देकारानुसार पुढील प्रस्तावास खालील अटी व शर्तीसह मंजूरी देण्यात येत आहे.

अ) मिरा रोड, ठाणे येथील स.क्र. १५० (हि) १५१ (हि) व २२६ व २३० येथील उर्वरीत सुमारे ३.५५ हेक्टर जमिनीवर म्हाडा व विकासक मे. रवि डेव्हलपमेंट्स यांच्या द्वारे संयुक्त विकास प्रकल्प राबविण्यास संमती देण्यात येत आहे.

ब) सदर प्रकल्पामध्ये अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक १.२० अधिक ०.८० टि.डी.आर. वापरुन मिळणाऱ्या एकुण बांधकाम क्षेत्रफळापैकी म्हाडास ३५.५०% निव्वळ रहिवासी वापराकरीता व विकासकास ६४.५०% बांधकाम क्षेत्र देण्यास संमती देण्यात येत आहे.

क) सदरच्या प्रकल्पामध्ये खाजगी विकासकास टि.डी.आर. वापरासाठी विनामुल्य परवानगी देण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

ड) वरीलबाबत आवश्यक करार करण्यासाठी मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

ई) प्रकल्पाचा कालबध्द कार्यक्रम तयार करण्याबाबत मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी आवश्यक कार्यवाही निविदेतील अटीस अधिन राहुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

फ) निविदेतील अटी व शर्तीनुसार विकासकाच्या वाट्यास येणाऱ्या चटईक्षेत्राचा वापर अनिवासी करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. यास अधिकचे अधिमुल्य प्राधिकरणाच्या धोरणानुसार आकारण्यात येऊ नये, असे ठरले.

अटीः-

१. प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने म्हाडा व विकासक यांच्यात करारनामा करण्यात यावा. याकरीता मा. उपाध्यक्ष /प्राधिकरण ठरविल त्या दराने सुरक्षा अनामत रक्कमत विकासकास ठेवावी लागेल.

२. प्रस्तावित प्रकल्पांचे आराखडे म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाखाली तयार करण्यात यावे व ते म्हाडा मार्फत संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करण्यात यावे. प्रकल्पास प्रारंभ प्रमाणपत्र (कमेंसमेंट सर्टिफीकेट) म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाने प्राप्त करुन घ्यावे.

३. प्रकल्पाच्या आराखड्यांवर म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती स्वतंत्रपणे व स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात, तसेच चटईक्षेत्रासंबंधीची आकडेमोड स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावी.

४. म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती यांचे स्पेसिफिकेशन सारखेच असावेत.

५. सदर प्रस्तावात जमिन व बांधकाम क्षेत्र विभागून म्हाडाच्या हिस्याची जमिन व बांधकाम क्षेत्र म्हाडास विनामुल्य प्राप्त होणेबाबत प्रस्तावित असल्यामुळे नियमानूसार जमिनीचे अधिमुल्य अधिकचे आकारण्यात येऊ नये.

६. मुख्य अधिकारी/कोंकण मंडळ यांच्या पूर्व परवानगी शिवाय विकासकास त्यांच्या हिस्स्याच्या इमारतींचे विक्रीखत / अभिहस्तांतरण (Sale Deed / Conveyance Deed) करता येणार नाही.

७. स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफीकेट) प्राप्त करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष / म्हाडा यांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

८. विकासकाने कोणत्याही त्रयस्त व्यक्तीशी विक्रीखत अथवा हस्तांतरण पत्र करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष/ म्हाडाकडून पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन घ्यावा लागेल.

९. विकासकाने सदर करारनाम्याच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आत बांधकामास सुरुवात करावी व याच तारखेपासून ३० महिन्याच्या आत बांधकाम सर्व बाबतीत पूर्ण करावे.

१०. कोणत्याही अकल्पीत परिस्थितीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जादा वेळेची आवश्यकता असल्यास याबाबत उपाध्यक्ष /म्हाडा निर्णय घेतील. जर मुदतवाढ देण्यात आलेली नसेल, तर मुळ वेळापत्रक प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी गृहीत धरण्यात येईल.

११. एकुण बांधकामापैकी ५०% बांधकाम १८ महिने कालावधीत तर संपूर्ण बांधकाम ३० महिन्याच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१२. प्रस्तावित बांधकामाचे भू अभिन्यास, बांधकाम नकाशे, इलेवेशन, तसेच स्पेसीफीकेशन इत्यादीबाबी मा. उपाध्यक्ष /म्हाडा यांच्या कडून बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी मंजूर करुन घ्यावे.

१३. म्हाडाच्या इमारतींच्या बांधकामावर देखरेख करण्यासाठी उपाध्यक्ष /म्हाडा "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची " (P.M.C.) नेमणूक करतील. व त्यांनी दिलेल्या सुचने नुसार / शिफारसीनुसार विकासकाने बांधकाम पूर्ण करावे.

१४. जर बांधकाम वरील अटी व शर्तीनुसार पूर्ण न झाल्यास व म्हाडाच्या हिस्याचे बांधकाम म्हाडास हस्तांतरीत न केल्यास सदर करारनामा रद्द करण्याचा हक्क मा. उपाध्यक्ष /म्हाडा राखून ठेवत आहे. व अशा परिस्थितीत जमिनीचा ताबा परत घेण्यात येईल. उर्वरीत बांधकाम म्हाडातर्फे विकासकाच्या खर्च व जोखिमेवर (Cost & Risk) करण्यात येईल. व याबाबत कोणत्याही खर्चाची पूर्तता म्हाडा देणार नाही व विकासक कोणताही दावा करु शकणार नाही. करारनामा रद्द करण्यापूर्वी विकासकास ३० दिवसाची सूचना देण्यात येईल.

१५. योजनेत अवश्यकतेनुसार व टप्प्या टप्प्याने सुरुवातीला विकासकाबरोबर परवाना करारनामा (Licence Agreement) करण्यात येईल. बांधकामानंतर लाभधारकांच्या गृहनिर्माण संस्थेला म्हाडाबरोबर भाडेपट्टा करारनामा (Lease Deed) करावा लागेल, निविदेतील अटीनुसार नाममात्र वार्षिक भूई भाडे गृहनिर्माण संस्था स्थापन होईपर्यत आकरण्यात येईल व संस्था स्थापन झाल्यावर म्हाडाच्या धोरणानुसार भुई भाडे आकारण्यात येईल.

१६. सदर प्रकल्पाबाबतची बांधकामाची कार्यवाही, पूर्णत्वाची, तसेच स्पेसीफीकेशन प्रमाणे दर्जाबाबतची जबाबदारी याबाबत विकासकाची बांधिलकी व जोखिम असेल व याबाबत तसे क्षतीपूर्तीबंध पत्र विकासक उपाध्यक्ष /म्हाडाकडे सादर करेल.

१७. प्रकल्पाची प्रगती तसेच दर्जा या बाबत शहानिशा करण्यासाठी म्हाडाचे अधिकारी वेळोवेळी जागेस भेट देतील.

१८. विकासक म्हाडाच्या अधिकाऱ्यांना जागा पाहणीच्या वेळी सर्व आवश्यक सहाय्य करेल. तसेच परिक्षणाचे नमूने निवडण्याबाबत सर्व आवश्यक सहाय्य करेल.

१९. सर्व गाळ्याचे विक्रीखत उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांच्यातर्फे नियुक्त केलेले म्हाडाचे अधिकारी व विकासकाचे अधिकृत प्रतिनिधी यांच्यातर्फे संयुक्त रित्या करण्यात येईल.

२०. विकासक विषयांकीत प्रकल्पाखालील मिळकत तारणापोटी काही बांधकाम कर्ज उभे करणार असल्यास त्याबाबत त्यांनी मा.उपाध्यक्ष / म्हाडाची आगाऊ मान्यता घ्यावी.

२१. प्रकल्प राबवितांना कोणत्याही प्रकारचा तंटा / वाद निर्माण झाल्यास किंवा तत्सम स्वरुपाचे न्यायालयीन विवाद निर्माण झाल्यास सदर प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी विकासकावर राहिल. तसेच कायदेशीर बाबींना अधिन राहून प्रकल्प

पूर्तीच्या दृष्टीने आवश्यकता असल्यास म्हाडामार्फत सहाय्य करण्यात येईल.मात्र कोणताही आर्थिक बोजा म्हाडावर असणार नाही.

२२.म्हाडास विनामुल्य उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे योजनेतील मालमत्ता पत्रके, स्थानिक नियोजन / प्राधिकरणाची मंजूरी, सर्व्हेक्षण, जागेवरील हद्द निश्चिती इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.व तद्नुसार वर नमूद केलेले क्षेत्रफळ अंतिम करण्यात येईल.

२३.भविष्यामध्ये जादा चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास यावर प्राधिकरणाची मालकी असेल.त्याचे वितरण विकासकास याच तत्वावर करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात यावे.

२४. म्हाडा व विकासक यांचे बांधकाम हे एकुण वरीलप्रमाणे बांधकामाच्या प्रमाणात ठरविणे,गाळ्यांचे क्षेत्रफळ व संख्या ठरविणे, तसेच सर्व तांत्रिक व इतर अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यात यावे.

२५. उपरोक्त अटी व शर्ती शिवाय म्हाडाच्या जमिन वितरणाच्या इतर सर्वसाधारण अटी बंधनकारक राहतील.

२६. वरील सर्व प्रस्ताव हे जनहित याचिका क्र. ७२ /२००७ मधील निर्णयास अधिन राहुन केली जावी.

२७.मा.महा-अधिवक्ता यांनी नोंदविलेल्या मतानुसार संबंधित विकासकाकडून प्रतिज्ञा पत्र घेण्यात यावे.

२८. तसेच या योजनेसाठी भविष्यामध्ये २.५ किंवा त्यापेक्षा जास्त चटईक्षेत्र निर्देशांक शासनाकडून मंजूर झाल्यास अशा जास्तीच्या बांधकाम क्षेत्रापैकी ३५.५० % बांधकाम क्षेत्र म्हाडास विकासकाने मुळ प्रस्तावानुसार विनामुल्य बांधून देण्यात यावे.

२९. प्रकल्पास आवश्यक असणा-या सर्व सोयी सुविधा (Infrastructure) या स्थानिक नियोजन प्राधिकरणाने मान्य केल्यानुसार स्वखर्चाने पुरविण्याची जबाबदारी विकासकावर राहील.

या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कार्यवाही करण्यास एकमताने मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : २२६/४

विषय :- चितळसर मानपाडा, ठाणे येथील जमिनीचे स्विस चॅलेंज मेथडवर आधारित म्हाडा व विकासक यांनी संयुक्तरित्या विकास प्रकल्प राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२८५ दिनांक : २२/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, स्वीस चॅलेज मेथड अंतर्गत जाहिरातीद्वारे मागविण्यात आलेल्या निविदा व सुधारीत देकारानुसार पुढील प्रस्तावास खालील अटी व शर्ती सह मंजूरी देण्यात येत आहे.

अ) चितळसर मापनाडा ,ठाणे येथील गट क्र. ५९ येथील सुमारे ४.५४ हेक्टर जमिनीवर म्हाडा व विकासक मे. श्री डेव्हलपर्स यांच्या द्वारे संयुक्त विकास प्रकल्प राबविण्यास संमती देण्यात येत आहे.

ब) सदर प्रकल्पामध्ये अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक १.२० अधिक ०.८० टि.डी.आर. वापरुन मिळणाऱ्या बांधकाम क्षेत्रफळापैकी म्हाडास ३५.५०% व विकासकास ६४.५०% बांधकाम क्षेत्र देण्यास संमती देण्यात येत आहे.

क) सदरच्या प्रकल्पामध्ये खाजगी विकासकास टि.डी.आर. वापरासाठी विनामुल्य परवानगी देण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

ड) वरीलबाबत आवश्यक करार करण्यासाठी मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

ई) प्रकल्पाचा कालबध्द कार्यक्रम तयार करण्याबाबत मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी आवश्यक कार्यवाही निविदेतील अटीस अधिन राहुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

फ) विकासकाच्या वाट्यास येणाऱ्या चटईक्षेत्राचा वापर अनिवासी करण्यास मान्यता देण्यांत यावी. यास अधिकचे अधिमुल्य प्राधिकरणाच्या धोरणानुसार आकारण्यात येऊ नये, असे ठरले.

अटीः-

१. प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने म्हाडा व विकासक यांच्यात करारनामा करण्यात यावा. याकरीता मा. उपाध्यक्ष /प्राधिकरण ठरविल त्या दराने सुरक्षा अनामत रक्कम विकासकास ठेवावी लागेल.

२. प्रस्तावित प्रकल्पांचे आराखडे म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाखाली तयार करण्यात यावे व ते म्हाडा मार्फत संबंधित नियोजन प्राधिकरणास सादर करण्यात यावे. प्रकल्पास प्रारंभ प्रमाणपत्र (कमेंसमेंट सर्टिफीकेट) म्हाडा व विकासक यांच्या संयुक्त नावाने प्राप्त करुन घ्यावे.

३. प्रकल्पाच्या आराखड्यांवर म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती स्वतंत्रपणे व स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात, तसेच चटईक्षेत्रासंबंधीची आकडेमोड स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावी.

४. म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती यांचे स्पेसिफिकेशन सारखेच असावेत.

५. सदर प्रस्तावात जमिन व बांधकाम क्षेत्र विभागून म्हाडाच्या हिस्याची जमिन व बांधकाम क्षेत्र म्हाडास विनामुल्य प्राप्त होणेबाबत प्रस्तावित असल्यामुळे नियमानूसार जमिनीचे अधिमुल्य अधिकचे आकारण्यात येऊ नये.

६. मुख्य अधिकारी/कोंकण मंडळ यांच्या पूर्व परवानगी शिवाय विकासकास त्यांच्या हिस्स्याच्या इमारतींचे विक्रीखत / अभिहस्तांतरण (Sale Deed / Conveyance Deed) करता येणार नाही.

७. स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफीकेट) प्राप्त करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष / म्हाडा यांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

८. विकासकाने कोणत्याही त्रयस्त व्यक्तीशी विक्रीखत अथवा हस्तांतरण पत्र करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष/ म्हाडाकडून पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन घ्यावा लागेल.

९. विकासकाने सदर करारनाम्याच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आत बांधकामास सुरुवात करावी व याच तारखेपासून ३० महिन्याच्या आत बांधकाम सर्व बाबतीत पूर्ण करावे.

१०. कोणत्याही अकल्पीत परिस्थितीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जादा वेळेची आवश्यकता असल्यास याबाबत उपाध्यक्ष /म्हाडा निर्णय घेतील. जर मुदतवाढ देण्यात आलेली नसेल, तर मुळ वेळापत्रक प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी गृहीत धरण्यात येईल.

११. एकुण बांधकामापैकी ५०% बांधकाम १८ महिने कालावधीत तर संपूर्ण बांधकाम ३० महिन्याच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१२. प्रस्तावित बांधकामाचे भू अभिन्यास, बांधकाम नकाशे, इलेवेशन, तसेच स्पेसीफीकेशन इत्यादीबाबी मा. उपाध्यक्ष /म्हाडा यांच्या कडून बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी मंजूर करुन घ्यावे.

१३. म्हाडाच्या इमारतींच्या बांधकामावर देखरेख करण्यासाठी उपाध्यक्ष /म्हाडा ''प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची '' (P.M.C.) नेमणूक करतील. व त्यांनी दिलेल्या सुचने नुसार / शिफारसीनुसार विकासकाने बांधकाम पूर्ण करावे.

१४. जर बांधकाम वरील अटी व शर्तीनुसार पूर्ण न झाल्यास व म्हाडाच्या हिस्याचे बांधकाम म्हाडास हस्तांतरीत न केल्यास सदर करारनामा रद्द करण्याचा हक्क मा. उपाध्यक्ष /म्हाडा राखून ठेवत आहे. व अशा परिस्थितीत जमिनीचा ताबा परत घेण्यात येईल. उर्वरीत बांधकाम म्हाडातर्फे विकासकाच्या खर्च व जोखिमेवर (Cost & Risk) करण्यात येईल. व याबाबत कोणत्याही खर्चाची पूर्तता म्हाडा देणार नाही व विकासक कोणताही दावा करु शकणार नाही. करारनामा रद्द करण्यापूर्वी विकासकास ३० दिवसाची सूचना देण्यात येईल.

१५. योजनेत अवश्यकतेनुसार व टप्प्या टप्प्याने सुरुवातीला विकासकाबरोबर परवाना करारनामा (Licence Agreement) करण्यात येईल. बांधकामानंतर लाभधारकांच्या गृहनिर्माण संस्थेला म्हाडाबरोबर भाडेपट्टा करारनामा (Lease Deed) करावा लागेल, निविदेतील अटीनुसार नाममात्र वार्षिक भूई भाडे गृहनिर्माण संस्था स्थापन होईपर्यत आकरण्यात येईल व संस्था स्थापन झाल्यावर म्हाडाच्या धोरणानुसार भुई भाडे आकारण्यात येईल.

१६. सदर प्रकल्पाबाबतची बांधकामाची कार्यवाही, पूर्णत्वाची, तसेच स्पेसीफीकेशन प्रमाणे दर्जाबाबतची जबाबदारी याबाबत विकासकाची बांधिलकी व जोखिम असेल व याबाबत तसे क्षतीपूर्तीबंध पत्र विकासक उपाध्यक्ष /म्हाडाकडे सादर करेल.

१७. प्रकल्पाची प्रगती तसेच दर्जा या बाबत शहानिशा करण्यासाठी म्हाडाचे अधिकारी वेळोवेळी जागेस भेट देतील.

१८. विकासक म्हाडाच्या अधिकाऱ्यांना जागा पाहणीच्या वेळी सर्व आवश्यक सहाय्य करेल. तसेच परिक्षणाचे नमूने निवडण्याबाबत सर्व आवश्यक सहाय्य करेल.

१९. सर्व गाळ्याचे विक्रीखत उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांच्यातर्फे नियुक्त केलेले म्हाडाचे अधिकारी व विकासकाचे अधिकृत प्रतिनिधी यांच्यातर्फे संयुक्त रित्या करण्यात येईल.

२०. विकासक विषयांकीत प्रकल्पाखालील मिळकत तारणापोटी काही बांधकाम कर्ज उभे करणार असल्यास त्याबाबत त्यांनी मा.उपाध्यक्ष / म्हाडाची आगाऊ मान्यता घ्यावी.

२१. प्रकल्प राबवितांना कोणत्याही प्रकारचा तंटा / वाद निर्माण झाल्यास किंवा तत्सम स्वरुपाचे न्यायालयीन विवाद निर्माण झाल्यास सदर प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी विकासकावर राहिल. तसेच कायदेशीर बाबींना अधिन राहून प्रकल्प पूर्तीच्या दृष्टीने आवश्यकता असल्यास म्हाडामार्फत सहाय्य करण्यात येईल.मात्र कोणताही आर्थिक बोजा म्हाडावर असणार नाही.

२२. म्हाडास विनामुल्य उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे योजनेतील मालमत्ता पत्रके, स्थानिक नियोजन / प्राधिकरणाची मंजूरी, सर्व्हेक्षण, जागेवरील हद्द निश्चिती इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.व तद्नुसार वर नमूद केलेले क्षेत्रफळ अंतिम करण्यात येईल.

२३. भविष्यामध्ये जादा चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास यावर प्राधिकरणाची मालकी असेल.त्याचे वितरण विकासकास याच तत्वावर करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात यावे.

२४. म्हाडा व विकासक यांचे बांधकाम हे एकुण वरीलप्रमाणे बांधकामाच्या प्रमाणात ठरविणे,गाळ्यांचे क्षेत्रफळ व संख्या ठरविणे, तसेच सर्व तांत्रिक व इतर अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यात यावे.

२५. उपरोक्त अटी व शर्ती शिवाय म्हाडाच्या जमिन वितरणाच्या इतर सर्वसाधारण अटी बंधनकारक राहतील.

२६. वरील सर्व प्रस्ताव हे जनहित याचिका क्र. ७२ /२००७ मधील निर्णयास अधिन राहुन केली जावी.
२७. मा.महा-अधिवक्ता यांनी नोंदविलेल्या मतानुसार संबंधित विकासकाकडून प्रतिज्ञा पत्र घेण्यात यावे.

२८. तसेच या योजनेसाठी भविष्यामध्ये २.५ किंवा त्यापेक्षा जास्त चटईक्षेत्र निर्देशांक शासनाकडून मंजूर झाल्यास अशा जास्तीच्या बांधकाम क्षेत्रापैकी ३५.५० % बांधकाम क्षेत्र म्हाडास विकासकाने मुळ प्रस्तावानुसार विनामुल्य बांधून देण्यात यावे.

२९. प्रकल्पास आवश्यक असणा-या सर्व सोयी सुविधा (Infrastructure) या स्थानिक नियोजन प्राधिकरणाने मान्य केल्यानुसार स्वखर्चाने पुरविण्याची जबाबदारी विकासकावर राहील.

या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कार्यवाही करण्यास एकमताने मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : २२६/६

विषय :- आरामनगर वर्सोवा या वसाहतीतील ३५७ गाळयांच्या व त्या लगतच्या जमिनीचा पुनर्विकासाचा प्रकल्प '' संयुक्त पुनर्विकास योजना '' तत्वावर राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२८६ दिनांक : २२/११/२००७

एकमताने निर्णय घेतला कीं, आरामनगर वर्सोवा येथील पुनर्बांधणीचा प्रस्ताव आरामनगर टेनन्टस् वेल्फेअर असोसिएशन, असोसिएशनने नेमलेल्या विकासक मे. इस्ट ॲन्ड वेस्ट बिल्डर्स व म्हाडा यांच्या संयुक्त प्रकल्पाव्दारे Joint Venture खालील अटी व शर्तींवर राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

- विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील कलम ३३ (५)मधील तरतूदीनुसार १.२ चटईक्षेत्र गृहीत धरुन आकडेमोड केली आहे. तथापि मुंबई महानगर पालिकेच्या सीआरझेड विभागाकडून अशी परवानगी प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी विकासकावर राहील. तसेच पुनर्बांधणी प्रकल्पात अभिप्रेत असलेली ३३(५) मधील गृहनिर्माणाची विभागणी जसे की, ६०% एलआयजी व ४०% एमआयजी/एचआयजी हे प्रमाण कायम ठेवण्याची खात्री टेनन्टस् असोसिएशनने व त्यांच्या विकासकाने करावी. अन्यथः नेहमीच्या अनुज्ञेय चटई क्षेत्रानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येते.
- बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.६ मधील १ ते ८ येथील सर्व गृहतीकांना मान्यता देण्यांत येते ती खालीलप्रमाणे आहेत.

१. बांधकामाच्या खर्चाचा मूळ दर रु. १५,०००/- प्रति चौ.मि.

२. संस्थेच्या ३५७ सदस्यांना प्रत्येकी द्यावयाचे बांधकाम क्षेत्रफळ ११५ चौ.मी. चटईक्षेत्र + ३० % = १४९.५ चौ.मी. (३५७ गाळयांसाठी).

३. उर्वरित चटईक्षेत्र पैकी काहीं गाळयांची बाजारभावाने विक्री करुन त्याद्वारे एकूण प्रकल्पाचा खर्च वळता करुन देण्यासाठी बांधकाम क्षेत्र विकासकास विनामुल्य देणे.

४. वरील अ.क्र.२ व ३ मधील बांधकाम क्षेत्र विकासकास विनामुल्य देऊन प्रकल्प खर्च वसुल झाल्यावर जे उर्वरित बांधकाम खुल्या बाजारात

विकावयाचे आहे त्याची विभागणी म्हाडा व विकासक यांना ५०:५० % या प्रमाणात करणे.

५.म्हाडाला प्राप्त होणारे बांधकाम म्हाडाने ठरविलेल्या स्पेसिफिकेशननुसार विकासकाने विनामुलय करुन द्यावे. सोबत परिशिष्टानुसार प्रकल्पाची किंमत काढताना मूळ बांधकाम दराशिवाय इतर खर्च / शुल्क, विकास खर्च, सल्लागार फी इ. आकारणे.

६. बांधकाम खर्चाचा दर व इतर मंजूरीकरिता लागणारे खर्च प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे गृहीत धरण्यांत येतील. मात्र बांधकामाचा दर रु. १५,०००/- प्रति चौ.मी. किंवा प्रत्यक्ष दर या पैकी जो कमी असेल तो गृहीत धरण्यांत येईल. गाळे विक्रीचा दर रु. ८०,०००/- चौ.मी.गृहीत धरला आहे. मात्र प्रत्यक्षात विक्रीचा दर यापेक्षा जास्त असल्यास तो जास्तीचा दर गृहीत धरण्यांत यावा.

७. प्रकल्पाची एकूण किंमत रु. ३९९.४२ कोटी किंवा प्रत्यक्ष येणारी किंमत यापैकी कमी होणारी किंमत गृहीत धरण्यांत येईल.

८. कोणत्याही परिस्थितीत म्हाडाला देय असणारे मोफत बांधकामाचे क्षेत्र (Built up area) २५,८१८ चौ.मी. पेक्षा कमी असता कामा नये. हे क्षेत्रफळ म्हाडाला दिल्यानंतर बाकीचे विक्री योग्य बांधकामाक्षेत्र विक्री करण्यास परवानगी देण्यांत येईल.

- आरामनगर वसाहतीमध्ये कलम १६ अंतर्गत शासनाने ४ भूखंड वितरीत केले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

  अ. नानु रिक्रीएशन या संस्थेस सुमारे ६००० चौ.मी. चे करमणूकीच्या मैदानाचा भूखंड वितरीत केला आहे.

  ब. सिध्देश्वर सहकारी संस्थेस १५०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड वितरीत केला आहे.

क. चिंतामणी सहकारी संस्थेस ९०० चौ.मी.व २५० चौ.मी. क्षेत्रफळाचे भूखंड वितरीत केले आहेत.

ड. सिध्दांत सहकारी संस्थेस १३९४.७५चौ.मी. क्षेत्रफळाचा समाजमंदिराचा सुविधा भूखंड वितरीत केला आहे.

तरी, आरामनगर पुनर्विकासाच्या भौतिक व आर्थिक वर्धनक्षमतेवर विपरीत परिणाम होत असल्यामुळे, उपरोक्त अ,ब,व क मधील तिन्ही भूखंडाचे कलम १६ अंतर्गत वितरण रद्द करण्याबाबत शासनास कळविण्यास मान्यता देण्यात येते. मात्र 'ड' मध्ये नमूद केलेल्या सिध्दांत सहकारी संस्थेस वितरण केलेल्या भूखंडाबाबत शासन स्तरावर वितरण कायम ठेवण्याचा निर्णय झालेला असल्यामुळे , हा भूखंड पुनर्विकास योजनेतून वगळण्यास मान्यता देण्यांत येते.

- एस.आर.ए.-- आरामनगर विभाग १ च्या एका कोप-यात एसआरए योजना मंजूर झाली असल्यामुळे ती पुनर्विकासाच्या प्रकल्पातून वगळण्यात यावी. या प्रकल्पावर विकासकाला कोणत्याही प्रकारचा हक्क रहाणार नाही. एसआरए योजनेमध्ये कांही बदला झाल्यास व म्हाडाने विकास करण्याचे ठरविल्यास या विकासकाचा कोणताही हक्क रहाणार नाही.

- सदर प्रकल्पात अंतर्भूत असलेल्या एकूण ३९.९९ एकर जमिनीचा विकास करताना प्रचलित विकास नियंत्रण नियमानुसार उपलब्ध असलेल्या चटईक्षेत्रानुसार उपलब्ध होणारे बांधकाम क्षेत्रफळ जास्तीत जास्त वापरणेस संस्था व त्यांनी नेमलेल्या विकासकावर बंधनकारक राहील.
- सदर प्रस्तावात जमीन व बांधकाम क्षेत्र विभागून म्हाडाच्या हिस्स्याची जमीन व बांधकाम क्षेत्र म्हाडास विनामूल्य प्राप्त होणेबाबत प्रस्तावित असल्यामुळे, नियमानुसार जमिनीचे अधिमूल्य अधिकचे आकारण्यात येऊ नये.

- बांधकामाच्या काळात सध्याचे गाळेधारकांच्या पर्यायी जागेची व्यवस्था संस्थेलाच करावी लागेल.
- ३५७ गाळे तोडण्याचा खर्च सर्वस्वी संस्थेलाच करावा लागेल. गाळे तोडण्यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून होणार नाही.
- संस्थेच्या सर्व ३५७ सभासदांना (मंडळाच्या भाडेकरुंना) नवीन इमारतीमध्ये मालकी तत्वावर सामावून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.
- प्रस्तावित प्रकल्पांचे आराखडे म्हाडाच्या नावाखाली तयार करण्यांत यावे व ते म्हाडामार्फत मुंबई महानगर पालिकेस सादर करण्यांत यांवे. प्रकल्पास प्रारंभ प्रमाणपत्र (कमेंसमेंट सर्टिफीकेट), म्हाडाच्या नावाने प्राप्त करुन घ्यावे.
- प्रकल्पाच्या आराखडयांवर म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती स्वतंत्रपणे व स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात, तसेच चटईक्षेत्रासंबंधीची आकडेमोड स्वतंत्रपणे दर्शविण्यांत यावी.
- म्हाडाला देय असणारे बांधकाम क्षेत्र, म्हाडाला दिल्याशिवाय सदनिका खरेदीदार / सध्याचे भाडेकरु यांच्या नावावर मिळकत हस्तांतरीत करता येणार नाही.
- म्हाडाच्या इमारती व विकासकाच्या इमारती यांचे स्पेसिफिकेशन सारखेच असावेत.
- उपाध्यक्ष/म्हाडा यांच्या ना हरकत प्रमाणपत्राशिवाय विकासकास त्यांच्या हिस्स्याच्या इमारतींचे विक्री खत / अभिहस्तांतरण (Sale deed/Conveyance deed) करता येणार नाही.
- स्थानिक प्राधिकरणाकडून इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्यूपन्सी सर्टिफीकेट) प्राप्त करण्यापूर्वी मा. उपाध्यक्ष/म्हाडाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.
- कोणत्याही त्रयस्थ व्यक्तींशी विक्री खत अथवा हस्तांतरण पत्र करण्यापूर्वी मा.उपाध्यक्ष/ म्हाडाकडून पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन घ्यावा लागेल.

- विकासकाने सदर करारनाम्याच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आंत बांधकामास सुरुवात करावी व याच तारखेपासून ३६ महिन्याच्या आंत बांधकाम सर्व बाबतीत पूर्ण करावे.
- कोणत्याही अकल्पीत परिस्थितीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जादा वेळेची आवश्यकता असल्यास याबाबत मा. उपाध्यक्ष/म्हाडा निर्णय घेतील. जर मुदतवाढ देण्यांत आलेली नसेल, तर मुळ वेळापत्रक प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी गृहीत धरण्यात येईल.
- एकूण बांधकामापैकी ५०% बांधकाम १८ महिने कालावधीत तर संपूर्ण बांधकाम ३६ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.
- प्रस्तावित बांधकामाचे भू अभिन्यास, बांधकाम नकाशे, इलेवेशन, तसेच स्पेसीफीकेशन इत्यादी बाबी मा. उपाध्यक्ष म्हाडाकडून बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी मंजूर करुन घ्यावे.
- म्हाडाच्या इमारतींच्या बांधकामावर देखरेख करण्यासाठी मा. उपाध्यक्ष/म्हाडा "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची" (PMC) नेमणूक करतील व त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार / शिफारसीनुसार विकासकाने बांधकाम पूर्ण करावे.
- जर बांधकाम वरील अटी व शर्तीनुसार पूर्ण न झाल्यास कोणत्याही अटीचे उल्लंान केलयास व म्हाडाच्या हिस्स्याचे बांधकाम म्हाडास हस्तांतरीत न केल्यास, सदर करारनामा रद्द करण्याचा हक्क मा. उपाध्यक्ष/म्हाडा राखून ठेवत आहे व अशा परिस्थितीत जमिनीचा ताबा परत घेण्यांत येईल. उर्वरीत बांधकाम म्हाडातर्फे विकासकाच्या खर्च व जोखीमेवरती (Cost & Risk) करण्यांत येईल व याबाबत कोणत्याही खर्चाची पूर्तता म्हाडा देणार नाही. करारनामा रद्द करण्यापूर्वी विकासकास ३० दिवसांची सूचना देण्यांत येईल.
- सदर प्रकल्पाबाबतची बांधकामाची कार्यवाही, पूर्णत्वाची, तसेच स्पेसीफीकेशन प्रमाणे दर्जाबाबतची जबाबदारी याबाबत विकासकाची बांधिलकी व जोखिम असेल व याबाबत तसे क्षतीपूर्तीबंध पत्र विकासक म्हाडाकडे सादर करेल.

- प्रकल्पाची प्रगती तसेच दर्जा याबाबत शहानिशा करण्यासाठी म्हाडाचे अधिकारी वेळोवेळी जागेस भेट देतील.
- विकासक म्हाडाच्या अधिका-यांना जागा पाहणीच्या वेळी सर्व आवश्यक सहाय्य करेल. तसेच परिक्षणाचे नमूने निवडण्याबाबत सर्व आवश्यक सहाय्य करेल.
- सर्व गाळयांचे विक्रीखत उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांच्यातर्फे नियुक्त केलेले म्हाडाचे अधिकारी व विकासकाचे अधिकृत प्रतिनिधी यांच्यातर्फे संयुक्तरित्या करण्यांत येईल.
- विकासक विषयांकीत प्रकल्पाखालील मिळकत तारणापोटी कांही बांधकाम कर्ज उभे करणार असल्यास, त्याबाबत त्यांनी मा. उपाध्यक्ष / म्हाडाची आगाऊ मान्यता घ्यावी.
- जमिनीच्या विकासाची परवानगी देण्याअगोदर ३५७ गाळेधारकांकडून मंडळाला देय असलेली भाडयाची संपूर्ण थकबाकी संस्थेला मंडळाकडे एकरकमी अदा करावी लागेल.
- अशा रितीने संस्थेस जमीन दिल्यानंतर सध्याच्या ३५७ भाडेकरुंना उपलब्ध होणा-या सदनिका विक्री / हस्तांतरीत करण्यास पहिली १० वर्ष म्हाडाची परवानगी मिळणार नाही. त्यानंतर रितसर परवानगी घेऊन म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार गाळे हस्तांतरणाची कार्यवाही करावी लागेल.
- ३५७ गाळयांच्या पुनर्वसन योजनेनुसार संस्थेस ३५७ गाळयांची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने संपूर्ण ३९.९९ एकर वरील योजनेत आवश्यकतेनुसार व टप्प्याटप्प्याने सुरुवातीला संस्थेबरोबर ''परवाना करारनामा'' (license Agreement) करण्यांत यावा. पुनर्वसन व विक्री गाळयांच्या पुनर्बाधणीनंतर संस्थेची सर्व थकबाकी वसुल झाली असल्यास, पुनर्बांधणीनंतर म्हाडाबरोबर आरामनगर टेनन्टस् असोसिएशनला तसेच नवीन विक्रीचे गाळे खरेदी करणा-या लाभधारकांच्या गृहनिर्माण संस्थेला लीजडीड करावे लागेल तसेच भाडेकरुंना

द्यावयाचे व विक्रीचे गाळे मालकी तत्वावर वितरीत करण्यास मान्यता देण्यांत येते.

- पुर्नविकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संस्था, म्हाडा व संस्थेने नेमलेला विकासक यांच्यात त्रिपक्षीय करारनामा करण्यांत यावा. प्रकल्प राबविताना सभासद/विकासक/संस्था यांचेमध्ये कोणत्याही प्रकारचा तंटा / वाद निर्माण झाल्यास किंवा तत्सम स्वरुपाचे कोणतेही न्यायालयीन विवाद निर्माण झाल्यास सदर प्रकरणाबाबतची संपूर्ण जबाबदारी संस्था व संस्थेने नेमलेल्या विकासकावर राहील. तसेच कायदेशीर बाबींना अधीन राहून प्रकल्प पूर्तीच्या दृष्टीने आवश्यकता असल्यास म्हाडामार्फत सहाय्य करण्यांत यावे.
- प्रकल्पास आवश्यक असणा-या सर्व सोयी सुविधा (Infrastructure) या मुंबई महानगरपालिकेने मान्य केल्यानुसार स्वखर्चाने पुरविण्याची जबाबदारी विकासकावर राहील.
- म्हाडास उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे निवासी वापरासाठीच वापरण्यांत यावे. म्हाडाला प्राप्त होणा-या विनामूल्य बांधकाम क्षेत्रफळात प्राप्त होणारे निवासी गाळे, त्याचे क्षेत्रफळ व प्रकार ठरविणे, योजनेत प्राप्त होणारे क्षेत्रफळ अंतीमतः ठरविणे, तसेच तांत्रिक व इतर बाबतच्या अटी व शर्ती ठरविण्याचे व संयुक्त प्रकल्प यशस्वीरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने वेळोवेळी निर्णय घेण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांत येत आहेत.
- संस्थेच्या वाटयास येणा-या ५०% बांधकाम क्षेत्राचा वापर जर अनिवासी /व्यापारी वापरासाठी करावयाचा असल्यास त्यास मान्यता देण्यांत यावी. यास अधिकचे अधिमूल्य आकारण्यात येऊ नये .
- प्रकल्पात ५०:५० या तत्वावर बांधकाम क्षेत्राच्या विभागणीचा प्रस्ताव असल्यामुळे जमिनीसाठी प्राधिकरणाच्या दि. ४.६.०६ च्या ठराव क्र. ६२६० मधील इतर आकारणी लागू रहाणार नाही.

- म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार वार्षिक भुईभाडे आकारण्यांत यावे व त्याची वसुली गाळे हस्तांतरणापूर्वी करण्यांत यावी.
- म्हाडास विनामूल्य उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे योजनेतील क्षेत्र मालमत्ता पत्रके, मुंबई महानगर पालिकेची मंजूरी, सर्वेक्षण, जागेवरील हद्द निश्चिती इत्यादी बाबींवर अवलंबून राहील. वरील प्रमाणे बाब टिप्पणीतील तक्ता क्र. २ मधील तत्वानुसार अंतीम क्षेत्रफळ निश्चित केले जावे.
- म्हाडा, विकासक, तसेच संस्थेचे पुनर्विकासाचे गाळे यांचे बांधकाम हे एकूण बांधकामाच्या प्रमाणात ठरविण्यात यावे. तसेच पुनवर्सनाचे व विक्री गाळे यांचे प्रत्येक टप्प्यातील प्रमाण देखील निश्चित करुन द्यावे जेणे करुन विकासक विक्रीचे गाळे प्राधान्याने बांधून पुनवर्सन गाळे बांधण्यास दिरंगाई करणार नाही, यावर म्हाडाचे नियंत्रण असावे.
- भविष्यामध्ये जादा चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास यावर प्राधिकरणाची मालकी असेल. त्याचे वितरण विकासकास याच तत्वावर करण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.
- तसेच या योजनेसाठी भविष्यामध्ये २.५० किंवा त्यापेक्षा जास्त चटईक्षेत्र निर्देशांक शासनाकडून मंजूर झाल्यास अशा जास्तीच्या बांधकाम क्षेत्रापैकी याच तत्वावर बांधकाम क्षेत्र म्हाडास विकासकाने मुळ प्रस्तावानुसार विनामुल्य बांधून देणे विकासकावर बंधनकारक राहील.
- याशिवाय इतर आवश्यक अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना देण्यांत येत आहेत.
- उपरोक्त अटी व शर्तीशिवाय म्हाडाच्या जमीन वितरणाच्या इतर सर्वसाधारण अटी विकासकावर बंधनकारक राहतील.

या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कार्यवाही करण्यास एकमताने मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
दिनांक : १३.०६.२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता
आयोजित केलेल्या २२७ बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२७/१

विषय :- सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ५८(१) (ब) अन्वये प्राधिकरणास मिळालेल्या गिरण्यांच्या जमिनीच्या विकासाबाबत.

प्राधिकरणाचा ठराव क्र.६२७८, दिनांक : १.११.२००७ अनुसार इतर गिरण्यांच्या जमिनींवर योजना कार्यान्वित करण्याबाबत.

सर्क्युलेशन पध्दतीने मंजूर करण्यात आलेल्या बाब टिप्पणीवरील सुधारित ठराव :

ठराव क्रमांक : ६२८७ **दिनांक : २४.०३.२००८**

१३/०६/२००८

एकमताने निर्णय घेण्यात आला की

१. दि. ०१/११/२००७ च्या प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६२७८ न्यु हिंद मिल गिरणीच्या जमिनीच्या विकासाच्या ठरावाप्रमाणेच खालील गटनिहाय एकूण दहा गिरण्यांच्या जमिनीवर एकूण ४८६३ सदनिकांचे काम हाती घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे. मात्र ''क'' गटातील गिरण्यांच्या जमिनींचा प्रत्यक्ष

ताबा मिळाल्यानंतर कंत्राटदारास स्विकृती पत्र देण्यात यावे व विकासाच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करावी.

गट अ : ताबा मिळालेल्या व विकासाच्या दृष्टीने तुलनात्मक अधिकतम क्षेत्रफळ असलेल्या स्वदेशी मिल चुनाभट्टी या एका गिरणीच्या जमिनीवर **१६४४** सदनिकांच्या विकासाचे काम हाती घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या सदनिकांच्या विकासासाठी बांधकामाचा दर रु. **१३६७.००** प्रति चौ. फुट (रु.८२४/- मुळ बांधकामाचा दर + रु. ३६०/- तळ + ७ पेक्षा अतिरीक्त मजल्यांसाठी अधिक रु. १८३/- सुधारित विनिर्देशासाठी) राहील. तर, या गिरणीच्या जमिनीवर विकासासाठी प्रकल्पाची अंदाजित निविदा किंमत रु.**९४.२०** कोटी एवढी राहील.

गट ब :- ताबा मिळालेल्या व विकासाच्या दृष्टीने तुलनात्मक कमी क्षेत्रफळ असलेल्या श्रीराम मिल, पिरॅमल मिल, स्टॅन्डर्ड मिल, शिवडी, स्टॅन्डर्ड मिल, प्रभादेवी या चार गिरण्यांच्या जमिनीवर एकूण **८४६** सदनिकांचे विकासाचे काम हाती घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या सदनिकांच्या विकासासाठी बांधकामाचा दर रु. **१३६७.००** प्रति चौ. फुट (रु.८२४/- मुळ बांधकामाचा दर + रु. ३६०/- तळ + ७ पेक्षा अतिरीक्त मजल्यांसाठी अधिक रु. १८३/- सुधारित विनिर्देशासाठी) राहील. तर, या गिरणीच्या जमिनीवर विकासासाठी प्रकल्पाची अंदाजित निविदा किंमत रु.**४७.८५** कोटी एवढी राहील.

गट क :- अंशतः ताबा मिळालेल्या मोरारजी मिल कांदिवली व लवकरच ताबा मिळणार अशा पहाडी गाव, गोरेगाव येथे मोरारजी मिलचा हिस्सा, स्वान मिल, शिवडी एकत्रित डॉन मिलचा हिस्सा, स्वान मिल कुर्ला अशा चार गिरण्यांच्या जमिनीवर एकूण **२२३४** सदनिकांचे विकासाचे काम हाती घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. स्वान मिल कुर्ला येथील सदनिकांच्या विकासासाठी बांधकामाचा दर रु. **१००७.००** प्रति चौ. फुट (रु.८२४/- मुळ बांधकामाचा दर अधिक रु. १८३/- सुधारित विनिर्देशासाठी) व उर्वरित तीन गिरण्यांच्या जमिनीवर सदनिकांच्या विकासासाठी बांधकामाचा दर रु. **१३६७.००** प्रति चौ. फुट (रु.८२४/- मुळ बांधकामाचा दर + रु. ३६०/- तळ + ७ पेक्षा अतिरीक्त मजल्यांसाठी + रु. १८३/- सुधारित विनिर्देशासाठी)

राहील. या गिरणीच्या जमिनीवर विकासासाठी प्रकल्पाची अंदाजित निविदा किंमत रु.**१२२.५५** कोटी एवढी राहील.

गट ड :- उपनगराऐवजी शहरात ताबा मिळालेल्या सिंम्प्लेकस मिल या गिरणीच्या जमिनीवर **१३९** सदनिकांच्या विकासासाठी बांधकामाचा दर रुपये **१३६७/-** प्रति चौ.मी. (रु.८२४/- मूळ बांधकामाचा दर + रु.३६०/- तळ + ७ पेक्षा अतिरिक्त मजल्यांसाठी अधिक रु.१८३/- सुधारित विनिर्देशासाठी) राहील. या गिरणीच्या जमिनीवर विकासासाठी प्रकल्पाची अंदाजित निविदा किंमत रुपये **७.८६** कोटी एवढी राहील.

उपरोक्त दहाही गिरण्यांच्या जमिनीवर विकासासाठी प्रकल्पाची अंदाजित निविदा किंमत रुपये २७२.४६ कोटी एवढी राहील व अंदाजित सदनिकांची संख्या पुढीलप्रमाणे :-

तक्ता

गट	*गिरणीचे नाव*	जमिनीचे क्षेत्रफळ चौ.मी.	प्रस्तावित सदनिका एकुण	बांधकामाचा प्रस्तावित दर (प्रती चौ.फुट मूळ बांधकाम)	निविदा रक्कम रुपये (कोटी)
अ	*1) स्वदेशी मिल*	१२६१२.१०	१६४४	१३६७.००	९४.२०
	एकूण :-	**१२६१२.१०**	**१६४४**		**९४.२०**
ब	१) श्रीराम मिल	२०५६.०६	२८६	१३६७.००	१६.१८
	२) पिरॅमल मिल	१४२४.५४	१९२	१३६७.००	१०.८६
	३) स्टॅन्डर्ड मिल, शिवडी	१२४७.८४	१९२	१३६७.००	१०.८६
	४) स्टॅन्डर्ड मिल, प्रभादेवी	१०२०.९३	१७६	१३६७.००	९.९५
	एकूण :-	**५७४९.३७**	**८४६**		**४७.८५**
क	१) मोरारजी मिल, कांदिवली	६२५१.००	८२६	१३६७.००	४६.७२
	२) मोरारजी मिल, हिस्सा (पहाडीगांव, गोरेगांव)	३७७४.००	४९८	१३६७.००	२८.१७
	३) स्वॉन मिल, शिवडी (मूळ स्वान मिलचे क्षेत्रफळ + डॉन मिलचे क्षेत्रफळ)	४१०२ (३१७३ + ९२९)	६५४	१३६७.००	३६.९९
	४) स्वॉन मिल, कुर्ला	३८१५.००	२५६	१००७.००	१०.६७

	एकूण :-	**१७९४२.००**	**२२३४**		**१२२.५५**
ड	१) सिंम्प्लेक्स मिल	११२६.००	१३९	१३६७.००	७.८६
	एकूण :-	**११२६.००**	**१३९**		**७.८६**
एकूण :- अ+ब+क+ड		**३७४२९.४७**	**४८६३**		**२७२.४६**

२] सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी कालावधी, कामाचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेता, स्वॉन मिल कुर्ला येथील गिरणीच्या जमिनिच्या विकासासाठी १८ महिने व उर्वरित ९ गिरण्यांच्या जमिनीच्या विकासासाठी २१ महिने एवढा ठेवण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

३] मे. बी.जी.शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांना [न्यु हिंद मिलच्या ठराव क्र. ६२७८ दि. ०१/११/२००७ प्रमाणेच] उपरोक्त दहा गिरण्यांच्या जमिनीवरील विकासाचे काम ठोक कंत्राट पध्दतीने (Lumpsum Turnkey) देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. कंत्राटाच्या इतर अटी व शर्ती ''न्यु हिंद मिल'' या गिरणीच्या विकासासाठी मंजुर झालेल्या प्रमाणे या दहा गिरण्यांच्या विकासासाठी सुध्दा लागू राहातील.

४] प्रस्तावित सदनिकांची संख्या अंदाजित असल्याने महानगर पालिकेकडून नकाशांना मंजुरी मिळाल्यानंतर मंजुरीतील सदनिकांच्या संख्येनुसार कंत्राटदाराशी करारनामा करण्यात यावा व कार्यादेश देण्यात यावे.

सदर ठरावाची अंमलबजावणी, कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २९.०३.२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २

विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन् २००७-२००८ चे सुधारित अंदाजपत्रक व

सन् २००८-२००९ चे अर्थसंकल्पीय अंदाज.

ठराव क्रमांक : ६२८८ दिनांक : २९/०३/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २००७-२००८ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २००८-२००९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास वरील सुधारणांसह मान्यता देण्यांत आली.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

बाब क्रमांक : ३

विषय :- प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी आकृतिबंध सन् २००८ - २००९

ठराव क्रमांक : ६२८९ दिनांक : २९/०३/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरण व प्रादेशिक मंडळांच्या कार्यालयासाठी सन २००८-२००९ या वित्तीय वर्षासाठी कर्मचारी आकृतीबंध मंजूर करण्यांत येत आहे.

तसेच जून्या वाहनांच्या यबदली नवीन वाहने आवश्यकतेनुसार खरेदी करताना शासन निर्णय दिनांक ३ ऑक्टोबर २००३ मध्ये विहीत केलेल्या किंमतीच्या मर्यादेपर्यंतच खरेदी करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या

दिनांक : १३.०६.२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता

आयोजित केलेल्या २२७ बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२७/३

विषय :- म्हाडा अधिकारी / कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२९० **दिनांक : २/०५/२००८**

१३/०५/२००८

एकमताने निर्णय घेण्यात आला कीं,

१) म्हाडा कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू करण्यासंबंधीचा यापूर्वी प्राधिकरणाने मंजूर केलेला ठराव क्र.६०६४ दिनांक ९/०८/२००४ व ठराव क्र. ६०९६ दिनांक २१/०६/२००५ हे पेन्शन योजना लागू न करण्याबाबतचे ठराव रद्द करण्यात येत आहेत.

२) प्राधिकरणाच्या दिनांक ३१/१०/२००५ पर्यंतच्या सर्व कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमाच्या तरतुदी लागू करुन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नुसार सेवानिवृत्ती वेतन लाभ योजना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर पेन्शन योजनेकरिता येणा-या संपूर्ण खर्चाची जबाबदारी / हमी म्हाडाची राहील. तसेच पेन्शन योजना वर्धनक्षम करण्याकरिता येणा-या अतिरिक्त रु. ५६.९२ कोटी च्या खर्चाची तरतूद करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

४) सदर योजना शासन मान्यतेने लागू होईपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांना पेन्शन योजनेचा विकल्प खुला ठेवण्यात येत आहे.

५) अंतिम मंजूरीसाठी सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पाहता या ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

म्हाडातील अधिकारी/कर्मचा-यांना सेवानिवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबतच्या टिप्पणीस व ठरावास प्राधिकरणाच्या सदस्यांनी सर्क्युलेशन पध्दतीने मान्यता दिल्यानुसार वरील ठराव स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : २२७/४

विषय :- अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) येथील म्हाडाच्या कमर्शियल बिल्डींग (क्र.१) मधील संपूर्ण अे विंग झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास मालकी हक्काने विकण्याबाबत. (भाडेतत्वावर देण्याऐवजी मालकी हक्काने देण्याचा ठराव करणे)

ठराव क्रमांक : ६२९१ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), येथील म्हाडाच्या कमर्शियल बिल्डींग (क्र.१) मधील संपूर्ण 'ए' विंग झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणास मालकी हक्काने विक्री करावयाच्या क्षेत्राबाबत तसेच आकारण्यात येणा-या रु. २२,६७,१९,३६५/- किंमतीबाबत आणि बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.

५ मध्ये विशद केलेल्या पध्दती अमलात न आणता सदर विक्री केली जात असल्याने प्राधिकरणाच्या या ठरावास शासनाकडून मंजूरी प्राप्त करुन घ्यावी.

यापूर्वी सदरहू अ-विंग झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाला (एसआरए) भाडयाने देण्याचा पारीत केलेला प्राधिकरणाचा ठराव क्र. ६२५९, दिनांक : ४.०६.२००७ रद्द करण्यात येत आहे.

कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता प्राधिकरणाचा ठराव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२७/५

विषय :- म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५२ अंतर्गत खाजगी जमीन खरेदी करण्याबाबत मौजा - शेगांव - भाग - २, सर्व्हे क्रमांक - ४११/२, एकूण क्षेत्रफळ ३.०७ हे.आर.पैकी १.३५ हे.आर.निव्वळ निवासी उपयोगी भूखंड / जमीन खरेदी करण्याबाबत....

ठराव क्रमांक : ६२९२ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

म्हाड अधिनियमातील कलम ५२ व त्यास अनुसरुन शासनाने जारी केलेली मार्गदर्शक तत्वे दिनांक : २९.०३.२००८ ला अनुसरुन मौजा शेगांव, भाग-२, स.क्र.४११/२ मधील एकूण क्षेत्रफळ ३.०७ हेक्टर आर पैकी १.३५ हेक्टर आर (१४५३१४ चौ.फुट) निव्वळ निवासी उपयोगी भूखंड/जमीन रु.६१/- प्रती चौ.फुट या

दराने खरेदी करण्यासाठी रु. ८८,६४,१९३/- जमिनीची किंमत अदा करण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे.

शासनाच्या दिनांक : २९.०३.२००८ रोजीच्या मार्गदर्शक तत्वातील मुख्य मुद्दयाप्रमाणे सदर जमीन ताब्यात घेतल्यानंतर त्यावरील योजना ३ वर्षाच्या कालावधीत सुरु करणे अनिवार्य आहे. प्राधिकरणाच्या कार्यालयाने दिनांक : ९.११.२००४ रोजी जारी केलेल्या परिपत्रक क्र. ४७२१ मधील सुचनेनुसार कार्यवाही करावी. जमिनीवर कोणत्याही प्रकारचा बोजा नाही, जमीन गहाण नाही, इत्यादी बाबतची खात्री मुख्य अधिकारी / अमरावती मंडळ यांनी प्रथम करुन घ्यावी. जमिनमालकासह आवश्यक तो करारनामा करणे, ७/१२ च्या उता-यावर म्हाडाचे नांव नोंद करणे अशा अनुषंगिक बाबी इत्यादी बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

या ठरावाची कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता, पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/६

विषय :- इस्लामपूर येथे स.क्र.१६२/२ या जागेतील उर्वरित क्षेत्राचा ताबा कासेगांव शिक्षण संस्थेस देणेबाबत विचारार्थ प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६२९३ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

कासेगांव एज्युकेशन सोसायटी, इस्लामपूर या संस्थेला प्राधिकरणाच्या दिनांक : १७.९.१९८३ चा ठराव क्र. ७२२ अन्वये ५० सदनिका व ५ एकर जमीन (

इस्लामपूर येथील म्हाडाची जमीन स.क्र.१६२/२) विक्री करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयातील ५० गाळे व त्याला अनुलग्न असलेल्या सुमारे ६५४२ चौ.मीटर क्षेत्रफळ सोडून उर्वरित सुमारे १५९७२ चौ.मी. क्षेत्रफळ एवढी जमीन, कासेगांव एज्युकेशन सोसायटीने इस्लामपूर येथे गृहनिर्माणास योग्य अशी तेवढयाच मुल्याची व क्षेत्रफळाची जमीन (बदली जमीन) म्हणून म्हाडाला द्यावी. याबाबत शासन स्तरावरुन आदेश जारी करुन घेण्यासाठी गृहनिर्माण विभागाला वरील प्रमाणे कळविण्यात यावे.

शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास बाब टिपण्णीतील पुढील २ पर्यायांपैकी एका पर्यायावर योग्य तो निर्णय शासनाने घ्यावा.

<u>पर्याय</u> (१) :- प्राधिकरणाने दि. १७.९.१९८३ रोजी पारीत केलेल्या ठराव क्रमांक ७२२ मधे <u>भागशः सुधारणा करणे</u>, ज्या अन्वये हा फक्त ५० गाळे व त्याला अनुलग्न असलेली जमीन देण्यापुरता ठराव सिमित करुन उर्वरित जमीन वितरणाचा ठराव रद्द करणे. शासनाने मंजूरी दिल्यानंतर पुढील प्रमाणे अंमलबजावणी/ कार्यवाही करावी.

अ) कासेगांव एज्युकेशन सोसायटीकडून <u>उर्वरित मोकळी जमीन</u> काढून घेणे. (५० गाळयांच्या खालील व नियमाप्रमाणे अनुलग्न जमीन सोडून उर्वरित अशी जमीन)

ब) कासेगांव एज्युकेशन सोसायटीने जमिनीचा ताबा सामंजस्याने (पीसफुल पझेशन) परत दिला नाही तर ही जमीन कासेगांव एज्युकेशन सोसायटीने अनधिकृतपणे ताब्यात ठेवली असे समजून अधिनियम व नियमातील तरतुदीप्रमाणे काढून घेण्याची कार्यवाही करणे.

<u>पर्याय (२)</u> :- सदरहू शासकीय जमीन ही मूलतः रहिवाशी वापरासाठी आहे, ती कासेगांव एज्युकेशन सोसायटीला त्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी नियमित करुन द्यावयाची असेल तर त्याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घेणे. शासनाने जर ही सर्व ५ एकर जमीन कासेगांव एज्युकेशन सोसायटीला नियमित करुन देण्याचा निर्णय घेतला तर पुढील अटी व शर्ती त्यास लागू कराव्यात.

अ) शैक्षणिक संस्थेसाठी आवश्यक असलेले मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र संस्थेने पुणे मंडळास सादर करणे जसे शिक्षण/तंत्रशिक्षण व संबंधीत शैक्षणिक विभागाकडून संस्थेच्या कामकाजाबाबत व गुणवत्तेबाबत अहवाल संस्थेने सादर करणे.

ब) जिल्हाधिकारी, सांगली यांना शासनाचा निर्णय कळविणे व जमिनीचा वापर शैक्षणिक प्रयोजनासाठी करण्यात येणार असल्याने त्यास जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडून आवश्यक ती मंजूरी कासेगांव एज्युकेशन संस्थेने घेणे. मुळ प्रयोजनात बदल झाल्याने जर जिल्हाधिकारी वा शासनाने त्यांच्या नियमाप्रमाणे जमिनीच्या अधिमुल्याची जादा आकारणी वा दंड आकारणी केली तर ती सदर संस्थेने अदा करावी/भरावी.

क) या जमिनीची किंमत प्रचलित शिघ्र सिध्द गणकानुसार म्हाडा/पुणे मंडळाला अदा करावी. प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीनुसार किंमत काढून व ती वितरणाच्या दिनांकापर्यंत भांडवलीकरण/ अद्यावत करुन शिघ्र सिध्द गणकापेक्षा ती जास्त असेल तर त्याप्रमाणे किंमत संस्थेला भरावी लागेल.

ड) जमिनीची किंमत ३० दिवसाच्या आत म्हाडा/पुणे मंडळाला अदा करणे. तसे न केल्यास वाटप रद्द करणे.

इ) जमिनीची किंमत पुणे मंडळ/म्हाडाला प्राप्त झाल्यानंतर या जमिनीचा करारनामा अमलात आणणे.

इस्लामपूर येथील सदर जमीन शासकीय जमीन असल्याने या प्रकरणी गृहनिर्माण विभागाने महसूल विभागाचे अभिप्राय घेवूनच निर्णय घ्यावा.

वरील प्रमाणे प्राधिकरणाचा हा निर्णय गृहनिर्माण विभागास कळविण्यात यावा.

बाब क्रमांक : २२७/७

विषय :-मौजा सिंध्दी (मेघे), वर्धा येथिल मंडळाच्या वसाहतीतील प्रायमरी शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड (पूर्वीचे आरक्षण क्र.४३)(सुधारित आरक्षण क्र.४६) (४०० चौ.मी) समप्रमाणात विभागून हुतात्मा स्मारक समिती, आष्टी व महिला विकास संस्था, वर्धा यांना वितरीत करण्याबाबतचा (फेरनिर्णयाचा) प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६२९४ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

मौजा सिंध्दी (मेघे), वर्धा येथिल मंडळाच्या वसाहतीतील प्रायमरी शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड (पूर्वीचे आरक्षण क्र.४३) (सुधारित आरक्षण क्र.४६) (४०० चौ.मी) समप्रमाणात विभागून हुतात्मा स्मारक समिती, आष्टी व महिला विकास संस्था, वर्धा यांना वितरीत करण्याबाबतच्या (फेरनिर्णयाचा) प्रस्तावाबाबत

१) गृहनिर्माण विभागाने दिनांक : २५.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या निर्देशास अनुसरुन प्राधिकरणाचा पुढील प्रमाणे निर्णय अंतिम निर्णयासाठी शासनाकडे पाठविण्यात यावा.

२) सुधारित विकास आराखडयामध्ये शाळेसाठी दर्शविलेले ४९०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे समप्रमाणात म्हणजे २४५० चौ.मी. याप्रमाणे विभागणी करुन त्याचे वाटप

अ) हुतात्मा स्मारक समिती आष्टी
ब) महिला विकास संस्था, वर्धा

यांना करण्यात यावे.

सदरहू विभाजनासाठी नगरविकास विभागाकडून, प्रथम गृहनिर्माण विभागाने मंजुरी घ्यावी.

३) भूखंडाचे विक्री मुल्य संबंधीत दोन्ही संस्थांकडून म्हाडाच्या जमिनीच्या किंमत विषयक असलेल्या प्रचलित धोरणानुसार वसुल करण्यात यावे.

४) विकास आराखडयानुसार शाळेच्या भूखंडाला लागून असलेले म्हाडाच्या जमिनीवरील सुमारे ५२०० चौ.मी. क्षेत्रफळ खेळाचे मैदान दोन्ही शाळांना प्रचलित धोरणानुसार किंमत आकारुन देण्यात यावे. या मैदानाची देखभाल/देखरेख ही या दोन्ही संस्थांची जबाबदारी असेल. तसेच या खेळाच्या मैदानाचा उपयोग वसाहतीतील रहिवाशांसाठी/जनतेसाठी देखील (शाळेच्या वेळे व्यतिरिक्त) उपलब्ध करुन देणे दोन्ही संस्थांना बंधनकारक असेल.

५) प्राथमिक शाळेचा भूखंड आणि सदरहू मैदान हे समुचित प्राधिकरणाला हस्तांतरीत करावयाचे असते. परंतु समुचित प्राधिकरण म्हणजे वर्धा नगरपरिषदेला मंडळाने १९९७ मध्ये केलेल्या संदर्भास प्रतिसाद दिला नव्हता, ही बाब लक्षात घेऊन समुचित प्राधिकरणाऐवजी संबंधीत या दोन्ही संस्थानां त्याचे वितरण करण्यासाठी गृहनिर्माण विभागाने नगरविकास विभागाकडून मंजुरी प्राप्त करुन घ्यावी.

६) प्राथमिक शाळेच्या भूखंडाची व मैदानाची समप्रमाणात विभागणी नगर विकास विभागाकडून मंजूर करुन घेतल्यानंतर गृहनिर्माण विभागाकडून अंतिम मान्यता/निर्णय घेण्यात यावा.

७) गृहनिर्माण विभाग आणि नगर विकास विभागाने संमती दिल्यानंतर तथा अंतिम निर्णय दिल्यानंतर सदर बाब मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठापुढे (WP N0. ३२८४/२००४ ला अनुसरुन) सादर करण्यात यावी व त्यानंतरच भूखंडांचे वितरण करण्याची कार्यवाही मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांनी करावी.

दोन्ही संस्थांसह योग्य ते करारपत्र मुख्य अधिकारी / नागपूर मंडळ यांनी करावे.

८) प्राधिकरणाचा निर्णय व शासनाचा अंतिम निर्णय स्थानिक प्राधिकरण (वर्धा नगर परिषद व नगर रचना वर्धा) यांना मुख्य अधिकारी / नागपूर मंडळ यांनी कळवावा.

९) उक्त प्रकरणी प्राधिकरणाने हा सुधारित निर्णय घेतला असल्याने प्राधिकरणाचा यापूर्वीचा ठराव क्र.५९१५ दिनांक ३१.५.२००३ आणि नागपूर मंडळाने विषय क्र. ७, दिनांक : ५.०७.२००२ च्या १५६ व्या बैठकीतील ठराव रद्द ठरतील.

कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता प्राधिकरणाचा निर्णय शासनास पाठविण्यात यावा व शासनाचे अंतिम आदेश / निर्णय प्राप्त करुन घ्यावे.

बाब क्रमांक : २२७/८

विषय :- अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ अमरावती यांचे अधिनस्त बांधलेल्या मौजे अकोली अमरावती येथील मूळ किंमतीवर आकारणी झालेले व्याज व मासिक हप्ता विलंबाने भरणा केल्याबाबत आकारणी करण्यात आलेली रक्कम रु. १,५८,२०,६६९/- माफ करुन मुद्दल रक्कम रु. २,९६,३२,४५०/- लाभार्थ्यांकडून वसूल करण्यास परवानगी मिळण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६२९५ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

१) मौजे अकोली अमरावती येथील योजनेतील ४९९ ई.डब्ल्यू.एस./एल.आय.जी. गाळयांच्या लाभधारकांकडून ३१ मार्च, २००८ अखेर पर्यंत वसूल करावयाच्या एकूण रु. ५,३८,६५,९३७/- या रकमेमधील व्याज व इतर देणी पोटी येणारी रक्कम रु. १,५८,२०,४९१/- शासनाची मान्यता घेतल्यानंतरच माफ करण्यात यावी.

२) सदर व्याज/विलंब शुल्क माफ करताना याचा फायदा जे लाभार्थी संपूर्ण थकबाकीची रक्कम (मुद्दल + इतर देणी) ६ महिन्यांच्या आत एकरकमी अमरावती मंडळाकडे भरतील त्यांनाच देण्यात येईल.

३) व्याज माफीची शासनाने मंजुरी दिल्यानंतरच्या तारखेपासून सवलत लागू राहील.

४) जे लाभार्थी या प्रमाणे मुद्दल + इतर रक्कम मंडळाला भरणार नाहीत त्यांना नियमाप्रमाणे संपूर्ण व्याज व विलंब शुल्क भरावे लागतील व मागील थकबाकीसह भरणे बंधनकारक राहील.

५) ज्याअर्थी लाभधारक संघटनेने व्याज माफीसाठी केलेल्या विनंतीवर शासन स्तरावर चर्चा करताना असे कबूल केले होते त्याअर्थी या योजनेमधील बाहय सुविधा अमरावती मंडळ/म्हाडा कडून पुरविण्यासाठी ते मागणी करणार नाहीत. बाहय सुविधा पुरविण्याचे काम हे अमरावती महानगरपालिकेच्या अखत्यारीतील आहे व त्याची पुर्तता अमरावती महानगरपालिकेने करण्यासाठी लाभधारकांनी म.न.पा.कडे पाठपूरावा करावा.

६) सदनिकांच्या बाबतीतही कुठल्याही प्रकारची दुरुस्ती अथवा नुतनीकरण मंडळाकडून करुन दिले जाणार नाही. ही व्याज माफीची सवलत घेणा-या सर्व संबंधीत लाभधारकांकडून मंडळाला वरीलप्रमाणे वचनपत्र देणे बंधनकारक राहील.

७) व्याज व विलंब शुल्क माफ करण्याची सदर सवलत ही ज्या लाभार्थींनी मासिक हप्ते (मुद्दल + व्याज) दिनांक ३१/०३/२००८ पर्यंत नियमित / वेळोवेळी

अदा केले आहेत त्यांना लागू नाही. म्हणजे माफ केलेल्या व्याजाची रक्कम त्यांना परत देण्यात येणार नाही.

८) व्याज माफीची सवलत ही फक्त मुळ लाभधारकानाच लागू राहील.

कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता व्याज व विलंब रक्कम रु. १,५८,२०,४९१/- माफ करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या निर्णयासाठी तात्काळ पाठविण्यात यावा.

बाब क्रमांक : २२७/१०

विषय :- मुंबईस्थित संक्रमण शिबिरातील म्हाडा कर्मचारी / अधिका-यांना वितरीत केलेले सेवानिवासस्थान गाळे मालकीहक्काने देण्याबाबत प्राधिकरणाने पारीत केलेला ठराव क्र.६०५५, दिनांक ७/०८/२००४ पुन्हा निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२९६ दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक : ६०५५, दिनांक : ७.०८.२००४ प्रमाणे मुंबईस्थित संक्रमण शिबीरातील म्हाडा कर्मचारी / अधिका-यांना तात्पूरती वितरीत करण्यांत आलेली सेवा निवासस्थाने / गाळे मालकी हक्काने देण्याबाबत प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेने केलेली मागणी विनियमातील तरतुदीला विसंगत ठरणारी असल्यामुळे अमलात आणता येत नाही. गृहनिर्माण विभागाला देखील प्राधिकरणाच्या

कार्यालयाने दि. २८.११.२००७ रोजी पत्र क्र. ६०६८ अन्वये सदर ठराव रद्द करण्यात येईल असे कळविले आहे. या बाबींचा विचार करुन प्राधिकरणाचा ठराव क्र. ६०५५, दिनांक : ७.८.२००४ रद्द करण्यात येत आहे, असे शासनास कळविण्यात यावे.

बाब क्रमांक : २२७/११

विषय :- देवळाई औरंगाबाद येथे भारस्कर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना अल्प उत्पन्न गटांतर्गत १४८ घरे बांधून देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत - विनियम १३ (२) अंतर्गत.

ठराव क्रमांक : ६२९७ दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेतला की,

१) देवळाली, औरंगाबाद येथे म्हाडाला मिळालेल्या शासकीय जमिनीवर राबविण्यात येणा-या २४८ एल.आय.जी. या योजनेतील १४८ गाळयांची योजना भारस्कर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांसाठी राबविण्याकरीता सदरहू संस्थेने केलेली मागणी म्हाड मिळकत व्यवस्थापनाशी संबंधीत असलेल्या विनियम १९८१ मधील विनियम क्र. १३ (२) अन्वये मंजुरी देण्यात येत असून विनियमातील तरतुदीप्रमाणे या प्रस्तावास शासनाची मंजुरी घेण्यासाठीचा प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

२) सदरहू योजना ही भारस्कर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांसाठी राबवावयाची असल्याने पूर्वनामनिर्देशील सभासदांच्या बाबत

गृहनिर्माण विभागाने विनियम १३ (२) ला अनुसरुन जारी केलेल्या दि. ८.२.२००७ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद-१ मधील तक्त्यातील अ.क्र. ५ ला अनुसरुन व परिच्छेद-३ ला अनुसरुन शासनाकडून निर्णय होणे आवश्यक आहे. शासनाच्या मंजूरीच्या आदेशानंतरच योजना घेण्यात यावी.

३) या योजनेतील लाभधारकांनी सदनिकांच्या किंमतीपोटी मंडळाला अदा करावयाची रक्कम ही स्वतः उभारावयाची आहे जसे, की योजनेतील लाभधारकांनी कोणत्याही वित्तीय संस्थेकडून अथवा बँकेकडून कर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते सहकार्य तथा ना हरकत प्रमाणपत्र मंडळाकडून देण्यात येईल. लाभधारकांनी सदनिकेच्या किंमतीच्या २० टक्के रक्कम अर्जासह मंडळाकडे भरणा करावी त्यानंतर मंडळ कर्जासाठी NOC देईल व उर्वरित ८० टक्के रक्कम बँकेकडून अथवा वित्तीय संस्थेकडून लाभार्थींने कर्ज मिळवून घेऊन ती रक्कम मंडळाकडे भरणा करावी. या प्रमाणे संपूर्ण रक्कम प्राप्त झाल्यानंतर योजना राबविण्यात यावी.

बाब क्रमांक : २२७/१२

विषय :- मौजा दत्तपूर व मौजा भिवापूर ता.जि.वर्धा येथील महारोगी सेवा समिती दत्तपूर यांच्या मालकीची २६.०० हे.

(अंदाजे ६५ एकर) जमीन म्हाडा (नागपूर मंडळ) साठी म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५२ अंतर्गत खरेदी करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६२९८ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

मौजा दत्तपूर व मौजा भिवापूर ता.जि.वर्धा येथील महारोगी सेवा समिती दत्तपूर यांच्या मालकीची २६.०० हे. (अंदाजे ६५ एकर) जमीन म्हाडा (नागपूर मंडळ) साठी म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५२ अंतर्गत खरेदी करणेबाबत

१) म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ५२ अंतर्गत तसेच शासनाने या कलमास अनुसरुन दिनांक : २९.३.२००८ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीस अनुसरुन मौजा-दत्तपूर व मौजा- भिवापूर, ता. जि. वर्धा येथील महारोगी सेवा समिती, दत्तपूर, वर्धा यांच्या मालकीची २५.६३ हेक्टर (अंदाजे ६५ एकर) जमीन *(जिल्हाधिकारी-वर्धा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने गृहनिर्माण विभागाने दिनांक : १६.९.१९९८ रोजीच्या पत्रान्वये जारी केलेल्या पूर्वीच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे)* उक्त संस्थेच्या प्राधिका-यांसह /संस्थेचे सचिव श्री. शर्मा यांच्यासह वाटाघाटी करुन रु. १३ लक्ष प्रती एकर या प्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्यास सुचविले आहे. या अहवालास अनुसरुन सदर जमीन रु. १३ लक्ष प्रती एकर या दराने सुमारे ६५ एकर (प्रत्यक्ष मोजणीला अधीन राहून) रु. ८ कोटी ४५ लाख या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

२) शासनाच्या दिनांक : २९.३.२००८ रोजीच्या मार्गदर्शक तत्वातील प्रमुख मुद्दा म्हणजे सदर जमीन ताब्यात घेतल्यानंतर त्यावरील योजना ३ वर्षाच्या कालावधीत सुरु करणे अनिवार्य राहील.

३) प्राधिकरणाच्या कार्यालयाने दिनांक : ९.११.२००४ रोजी जारी केलेल्या परिपत्रक क्र. ४७२१ मधील सुचनेनुसार कार्यवाही करावी. जमिनीवर कोणत्याही प्रकारचा बोजा नाही, जमीन गहाण नाही, इत्यादी बाबतची खात्री मुख्य अधिकारी / नागपूर मंडळ यांनी प्रथम करुन घ्यावी. जमिनमालकासह आवश्यक तो करारनामा करणे, ७/१२ च्या उता-यावर म्हाडाचे नांव नोंद करणे इत्यादी बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

४) सदरहू जमीन ही पब्लीक व सेमी-पब्लीक करीता आरक्षित असल्याचे कळविण्यात आले होते. सदर आरक्षण आता जिल्हाधिकारी यांनी दिनांक ९.६.२००८ रोजी बैठक घेऊन " रहिवासी " असे बदलून दिल्याचे मुख्य अधिकारी यांनी सांगितले आहे. सदरहू इतिवृत्ताची प्रत नगररचना विभागाने जारी केली आहे. या इतिवृत्तामध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरहू जमिनीच्या संदर्भात परिसर नकाशामधील सार्वजनिक व निम-सार्वजनिक क्षेत्र वगळून निवासी क्षेत्रात अंतर्भूत करण्याबाबत घेतलेला निर्णय राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येणार आहे, याप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच सदर जमीन खरेदी करण्याबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार करावी.

या ठरावाची स्थायी होण्याची वाट न पाहता, पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/१३

विषय :- स.क्र.४६३ वाशिम येथे अत्यल्प उत्पन्न गटाच्या ७४ घरांचे बांधकामासाठी प्राप्त निम्नतम दराच्या निविदेस मंजूरी बाबत.

ठराव क्रमांक : ६२९९ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

अमरावती मंडळांतर्गत स.क्र.४६३, वाशिम येथील अत्यल्प उत्पन्न गटाच्या ७४ घरांच्या बांधकामासाठी मे. शिलांश कॉर्पोरेशन अमरावती यांनी मंडळ स्तरावर

झालेल्या वाटाघाटीनंतर दिलेला सुधारित निविदा दर, जो चालू दरसूची २००७-०८ वर आधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या ६ % ने अधिक आहे व निविदा रक्कम रु. ८८,३७,९१३/- आहे, ती मंजूर करण्यात येत आहे.

या ठरावाची स्थायी होण्याची वाट न पाहता, पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/१४

विषय :- गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व) येथील उपहारगृह चालविण्यासाठी प्राप्त झालेल्या देकारावर निर्णय घेण्याचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक :६३०० **दिनांक : १३.६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व) येथील उपहारगृह चालविण्यासाठी मे. केळकर हॉटेल यांनी वाटाघाटीने वाढवून दिलेल्या रु. १२.३३ प्रती चौ.फुट प्रमाणे भाडयाची रक्कम दरमहा रु.४५,०००/- आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

खाद्य पदार्थाचे दर निविदेत नमुद केल्यानुसार राहतील खाद्यपदार्थ व त्यांच्या दराचे विवरण बाब टिप्पणीसह जोडलेल्या परिशिष्ट-'ए' प्रमाणे राहतील.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२७/१५

विषय :- मोतीवाणी चाळ, '' ई '' विभाग इमारत क्र.१३५-१४१ (१३७ अे) साने गुरुजी मार्ग, मुंबई या इमारतीच्या पुनर्रबांधणी योजनेच्या कामाच्या निम्नतम निविदेस मंजूरी घेण्याबाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६३०१ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

मोतीवाणी चाळ, '' ई '' विभाग इमारत क्र.१३५-१४१ (१३७ अे) साने गुरुजी मार्ग, मुंबई या इमारतीच्या पुनर्रबांधणीच्या योजनेच्या कामाची मे. इगल कन्स्ट्रक्शन यांची २०.७०% अधिक दराची (२००७-२००८ या दर सूचीवर ९.०६% अधिक दराची) मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे न्युनतम निविदा मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२७/१६

विषय :- इमारत क्र.४ माणिकजी स्ट्रीट व २५-२९ राजवाडकर स्ट्रीट, ३८ एडजली स्ट्रीट सी.एस.क्र.२२९ (भाग) २३० कुलाबा '' अ '' विभाग, मुंबई.

ठराव क्रमांक : ६३०२ दिनांक : १३.६.२००८

एकमताने निर्णय घेतला कीं,

इमारत क्र.४ माणिकजी स्ट्रीट व २५-२९ राजवाडकर स्ट्रीट, ३८ एडजली स्ट्रीट सी.एस.क्र.२२९ (भाग) २३० कुलाबा " अ " विभाग, मुंबई येथील मंडळाने वाटाघाटीने कमी केलेले दर २३.२६% अधिक दराची (२००७-२००८ दर सूचीवर १०.० % जादा इतक्या) दराची मे.कैलास महादेव यांची न्यूनतम निविदा मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२७/१७

विषय :- प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचा-यांना वैद्यकीय भत्ता वाढवून देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३०३ दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेतला की,

प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना वेतन देयकातून वैद्यकीय भत्ता म्हणून दरमहा रुपये ५००/- ठराव क्रमांक ५८६८, दिनांक : २४.१२.२००३ अन्वये देण्यात येत आहे. यामध्ये दरमहा रुपये २५०/- वाढ करुन दरमहा रुपये ७५०/- याप्रमाणे वेतन

देयकातून वित्तीय वर्ष २००८-२००९ पासून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२७/१८

विषय :- प्राधिकरणाचा सन २००६-२००७ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३०४ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

प्रशासनाने सादर केलेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००६-२००७ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा एकमताने स्विकृत करण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/२१

विषय :- महाराष्ट्र मुल्यवर्धित करनियम २००२ (व्हॅट) अंतर्गत सन २००६-२००७ चे लेखा परिक्षण करणेसाठी मे.राकेश जे.गांधी सनदी लेखापाल यांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३०५ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर नियम २००२ चे कलम ६१ (१) मध्ये शासनाने सुधारणा केली असून महाराष्ट्र मूल्यवर्धीत करनियम २००५ (लेव्ही ॲन्ड अमेंडमेंट) मूल्यवर्धीत कराचे लेखापरिक्षण करण्यासाठी मे. राकेश जे. गांधी, सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे. मे. राकेश जे. गांधी, सनदी लेखापाल यांना प्रस्तावित कामाकरीता वार्षिक व्यावसायिक फी रुपये २,४२,०९९ इतकी व्यवसायी फी अधिक सेवा आकार १२.३६% रुपये २९.९१२ = २७१९२१ तसेच कर्मचा-याच्या प्रत्यक्ष दौ-याकरीता प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे प्रवासखर्च अदा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २२७/२२

विषय :- अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळा अंतर्गत उमरखेड, अकोला येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत १२ बंगल्याच्या बांधकामासाठी प्राप्त निम्नतम दराच्या निविदेस मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३०६ **दिनांक : १३.६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

अमरावती मंडळांतर्गत स.क्र.१५/१, उमरखेड, अकोला येथील उच्च उत्पपन्न गटाच्या १२ बंगल्याच्या बांधकामासाठी, मे.इंदरदीप कन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी मंडळ स्तरावर झालेल्या वाटाघाटीनंतर दिलेला सुधारित निविदा दर, जो चालू दरसूची २००७-०८ वर आधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या १३.०५% ने अधिक आहे व निविदा रक्कम रु.१,६७,३५,३१६/- येत आहे, मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२७/२३

विषय :- पुणे मंडळाच्या आगरकर नगर, पुणे येथील कार्यालयीन इमारतीचे अंतर्गत सजावट व फर्निचर करण्याच्या कामाबाबत निविदा मंजूरीबाबत.. .. ..

ठराव क्रमांक : ६३०७ **दिनांक : १३.६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

पुणे मंडळांतर्गत आगरकर नगर, पुणे येथील कार्यालयीन इमारतीच्या अंतर्गत सजावट व फर्निचर करण्याच्या कामाबाबत, मे. बिपीन शहा ॲन्ड असोसिएटस, मुंबई यांनी दिलेल्या निम्नतम निविदा दर, जो अंदाजपत्रकीय रकमेच्या १०.१०% ने कमी आहे व निविदा रक्कम रु.२,२४,८६,२९८.६ आहे, मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२७/२४

विषय :- नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत भुसावळ येथील स. क्र. ११९/२ भाग उच्च उत्पन्न गटांतर्गत ६४/८२ गाळ्यांच्या निम्नतम दराच्या बांधकामाच्या निविदेस मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३०८ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

नाशिक मंडळांतर्गत स.क्र.१९९/२ भुसावळ येथील उच्च उत्पन्नउ गट ६४/८२ गाळयांच्या बांधकामासाठी मे. व्ही.पी. भंडारी यांनी वाटाघाटीनंतर दिलेला सुधारित निविदा दर जो दरसूची २००५-२००६ वर आधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या ५२.२५% अधिक आहे व निविदा रक्कम रु.३,९९,०२,८७३.६४ आहे, मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्रमांक : २२७/२५

विषय :- हिंदुस्थान टाईम्स वर्तमानपत्राने प्रसिध्द केलेल्या विशेष जाहिरातीचे रुपये १६ लाख रकमेचे देयक अदा करणेस प्राधिकरणाची मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्रमांक :६३०९ दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेण्यात आला की,

बाब टिप्पणीत सादर केलेल्या माहितीस अनुसरुन हिंदुस्थान टाईम्स या वर्तमानपत्राने प्रसिध्द केलेल्या विशेष जाहिरातीचे रु. १६.०० लाखाचे देयक शासनाच्या आदेशानुसार अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक २२७/२६

विषय :- जाहिरातीच्या खर्चास पूर्ण मंजूरी देण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष /प्राधिकरण यांना प्रदान करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३१० दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेतला की,

१) म्हाडा अंतर्गत तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी प्रशासन विभागाने दिलेल्या जाहिरातीची रुपये ४०,९३,७५१/-(रुपये चाळीस लाख त्र्याण्णव हजार सातशे एकावन्न) रकमेची देयके अदा केलेली आहेत. या अदा केलेल्या खर्चाच्या रकमेस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

२) ''प्राधिकरण ठराव क्र. ६२३६, दि. ११.२.२००७ मधील अ.क्र.५ प्रमाणे जाहिरातीच्या रु.५.०० लाख पर्यंतच्या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार

मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना राहतील असे अधिकार दिलेले होते, त्या ऐवजी आता जाहिरातीच्या संपूर्ण खर्चास मान्यता देण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना राहतील असे या ठरावाचे दिनांकापासून वित्तीय अधिकार प्रत्यायोजीत करण्यात येत आहे.''

मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी अशा प्रकरणी दिलेल्या मंजुरीस प्राधिकरणाची कार्योत्तर मंजुरी घेण्यात यावी.

बाब क्रमांक : २२७/२७

विषय :- प्राधिकरण व प्रादेशिक मंडळे यांच्या कार्यालयासाठी कर्मचारी आकृतीबंध सन २००८-२००९.

ठराव क्रमांक : ६३११ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत संक्रमण शिबिरासाठी बाब टिपण्णीत प्रस्तावित रकण्यांत आलेल्या १९५ अतिरिक्त पदांस मंजुरी देण्यात येते, ही पदे तांतडीने भरण्याबाबतच्या समर्थनासह शासनाकडे प्रस्ताव पाठवून शासनाची मान्यता घेण्यांत यावी. शासनाच्या मान्यतेनंतर योग्य त्या माध्यमातून आवश्यकतेनुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

बाब क्रमांक :२२७/२८

विषय :- विशेष नियोजन प्राधिकरण, नविन चंद्रपूर

शहरामधील विकास आराखडयामधील खेळाचे मैदान, करमणूकीचे मैदान, बगीचा, शाळा व कब्रस्तान या अंतर्गत आरक्षीत असलेल्या जमिनी म्हाडाच्या निधीतून संपादीत करण्याच्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३१२ दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेतला की,

१) विशेष नियोजन प्राधिकरण, नविन चंद्रपूर शहरामधील विकास आराखडयामधील खेळाचे मैदान, करमणूकीचे मैदान, बगीचा, शाळा व कब्रस्तान या अंतर्गत आरक्षीत असलेल्या जमिनी म्हाडाच्या निधीतून संपादीत करण्याबाबत मा.उप लोकआयुक्त / महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानसुार तसेच शासनाकडे झालेला पत्रव्यवहार विचारात घेता खाली नमूद करण्यात आलेल्या जमिनी संपादित करण्यास मान्यता देण्यात येते :---

अ. क्र.	**आरक्षण क्रमांक**	**आरक्षणाचे विवरण**	**जमिनीचे एकूण क्षेत्र हेक्टरमध्ये**	**जमिन संपादनाचा अंदाज दर प्रति हेक्टर**	**एकूण रक्कम रुपये**
१.	६,८,९,११,२१, ३७,४५,५०,६३, ६४,६७,७१,७२, ७४,९४,९५,९८, १०३,१०७,१११ ११३,१३०,१३६ १४१,१५०,१५६ (एकूण २६ आरक्षणे)	खेळाचे मैदान, बगीचा व कब्रस्तान	४५.९९ हे.	१६.८५ लक्ष रुपये	७७५.०० लक्ष रुपये (७.७५ कोटी)

२	४४	प्राथमिक शाळा	०.६५ हे.	३.०७ लक्ष	२ लक्ष
		एकूण	**४६.६४ हेक्टर**	-	**७७७ लक्ष (७.७७ कोटी)**

२) खुल्या जागा, बगीचा, शाळा व कब्रस्तान अशी एकूण ४६.६४ हेक्टर जमीन संपादीत करण्याबाबत व यासाठी म्हाडा निधीतून सुमारे रु. ७.७७ कोटी निधी खर्च करण्याबाबत नागपूर मंडळाच्या मुख्य अधिका-यांना निर्देश देण्यात आले आहेत, या केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

३) संपादन मुल्याबाबत संबंधित विशेष भूसंपादन अधिकारी (SLAO) यांच्या मार्फत ॲवार्ड अंतिम झाल्यावर रकमेत काही बदल झाल्यास त्यास मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी आपल्या स्तरावर मंजुरी देण्याकरीता मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

४) नविन चंद्रपूर वि.नि.प्रा.च्या विकासासाठी सदरचा अंदाजे रुपये ७.७७ कोटीचा निधी शासनातर्फे अनुदान म्हणून उपलब्ध करुन घेण्याकरीता वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी पाठपुरावा करावा.

५) शासनाच्या दिनांक २४/०१/२००८ रोजीच्या पत्रानुसार तूर्त हा खर्च करावयाचा असल्याने म्हाडाचे पुरवणी अंदाजपत्रकात रु. १०.०० कोटीची वाढीव तरतूद करण्यात यावी तसेच शासनास या रकमेच्या प्रतिपूर्तीसाठी शासकीय निधी योजनेखाली शासनाच्या पुरवणी अंदाजपत्रकात तरतूद करण्यास शासनास विनंती व शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/२९

विषय :- गट क्रमांक ७४ (भाग), देवळाई, औरंगाबाद येथे अल्प उत्पन्न गटाच्या १०० घरांचे बांधकामासाठी प्राप्त निम्नतम दराच्या निविदेस मंजुरी बाबत.

ठराव क्रमांक : ६३१३ दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेतला की,

औरंगाबाद मंडळांतर्गत गट क्र. ७४ (भाग), देवळाई, औरंगाबाद येथील अल्प उत्पन्न गटाच्या १०० घरांच्या बांधकामासाठी, मे. देवगिरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांनी मंडळ स्तरावर झालेल्या वाटाघाटीनंतर दिलेला सुधारित निविदा दर, जो दरसूची २००६-०७ वर आधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या ३७% ने अधिक आहे (चालू दरसूची २००७-०८ वर १५.९२% अधिक) व निविदा रक्कम रु.१,७६,२६,५५७/- येत आहे, मंजूर करण्यात येत आहे.

या ठरावाची स्थयी होण्याची वाट न पाहता, पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/३०

विषय :- रि.स.नं.२४९/अ-१/५५, नागाळा पार्क, कोल्हापूर येथील म्हाडाच्या रहिवाशी गाळे व व्यापारी गाळे

व कार्यालयीन गाळे व कार्यालयीन इमारतीतील मागणी न आलेल्या दुकान क्र.४ व बँक हॉल जाहिरातीच्या किंमतीनुसार केंद्र शासनाचा वस्त्रोद्योग खात्यास कार्यालयासाठी विकत देणेबाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६३१४ **दिनांक : १३.०६.२००८**

एकमताने निर्णय घेतला की,

रि.स.नं.२४९/अ-१/५५ नागाळा पार्क कोल्हापूर येथील म्हाडाच्या रहिवाशी गाळे व व्यापारी गाळे व कार्यालयीन गाळे व कार्यालयीन इमारतीतील मागणी न आलेल्या योजनेतील दुकान क्र. ४ व बँक हॉलची मागणी केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग खात्याने त्यांच्या कार्यालयासाठी मंडळाने डिसेंबर २००७ मध्ये जाहिरातीमध्ये दिलेल्या किंमतीनुसार मागणी केली आहे. पुणे मंडळाने डिसेंबर २००७ मध्ये जाहीर केलेल्या किंमतीस दुकान क्र.४ करीता रु. ५,०३,८८२/- व हॉलकरिता रु. २६,३२,९३०/- म्हणजे रु. ३१,३६,८१२/- या विक्री किंमतीस वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर वितरण हे निविदा पध्दतीने करण्यात येत नसल्याने तथापि थेट पध्दतीने करावयाचे असल्याने या प्रस्तावास गृहनिर्माण विभागाकडून मंजुरी घेण्यात यावी व त्यानंतरच सदरहू गाळयांचे वाटप केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग खात्याच्या कार्यालयासाठी करण्यात यावे. वाटपाच्या सर्व अटी व शर्ती जसे, स्थानीक सर्व प्रकारचे कर, एन.ए., लीजरेंट इत्यादी नियमानुसार देय्य राहील.

ठरावाची स्थायीकरणाची वाट न पाहता सदर प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/३१

विषय :- स.नं. २५७ सांगली येथील म्हाडाच्या व्यापारी गाळे, कार्यालयीन गाळे व उपविभागीय कार्यालय इमारतीतील मागणी नसलेले कार्यालयीन गाळे क्र. १ व २ जाहिरातीच्या किंमतीनुसार केंद्र शासनाच्या सी.आय.बी. (सेंट्रल इंटेलिजन्स ब्युरो) खात्यास कार्यालयीन कामासाठी विकत देणे बाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ६३१५ दिनांक : १३.०६.२००८

एकमताने निर्णय घेतला की,

स.नं.२५७ सांगली येथिल म्हाडाच्या व्यापारी गाळे, कार्यालयीन गाळे व उप विभागीय कार्यालय इमारतीतील मागणी नसलेले गाळा क्र. १ व २ ची मागणी जाहिरातीच्या किंमतीनुसार केंद्र शासनाच्या सीबीआय (सेन्ट्रल इंटेलिजन्स ब्युरो) खात्याने कार्यालयासाठी, मंडळाने डिसेंबर २००७ मध्ये दिलेल्या जाहिरातीतील किंमतीप्रमाणे मागणी केली आहे. पुणे मंडळाने डिसेंबर २००७ मध्ये जाहीर केलेल्या प्रती गाळा किंमतीस म्हणजे रु. ४,९९,७००/- याप्रमाणे २ गाळे रु.९,९९,४००/- या विक्री किंमतीस वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर वितरण हे निविदा पध्दतीने करण्यात येत नसल्याने तथापि थेट पध्दतीने करावयाचे असल्याने या प्रस्तावास गृहनिर्माण विभागाकडून मंजुरी घेण्यात यावी व त्यानंतरच सदरहू गाळयांचे वाटप केंद्र शासनाच्या सेंट्रल इंटेलिजन्स ब्युरोच्या कार्यालयासाठी करण्यात यावे. वाटपाच्या सर्व अटी व शर्ती जसे, स्थानीक सर्व प्रकारचे कर, एन.ए., लीजरेंट इत्यादी नियमानुसार देय राहील.

ठरावाची स्थायीकरणाची वाट न पाहता सदर प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२७/३३

विषय :- मुंबई मंडळाने दिनांक १६ एप्रिल, २००८ रोजी केलेला ठराव क्रमांक : २३१/२४५८ संदर्भात.

ठराव क्रमांक : ६३१६ दिनांक : १३.०६.२००८

एकमाताने निर्णय घेतला कीं,

अ) म्हाड कायदा १९७६ कलम २८ व २९ नुसार ज्या प्रकरणात विभागीय मंडळाची शिफारस आवश्यक असेल अशी प्रकरणे मंडळाची शिफारस घेऊन प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावीत व इतर प्रकरणे सध्या प्रचलित पध्दतीनुसार थेट प्राधिकरणाकडे सादर करण्यात यावीत.

ब) प्राधिकरणाकडून अथवा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडून मंजूर करण्यात आलेल्या महत्वाच्या धोरणात्मक प्रस्तावाची माहिती विभागीय मंडळाच्या केवळ माहितीस्तव पटलावर ठेवण्यास हरकत नाही.

क) प्राधिकरणाने अधिकार प्रदानता (Deligation of Power) संबंधित जे आदेश निर्गमित केले आहेत त्या सर्व आदेशांनुसार व ठरावानुसार मुंबई मंडळाने स्वतःचे अधिकार स्वतंत्ररित्या सक्षमपणे वापरावेत. तसेच मुख्य अधिकारी यांनी त्यांना

प्रदान केलेले अधिकार स्वतंत्रपणे वापरावेत. मुख्य अधिकारी यांना प्राधिकरणाने प्रदान केलेले अधिकार वापरण्यापूर्वी मंडळाची शिफारस घेण्याची आवश्यकता नाही.

ड) मुख्य अधिकारी यांनी घेतलेले महत्वाचे धोरणात्मक निर्णय मंडळाला आवश्यकतेनुसार माहितीकरीता अवगत करावेत.

उपरोक्त ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्तांताच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक :२०.०९.२००८ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित केलेल्या २२८ बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२८/२

विषय :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्थीत शिल्प गृहनिर्माण भवनात प्रस्थापित करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३१७ दिनांक : २०/०९/२००८

एममताने निर्णय घेतला कीं, म्हाडा मागासवर्गीय कर्मचारी संघटनेने मागणी केल्याप्रमाणे राष्ट्रपुरुष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्थीत शिल्प जे.जे.स्कूल ऑफ आर्ट मुंबई यांचेकडून प्रमाणित केल्यानंतर गृहनिर्माण भवनात प्रस्थापित करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

तसेच सदर शिल्प गृहनिर्माण भवनात प्रस्थापित करण्यास होणा-या खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/३

विषय :- मुर्तिजापूर, औरंगाबाद येथील स.क्र.३४ (भाग)
या जमिनीवरील ७३ मध्यम उत्पन्न गट भूखंड
पत्रकार सहकारी गृहनिर्माण संस्थेस म्हाड विनियम १३ (२)
नुसार देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३१८ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. औरंगाबाद मंडळाच्या मूर्तिजापूर,औरंगाबाद येथील स.क्र.३४/भाग, ३५/भाग येथील म्हाडाच्या लेआऊट मधील शिल्लक जमिनीवरील ७३ मध्यम उत्पन्न गटाची योजना औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी म्हाड मिळकत व्यवस्थापनाशी संबंधित असलेल्या विनियम १३ [२] खाली राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या विनियमातील तरतूदीप्रमाणे सदर प्रस्तावास शासनाकडून प्रथम मंजूरी करुन घेतल्यानंतरच या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

२. योजनेची अंमलबजावणी करण्यास पुढील अटी व शर्ती लागू राहतील.

२.१] ७३ भूखंडांपैकी ५ भूखंड रहिवाशी तथा व्यापारी प्रयोजनासाठी आहेत. म्हणजेच ६८ भूखंड निव्वळ रहिवाशी वापर व ५ भूखंड रहिवाशी तथा व्यापारी

वापरासाठी आहेत. रहिवाशी तथा व्यापारी प्रयोजनासाठी असलेले ५ भूखंड ज्या लाभार्थींना वाटप करण्यात येतील त्यांना प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे रहिवाशी वाटपाच्या जो दर/किंमत आकारण्यात येईल त्याच्या दुप्पट दर/किंमत आकरण्यात यावा. म्हाडाच्या धोरणाप्रमाणे येणारी किंमत लाभार्थींला अदा करावी लागेल. तसेच भूईभाडे, एन.ए.चार्जेस, प्रॉपर्टी टॅक्स इत्यादी सर्व कर लाभार्थीला भरावे लागतील.

२.२] गृहनिर्माण विभागाने दिनांक ८-२-२००७ रोजीच्या शासन निर्णयाप्रमो दिलेल्या मार्गदर्शक सूचनेतील तरतूद-३ ला अनुसरुन या योजनेतील जाहिरात काढण्याचे हक्क शासनाने राखून ठेवले असल्याने त्याबाबतचे आवश्यक ते आदेश गृहनिर्माण विभागाने जारी करावेत. दि.८-२-०७ च्या शासन निर्णयामध्ये पत्रकारांची पात्रता ठरविण्याचे निकष दर्शविले आहेत. ते जसेच्या तसे म्हाडाच्या इतर निकषासह लागू राहतील.

२.३] शासनाच्या निर्देश तथा मंजूरीनंतर लाभार्थीना भूखंडांचे वाटप केल्यावर त्यावर बांधावयाच्या घरांचा नकाशाची मंजूरी स्थानिक प्राधिकरणाकडून लाभार्थींना परस्पर घ्यावी लागेल. त्यासाठी स्थानिक प्राधिकरणाकडे अदा करावयाचा संपूर्ण खर्च लाभार्थीला भरावा लागेल. लाभार्थींनी मंजूर नकाशाची प्रत मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना सादर करणे बंधनकारक राहील.

२.४] स्थानिक विकास प्राधिकरण /संस्थेचे वेळोवेळी आकारले जाणारे कर लाभार्थीं पत्रकारांनी परस्पर भरावेत.

२.५] या योजनेतील भूखंडाचे सरासरी क्षेत्रफळ सुमारे ७५ चौ.मी.आहे. प्रत्यक्षात हे क्षेत्रफळ जास्त असल्यास नियमातील तरतूदीप्रमाणे त्याची आकारण्यात येणारी किंमत मंडळाला भरावी लागेल.

२.६] इतर सुविधा जसे पाणीपुरवठा, वीज, रस्ते इत्यादींसाठी संबंधित स्थानिक संस्थेकडे लाभार्थींनी पाठपुरावा करुन त्याचे शुल्क भरुन त्या उपलब्ध करुन घेणे बंधनकारक राहील.

२.७] म्हाडाच्या नियमित योजनेतील लाभार्थींना लागू योजनेतील अटी शर्ती या योजनेतील लाभार्थींना जसेच्या तसे लागू राहतील.

२.८] नियमाप्रमाणे या योजनेमध्ये एससी, एसटी, डीटी/एनटी करीता आरक्षण लागू असेल व या प्रवर्गातील लाभार्थीं पत्रकारांनी त्याचे पुरावे मंडळाकडे सादर करुन पात्रता ठरवून घ्यावी लागेल, म्हणजेच प्रचलित नियमाप्रमाणे या प्रत्येक प्रवर्गाचे आरक्षणा एवढे भूखंड योजनेत ठेवणे बंधनकारक राहील.

३. वरील ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता सदर प्रस्ताव गृहनिर्माण विभागाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

बाब क्रमांक : २२८/४

विषय :- औरंगाबाद, लातूर अतिरिक्त एम.आय. डी. सी. येथील म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवर म्हाड विनियम १९८१ (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिका अदलाबदली) मधील विनियम १३ (२) अंतर्गत गुमास्ता कामगारांना (पूर्वनिश्चित लाभार्थी) ९९१ अविकसीत भूखंड वाटप करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३१९ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. औरंगाबाद मंडळाच्या लातूर येथील एम.आय.डी.सी.कडून मिळालेल्या १५ हे.जमिनीवरील आराखडे / रेखांकनातील ९९१ अत्यल्प उत्पन्न गट, ९६ मध्यम उत्पन्न गट, ३१ उच्च उत्पन्न गट व इतर सुविधा भूखंड योजनेतील, ९९१ अत्यल्प उत्पन्न गटाचे अविकसित भूखंड राष्ट्रीय गुमास्ता मंडळ, लातूर यांच्या गुमास्ता सभासदांसाठी योजना राबविण्यास, म्हाडाच्या मिळकत व्यवस्थापनाशी संबंधित असलेल्या विनियम १९८१ मधील विनियम १३ [२] या '' गुमास्ता '' विशेष प्रवर्गासाठी योजना राबविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

गुमास्ता हा प्रवर्ग शासन निर्णयातील परिच्छेद १ च्या तक्त्यातील अ.क्र.५ प्रमाणे यास विशेष प्रवर्ग म्हणून शासनाच्या संमतीला अधीन राहून सदर विनियमातील तरतूदीप्रमाणे या योजनेसाठी शासनाची पूर्व परवानगी /मंजूरी घेण्यात यावी.

२. या योजनेला पुढील अटी शर्ती लागू राहतील.

२.१] गृहनिर्माण विभागाने दि.८-२-२००७ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयातील अटी, शर्ती तसेच म्हाडाच्या नियमित योजनेतील अटी, शर्ती लागू राहातील.

२.२] शासनाच्या दिनांक ८-२-०७ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ मध्ये शासनाने जाहिराती संदर्भात हक्क राखून ठेवले आहेत. गुमास्ता प्रवर्गासाठी जाहिरात देवून अर्ज मागविण्यात यावेत की, गुमास्ता मंडळाने दिलेल्या यादीतील सदस्यांना भूखंडाचे वाटप करावेत याबाबतचे स्पष्ट आदेश शासनाकडून घेण्यात यावेत.

२.३] या योजनेमध्ये सुमारे ४८ चौ.मी.चा अविकसित भूखंड रु.१९,०००/- या परिगणित केलेल्या किंमतीला विकण्यात येईल. ही किंमत भूखंडाच्या वाटपाच्या दिनांकापर्यंत भांडवलीकरणाने परिगणित करुन तद्नुसार लाभार्थींना भूखंडाची किंमत अदा करावी लागेल. किंमत एकरकमी वसूल करण्यात यावी.

२.४] उक्त ठिकाणची जमीन एम.आय.डी.सी.कडून घेतली असल्याने या जमिनीच्या संदर्भातील एम.आय.डी.सी.सह करारनामा प्रथम करुन घ्यावा व त्यानंतरच या योजनेची अंमलबजावणी करावी. एम.आय.डी.सी.च्या अटी शर्ती या गुमास्ता प्रवर्गाच्या लाभार्थ्यांना जशाच्या तशा लागू राहतील.

२.५] सदर जमिनीवरील आराखडयाला एम.आय.डी.सी./ सक्षम प्राधिकरणाकडून मंजूरी घेतल्यानंतरच योजनेची अंमलबजाणी तथा भूखंडाच्या वाटपाची कार्यवाही करावी. प्रत्यक्षात मंजूर रेखांकनामध्ये जर भूखंडाच्या क्षेत्रामध्ये फरक असल्यास प्रत्यक्षात भूखंडाच्या मापाप्रमाणे विक्री किंमत आकारण्यात येईल व ती लाभार्थींनी मंडळाला भरणे बंधनकारक राहील.

२.६] भूखंड वाटपासाठी आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे तसेच सदरहू योजनेच्या गुमास्ता लाभार्थींनी, शासनाच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नसल्याचे, त्याचप्रमाणे भविष्यात घेण्यात येणार नसल्याचे हमी पत्र मंडळाला सादर करावे.

२.७] एम.आय.डी.सी.च्या प्रचलित धोरणाप्रमाणे आवश्यक सेवा शुल्क] सध्याच्या दर रु.३/- प्रति चौ.मी.] लाभार्थींना एम.आय.डी.सी.ला भरावे लागेल.

२.८] भूखंडाचे वाटप केल्यानंतर भूखंडाचे सबलीज होऊन भूखंड संबंधित लाभार्थींच्या नावे जोपर्यंत हस्तांतरित होत नाही तोपर्यंत सेवा शुल्काची रक्कम म्हाडाला अदा करावयाची झाल्यास ती रक्कम लाभार्थींनी मंडळाकडे / म्हाडाकडे भरावी. ही रक्कम भरण्यासाठी लाभार्थी स्वतः तसेच गुमास्ता मंडळाची संस्था " जॉईन्टली व सेव्हरली " जबाबदार असेल. त्यात कसूर झाल्यास ती वसूल करण्याची कार्यवाही कायद्याच्या तरतूदीप्रमाणे मंडळाला करता येईल.

२.९] लाभार्थी / लाभार्थी संस्थांना त्यांना देण्यात येणा-या भूखंडावरील घरांच्या बांधकामाच्या नकाशांना एम.आय.डी.सी.कडून तथा स्थानिक संस्थेकडून परवानगी घ्यावी लागेल. नकाशांना परवानगी घेताना एम.आय.डी.सी.च्या स्थानिक संस्थेच्या नियमाप्रमाणे प्रचलित विकास खर्च [सध्या रु.८/- चौ.मी.] बांधकाम शुल्क म्हणून एम.आय.डी.सी.ला लाभार्थी / लाभार्थी संस्थेला अदा करावा लागेल. गुमास्ता लाभार्थीं संस्थेने बांधकामाची परवानगी एम.आय.डी.सी.कडून परस्पर घ्यावी व तद्नुसार बांधकाम करावे, विना परवानगी केलेले बांधकाम हे अनधिकृत समजले जाईल. बांधकामास परवानगी मिळविण्यासाठी म्हाडा जबाबदार राहाणार नाही.

२.१०] गुमास्ता लाभार्थी तथा लाभार्थी संस्था यांनी सर्व मुलभूत सोई-सुविधा जसे मलःनिस्सारण, पाणी पुरवठा, बाहय विद्युतीकरण, पाणी पुरवठयाची जोडणी, पावसाळयाच्या पाण्याची गटारे इत्यादी सुविधा संबंधित खात्याकडे पाठपुरावा करुन स्वखर्चाने उपलब्ध करुन घ्याव्यात. या सुविधा पुरविण्यासाठी म्हाडा जबाबदार राहणार नाही किंवा या सुविधांसाठी कोणत्याही प्रकारचा खर्च म्हाडा करणार नाही.

२.११] पाणी पुरवठयाच्या जोडणीच्या संदर्भात पाणी पट्टीचे देयक गुमास्ता लाभार्थीं किंवा गुमास्ता लाभार्थी संस्था यांच्या नावे असणे अपेक्षित आहे. जर पाणी पुरवठयाची जोडणी म्हाडाच्या नावे असल्यास त्याचे संपूर्ण शुल्क गुमास्ता संस्थेला म्हाडाकडे भरावे लागेल. तथापि पाण्याची जोडणी ही लाभार्थींच्याच नावे घेवून त्याची देयके एम.आय.डी.सी.कडे परस्पर अदा करावीत.

२.१२] म्हाडाच्या नियमित योजनेतील सर्वसामान्य जनतेसाठी त्यांची पात्रता ठरविण्यासाठी लागू असलेल्या अटी व शतर्शी गुमास्तांच्या या योजनेसाठी लागू असतात. जसे उत्पन्न, १५ वर्षाचे वास्तव्य व शासन निर्णय दि.८-२-२००७ मधील अटी, शर्ती इत्यादी जशाच्या तशा लागू राहतील.

३. ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता शासनाच्या संमती / मंजूरीसाठी या योजनेचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

बाब क्रमांक : २२८/५

विषय :- नविन चंद्रपूर येथील विकास केंद्र क्र.४ मधील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाच्या वाटपाबाबत.

ठराव क्रमांक : ६३२० **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, नविन चंद्रपूर येथील विकास केंद्र क्र. ४ मधील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या १५,५०० चौ.मी. चे नेहमीच्या अटी व शर्तीला अनुसरुन पुढील संस्थांना प्राधान्य क्रमांकाने वितरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

२. **<u>प्राधान्य</u>**

प्राधान्य [१] विदर्भ ग्रामविकास शिक्षण मंडळ, चंद्रपूर.

प्राधान्य [२] आदर्श शिक्षण मंडळ, चंद्रपूर.

३. सदर भूखंडाची अंदाजित किंमत रु. ५१.८८ प्रति चौ.फू. प्रमाणे रु. ८६,५२,०००/- काढण्यात आली आहे. भूखंडाचे प्रत्यक्षात वितरण ज्या दिवशी होईल त्या दिवसापर्यंत भांडवलीकरण करुन येणारी किंमत संस्थेला भरावी लागेल. भू भाडे, अकृषिक कर [NA] इत्यादी कर लागू राहतील. माध्यमिक शिक्षणाच्या प्रयोजनासाठी असलेल्या भूखंडाचे वितरणासंदर्भात लागू असलेल्या अटी व शर्तीची पूर्तता संस्थेला करावयाची आहे. भूखंडाचा ताबा - अधिमूल्य इ. चा भरणा व करारनामा केल्यानंतर देण्यात यावा.

४. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यासाठी मुख्य अधिकारी / नगापूर मंडळ यांना कळविण्यात यावे.

बाब क्रमांक : २२८/६

विषय :- मिळकत व्यवस्थापनाच्या विनियम १९८१ मधील विनियम क्र. १३ (२) अन्वये विशिष्ट प्रवर्गासाठी राबवावयाच्या योजनेची अंमलबजावणी करण्याची पध्दत.

ठराव क्रमांक : ६३२१ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाड कायद्याला अनुसरुन असलेल्या मिळकत व्यवस्थापन, विक्री, गाळयांची अदलाबदल विनियम १९८१ मधील विनियम क्र. १३ [२] अंतर्गत विशिष्ट प्रवर्गासाठी योजना घेण्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे कार्य प्रणालीवर मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात येत आहेत.

२. **<u>कार्यप्रणालीची मार्गदर्शक तत्वे</u> :-**

२.१] विभागीय मंडळाच्या अखत्यारीत आर्थिक वर्षामध्ये घेण्यात येणा-या योजनेतील जास्तीत जास्त १० टक्के सदनिका विनियम १३ [२] अंतर्गत शासनाने ठरवून दिलेल्या विशेष प्रवर्गासाठी योजना घेण्यात याव्यात.

२.२] योजनेतील सदनिकांच्या <u>वितरणाची जाहीरात देण्यापूर्वी</u>, जर शासनाने ठरवून दिलेल्या विशिष्ट प्रवर्गाकडून अर्ज प्राप्त झाले तर, (१० टक्क्यांपेक्षा जास्त नाही एवढया सदनिकांच्या संदर्भात) प्राप्त झालेले सर्व अर्ज गृहनिर्माण विभागाकडे पाठविणे व कोणत्या विशिष्ट प्रवर्गासाठी योजना घ्यावी व गाळयांचे वितरण कोणत्या पध्दतीने करावे याचे स्पष्ट आदेश प्राप्त करुन घ्यावेत. शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीपुढे प्रस्ताव सादर करावा.

२.३] योजनेची जाहीरात देण्याच्या दिनांकापर्यत जर विशिष्ट प्रवर्गातील गटाकरीता योजना घेण्यासाठी मागणी अर्ज नसतील तर विशिष्ट प्रवर्गासाठी १० %

सदनिका राखून ठेवण्याची आवश्यकता नाही, योजनेतील सर्व सदनिकांची जाहिरात मंडळाने द्यावी.

२.४] जाहिरातीच्या दिनांकापूर्वी विशिष्ट प्रवर्ग योजनेसाठी अर्ज प्राप्त झाले असतील व त्या संदर्भात शासनाचे आदेश प्राप्त झाले असतील तर जास्तीत जास्त १० टक्के सदनिका राखून ठेवाव्यात आणि उर्वरीत सदनिकांची मंडळाच्या मुख्य अधिका-याने विनियमाच्या तरतुदीनुसार जाहिरात द्यावी.

नियमातील तरतुदीप्रमाणे सर्वसामान्य जनतेसाठी, तसेच नियम १३ मधील सर्व आरक्षणे व शासन स्वेच्छाधिकारातील २% याप्रमाणे दर्शविलेल्या सर्व प्रवर्गासाठी सदनिका आरक्षित ठेवाव्यात.

२.५] शासनाने विशिष्ट प्रवर्गासाठी योजना राबविण्यास मंजुरी दिल्यानंतर व प्राधिकरणाने त्यानुसार घेतलेल्या निर्णयाप्रमाणे विशिष्ट प्रवर्गाच्या योजनेतील गाळे/भूखंडाच्या वितरणास म्हाड [डिस्पोझल ऑफ लॅण्ड] रुल्स १९८१ मधील नियम क्र.१३ तील २० टक्के सदनिका एससी, एसटी, डीटी, व एनटी साठी वितरण करणे बंधनकारक राहील.

२.६] विशिष्ट प्रवर्गामध्ये पूर्वघोषित लाभार्थी असल्यास व शासनाने पूर्वघोषित असलेल्या सदर सदस्यांनाच गाळे वितरण करण्याचे आदेश दिल्यास, त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. अन्यथा विशिष्ट प्रवर्गाच्या गटाकडून जाहीरातीव्दारे अर्ज मागविणे व एकूण सदनिकांपेक्षा अर्ज जास्त असल्यास सोडत काढून सोडतीत यशस्वी ठरणा-या व पात्र ठरणा-या अर्जदारांना सदनिकेचे वाटप करणे.

३. प्राधिकरणाच्या सदरहू निर्णयाप्रमाणे कार्यप्रणालीची वरील मार्गदर्शक तत्वे शासनाच्या मंजुरीसाठी गृहनिर्माण विभागाकडे पाठविण्यात यावीत. गृहनिर्माण विभागाने दि. ८.२.२००७ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाला अनुसरुन

म्हाडाच्या सदर कार्यप्रणालीच्या तत्वास अनुसरुन योग्य ते आदेश तथा शासन निर्णय जारी करावा अशी विनंती शासनास करण्यांत यावी.

४. प्राधिकरणाने सध्या प्रगतीपथावर असलेल्या सायन येथील व अन्य ठिकाणी विविध प्रवर्गाच्या योजनेसाठी हाती घेतलेल्या व सध्या पूर्ण झालेल्या अगर पूर्णत्वास असलेल्या योजनेतील गाळे विशिष्ट प्रवर्गासाठी प्राप्त झालेल्या अर्जांना अनुसरुन ठराव क्र. ६०२५ दि.१३.७.०४, ६०२६ दि.१३.७.०४, ६०२७ दि. १३.७.०४, ६०२८ दि. १३.७.०४, ६१४५ दि. ३१.१.०६ अन्वये [अनुक्रमे ब्रिचकॅन्डी हॉस्पिटलच्या कर्मचा-यांसाठी, टाटा मेमोरियल सेंटरच्या कर्मचा-यांसाठी, पत्रकारांसाठी, स्वयंभू कोकण संस्था, अपर विक्रीकर आयुक्त यांचे कर्मचारी व पोलीस कर्मचा-यांसाठी पारीत केलेले ठराव] पारित केले आहे व सदर ठराव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत. त्यासर्व ठरावांना ही मार्गदर्शक तत्वे लागू करावीत. [ठराव क्र. ६१२१ दि. २४.८.०५ [जजेस को.ऑ.हौ.सो. च्या संदर्भात] ला अनुसरुन निर्णय घेतला आहे.

५. प्राधिकरणाच्या आजच्या बैठकीतील विषय क्र. २२८/२० अन्वये गरजवंत सहकारी गृहनिर्माण संस्था व विधानमंडळ/सचिवालयातील अधिकारी/कर्मचा-यांची संस्था या प्रस्तावित केलेल्या विशेष प्रवर्गाच्या योजनांना ही मार्गदर्शक तत्वे लागू करावीत.

६. परिच्छेद ४ व ५ वरील सर्व ठरावाच्या बाबतीत, परिच्छेद २.१ ते २.६ वर नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेवून यापैकी विशेष प्रवर्गातील कोणत्या गटाला [१० टक्के पर्यत मर्यादित] सदनिकेचे वाटप करावे याचा निर्णय शासनाने घेण्यास विनंती करावी.

७. सदर ठरावाचे स्थायीकरणाची वाट न पाहता गृहनिर्माण विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

बाब क्रमांक : २२८/७

विषय :- स.नं.४३/३ अ वडगांवशेरी, पुणे या जमिनीवरील २३४ सोईसह भूखंड अत्यल्प उत्पन्न गटांतर्गत राबविलेल्या येाजनेतील १२१ भूखंड सर्वसाधारण आरक्षण निहाय जनतेसाठी व ११३ भूखंड म.न.पा. कर्मचारी लाभार्थ्यांपैकी फक्त मूळ भूखंडधारकांना जमिनीच्या मोबदल्याच्या वाढीव रक्कमेवरील व्याजाच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करणे व लाभार्थींना त्याची आकारणी न करणे.

ठराव क्रमांक : ६३२२ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, पुणे मंडळाच्या वडगांव शेरी येथील स.क्र.४३/३ अ जमिनीच्या संदर्भात मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार अदा करण्यात आलेल्या अतिरिक्त मोबदला रकमेवरील वसूल करावयाच्या व्याजाच्या रकमेच्या संदर्भात पुढीलप्रमाणे प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे.

१] २३४ भूखंड लाभधारकांपैकी सध्या फक्त १६५ मूळ लाभधारक/भूखंडधारक आहेत. पुणे मंडळाने अदा केलेल्या रु.१५ लाख या अतिरिक्त मोबदल्याची रक्कम / किंमत व व्याज भूखंडधारकांकडून/लाभधारकांकडून वसूल करावे. मात्र, योजनेतील <u>सध्या असलेल्या १६५ मूळ भूखंडधारकांना व्याज आकारण्याची गरज नाही.</u>

[२३४ पैकी १६५ मूळ भूखंडधारकांपुरते येणारे व्याज रु.२८,१७,७९२/- आकारु नये.]

२] ज्या मूळ लाभधारकांनी त्यांचे भूखंड अन्य व्यक्तीला विकले आहेत, व त्यापैकी काही भूखंडधारकांनी जमिनीची वाढीव किंमत व त्यावरील व्याजाचा भरणा मंडळाकडे केला आहे अशा प्रकरणात वसूल केलेली किंमत व व्याजाची रक्कम परत करण्यात येऊ नये. नियमित / हस्तांतरित केलेल्या ज्या भूखंड तथा लाभधारकांनी [

मूळ भूखंडधारक / लाभधारक नाहीत असे] अद्याप जमिनीची वाढीव किंमत भरली नाही ती किंमत व्याजासह अशा भूखंड लाभधारकांकडून वसूल करावी.

३] मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी या प्रकरणात संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करावी. अंतिम किंमत काढताना जमिनीचा अदा केलेला अतिरिक्त मोबदला तथा वाढीव रक्कम अंतिम किंमतीमध्ये समाविष्ट न करण्याची झालेली चूक ज्या कर्मचारी/ अधिका-यांनी केली आहे त्यांच्याकडून व्याजाची संपूर्ण रक्कम वसूल करावी लागेल. तथापि जबाबदारी निश्चित केल्यावर वस्तुस्थिती लक्षात घेवून जर व्याजाची रक्कम वसूल करता आली नाही तर ती निर्लेखित करावी किंवा नाही याबाबतचा निर्णय प्राधिकरणाच्या बैठकीपुढे घेण्यात यावा.

२. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता मुख्य अधिकारी / पुणे मंडळ व गृहनिर्माण विभागाला हा निर्णय कळविण्यात यावा.

बाब क्रमांक : २२८/८

विषय :- म्हाड अधिनियमातील कलम ५२ अन्वये खरेदीने संपादित करावयाच्या मौजे कोटमगाव, ता.निफाड येथील जमीन गट नं. १०१/२ <u>क्षेत्र ५.०३५ हेक्टर</u> मुल्यांकन समितीने ठरविलेल्या किंमतीस मान्यता प्रदान करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३२३ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं,

१] गृहनिर्माण विभागाने दि.२९-३-२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सिध्द गणका दरापर्यंतच्या किंमतीला जमीन खरेदी करण्याचे अधिकार विभागीय मंडळांच्या मुख्य अधिका-यांना प्रदान केले आहेत. या

तरतूदीला अनुसरुन मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी मौजे कोटमगाव,ता.निफाड गट क्र.१०१/२ ची ५.०३५ हे.जमीन रु.३४०/- प्रति चौ.मी.दराने खरेदी करण्याचा निर्णय घेवून त्याप्रमाणे येणारी रु.१,७१,१९,०००/- जमिनीची किंमत जमीन मालकास प्रदान करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास पुढील अटी, शर्तीला अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१.१] शासन निर्णय दिनांक २९-३-२००८ मधील परिच्छेद अ.क्र.४ नुसार या जमिनीवरील योजना ३ वर्षात सुरु करणे बंधनकारक / अनिवार्य असेल. ही जमीन '' लॅन्ड बँक '' म्हणून विनावापर ठेवता येणार नाही.

१.२] जमिनीच्या किंमतीची अदायगी करण्यापूर्वी जमीन मालकाची [जमिनीची किंमत प्राप्त करुन घेण्यासाठी कायद्याच्या दृष्टीकोनातून असलेली व्यक्ती / जमीन मालक] खात्री करुन घ्यावी.

१.३] या जमिनीच्या संदर्भात खरेदी विक्रीचा व्यवहार, खरेदी खत तथा करारनामा करुन घ्यावा. जमिनीवर कोणत्याही प्रकारचा बोजा / कर्ज / गहाण इत्यादी कोणतेही दायीत्व नाहीत याची प्रथम संपूर्ण खात्री करुन घ्यावी. कर्ज वा बोजा असल्यास तो काढून, जमीन कर्जरहीत / बोजारहीत झाल्याशिवाय जमिनीच्या खरेदीचा व्यवहार, किंमतीची अदायगी वा खरेदीचा करार करण्यात येवू नये. तसे केल्यास मुख्य अधिकारी हे त्यास स्वतः जबाबदार असतील.

१.४] प्रादेशिक योजनेमध्ये ही जमीन रहिवाशी क्षेत्रात जरी दर्शविली असली तरी या जमिनीवर अन्य कोणतेही आरक्षण घालण्यात आलेली नाही याची खात्री प्रथम करुन घेण्यात यावी.

१.५] ही जमीन आदिवासी क्षेत्र / आदिवासी किंवा सामाजिक वनीकरण इत्यादी अशा आरक्षणाने बाधीत नाही याची प्रथम खात्री करुन घ्यावी.

१.६] कलम ५२ अंतर्गत खरेदी करावयाच्या जमिनीच्या संदर्भात प्राधिकरणाने वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकातील कलमांची पूर्तता प्रथम करुन घ्यावी.

त्याचप्रमाणे जमिनीच्या मालकी हक्काविषयी कर्ज / गहाण / बोजाविषयी खात्री करुन घेण्यासाठी " लेटेस सर्च रिपोर्ट " प्रथम तयार करुन घ्यावा.

१.७] सदर जमिनीवर म्हाडाच्या प्रस्तावित योजनांसाठी आवश्यक अशा सर्व सुविधा, जसे वीज, रस्ते, पाणी, मलनिःस्सारण, इत्यादींची उपलब्धतता स्थानिक तथा शासकीय / निमशासकीय संस्थेकडून उपलब्ध होतील याची खात्री करुन घ्यावी.

१.८] जमीन खरेदी बाबतचा व्यवहार, खरेदीखत तथा करारपत्र इत्यादीं कार्यवाहीप्रमाणे ७/१२ च्या उता-यावर म्हाडाचे / नाशिक मंडळाचे नांव नोंदविणे बंधनकारक असेल.

१.९] जमीन खरेदीचा प्रत्यक्ष व्यवहार करण्यापूर्वी स्थानिक व जिल्हा स्तरावरील वर्तमान पत्रात म्हाडा [नाशिक मंडळ] ही जमीन खरेदी करीत असल्याबाबतचे जाहीर प्रगटन करुन या जमिनीच्या संदर्भात कोणतेही आक्षेप नाहीत किंवा गहाण / कर्ज / बोजा इत्यादी नाहीत याची खात्री करुन घ्यावी.

१.१०] मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी प्रस्तावात दर्शविलेल्या रु.३४०/- प्रति चौ.मी.या दराने जमीन खरेदी केल्यास म्हाडाची योजना आर्थिक दृष्टया सक्षम होईल असे दिनांक १५-९-०८ रोजीच्या टिप्पणी अन्वये [बाब टिप्पणीसह जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे] स्पष्ट केले आहे. हा निर्णय घेताना सदर बाब प्राधिकरणाने विचारात घेतली आहे.

१.११] मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी जमिनीच्या खरेदीच्या निधीची मागणी प्राधिकरणाच्या वित्त नियंत्रक विभागाकडे प्रस्ताव पाठवून करावी. अंदाज पत्रकात आवश्यक ती तरतूद वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी करावी.

२. प्राधिकरणाच्या ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता वरीलप्रमाणे जमीन खरेदी करण्यापूर्वी <u>सर्व प्रकारची पूर्व कार्यवाही</u> मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी

सुरु करावी. मात्र जमिनीच्या किंमतीपोटी जमीन मालकाला अदा करावयाच्या रु.१,७१,१९,०००/- ची अदायगी हा ठराव स्थायी केल्यानंतर करावी.

बाब क्रमांक : २२८/९

विषय :- म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५२ अंतर्गत खाजगी जमीन खरेदी करणेबाबत. मौजा गायमुखनगर, ता.पुसद, जिल्हा यवतमाळ येथिल सर्व्हे क्र.९/१, ९/१अ, ९/१ब, ९/१क मौजा ईटावा, ता.पुसद, जिल्हा यवतमाळ स.नं.८/१ब, एकूण क्षेत्रफळ ३.० हेक्टर आर (दोनही मौजा व स.नं.मिळून).

ठराव क्रमांक : ६३२४ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, मौजा गायमुखनगर, ता. पुसद, जि.यवतमाळ येथील सर्व्हे क्र. ९/१, ९/१अ, ९/१ब, ९/१क, मौजा ईटावा, ता.पुसद, जि. यवतमाळ स.नं. ८/१ब, एकूण क्षेत्रफळ ३.० हे. जमिनीचा दर हा प्रचलित सिध्द गणक दरापेक्षा [रु. २० ते २२.५ लाख प्रति हे.दरापेक्षा] खूपच जास्त म्हणजे रु. ५२.५० लाख प्रति हे. असून यावर प्रस्तावित केलेल्या योजनेचा विचार करता जमिन विक्रीचा सदर दर ५२.५० लाख प्रति हे. मान्य करण्यासारखा नाही. त्यामुळे ३ हेक्टर जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

२. सदर जमिनीचा दर हा प्रचलित सिध्द गणक दरानुसार योजना आर्थिक दृष्टया सक्षम ठरत असेल व सिध्दगणक दर जमीन मालक सिध्द गणक दर स्विकारण्यास तयार असल्यास मुख्य अभियंता-२/प्रा. यांनी उक्त जमिनीची पाहणी करुन आणि योग्ययोग्यता तपासून सदर जमीन गृहनिर्माण योजनेसाठी योग्य आहे किंवा नाही हे ठरवूनच हा प्रस्ताव विचारात घेणे योग्य होईल. तुर्त सदर प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

३. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता सदर निर्णय मुख्य अधिकारी / अमरावती मंडळ यांना कळविण्यात यावा.

बाब क्रमांक : २२८/१०

विषय :- म्हाडाच्या योजनांमधील गाळे वितरणासाठीच्या विविध संवर्गातील लाभार्थ्यांच्या उत्पन्नाच्या तसेच गाळयांच्या किंमतीच्या मर्यादेमध्ये वाढ.

ठराव क्रमांक : ६३२५ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडा स्वतःच्या निधीतून संपूर्ण महाराष्ट्रात ज्या योजना राबविल त्याकरिता संपूर्ण महाराष्ट्रासाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्या सुधारित प्रमाणपध्दतीस मंजूरी देण्यात येत आहे.

संवर्ग	प्रस्तावित अर्थसहाय्य प्रमाणपध्दत				
	उत्पन्न मर्यादा दरमहा	बांधकाम खर्चाची मर्यादा रु. लक्ष	व्याजदर	प्राथमिक अदायगीची रक्कम	परत फेडीचा कालावधी
अत्यल्प उ.गट	रु. ८०००/- पर्यंत	रु. २.५० लक्षपर्यंत	१० %	१५ %	१५ वर्ष
अल्प उ. गट	रु. ८००१ ते १२००० पर्यंत	रु. २.५० ते रु. ७.५० लक्षपर्यंत	१२ %	१५ %	१० वर्ष
मध्यम उ.गट	रु. १२००१ ते २०००० पर्यंत	रु. ७.५० ते १५.०० लक्ष पर्यंत	लाभाथ्याने स्वतः कर्ज उभारणी करावी.		
उच्च उ. गट	रु. २०००१/- पेक्षा जास्त	रु. १५.०० लक्षच्या वर			

बाब क्रमांक : २२८/१२

विषय :- सन् २००८-२००९ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात तरतूद नसलेल्या किंवा वाढीव खर्चाची अथवा जमेची पुरवणी अंदाजपत्रकीय तरतूद मंजूरीसाठी सादर.

ठराव क्रमांक : ६३२६ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, यप् २००८-२००९ च्या अर्थसंकलपीय अंदाजपत्रकात तरतूद नसलेल्या आणि मुख्य अभियंता- १ व २ / प्रा. यांच्याकडून प्रस्तावित करण्यात आल्यानुसार प्राधिकरणाचा ठराव क्र. ६३१७ दिनांक २७/०६/२००८ नुसार पूणे मंडळासाठी रु. ३.५० कोटी रक्कम व आता प्रस्तावित केलेली रु. १०९.९४ कोटी अशी एकूण रु. ११३.४४ कोटीच्या पूरक वाढीव खर्चाच्या तरतूदीस मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/१३

विषय :- आयकर खात्यास प्रपत्र क्रमांक १० सोबत प्राधिकरणाने द्यावयाचा ठराव.

ठराव क्रमांक : ६३२७ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं,

Resolved that entire revenue surplus fo MHADA for the Assessment Year 2008-09 corresponding to Financial Year 2007-2008, shall be utilized applied on the object fo MHADA during the next five consecutive financial years

beginning form 2008-2009 and particularly on schemes as mentioned in the budget for the financial year 2007-2008 as required U/S 11 of the Income Tax Act, 1961.

कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाच्या अंमलबजावणीस संमती देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/१४

विषय :- महाराष्ट्र मुल्य वर्धीत कर नियम २००२ (व्हॅट) अंतर्गत सन २००७-२००८ चे लेखा परिषण करणेसाठी मे.राकेश जे.गांधी, सनदी लेखापाल यांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३२८ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर नियम २००२ चे कलम ६१ (१) मध्ये शासनाने सुधारणा केली असून महाराष्ट्र मुल्यवर्धीत करनियम २००५ (लेव्ही ॲन्ड अमेंडमेंट) मूल्यवर्धीत कराचे सन् २००७-२००८ चे लेखापरिक्षण करण्यासाठी मे.राकेश जे.गांधी, सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे. मे.राकेश जे.गांधी, सनदी लेखापाल यांना प्रस्तावित कामाकरिता वार्षिक व्यावसायिक फी रु. २,४२,००९/- इतकी व्यवसायिक फी अधिक सेवा आकार १२.३६ टक्के रुपये २९,९१२ = २७१९२१. तसेच कर्मचा-यांच्या प्रत्यक्ष दौ-याकरिता प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे प्रवासखर्च अदा करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २२८/१६

विषय :- मे.अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, विक्रीकर सल्लागार यांच्या नेमणूकीचे नुतनीकरण व फी वाढ करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३२९ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र व्हॅट ॲक्ट २००२ वर्क्स कॉन्ट्रक्ट टॅक्स, सर्व्हीस टॅक्स इत्यादिं संबंधित व न्यायालयीन कायदेविषयक बाबी नियमानुसार पूर्तता करुन वेळीच कार्यवाही करण्याकरिता त्या विषयातील तज्ञांची आवश्यकता असल्याने मेसर्स अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल यांची सन् २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मे.अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल यांना नेमणूकीच्या कालावधीसाठी मासिक फी रुपये ४८,५००/- (रुपये अठ्ठेचाहीस हजार पाचशे) (अधिक सेवा शुल्क) फक्त मंजूर करण्यांत येत आहे.

मे.अे.व्ही.शाह ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल यांना नेमणूकीच्या कालावधीत मुंबई बाहेरील विभागीय मंडळाना भेटी द्याव्या लागतात. यासाठी त्यांना प्रत्यक्ष प्रवास खर्च प्राधिकरणाचे नियमाप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/१७

विषय :- म्हाडाच्या विविध बहुमजली इमारतीच्या व इतर वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुर्नबांधणीसाठी उर्वरित चटईक्षेत्र व अन्य फुटकळ भूखंड, करमणुकीचे मैदान इत्यादिसाठीच्या वाटपाबाबतच्या धोरणामध्ये सुधारणा करणेबाबतच्या ठराव क्र. ६२६०, दिनांक ४/०६/२००७ मधील धोरणात भागशः सुधारणा करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३३० **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाच्या विविध बहुमजली इमारतींच्या व इतर वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्बांधणीसाठी उर्वरित चटईक्षेत्र व अन्य फुटकळ भूखंड, करमणूकीचे मैदान इत्यादिसाठीच्या वाटपाबाबत म्हाडाच्या २२४ व्या बैठकीत क्र. ६२६० ठराव करण्यात येऊन या वाटपासंबंधिचे वितरण धोरण शासनाच्या पत्र क्र. वाटप ११०७/प्र.क्र. ३२४/गृनिभू, दिनांक १५/१०/२००७ च्या पत्रानुसार मंजूर करण्यात आले आहे. सदर प्राधिकरणाच्या ठराव क्र.६२६०, दिनांक ४/०६/२००७ मध्ये भागशः सुधारणा करण्यात येत असून त्या ठरावातील इतर मार्गाने उर्वरित चटईक्षेत्र प्राप्त केल्यास जसे कीं, विकास नियंत्रण नियमावली क्र. ३३ (२), (३) खालील तरतूदीनुसार व इतर मार्गाने उर्वरित चटईक्षेत्र प्राप्त केल्यास प्रचलीत रेडीरेकनरच्या दराच्या ५ टक्के आकारणी करुन ना-हरकत पत्र देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर भागशः सुधारणा शासनाच्या मंजूरी करिता शासनाकडे पाठविण्यात यावी परन्तु शासनाची मंजूरी प्राप्त होईपर्यंत सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता सुधारित दरानुसार यापुढील प्राप्त होणा-या

प्रस्तावांमध्ये अर्जदारांकडून भविष्यात फरकाची रक्कम भरणेबाबत हमीपत्र घेऊन कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/१८

विषय :- म्हाडाच्या पुरवणी अर्थसंकल्पात नविन चंद्रपूर शहर विकास कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३३१ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, नविन चंद्रपूर शहराकरिता म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली असून नविन चंपद्रपूर शहराच्या विकास कामाकरिता येणारा खर्च म्हाडाने म्हाडाच्या निधीतून करण्याच्या शासनाच्या सूचनांनुसार व बाब टिपणीत प्रस्तावित केल्यानुसार यावर्षी विकास कामांवर आवश्यक असलेला रु. ६५.४८ कोटींचा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून प्रथम करावा. त्यानंतर जस-जसा खर्च करण्यात येईल, तस-तशी शासनाकडून प्रतिपूर्ती करुन घेण्याची कार्यवाही म्हाडाच्या वित्त विभागामार्फत करण्यात यावी. याकरिता सन् २००८ - २००९ च्या सुधारित मागणीप्रमाणे रु. ६५.४८ कोटींची तरतूद म्हाडाच्या पूरवणी अर्थसंकल्पात करण्यात यावी. या प्रस्तावास प्राधिकरणाने मंजरी दिली.

या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास अनुमती देण्यात आली.

बाब क्रमांक : २२८/१९

विषय :- ११० कि.वॅ.च्या पश्चिम रेल्वेसाठी वीज पुरविण्यासाठी म्हाडाच्या देवीपाडा, मागाठाणे, बोरिवली (पूर्व), न.भू.क्र.२०७ जमिनीतून केबल टाकण्यासाठी परवानगी देणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३३२ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, मागाठाणे बोरिवली (पूर्व) येथील ११० किलो वॅटच्या पश्चिम रेल्वेसाठी वीज पूरविण्याच्या दृष्टीने मागाठाणे येथील म्हाडाच्या जमिन नगर भूमापन २०७ मधून टाटा कंपनी तर्फे भू-केबल टाकण्याकरिता ३१ डिसेंबर २००८ अगोदर पूर्ण करण्याचा कार्यक्रम निश्चित केल्याने सदर काम ठराविक वेळेत पूर्ण व्हावे म्हणून टाटा कंपनीच्या मागणीवर नियमानुसर आकारण्यात येणारी रक्कम भरल्यानंतर मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी " ना हरकत प्रमाणपत्र " देण्याकरिता मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२०

विषय :- गरजवंत सहकारी गृहनिर्माण संस्था (नि.) आणि विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी / कर्मचा-यांच्या नियोजित सहकारी संस्थेसाठी विनियम १३ (२) अंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३३३ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, गरजवंत सहकारी गृहनिर्माण संस्था आणि विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी / कर्मचा-यांची नियोजित सहकारी संस्था यांना विनियम १३ (२) अंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२१

विषय :- टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) या वसाहतीतील बाहय पाणी पूरवठा व्यवस्थेच्या पातळी वाढीच्या कामाच्या निवीदांवर निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३३४ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, टागोर नगर विक्रोळी (पूर्व) या वसाहतीतील बाहय पाणीपूरवठा व्यवस्थेच्या पातळी वाढीच्या कामाच्या प्राप्त झालेल्या निविदांचा मूळ वैधता कालावधी दिनांक १८/०६/२००८ पर्यंत होता. न्युनतम निविदाकार मे.बाबूलाल उत्तमचंद आणि कंपनी यांना सदर निविदा वैधता कालावधी. त्यांच्या दिंनाक ९/०९/२००८ च्या पत्रान्वये सदर निविदा वैधता कालावधी दिनांक १७/१०/२००८ पर्यंत वाढवून दिलेला आहे.

न्युनतम निविदाकार मे.बाबूलाल उत्तमचंद आणि कंपनी यांची निविदेतील सन् २००६-२००७ च्या दरासूचीवर आधारित रक्कम रु. १,५४,६०,१४५/- वरील

३८.७० टक्के अधिक दराची (सन २००७-२००८ या प्रचलीत दरसूचीव २४.०२ टक्के अधिक) व निविदा रक्कम रु. २,१४,४३,२२१.१० ची निविदा स्विकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाच्या कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२२

विषय :- सर्कस या करिता विविध वसाहतीतील मोकळी मैदाने तात्पूरत्या स्वरुपात भाडयाने देण्यासाठी दर ठरविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३३५ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, सर्कस करिता म्हाडाच्या विविध वसाहतीतील मोकळी मैदाने तात्पूरत्या स्वरुपात भाडयाने देण्यासाठी ॲम्पायर सर्कस यांच्या विनंतीवर तसेच भारत सरकार (Ministry of Human Resource Development Dept. of Youth affairs & Sports) यांचे पत्र दिनांक २०/०५/१९९४ च्या अनुषंगाने सर्कससाठी म्हाडाच्या जमिनीवर तात्पूरत्या स्वरुपात भाडयाने देण्यासाठी भुईभाडे रु. ५०/- प्रति १०० चौ.मिटर प्रतिदिन व त्यावर प्रतिवर्ष १० टक्के वाढीव दर प्रति दिन एकमताने निश्चित करण्यास आणि मागील म्हाडाचा ठराव क्र. ५५३२ मध्ये ठरविण्यात आलेले भूईभाडे फक्त सर्कससाठी रद्द करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाच्या कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२३

विषय :- मुबारक कॅाम्पेक्स, अचानक नगर, विनोबा भावे नगर, कुर्ला (प) येथील म्हाडाच्या जमिनीवर अतिक्रमण स्वरुपाने मदरसा नियमित करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३३६ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, मुबारक कॅाम्पेक्स अचानक नगर, विनोबा भावे नगर कुर्ला (प.) येथील म्हाडाच्या जमिनीवरील अतिक्रमीत मदरसा संवेदनशील भागात असल्याने सदर मदरसा नियमित करण्यापूर्वी गृहमंत्रालय (होम डिपार्टमेंट), बृहन्मुंबई महानगर पालिका तसेच रेल्वेचे ना हरकत प्रमाणपत्र घेवून त्यानंतर मुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ यांनी पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२८/२४

विषय :- मुख्य प्रशासकीय इमारत म्हाडा वांद्रे (पूर्व) येथील इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती, बाहेरील गिलावा , खिडक्या बसविणे इ. कामे करणे - निविदा स्विकृती.

ठराव क्रमांक : ६३३७ दिनांक : २०/०९/२००८

एकमताने निर्णय घेतला कीं, मुख्य प्रशासकीय इमारत म्हाडा वांद्रे (पूर्व) येथील इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती, बाहेरील गिलावा, खिडक्या बसविणे इ. कामे करण्याबाबतच्या मे.पी.बी.कन्स्ट्रक्शन कं. यांच्या १९.८० टक्के अधिक या दराच्या निविदेस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्रमांक : २२८/२५

विषय :- लोकमान्य नगर, दादर येथील एफ.पी.नं.-५८०,टी.पी.एस.-IV (माहीम डिव्हीजन), दादर (पश्चिम), या भूखंडावरील पुनर्विकास प्रकल्प संस्था, म्हाडा व विकासक यांनी संयुक्त रित्या (Joint Venture द्वारे) राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३३८ **दिनांक : २०/०९/२००८**

लोकमान्यनगर, दादर (पश्चिम) येथील मुंबई मंडळाच्या मालकीच्या एकंदर ११,९०४.४५ चौ.मि. जमिनी क्षेत्रावर २६४ रहिवाशी गाळयांचे पुनर्विकास प्रकल्प विकास नियंत्रण नियमावली क्र. ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत च.क्षे.नि. ४.०० नुसार लोकमान्य नगर प्रियदर्शनी सह.गृह.संस्था, म्हाडा व विकासक शितल सागर बिल्डर्स व डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी संयुक्तरित्या (Joint Venture द्वारे) राबविण्याबाबतच्या प्रस्तावास तसेच संस्थेने म्हाडासाठी मोकळा करुन दिलेल्या भूखंडावर जे बांधकाम म्हाडाला विकासकाने मोफत बांधून द्यावयाचे आहे त्याचा पुनर्वसन क्षेत्रात समावेश करण्याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेला शिफारस करुन मान्यता मिळविणे आणि सदर प्रकल्पातील आकडेवारी अंतिम निश्चित करणे, म्हाडाला प्राप्त होणा-या गाळयांचे क्षेत्रफळ ठरविणे व या संयुक्त प्रकल्पाबाबत अधिकच्या अटी, शर्ती आवश्यकतेनुसार ठरविण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना प्रदान करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाच्या इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२६

विषय :- दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड येथील वसाहतीचे म्हाडा व पोलीस सहकारी गृहनिर्माण संघटनेसोबत संयुक्त पुनर्विकास प्रकल्प राबविणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३३९ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड येथिल वसाहतीचे म्हाडा व पोलीस सहकारी गृहनिर्माण संघटनेसोबत संयुक्त पूनर्विकास प्रकल्प राबविणेबाबत महाराष्ट्र पोलीस को-ऑ.हौ.फेडरेशन मालवणी यांनी सादर केलेला प्रस्ताव मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे (S.R.A.) मंजूरीकरिता पाठवावा. तसेच वसाहतीमधील अंध व्यक्तींच्या आम्रपाली व यशोदिप सह.गृहनिर्माण संस्थांना महाराष्ट्र पोलीस सह.गृहनिर्माण संघटनेच्या गृहनिर्माण योजनेत समाविष्ट करण्यात यावे, असे ठरले. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने महाराष्ट्र पोलीस को-ऑ.हौ.फेडरेशन मालवणी यांनी सादर प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर त्यानुसार त्यास मंजूरी देणेबाबत प्रस्ताव म्हाडाच्या बैठकीत सादर करण्यात यावा.

सदर ठरावाच्या इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२७

विषय :- वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भूखंडांच्या वितरणासाठी मागविण्यात आलेल्या निविदांबाबत करावयाची कार्यवाही.

ठराव क्रमांक : ६३४० **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळाने ६७ भूखंडांची वर्तमान पत्रात जाहिरात देऊन भूखंडांच्या वितरणासाठी मागविण्यात आलेल्या निविदा या तत्कालीन उपाध्यक्ष / प्रा. यांनी पूर्ण निविदा प्रक्रिया रद्द केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यास अनुसरुन सर्व निविदाधारकांना त्यांच्या अनामत रकमा परत करण्यास व निविदा रद्द केल्याने या सर्व भूखंडावर म्हाडाने तात्काळ गृहनिर्माण योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाच्या कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२८

विषय :- समाज मंदिर हॉल गांधी नगर वांद्रे पूर्व येथील लिजवर मिळणेबाबत खालीलप्रमाणे संस्थांची मागणी -

१. इंटरनल चॅरीटीज ट्रस्ट.
२. गांधीनगर को-ऑप.हौ.सोसायटीज असोसिएशन लि.
३. खेरवाडी तालुका आरोग्य संस्था.

ठराव क्रमांक : ६३४१ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडाच्या सर्व वसाहतीतील समाज मंदिर हॅाल लिजवर देण्याबाबत निविदा मागवून, व विहीत पध्दतीनुसार लिजवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/२९

विषय :- कफ परेड कुलाबा येथिल संक्रमण शिबीराचा पुनर्विकास व संक्रमण शिबीरात राहणा-या भाडेकरुंचे कायमस्वरुपी पुनर्वसन.

ठराव क्रमांक : ६३४२ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, कुलाबा संक्रमण शिबीरातील भाडेकरुंच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी तेथेच प्रस्तावित पुनर्विकास येाजनेअंतर्गत २२५ चौ.फूट चटईक्षेत्रफळाचे २०० गाळे व उर्वरित गाळे १८० चौ.फुटाचे संक्रमण गाळे बांधण्यास व त्यामुळे या पुनर्वसन प्रकल्पाच्या नियोजनात होणारा-या बदलास मान्यता देण्यांत येते. कुलाबा संक्रमण शिबीरातील ज्या रहिवांशाचा / भाडेकरुंचा बृहत् सूचीमध्ये समावेश असेल अशाच भाडेकरुंना गाळयांचे मालकी तत्वावर वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२८/३०

विषय :- संक्रमण शिबीर व्यवस्थापनासाठी आवश्यक कर्मचारीवर्ग व त्यांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३४३ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, संक्रमण शिबीरात होणारी घुसखोरी व झालेली घुसखोरी पाहता कडक कार्यवाही करण्याकरिता संक्रमण शिबीर व्यवस्थापनासाठी १ पोलीस उपनिरीक्षक आणि ३ पदे हेड कॉन्स्टेबल आणि ७ पदे कॉन्स्टेबलची प्रतिनियुक्तीने म्हाडाच्या आस्थापनेवर भरण्याकरिता मंजूरी देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या मंजूरीस्तव पाठविण्यात यावा परन्तु या पदांची निकड लक्षात घेता शासनाच्या मंजूरीची वाट न पाहता कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाच्या कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२८/३१

विषय :- मुंबई शहरातील जुन्या उपकरप्राप्त, धोकादायक इमारतींच्या जागेवर व इतर अरुंद, बांधकामयोग्य / दुःसाध्य (unbuildable) भूखंडावर तात्पूरत्या स्वरुपाची संक्रमण शिबीरे बांधण्याबाबत प्रस्ताव. (Temporary Transit Shelters - TTS).

ठराव क्रमांक : ६३४४ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचनाकडे अरुंद तसेच आरक्षणीय बांधण्यायोग्य (Buildable Reservation) व दुःसाध्य भूखंडांवर (Non-Buildable) भूखंडावर तसेच धोकादायक इमारती पाडून त्या ठिकाणी तात्पूरत्या स्वरुपात संक्रमण शिबीरे बांधण्यास तात्वीक मंजूरी देण्यात येत आहे. तसेच प्रायोगिक तत्वावर विविध ठिकाणी सुमारे १०० सदनिका तात्पूरत्या स्वरुपाची संक्रमण शिबीरे बांधण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

मे.बी.जी.शिर्के या कंपनीचा म्हाडा बरोबर संक्रमण विकास करण्याचा अनुभव लक्षात घेता तसेच ते शासनाचे पूर्व अहर्ताप्राप्त ठेकेदार असल्यामुळे सदरचे विविध ठिकाणच्या सुमारे १०० सदनिकांच्या बांधकामाचा ठेका मे.बी.जी.शिर्के कंपनीला (Drmonstration Project) म्हणून थेट पध्दतीने (Special Circumstances) देण्यात येत आहे. बांधकामाचा दर व इतर बाबी निश्चित करण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना राहतील.

बाब क्रमांक : २२८/३२

विषय :- उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरु / रहवाश्यांची बृहतसूची बाबतच्या विनियम ३४ मध्ये सुधारणा.

ठराव क्रमांक : ६३४५ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन इ.) विनियम १९८१ चा विनियम ३४ मध्ये पुढीलप्रमाणे नव्याने तरतूद अंतर्भूत करण्यास व सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता शासनाकडे पाठविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

34 (6) Notwithstanding anything contained in regulation 34 (1) to 34 (5), the Competent Officer may also offer and provide permanent alternate accommodation in any buklding / tenement constructed by or through MHADA, to those temants / occupiers in the Master List who are willing to surrender their respective tenancy / occupancy rights in favour of MBR&R Board.

त्या अनुषंगाने अशाी तरतूद करण्यात येते कीं, म्हाड अधिनियमाचे कलम ९१ (५) मध्ये संपादित न केलेली उपकरप्राप्त इमारत जर मूळ मालकास पुनर्रचित करावयाची असेल तर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असल्याची तरतूद करण्यात आली आहे. सदरचे ना हरकत प्रमाणपत्र देताना ज्या रहिवाशांना मंडळाने पुनर्रचित जागेचे वितरण अगोदरच केलेले आहे. तितके गाळे मंडळास कोणतीही किंमत न आकारता विकासकाने द्यावेत अशी स्पष्ट अट ना हरकत प्रमाणपत्रात अंतर्भूत करण्यास मान्यता देण्यात येत आहे आणि सदर प्रस्ताव शासनाच्या मंजूरीस्तव शासनाकडे पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

बाब क्रमांक २२८/३३

विषय : जागतिक बँक अर्थ सहाय्यीत सांताक्रुझ-चेंबूर जोड रस्त्यामुळे नविन टिळकनगर, चेंबूर येथील बाधित इमारती क्र. १३१ ते १३४ व १४४ ते १५२ मधील गाळेधारकांच्या एम.एम.आर.डी.ए. मार्फत करावयाच्या पुनर्वसनाबाबत.

ठराव क्रमांक : ६३४६ **दिनांक : २०/०९/२००८**

एमकमाने निर्णय घेतला कीं, जागतिक बँक अर्थ सहाय्यीत सांताक्रुझ-चेंबूर जोड रस्त्यामुळे नविन टिळकनगर, चेंबूर येथील बाधित इमारती क्र. १३१ ते १३४ व १४४ ते १५२ मधील गाळेधारकांच्या एम.एम.आर.डी.ए. मार्फत करावयाच्या पुनर्वसनाबाबत खालील क्र.१ ते ८ प्रस्तावांच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१. मुंबई मंडळाच्या सुधारित अभिन्यासातील भूखंड क्रमांक " ए " व " बी " चे एकूण क्षेत्रफळ ४०९३.१७ चौ.मि., १-०० चटई क्षेत्र निर्देशांकासह चालू बाजारभावाच्या (प्रचलीत रेडीरेकनर दराने) विकसित भूखंडाच्या १०० टक्के दराने अधिमुल्याची आकारणी करुन वितरण करणे.

२. पूर्वी भाडेकरारनामा झालेल्या इमारत क्र. १३४ चा भाडेकरारनामा रद्द करुन नव्याने नोंद होणा-या २४० गाळयांच्या सहकारी संस्थेशी भाडेपट्टा करारनामा करणे. सदर भूखंडावरील प्रस्तावित इमारतींच्या बांधकामास ना हरकत प्रमाणपत्र देणे व सदर बाबतींत म्हाडाच्या प्रचलीत हस्तांतरण नियमानुसार कार्यवाही करणे.

३. नविन टिळकनगर वसाहतीचा सुधारित अभिन्यास मंजूर झाल्यानंतर त्यामधील उर्वरित बांधकाम क्षेत्रफळाचे प्रति गाळा सम प्रमाणात येणारे बांधकाम क्षेत्रफळाचे वितरण भूखंड क्रमांक " ए " व " बी " वरील गाळयांना करणे. या आधी देण्यात यावयाचे ११.२५ चौ.मी. चटईक्षेत्रफळ वगळून फरकाच्या चटईक्षेत्राची मागणी झाल्यास म्हाडाच्या प्रचलीत धोरणास अनुसरुन उर्वरित बांधकाम क्षेत्रफळाचे अधिमुल्याची व इतर अनुषंगिक शुल्काची वसूली सहकारी संस्थेकडून करणे. ११.२५ चौ.मि. चटईक्षेत्रफळाची किंमत म्हाडाच्या धोरणानुसार एम.एम.आर.डी.ए.कडून वसूल करणे.

४. सदर पुनर्वसन प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी एम.एम.आर.डी.ए.ची असेल. त्या अनुषंगाने एम.एम.आर.डी.ए.ने संबंधित प्रकल्प बाधित गाळेधारकांच्या संस्थेशी आवश्यक करारनामा करणे.

५. सांताक्रुझ-चेंबूर जोड रस्त्याने बाधित झाल्यामुळे अभिन्यासामध्ये मिळणारा वाढीव चटईक्षेत्राचा / टीडीआर फायदा म्हाडाकडे राहील व त्याचे वाटप म्हाडा प्रचलीत धोरणानुसार करेल.

६. प्रकल्प बाधित १३ इमारतींपैकी इमारत क्र.१३३ मधील एकूण २० गाळे हे तीन शासकीय संस्थांना सेवानिवासस्थानाच्या उद्देशाने म्हाडातर्फे वितरीत करण्यात आले आहेत. सदर इमारत पाडली जाणार असल्याने तीच्या सध्याच्या किंमतीप्रमाणे रक्कमेची भरपाई एम.एम.आर.डी.ए.तर्फे म्हाडास मिळावी. या २० सेवानिवासस्थानांच्या पुनर्वसनाची जबाबदारी पूर्णपणे एम.एम.आर.डी.ए.ची राहील.

७. सदर पुनर्वसनाच्या प्रकल्पासाठी एम.एम.आर.डी.ए., म्हाडा व सहकारी संस्था यांचेमध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्यात यावा.

८. वरील १ ते ७ मुद्यांबाबत कार्यवाही करण्यासाठी तसेच काही अनुषंगिक बाबींवर निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार मा.उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदर ठरावाच्या कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक २२८/३४

विषय : नेहरुनगर कुर्ला (पूर्व) वसाहतीतील इमारत क्र.४१ मधील गाळा क्र.११८७ व ११८८ च्या वितरणाबाबत.

ठराव क्रमांक : ६३४७ **दिनांक : २०/०९/२००८**

एकमताने निर्णय घेतला कीं, नेहरुनगर कुर्ला (पूर्व) या वसाहतीतील इ.क्र.४१ मधील गाळा क्र.११८७ व ११८८ हे दोन्ही गाळे श्री.अशोक बाबासाहेब भोसले यांना विहीत कार्यपध्दतीचे काटेकोर अनुपालन करुन दोन्ही सदनिका महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ मधील नियम ६४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन वितरीत करण्यास शासनाने दिलेल्या मान्यतेस प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाच्या इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २ जानेवारी २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित केलेल्या २२९ बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २२९/२

विषय :- स.क्र.७४/१ (भाग) सासवड, ता.पुरंदर, जिल्हा पुणे येथील भूखंडावर ३६ अल्प उत्पन्न गट सदनिकेच्या बांधकामाच्या निविदा स्विकृत करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३४८ **दिनांक : ८/१०/२००८**

२/०१/२००९

एकमताने निर्णय घेतला कीं,

पुणे मंडळांतर्गत स.क्र. ७४/१ (भाग), सासवड, ता.पुरंदर, जिल्हा पुणे येथील अल्प उत्पन्न गटाच्या ३६ सदनिकांच्या बांधकामासाठी, मे.अमर कन्स्ट्रक्शन यांनी मंडळ स्तरावर झालेल्या वाटाघाटीनंतर दिलेला सुधारित निविदा दर, जो दरसूची २००६-२००७ वर आधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या ४०.५ टक्के ने अधिक आहे (चालू दरसूची २००७-२००८ वर १९.४९ टक्के अधिक) व निविदा रक्कम रु. ८२,७६,४६२/- येत आहे, मंजूर करण्यात येत आहे.

या ठरावाची स्थायी होण्याची वाट न पाहता, पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२९/३

विषय :- म्हाडाच्या विविध बहुमजली इमारतींच्या व इतर वसाहतींमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्बांधणीसाठी उर्वरित चटईक्षेत्र व अन्य फुटकळ भूखंड, करमणुकीचे मैदान इत्यादिंसाठीच्या वाटपाबाबतच्या धोरणा मध्ये सुधारणा करण्याबाबतच्या ठराव क्र. ६२६०, दिनांक ४/०६/२००७ मधील धोरणात भागशः सुधारणा करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३४९ **दिनांक : २५/११/२००८**

२/०१/२००९

एकमताने निर्णय घेतला कीं,

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई मंडळाने २३५ व्या बैठकीत दिनांक २४/१०/२००८ रोजीच्या बैठकीत नियुक्त केलेल्या समितीने शिफारस केल्यानुसार व सदरहू प्रस्ताव मा.सभापती / मुंबई मंडळ यांनी त्यांचे गोपनीय पत्र क्र.२००, दिनांक २७/१०/२००८ अन्वये सादर केल्यानुसार खालीलप्रमाणे सुधारित अधिकार प्रदानतेस मान्यता देण्यात आली :

अ.क्र.	निर्णयाचा प्रस्ताव	सुधारित अधिकार प्रदानता
१	२	३
३	वसाहतीचे सुधारित भूअभिन्यास मंजूर करणे.	मा.उपाध्यक्ष / प्राधिकरण
५	फुटकळ भूखंड ठरविणे व वितरण करणे	मुंबई मंडळ
६	ना फुटकळ ना स्वतंत्रपणे विकासायोग्य असे भूखंड ठरविणे व वितरीत करणे.	मुंबई मंडळ

७	वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचे विविध संस्थांना वाटप या धोरणाप्रमाणे व ज्यामध्ये चटईक्षेत्रा अंतर्गत समाविष्ट होणारे व न होणारे बांधकाम प्रस्तावित आहे.	वसाहतीतील उर्वरित चटईक्षेत्राचे विविध संस्थांना वाटप या धोरणा प्रमाणे व ज्यामध्ये चटईक्षेत्रा अंतर्गत समाविष्ट होणारे व न होणारे बांधकाम प्रस्तावित आहे. मुंबई मंडळ.
८	वसाहतीतील सामायिक सुविधांची दुरुस्ती करणे, श्रेणीवाढ करणे, नवीन सुविधा उपलब्ध करुन देणे यासाठी चटईक्षेत्राची विक्री, टीडीआर ना हरकत प्रमाणपत्र देणे यातून प्राप्त होणारा निधी मंडळा मार्फत योजना राबवून खर्च करणे.	१०० % निधीपर्यंतची रक्कम मुंबई मंडळ
१०	वसाहतीच्या भू अभिन्यासातील करमणूकीचे मैदान १५ % व १० % (lay out R.G.P.G. or Garden) वितरण व स्थलांतरण करणे.	१५% व १०% करमणूकीच्या मैदानाचे वितरण व स्थलांतर करणे - मुंबई मंडळ
११	उर्वरित चटईक्षेत्र, फुटकळ भूखंड व ना फुटकळ, ना स्वतंत्रपणे विकास योग्य भूखंड या सर्वाच्या वितरणाबाबत आवश्यकतेनुसार वेळोवेळी वितरणाच्या इतर अटी व शर्ती ठरविणे.	मुंबई मंडळ
१२	विकास नियंत्रण विनियम ३३ (२), (३) नुसार मुंबई व इतर शहरासाठी इतर मार्गाने मिळणा-या नेहमीच्या अनुज्ञेय चटईक्षेत्रापेक्षा अधिकचा चटईक्षेत्र सामाजिक / शैक्षणिक / वैद्यकीय व इतर संस्थांना मंजूर करणे.	मुंबई मंडळ
१३	बाहेरील हस्तांतरणीय विकास हक्क विविध संस्थांना रहिवासी, व्यापारी व इतर वापरासाठी वापरण्यास परवानगी देणे.	मुंबई मंडळ.

मुंबई मंडळ अस्तित्वास नसल्यास वरील सर्व अधिकार मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. यांना राहतील.

प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६२६० ला शासनाने दिनांक १५/१०/२००७ रोजी मंजूरी दिलेली असल्यामुळे व ही बाब तातडीची असल्यामुळे या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्यात आला व या सुधारणांबाबत शासनाची मंजूरी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

बाब क्रमांक : २२९/४

विषय :- मुंबई शहरावरील दिनांक २६ नोव्हेंबर २००८ रोजीचा अतिरेक्यांचा हल्ला --- शहीद पोलीस अधिकारी, कर्मचारी व जवानांच्या नातेवाईकांचे पुनर्वसन.

ठराव क्रमांक : ६३५० **दिनांक : ६/१२/२००८**

२/०१/२००९

एकमताने निर्णय घेतला कीं, मुंबई शहरावरील दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या वर्ग-१ मधील पाच अधिका-यांच्या वारसांना वर्सोवा येथिल उच्च उत्पन्न गटातील ९६५ चौरस फुटाच्या ५ सदनिका व १३ पोलीस / जवानांच्या वारसांना सायन, प्रतिक्षा नगर येथील उच्च उत्पन्न गटाच्या ७७९ चौ.फुटाच्या १३ सदनिका विनामुल्य वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच यासाठी होणारा एकूण रुपये ०४,९६,८७,०००/- खर्च म्हाडाच्या निधीतून समायोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त अठरा शहीदांव्यतिरिक्त शासनाकडून आणखीन शासकीय / पोलीस / गृहरक्षक दलातील शहीदांची नांवे प्राप्त झाल्यास त्यांच्या वारसांना सदनिका वितरीत करण्याचे अधिकार उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

३. शहीद अधिकारी / जवान / पोलीस अधिका'यांच्या वारसांना म्हाडा मार्फत देण्यात येणा-या विनामुल्य सदनिकांच्या नोंदणीसाठी येणा-या नोंदणी शुल्क व मुद्रांक शुल्क यासाठी होणा-या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदर ठरावाची अंमलबजावणी या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी. तसेच यास शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

बाब क्रमांक : २२९/६

विषय :- म्हाडाचा ठराव क्र.५३४६, दिनांक २९/०९/१९९८ ला अनुसरुन सेवानिवास स्थान वितरणाकरिता ठरविलेल्या दिनांक ३१/०३/१९९९ च्या मार्गदर्शक तत्वाच्या परिपत्रकातील क्र. २-(ब) शिथील करुन परिविक्षा कालावधीवर असलेल्या अधिका-यांना सेवानिवासस्थान देण्याबाबत रिक्त १७ सेवानिवासस्थनांपैकी १२ करिता सिमीत केलेली उपाययोजना माहिती व संमतीसाठीचा प्रस्ताव).

ठराव क्रमांक : ६३५१ **दिनांक : २/०१/२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

(१) प्राधिकरणाचा ठराव क्र. ५३४६, दि. २९.९.१९९८ रोजी पारीत केलेल्या ठरावास अनुसरुन दि. ३१.३.१९९९ रोजी मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत. मार्गदर्शक तत्वामधे उपाययोजनेबाबत ठरावात केलेल्या सुचनेप्रमाणे मा.उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी परिविक्षा कालावधीवर असलेल्या १० अधिका-यांना सेवानिवासस्थाने वाटप करण्याच्या घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

(२) परिविक्षा कालावधीवरील अधिका-यांना / कर्मचा-याना सेवानिवासस्थानाचे वितरणाच्या संदर्भात दि. ३१.३.१९९९ रोजीच्या मार्गदर्शक तत्वात नमूद केलेली अट /तत्व क्र. २-(ब) योग्य नसल्याने ती पूर्णपणे वगळण्यात यावी, जेणेकरुन प्राधिकरणाच्या सेवेत असलेल्या तथा परिविक्षा कालावधीवर नियुक्त करण्यात येणा-या कर्मचारी अधिका-यांना सेवानिवासस्थानाचे वितरण जेष्ठतेनुसार/परिविक्षा यादीवरील अग्रक्रमाने करता येईल. सदर तत्व/अट २-(ब) रद्द केल्याबाबतच्या सुचनेचे परिपत्रक जारी करण्यात यावे.

ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

बाब क्रमांक : २२९/७

विषय :- दिवाणी दावा क्र.२०७९/८३, निकाल दिनांक ३०/०४/२००४, दिवाणी अपील क्र.३०१/ २००४ निकाल दि. २६/०७/२००५, दुसरे अपील क्र. १३२४/२००४ निकाल दिनांक २५/१०/२००५ अनुसार गोखलेनगर, पुणे येथिल एक उच्च उत्पन्न गट ६९७.७८ चौ.फुट सुपर बिल्टअप (४२१.०४ चौ.फुट चटईक्षेत्र) ची सदनिका श्री.पी.व्ही.अंतुरकर यांना रु. ४९,५०० /- या सन १९७७ चे किंमतीस (सुधारित रु. ६३,०००/-) तडजोडीने १८ टक्के व्याजाने देणेबाबत -- रिव्हयूव्ह पिटीशन क्र. १२/२००६.

ठराव क्रमांक : ६३५२ दिनांक : २/०१/२००९

एकमताने निर्णय घेतला की, श्री.पी.व्ही. अंतुरकर यांच्या प्रकरणात आतापर्यंत वेगवेगळया न्यायालयाने दिलेले निकाल दिवाणी दाव्याचा निकाल २०७९/८३ दि.३०-४-२००४, सिव्हील अपिल क्र.३०१/०४ चा निकाल दि.२६-७-२००५ व दुसरे अपिल क्र.१३२४/०५ चा निकाल दि.२५-१०-२००५ आणि दाखल करण्यात आलेले रेव्हयूव्ह पिटीशन क्र.१२/०६ तसेच असि.गव्हर्नमेन्ट प्लीडर यांनी श्री.पी.व्ही. अंतुरकर यांचे वकिल श्री. अनिल अंतुरकर यांच्या दिनांक २-१०-२००८ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या प्रस्तावाबाबत पत्र दि.२४-१०-२००८ अन्वये केलेली विचारणा लक्षात घेवून हे प्रकरण अंतिमतः निकाली काढण्यासाठी पुढील मुद्दयांना अनुसरुन कार्यवाही करण्यात यावी.

१] १९७७ सालच्या योजनेतील गाळयाची किंमत रु.६३,०००/- ठरविण्यात आली आहे. श्री.पी.व्ही. अंतुरकर यांनी आधी भरलेली रु.५०००/- वजा करुन रु.५८,०००/- वर १८ टक्के या सरळ व्याज दराने येणारी किंमत श्री.पी.व्ही. अंतुरकर यांनी म्हाडास भरावी.

२] मा.न्यायालयाच्या निकालाप्रमाणे गोखले नगर योजनेतील जी सदनिका राखून ठेवली आहे, व ज्याचे क्षेत्रफळ ४२१ चौ.फूट आहे, ती सदनिका श्री.पी.व्ही. अंतुरकर यांनी स्वीकारावी.

३] न्यायालयात दाखल केलेले व सुरु असलेली प्रकरणे मागे घेवून व त्यानंतर कोणत्याही प्रकारच्या, कोणत्याही न्यायालयात, कोणत्याही सबबीखाली श्री.पी.व्ही. अंतुरकर दावा दाखल करणार नाहीत.

याप्रमाणे वरील तिन्ही बाबी श्री.पी.व्ही. अंतुरकर मान्य करीत असतील तर हे प्रकरण अंतिमतः निकाली काढण्यासाठी असि.गर्व्हन्मेन्ट प्लीडर श्री.मॅटोज यांना मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी संमती पत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्राधिकरणाच्या स्थायी करणाची वाट न पाहता तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

बाब क्रमांक : २२९/८

विषय :- तिसगांव, औरंगाबाद येथील गट क्र.१०४/१ मधील प्राप्त शासकीय १०.३१ हेक्टर क्षेत्रावर लष्करी प्रशासनातर्फे वाद निर्माण झालेल्या आणि परत घेतलेल्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या व विकास केलेल्या गाळयांच्या खर्च रु. ६८.७४ लाख निर्लेखित करण्याचा प्रस्ताव.

ठराव क्र. :६३५३ **दिनांक :- २/०१/२००९**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

[१] तिसगांव येथील १०.३१ हेक्टर जमिनीच्या संदर्भात लष्कर प्रशासनाने दावा केलेल्या सुमारे २९६८.४२ चौ.मी. जमिनीचा वाद निकाली काढण्यासाठी सदर जमिनीची सुपरिटेंडेंट ऑफ लॅण्ड रेकॉर्ड यांना मुख्य अधिकारी यांनी पुन्हा स्वतंत्र अर्ज करुन जमिनीची मोजणी करुन घ्यावी तसेच हे प्रकरण त्या विभागाच्या वरिष्ठ पातळीवर व सेटलमेंट कमिशनर आणि जिल्हाधिकारी यांचेकडे पुन्हा संदर्भ करण्यात यावेत. ही कार्यवाही मुख्य अधिकारी यांनी तात्काळ सुरु करावी.

[२] म्हाडाकडे असलेली जमीन ही लष्कर प्रशासनाची असल्याचे एसएलआर, सेटलमेंट कमिशनर व जिल्हाधिकारी यांच्याकडून अंतिमतः निश्चित झाल्यास रु. ६८.७४ लक्ष ची मागणी [Demand Raise] महसूल विभागाकडे करावी.

[३] म्हाडाच्या जमिनीच्या संदर्भात झालेली चुक ही भूमी अभिलेख विभागाची असल्याने त्यांच्या विभागाने जबाबदारी निश्चित करावी असे विभागीय आयुक्त यांना कळविण्यात यावे.

[४] वर नमूद केलेल्या [१ ते ३] या सुचनेप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर बाधीत जमीनबाबतची मालकी ज्या विभागासाठी निश्चित होईल त्याप्रमाणे अंतिम निर्णयासाठीचा प्रस्ताव पूनः सादर करावा.

स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही सुरु करावी.

बाब क्रमांक : २२९/९

विषय :- मूदखेड जिल्हा नांदेड येथे स.नं.४५५(भाग) या जमिनीवर राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेतील मागणी अभावी रिक्त गाळयांची विल्हेवाट लावणेसाठी मूळ किंमतीत गाळे वाटप करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३५४ **दिनांक : २/०१/२००९**

प्रधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

(१) मुदखेड येथील योजनेतील गाळे अनेक वर्षांपासून रिक्त असल्यामुळे व ते रिक्त राहिल्यास म्हाडाचे अधिक आर्थिक नुकसान टाळण्यासाठी ई.डब्ल्यु.एस.चे गाळे रु. ४३,५००/- व एल.आय.जी.चे गाळे रु.६५,०००/- या किंमतीला ई.डब्ल्यु.एस. करीता आय.डी.पी. रु. ४५००/- व १० टक्के व्याज दर एल.आय.जी. करीता आय.डी.पी. रु. ६५००/- व १३.५ टक्के व्याज दराने १४ वर्षाच्या परतफेडीच्या धर्तीवर विक्री करण्यास संमती देण्यात येत आहे. नियमातील तरतुदीप्रमाणे जाहीरात देवून पुढील कार्यवाही मुख्य अधिकारी यांनी करावी.

(२) सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी जारी केलेल्या घरकुल योजनेद्वारे लाभार्थीना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते, असे अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी म्हाडाचे रिक्त गाळे या योजनेखाली लाभार्थीना उपलब्ध करुन देण्याचे पहावे व अनुदान प्राप्त झाल्यास ते एकूण किंमतीमध्ये समायोजीत करावे. याप्रमाणे प्रयत्न सुरु ठेवावेत, मात्र शासनाचे अनुदान मिळेपर्यंत वरील ठरावात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही सुरु ठेवावी. अनुदान मिळाल्यास त्या त्या प्रवर्गातील लाभार्थीच्या नांवे अनुदानवर्ग करुन एकूण किंमतीमधून ते समायोजीत करावे.

स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

बाब क्रमांक : २२९/१०

विषय :- मौ.बोरी, ता.जिंतूर, जि.परभणी या जमिनीवर राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेतील मागणी अभावी रिक्त गाळयांची विल्हेवाट लावणेसाठी मूळ किंमतीत गाळे वाटप करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३५५ **दिनांक : २/०१/२००९**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

१] मौ.बोरी, ता.जिंतूर, जि.परभणी येथील योजनेतील गाळे अनेक वर्षापासून रिक्त असल्यामुळे व ते रिक्त राहिल्यास म्हाडाचे अधिक भविष्यातील आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व म्हाडाचा अडकून पडलेला निधी मोकळा करण्यासाठी रिक्त असलेल्या १६१ गाळयांची विक्री रु.५३,५००/- या किंमतीला करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या रकमेपैकी आय.डी.पी.पोटी रु.५,५००/- व उर्वरित रु.४८,०००/- रक्कम १४ वर्षाच्या कालावधीत रु. ६३०/- या मासिक भाडेखरेदी हप्त्याने वसूल करण्यात यावी. गाळयाचे वाटप नियमातील तरतूदीप्रमाणे जाहिरात देवून करण्यात यावे.

२] सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी योजना जाहीर केली आहे. त्या योजनेतील लाभार्थींना या योजनेतील गाळे देवू केल्यास किंवा शासनाने लाभार्थी उपलब्ध करुन दिल्यास शासनाचे अनुदान गाळयांच्या एकूण किंमतीपोटी समायोजित करण्यात यावे.

मात्र शासनाचे अनुदान मिळेपर्यंत घरे वितरणाची कार्यवाही थांबवू नये व उपनिर्दिष्ट परिच्छेद [१] मध्ये नमूद केलेल्या किंमतीप्रमाणे गाळे विक्री करण्याची कार्यवाही सुरु करावी.

प्राधिकरणाच्या ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही सुरु करावी.

बाब क्रमांक : २२९/११

विषय :- भोकरदन जिल्हा जालना येथिल स.क्र.५४ (भाग) या जमिनीवर राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेतील मागणी अभावी रिक्त गाळयांची विल्हेवाट लावणेसाठी मूळ किंमतीत गाळे वाटप करण्याबाबत.

ठराव : ६३५६ **दिनांक : २/०१/२००९**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

(१) भोकरदन येथील योजनेतील गाळे अनेक वर्षापासून रिक्त असल्यामुळे व ते रिक्त राहिल्यास म्हाडाचे भविष्यात होणारे अधिक आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व म्हाडाकडील अडकून पडलेाल निधी मोकळा करण्यासाठी ७९ ई.डब्ल्यु.एस. व ८१ एल.आय.जी. गाळे अनुक्रमे रु. ५५,५००/- व रु. ८७,५००/- या किंमतीला भाडेखरेदी हप्त्यावर विक्री करण्यास संमती देण्यात येत आहे. या रक्कमेपैकी ई.डब्ल्यु.एस.च्या गाळेधारकांकडून आय.डी.पी.पोटी रु. ५५००/- व एल.आय.जी.करीता रु. ९,५००/- वसुल करुन उर्वरित रक्कम १० वर्षाच्या कालावधीमधे अनुक्रमे रु. ७१०/- व रु. १२००/- या मासिक हप्त्याने वसुल

करण्यात यावी. नियमातील तरतुदीप्रमाणे जाहीरात देवून पुढील कार्यवाही मुख्य अधिकारी यांनी करावी.

(२) सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी जारी केलेल्या घरकुल योजनेद्वारे लाभार्थीना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते तसेच सुविधांच्या खर्चापोटी शासनाकडून अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. म्हाडाचे रिक्त गाळे सामाजिक न्याय विभागाच्या योजनेखाली लाभार्थीना उपलब्ध करुन देण्याचे पहावे व अनुदान प्राप्त झाल्यास ते एकूण किंमतीमध्ये समायोजीत करावे, याप्रमाणे प्रयत्न सुरु ठेवावेत.

(३) मात्र शासनाचे अनुदान मिळेपर्यंत वरील ठरावात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही थांबवू नये ती सुरु करावी. अनुदान मिळाल्यास त्या त्या प्रवर्गातील लाभार्थीच्या नांवे अनुदानवर्ग करुन एकूण किंमतीमधून ते समायोजीत करावे.

स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

बाब क्रमांक : २२९/१२

विषय :- पहूर, ता.जामनेर, जिल्हा जळगांव येथील ६५ गाळे अत्यल्प उत्पन्न गट व ३२ गाळे अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना - रिक्त गाळे वाटपाच्या दृष्टीने घरांची किंमत बाजार भावापेक्षा २० टक्के कमी करणे व स्थिर ठेवणे.

ठराव क्रमांक : ६३५७ दिनांक : २/०१/२००९

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

१] पहूर, जि.जामनेर, जि.जळगांव येथील योजनेतील गाळे अनेक वर्षापासून रिक्त असल्यामुळे व ते रिक्त राहिल्यास म्हाडाचे भविष्यात होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व म्हाडाचा अडकून पडलेला निधी मोकळा होण्यासाठी रिक्त असलेले ५९ इडब्ल्यूएस व २१ एलआयजी गाळयांची किंमत अनुक्रमे रु.५८,०००/- व ९२,०००/- ने विक्री करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. या गाळयांची विक्री करण्यासाठी मुख्य अधिका-यांनी दोन पध्दतीचे पर्याय दिले आहेत.

१] एकरकमी पध्दतीने विक्री करणे व

२] भाडेखरेदी तत्वावर विक्री करणे.

यापैकी प्राधान्याने पहिला पर्याय प्रथम अंमलात आणावा. भाडेखरेदी हप्त्यावर गाळयाची विक्री करण्यासाठी इब्ल्यूएसकरिता १० टक्के (रु. ५३६/- मासिक हप्ता) व एलआयजीकरिता १२.२५ टक्के व्याज दर (रु. १०८०/- मासिक हप्ता) परतफेडीचा कालावधी २० वर्षे ठेवावा. गाळयाचे वाटप विनियमातील तरतूदीप्रमाणे जाहिरात देवून व योग्य त्या पध्दतीने अंमलात आणून करण्यात यावे.

२] सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी योजना जाहीर केली आहे. त्या योजनेतील लाभार्थींना या योजनेतील गाळे देवू केल्यास किंवा शासनाने लाभार्थी <u>उपलब्ध करुन दिल्यास</u> शासनाचे अनुदान गाळयांच्या एकूण किंमतीपोटी समायोजित करण्यात यावे.

मात्र शासनाचे अनुदान मिळेपर्यंत घरे वितरणाची कार्यवाही थांबवू नये व उपनिर्दिष्ट परिच्छेद [१] मध्ये नमूद केलेल्या किंमतीप्रमाणे गाळे विक्री करण्याची कार्यवाही सुरु करावी.

प्राधिकरणाच्या ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही सुरु करावी.

बाब क्रमांक : २२९/१३

विषय :- बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर येथील मागणी अभावी रिक्त असलेल्या १४ मध्यम उत्पन्न गट गाळयांची किंमत (रु.९०,००० प्रती गाळा) गोठवून वाटप करण्याबाबत.

ठराव क्र. ६३५८ दिनांक - २/०१/२००९

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

१] बल्लारपूर, चंद्रपूर येथील अनेक वर्षापासून रिक्त असल्यामुळे व ते रिक्त राहिल्यास म्हाडाचे भविष्यातील होणारे अधिक आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व म्हाडाचा अडकून पडलेला निधी मोकळा होण्यासाठी रिक्त असलेले १४ एम.आय.जी. गाळे हे मुख्य अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या रु. ९०,०००/- या किंमतीला विक्री करण्यासाठी प्राधिकरण मंजुरी देत आहे. जेणेकरुन गाळे रिक्त राहून अधिक नासधूस होवून म्हाडाचे अधिक नुकसान होणार नाही. मुख्य अधिकारी यांनी गाळयांचे वाटप संबंधित असलेल्या विनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही सुरु करावी.

२] सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेकरीता जाहिर केलेल्या योजनेअंतर्गत लाभार्थी <u>उपलब्ध झाल्यास</u> त्यांना शासनाचे मिळणारे अनुदान हे गाळयाच्या एकूण किंमतीतून समायोजित करण्याचे पहावे. मात्र शासनाचे अनुदान मिळेपर्यंत गाळे वितरणाची कार्यवाही थांबवू नये. व परिच्छेद १ मध्ये नमूद केलेले गाळे विक्री करण्याची कार्यवाही सुरु करावी.

प्राधिकरणाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही सुरु करावी.

बाब क्रमांक : २२९/१६

विषय :- सन् २००८-२००९ च्या अंदाजपत्रकात वाढीव तरतूद मंजूर करणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३५९ **दिनांक : २/०१/२००९**

एकमताने निर्णय घेतला कीं, मुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ यांनी प्रस्तावित केलेल्या रु. ६४.१५ लाख व रु. ४.२२ लाख च्या वाढीव तरतूदीस सन् २००८-२००९ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता सदर ठरावाच्या अंमलबजावणीस संमती देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२९/१७

विषय :- मे.संघवी, सनदी लेखापाल यांनी केलेल्या अपील फी ला मंजूरी देण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३६० **दिनांक : २/०१/२००९**

एकमताने निर्णय घेतला कीं, सन् २००३-२००४, २००४-२००५, २००५-२००६ करिता आयकर विभागाने आकारलेल्या रुपये २०३.०० कोटी पैकी रुपये ४.२३ कोटी एवढी रक्कम Under Protest भरणा केलेली रक्कम मे.संघवी, सनदी लेखापाल

यांनी अपिल करुन म्हाडाची बाजू योग्य रितीने मांडून भरलेला कर व्याजासहीत परत मिळविला असल्याने सदर रक्कम म्हाडास प्राप्त करुन देण्याबद्दल मे.संघवी यांनी मागणी केलेली अपिल फी रुपये ६,५०,०००/- रकमेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थाई करणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२९/१८

विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००७-०८ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३६१ **दिनांक : २/०१/२००९**

एकमताने निर्णय घेतला किं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन् २००७-२००८ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करुन सदर लेखा महालेखापाल यांना लेखा परीक्षणाकरिता पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाच्या अंमलबजावणीस संमती देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२९/२०

विषय :- सर्वे क्र.१२० सी.टी.एस.क्र.१३७४ अ वर्सोवा अंधेरी (प) येथील १०८८ उच्च उत्पन्न गटातील गाळयांच्या विक्री करीता प्रति चौ.फुटाचा दर निश्चित करणे.

ठराव क्रमांक : ६३६२ **दिनांक : २.०१.२००९**

एकमताने निर्णय घेतला की,

सर्व्हे क्रमांक १२०, सी.टी.एस. क्रमांक १३७४-अे, वर्सोवा अंधेरी (पश्चिम) येथील उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात आलेल्या सदनिकांची विक्री किंमत संदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक १२/६/२००६ रोजीच्या बैठक क्रमांक २१७ अन्वये पारीत झालेला ठराव क्रमांक ६२०४ रद्द करण्यात येत आहे तसेच प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ३०९४ दिनांक १६/११/१९९२ नुसार प्राधिकरणाच्या गाळे विक्रीच्या किंमती विषयक धोरणास अनुसरुन वर्सोवा येथील एच.आय.जी. गाळयांची विक्री किंमत काढण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थाई करण्याची वाट न पहाता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२९/२१

विषय :- अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) येथील म्हाडाच्या कमर्शिअल बिल्डिंग '' बी '' आणि '' सी '' विंग झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास मालकी हक्काने विकण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३६३ **दिनांक : २/०१/२००९**

एकमताने निर्णय घेतला कीं, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) येथील म्हाडाच्या कमर्शिअल बिल्डींग मधील " ए " वींग ऐवजी " बी " आणि " सी " वींग झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास रुपये ४७,२०,१७,५८०/- (रुपये सत्तेचाळी कोटी वीस लाख सतरा हजार पाचशे ऐंशी फक्त) एवढया विक्री किंमतीस मालकी हक्काने विक्री करण्याच्या प्रशासकीय निर्णयास प्राधिकरण कार्योत्तर मान्यता देत आहे.

कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता ठरावाच्या अंमलबजावणीस संमती देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२९/२२

विषय :- वांद्रे (पूर्व) येथील गांधीनगर वसाहतीत एम.आय.जी. क्रिकेट क्लब यांना खेळाचे मैदान व पॅव्हेलीयन, क्लबसाठी वितरीत केलेल्या भूखंडाच्या किंमतीचा फेरविचार करण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३६४ दिनांक : २/१/२००९

एकमताने निर्णय घेतला कीं, गांधीनगर, वांद्रे (पूर्व) येथील एम.आय.जी.क्रिकेट क्लब यांना पॅव्हीलियन व क्लबसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाच्या बाबत पब्लीक अकौंट कमिटीसमोर झालेल्या साक्षीनुसार फरकाची रक्कम रुपये ३७,४०,१७८/- एम.आय.जी. क्रिकेट क्लबकडून वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थाई करण्याची वाट न पहाता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२९/२३

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तात्पूरते संक्रमण शिबीराकरिता मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीत वितरीत केलेल्या भूखंड / जमिनीची भुईभाडे आकारणी व कालावधी या करिता न्यायालयीन निर्देश विचारात घेऊन घ्यावयाच्या निर्णयाबाबत.

ठराव क्रमांक : ६३६५ दिनांक : २/०१/२००९

एकमताने निर्णय घेतला कीं, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तात्पूरते संक्रमण शिबीराकरिता मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीत वितरीत केलेल्या भूखंड / जमिनीची भुईभाडे आकारणी व कालावधी या करिता न्यायालयीन निर्देश विचारात घेऊन श्री.ढोले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांना म्हाडा व विकासक यांची बाजू ऐकून घेण्याकरिता ट्रायल कोर्ट म्हणून प्राधिकृत केल्याने श्री.ढोले,

उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांनी दिलेल्या निर्णयानुसार व पीएसीच्या इतिवृत्तास अनुसरुन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बाब क्रमांक : २२९/२४

विषय :- नर्गीस दत्त मेमोरियन चॅरिटेबल ट्रस्ट यांना ओशिवरा येथील मुंबई मंडळाच्या अभिन्यासासाठी रुग्णालयाकरिता आरक्षित असलेल्या १०,०००.०० चौ.मि. भूखंडासाठी अधिमुल्य आकारण्याबाबत.

ठराव क्रमांक : ६३६६ दिनांक : २/०१/२००९

एकमताने निर्णय घेतला की, सदर प्रकरणी प्राधिकरण ठराव क्रमांक ५६५६ दिनांक ५/३/२००१ लागू होईल आणि ठराव क्रमांक ५९३१ दिनांक २१/६/२००३ हा लागू होणार नाही असे चर्चेअंती ठरले.प्राधिकरण ठराव क्रमांक ५८१८ दिनांक १२/७/२००२ अनुसार रुपये १/- नाममात्र अधिमुल्य न आकारता भूखंडास प्राधिकरण ठराव क्रमांक ५६५६ अनुसार येणारे अधिमुल्य रुपये ११,७०,६९,५३०/- नर्गिस दत्त मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेकडून वसूल करावे असे सर्वानुमते ठरले. तसेच या प्रकरणी प्राधिकरणाने रुपये १/- अधिमुल्य आकारुन भूखंड वितरीत करण्याचा निर्णय घेतलेला होता तथापी या प्रस्तावित निर्णयामुळे प्राधिकरणास किमान रुपये ११,७०,६९,५३०/- ही रक्कम मिळणार आहे. त्यामुळे सदर प्रकरणी शासनाने दिलेले निर्देश लक्षात घेऊन सदर रकमेवर व्याज आकारण्यात येवू नये असे सर्वानुमते ठरले.

सदर ठरावावर कार्यवृत्त स्थाई करण्याची वाट न पहाता कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२९/२५

विषय :- टेंबीपाडा भांडूप (प) येथील शिवमंदीर केदारे चौक ते तानाजीवाडी, रावते कंम्पाऊंड येथे पुलाचे बांधकाम करणे.

ठराव क्रमांक : ६३६७ **दिनांक : २/०१/२००९**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, टेंबीपाडा भांडूप (पश्चिम) येथील शिवमंदिर केदारे चौक ते तानाजीवाडी, रावते कंम्पाऊंड येथे पूलाचे बांधकाम करण्याकरिता मे.ओमसाई कन्स्ट्रक्शन यांची ५४ टक्के अधिकचा दर रु. ६७,४३,६७४ /- एवढया किंमतीची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यात येते.

बाब क्रमांक : २२९/२६

विषय :- मुंबई बेट शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे सर्व्हेक्षण करुन संगणीकृत माहिती तयार करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या निविदांबाबत.

ठराव क्रमांक : ६३६८ **दिनांक : २/०१/२००९**

एकमताने निर्णय घेतला कीं,

१. मुंबई बेट शहरातील १९,६४२ उपकरप्राप्त इमारतींचे सर्व्हेक्षण करुन तसेच बैठकीत देण्यात आलेल्या सुचनांनुसार बायोमेट्रीक पध्दतीचा अवलंब करुन संगणीकृत माहिती संकलीत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मंडळाने विभाग निहाय बोलाविलेल्या निविदेनुसार प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे निम्नतम निविदाधारकांना कामे वितरीत करण्यात यावीत. ज्या विभागामध्ये अवाजवी दर आले आहेत व निविदा प्राप्त झालेली नाही त्या विभागांमध्ये इतर विभागाच्या निम्नतम निविदाधारकांबरोबर वाटाघाटी करुन रु. १३०/- प्रति गाळा या दराने काम वितरीत करण्यात यावे.

२. सर्व्हेक्षणाचे तसेच संगणीकृत करण्याचे काम एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावे.

३. उपकरप्राप्त इमारतींबरोबरच मिल जमिनीवरील इमारतींचे सर्व्हेक्षण करुन घेण्यात यावे व त्यासाठी नगर विकास विभागाकडून संबंधित मिल मालकांकडे पत्र पाठवून सर्व्हेक्षणाबाबत माहिती दिल्यानंतर काम हाती घेण्यात यावे.

४. संगणीकृत करण्याच्या कामाचा डेटा सुरक्षीत ठेवण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व त्यासाठी सॉफटवेअर विकसीत करणा-या संस्थेची मदत घेण्यात यावी व त्यांना द्यावयाच्या फीबाबत स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

५. प्रत्येक इमारतीच्या साधारणतः ५० फुटापर्यंतची आजूबाजूची माहिती उदा.रस्ता, नाला किंवा स्थळ पहाणी नुसार उपलब्ध असेल ती नकाशासहीत माहिती संकलीत करुन जबाबदार अधिका-यांनी प्रमाणित करावी.

सदर ठरावावर कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

बाब क्रमांक : २२९ / २७

विषय : दिनांक २६ मे २००८ रोजी शासनाकडून दै.टाईम्स ऑफ इंडिया, दै.हिंदुस्थान टाईम्स आणि दै.पंजाब केसरी (हिंदी) या वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दिलेल्या जाहिरातीस व देयके अदा करणेस प्राधिकरणाची मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : ६३६९ **दिनांक : २/०१/२००९**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, दिनांक २६ मे २००८ रोजी शासनाकडून दै.टाईम्स ऑफ इंडिया, दै.हिंदुस्थान टाईम्स आणि दै.पंजाब केसरी (हिंदी) या वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दिलेल्या जाहिरातीस व एकूण रु. ५२,५४,४८०/- ची देयके अदा करणेसाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार सन् २००८-२००९ मध्ये अपेक्षित वाढीव खर्च रु. ५७ लाख विचारात घेता सन् २००८-२००९ साठी सुधारित अंदाजपत्रकीय तरतूद रु. ८७ लाख करण्यास मान्यता देण्यात येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थाईकरणाची वाट न पहाता करण्यास मान्यता देण्यात येते.

	ठराव क्रमांक	बैठक क्रमांक	ठराव क्रमांक
१६५	५५५१ ते ५५६०	१९१	५८७८ ते ५८९२
१६६	५५६१ ते ५५७२	अर्थसंकल्पीय विशेष बैठेक ५८९३ ते ५८९६	
१६७	५५७३ ते ५५८१	१९२	५८९७ ते ५९१७
१६८	५५८२ ते ५५९६	१९३	५९१८ ते ५९२६
१६९	५५९७ ते ५६०३	१९४	५९२७ ते ५९३३
१७०	५६०४ ते ५६२०	१९५	५९३४ ते ५९४३
१७१	५६२१ ते ५६३५	१९६	५९४४ ते ५९५९
१७२	५६३६ ते ५६३९	१९७	५९६० ते ५९६५
१७३	५६४० ते ५६५१	१९८	५९६६ ते ५९८४
१७४	५६५२ ते ५६६५	१९९	५९८५ ते ६००६
अंदाजपत्रकीय विशेष बैठक - ५६६६		२००	६००७ ते ६०१३
१७५	५६६७ ते ५६८०	अर्थसंकल्पीय विशेष बैठक ६०१४ ते ६०१५	
१७६	५६८१ ते ५७०३	२०१	६०१६ ते ६०२१
१७७	५७०४ ते ५७१४	२०२	६०२२ ते ६०३१
१७८	५७१५ ते ५७२३	२०३	६०३२ ते ६०४३
१७९	५७२४ ते ५७३२	२०४	६०४४ ते ६०६९
१८०	५७३३ ते ५७४८	२०५	६०७० ते ६०७६
१८१	५७४९ ते ५७५९	६०७७ क्र. ठराव नाही.	
१८२	५७६० ते ५७७६	२०६	६०७८ ते ६०८४
१८३	५७७७ ते ५७८७	२०७	
१८४	५७८८ ते ५७९७	२०८	
१८५	५७९८ ते ५८२८	२०९	
१८६	५८२९ ते ५८३८	२१०	
१८७	५८३९ ते ५८४८	२११	
१८८	५८४९ ते ५८५८	२१२	
१८९	५८५९ ते ५८६२	२१३	

१९०	५८६३ ते ५८७७	२१४	
२१५		२१६	
२१७		२१८	
२१९		२२०	
२२१		२२२	